तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

• समग्र वाङ्मय •

खंड-१०

प्रस्तावना संग्रह

संपादक

डॉ. सुनीलकुमार लवटे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय

खंड - १०

प्रस्तावना संग्रह

संपादक

डॉ. सुनीलकुमार लवटे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

सन २०२४

वाय १८२-१

▶▶ **पुस्तकाचे नाव :** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय
खंड - १० प्रस्तावना संग्रह

▶▶ **संपादक :** डॉ. सुनीलकुमार लवटे

▶▶ **आयएसबीएन :** ९७८-८१-९६८२६८-५-७

▶▶ **प्रथमावृत्ती :** २०२४

▶▶ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी मार्ग,
प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.

▶▶ **© प्रकाशकाधीन :**

▶▶ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

▶▶ **मुखपृष्ठ :** गौरीश सोनार

▶▶ **किंमत :** रुपये ४९१/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः संपादकांची व लेखकांची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

अध्यक्षीय मनोगत

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे संस्थापक अध्यक्ष होत. त्यांच्या कार्यकाळात (१९६० ते १९८०) मराठीत विविध विषयांचे ग्रंथ तयार करून प्रकाशित करण्यात आले. तसेच वैश्विक अभिजात साहित्य ग्रंथ भाषांतरित करून घेऊन ते प्रकाशित करण्यात आले. महत्त्वाच्या नियतकालिकांना प्रकाशन सातत्यार्थ अनुदान देण्यात आले. शिवाय समग्र वाङ्मय प्रकाशनाचा प्रारंभ झाला. आज मंडळ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय प्रकाशित करत आहे, याचा आनंद होत आहे. हा मंडळाचा महत्त्वपूर्ण व महत्त्वाकांक्षी प्रकल्प होय. तो सिद्ध केल्याबद्दल या प्रकल्पाचे संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे मंडळ ऋणी आहे, आणि त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते.

प्रकल्प संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय १८ खंडात संपादित करून प्रकाशनार्थ सादर केले आहे. सुमारे अकरा हजार पृष्ठांचे हे वाङ्मय वैविध्यपूर्ण आहे. यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित मराठी विश्वकोश नोंदी, भाषणे, लेख, मुलाखती, प्रबंध व चरित्रे (मराठी आणि संस्कृत), ग्रंथ प्रस्तावना, पुस्तक परीक्षण, पत्रे, संस्कृत हस्तलिखित ग्रंथ विवरण सूची, भारतीय राज्यघटनेचे संस्कृत भाषांतर यांचा समावेश आहे. शिवाय या प्रकल्पात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवनावर आधारित स्मृती व गौरव लेख आणि यांच्या साहित्यावरील समीक्षात्मक लेख अंर्तभूत करण्यात आले आहेत. प्रकल्पाच्या अंतिम खंडात तर्कतीर्थांच्या अप्राप्त साहित्याची सूची देण्यात आली आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याची सूची नसताना संपादकांनी हे वाङ्मय संकलित करून त्यांचे साहित्य प्रकार, स्वरूप, विषयाधारित वर्गीकरण करून सादर केले आहे. प्रत्येक खंडास स्वतंत्र व विस्तृत प्रस्तावना असल्याने तर्कतीर्थ वाङ्मयाची पीठिका प्रारंभीच वाचकास कळते. सर्व साहित्याचे पूर्वसंदर्भ देण्यात येऊन त्यांची क्रमागत प्रकाशन सूची प्रत्येक खंडाच्या शेवटी

देण्यात आली आहे. परिशिष्टात ऋणनिर्देशांतर्गत साहित्य संकलनास साहाय्यभूत ठरणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा कृतज्ञतापूर्वक उलेख करण्यात आला आहे. शिवाय तर्कतीर्थ जीवन परिचय, तर्कतीर्थ साहित्य व संदर्भग्रंथसूची, संपादक परिचय प्रत्येक खंडाच्या शेवटी देण्यात आला आहे. या अर्थाने व अंगांनी हा प्रकल्प परिपूर्ण व उपयुक्त बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे प्रकाशित, संपादित व भाषांतरित ग्रंथ आणि चरित्रे यापूर्वी वेळोवेळी प्रकाशित झाली होती. पण यात त्यांचे समग्र वाङ्मय संकलित नव्हते. या प्रकल्पात त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न संपादकांनी केला आहे., यामुळे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे समग्र जीवन, कार्य, विचार जिज्ञासू वाचक, अभ्यासक, संशोधकांना एकत्र उपलब्ध झाले आहे. तो या प्रकल्पाचा उद्देश होता. तो पूर्णत्वास गेल्याचा मंडळास आनंद आहे. प्रकल्पाच्या अठराव्या खंडाच्या शेवटी प्रकल्प परिचय पुस्तिका अंतर्भूत असून त्यामुळे समग्र प्रकल्प एका दृष्टिक्षेपात समजणे सुलभ झाले आहे. हा प्रकल्प जिज्ञासुंना उपयुक्त होईल अशी अपेक्षा आहे.

दि. ८ मार्च, २०२४
जागतिक महिला दिन

डॉ. सदानंद मोरे
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

संपादकीय

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पातील हा दहावा खंड. तो 'प्रस्तावनासंग्रह आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या समग्र वाङ्मयाची विधिवत सूची नसल्याने उपलब्ध संदर्भांद्वारे केलेल्या संकलनावरच अवलंबून राहावे लागते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या प्रस्तावना लेखनाचा प्रारंभ सन १९२८ ला झाला. सन १९२८ ला त्यांनी 'शुद्धिसर्वस्वम्' हा छोटा संस्कृत प्रबंध रचला. त्यास 'भूमिका' शीर्षकाखाली चार पृष्ठांची छोटी प्रस्तावना आहे. ती त्यांची पहिली प्रस्तावना असावी. त्यानंतर दशक भराच्या कालावधीनंतर ते रॉयवादी असल्याच्या काळात मानवेंद्रनाथ रॉय यांच्या मूळ इंग्रजीतील 'Historical Role of Islam' चे श्रीनिवास व्यंकटेश नखाते यांनी 'इस्लामी संस्कृतीचे क्रांतिकार्य' शीर्षकाने केलेले भाषांतर 'प्रकाश मंडळ'तर्फे दयार्णव कोपार्डेकर यांनी प्रकाशित केले. त्यास तर्कतीर्थांनी विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. ती अन्यांच्या ग्रंथास लिहिलेली पहिली प्रस्तावना असावी. सन १९६० मध्ये मराठी भाषेचे स्वतंत्र राज्य १ मे रोजी अस्तित्वात आले. तत्कालीन राज्य शासनाने पहिले मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या द्रष्ट्या राज्यकारभार करण्याच्या धोरणानुसार 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई' ची स्थापना केली. त्याचे संस्थापक अध्यक्ष म्हणून तर्कतीर्थांची नियुक्ती झाली. ते या पदावर सन १९८० पर्यंत कार्यरत राहले. या दोन दशकांच्या काळात त्यांनी मराठी भाषा व साहित्याच्या अभिवृद्धीसाठी अनेक (सुमारे २००) ग्रंथ निर्मिले असावेत. त्या ग्रंथांना अध्यक्ष या नात्याने 'निवेदन' शीर्षक प्रस्तावना लिहिण्याचा प्रघात होता. या सर्व ग्रंथांना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या प्रस्तावना आहेत. पैकी शंभरहून अधिक हाती आल्या. त्या साचेबंद राहिल्याने त्यातील विविधतानिदर्शक निवडक ३५ प्रस्तावना या खंडात समाविष्ट आहेत. उपलब्ध प्रस्तावनांची सूची परिशिष्ट क्र. २ मध्ये आहे. या सर्वांतून 'प्रस्तावनाकार' म्हणून तर्कतीर्थांचे मूल्यांकन करण्याचा प्रयत्न या खंडातून केला आहे.

या प्रस्तावनांच्या आधारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी एक व्यासंगी अभ्यासक, विचारक, समीक्षक म्हणून आपणापुढे येतात. त्यांची माझ्या कुवतीनुसार मीमांसा येथे केली आहे. परिशिष्टांमधून संदर्भ सूची पुरविली आहे. या सर्वांतून जिज्ञासू वाचकांना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या समग्र वाङ्मयाचा हा पक्ष व व्यक्तिमत्त्वाचे प्रस्तावनाकार रूप ध्यानी येईल असा विश्वास वाटतो.

या संदर्भ संकलनकार्यात साहाय्य करणाऱ्या सर्व व्यक्ती नि संस्थांचा मी ऋणी आहे.

१४ एप्रिल, २०२२ **- डॉ. सुनीलकुमार लवटे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती संपादक

अनुक्रमणिका

- अध्यक्षीय मनोगत .... तीन
- संपादकीय .... पाच
- प्रस्तावना : प्रतिभेचे आश्चर्यकारक विभ्रम! .... तेरा

प्रस्तावना संग्रह

(अ) संपादित साहित्य प्रस्तावना

१) **राजवाडे लेखसंग्रह** संपा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी १

२) **लोकमान्य टिळक लेखसंग्रह** संपा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी १७

३) **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह** ६२

धर्मकोश (विविध खंड) - संपा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

४) **व्यवहारकाण्डम् (खण्ड-१, भाग-१)** - व्यवहारमातृका ७१

५) **व्यवहारकाण्डम् (खण्ड-१, भाग-२)** - विवादपदानि (पूर्वार्ध) ८०

६) **व्यवहारकाण्डम् (खण्ड-१, भाग-३)** - विवादपदानि (उत्तरार्ध) ८३

७) **उपनिषत्काण्डम् (खण्ड-२, भाग-१)** -मंत्रब्राह्मणोपनिषत्
(इंग्रजी, संस्कृत, मराठी) ८५

८) **उपनिषत्काण्डम् (खण्ड-२, भाग-२)** ३१९

९) **उपनिषत्काण्डम् (खण्ड-२, भाग-३)** ३४६

१०) **उपनिषत्काण्डम् (खण्ड-२, भाग-४)** ३४९

११) **संस्कारकाण्डम् (खण्ड-३, भाग-१)** ३५०

12) **Discriptive Catalogue of Sanskrit Manuscripts (VOL-I)**- Tarkrateerth Laxmanshastri Joshi 352

(ब) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रकाशित ग्रंथ

१३) **प्राणिशास्त्र** - (प्राणिशास्त्र) डॉ. म. वि. आपटे ३५७

१४) **होमिओपॅथिक औषधांचा लक्षण** -(औषधशास्त्र) भावना कोश
- डॉ. श. रं. फाटक ३५९

१५) **मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ** - (रितीग्रंथ) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ... ३६२

१६) **धर्मरहस्य** - (धर्मशास्त्र) कै. डॉ. के. ल. दप्तरी ३६४

१७) **इंग्रजी-मराठी स्थापत्य-शिल्प कोश**- (कोश वाङ्मय) संपा. रा. वि. मराठे ... ३६८

१८) **गुजराती-मराठी शब्दकोश** - (कोश वाङ्मय) संपा. स. ज. धर्माधिकारी..... ३७०

१९) **धर्मशास्त्राचा इतिहास** - (धर्मशास्त्र) डॉ. पां. वा. काणे.
अनु. यशवंत आबाजी भट ३७३

२०) **आयुर्वेदीय महाकोश : अर्थात आयुर्वेदीय शब्दकोश : (संस्कृत-संस्कृत) (भाग १, २)** - (कोश वाङ्मय:) संपा. आयुर्वेदाचार्य वेणीमाधव शास्त्री एवं आयुर्वेद विशारद नारायण हरी जोशी ३७६
२१) **उर्दू-मराठी शब्दकोश** - (कोश वाङ्मय) संपा. श्रीपाद जोशी व प्रा. निजामुद्दीन एस. गोरेकर........ ३७९
२२) **बुद्धी, प्रेरणा आणि क्रांती** - (वैचारिक) मानवेंद्रनाथ रॉय. अनु. बा. रं. सुंठणकर........ ३८२
२३) **गुजराती भाषा प्रवेश** - (भाषा) भाऊ धर्माधिकारी ३८५
२४) **महात्मा फुले : समग्र वाङ्मय** - (समग्र वाङ्मय) संपा. धनंजय कीर व डॉ. स. गं. मालशे, डॉ.य.दि.फडके ३८७
२५) **वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा कोश** - (कोश वाङ्मय) प्राचार्य गो. रा. परांजपे ३९६
२६) **मानवी देह** - (शरीरविज्ञान) डॉ. म. वि. आपटे........ ४०१
२७) **कानडी साहित्य परिचय** - संपा. लेखक - (साहित्य) गु. व्यं. दिवेकर........ ४०३
28) **A Survey of Marathi Dilects : Gowadi of Goa** - (Linguistics) Dr. A. M. Ghatage........ 405
२९) **सामाजिक करार** - (राज्यशास्त्र) झ्याक रूसो. अनु. व. भ. कर्णिक........ ४०७
३०) **संगीत आणि कल्पकता** - (संगीतशास्त्र) आरन कोपलँड - अनु. श्रीधर हरी देशपांडे ४०९
31) **A History of Maratha Navy And Merchantship** -(History) Dr. B. K. Apate........ 411
३२) **स्वातंत्र्याविषयी** - (धर्मशास्त्र) जॉन स्टुअर्ट मिल. अनु. व. भ. कर्णिक........ ४१४
३३) **स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री** - (स्त्री अभ्यास) सौ. चंद्रकला ए. हाटे........ ४१६
३४) **बोस्तान (पुष्पवन)** - (काव्य) शेख सादी. अनु. गु. व्यं. दिवेकर........ ४१९
३५) **भूमिका-शिल्प** - (अभिनय) स्तानिस्लावस्की. अनु. के. नारायण काळे........ ४२१
३६) **खनिज तेले व तज्जन्य रसायने : एक सुबोध परिचय** - (खनिजविज्ञान) प्रा. प. म. बर्वे........ ४२५
३७) **बुद्धलीला** - (बौद्धधर्म) धर्मानंद कोसंबी - ४२७
38) **The Letters And Correspondance of Pandita Ramabai** - (Letters) Editor - Prof. A. B. Shah........ 435
३९) **पुरातत्त्वविद्या** - (पुराभिलेखशास्त्र) म. के. ढवळीकर........ ४३८
४०) **स्त्री रोग चिकित्सा** - (स्त्री रोगशास्त्र) डॉ. के. एम. मसानी. अनु. डॉ. मधुकर रानडे ४४१
४१) **सेनापती बापट वाङ्मय:** (समग्र वाङ्मय) समग्र ग्रंथ (खंड-२) ४४४

४२) **मोगल दरबाराची बातमीपत्रे (खंड-१)** - (इतिहास) कै. डॉ. जदुनाथ सरकार. -अनु. सेतुमाधवराव पगडी ४४८
४३) **महाराष्ट्रातील वन्य प्राणी** - (प्राणिशास्त्र) सौ. शैलजा रॉबर्ट ग्रब ४५१
४४) **जातककथासंग्रह (भाग १, २, ३)** - (बौद्ध साहित्य) धर्मानंद कोसंबी....... ४५४
४५) **वि. का. राजवाडे कृत ज्ञानेश्वरीची प्रस्तावना आणि ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण** - (काव्य आणि व्याकरण) संपा. शं. गो. तुळपुळे........... ४५८
४६) **सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेणी** - (इतिहास) डॉ. वा. वि. मिराशी.. ४६१
४७) **कबड्डी** - (खेळ) डॉ. नरेंद्र दाभोलकर ४६४

(क) अन्यांच्या ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना

४८) **इस्लामी संस्कृतीचे क्रांतिकार्य** - (वैचारिक) मानवेंद्रनाथ रॉय. अनु. श्री. व्यं. नखाते. ४६९
४९) **फासिझम** - (तत्त्वज्ञान) भाई मानवेंद्रनाथ रॉय. अनु. बा. कृ. गलगली ४७९
५०) **जातीय प्रश्नांची चर्चा (हिंदू-मुसलमानांचा प्रश्न)** - (भाषणसंग्रह) भाई मानवेंद्रनाथ रॉय - अनु. व. भ. कर्णिक ४९३
५१) **कै. वामन आबाजी मोडक यांनी रचलेली कीर्तने व आख्याने** - (कीर्तन, आख्यान, भक्तिगीत संग्रह) संग्राहक - नारायण वामन मोडक ४९५
५२) **महात्मा गांधी** - (महात्मा गांधी जीवन, तत्त्वज्ञान लेखसंग्रह) - प्रा. गोवर्धन पारीख ५०६
५३) **विचारकिरण (भाग-१)** - (अग्रलेखसंग्रह) ‘दीनमित्र’कार मुकुंदराव पाटील. ५१३
५४) **जीवनप्रवाह** - (आत्मकथनात्मक लेखसंग्रह) माधवराव बागल ५१७
५५) **डॉ. संतूजी रामजी लाड परिचय** - (चरित्र) ग. वा. खराटे...................... ५२२
५६) **राज्यशास्त्राचा विकास** - (राज्यशास्त्र इतिहास) स. मा. गर्गे.................... ५२४
५७) **नवमानवतावाद** - (तत्त्वज्ञान) मानवेंद्रनाथ रॉय. अनु. प्रा. गोवर्धन पारीख.... ५२९
५८) **सुशीलेचा देव** - (कादंबरी) प्रा. वा. म. जोशी..................................... ५३१
५९) **मेनका** - (कवितासंग्रह) यशवंत कानिटकर... ५३६
६०) **चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान** - (तत्त्वज्ञानेतिहास) प्रा. सदाशिव आठवले ५४५
६१) **श्री सोमनाथ तीर्थ** - (वृत्तांत) गौतमबुवा पाठक ५५९
६२) **सद्गुरू प्रसाद अर्थात् जीवन रहस्यदर्शन** - (धार्मिक) सदाशिव मनोहर जोशी ५६१
६३) **श्री दासबोध** - (मध्ययुगीन काव्य) समर्थ रामदास स्वामी ५६३
६४) **भारतीय साहित्यशास्त्रातील सौंदर्यकल्पना** - (भाषणसंग्रह) डॉ. ग. त्र्यं. देशपांडे ५७२

६५) **कल्पवन** - (कादंबरी) श्री. द. कुलकर्णी..५७६
६६) **रणगर्जना** - (भाषांतरित) भारतीय कवींचा प्रातिनिधिक काव्यसंग्रह............५७९
६७) महाराष्ट्र रामायण (महाकाव्य) भाषांतरित - आनंद साधले....................५८१
६८) कै. वेदशास्त्रसंपन्न, महामहोपाध्याय, मीमांसाभूषण
पंडित श्रीधरशास्त्री वारे - गौरवग्रंथ ५८३
६९) **भारतीय स्त्री** - (वैचारिक लेखसंग्रह) ५८५
७०) **विद्वद्रत्न डॉ. दप्तरी लेखसंग्रह (खंड-१)** - (लेखसंग्रह) संपा. गणेश महादेव डोळके
डॉ. यादव केशव दप्तरी ५९५
७१) **डॉ. भाऊ दाजी : व्यक्ती, काल व कर्तृत्व** - (स्मारक ग्रंथ)
अ. का. प्रियोळकर ५९९
७२) **'भारत छोडो' पर्व** - (इतिहास) पुंडलिकजी कातगडे.............................६०६
७३) **महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग** - (इतिहास) कै. नारायण कृष्ण गद्रे..............६१२
७४) **नाथ माधव : व्यक्ती आणि वाङ्मय** - (साहित्य समीक्षा)
डॉ. चारुशीला गुप्ते ६१४
७५) **महात्मा जोतीराव फुलेकृत 'सार्वजनिक सत्यधर्म'** - (पुस्तकसार)
संपा. रा. ना. चव्हाण ६१६
७६) **पुरोहितवर्गवर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास** - (सामाजिक इतिहास)
डॉ. सुमंत मुरंजन..६१८
७७) **विद्वद्रत्न डॉ. दप्तरी लेखसंग्रह (खंड-३)** - (भारतीय युद्धकाल निर्णय) लेखक - कै. डॉ. के. ल. उर्फ भाऊजी - संपा. प्रा. गणेश महादेव डोळके, डॉ. यादव केशव दप्तरी (लेखसंग्रह) ६२९
७८) **विचार-जागृती** - (वैचारिक लेखसंग्रह) डॉ. वा. दा. गाडगीळ..................६३३
७९) **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे** (काही आठवणी) -संपादक -
रा. ना. चव्हाण..६३५
80) **A Compendium of Molesworth's Marathi and English Dictionary**
- (Dictionary) Jems Thomas Molesworth.................................637
८१) **भगीरथ** - (कादंबरी) रवींद्र भट...६४०
८२) **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक धगधगीत व्यक्तिमत्त्व** - (चरित्र - जीवन व कार्य)
संभाजीराव पाटणे ६४६
८३) **संशोधन साधना** - (साहित्य संशोधन) डॉ. वसंत स. जोशी.......................६४८
८४) **तुमची नगरे** - (नगररचना) हेमचंद्र दयार्णव कोपर्डेकर.............................६५०
८५) **यशवंतराव : इतिहासाचे एक पान** - (चरित्र) रामभाऊ जोशी.................६५२
८६) **लोकानुवर्ती राज्यकर्ता : शंकररावजी चव्हाण** -
(चरित्र) पंढरीनाथ पाटील ६५८

८७) **ज्ञानदेव चिंतन** - (समीक्षात्मक लेखसंग्रह) संपा. डॉ. वसंत जोशी............. ६६३
८८) **श्री. रामचंद्र बाबूराव मेरूकर यांचे जीवनदर्शन** - (गौरवग्रंथ)
संपा. वसंत बोराटे ६७६
८९) **आचार्य धर्मानंद कोसंबी यांचे आत्मचरित्र आणि चरित्र** - (चरित्र / आत्मचरित्र)
ज. स. सुखटणकर... ६७८
90) **The World As Idea And Will -** (Anthology) Mohan R. Patil **..**683
९१) **सामर्थ्ययोगी रामदास -** (वैचारिक) प्रभाकर पुजारी **..............................** ६८५
९२) **कवी चोंभा विरचित 'उखाहरण'** - (काव्य) संपा. यु. म. पठाण ६९४
९३) **चार्वाक समीक्षा** - (तत्त्वज्ञान/लेख/भाषणसंग्रह) संपा. डॉ. गणेश थिटे ६९७
९४) **वागीश्वरी** - (नाट्यसमीक्षा) गो. के. भट ७०४
९५) **दलित साहित्य : एक अभ्यास** - (समीक्षात्मक लेखसंग्रह)
संपा. अर्जुन डांगळे ७०७
९६) **अशी आमुची वाई** - (इतिहास) प्रा. ग. ह. खरे आणि व. म. बोराटे........... ७११
९७) **आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास** - (इतिहास) ऋग्वेदी ७२२
९८) **वैदिक यज्ञ, मध्ययुगीन तंत्रसाधना आणि ज्ञानेश्वरप्रणीत भक्तियोग**
- (इतिहास) डॉ. स. रा. गाडगीळ.. ७२७
९९) **युगानुयुगे चाललेला ईश्वराचा शोध** - (धर्मशास्त्र) शंकरराव सावंत ७३५
१००) **आर्य** - (कादंबरी) वसंतराव पटवर्धन.. ७३९
१०१) **अक्षर-माधव (खंड २)** - (लेखसंग्रह) कै. माधव श्रीहरी तथा बापूजी अणे
- संपा. प्राचार्य राम शेवाळकर ७२५
१०२) **महाराष्ट्राची सत्त्वधारा** - (लेखसंग्रह) **(डॉ. रा. चिं. ढेरे अभिनंदन ग्रंथ)**
संपा. प्रा. गो. म. कुलकर्णी व वि. त्र्यं. शेटे ७५४
१०३) **शिव-समर्थ स्मरणमुद्रा (शिवछत्रपती आणि समर्थ रामदास त्रिशताब्दी गौरव ग्रंथ)** - (गौरव स्मरणिका) संपा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी........... ७६३
१०४) **पार्टी** - (आठवणी) ग. वा. बेहेरे.. ७६६
१०५) **हे तो देवाचे देणे** - (चिंतनात्मक विचारसंग्रह) संभाजीराव पाटणे............ ७६९
१०६) **चौफेर** - (स्फुटलेखन) माधव गडकरी.. ७७१
१०७) **दासशूद्रांची गुलामगिरी** - (तत्त्वज्ञान) शरद पाटील ७७६
१०८) **'कृतार्थ' : श्री महामूदमियाँ दारूवाले गौरवग्रंथ**
- (गौरवग्रंथ) संपा. वसंत बोराटे, प्रा. श्याम जोशी, प्रा. विजयकुमार फरांदे..... ७७८
१०९) **ही ज्योत अनंताची (सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण)**
- (चरित्र) रामभाऊ जोशी ७८०
११०) **बायबलचे मराठी अवतार** - (भाषांतर-विचार) एलायस रॉड्रिग्ज ७८२
१११) **प्राचीन भारतीय भौतिक विज्ञान** - (भौतिकशास्त्र) श्री. भि. वेलणकर..... ७८५
११२) **वादविमर्श** - (भाषणसंग्रह) संपा. प्राचार्य न. गो. काळे......................... ७८७

११३) **रा. ना. चव्हाण निवडक वाङ्मय** - (साहित्य) संपा. मो. नि. ठोके ७९४
११४) **पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य** - (इतिहास) जी. डी. (बापू) लाड.....८०१
११५) **डॉ. आंबेडकर : एक चिंतन** - (लेखसंग्रह) मधु लिमये.
अनु. अमरेंद्र नंदू धनेश्वर ८०५
116) **Essence of Royism (Anthology of M. N. Roys writing)**
- (Anthology) compiled by G. D. Parikh.................................810
११७) **समाजभूषण पुरुषोत्तम (पद्मश्री पु. पां. तथा बाबूराव गोखले चरित्र)** - (चरित्र)
ना. ल. गाडगीळ..८१२
११८) **वाल्मिकी रामायण : एक स्वतंत्र विचार** - (काव्य समीक्षा)
लालचंद हिराचंद...८१४
११९) **यशवंतराव चव्हाण : झुंझार नेतृत्वाचा शोध आणि बोध**
- (चरित्र) संभाजीबाबा थोरात...८२१
१२०) **विदेश दर्शन - यशवंतराव चव्हाण** - संग्राहक/संपादक - (पत्रसंग्रह)
रामभाऊ जोशी ८२४
१२१) **विद्वत्परमल (संस्कृत पंडित विवरणिका)** - (विवरणिका)
मोरेश्वरशास्त्री जोशी ८३२
१२२) **सोव्हिएत अंतरंग आणि सोव्हिएत-भारत मैत्री**
- (राजकीय) डॉ. अशोक मोडक ८३३
१२३) **'स्मृतिगंध' :** (आत्मचरित्र) श्रीमती गुणाबाई गाडेकर यांचे आत्मचरित्र.......८३६
१२४) **ज्ञानदेवांच्या वनश्रीतील पर्यावरण** - (निसर्ग) गजानन खोले.................८३८
१२५) **दिलखुलास** - (लेखसंग्रह) प्रवीण दवणे...८४१
१२६) **अक्षर -श्रद्धांजली** - (रा. ना. चव्हाण स्मृतिग्रंथ) संपा. वैशाली रमेश चव्हाण८४२
१२७) **दीपस्तंभ** - (लेखसंग्रह) प्राचार्य शिवाजीराव भोसले..............................८४४
१२८) **चंद्रफुलांची गाणी** - (काव्य) द. वि. केसरकर.....................................८४६
१२९) **छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र** - श्री. वा. सी. बेंद्रे......................८४८
१३०) **नवा युगधर्म** (वैचारिक) एम. एन. रॉय अनु. व्यं. रा. शिराळकर ८५०
१३१) **लोकमान्यटिळकचरितम् -** (चरितम्) कृ. वा. चितळे ८५५

❍ संदर्भ सूची

१) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षीय कारकिर्दीत प्रकाशित ग्रंथांची सूची...................८५९
२) प्रस्तावना संदर्भ सूची...८६९

❍ परिशिष्टे

१) ऋणनिर्देश...८८३
२) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी परिचय...८८६
३) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्यसंपदा व संदर्भग्रंथ सूची.................८९०
४) डॉ. सुनिलकुमार लवटे परिचय.. ९००

प्रस्तावना

प्रतिभेचे आश्चर्यकारक विभ्रम !

लेखक, ग्रंथकार, कोशकार, संपादक, अनुवादक असो किंवा कथात्मक वा कथेतर साहित्य लिहिणारा आपल्या रचना वा कृतीच्या विधिवत प्रारंभापूर्वी आपल्या लेखनाची भूमिका, उद्देश, स्वरूप विवेचन करणारा मजकूर लिहीत असतो. या मजकुरास स्थूल रूपाने प्रस्तावना, उपोद्घात, निवेदन म्हटलं जातं. पण आपली मराठी भाषा इतकी शब्दसंपन्न आहे, की तिच्यात प्रस्तावना-सदृश शब्दांची अनेक पर्यायवाची रूपे आढळतात, जसे की प्रारंभ, नांदी, प्रवेश, ओनामा, सूतोवाच, उपोद्घात, विषयप्रवेश इ. याशिवायही भूमिका, उद्देशिका, पूर्वभाष्य असे शब्द आहेतच.

संस्कृत साहित्यात काव्य, नाटक संदर्भात मूळ प्रस्ताव (प्रस्ताव:) शब्द येतो. प्रस्तावना शब्दाची संस्कृत व्युत्पत्ती प्र+ स्तु + णिच् +युच् + टाप अशी स्पष्ट करण्यात येते.[१] त्याचा अर्थ प्रारंभ असा होतो. इंग्रजीत यास Preface शब्द प्रचलित आहे. तो लॅटिन Prae and fatia पासून बनलेला आहे. मराठीप्रमाणेच इंग्रजीतही Preface शब्दाची अनेक पर्यायवाची रूपे दिसून येतात. जसे की, Abstract, Summary, Introduction, forword, Prologue इत्यादी. लेखक जेव्हा आपल्या लेखनकृती वा रचनेस स्वत: प्रस्तावना लिहितो तेव्हा त्याला Preface संबोधले जाते. अन्य लेखकाने लिहिलेल्या प्रस्तावनेस forward वा Introduction शब्द वापरला जातो. मराठीत या अर्थाने प्रशस्ती, प्रशंसा, पुरस्कार, ओळख शब्द वापरले जातात.

लेखक आपल्या प्रस्तावनेत पुस्तकाची कल्पना कशी सुचली, ते आकाराला कसं आलं, या लेखनाचा उद्देश काय याविषयी विवेचन करतो. शिवाय पुस्तक साकारण्यात साहाय्य करणाऱ्यांविषयी ऋणनिर्देश करत असतो. आपल्या लेखनकृतीची पार्श्वभूमी सांगत तो प्रस्तावनेतून वाचनाची जिज्ञासा वाढवतो, शिवाय त्याची मानसिक भूमिकाही तयार करत असतो. अशा प्रस्तावना औपचारिक, अनौपचारिक, संक्षिप्त, दीर्घ असतात.

प्रसंगी त्या विविध शैलीत (पत्र, प्रश्नोत्तर इ.) लिहिलेल्या आढळतात. कधी प्रस्तावनेत मूळ रचनेचं प्रतिबिंब असतं. लेखक आपल्या लेखनाचा प्रवास प्रस्तावनेत विशद करत असतो. काही प्रस्तावना विशेषत: ज्या संक्षिप्त असतात, त्या मोठ्या सूचक राहतात. प्रस्तावना लेखकस्वाक्षरी, स्थळ, काळ नोंदीने समाप्त करण्याचा प्रघात आहे. संशोधन, समीक्षा इ. स्वरूपाच्या ग्रंथांच्या प्रस्तावनेशेवटी संदर्भ सूची दिली जाते.

प्रस्तावनाकार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे चतुरस्र लेखक होत. त्यांचे भाषणसंग्रह, लेखसंग्रह, कोश, संपादने, भाषांतरे असे वैविध्यपूर्ण साहित्यिक ग्रंथ उपलब्ध असून त्यांना तर्कतीर्थांनी औपचारिक, अनौपचारिक, संक्षिप्त, दीर्घ प्रस्तावना लिहिल्याचे दिसून येते. त्यांच्या प्रस्तावना लेखनाचा धांडोळा घेत असताना लक्षात येते की सन १९२८ मध्ये त्यांनी आपल्या ग्रंथलेखनास सुरुवात केली, ती 'शुद्धिसर्वस्वम्' या संस्कृत ग्रंथापासून. त्या ग्रंथास 'भूमिका' शीर्षकाने चार पानांची प्रस्तावना आहे. ती तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेली पहिली प्रस्तावना होय. परंतु तिचे स्वरूप ग्रंथविषयाची पार्श्वभूमी वा स्पष्टीकरण देणारे आहे. त्यामुळे तिला रूढ अर्थाने प्रस्तावना म्हणता येणार नाही. तर्कतीर्थांनी विधिवत पहिली प्रस्तावना लिहिली, ती मानवेंद्रनाथ रॉयलिखित मूळ इंग्रजी ग्रंथ 'Historical Role of Islam' चा श्रीनिवास व्यंकटेश नखाते यांनी जुलै, १९३८ मध्ये 'इस्लामी संस्कृतीचे क्रांतिकार्य' शीर्षकाने जो मराठी अनुवाद करून प्रकाशित केला त्या ग्रंथास ११ जुलै १९३८ रोजी तर्कतीर्थांनी ही प्रस्तावना लिहिली तेव्हा ते सदाशिव पेठ, पुणे येथे बिऱ्हाड करून राहत होते. स्वत:च्या ग्रंथास लिहिलेली विधिवत प्रस्तावना सन १९४१ साली प्रकाशित 'जडवाद अर्थात अनीश्वरवाद' ग्रंथात पाहावयास मिळते. ती १० ऑक्टोबर १९४१ ला प्रकाशित झालेली आहे. त्यांच्या प्रस्तावना लेखनाचा काळ ११ जुलै १९३८ ते १८ मार्च १९९४ असा सुमारे ५७ वर्षांचा आहे. या काळात त्यांनी २०० हून अधिक ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्याचे आढळून आले आहे. विविध नियतकालिके, सूच्या, कोश इत्यादींच्या आधारे, शिवाय 'वाचनालय', 'संग्रहालय', 'साहित्य सहकार', 'साहित्य सूची', 'ललित' यांसारख्या नियतकालिकांतील संदर्भ यांच्या आधारे शोध घेण्याचा प्रयत्न केला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची समग्र साहित्य सूची अद्याप कुणी न करणे हा शोधातील मोठा अडथळा होय. ही मराठी संशोधन क्षेत्राची खरी शोकांतिका आहे. त्यामुळे साहित्य - अंधारात चाचपडत जे हाती आले त्यावरच समाधान मानण्याशिवाय पर्याय नव्हता नि नाही. ज्या २००हून अधिक प्रस्तावना हाती लागल्या; त्यातील निम्म्या तर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे अध्यक्ष असण्याच्या काळात (१८ नोव्हेंबर १९६० ते १ डिसेंबर १९८०) लिहिल्या गेल्या. त्यातील अधिकांश तरी 'निवेदन' रूपात असल्याने, ती निवेदने ग्रंथापेक्षा मंडळाच्या विविध योजना विशद करणाऱ्या, साचेबंद (Stereotype)

तीच ती माहिती पुन:पुन्हा देणाऱ्या आहेत. शिवाय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मंडळ अध्यक्षीय कार्यालयात एकूण किती ग्रंथ प्रकाशित झाले याची साद्यंत माहिती मिळून येत नाही. त्यामुळे मंडळाच्या संकेतस्थळी जे ग्रंथ अंतरजालावर उपलब्ध आहेत, ते एकेक करून चाळणे, शोधणे (Browse and Surf) मोठे कष्टप्रद व कंटाळवाणे काम होऊन जाते. अशातून हे उपलब्ध ४४४ ग्रंथ प्रस्तावना (निवेदने) चाळून मंडळामार्फत प्रकाशित १७० ग्रंथांना तर्कतीर्थांनी लिहिल्याचे दिसून येते. त्यांची सूची या खंडाच्या परिशिष्टात (क्रमांक - १) दिलेली आहे. ती जिज्ञासूंनी पाहावी. या खंडात द्विरुक्ती दोष टाळण्याच्या हेतूने निवडक नि प्रातिनिधिक प्रस्तावना (निवेदने) अंतर्भूत करण्यात आली आहेत. त्या कोणत्या ते अनुक्रमणिका व प्रस्तावना संदर्भ सूची (क्रमांक - २) न्याहाळल्यास लक्षात येईल. द्विरुक्तीचा दोष पत्करून तर्कतीर्थांच्याच शब्दात सांगायचे तर, ‘एकूणच मराठी व्यासंगाचा व विद्वत्तेचा कस व शिस्त समाधानकारक नाही.’[२] त्यामुळे कष्टप्रद शोधावरच भिस्त ठेवावी लागते. खरं तर हा सारा प्रकल्प डोंगर खोदण्याचेच काम झाले आहे. जतन, दस्तऐवजीकरण, सूची व कोश निर्मिती या क्षेत्रात विविध विद्यापीठांमधील मराठी अधिविभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मराठी राजभाषा संस्था व तिचे मध्यवर्ती ग्रंथालय (बदलापूर), महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालय अनुदानित ग्रंथालये, मराठी संशोधन संस्था यांनी संयुक्तपणे भविष्यकाळात हे कार्य हाती घेणे आवश्यकच नाही तर अनिवार्य आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेल्या समग्र प्रस्तावनांचा विचार करता त्या तीन प्रकारच्या दिसून येतात- अ) स्वत:च्या ग्रंथ, कोश, संपादनांना लिहिलेल्या, ब) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाद्वारे प्रकाशित ग्रंथांना निवेदन रूपात लिहिलेल्या प्रस्तावना, (क) अन्य लेखकांच्या ग्रंथ, स्मरणिका, गौरवग्रंथ, संपादित ग्रंथ, कोश इत्यादींना लिहिलेल्या प्रस्तावना.

स्वत:च्या ग्रंथ, कोश, संपादने इ. च्या प्रस्तावनांचा विचार या प्रकल्पात त्या ग्रंथांचा ज्या खंडात अंतर्भाव करण्यात आला आहे, तेथे करण्यात आला आहे. उर्वरित प्रस्तावनांची मीमांसा येथे करण्यात आली आहे. या खंडाच्या परिशिष्टात (क्र. ३) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या समग्र साहित्याची सूची देण्यात आली असून प्रत्येक ग्रंथापुढे प्रस्तावनासंबंधी सूचना आहे. जिज्ञासूंनी ते परिशिष्ट पाहावे.

(अ) संपादित साहित्य प्रस्तावना

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची ग्रंथसंपदा विपुल आहे. परंतु त्यापेक्षा अधिक साहित्य असंकलित असल्याने हा समग्र वाङ्मय प्रकल्प मुख्यत: हाती घेण्यात आला आहे. तर्कतीर्थांनी केलेलं लेखन संस्कृत, मराठी, इंग्रजी, हिंदीत उपलब्ध आहे. त्यातील

काही मूळ तर काही भाषांतरित. त्यांनी मूळ लेखन संस्कृत, मराठीत केलेलं आहे. इंग्रजी, हिंदीतील लेखन भाषांतरित असावं. काही ठिकाणी भाषांतरकारांच्या नोंदी आहेत, काही ठिकाणी नाही हे भाषांतरकारांशी झालेल्या प्रत्यक्ष भेट, चर्चा, नोंदीतून स्पष्ट होतं. त्यांची प्रकाशित ग्रंथसंपदा निबंध, भाषण, लेख, चरित्र, कोश, लेखसंग्रह, सूची, तत्त्वज्ञान अशा साहित्य प्रकार नि विषयांवर आधारित आहे. पैकी काही संग्रह आहेत तर काही संपादने. यातील काहींना त्यांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत, तर काहींना नाही. प्रस्तावना असलेली ग्रंथसंपदा खालीलप्रमाणे असून त्यांच्या प्रस्तावना ते ग्रंथ या प्रकल्पातील ज्या खंडात समाविष्ट करण्यात आले आहे, तिथे त्यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. उर्वरित प्रस्तावना या खंडात अंतर्भूत आहेत. त्याची सूचना खाली त्या त्या ग्रंथांसमोर देण्यात आली आहे -

१) **शुद्धिसर्वस्वम्** (संस्कृत निबंध) (खंड-११ मध्ये समाविष्ट)
२) **जडवाद अर्थात् अनीश्वरवाद** (तत्त्वज्ञान) (खंड-११ मध्ये समाविष्ट)
३) **हिंदुधर्माची समीक्षा** (भाषणसंग्रह) (खंड-३ मध्ये समाविष्ट)
४) **वैदिक संस्कृतीचा विकास** (भाषणसंग्रह) (खंड-५ मध्ये समाविष्ट)
५) **राजवाडे लेखसंग्रह** (लेखसंग्रह संपादन) (या खंडात अंतर्भूत)
६) **लोकमान्य टिळक लेखसंग्रह** (लेखसंग्रह संपादन) (प्रस्तावना खंडात अंतर्भूत)
7) **Discriptive Catalogue of Sanskrit Manuscripts (Part I)** (Foreword is included in this volume) (खंड-१४ मध्ये समाविष्ट)
८) **आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत** (भाषणसंग्रह) (खंड - ४ मध्ये समाविष्ट)
९) **तर्कतीर्थ लेखसंग्रह (खंड-१)** (लेखसंग्रह) (या खंडात अंतर्भूत)
१०) **ज्योतिचरित्र** (चरित्र) (खंड-१२ मध्ये समाविष्ट)
११) **मराठी विश्वकोश** (नोंदसंग्रह) (खंड-१ मध्ये समाविष्ट)
१२) **धर्मकोश** (मीमांसा कोश) (या खंडात अंतर्भूत)

इथे देण्यात आलेल्या प्रस्तावनांव्यतिरिक्त ज्या प्रस्तावना उपरोक्त विविध खंडांत अंतर्भूत वा समाविष्ट आहेत, तिथे त्या प्रस्तावनांची चर्चा अभावाने दिसेल. इथे वरील सर्व बारा ग्रंथांच्या प्रस्तावनांची चर्चा, विवेचन, मीमांसा करण्यात आली आहे.

१) शुद्धिसर्वस्वम् (१९२८)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे सन १९१४ ते १९१९ अशा पाच वर्षांच्या कार्यकालात आपले गुरू नारायणशास्त्री मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती यांचेकडे प्राज्ञपाठशाळा, वाई येथे व्याकरण, न्याय, वेदांत शिकले. यातील उच्च शिक्षण घ्यायचे म्हणून त्यांनी काशीस प्रयाण केले. तिथे ते चतु:शास्त्री असलेल्या नित्यानंद पर्वतीयशास्त्री, राजेश्वरशास्त्री द्रविड, वामाचरण भट्टाचार्य इ. पंडितांकडून शिक्षण घेऊन व्याकरण, न्याय, मीमांसा आणि वेदान्ताचे

उच्च शिक्षण घेतले. त्या आधारे कलकत्त्याच्या शाासकीय संस्कृत महाविद्यालयातून सन १९२३ साली त्यांनी 'तर्कतीर्थ' पदवी संपादन केली व परत वाईस येऊन प्राज्ञपाठशाळेत वेदातील षट्‌दर्शने, तर्कशास्त्र, न्याय, वेदान्त शिकवू लागले. ते कार्य १९३० पर्यंत चालले. दरम्यानच्या काळात आपले गुरू नारायणशास्त्री मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली तर्कतीर्थांनी सन १९२३ पासून धर्मसुधारणा चळवळीचे कार्य हाती घेतले. यावर्षी (१९२३) वाईत ब्राह्मण पोटजातीची परिषद संपन्न झाली. यात मुख्य विषय होता पोटजातीतील एकीकरण धर्मसंमत वा ग्राह्य मानायचे का? सनातनी पंडितांचा यास नकार होता. नारायणशास्त्री मराठे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सुधारणावादी विचाराचे असल्याने असे एकीकरण ग्राह्य मानत व त्यासाठी शास्त्रातील पुरावे देत. असे प्रसंग पुढे वारंवार येऊन वादविवाद अटळपणे होत राहिला.

पुढे सन १९२६ ला (माघ, शके १८४७) सोनगीर, जि. धुळे येथे केशवदत्त महाराजांच्या पुढाकाराने धर्म परिषद संपन्न झाली. ही परिषद धर्मसुधारणेसंबंधीच्या विविध प्रश्नांवर धर्मपंडितांची मते जाणून घेण्यासाठी योजण्यात आली होती. इथे तर्कतीर्थांनी धर्मसुधारणांच्या बाजूने मत व्यक्त केले होते. पुढे या मतसंग्रहावर आधारित एक ग्रंथ अनंत कृष्णशास्त्री यांनी 'धर्मप्रदीप:'[३] नावाने प्रकाशित केला. त्यात चार भाग होते - १) प्रमाणप्रकाश: २) जातितत्त्वप्रकाश: ३) शुद्धितत्त्वप्रकाश: ४) विवाह प्रकाश:. पैकी तिसरा भाग असलेल्या 'शुद्धितत्त्वप्रकाश:'चा प्रतिवाद वा खंडन करण्यासाठी तर्कतीर्थांनी लिहिलेला निबंध म्हणजे 'शुद्धिसर्वस्वम्' होय. या निबंधात तर्कतीर्थांनी शुद्धीकरणासंबंधी सुधारवादी मत मांडले आहे. पूर्वी शुद्धीकार्याला विरोध असणाऱ्या सनातनी पक्षाकडून शुद्धीकरणासाठी अगडबंब प्रायश्चित्त सुचवले जात असे. जी पतित वा धर्मांतरित वा संसर्गी व्यक्ती असे ती प्रायश्चित्त ऐकून भीक नको पण कुत्रे आवर असे मनात म्हणून पतित राहणे पसंत करीत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या या ग्रंथ वा निबंधातून जिथे साम्याने किंवा अतिदेशाने (सादृश्याने) प्रायश्चित्त सांगितले असेल तेथे अर्धे प्रायश्चित्त सुचवले. इतकेच नव्हे तर प्रायश्चित्ताच्या अतिरेकास शह देण्यासाठी पतित वा पातक संतती (जी मूलत: निर्दोष असते, तिला खरे तर प्रायश्चित्ताची गरज असता नये) यासाठी एक तृतीयांश प्रायश्चित्त सुचवले आहे. विशेष म्हणजे यासाठी शास्त्राधार नमूद केले आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींच्या 'शुद्धिसर्वस्वम्'ची प्रशंसा करत सदाशिवशास्त्री भिडे यांनी लिहले आहे की, ''प्रदीपकारांनी लोकसंग्रहाची कल्पनादेखील आपल्या मनास शिवू द्यावयाची नाही असा जणू निश्चयच केला आहे असे दिसते. शुद्धिकार्याला विरोध करण्याच्या भरात येऊन अस्पृश्यांपेक्षा म्लेंच्छ (म्हणजे मुसलमान, युरोपियन वगैरे जाती) धर्मदृष्ट्या उच्च होत असे बेधडक विधान केले आहे! या विधानाचा कोणीही तिरस्कारपूर्वक धिक्कारच करील. पण तसे काही न दर्शवता श्री. जोशी यांनी शास्त्रीय शब्दांनीच त्यांच्या सर्व विधानांचे खंडन केले आहे.''[४]

या ‘शुद्धिसर्वस्वम्’ निबंध ग्रंथास तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ‘भूमिका’ शीर्षकाची प्रस्तावना लिहिली आहे, ती खरे तर वरील वर्ण्यविषयाचे (शुद्धी) विवेचन आहे; पण ते समजून घ्यायचे तर वरील सर्व पार्श्वभूमी प्रथम समजून घेणे आवश्यक असल्याने उपरोक्त विवेचन केले आहे. या भूमिकेत त्यांनी मांडले आहे की हिंदू धर्मातून ज्या काही व्यक्ती बाहेर पडल्या वा त्यांना बाहेर पाडले गेले त्यांना पुन्हा धर्मात प्रवेश करता येईल की नाही याबद्दल धर्मवेत्ते संभ्रमात आहेत. श्रुती, स्मृती, पुराण इ. चा अभ्यास करूनही अशा धर्मभ्रष्टांना पुन्हा धर्मात येण्याचा शास्त्रसंमत मार्ग नाही अशी त्यांची धारणा असते. हे मत शास्त्र नीट अभ्यासले नसल्याने असते. अन्य धर्म स्वीकारल्याने त्या व्यक्तीस नास्तिकाचा दोष लागतो. पण त्याच्या निरासाचे जे उपाय आहेत, ते अतिशयोक्त केले जातात. त्याची सोदाहरण मीमांसा या भूमिकेत आहे. ही उदाहरणे जात, धर्म, संबंध, नैतिकता इ. अंगाने करत स्पष्ट केले आहे की, यात मानवीय सहानुभूती ऐवजी शब्द प्रमाण, पारंपरिक निष्ठुरता अधिक असते. काही प्रसंगी तर निरपराधांनाही याचा त्रास सोसावा नि भोगावा लागतो. म्हणून लोकाचार समन्वय हाच त्यावर रामबाण उपाय होय. शास्त्रप्रामाण्य व लोकाचारात समन्वय हा करुणासागर समाज विद्वानांनी दाखवून भारतीयत्व जपावे असे आवाहन या भूमिकेत आहे. ‘शुद्धिसर्वस्वम्’ चा हा प्रबंध या विचारावर उभा आहे. ही प्रस्तावना म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या समन्वयी व्यक्तिमत्त्वाची साक्ष होय.

२) जडवाद अर्थात् अनीश्वरवाद (१९४१)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या व्यक्तिमत्त्व व विचार-विकासाचा अभ्यास करताना लक्षात येते की, त्यांच्या जीवनाच्या २० ते ६० वयवर्षांच्या काळात मोठी स्थित्यंतरे घडून आली. संस्कृत पंडित, धर्मसुधारक, क्रांतिकारी, सत्याग्रही, स्वातंत्र्यसैनिक, काँग्रेसी गांधीवादी, मार्क्सवादी, रॉयवादी नि परत काँग्रेसी नि गांधीवादी असा परिवर्तनाचा परीघ राहलेला आहे. अहिंसा, हिंसा, क्रांती, परिवर्तन, हृदयपरिवर्तन, विकासवादी अशी मूल्यात्मक घडण नि चढउतार त्यांनी अनुभवले आहेत. सन १९३७ ते १९४८ हा काळ त्यांच्या जीवनातला मार्क्सवाद, रॉयवाद नि नंतर नवमतवाद असा वैचारिक क्रांतीचा राहिला आहे. या काळात मानवेंद्रनाथ रॉय त्यांचे गारूड त्यांच्यावर होते. नारायणशास्त्री मराठे तथा केवलानंद सरस्वती, महात्मा गांधी व मानवेंद्रनाथ रॉय या तिघांना ते आपल्या जीवनाचे प्रेरणास्थान मानत. धर्मसुधारणा, स्वातंत्र्य आणि परिवर्तन या तिन्हीत स्थित्यंतर हा स्थायीभाव राहिला आहे. मानवेंद्रनाथ रॉय यांनी सन १९४० मध्ये 'Materialism'[५] नावाचा इंग्रजी ग्रंथ लिहिला. त्यापासून प्रेरणा घेऊन मराठी वाचकांसाठी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ‘जडवाद अर्थात् अनीश्वरवाद’ शीर्षक ग्रंथ लिहिला.

या ग्रंथाच्या प्रस्तावनेत स्पष्ट केल्याप्रमाणे मराठी साहित्यिक य. गो. जोशी यांनी विविध विद्वानांना विविध वादावर लिहायला सांगून ‘वादविवेचनमाला’ प्रकाशित केली होती. या

मालेतील हे ११वे पुष्प होय. पां.वा. गाडगीळ या मालेचे संपादक म्हणून कार्य करीत होते. य. गो. जोशी यांनी तर्कतीर्थांना जडवादावर लिहिण्याविषयी सुचवले होते. तेव्हा तर्कतीर्थांनी त्यांना समजावले की, जडवाद हा अनीश्वरवाद सांगितल्याशिवाय कळू शकत नाही. हे दोन्ही वाद म्हणजे एकाच विचाराच्या दोन बाजू होत. जडवाद हा त्याचा सकारात्मक पक्ष (Positive) आहे तर अनीश्वरवाद वा नास्तिकवाद त्याचे अभावात्मक रूप (Negative) होय.

जडवादाच्या प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी ही विचारधारा संक्षेपाने परंतु साक्षेपाने मांडली आहे. त्यांचे म्हणणे होते की विधायक कल्पनेवरच अभावात्मक कल्पना अवलंबून असते. जी माणसे विज्ञानाची बौद्धिक भूमिका नीट लक्षात घेतात, त्यांच्या मनोभूमीत ईश्वर वासच करू शकत नाही. हा ग्रंथ म्हणजे तात्त्विक जडवादाची प्रस्तावनाच होय. जग नि जीवन नीट समजून घेण्यासाठी जड (Matter), जीव (Life) आणि चेतन (Mind or Soul) ही तत्त्वे समजून घेणे आवश्यक असते. सगळे वाद-विचार खरे तर या तत्त्वांच्या संबंधांचीच परोक्ष-अपरोक्ष चर्चा करीत असतात.

सदरचा दीर्घ निबंध वा ग्रंथ लिहिण्यामागे तर्कतीर्थांची विशिष्ट दृष्टी होती. विसाव्या शतकाचा पूर्वार्ध हा धर्मसुधारणांना गती देणारा काळ राहिला आहे. समाज युरोपातील प्रबोधन पर्व नि पुनरुज्जीवन पर्व यातून जसा प्रगल्भ, भौतिकवादी, पुरोगामी बनला तसा भारत बनायला हवा अशी तळमळ या लेखनामागे होती. पहिल्या महायुद्धानंतरचा बदलता सोविएत नि दुसऱ्या महायुद्धानंतरचा उभा राहू पाहणारा जपान तर्कतीर्थांच्या पुढे होता. वेदाध्ययनातून पौर्वात्य विचारधारा वा वाद तर्कतीर्थ कोळून प्यालेले होते. स्वातंत्र्यलढ्यातील तुरुंगवासात कर्णिक बंधूंच्या संपर्कामुळे (द्वा. भ. कर्णिक आणि व. भ. कर्णिक) मार्क्सवाद ते समजू लागले होते. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या सहवासामुळे तर तर्कतीर्थांच्यात वैचारिक कायाकल्पच घडून आलेला होता. त्यामुळे भारत हा पुरोगामी बनला पाहिजे अशी पक्की खूणगाठ त्यांच्या मनाने स्वीकारली होती. जडवाद वा अनीश्वरवाद स्वीकारल्याशिवाय तरणोपाय नाही याची खात्री त्यांना पटलेली होती. त्याची कबुली देत 'जडवाद अर्थात् अनीश्वरवाद'च्या प्रस्तावनेचा समारोप करत तर्कतीर्थ म्हणतात की, ''आपली प्रगती जडवादावाचून अडून राहिली आहे. जडवादाने आपल्या विचारक्षेत्रात व वाङ्मयक्षेत्रात प्रवेश केल्याशिवाय आपल्या बुद्धीचे जाड्य नष्ट होणार नाही. ज्या बुद्धीस जडवादाचे आकलन होत नाही, ती जड असते. आपल्या सामाजिक बुद्धीतील व कर्मातील मांद्य व आंध्य नष्ट करण्यास तात्त्विक जडवादच समर्थ आहे. तात्त्विक जडवाद हा कलात्मक कर्म व ज्ञान-रूप विचार यांचा बलवान असा आधार आहे. त्याच्याशिवाय, ईश्वरवादाच्या सोनेरी व सुंदर आवरणाखाली दडलेल्या सामाजिक अन्यायाचा व मानवी दास्याचा शुद्ध बुद्धीच्या न्यायासनासमोर निकाल लागणार नाही.''[६]

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या 'जडवाद' या छोट्या पुस्तकाने महाराष्ट्रात मात्र मोठी क्रांती केली. प्रा. नरहर कुरुंदकर आपल्या नास्तिक होण्याचे श्रेय या ग्रंथास देतात. ते एका मुलाखतीत म्हणतात की, ''पुस्तकाच्या दृष्टीने अत्यंत प्रभावित झालो ते लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या 'जडवाद' या पुस्तकामुळे. ...मी जडवादी झालो आणि नंतर नास्तिक झालो. स्नान शिल्लक राहिलं, संध्या संपली.''[७]

३) हिंदुधर्माची समीक्षा (१९४१)

हे पुस्तक म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९४० मध्ये नागपूर विद्यापीठ आयोजित 'श्री श्रीधर गणेश परांजपे व्याख्यानमाला' अंतर्गत दिलेल्या तीन भाषणांचा संग्रह होय. या ग्रंथास तर्कतीर्थांनी प्रथम आवृत्ती (१९४१) आणि तृतीय आवृत्ती (१९८४) अशा दोन प्रस्तावना लिहिल्या आहेत.

पहिल्या प्रस्तावनेनुसार या व्याख्यानांद्वारे तर्कतीर्थांनी हिंदू धर्माची ऐतिहासिक व समाजशास्त्रीय समीक्षा केली आहे. धर्म समीक्षा धर्मविध्वंसक नास्तिक्य मानले जाते, हा चुकीचा दृष्टिकोन आहे. कार्ल मार्क्सने म्हटले होते की सर्व समीक्षेचा खरा प्रारंभ धर्म समीक्षा होय. (The criticism of religion is a begining of all criticism.) हिंदुधर्मसमीक्षा ग्रंथाची ही प्रेरणा आहे. हा ग्रंथ तर्कतीर्थांनी मार्क्सवादी दृष्टीने लिहिला आहे. पहिल्या व्याख्यानात त्यांनी समाजरचनेचे नियम, संस्कृती व धर्म यांची गल्लत करण्याची अनेक पंडितांना सवय असते. त्यामुळे घोटाळे होतात. म्हणून यात त्यांनी समाजरचना, संस्कृती व धर्म यांच्या संबंधांवर प्रकाश टाकला आहे. दुसऱ्या व्याख्यानात धर्माची व्याख्या व धर्माच्या ज्ञानाचे साधन यासंबंधी प्राचीन भारतीय तत्त्ववेत्त्यांनी जी अत्यंत सूक्ष्म व मूलगामी चर्चा केली आहे तिचा परामर्ष घेण्यात आला आहे, तर तिसऱ्या व्याख्यानात हिंदू धर्माच्या सामान्य व विशेष स्वरूपाची, अंगोपांगांची, विविध व विचित्र शाखोपशाखांची, ऐतिहासिक क्रमाची आणि ऐतिहासिक कार्यकारणपरंपरेची मांडणी केली आहे.

तर्कतीर्थांच्या मतानुसार हिंदू धर्मावर टीका करणे हे फारच जबाबदारीचे व अनेक कारणांस्तव अवघड काम आहे. पण अशी टीका केली नाही तर धर्म अंधश्रद्धेच्या आहारी जाण्याचा धोका असतो. धर्मात सुधारणा आवश्यक असते व टीकेतून ती होते. या प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी नमूद केले आहे की, ''स्वत:च्या परंपरेच्या विरुद्ध बंड करणारा बुद्धिवादच स्वत:च्या राष्ट्रात व समाजात उच्चतर स्थित्यंतर घडवून आणू शकतो. परंतु पूर्वपरंपरेचे लंगडे समर्थन करणाऱ्या विचारसरणीसच भारतीय समाजात अग्रपूजेचा मान आहे. परंपरा गत मूल्यांची तपासणी करणारी, जुन्या संस्था, जुने विचार आणि जुने आचार यांची दयामाया न ठेवता शास्त्रीय रीतीने छाननी करणारी, चालू समाजरचना आणि धर्म यांच्यावर बौद्धिक हल्ला करणारी व सामाजिक नवजीवनास प्रसविणारी चिकित्सा सोसण्याइतके मानसिक बल फार थोड्या भारतीयांच्या ठायी शिल्लक आहे.''[८] तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

यांच्या सारखे पुरोगामी तत्त्वचिंतकच शास्त्ररूपी शस्त्रांनी असा मुकाबला करत समाज पुढे नेत असतात.

आज आपण या ग्रंथ प्रकाशनाच्या सहा दशकांनंतर हिंदू धर्मात ज्या सुधारणा पाहतो त्यात या ग्रंथाचा सिंहाचा वाटा आहे. हा ग्रंथ प्रकाशित झाला तेव्हा अनुकूल, प्रतिकूल अशी मोठी चर्चा दीर्घकाळ होत राहिली. वादविवाद झाले. पण अंतिमत: सुधारणावादी विचारांचीच सरशी कालौघात समाजात होत राहते. रूळ बदलताना खडखडाट होतोच, म्हणून कधी कोणी घड्याळाचे काटे उलटे फिरविल्याचा इतिहास नाही. डॉ. केशव लक्ष्मण दप्तरी, ना. गो. चाफेकर, गो. रा. राजोपाध्ये, वि. वि. दीक्षित, कॉम्रेड शरद पाटील, डॉ. यशवंत मनोहर प्रभृती मान्यवरांनी या ग्रंथाचे परीक्षण व समीक्षा केलेली आहे. डॉ. के. ल. दप्तरी व तर्कतीर्थांचा या प्रश्नी झालेला पत्रव्यवहार प्रसिद्ध आहे. या ग्रंथाचे योगदान अधोरेखित करत डॉ. यशवंत मनोहर यांनी म्हटले आहे की, 'हिंदुधर्माची समीक्षा' या पुस्तकात एकूणच धर्मसंस्थेची चर्चा जागतिक पातळीवरून तर्कतीर्थांनी केली आहे. धर्माची निर्मिती माणूस केव्हा करतो, धर्माचा उपयोग स्वत:च्या वर्चस्वासाठी धुरीण कसे करतात आणि मूल्यदृष्ट्या धर्माचा ऱ्हास कसा होतो याची आणि संस्कृतीचीही अत्यंत रेखीव चर्चा तर्कतीर्थांनी या प्रबंधात केली आहे. ती करताना जगातल्या तत्त्वज्ञांच्या आणि वैज्ञानिकांच्या साक्षी नोंदवल्या आहेत. भारतीय तत्त्वज्ञान आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञान या दोन्हींचा त्यांचा तलस्पर्शी व्यासंग होता. विज्ञानाच्या तथ्यांशी आणि आधुनिक ज्ञानमीमांसेतील सत्याशी भारतीय तत्त्वज्ञान कुठे व कसे जुळते ते पाहण्याचा ध्यास शास्त्रीजींनी घेतला होता. या ज्ञानमीमांसेचे प्रत्यंतर आपणास 'हिंदुधर्माची समीक्षा' या पुस्तकात येते.''[९]

'हिंदुधर्माची समीक्षा'च्या सन १९८४ च्या तिसऱ्या आवृत्तीस लिहिलेली प्रस्तावना त्यांच्या 'सर्वधर्मसमीक्षा' या सन १९७६ च्या मुंबई विद्यापीठ आयोजित सेनापती बापट व्याख्यानमालातील दोन भाषणांसह अंतर्भूत ग्रंथाचीपण आहे. या व्याख्यानमालेत नंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'धर्माचे मानसशास्त्र व समाजशास्त्र' विषयावरील व्याख्यान सन १९७९ मध्ये दिले होते. ते या 'सर्वधर्मसमीक्षा' ग्रंथात नाही. मात्र आपला हा जो 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्प आहे, त्याच्या तिसऱ्या खंडात ते 'सर्वधर्मसमीक्षा' ग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहे.

तर ही जी सुधारित म्हणण्यापेक्षा नवी, स्वतंत्र प्रस्तावना आहे, तीत ते समजावतात की, फ्रेंच इहवादी तत्त्ववेत्ता ऑगस्ट कोंतच्या मतानुसार मानव विकासावस्थेत तीन विचार-पद्धती श्रेणी क्रमाने विकसित झाल्या आहेत - १) धर्मप्रधान विचारसरणी २) अधिक प्रगत परतत्त्वप्रधान विचारसरणी ३) वैज्ञानिक विचासरणी. धर्मप्रधान किंवा परतत्त्वप्रधान विचारसरणींपेक्षा वैज्ञानिक वा भौतिक विचारसरणीमुळे लोकभ्रम दूर होईल असे वाटले होते. पण प्रत्यक्षात तसे झाले नाही. रशियामध्ये धर्मशिक्षणाला बंदी आहे; पण तिथे

धर्मप्रभाव समाजात टिकून आहे. अमेरिकेतील एका झटपट मतमोजणी (गॅलप पोल) मध्ये ९४[३] लोक धर्मविश्वासी निघाले. ऑगस्ट कोंतच्या विचारानुसार देवाच्याऐवजी समाजाची पूजा आरंभली तर धर्मविरोधी विज्ञाननिष्ठ मानवतावादी समाज संघटन शक्य आहे. श्रद्धाळू धार्मिक संप्रदाय आणि विवेकबुद्धीनिष्ठ इहवादी संप्रदाय यांच्यात सामंजस्य निर्माण करण्याचे प्रयत्न गेली २५० वर्षे सुरू आहेत. विज्ञान व धर्म समन्वय ही सर्वथा वेगळी गोष्ट होय. भिन्नधर्मीय स्पर्धेतून द्वेष, क्षोभ जन्मतो. सर्वधर्म समीक्षेतून सर्व धर्मसमन्वय ही आदर्श गोष्ट झाली. सर्वधर्मांचा महासमन्वय करणारे तत्त्वज्ञान 'भगवद्गीते'ने सांगितले आहे. अद्वैत वेदांतात याचा पुरस्कार वेगळ्या पद्धतीने करण्यात आला आहे. अविरोध महाधर्म समन्वय हाच यावरील उपाय असल्याचे या प्रस्तावनेतून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना सुचवायचे आहे.

४) वैदिक संस्कृतीचा विकास (१९५१)

श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे (इचलकरंजी) व्याख्यानमाला, १९४९ अंतर्गत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी पुणे विद्यापीठात 'वैदिक संस्कृतीचा विकास' विषयावर सहा व्याख्याने दिली. या भाषणांचा संग्रह म्हणजे सदर ग्रंथराज होय. या सहा व्याख्यानांचे विषय होते - १) वेदकालीन संस्कृती, २) वेदांची तार्किक प्रज्ञेत परिणती, ३) वैदिकांची कुटुंबसंस्था व समाजसंस्था, ४) इतिहास पुराणांची व रामायणाची संस्कृती, ५) बौद्ध व जैन यांचा धर्मविजय, ६) आधुनिक भारतातील सांस्कृतिक आंदोलन. ५६९ पृष्ठांच्या या ग्रंथराजाची पहिली आवृत्ती सन १९५१ ला प्रकाशित झाली. सन १९५५ ला या ग्रंथास साहित्य अकादमी पुरस्कार लाभला. मराठीस या ग्रंथाने साहित्य अकादमीची परंपरा सुरू केली. सन १९५१ च्या आवृत्तीस तर्कतीर्थांनी १२ पृष्ठांची प्रस्तावना लिहिली होती. वीस वर्षांनंतर या ग्रंथाची दुसरी सुधारित व संवर्धित आवृत्ती प्रकाशित झाली, तेव्हाही त्या आवृत्तीसाठी म्हणून ६ पृष्ठांची प्रस्तावना लिहिली. या दोन्ही आवृत्त्यांच्या प्रस्तावनांचा इथे विचार कण्यात येत आहे.

पहिल्या प्रस्तावनेनुसार तर्कतीर्थांनी प्रारंभीच स्पष्ट केले आहे, की वैदिक संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृती होय. या संस्कृतीचा काळ चार ते पाच हजार वर्षांचा आहे. वैदिक संस्कृतीच्या विकासक्रमाचे हे सारभूत संकलन होय. वेदकालापूर्वी इथे वैदिकेतरांची संस्कृती होती. द्रविड व शूद्रांचे तत्कालीन आचारविचार म्हणजे वेदपूर्वकालीन संस्कृती होय. पण ती आपले प्रभावी व अखंडित अस्तित्व सिद्ध करत नाही. संन्यास, दीक्षा, योग, मूर्तीपूजा यांचा संबंध वेदपूर्वकालीन संस्कृतीशी दाखवता येतो. संस्कृतीची दोन रूपे असतात - १) भौतिक, २) आध्यात्मिक. आध्यात्मिक रूप मानसिक असते, तर भौतिक व्यवहारी. अध्यात्म विचार आहे, तर भौतिक आचार. संस्कृतीची ही रूपे काल्पनिक होत. तर्कतीर्थांनी या प्रबंधात आध्यात्मिक शक्तीच्या अंगाने अधिक विचार व चर्चा केलेली आढळते.

यापूर्वी आपण धर्मावर आधारित भाषण संग्रह 'हिंदुधर्माची समीक्षा'च्या प्रस्तावनेवर विचार केला आहे. तिथे धर्मचर्चा, चिकित्सा ही मार्क्सवादी विचारधारेतून केली गेली होती. इथे आध्यात्मिक किंवा वैचारिक स्थिर मूल्यांची शक्ती समाजातील भौतिक प्रवृत्तींवरही आधिपत्य गाजवू शकते, या धारणेच्या आधारे संस्कृती मीमांसा करण्यात आली आहे. मानववंशशास्त्रज्ञांच्या (Antropologist) मतानुसार जगात ज्या विविध संस्कृती आहेत, त्या मूलत: एकच मानव संस्कृती होय. महानदी निराळी असली तरी नदी म्हणून तिचा सामान्य धर्म एकच असतो, तसे संस्कृतीचेही असते. ती मूलत: एकच असते. कोणतीही संस्कृती म्हणजे त्या प्रदेश, मानव समाजाचे भाषा, धर्म, कला, स्थापत्य, शेती, व्यापार, साहित्य रूप होय. जगातील आजच्या चिनी, हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन इ. संस्कृती स्वतंत्रपणे विकसित झालेल्या आहेत. कारण पूर्व काळात स्थित्यंतर, संपर्काचा अभाव होता. आज आपण असे पाहतो आहोत की पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव जगभर आहे. व्यापार, वाहतूक व संपर्क साधनांनी जगास खेडे बनवले. पूर्वी तसे नव्हते.

पाश्चात्त्य संस्कृतीच्या माध्यमातून जो वैश्विक प्रचार, प्रसार झाला, त्याने सर्व राष्ट्रे व तेथील समाज प्रभावित केला आहे. हा प्रभाव मुख्यत: भौतिक आहे. तो उद्योग, व्यापार, यंत्र, तंत्र, विज्ञान इ.तून सर्व राष्ट्रांच्या अंतरंगात प्रवेश केला आहे. हा प्रवेश एकीकडे समाजाचा उत्कर्ष करतो तर दुसरीकडे नाश. या पाश्चात्त्य संस्कृतीचे स्वरूप पेटलेल्या मशालीसारखे आहे. मशाल मार्गदर्शक असते तशी संहारकही. तुम्ही तिचा कसा वापर करता यावर परिणाम अवलंबून असतो. आज वैश्विक संस्कृती निर्माण होत आहे. त्यातून परंपरागत संस्कृतींना उजाळा दिला जात असून ही स्वागतार्ह बाब आहे. विश्वव्यापी संस्कृती निर्माण करणे सर्व राष्ट्रातील मानवांचे आद्य व श्रेष्ठ कर्तव्य आहे. भारतीय संस्कृती या महासमन्वयात भागीदार होऊन विशाल शक्तीचे पोषण करू शकेल असा विश्वास तर्कतीर्थांना असल्याने त्यांनी त्यादृष्टीने 'वैदिक संस्कृतीचा विकास' लिहिला आहे.

वैदिक अर्थात भारतीय संस्कृतीचे स्वरूप स्पष्ट करत या प्रस्तावनेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म्हटले आहे की, ''ब्रह्मविचार किंवा अध्यात्मविचार या संज्ञेने या भारतीय संस्कृतीच्या शुभ शक्तीचा बोध होतो. वैदिक संस्कृतीचे तेच अंतिम सार आहे. आजपर्यंतच्या विकासाची हीच बीजशक्ती आहे.''[१०]

असे असले तरी या संस्कृतीस वर्तमानात उतरती कळा येत आहे. या प्रत्ययाची कारणमीमांसा करत तर्कतीर्थ सांगतात, की त्याची चार अवलक्षणे (अनिष्टसूचक वा दुश्चिन्ह) आहेत - १) पिंडपोषणास आवश्यक असलेल्या अर्थपर प्रवृत्तीचा अभाव, २) परकीय आक्रमणांत पराभव, ३) प्रगतीच्या सर्व क्षेत्रांत अनिर्बंधपणे स्वातंत्र्य भोगण्यास प्रत्यवाय (विरोध) करणारी परंपरागत समाजव्यवस्था, ४) येथील सर्वसामान्य माणसांचा जीवन वा जगाकडे पाहण्याचा उपेक्षेचा दृष्टिकोन. यावर उपाय सुचवत सदर प्रस्तावनेत तर्कतीर्थ सल्ला देतात की, येथील माणसांची परलोकवादी दृष्टी बदलायची तर मोठे शैक्षणिक प्रयत्न

आवश्यक आहेत. त्यासाठी समाजात वैचारिक क्रांती अनिवार्य. वैचारिक क्रांतीशिवाय नवी दृष्टी असंभव. राजा राममोहन रॉय, लोकमान्य टिळक, योगी अरविंद, महात्मा गांधी आध्यात्मिक होते याचा खरा अर्थ ते सद्गुणी, पराक्रमी, ज्ञानी होते हा होय. येथील शैव, वैष्णव, जैन, बौद्ध धार्मिक दर्शनांची प्रेरणा नैतिक होती, म्हणजे मानवी कल्याणपर होती. त्यासच परमार्थ मानला जात असे. तीच अंतिम विश्वव्यापी प्रेरणा होय, हे या 'वैदिक संस्कृतीचा विकास'चे सांगणे आहे.

विख्यात विदुषी दुर्गा भागवत यांनी या ग्रंथाची भलावण करत म्हटले आहे की, ''तर्कतीर्थांचा हा ग्रंथ एक अप्रतिम ग्रंथ आहे. कारण या विषयातल्या विचारांची मांडणी स्वतंत्र मानवतावादी दृष्टिकोन ठेवून त्यांनी केलेली आहे. अफाट विषय मोजक्या जागेत मुद्यापुढे मुद्दे ठेवून व्यक्त करण्याची हातोटी ही या विषयांत वर्षानुवर्षे रमून गेलेल्या आणि जगाच्या सर्व संस्कृतींचा सूक्ष्म आढावा घेऊ शकणाऱ्या प्रतिभेलाच केवळ पेलेल अशी आहे. तिचे अनुकरण करणे शक्य नाही. जिवंत प्रज्ञेच्या स्फुरणाचे हे पुस्तक एक उत्कृष्ट प्रत्यंतर आहे.''[११] हे वर्णन या प्रस्तावनेसही लागू पडते.

यानंतरच्या सन १९७१ च्या सुधारित व संवर्धित आवृत्तीस जी प्रस्तावना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिली आहे ती पर्याप्त संक्षिप्त असून तिचा भर संस्कृतीच्या पुराव्यांवर आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, भाषा आणि साहित्य या दोहोत संस्कृती जितकी प्रत्ययास येते, तितकी ती अन्य संसाधनात नाही. त्याचे कारण भाषा ही संस्कृतीचे समावेशक असे मुख्य वाहन आहे. भाषा व साहित्याच्या अभावी संस्कृती गूढतेतच गुरफटलेली राहते. साहित्याने प्राप्त होणाऱ्या विचारात व ज्ञानात भूत, भविष्य व वर्तमान जीवन घडवण्याचे अनंत सामर्थ्य असते. विद्यमान भारतीय संस्कृतीच्या वैचारिक सामर्थ्याचे मूळ अधिष्ठान वैदिक साहित्य व संस्कृतीच होय. वैदिक साहित्यात जे निसर्गशक्तीचे सौंदर्य प्रत्ययास येते, तेच तिचे खरे बलस्थान होय. 'ऋग्वेदा'तील उषासूक्ते, सूर्यसूक्ते, वायुसूक्ते, पर्जन्यसूक्ते, अग्निसूक्ते, जलसूक्ते, वरुणसूक्ते दुसरे काय आहे? विश्व हे नियमबद्ध आहे, असा विश्वास 'ऋग्वेद' मधील भारतीयांना (ऋषी, मुनी) होता. 'ऋत्' चा अर्थ सत्य होय. 'ऋत्' म्हणजे नियमित आचरावयाचे व्रत. 'ऋत्' म्हणजेच नीतिनियम. वैदिक व वैदिकोत्तर संस्कृत साहित्याने भारतीय संस्कृतीस विश्वविषयक सौंदर्यदृष्टी, तात्त्विक चिंतन करण्याची पद्धती, तार्किक विचारसरणी आणि मूलभूत नैतिक संकल्पना दिली अशी तर्कतीर्थांची धारणा होती. ती त्यांनी या प्रस्तावनेत विस्ताराने विशद केली आहे. संस्कृत भाषेने व साहित्याने भारताचा भौगोलिक निसर्ग आत्मसात करून भारतीय एकात्मतेचे परिपोषण केले आहे, असे त्यांचे मत या प्रस्तावनेत प्रतिबिंबित झाले आहे. नंतरच्या काळात बुद्ध व महावीर यांनी धार्मिक व तार्किक विचार व्यक्त करण्यासाठी लोकभाषा म्हणून प्राकृत (पाली, अर्धमागधी) भाषेचा प्रयोग केला.

ही दुसरी आवृत्ती सुधारित व संवर्धित असून अनेक ठिकाणी मौलिक भर तर्कतीर्थांनी टाकली आहे. पहिल्या व दुसऱ्या आवृत्ती व प्रस्तावनेत दोन दशकांचे अंतर आहे. या काळात तर्कतीर्थांमध्ये मोठे बदल घडून आले. पहिल्या प्रस्तावनेच्या शेवटी भारतीय कालगणना (आश्विन शुद्ध ६ शके १८७३) आहे, तर दुसऱ्या प्रस्तावनेशेवटी पाश्चात्त्य (२८ मे १९७१) कालगणना नमूद आहे.

५) राजवाडे लेखसंग्रह (१९५८)

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे (१८६३ ते १९२६) यांनी मराठ्यांचा इतिहास, मराठी भाषेचे व संस्कृतचे ऐतिहासिक व्याकरण, जुन्या (प्राचीन) मराठी वाङ्मयाचा इतिहास, भारतीय इतिहासाची समाजवैज्ञानिक चिकित्सा, भारतीय विवाह संस्थेचा इतिहास अशी मूलभूत स्वरूपाची कार्ये करून मराठीत इतिहास लेखनाची वैज्ञानिक व वस्तुनिष्ठ परंपरा कायम केली. त्यांनी जे विपुल व विविधांगी लेखन केले त्यातील प्रातिनिधिक लेखनाचा संग्रह म्हणजे ‘राजवाडे लेखसंग्रह’ होय. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी त्याचे संपादन केले असून त्यास त्यांनी प्रस्तावनाही लिहिली आहे. या लेखसंग्रहात वि. का. राजवाडे यांच्या विविधांगी लेखनाचे प्रातिनिधिक प्रतिबिंब म्हणजे हा लेखसंग्रह होय. सदर लेखांची निवड तर्कतीर्थांनी ‘साहित्यगुणालंकार’ निकषावर केली आहे. वि. का. राजवाडे यांनी जे लेखन केले त्यामागे एक विशिष्ट दृष्टी होती. भारतीय समाजास पुनरुज्जीवन प्रेरणा मिळावी अशी धडपड त्यामागे होती. भारतीय स्वाभिमान आणि वैज्ञानिक संस्कृती या दोन्हीचा लाभ झाल्याशिवाय भारतात युरोपसारखे नवजीवन अवतरणार नाही अशी खात्री असल्याचा राजवाडे यांचा विश्वास तर्कतीर्थांनी आपल्या या प्रस्तावनेत व्यक्त केला आहे. या प्रस्तावनेत त्यांनी वि. का. राजवाडे यांच्या एकंदर जीवन, साहित्य व कार्य, विचारांचा संक्षेपाने आढावा घेऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व वाचकांपुढे उभे करत त्यांचे कार्य अनवट (प्रभावी) कसे होते ते रेखांकित केले आहे.

नव्या ज्ञानाचा प्रकाश समाजास लोकभाषेतून मिळायला हवा या उद्देशाने वि. का. राजवाडे यांनी ‘भाषांतर’ हे मासिक सुरू केले होते. ते अल्पजीवी ठरले तरी प्लेटोच्या 'On Republic' सारख्या विश्वविख्यात कृतीच्या भाषांतराचे आरंभिक खर्डे याच मासिकातून प्रकाशित झाले होते, हे कोण विसरेल? वि. का. राजवाडे यांचे जीवित कार्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ‘मराठ्यांच्या इतिहासाची साधने’ (१८९८-१९२३) चे २२ खंड हा इतिहास लेखन पद्धतीचा दीपस्तंभ होय. वि. का. राजवाडे यांनी ‘विश्ववृत्त’, ‘ग्रंथमाला’, ‘सरस्वती मंदिर’, ‘प्राची प्रभा’, ‘इतिहास व ऐतिहासिक’, ‘रामदास व रामदासी’, ‘केसरी’, ‘संशोधन वृत्त’ सारख्या नियतकालिकातून विपुल लेखन केले. ते आपणास ‘इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य’ च्या १३ खंडांमध्ये वाचनास उपलब्ध आहे. चित्रशाळा, पुणे प्रकाशित ‘संपूर्ण साहित्य संग्रह’चे तीन खंड - समग्र राजवाडे उभा करतात.

वि. का. राजवाडे यांच्या साहित्य साधनेचा गौरव करत या प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी म्हटले आहे की, ‘त्यांनी अनिकेत बनून; परंतु स्थिरमतीने साहित्य लेखन केले. पत्नी निधनानंतर ते परिव्राजक म्हणजे चित्रयात्री बनले. मितनिद्रा व मित आहारविहार याचे पथ्य सांभाळल्यामुळे इतके विपुल लेखन करू शकले. नाही म्हणायला विडीचे व्यसन हाच शीण घालवायचा मार्ग होता. ‘माणूस काम करून मरत नाही, आळसाने मरतो’ अशी वि. का. राजवाडे यांची धारणा होती. तर्कतीर्थांनी या प्रस्तावनेत राजवाडे यांच्या इतिहासलेखनसंबंधी धारणा नि दृष्टिकोनासंबंधी विस्ताराने विवेचन केले आहे. त्यातून भारतीय इतिहास लेखनाची मूलतत्त्वे स्पष्ट होण्यास साहाय्य होते. राजवाडे यांचे इतिहासलेखन म्हणजे वैज्ञानिक लेखनाचा वस्तुपाठच म्हणावा लागतो. त्यांनी साहित्य, इतिहास, समाज अशी गुंफण करत लेखन केल्याने ते एकांगी राहत नाही, हेही तर्कतीर्थांनी या प्रस्तावनेत स्पष्ट केले आहे. याशिवाय वि. का. राजवाडे यांच्या संस्थात्मक कार्यावरही या प्रस्तावनेत प्रकाश टाकण्यात आला आहे. भारत इतिहास संशोधन मंडळाचे कार्य या संदर्भात महत्त्वाचे ठरते.

वि. का. राजवाडे यांनी स्वीकारलेली इतिहास कल्पना ही पाश्चात्त्य विचारवंतांनी मान्य केलेली संकल्पना होय. ती स्वीकारून त्या पद्धतीने लेखन करायचा कटाक्ष त्यांनी पाळला. असा कटाक्ष पाळणारे ते पहिले भारतीय इतिहासकार होत. म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या लेखसंग्रह संपादनाचा घाट घातला. साहित्य अकादमीने हे संपादन प्रकाशित करून राजवाडे यांच्या जीवन, कार्य, विचारास एका अर्थाने राष्ट्रीय मान्यता देण्याचे कार्य केले आहे.

६) लोकमान्य टिळक लेखसंग्रह (१९६९)

‘‘टिळकांच्या निष्ठेला अपवाद नाही. इतरांच्या लेखनात हे अपवाद मधूनमधून आढळतात. टिळकांच्या लेखांत लोकशाही स्वातंत्र्याचे मूल्य केव्हाही खाली जात नाही, परकीय पारतंत्र्याच्या विरुद्ध लढण्याचा बाणा कोठेही वाकत नाही. अंतिम स्वार्थत्यागाची प्रतिज्ञा कोठेही सुटत नाही वा मर्यादित होत नाही. याच्या उलट इतरांच्या लेखनात असे क्वचित घडलेले दिसते. टिळकांची स्वराज्याची प्रतिज्ञा ही भीष्मप्रतिज्ञा आहे, या प्रतिज्ञेने स्वत:चे मरण डोळ्याने पाहिले आहे. त्यामुळे टिळकांचे लेखन हे भारताच्या उद्योगपर्वापर्यंतच्या स्वातंत्र्ययुद्धाचे गद्य महाकाव्य बनले आहे.’’[१२] तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ‘लोकमान्य टिळक लेखसंग्रह’च्या ६१ पानी दीर्घ प्रस्तावनेचा समारोप करताना काढलेले हे उद्गार म्हणजे या लेखसंग्रहातील लोकमान्य टिळकांच्या लेखनातून त्यांना उमजलेले टिळकांचे व्यक्तिमत्त्वच! या लेखसंग्रहात तर्कतीर्थांनी ‘केसरी’मधील निवडक लेखन संपादित करून सादर केलं आहे. ते करताना हे लेखन लोकमान्य टिळकांचेच आहे याची प्रा. न. र. फाटक यांच्या सारख्या इतिहास तज्ज्ञ व टिळक अभ्यासकाकडून खात्री करून घेतल्याचे प्रस्तावनेतून लक्षात येते.

सदरच्या प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी हा लेखसंग्रह संपादित करताना जे सात विषय विभाग पाडले आहेत, त्या आधारे लोकमान्य टिळकांच्या 'केसरी'तील लेखनाची चिकित्सा केली आहे. १) आधी सामाजिक की राजकीय, २) स्वराज्य हा जन्मसिद्ध हक्क, ३) काँग्रेस अर्थात् राष्ट्रीय सभा, ४) हिंदू-मुसलमान संबंध, ५) परतंत्र भारताच्या आर्थिक समस्या-शेती, स्वदेशी व बहिष्कार, ६) शैक्षणिक प्रश्न व राष्ट्रीय शिक्षण, ७) संकीर्ण - (अ) शिवाजी उत्सव, गणेशोत्सव व राष्ट्रीय उत्सवांची आवश्यकता, (ब) धर्म व तत्त्वज्ञान, (क) कै. महादेव गोविंद रानडे, स्वामी विवेकानंद, आगरकर व गोखले. या सात विभागांत 'केसरी'मधील टिळकलिखित ८० लेखांचा समावेश करण्यात आला आहे. दीर्घ प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी या लेखांचा विस्ताराने परामर्ष घेतला आहे. टिळक युगात चार विचारधारा भारताच्या राजकीय पटलावर सक्रिय होत्या - १) क्रांतिकारी, २) समाजसुधारणावादी, ३) सामाजिक व राजकीय सुधारणा समांतर करू इच्छिणारी, ४) भारतीय अधोगतीस परकीय सत्ता जबाबदार मानणारी. लोकमान्य टिळक चौथ्या विचारधारेचे प्रतिनिधी होते. तरी त्यांना सशस्त्र क्रांतीचे समर्थक मानले जाई. तर्कतीर्थांनी आपल्या या प्रस्तावनेत टिळक चरित्रकार धनंजय कीर, प्रा. य. दि. फडके तथा गायत्री पगडी प्रभृतींच्या मतांचे खंडन करून लोकमान्य टिळकांना गांधीमार्गाचे पहले उपासक सिद्ध केले आहे. इतकेच नव्हे तर टिळक युगातूनच गांधीयुगाचा प्रारंभ झाला हे स्पष्ट केले आहे. 'मी जे लिहीन ते कायद्याच्या सीमेत राहूनच लिहीन' हा टिळकांचा बाणा अधोरेखित केला आहे. तर्कतीर्थांनी अन्य एका ठिकाणी महात्मा गांधी नि लोकमान्य टिळक यांच्यातील फरक सांगत म्हटले आहे की, 'लोकमान्य कायदा मानत, तर महात्मा गांधी कायदेभंगाची स्वीकृती व समर्थन करत.'

'लोकमान्य टिळक लेखसंग्रह' प्रस्तावनेत लोकमान्यांच्या लेखनाच्या विशेष अनुभूतीची शुद्धता सांगून ती प्रा. बा. सी. मर्ढेकर वर्णित 'वाङ्मयीन महात्मता' असल्याचे नमूद केले आहे. ही महात्मता महात्मा गांधींच्या लेखनातही दिसते हे सांगण्यास तर्कतीर्थ विसरत नाही. या प्रस्तावनेचा मोठा हिस्सा तर्कतीर्थांनी लोकमान्यांच्या राजकीय भूमिकेच्या विश्लेषणावर खर्च केला आहे. तो तात्त्विक व तार्किक आहे. परंतु संकीर्णमधील लेखनाच्या समीक्षेत लोकमान्यांची सामाजिक बांधिलकी स्पष्ट होते. त्यामुळे लोकमान्यांचे सर्वंकष व्यक्तिमत्त्व उभे राहते. शिवाय लोकमान्य कृत लेखनाची समग्रलक्ष्यी चर्चाही त्यातून होत राहते. लोकमान्य आणि राष्ट्रीय काँग्रेस, लोकमान्य व ब्रिटिश, लोकमान्य व गांधी, आगरकर, न्यायमूर्ती रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, हर्बर्ट स्पेन्सर, स्वामी विवेकानंद असा अनुबंधही यातून प्रतिबिंबित होतो. समग्रत: हा लेखसंग्रह व त्याची प्रस्तावना म्हणजे लोकमान्यांची संयमित व संतुलित चिकित्सा होय. ती टिळक चरित्राचे नवे पैलू वाचकांसमोर मांडते.

7) Descriptive Catalogue of Sanskrit Manuscripts (Part I and II) - (1970)

'संस्कृत हस्तलिखितांची विवरणात्मक सूची' (भाग-१,२) चे संपादन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले आहे. त्यास तर्कतीर्थांची एका पानाची छोटीशी प्रस्तावना आहे. ती या सूचीची माहिती देणारी आहे. संस्कृत हस्तलिखितांच्या अभ्यासाची वाईमध्ये असलेली परंपरा जुनी आहे. 'अशी आमुची वाई'[१३] ग्रंथात प्रा. ग. ह. खरे आणि व. म. बोराटे यांनी त्याची माहिती दिली आहे. या ग्रंथासही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची प्रस्तावना असून त्यात वाईच्या या परंपरेचा बृहत् इतिहास संक्षेपाने नोंदला आहे (त्याची विस्तृत चर्चा या प्रस्तावनेत पुढे संदर्भित ग्रंथ प्रस्तावनेच्या विवेचनात येईलच). पूर्वी वाईमध्ये वेदविद्या, श्रौतस्मार्त, याज्ञिकी, धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र, व्याकरण, वेदांत इ. शास्त्रांचा अभ्यास करणारी घराणी होती. तशीच इथे असलेली गायन परंपराही जुनी - पुराणी आहे. वैदिक, शास्त्री, कीर्तनकार, पुराणकथाकार, प्रवचनकार, वादक, गवई यांची येथील परंपराही जुनी आहे. त्याचा येथील सांस्कृतिक विकास, इतिहास २००० वर्षांचा असल्याचे पुरातत्व संशोधक डॉ. ह. वि. सांकलिया यांनी नोंदवून ठेवले आहे.•

गेल्या शतकाच्या प्रारंभीच्या काळापर्यंत वाईत वेदशाळा, संस्कृत पाठशाळा होत्या. इथे 'मोदवृत्त', 'धर्म' सारखी नियतकालिके प्रकाशित होत असे. वाईत 'योगवासिष्ठ', 'विष्णुपुराण', 'रामायण', 'गीताभाष्य', 'ब्रह्मसूत्र', 'शांकरभाष्य', 'मनुस्मृती', 'महाभारत' यांची भाषांतरे झाली आहेत. येथील रड्डी, अष्टपुत्रे, हाळबे, काथवटे, ताटके, वळे, दीक्षित, अभ्यंकर, लेले, पुराणिक, जोशी इ. घराण्यांत ब्रह्मविद्या परंपरा होती. नारायणशास्त्री मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती इथे प्राज्ञपाठशाळा चालवत. शिवाय त्यांचे धर्मसुधारणा मंडळही इथे कार्यरत होते. त्यांनी 'मीमांसा कोश', 'धर्मकोश' प्रकाशन, संपादन उपक्रम १९२५ च्या दरम्यान हाती घेतला होता. 'मीमांसाकोश'चे ७ खंड, 'धर्मकोश'चे २६ खंड आजमितीस प्रकाशित आहेत. या उपक्रमांतर्गत स्वामी केवलानंद सरस्वती यांनी जी संस्कृत हस्तलिखिते, पोथ्या, कागदपत्रे, भाषांतरे, ग्रंथ, कोश संग्रहित केले होते, त्यातील १०,७१२ संस्कृत हस्तलिखित पोथ्या, ग्रंथ इ.ची विवरण सूची तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जून १९७० मध्ये संपादित करून प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई यांच्या तर्फे प्रकाशित केली. ही संस्कृत हस्तलिखित विवरण सूची दोन भागात प्रकाशित असून ती १३६१ पृष्ठांची आहे. त्यात दहा हजारहून अधिक हस्तलिखितांचे विवरण आहे. संस्कृत हस्तलिखितांची ही सूची इंग्रजीत आहे. ती मध्ये भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने निर्धारित (Prescribed) करून दिलेल्या रकान्यात हस्तलिखितांची माहिती देण्यात आली आहे. ते १५ रकाने असून त्यांची शीर्षे (Heads) पुढील प्रमाणे आहेत - १) अनुक्रमांक, २) गाठोडे वा रूमाल क्रमांक, ३) विषय वर्णन, ४) लेखकाचे नाव, ५) भाष्यकाराचे नाव, ६) हस्तलिखिताचे माध्यम - (ते

कशावर लिहिले आहे - कागद, कापड, भूर्जपत्र इ.), ७) लिपी, ८) आकार (सेंटीमीटरमध्ये), ९) पृष्ठसंख्या, १०) प्रत्येक पृष्ठावरील ओळींची (Lines) संख्या, ११) हस्तलिखिताचे स्वरूप (पूर्ण/अपूर्ण), १२) ओळीतील अक्षरांची संख्या (Words), १३) हस्तलिखिताची स्थिती (जीर्ण इ.), १४) हस्तलिखिताचा काळ, १५) अन्य तपशील.

सदर संस्कृत हस्तलिखित विवरण सूची वाचताना लक्षात येते की, ती प्रकाशित व्हावी म्हणून भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने या उपक्रमासाठी अनुदान दिले होते. त्याच्या ५०० प्रती छापण्यात आल्या होत्या. त्याच्या प्रत्येक भागाचे (खंडाचे) मूल्य ५० रुपये होते. हे खंड भारत सरकारने निर्धारित केलेल्या ग्रंथालयांना वितरीत करण्यात आले होते. ही हस्तलिखिते विषयनिहाय वर्गवारी करून (वेद, तत्त्वज्ञान, भक्ती, तंत्रमार्ग, काव्य, व्याकरण, कोश, आयुर्वेद, ज्योतिष) त्यांची माहिती देण्यात आली आहे. शिवाय परिशिष्टात काही पूरक हस्तलिखितांची माहिती देण्यात आली आहे. शौनक, वैजनाथ, अपस्तंभ, पद्मनाभ उपासनी, गोपीनाथ ओक यात आहेत नि माधवाचार्य, गौतम, गदाधर, जगदीश, पातंजली, जैमिनी, शंकराचार्य, व्यास, वल्लभाचार्य ही आहेत. या संपादनाने एक मोठे संचित पुढे आले असून त्यांचा अभ्यास, संशोधन, संपादन, प्रकाशन कार्य प्राच्यविद्या संस्था, संस्कृत विद्यापीठ, संस्कृत अधिविभाग, व्यासंगी पंडित यांनी केले पाहिजे.

८) आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत (१९७२)

व्हीनस प्रकाशन संस्था, पुणे यांचा मार्च, १९६३ मध्ये स्थापना रौप्य महोत्सव साजरा झाला. त्या निमित्त सदर प्रकाशन संस्थेने प्रतिवर्षी ज्ञानसत्राच्या रूपात व्याख्यानामाला योजण्याचा संकल्प सोडला होता. सन १९६४ पासून यात सातत्य राहिल्याने व्हीनस प्रकाशन संस्थेने सन १९७१ साली 'साहित्य आणि सौंदर्य' विषयावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना आमंत्रित केले. या विषयावर विचार करताना तर्कतीर्थांच्या लक्षात आले की संस्कृत रससिद्धांतावर अनेकांचे अनेक आक्षेप आहेत. तेव्हा त्यावर चर्चा करण्याच्या दृष्टीने तर्कतीर्थांनी 'आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत' विषय मुक्रर केला. या विषयांवर तर्कतीर्थ यांनी तीन व्याख्याने दिली. ती व्हीनस प्रकाशनाने सप्टेंबर, १९७२ मध्ये पुस्तक रूपाने प्रकाशित केली. या पुस्तिकेस तर्कतीर्थांची दोन पानांची औपचारिक प्रस्तावना आहे.

त्या प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी सांगितले आहे की, मूळ संस्कृत काव्यातील रससिद्धांतावर मराठीत अनेकांनी विचार व्यक्त केले आहेत. पण ही चर्चा भारतीय साहित्यशास्त्राभोवतीच घुटमळत राहिली आहे. आधुनिक काळातील बदलते काव्य लक्षात घेता रससिद्धांतावर नवा विचार केला गेला पाहिजे. त्या अनुषंगाने तर्कतीर्थांनी या विषयावर दिल्या गेलेल्या व्याख्यानावर विवेचन केले आहे. त्यातील महत्त्वाचा मुद्दा हा, की विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी 'निबंधमाला'मध्ये जो विचार केला आहे, तो विचार मराठी समीक्षेचा पाया भक्कम

करणारा आहे. त्यानुसार भारतीय प्राचीन साहित्यशास्त्रामध्ये कवितेचे खरे रूप व मर्म सापडत नाही. ते पश्चिमी साहित्य शास्त्रातच आढळते. यावर आधारित विवेचन करत तर्कतीर्थांनी आपली व्याख्यानमाला गुंफली. आपल्या या व्याख्यानांची मूलभूत भूमिका या प्रस्तावनेतून व्यक्त होते. ती छोटी असली तरी तिचे संदर्भमूल्य मोठे आहे. ती अनेक महत्त्वाचे तपशील पुरविते. म्हणूनही तिचे महत्त्व आहे. प्रस्तावनेपेक्षा मूळ व्याख्यान संहिता अधिक विवेचक आहे.

९) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड-१) (१९८२)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा अमृतमहोत्सव सन १९७६ मध्ये साजरा झाला. त्याचे औचित्य साधून त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्या निवडक साहित्याचे दोन खंड बनविण्याची योजना आखली होती. प्रत्यक्षात मात्र पहिला खंडच सन १९८२ ला प्रकाशात आला. या लेखसंग्रहात विश्वकोश नोंदी, भाषणे, लेख, अनुवाद, छोटे ग्रंथ (निबंध, चरित्र इ.), प्रस्तावना, परीक्षणे (समीक्षा) यांचा संग्रह आहे. विषयाच्या दृष्टीने पाहू लागू तर भौतिकवाद, धर्म व समाज आणि तत्त्वज्ञान अशा त्रिविध स्वरूपाचं लेखन आहे. यात अनेक वाद, व्यक्ती, ग्रंथ, धर्म, देवदेवता यांचा समावेश आहे. असे ६८ लेख यांत असून त्याची पृष्ठे ६०० च्या घरात आहे.

या ग्रंथाच्या प्रारंभी तर्कतीर्थांची विवेचक प्रस्तावना असून आपल्या या लेखनामागील वैचारिक भूमिका ते स्पष्ट करतात. त्यातून जगाच्या नि व्यक्ती म्हणून तर्कतीर्थांच्या वैचारिक विकासाचा पट उलगडत जातो. भारतीय व पाश्चात्त्य दर्शने, वाद इथे एकत्रितरीत्या वाचावयास मिळत असले तरी तर्कतीर्थ याकडे भारताच्या वैचारिक इतिहास व वाटचालीच्या रूपात पाहतात हे लक्षात येते. युरोपात १४ व्या शतकात विज्ञान युगाचा प्रारंभ झाला. भारतात त्याची गर्भधारणा व्हायला सतरावे शतक उजाडावे लागले. तिकडे प्रबोधन युगाचा प्रारंभ मध्ययुगात तर आपणाकडे आधुनिक युगात झाला. या तुलनेतून भारतीय समाज जागृतीच्या दृष्टीने मागे असल्याचे त्यांना सुचवायचे आहे. हे भान तर्कतीर्थांनी पौर्वात्य आणि पाश्चिमात्य ग्रंथ, विचार, वाद, व्यक्ती, इतिहास, संस्कृती तटस्थपणे परंतु व्यासंगाने अभ्यासल्यामुळे शक्य झाले. याची कारणमीमांसा करताना याच 'लेखसंग्रह'च्या समीक्षेत प्रा. मे. पुं. रेगे यांनी म्हटले आहे की, ''सामाजिक परिवर्तनाच्या आंदोलनात सहभागी झाल्यानेच केवळ बंदिस्त हिंदू वैचारिक परंपरेतून शास्त्रीजी बाहेर पडले नाहीत. पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, सांस्कृतिक मानवशास्त्र यांच्या अभ्यासातून लाभलेल्या वैचारिक आयुधांच्या साहाय्याने भारतीय बौद्धिक परंपरेचे कवच फोडून ते अधिक उदार आणि मुक्त अशा बौद्धिक वातावरणात आले. भारतीय बौद्धिक परंपरेकडे चिकित्सक दृष्टीने, आणि मानव जातीच्या इतर इस्लामी, ख्रिश्चन, 'आधुनिक' इ. परंपरांकडे सहानुभूतीने व मर्मग्राही दृष्टीने पाहणे त्यांना शक्य झाले. मानवजातीच्या सबंध सांस्कृतिक वारशावर आपला हक्क त्यांना सांगता

येऊ लागला.''[१४] त्यामुळेच ते एकीकडे द्वैतवाद, द्वैताद्वैतवाद, केवलाद्वैतवाद लिहितात तर दुसरीकडे जडवाद, भौतिकवाद, नवमानवतावाद लिहितात. त्यांना शंकराचार्य, जैमिनी, कपिल, कणाद माहीत असतात आणि कार्ल मार्क्स, हेगेल, लेनिन, मुसोलिनी, गांधी, टिळक, फुले, आगरकरही. सर्व धर्म, पंथ, परंपरा, ईश्वरीय रूपे व तत्त्वज्ञान ते जाणतात. द्वा. भ. कर्णिकांनी म्हटल्याप्रमाणे, ''शास्त्रीजींनी जे ज्ञानभांडार मोकळे केले आहे त्याचा नुसता आढावा घेताना प्रज्ञावंताची मतीसुद्धा कुंठित झाल्याशिवाय राहणार नाही.''[१५]

या लेखसंग्रहातील पहिला विभाग 'भौतिकवाद' विषयाला समर्पित आहे. यात काही मौलिक लेख आहेत तर काही अनुवाद. या लेखांच्या विवेचनात तर्कतीर्थांनी स्पष्ट केले आहे की, भौतिकवाद, जडवाद, अनीश्वरवाद, विज्ञान इ. नी व शोधांनी धर्मशास्त्र पराभूत केले; पण त्यासही ८०० वर्षांचा काळ लोटावा लागला. आता आपणास विकासाच्या नवीन संकल्पनाच स्वीकारणे क्रमप्राप्त आहे. ते स्पष्ट करत या प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी म्हटले आहे की, ''जुन्या जगातील अत्यंत बुद्धिवंत लोक ज्या निश्चित व स्थिर विश्वविषयक संकल्पनांच्या मर्यादेत विचार करीत राहले व जगले, ते विश्वाचे चित्र आज अवास्तव ठरत असून नित्य बदलत आहे. नव्या नव्या विश्वतत्त्वांच्या आणि विश्ववस्तूंच्या संकल्पनांनी सतत समृद्ध होणारी विश्वसंकल्पना स्वीकारल्याशिवाय ज्ञानाची प्रगती होऊ शकणार नाही. आता पाठीमागे जाता येणार नाही.''[१६] या धारणेने हे सारे लेखन झाल्याचे स्पष्ट होते.

दुसरा भाग 'धर्म व समाज' असून तो तर्कतीर्थांच्या व्यासंग नि आस्थेचा आहे. पूर्वीच्या काळात धर्म हा समाजधारणेचा पाया होता. युरोपातील पुनरुज्जीवन युग व प्रबोधन युगाने त्या जागी स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्ये रुजवली. भारतीय समाजात धर्मसुधारणांचा उदय व आग्रह नि पारतंत्र्याच्या विरोधात राष्ट्रवाद नि स्वातंत्र्याचा पुरस्कार घडून आला तो परिवर्तन व जागृतीमुळे. या दुसऱ्या भागात धर्मस्वरूप चर्चा आहे नि धर्मसुधारणा आंदोलनाचा इतिहासही. वेद, चातुर्वर्ण्य चर्चा आहे नि 'ज्योतिनिबंध' व 'ज्योतिचरित्र' ही धर्मचर्चा आहे, धर्मसंघर्ष आहे नि धर्मांचा महासमन्वयही.

तिसरा विभाग तत्त्वज्ञानाचा आहे. त्यात सुखवाद, दु:खवाद, आनंदमीमांसा, भारतीय दर्शने यांची चर्चा आहे. परंतु प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी स्पष्टपणे बजावले आहे की, ''जुन्या वादांच्या मांडणींमध्ये परिवर्तन करण्याची, त्यांची पुन्हा मांडणी करण्याची गरज आता भासू लागली आहे...पण त्याचा अर्थ असा नव्हे की, अध्यात्मवादाकडे पुन्हा वळणे आवश्यक दिसू लागले आहे. ईश्वर हे गृहीत कृत्य म्हणून विज्ञानाला आवश्यक नाही. जी तत्त्वे विज्ञानाला आवश्यक आहेत त्यामध्ये ईश्वराचा अंतर्भाव होत नाही. म्हणूनच ईश्वराकडे पाठ फिरवूनच विज्ञानास आवश्यक असे तत्त्वज्ञान हे जडवादाच्या रूपात मांडणे आवश्यक आहे.''[१७]

ही प्रस्तावना आणि हा लेखसंग्रह तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा वैचारिक विकास समजून घेण्याचे सशक्त साधन व माध्यम आहे. यातील विषय व स्वरूप वैविध्यामुळेही

समग्र तर्कतीर्थ समजून घ्यायचा हा आरसा आहे. अमृत महोत्सव हा माणसाच्या प्रगल्भतेची चरमसीमा वा बिंदू मानला जातो. त्या दृष्टीनेही या संग्रहाचे असाधारण असे महत्त्व आहे. प्रा. मे. पुं. रेगे यांच्याच शब्दात सांगायचे तर, ''हे लिखाण 'शुद्ध' वैचारिक स्वरूपाचे नाही; त्याला एक सामाजिक कार्य, सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला गती आणि विशिष्ट दिशा देण्याचे उद्दिष्ट आहे. 'एन्सायक्लोपीडिस्ट' विचारवंतांनी केलेल्या लिखाणाप्रमाणे सामाजिक परिवर्तनाचे साधन असलेले असे हे लिखाण आहे. ते सामाजिक उद्दिष्टांसाठी करण्यात आलेले असले तरी उथळ, प्रचारकी नाही. त्यात प्रकट झालेली व्यापक विद्वत्ता, चिंतनाचे गांभीर्य, उत्कटता आणि ऋजुता, युक्तिवादातील नेमकेपणा आणि धार, आणि वक्तृत्व व तर्क यांचा मनोहर मिलाफ यांच्यामुळे हे निबंध केवळ प्रासंगिक राहत नाहीत, त्यांना अभिजात वैचारिक साहित्यात स्थान मिळते.''[१८]

१०) जोतिचरित्र (१९९२)

सन १९९० हे वर्ष महात्मा जोतीराव फुले यांचे स्मृतिशताब्दी वर्ष होते. पाठोपाठ १९९१ हे वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मशताब्दीचे होते. भारतातील जातीयतेचा बळी ठरलेल्या पददलितांना जातीयतेच्या विषमतेतून मुक्त करून त्यांना माणूस म्हणून स्वीकारायला भाग पाडण्याचे व सामाजिक न्यायाद्वारे त्यांना समाजातील सवर्ण इतरेजनांप्रमाणे प्रतिष्ठा देऊन मध्य प्रवाहात आणण्याचे कार्य या दोन महापुरुषांनी केले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मनात उभयतांबद्दल आदरभाव तर होताच पण त्यांचे विचार व ध्येय कृतीतून अनुसरणारे ते कर्ते सुधारक होते, या विषयी यापूर्वीच्या 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पातील खंड-२ (भाषणसंग्रह-व्यक्ती आणि विचार) च्या प्रस्तावनेत विस्ताराने ऊहापोह करण्यात आला आहे. 'जोतिचरित्र' वर या प्रकल्पातील खंड-१२ (मराठी व संस्कृत प्रबंध व चरित्र साहित्य) मध्ये विस्ताराने विचार व्हावयाचा आहे. इथे फक्त 'जोतिचरित्र'ची जी 'निवेदन'पर छोटी प्रस्तावना तर्कतीर्थांनी लिहिली आहे, तीवर विचार अपेक्षित आहे.

या छोट्या प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी प्रारंभीच आपण हे चरित्र ज्या वरील संदर्भाने लिहिले त्याचे सूतोवाच केले आहे. नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्लीच्या विनंतीवरून हे 'ज्योतिचरित्र' लिहिले गेले ते स्पष्ट केले गेले आहे. राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे पुढे ते १९९६ ला इंग्रजीमध्ये (अनुवादक - दया अग्रवाल) आणि २००६ ला हिंदीमध्ये (अनुवादक - प्रशांत पांडे) प्रकाशित झाले. महात्मा फुले यांच्याबद्दल प्रारंभिक लिखाण करणाऱ्यांमध्ये तर्कतीर्थांचा समावेश होतो, हे लक्षात घेतले पाहिजे. 'ज्योतिनिबंध' भाषण आहे तर हे चरित्र. या चरित्रात बालपण, शिक्षण, काय, विचारावर प्रकाश टाकण्यात आला आहे. हे चरित्र 'महात्मा जोतीराव फुले : समग्र वाङ्मय' (संशोधित संपा. य. दि. फडके) आणि 'महात्मा जोतीराव फुले' (धनंजय कीर) या दोन महत्त्वपूर्ण ग्रंथांवर आधारून लिहिले आहे.

या पुस्तकामुळे राष्ट्रीय चरित्र मालेत मोलाची भर पडली असून हिंदी व इंग्रजी भाषांतरामुळे ते जगभर नि भारतभर प्रचारित, प्रसारित होण्यास मोठे साहाय्य झाले आहे.

११) मराठी विश्वकोश (१९७६-२०१९)

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पाचा खंड-१ हा 'मराठी विश्वकोश नोंदसंग्रह' आहे. त्यात मराठी विश्वकोश खंड-१ ला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी १४ मे १९७५ रोजी लिहिलेली प्रस्तावना प्रारंभीच देण्यात आली आहे. या मराठी विश्वकोश प्रकल्पाबद्दल खंड-१ च्या प्रस्तावनेत सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. इथे आपण फक्त मराठी विश्वकोश खंड-१ च्या प्रस्तावनेवर विचार करणार आहोत.

'मराठी विश्वकोश (खंड-१)' चे प्रकाशन सन १९७६ मध्ये झाले. तो प्रकल्प सन २०१९ मध्ये मूळ योजनेबरहुकूम वीस खंडांत प्रसिद्ध झाला. अपवाद राहिला तो नकाश खंडाचा. सन १९७५ ला ही प्रस्तावना लिहिली तेव्हा मराठी विश्वकोश प्रकल्पाचे पहले चार खंड प्रकाशित झाले होते. तेव्हाच्या प्रस्तावनेवर सुमारे पाच दशकाने बोलतो आहोत. दरम्यानच्या काळात माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती होऊन संगणक, अंतरजातीय प्रणाली, भ्रमणध्वनी अशी साधने विकसित होत ज्ञानसंग्रहणाची जागा घटना वा ज्ञान निर्माण होण्याक्षणी प्रक्षेपण, प्रकाशनाची प्रक्रिया इ. नी घेतली आहे. त्यातून 'विकिपीडिया' हा महाजालावर वापरता येण्याजोगा आणि एकाच वेळी विविध भाषात माहिती उपलब्ध करून देणारा मुक्त ज्ञानकोश प्रत्यक्ष वापरला जात आहे. त्यात ८३,६९७ इतकी पृष्ठे असून तीन कोटीहून अधिक लेख (नोंदी) उपलब्ध आहेत. या शिवाय विकिस्रोत, विकिकॉमन्स, विक्शनरी, विकिडाटा, विकिस्पेशीज, विकिव्हॉयेज, विकिव्हर्सिटी, विकिडॉक्युमेंटरी अशी त्याची विविधांगी ज्ञानसेवा लिखित, दृश्य नि श्राव्य (दृक्-श्राव्य) रूपात पुरविणारी ज्ञानकेंद्रे वा ज्ञानसाधने क्रियान्वित आहेत. अशावेळी सन १९७५ च्या प्रस्तावनेची चर्चा कुणाला कालबाह्य वाटेल, पण पन्नास-साठ वर्षांपूर्वीची ज्ञानासक्त व ज्ञानसेवी पिढी समाजाला कशाप्रकारे ज्ञानी बनवू इच्छित होती, हे समजणे कालसंदर्भात तितकेच महत्त्वाचे आहे.

या प्रस्तावनेत स्पष्ट केल्यानुसार मराठी विश्वकोश मानव्यविद्या, विज्ञान व तंत्रविद्या यांतील सर्व विषयांचे ज्ञान संकलित करणारा तयार करण्याची योजना होती. सर्वविषयसंग्राहक कोश हे त्याचे स्वरूप लक्षात घेता हा मराठीतील अशा स्वरूपाचा पहिलाच महाकोश होता नि आहे. ज्ञानविस्तार नि विकासाची स्थिती, गती पाहता असा कोश आवश्यकच नाही तर अनिवार्य होता. मराठी विश्वकोश निर्मितीची अनेक कारणे नि प्रयोजने होती. एक म्हणजे विषय नि त्यासंबंधी संलग्न बाबींवर माहिती आवश्यक असते. ती पुरविण्याची क्षमता यात असेल असे पाहिले गेले. दुसरे असे की एका माणसास सर्वच क्षेत्रातले ज्ञान असते असे नाही. परंतु जिज्ञासा मात्र सर्व विषयांची असू शकते. अशा जिज्ञासा, शंकांचे समाधान निर्मितीत पाहिले गेले. तिसरी गोष्ट म्हणजे सर्व विषय सारग्राही पद्धतीने कळण्याची यात सुविधा होती.

ज्ञानाच्या संस्थात्मक रचनेत शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, ग्रंथालये इ. ठिकाणी संदर्भ पुरविणाऱ्या सशक्त, विश्वासार्ह साधनांची गरज असते. मराठी विश्वकोश त्याची जागा घेणारा बनवायचा संपादकांचा संकल्प सदर प्रस्तावनेतून लक्षात येतो.

तत्कालीन समाज औद्योगिकीकरण, विज्ञान, तंत्रज्ञान इ. मुळे जागृत होत होता. उच्च ज्ञान मराठीत निर्मिणे काळाची गरज नि आव्हान होते. शिक्षणाचे माध्यम मराठी बनवण्याचा कटाक्ष होता. महाराष्ट्र राज्यच मुळी मराठी भाषी राज्य म्हणून मराठी भाषिक आकांक्षेतून स्थापण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर मराठीतील सर्व विषयसंग्राहक ज्ञानकोश या आकांक्षापूर्तीचे साधन म्हणून एक स्वप्न होते. जगातील स्पर्धा सर्व क्षेत्रात गतिमान होत असता भाषिक क्षमता विकास काळाची गरज होती. भारतातील प्रत्येक प्रांत भाषांपुढे अस्मिता नि अस्तित्वाची लढाई महत्त्वाकांक्षी बनत चालली होती. प्रत्येक भाषा स्वत:स स्वावलंबी व इंग्रजीसारख्या समृद्ध ज्ञानभाषेच्या तोडीची कशी बनेल असा प्रयत्न करत होती. अशा स्थितीत मराठीस मागे राहणे परवडणारे नव्हते. या सर्व गरजांच्या पूर्ततेचा प्रयत्न यात आहे. सध्या नभोवाणी, अनुबोधपट, वृत्तपट, वृत्तपत्रे इ. मुळे पोहोचणाऱ्या समूह माध्यमातून कुतूहलाचे व जिज्ञासेचे क्षितिज रुंदावते आहे नि दरी खोल होत आहे. अशा काळात ज्ञानसाधने अधिक सक्षम हवीत. ज्ञानार्जनाइतकेच ज्ञानअभिव्यक्तीचे महत्त्व वाढत आहे. अशावेळी इंग्रजीवरचे परावलंबन दूर करून मराठी भाषिक ज्ञानसंपन्न होण्यासाठी संज्ञा व परिभाषा, तसेच पदनामे मराठीत असणे आवश्यक आहे. मराठी विश्वकोश त्याचे साधन बनावे.

असे विषय कोश एकविषयी असतात, तसेच सर्वविषयसंग्राहक. मराठी विश्वकोश दुसऱ्या प्रकारचा आहे. अशा प्रकारच्या कोशाचे अनेक फायदे असतात. आवश्यक ती माहिती तर हा कोश देईलच; पण अधिकची माहितीही पुरवेल असा प्रयत्न आहे. यासाठी संपादकीय धोरण, रचना, नोंदींचे शास्त्र, स्वरूप, प्रकार, संपादन यावर खूप विचार केला आहे. त्याची माहिती आपणास 'मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ'मध्ये विस्ताराने वाचण्यास मिळते. शिवाय पहिल्या खंडाच्या प्रारंभी काही उपयुक्त मजकूर वाचण्यास मिळतो. त्याबद्दलचे सविस्तर विवेचन या प्रस्तावनेत आहे. संदर्भ ग्रंथ म्हणून 'मराठी विश्वकोश'चे आगळे महत्त्व आहे. जिज्ञासू वाचकांना विषय कसे शोधावेत, अधिकची माहिती कशी संपादन करावी याचे मार्गदर्शन ही प्रस्तावना करते. केवळ भारतातीलच नाही तर जगातील सर्व भाषा, देश, राष्ट्रे यांची सर्व प्रकारची माहिती हा 'मराठी विश्वकोश' पुरवितो. म्हणून या ज्ञानकोशास 'विश्वकोश' संबोधले आहे. मराठी विश्वकोशांतील संज्ञा, परिभाषांचा आधार इंग्रजी आहे. कारण त्यांचा वापर जगभर होत असल्याने त्यांचे वैश्विकीकरण झालेले आहे, हे इथे लक्षात घेतले आहे. त्यामुळेही या विश्वकोशाची उपयुक्तता वाढण्यास मदत झाली आहे.

मराठी विश्वकोश नोंदी या शास्त्रोक्त पद्धतीने लिहिल्या गेल्या असून अंतर्गत संदर्भ विस्तारासाठी बाणांकन पद्धती वापरली आहे. त्याच्या सूचना कोशाच्या प्रारंभी व परिचय

ग्रंथात मिळतात. शिवाय नोंदींमध्ये रेखाचित्रे, छायाचित्रे (कृष्णधवल व रंगीत), आकृत्या, तक्ते, आलेख इ. पुरवून माहिती अद्ययावत व प्रभावी पद्धतीने सादर करण्यात आली आहे. नोंदी शुद्ध स्वरूपात वाचावयास मिळाव्यात म्हणून शुद्धलेखन पाहिले गेले आहे. कोश मुद्रणदोष मुक्त आहे. नोंदीतील माहिती अद्ययावत व बिनचूक मिळावी म्हणून नोंद लेखक, नोंद संपादक, अभ्यागत संपादक यांच्यासाठी कोश कार्यालयात संदर्भ ग्रंथालय विकसित करण्यात आले आहे. दैनंदिनी माहिती संकलनार्थ वृत्तपत्रे, नियतकालिके, सांख्यिकी माहिती, अहवाल, विविध कोश, ज्ञानकोश, विश्वकोश संग्रहित करण्यात आले आहे. पहिली आवृत्ती पूर्ण होताच पूर्व नोंदींच्या व कोश खंडाच्या आधुनिकीकरण व अद्यतनतेकडे लक्ष पुरविण्यात येईल. ही प्रस्तावना म्हणजे मराठी विश्वकोशाचा रचनाकल्पच (Blue print) होय.

१२) धर्मकोश (१९२५ ते १९८८)

भारतात ब्रिटिश राज्यसत्तेची स्थापना पहिल्या स्वातंत्र्य लढ्यानंतर (१८५७) विधिवत सुरू झाली. भारतात ब्रिटिश कायद्यांची अंमलबजावणी सुरू झाली तशी येथील समाज व धर्मव्यवस्थेतही सुधारणा होऊ लागल्या. आजवर भारतीय समाज व्यवस्थेवर पारंपरिक वेद, वेदान्त, पुराण, ब्राह्मण ग्रंथ इ. द्वारे हिंदू धर्म नि वैदिक संस्कृतीचे साम्राज्य होते. ब्रिटिश कायदे व भारतीयांतील शिक्षण प्रसारामुळे धर्म सुधारणांना गती आली. येथील सुशिक्षितांत समाजाकडे पाहण्याची नवी बुद्धिवादी आणि मानवतावादी दृष्टी आली. त्यातून अनिष्ट चालीरीती, चातुर्वर्ण्य, प्रथा, जातीयता यांना विरोध सुरू झाला. राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाज स्थापनेतून हे कार्य आरंभले. महाराष्ट्रात त्याचे लोण पसरून प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज स्थापन झाला. बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी देशमुख, न्यायमूर्ती रानडे, सुधारककार आगरकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई प्रभृती मान्यवरांनी हे प्रयत्न सुरू केले. टिळक युगाचा अस्त होऊन सनातनी समाज व्यवस्थेजागी पुरोगामी चळवळीचे नेतृत्व उदयाला आले. त्यात महाराजा सयाजीराव गायकवाड, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांसारख्या प्रागतिक संस्थानिकांची सुधारणावादी दृष्टीही कारण ठरली. भारतात जिथे सनातनी शिक्षण सुरू होते, तिथे राष्ट्रीय शिक्षण सुरू झाले.

वाई हे गाव विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात सनातन धर्म शिक्षणाचे केंद्र होते. तिथे अनेक संस्कृत पाठशाळा चालत. अनेक घराण्यांत वेदाध्ययन चाले. वाईच्या प्राज्ञपाठशाळेचे प्रमुख नारायणशास्त्री मराठे या नव्या बदलाकडे स्वागतशील दृष्टीने पाहात. तशात तळेगावचे राष्ट्रीय शिक्षण देणारे वि. गो. विजापूरकर यांचे समर्थ विद्यालय ब्रिटिशांनी बंद केल्याने तेथील राष्ट्रीय व सुधारणावादी विद्यार्थी शिक्षक प्राज्ञपाठशाळेत आले. राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली गतिमान होत असताना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे सुधारवादी सक्रिय होत जाण्यातून समाज व धर्मसुधारणा प्रभावी होत गेल्या.

प्राज्ञपाठशाळेत शिकलेले व काशी कलकत्त्यातून तर्कतीर्थ पदवी संपादून आलेले लक्ष्मणशास्त्री जोशी सन १९२३ मध्ये अध्यापक म्हणून प्राज्ञपाठशाळेत दाखल झाले तेव्हा नारायणशास्त्री मराठे यांच्याबरोबर कार्यरत दिवेकरशास्त्री, कोनकरशास्त्री प्रभृतीमंडळी तशीच सुधारक वृत्ती नि मतांची होती. सन १९२३ ला वाईत भरलेल्या ब्राह्मण परिषदेत या सुधारणावादी आचार्यांनी सनातनी वृत्तीच्या मंडळींविरुद्ध सुधारणावादी दृष्टिकोन स्वीकारून पोटजातीतील विवाह धर्मसंमत असल्याची भूमिका मांडली. त्यांचा प्रभाव समाजमनावर पडला. त्यातून सनातन धर्माजागी सुधारवादी धर्मविचार मांडणे गरजेचे वाटून नारायणशास्त्री मराठे, जे पुढे संन्यास धारण करून स्वामी केवलानंद सरस्वती बनले, त्यांच्या नेतृत्वाखाली धर्मकोश निर्मिती मंडळाची स्थापना सन १९२५ ला वाईच्या प्राज्ञमठात म्हणजेच प्राज्ञपाठशाळेत झाली. या मंडळाची अशी भूमिका होती की, देशकालपरिस्थितीप्रमाणे निरनिराळ्या युगात धर्माचे स्वरूप बदलत आले आहे. मूलभूत तत्त्वे बदलली नाही तरी त्यांच्या अनुसरणाने वेळोवेळी परिस्थितीसापेक्ष आचारांचे नियम व संस्कार विधी-निषेध ठरत आले आहेत. धर्मग्रंथांचा ऐतिहासिक अभ्यास केला असता धर्मात झालेले बदल लक्षात येतात. हिंदू धर्म व संस्कृती जगातील प्राचीन गणली जाते. तिचा संगतवार इतिहास अद्याप (१९२५) लिहिला गेला नाही. धर्मकोशाच्या निर्मितीद्वारे हे कार्य शक्य आहे. त्यासाठी हिंदू धर्म व संस्कृतीची साधने कालानुक्रमाने ग्रंथित करून अभ्यासकांपुढे मांडणे आवश्यक आहे. ही साधने श्रुती, स्मृती, पुराणे निबंधग्रंथ यात साठवलेली आहेत. ही सर्व साधने, मुद्रित ग्रंथ, हस्तलिखिते यांचे उत्तम परिशीलन करून ही इतिहास साधने धर्मकोश रूपात प्रकाशित करण्याचा संकल्प करण्यात आला, आणि प्रत्यक्ष कार्यही सुरू झाले होते; पण सन १९३० च्या कायदेभंग चळवळीत प्राज्ञेपाठशाळेतील विद्यार्थी व शिक्षक मोठ्या प्रमाणात सामील झाल्याने प्राज्ञपाठशाळा बंद पडली. सन १९३१ ला नारायणशास्त्री मराठेंनी संन्यास धारण केला व ते टेंभूण निघून गेले. सन १९३२ ला कायदेभंग शिक्षा पूर्ण करून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वाईत परत आले. स्वामी केवलानंद सरस्वतींना घेऊन त्यांनी धर्मकोश, मीमांसा कोश कार्यात गती व सुसूत्रता आणली.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी धर्मकोश रचना सुटसुटीत केली. महामहोपाध्याय पां. वा. काणे यांनी 'धर्मशास्त्राचा इतिहास' लिहिण्यास प्रारंभ केला होता. त्यासाठी त्यांनी स्मृतिग्रंथांचा कालक्रम निश्चित केला होता. 'धर्मकोश'साठी तो ग्राह्य मानून पाठभेद तयार करण्यात आले. 'धर्मकोश' च्या ११ खंडांची योजना निश्चित करण्यात आली - १) व्यवहार किंवा प्राचीन कायदा, २) वैदिक अध्यात्मविद्या, ३) विवाहादी संस्कार, ४) राजनीती, ५) वर्णाश्रम धर्म, ६) शुद्धी व श्राद्ध, ७) प्रायश्चित्त, ८) शांतिकर्म, ९) पुराणागमधर्म, १०) कालतत्त्व, ११) मोक्ष. या आधारे कांडांची रचना व कार्यपद्धती निश्चित करण्यात आली - १) वचनसंग्रह, २) ऋषिवार विभाग, ३) ऋषिनिश्चिती, ४) प्रकरणश: विभाग, ५) पाठनिर्णय,

६) शास्त्रार्थ टीका - टिप्पणी, ७) संपादकीय संस्कार, ८) मुद्रण प्रत तयार करणे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या संपादकत्वाखाली आजवर प्रकाशित झालेल्या धर्मकोश खंडांची भागश: सूची खालीलप्रमाणे -

धर्मकोश रचना

१) व्यवहारकाण्डम् (VOL-I)

(अ) • Part I	• पूर्वार्ध: / व्यवहारमातृका	(१९३७)
	• प्रास्ताविकम् - १,२. ⊙	
	• Introduction - 3-9. ⊙	
	• A Ground Plan of the Vyavaharkanda	
(ब) • Part II	• विवादपदानि (Titels of Law) (1938)	
	• Preface - 1-3. ⊙	
	• A Ground Plan of the Vyavaharkanda - 4-7	
(क) • Part III	• उत्तरार्ध :	(1941)
	• विवादपदानि (Titels of Law)	
	• Introductory Notes ⊙	

२) उपनिषत्काण्डम् (VOL-II)

(ड) • Part I	• धर्मो विश्वस्य जगत: प्रतिष्ठा ⊙	
	• मंत्र ब्राह्मण उपनिषत् (अंश१,२)	(१९५०)
	• Preface - 5-10. ⊙	
	• Introduction - 11-103. ⊙	
(इ) • Part II	• प्रास्ताविकम् - 1-14 ⊙	(1949)
	• Introduction - 1-15 ⊙	
(फ) • Part III	• तृतीयो भाग:	(1949)
	• Introduction ⊙	
(ब) • Part IV	• चतुर्थो भाग:	
	• Preface - Page-1. ⊙	(1953)

३) संस्कारकाण्डम् (VOL-III)

(भ) • Part I		
	• प्रथमो भाग:	(1959)
	• प्रास्ताविकम् - Page 1, 2. ⊙	
• Part II		
	• द्वितीयो भाग:	(1980)

- Part III
    - तृतीयो भाग: (1981)
- Part IV
    - चतुर्थो भाग: (1983)
- Part V
    - पंचमो भाग: (1984)
- Part VI
    - षठो भाग: (1985)

४) राजनीतिकाण्डम् (VOL-IV)

- Part I
    - प्रथमो भाग: (1973)
- Part II
    - द्वितीयो भाग: (1973)
- Part III
    - तृतीयो भाग: (1974)
- Part IV
    - चतुर्थो भाग: (1977)
- Part V
    - पंचमो भाग: (1979)
- Part VI
    - षठो भाग: (1979)

५) वर्णाश्रमधर्मकाण्डम् (VOL-V)

- Part I
    - प्रथमो भाग: (1988)

वर दर्शविल्याप्रमाणे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ५ खंडांच्या २० भागांपैकी आरंभिक आठ भागांना प्रस्तावना वा निवेदने लिहिली आहेत. त्यांचा गोषवारा असा -

१) व्यवहारकाण्डम् (खंड-१, भाग-१)

धर्मकोश खंड-१, भाग-१ 'व्यवहारकाण्डम्' हा पूर्वार्ध असून तो 'व्यवहार मातृका' म्हणून ओळखला जातो. यात धर्मातील दंडनीती, व्यवहार, वर्णाश्रम, संस्कार, प्रायश्चित्त शान्तिकर्म, व्रत, यज्ञ, पूजाविधी, तीर्थयात्रा, प्रतिष्ठापना, मोक्ष, धर्म वा अधर्म या सर्वांचा

विचार म्हणजे धर्मव्यवहार होय. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या भागास प्रारंभी 'प्रास्ताविकम्' म्हणून संस्कृतमध्ये निवेदन केले आहे. त्यानुसार या भागात वरील सर्व बाबींचा व्यवहार अर्थात कार्यपद्धती, नियम, बंधन, परिणामादींची चर्चा आहे. प्राचीन ऋषि-मुनींनी याबाबत उपरोक्त आधार ग्रंथांमध्ये जे निर्देश केले आहेत, त्यांची या भागात चर्चा आहे. धर्मकोश हा धर्मसंबंधी ज्ञानकोश असल्याने या संबंधी विविध धर्माधार ग्रंथात जी प्रसंगोपात चर्चा आढळते, ती इथे कालसंगतरीत्या विवेचित करण्यात आली असल्याचे प्रस्तावनेतून लक्षात येते. 'धर्मकोश' संस्कृतमध्ये लिहिला असून त्याचे सर्वत्र प्रसारण व्हावे (जगभर) इंग्रजीचा जागोजागी आधार घेऊन बाबी स्पष्ट केल्या आहेत. 'निरुक्त', 'कल्पसूत्र', 'स्मृति', 'महाभारत', 'कौटिल्यकृत अर्थशास्त्र', 'रामायण', 'शुक्रनीती', 'अग्निपुराण', 'मानसोल्लास' इत्यादी ग्रंथांच्या आधारे यात धर्म-व्यवहार विवेचन करण्यात आले आहे. त्यासाठी विविध टीकाग्रंथ, भाष्य इ. चा आधार घेतल्याचे प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी स्पष्ट केले आहे. 'मिताक्षरा'चाही वापर करण्यात आला आहे. विवेचनात शुद्धपाठ वापरण्यावर भर देण्यात आला आहे. आवश्यक तिथे तळटीप (Foot Note) देण्यात आली आहे. विवेचन अद्यतन व्हावे म्हणून डॉ. जाली यांच्या संशोधनाबरोबर बिकानेर, बडोदे येथील प्राचीन ग्रंथ संग्रहालयाची या संदर्भात मदत झाल्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी करत अन्य शास्त्री-पंडितांचे ऋणनिर्देश केले आहेत. या सोबत 'Introduction' शीर्षक इंग्रजी प्रस्तावनाही आहे. तीत अधिकची सविस्तर माहिती मिळते. ती या ग्रंथाचे महत्त्व सिद्ध करते.

२) व्यवहारकाण्डम् (खंड-१, भाग-२)

या भागास इंग्रजी 'Preface' आहे. 'व्यवहारमातृका' शीर्षक पूर्व भागात परंपरागत रूढी, चालीरीती, कर्मकांड इ. प्रचलित धर्म-व्यवहार (Adjective Law) चर्चा आहे. त्यात प्राचीन धर्मग्रंथांचा व्यवहार सार आहे. या भागास 'व्यवहारपदानि' शीर्षक देण्यात आले आहे. त्याचा अर्थ 'Titels of Law' असा आहे. नागरी वा सांस्कृतिक लोकव्यवहाराची यात चर्चा आहे. अशा १३ व्यवहारांची (Laws) इथे चर्चा आहे - १) ऋणदानम् (कर्ज), २) उपनिधि: (ठेव), ३) अस्वामिविक्रय: (स्वमालकी नसलेल्या (वस्तू-वास्तू स्थावर-जंगम) ची विक्री, ४) संभूयमुत्थानम् (भागीदारी व्यवहार, प्रत्याभूती), ५) दत्ताप्रदानिकम् (भेट वा दानाचा पुनरारंभ), ६) अभ्युपेत्याशुश्रूषा (कराराचे उल्लंघन), ७) वेतनानपाकर्म (वेतन थकबाकी), ८) संविदव्यतिक्रम: (परंपरेने बहुमतमान्य लोकाचार - रूढी, परंपरा इ.), ९) क्रयविक्रयानुशय: (खरेदी-विक्रीसंबंधीचा करारभंग), १०) स्वामिपालविवाद (मालक-कूळ विवाद), ११) सीमाविवाद: (जमीनजुमल्यातील चतु:सीमा वाद), १२) स्त्रीपुंधर्मा: (स्त्री-पुरुष, पति-पत्नी इ. वाद), १३) दायभाग: (वहिवाट)

उपरोक्त व्यवहार पद्धतींसंबंधींचे उल्लेख आपणास 'मनुस्मृती', 'याज्ञवल्क्य स्मृती', 'नारदीय पुराण', 'कौटिल्य अर्थशास्त्र' इ. ग्रंथात वेगवेगळ्या रूपात आढळतात (अटी, शर्ती, नियम, प्रायश्चित्त इ. भिन्नता). याची सोदाहरण चर्चा, विवेचन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रस्तुत इंग्रजी प्रस्तावनेत केली आहे. तसेच या भागात ज्या ग्रंथ संहितांचा वापर करण्यात आला आहे, त्यांच्या स्थल, काल, स्वरूपांची माहिती सदर प्रस्तावनेत संपादकांनी जिज्ञासूंसाठी दिली आहे. काही उद्धरणांसबंधीचे संदर्भ, खुलासे प्रस्तावनेत येतात. पुढील भाग-३ मध्ये जे विभाग अंतर्भूत आहेत, द्विरुक्ती टाळण्यासाठी ते या भागात न दिल्याची सूचनाही प्रस्तावनेतून मिळते. 'धर्मकोश' या या छोट्या छोट्या भागांच्या संदर्भ मालिकाच होत. त्यामुळे वाचकास खंडातील भागाच्या विषयाचा परिचय व पूर्वज्ञान होते. या प्रस्तावना नाटकातील पूर्वभूमिकांचे (Curtain Raiser) कार्य करतात.

३) व्यवहारकाण्डम् (खंड-१, भाग-३)

अठरा पुराणांमध्ये व्यवहारसंबंधी अनेक बाबींचे उल्लेख येतात. ते सर्व 'धर्मकोश' मध्ये संक्षेपाने घ्यायचे तरी मोठे काम होऊन बसेल. अशा स्थितीत केवळ त्यांची अनुक्रमणिकेत सूची देणे हाच मार्ग होता. तो अवलंबला असल्याचे या भागाच्या 'प्रास्ताविक निवेदन' (Introductory Note) मध्ये संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी नमूद केले आहे. हे निवेदन अशा सूचनांची जंत्रीच होय. शिवाय 'धर्मकोश' सहाय्यक ग्रंथांची सूचीही या भागाच्या परिशिष्टात देण्यात आली आहे. काही सूचक चिन्हे वापरून हा कोश वाचकसुलभ बनवण्याचा प्रयत्न संपादक महोदयांनी केला आहे. सदर भागात ग्रंथांमधील संस्कृत शब्दांची सूची देण्यात आली आहे. त्यामुळे शंका समाधान त्वरित होणे शक्य झाले आहे. सदर कोशात अनावधानाने काही बाबी आल्याचे, उदा. 'आपस्तंब धर्मसूत्र' मधील काही परिच्छेद अंतर्भूत झाल्याबद्दलची स्पष्ट कबुली देऊन संपादकांनी पारदर्शिता प्रदर्शित केली आहे. सदर भागास साहाय्य करणाऱ्यांचा ऋणनिर्देशही करण्यात आला आहे.

एकूणच, ही प्रास्ताविक नोंद म्हणजे वाचक मार्गदर्शिका बनली आहे. अशा कोशांच्या वापरात मात्र या सूचनांमुळे श्रम नि वेळ वाचत असतो. शिवाय नेमकी गोष्ट शोधून वाचणे शक्य होते, हे अनुभवावरून सांगणे आवश्यक आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची संस्कृत पंडित म्हणून जी घडण झाली, त्यांनी ज्या गुरुकुल पद्धतीचे शिक्षण घेतले ते मीमांसा, खंडन-मंडन, चर्चा, पूर्वमीमांसा, उत्तर मीमांसा अशा पठडीतून झाले असल्याने ते संस्कृत कोश निर्मिती व संपादनास उपकारक व उपयुक्तच ठरले आहे. कोशाचा विस्तार पाहता, तो या अभ्यासावर उभा आहे हे दिसून येते. 'धर्मकोश' वैदिक वाङ्मयाच्या सारतत्त्वाचा ज्ञानकोश बनला आहे, त्यामागे अध्ययन, अध्यापन, संशोधन, समीक्षा, मीमांसा इ. ची साधना आहे. गुरुवर्य स्वामी केवलानंद सरस्वतींच्या ज्ञानभांडार व शिस्तीवर या कोशाचे शरीर व संरचना उभी आहे.

४) उपनिषत्काण्ड (खंड-२, भाग-१)

'धर्मकोश' मालेतील ही एकमेव अशी विस्तृत प्रस्तावना असून या भागास तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'मंत्र-ब्राह्मण-उपनिषत्' अर्थात 'मंत्रब्राह्मणोपनिषद्' असे कल्पक नाव देऊन आपल्या प्रतिभेचा प्रत्यय दिला आहे. वेदकाळ आणि वेदान्त यांमध्ये काळाचे मोठे अंतर आहे. या भागाचा उद्देश दोन्हींमधील ऐतिहासिक पार्श्वभूमी (परिस्थिती)चा फरक, तसेच उपनिषदकालीन तत्त्वज्ञान समजावणे असा निश्चित केला असल्याचे तर्कतीर्थांनी प्रस्तावनेत स्पष्ट केले आहे. उपनिषद तत्त्वज्ञानात पुरुष, प्राण व आत्मन् (ब्रह्म) या तीन संकल्पनांचा ऊहापोह करण्यात आला आहे. 'धर्मकोश'च्या या भागात अध्यात्मदर्शन आहे. यात संहिता व ब्राह्मणे ह्यातील वचनांचा (तत्त्वांचा) सर्वंकष संग्रह करण्यात आला आहे. वेद साहित्य इतिहासात असा प्रयत्न प्रथमच करण्यात आला आहे. हे 'धर्मकोश'चे म्हणजेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे अपूर्व असे योगदान ठरते. उपरोक्त वचनांची या खंडात विषयवार वर्गवारी करण्यात आली आहे. त्यात १) अग्नी, इंद्र, सोम इ. देवता, २) परमात्मा, ३) सृष्टी, ४) शरीर, ५) जीवगती, ६) धर्मतत्त्व, ७) श्रेयस, ८) प्रणव या विषयांचा समावेश आहे. तो व्यापक (Exhaustic) आहे. 'अधिकस्य अधिकम् फलम्' न्यायाने वचन निवडीत उदारतेचे धोरण अंगिकारल्याचे दिसून येते. परमात्म्याचे वर्णन यात विविध विशेषणे - सर्वज्ञ, सर्वान्तर्यामी, सर्वदेवतात्मे - वापरून करण्यात आले आहे. त्यातून ईश्वराचे एकत्व नि श्रेष्ठत्व अधोरेखित केले आहे. यात अग्नी, सृष्टी, इंद्रादि देवतांचे मंत्र आहेत. ते त्यांची स्तुती, आराधनासूचक आहेत. दान, धर्म, अधर्म इत्यादींची येथे प्रसंगोपात चर्चा आहे. ''उपनिषदातील तत्त्वज्ञानाला आधारभूत ठरू शकतील अशा अम्नायवचनांचा संग्रह करावा ही कल्पनाच उदात्त असल्याचे''[११] म. अ. मेहेंदळे यांनी म्हटले आहे, ते सार्थच होय. या खंडामुळे वेदांचा कालानुक्रमिक अभ्यास शक्य झाला. हा उपक्रम संशोधकांना पर्वणी ठरावा. ही प्रस्तावना संस्कृत आणि इंग्रजीत असून सुमारे १०० पृष्ठ भरतील इतकी प्रदीर्घ आहे. तिचे सौंदर्य आस्वादन मूळ संहिता वाचनानेच करता येते.

५) उपनिषत्काण्डम् (खंड-२, भाग-२)

'धर्मकोश'च्या या भागास संस्कृत 'प्रास्ताविकम्' ला समांतर इंग्रजी 'Introduction' प्रस्तावनेची जोड आहे. दोहोंमध्ये काही गोष्टी समान असणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. हा कोश तयार केला जात होता, तेव्हा संपादकांपुढे सुमारे २२५ इतक्या मोठ्या संख्येने हस्तलिखित आणि मुद्रित रूपाची उपनिषदे होती. त्या सर्वांचाच अंतर्भाव या भागात करता न आल्याचे संपादकांचे शल्य समजण्यासारखे आहे. असे असले तरी शंकरकृत 'ब्रह्मसूत्रभाष्य', भास्कर, रामानुज, नम्बार्क, माधव, श्रीकांत, वल्लभ, विज्ञानभिक्षु इ. मान्यवर आचार्यांचे ग्रंथ हे या कोशात अंतर्भूत आहे. त्यावरूनही या भागाचे महत्त्व लक्षात येते. या सर्वांच्या ग्रंथ नि संदर्भांचे विस्तृत विवेचन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या 'प्रास्ताविकम्'मध्ये केले आहे.

या प्रास्ताविकात 'व्याख्यानसंग्रहपद्धति' आणि सदर 'उपनिषत्काण्डम्' मधील उल्लेखित स्थल-काल निर्देश पद्धतीबद्दलही विस्ताराने विवेचन केले आहे. शेवटी 'शुद्धिपत्र'ही जोडले आहे.

या भागात १) ऐतरेय, २) कौषीतकि, ३) तैत्तिरीय, ४) छान्दोग्य, ५) बृहदारण्यक, ६) ईश, ७) तलवकार ब्राह्मणोपनिषत (केन), ८) काठक, ९) मुण्डक, १०) प्रश्न, ११) माण्डुक्य, १२) शिवसंकल्प, १३) श्वेताश्वतर, १४) महानारायण, १५) मैत्रायणी, १६) जाबाल, १७) कैवल्य, १८) अथर्वशिर, १९)अथर्वशिखा या उपनिषदांचा अंतर्भाव केल्याचे संपादकांनी प्रस्तावनेत सांगितले आहे. काही उपनिषद चर्चांमध्ये डॉ. ओरटेल यांच्यासारख्या विदेशी अभ्यासकांच्या संशोधनाचा परामर्श घेऊन आपली मीमांसा अधिक शास्त्रोक्त व कालसंगत करण्याचा प्रयत्न स्तुत्यच म्हणावा लागेल. 'शंकराचार्य भाष्य'ही तितकेच महत्त्वाचे आहे. विभिन्न श्रुति-स्मृतींची यातील यादी वाचता संपादकांनी कोश सिद्धीस घेतलेल्या कष्टाची कल्पना येते. ज्ञानसक्ती नि ज्ञानसाधनेचे हे मूर्त रूप होय.

६) उपनिषत्काण्डम् (खंड-२, भाग-३)

या भागास 'Introduction' शीर्षक असलेली तीन पृष्ठांची संक्षिप्त इंग्रजी प्रस्तावना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिली आहे. हा भाग दोनचाच उत्तरार्ध वा विस्तार होय. या प्रस्तावनेत कोश लेखन पद्धतीवर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यानुसार प्रथम कालक्रमाधारे संहिता निवडली जाते. नंतर विषय सूचित केला जातो. तद्नंतर संहिता मजकूर सादर केला जातो. संहिता शीर्ष इंग्रजीत दिले जाते. त्यामुळे सार्वत्रिकता बोधास मदत मिळते. एकाच शीर्षकाची अनेक हस्तलिखिते, पोथ्या उपलब्ध असतात. अशा स्थितीत प्रमाणीकरण करणे हे मोठे जिकिरीचे असले तरी अनिवार्य असते. संहिता (Text) आणि भाष्य (Commentry) यात फरक/भेद करून त्यांचा कोशात उपयोग करण्यात आल्याने कोशाची अधिकृतता व शास्त्रोक्तता वरच्या दर्जाची सिद्ध झाली आहे. 'धर्मकोश'चे जे माहितीपत्रक प्रकाशक असलेल्या प्राज्ञपाठशाळा मंडळामार्फत प्रकाशित करण्यात आले आहे, त्यात कोशाचे संपादक मंडळ आहे. ते सर्व वेदातील अधिकारी व्यक्ती होत. शिवाय 'धर्मकोश'चे परीक्षण ज्या विविध दैनिक, नियतकालिकांत प्रसिद्ध झाले आहे, ते सर्वही प्रथितयश व्यक्ती/संस्था होत. त्यापैकी 'The Times of India, Bombay' चा अभिप्राय या कार्याची जी प्रशस्ती करतो, ती एकदा सर्वांच्या डोळ्याखालून जायलाच हवी. 'धर्मकोश' परीक्षणात म्हटलं गेलं आहे की,

'That is now 'Upanishatkanda' comes to form of part of the 'Dharmakosha'. Like a Scientific Historian, the learned Editor has discarded the tradition belief which thought of scriptures as inspired literature and accepts the gradual process of evolution of thought from

the 'Vedas' to the 'Vedanta' (Upanishadas)'[20]

'धर्मकोश'ची सर्वात मोठी ओळख ही त्याची प्रागतिकता आहे. 'धर्मकोश'चा संकल्प सोडला गेला तोच मुळी धर्मसुधारणा कार्याच्या हेतूने, हे विसरून चालणार नाही.

७) उपनिषत्काण्डम् (खंड-२, भाग-४)

प्रस्तुत खंडास तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'Preface' शीर्षक छोटी प्रस्तावना आहे. तिला प्रस्तावना म्हणण्यापेक्षा 'ऋणनिर्देश' (Acknowledgement) म्हणणं अधिक सयुक्तिक ठरलं असतं. यात त्यांनी साहाय्यक सहकाऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करत आभार मानले आहे. विशेषत: डॉ. जी. व्ही. देवस्थळींचे विशेष आभार मानलेत. कारण त्यांनी या खंडासाठी इंग्रजी अनुक्रमणिका (शब्दसूची) तयार करून देण्याचे मोठे कार्य केले आहे. अन्य सहकाऱ्यांत सर्वश्री रंगनाथशास्त्री जोशी, गोविंदशास्त्री केळकर, एस. व्ही. लेले यांचा अंतर्भाव आहे. यातील शब्दसंग्रह प्रस्तुतीत भाषाशास्त्रीय शिस्त पाळण्यात आली आहे. तत्त्वज्ञानातील प्रचलित व परिचित शब्दांचा वापर करून हा भाग वाचकानुवर्ती होईल असे पाहिले आहे.

८) संस्कारकाण्डम् (खंड-३, भाग-१)

या खंडाच्या प्रथम भागास संस्कृत प्रस्तावना असून 'प्रास्ताविकम्' तिचे शीर्षक आहे. व्यवहारकांड पूर्ण झाल्यावर हा खंड हाती घेण्यात आला. याचे सहा भाग प्रस्तावित आहेत. पहिल्या भागात विवाह संस्कार चर्चा आहे. दुसऱ्या भागात विवाह ज्योतिष, मांगलिक संस्कार (विधि), गणेश पूजन, ग्रहयज्ञ इ. विवाहसंबंधी बाबींचा ऊहापोह करण्यात आला आहे. तिसरा भाग गर्भाधान विधानास समर्पित आहे.

'संस्कारकांड' मध्ये समग्रत: (सहा भागात) विविध संस्कारसंबंधी वचने, व्याख्यान (भाष्य, स्पष्टीकरणे इ.), पाठभेद (विभिन्न मते), विषय संग्रह पद्धती व वर्गीकरण, त्यांचे नियम इ. ची या प्रस्तावनेत संक्षेपाने माहिती दिल्याने संस्काराच्या विविध भागांची वाचकास वा जिज्ञासूस कल्पना येते. या विषयीचे ग्रंथ, संहितादी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मुंबई, पुणे, म्हैसूर येथून प्रकाशित प्रसिद्ध ग्रंथ संकलित करून वापरले आहेत. प्रस्तावनेत त्या सर्वांचे विस्तृत नामोल्लेख आहेत. शिवाय या प्रकल्पास अर्थसाहाय्य प्रदान करणाऱ्या माधवप्रसाद बिर्लांचा गौरवपूर्ण शब्दात उल्लेख आहे.

'धर्मकोश'च्या विविध खंड नि भागांना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ज्या उपरोक्त प्रस्तावना लिहिल्या त्या अधिकतर त्या त्या खंड नि भागातील विषयांचे विवेचन करणाऱ्या आहेत. 'उपनिषत्काण्डम्'च्या भाग-१ ची 'मंत्रब्राह्मणोपनिषद' प्रस्तावना विषयाचे तात्त्विक विवेचन करणारी आहे. पण समग्रत: त्या सर्व प्रस्तावना या 'धर्मकोश' प्रकल्पाचा आवाका, उद्देश नि कार्य समजावून देणाऱ्या आहेत. ते स्पष्ट करणारे एक निवेदन अगदी अलीकडेच

प्राज्ञपाठशाळा मंडळ अध्यक्ष प्रा. डॉ. सरोजा भाटे यांनी वृत्तपत्रात प्रसृत केले आहे. ते इथे आपणास त्याची सुस्पष्ट कल्पना यावी म्हणून उद्धृत करण्याचा मोह आवरत नाही. त्यात त्या म्हणतात, '''धर्मकोशा'त धर्मशास्त्रामध्ये अंतर्भूत होणाऱ्या सर्व विषयांचे कालानुक्रमे सर्व संदर्भ संस्कृत वाङ्मयातून एकत्र करणे, मूळ श्रुतिस्मृतींची वचने, त्यावरील भाष्य, टीका, शास्त्रार्थ यांचे संकलन करणे, या संग्रहाच्या आधारे आजमितीस 'धर्म' या संकल्पनेच्या रूढ झालेल्या संकुचित अर्थापलीकडे असणारे धर्माचे सर्वसमावेशक आणि विश्वात्मक रूप लोकांसमोर आणणे, धर्म हा केवळ उपासना पद्धती संप्रदायापुरता मर्यादित नसून आचार, कायदा, राजनीती, शासन पद्धती या विषयांना तो कसा कवेत घेतो, धर्म प्रत्येक वर्गासाठी समान आहे, हे विशद करणे, धर्मशास्त्रीय संदर्भांच्या आधारे प्राचीन भारतीय न्याय आणि शासन व्यवस्थेचा विकास सर्वांसमोर आणणे अशी प्रकल्पाची उद्दिष्टे आहेत.''[२१]

हे लक्षात घेतले की स्वामी केवलानंद सरस्वती, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, त्यांचे समकालीन सहकारी पंडित, शास्त्री, संपादक इ. मंडळींनी गेले शतकभर करत आणलेले कार्य केवळ आर्थिक तरतुदीअभावी अपूर्ण राहत असेल तर सर्व समाजहितैषी मंडळींनी वैदिक संस्कृती जपण्याचा हा प्रकल्प येनकेन प्रकारेण पूर्ण होईल हे पाहायला हवे. त्यात शासन दानशूर व्यक्ती, संस्था, बहुराष्ट्रीय कंपन्या, लोकप्रतिनिधी, सुशिक्षित समृद्ध वर्ग व सर्वसामान्यांनीपण यास हातभार लावायला हवा, कारण तो अंतिमत: त्यांच्याच अधिक हिताचा आहे. या समग्र वाङ्मय प्रकल्पात 'धर्मकोश' विचार नि चर्चेचा तोच मूळ उद्देश आहे.

(ब) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई द्वारा प्रकाशित ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत प्रकाशित ग्रंथांची निर्मिती का करण्यात आली त्याविषयीच्या एका प्रारंभिक ग्रंथातील निवेदनात तर्कतीर्थांनी स्पष्ट केले आहे की, ''मराठी भाषेला विद्यापीठाच्या भाषेचा दर्जा येण्याकरिता मराठीत विज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिकशास्त्रे आणि तंत्रविज्ञान या विषयांवरील ग्रंथांची रचना मोठ्या प्रमाणात होण्याची आवश्यकता आहे. वरील विषयांवर केवळ परिभाषा कोश अथवा पाठ्यपुस्तके प्रकाशित करून अशा प्रकारचा दर्जा मराठी भाषेला प्राप्त होणार नाही. सर्वसामान्य सुशिशितांपासून ते प्रज्ञावंत पंडितांपर्यंत मान्य होतील, अशा ग्रंथांची रचना व्हावयास पाहिजे. मराठी भाषेत किंवा अन्य भारतीय भाषांमध्ये विज्ञान, सामाजिकशास्त्रे व तंत्रज्ञान या विषयांचे प्रतिपादन करावयास उपयुक्त अशा परिभाषा-सूची किंवा परिभाषा-कोश तयार होत आहेत. परिभाषा किंवा शब्द यांचा प्रतिपादनाच्या ओघात समर्पकपणे वारंवार प्रतिष्ठित लेखांत व ग्रंथांत उपयोग केल्यानेच अर्थ व्यक्त करण्याची त्यांत शक्ती येते. अशा तऱ्हेने उपयोगात न आलेले शब्द केवळ कोशात पडून राहिल्याने अर्थशून्य राहतात. म्हणून, मराठीला आधुनिक तंत्रज्ञानांची भाषा बनवण्याकरिता शासन-विद्यापीठे, प्रकाशन-संस्था व त्या त्या विषयांचे

कुशल लेखक यांनी ग्रंथरचना करणे अवश्य आहे.''[२२]

हा उद्देश लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने वाङ्मय निर्मितीचा विविध स्वरूपाचा कार्यक्रम हाती घेतला. त्या अंतर्गत मराठी विश्वकोश, मराठी भाषेचा महाकोश, वाङ्मय कोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला, आंतरभारती, विश्वभारती, महाराष्ट्रेतिहास इत्यादी योजना हाती घेऊन शेकडो ग्रंथ प्रकाशित केले. विज्ञानांतर्गत आरोग्यशास्त्र, शरीरविज्ञान, जीवशास्त्र, आयुर्वेद, गणित, ज्योतिषशास्त्र, भौतिकी, तंत्रज्ञान, अणुविज्ञान, सांख्यिकी, स्थापत्यशास्त्र, वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, भूगोल, खगोल, खनिज इ. शास्त्रे समाविष्ट होताrल असे ग्रंथ प्रकाशित केले.

भारत हे बहुभाषी राष्ट्र आहे. भारतीय राज्यघटनेच्या ८ व्या परिशिष्टानुसार आसामी, बंगाली, बोडो, डोगरी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, कोकणी, मल्याळम, मणिपुरी, मराठी, मैथिली, नेपाळी, उडिया, पंजाबी, संथाली, संस्कृत, सिंधी, तामिळ, तेलुगू, उर्दू या देशांच्या २२ राजभाषा आहेत. भारताची राष्ट्रीय एकात्मता ही पश्चिमी देशांतील 'एक राष्ट्र व एकभाषा' अशा स्वरूपाची नाही. 'एक हृदय हो भारत जननी', 'अविभक्तं विभक्तेषु' असे तिचे आंतरभारती रूप आहे. साने गुरुजींची 'आंतरभारती व प्रांतभारती', रवींद्रनाथ टागोरांची 'विश्वभारती' आणि गटेची 'विश्वसाहित्य' संकल्पना स्वीकारून तर्कतीर्थांनी भारतीय व आंतरराष्ट्रीय भाषांतील अभिजात ग्रंथांच्या भाषांतराची योजना हाती घेऊन अनेक ग्रंथ मराठी भाषेत आणले. भारतीय भाषांमधील तमिळ, संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम, उडिया भाषा अभिजात मानल्या गेल्या आहेत. त्यांचे नि अन्य भाषांचे साहित्य इतिहास, परिचय ग्रंथ, वाचन-माला, द्वैभाषिक कोश प्रकाशित केले आहेत.

तसेच महाराष्ट्राच्या इतिहासविषयक उजेडात आलेली अव्वल साधने लक्षात घेऊन आधुनिक इतिहासरचनेच्या तत्त्वांनुसार महाराष्ट्राचा एक प्रमाणभूत व सलग सांस्कृतिक, राजकीय इतिहास मराठी भाषेत संपादून तो प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंड, मराठा कालखंड, पेशवा कालखंड, आधुनिक कालखंड असे पाच खंडात इतिहास प्रकाशनाचे कार्य मंडळाने केले. त्यासाठी पोर्तुगीज, फ्रेंच, उर्दू, पर्शियन आणि राजस्थानी भाषांतील अव्वल साधनांचे संकलन, भाषांतर, प्रकाशन अशी त्रिसूत्री राबवली. त्यामुळे अधिकृत व वस्तुनिष्ठ इतिहास ग्रंथ निर्मिले गेले.

भाषांतरित ग्रंथ

मराठी भाषेस ज्ञानभाषा म्हणून समृद्ध करण्याच्या हेतूने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत जागतिक भाषांपैकी इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटिन इ. भाषांतील अभिजात ग्रंथ मराठीत आणण्याची एक व्यापक योजना आखली. तज्ज्ञांची समिती नेमून अशा ३०० ग्रंथांची सूची तयार करून

त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांवर भाषांतराचे कार्य सोपवले व अल्पावधीत अनेक ग्रंथ प्रकाशित झाले. या भाषांतर योजनेच्या अनुषंगाने सुप्रसिद्ध संस्कृत पंडित श्री. पां. वा. काणे यांच्या 'History of Dharmshastra' च्या यशवंत आबाजी भट यांनी 'धर्मशास्त्राचा इतिहास' शीर्षकाने जो अनुवाद केला आहे, त्यास तर्कतीर्थांनी विवेचक प्रस्तावना लिहिली आहे. त्यात भाषांतरसंबंधी भूमिका मांडत म्हटले आहे की, ''ज्ञान हे विनिमयाने वाढते. जगातील सगळ्याच प्रौढ अवस्थेस पोचलेल्या संस्कृतींमध्ये विशेषत: पश्चिमी संस्कृतीमध्ये फार विशाल ग्रंथसंपत्ती निर्माण झाली व होत आहे. मराठी साहित्याला समृद्ध होण्याकरिता जगातील सर्व साहित्यातील निवडक विचारसंपन्न व सुंदर साहित्याचा मराठीत अनुवाद करण्याची आवश्यकता आहे.''[२३]

सदर प्रस्तावनेत तर्कतीर्थ भाषांतर प्रक्रिया समजावत तिचे भाषा विकासातील महत्त्व अधोरेखित करत म्हणतात की, ''भाषांतर करणे ही क्रिया मूळ ग्रंथ लिहिणे या क्रियेइतकीच जबाबदारीची गोष्ट आहे. नामांकित ग्रंथ लिहिण्यास जसे परिश्रम घ्यावे लागतात तसेच भाषांतरासही घ्यावे लागतात. परंतु मूळ ग्रंथ लिहिणे व भाषांतर करणे या दोन प्रयत्नांची प्रक्रिया अत्यंत भिन्न आहे. विकासाच्या समान पातळीवर असलेल्या अत्यंत प्रगत झालेल्या इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादी पश्चिमी भाषांमधील प्रतिष्ठित (Classical) ग्रंथांचे एकमेकीत भाषांतर करणेसुद्धा फार जिकिरीचे काम असते. प्रत्येक भाषेची मूलभूत रचना, पदपदार्थसंबंध, शब्दावली, म्हणी व उपवाक्यसंबंध यांत कमीजास्त भिन्नता असते. कोणताही नामांकित वैचारिक प्रबंध किंवा कलात्मक निबंध संपूर्ण अभिप्रायाने भाषांतरित करणे हे जवळ जवळ अशक्य कोटीतले काम असते.''[२४]

मंडळाने भाषांतरासाठी पाश्चात्त्य व भारतीय भाषांतील जे ३०० ग्रंथ निवडले होते, त्यात होमर, व्हर्जिल, एस्किलस, ॲरिस्टोफेनिस, युरिपिडिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, थॉमस ॲक्वानस, न्यूटन, डार्विन, रूसो, काँट, हेगेल, जॉन स्टुअर्ट मिल, गटे, शेक्सपिअर, टॉलस्टॉय, दोस्तएवस्की, कॅसिरेर, गॉर्डन व्ही चाइल्ड यांच्या विश्वश्रेष्ठ व प्रसिद्ध साहित्यकृतींचा समावेश होता. या योजनेंतर्गत जॉन स्टुअर्ट मिलचे 'ऑन लिबर्टी', रूसोचे 'सोशल कॉन्ट्रॅक्ट', मानवेंद्रनाथ रॉय यांचे 'रीझन, रोमँटिसिझम अँड रिव्होल्यूशन', व 'लेटर्स फ्रॉम जेल', स्तानिस्लावस्कीचे 'ॲन ॲक्टर प्रपरेस', तुर्गनेवचे 'फादर अँड सन्स', रायशेनबाखचे 'राइज ऑफ सायन्टिफिक फिलॉसॉफी', गन्नर मिलदारचे 'इकॉनॉमिक थ्योरी अँड अंडरडेव्हलप्ड रिजन्स', पां. वा. काणेंचे 'हिस्ट्री ऑफ धर्मशास्त्र', कोपलँडचे 'म्युझिक अँड इमॅजिनेशन', बर्ट्रांड रसेलचे 'रिलिजन अँड सायन्स', विशाखादत्तचे 'मुद्राराक्षसम्', भरतमुनीचे 'भरतनाट्यशास्त्र' सारखे ग्रंथ प्रकाशित झाले असून ही भाषांतर परंपरा मराठीत आजही अबाधित आहे. आजमितीस मराठी साहित्यात मौलिक रचनांच्या तुलनेत भाषांतरित रचना अधिक प्रकाशित होत आहेत. त्यामुळे मूळ मराठी साहित्य निर्मितीस ओहोटी लागल्याचे जे

दृश्य पाहावयास मिळते, तो वर्तमानासाठी चिंता नि चिंतनाचा विषय व्हायला हवा. मराठी प्रकाशन गृहांचे रूपांतर अनुवादगृहात झालेले दिसते आहे. यावर विचार व्हायला हवा.

ललित कला ग्रंथ

सौंदर्य अथवा लालित्य व्यक्त करणाऱ्या कला म्हणजे ललित कला (Fine Arts) होत. या कलांच्या अभिव्यक्तीत कोमलता, आल्हादकता व मनोहर भाव-भावना व्यक्त करण्याचे सामर्थ्य असते. नाट्य, नृत्य, वाद्य, चित्र, गायन इ. कलांचा अंतर्भाव ललित कलांमध्ये होतो. या कला नि त्या कलांसंबंधी मूलभूत संशोधन करून लिहिलेले ग्रंथ नाट्यशास्त्र, संगीतकला, शिल्पकला, चित्रकला, नृत्य इ. मध्ये विपुल मौलिक ग्रंथसंपदा आढळते. इंग्रजी, संस्कृतसारख्या भाषांत असे ग्रंथ मोठ्या संख्येने आहेत. काही नवसंशोधनाधारित ग्रंथही मौलिक स्वरूपाचे आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने असे प्रातिनिधिक ग्रंथ निवडून ते मराठीत आणले. अन्य भाषिक साहित्यिक ग्रंथांप्रमाणे या ग्रंथांनाही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्या बऱ्याचशा साचेबंद असल्या तरी काही नवा दृष्टिकोन देणाऱ्या, भाष्य करणाऱ्या आहेत. अशा प्रस्तावनांचा अंतर्भाव या खंडात करण्यात आला आहे. अर्थात् त्यांचे स्वरूप प्रातिनिधिक वा नमुन्यासारखे आहे. ललित कलाविषयक हे ग्रंथ जसे भाषांतरित आहेत, तसेच काही पुनर्मुद्रित (जे दुर्मीळ होते) तर काही सुधारित रूपात प्रकाशित करण्याचा प्रयत्न दिसून येतो.

डॉ. श्री. ना. रातंजनकरलिखित 'पं. विष्णु नारायण भातखंडे', प्रा. र. प. कंगले अनुवादित 'रस-भाव-विचार', आणि 'दशरूपकविधान', बा. गं. आचरेकर यांचे 'भारतीय संगीत व संगीतशास्त्र', डॉ. ग. ह. तारळेकर अनुवादित शार्ङ्गदेवाचे 'संगीत रत्नाकर', • नंदिकेश्वरांचे 'अभिनय दर्पण', डॉ. बी. सी. देव कृत Encyclopedia of Indian Music, पार्वतीकुमार यांचे 'तंजावरची नृत्यसाधना', अशी कितीतरी पुस्तके आहेत. ज्यांना तर्कतीर्थांच्या 'निवेदन' रूप प्रस्तावना आहेत. डॉ. वा. वि. मिराशी यांचा 'कालिदास' ग्रंथ वाचनीय आहे. रस, रंग, ताल, सूर, आकार, वृत्त, अलंकार, लय, रूप इ. कितीतरी ललित अंगांवर प्रकाश पाडणारे ग्रंथ, त्यांची निवड यामागे तर्कतीर्थांची मराठी समृद्ध करण्याची धडपड वाखाणण्यासारखी आहे.

क्रीडा ग्रंथ

जे कलांचे तेच क्रीडांचेही. डॉ. नरेंद्र दाभोळकरांचे 'कबड्डी' आणि ना. रा. वडनप यांचे 'बुद्धिबळे' वाचले की क्रीडा हा शरीर, बुद्धी, मन यांना विकसित करणारा साहित्य प्रकार आहे. मैदान आणि मनाच्या संयोगाशिवाय मानवी मन नि भावना संयमित व संतुलित विकसित होत नसतात, हे लक्षात येते.

इतिहास ग्रंथ

महाराष्ट्र राज्य स्थापन झाले तेच मुळी मराठी भाषा, साहित्य नि संस्कृती संरक्षण, संवर्धनासाठी. तेव्हा राज्य विकास योजनेत महाराष्ट्राच्या इतिहासाचे जतन करायचे ठरवले होते. भारताचा इतिहास हा विविध वंश, जमाती, स्थलांतरितांच्या आगमन व स्थिरीकरणाचा आहे, तसाच तो स्थित्यंतराचा आहे. इतिहास पूर्वखुणा जपत राहतो नि काळ त्यावर विस्मृतीची पुटे चढवत राहतो. दडलेलं, दडपलेलं शोधणं हेच इतिहास संशोधनाचं इप्सित कार्य असतं. इतिहास हा शब्दच मुळी निश्चिती नि अस्तित्वाचा सूचक व पर्यायी आहे. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने जितक्या मोठ्या प्रमाणात His Story लिहिली, तितक्या प्रमाणात Her Story लिहिली नाही. ही पक्षधरता नि इतिहासकारांच्या मानसिक पक्षपाताची निदर्शक आहे. इतिहास नि राज्यशास्त्रात 'राजेशाही' शब्द आहे, 'राणीशाही' नाही. नूरजहाँ, एलिझाबेथ, चन्नम्माचे तितके गौरवीकरण नाही, जितके औरंगजेब, हिटलर, मुसोलिनीचे आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी महाराष्ट्राचा पूर्वेतिहास जो फ्रेंच, पोर्तुगीज, इंग्रजांनी लिहून ठेवला होता, त्याची भाषांतरे उजेडात आणून पूर्व इतिहासावर चढलेली पुटे दूर केली. त्यातून डॉ. बादल सरकार, डॉ पांडुरंग पसुर्लेकर, निकोलाव्हा मनुची, रूबेन लेव्ही, सर विस्टन चर्चिल यांचे महाराष्ट्र, भारत व जगासंबंधी प्रसिद्ध ऐतिहासिक ग्रंथ मराठीत आणून मराठी भाषा ज्ञानसंपन्न केली. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने', 'युद्ध आणि शांती', 'उत्तरकालीन मुघल', 'दुसरे महायुद्ध', 'मोगल दरबाराची बातमीपत्रे', 'जगाचा शोध व शोधक' सारखे ग्रंथ याचीच साक्ष देतात. इतिहास केवळ कागदपत्रे, ताम्रपत्रे, नाणी, युद्धसाधने यांत नसतो, तर तो साहित्य, भाषांतूनही प्रतिबिंबित असून तो अधिक सजीव रूपात प्रवासवर्णने, स्वारी, मुशाफिरी, दैनंदिनी, पत्रे यात दडलेला असल्याचे भान तर्कतीर्थांना असल्याने त्यांनी जातककथा, बातमीपत्रे, कागदपत्रे, पुरातत्त्वविद्या संबंधी ग्रंथही मराठीत आणले.

शिवकाल, पेशवाकाल नि आधुनिक काल चित्रित करणारे अनेक ग्रंथ तर्कतीर्थांनी प्रकाशित करून उजेडात आणले. भाषांतर, लिप्यंतर करून घेतले. विदेशी पुराभलेखागारातून मूळ कागदपत्रे, ग्रंथ मिळवले. या मागची भूमिका स्पष्ट करत ते एका प्रस्तावनेत म्हणतात, "Looking to the fact that this source material has not either been available to Indian scholars until now or even been preserved anywhere in the country, the Board felt that publication of this material will throw new light on a significant period of Maratha history and may be of great benifit to scholars generally all over the Country."[25] तर्कतीर्थ केवळ महाराष्ट्राचाच नाही तर देशाचा विचार करत साहित्य आणि संस्कृती मंडळाचे कार्य करत होते, हेही या वक्तव्यातून स्पष्ट होते. ही उदारता नि व्यापकता यातच तर्कतीर्थांचे मोठेपण व द्रष्टेपण सामावलेले दिसते.

भाषा नि बोलींचे ग्रंथ

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी संस्कृत भाषेचे पंडित असल्याने त्यांना भाषेची चांगली जाण होती. त्यांनी भाषेचे पूर्व रूप असलेल्या बोलींच्या मराठी रूपांचे पुण्याच्या डेक्कन कॉलेजचे डॉ. ए. एम. घाटगे यांनी जे सर्वेक्षण केले होते, त्या आधारे कुडाळी, गावडी, कोंकणी, वारली, कुणबी, कासारगोड बोलींची भाषाशास्त्रीय उकल व सांख्यिकी माहिती देणारे अहवाल व निरीक्षणांची पुस्तके इंग्रजीत प्रकाशित केली. पैकी कोंकणीच्या महाराष्ट्री, कर्नाटकी व गोमंतकीय स्वरूपांमधील फरक व परंपरा स्पष्ट केला. हे कार्य किती, कसे व का आवश्यक आहे, त्याचे विवेचन तर्कतीर्थांनी विस्ताराने या मालिकेतील एका ग्रंथाच्या प्रस्तावनेत विशद करत म्हटले आहे की, The Marathi language is rich in linguistic and cultural heritage constituted by its host of dialects. It is considered by scholars of linguistics that an analytical study of a selected numbers of Marathi dialects will afford broad ponits of reference for dialectal stuidies and linguistic surveys of a more comprehensive nature. Their study will also open the door for the study of local culture and folk literature. Such an analytical study is thus very important and also urgent because the local dialects which constitute the worthy heritage are fast disppearing owing to the spread of literacy in standerd Marathi as well as the wide circulation of dialects, weeklies and other periodicals in standerd Marathi. It has besides, other scientific value for linguistic studies in Maharashtra and for wider field of Indian Languages."[26]

जी गोष्ट बोलींची, तीच भाषांचीपण. तर्कतीर्थांनी भारतीय भाषांच्या 'साहित्य परिचय', 'वाचन पाठमाला', 'द्विभाषिक कोश' तयार करून प्रकाशित केले. 'गुजराती-मराठी शब्दकोश', 'गुजराती भाषा प्रवेश', 'उर्दू-मराठी शब्दकोश', 'कन्नड मराठी शब्दकोश', 'कन्नड भाषा प्रवेश', 'कानडी साहित्य परिचय', 'बंगाली साहित्य परिचय', 'बंगाली भाषा प्रवेश' (खंड १ व २), 'इंग्रजी-मराठी स्थापत्यशिल्प कोश', 'वैज्ञानिक परिभाषा कोश' (गणितशास्त्र, वास्तवशास्त्र, रसायनशास्त्र) या ग्रंथनाम सूचीवरूनही आपणास तर्कतीर्थांनी त्या त्या भाषांतील तज्ज्ञांकडून आणि त्यातही जे द्विभाषिक तज्ज्ञ आहेत, अशांकडून ही ग्रंथसंपदा तयार करून घेतली. त्यापूर्वी त्याची योजना, आराखडे, घटक, उद्देश, माध्यम (मराठी) निश्चित करून नियतकाळात हे ग्रंथ निर्मित करून प्रकाशित केले. हे भारतीय भाषा तज्ज्ञ मराठी मातृभाषी असतील, यावर त्यांचा कटाक्ष होता. कारण त्यांनी या 'आंतरभारती' प्रकल्पाची लक्ष्यभाषा (Target Language), माध्यमभाषा (Media of Language) म्हणून मराठी निश्चित केली होती. मराठीभाषी वाचक डोळ्यासमोर ठेवून हे ग्रंथ निर्मिले गेले होते.

मध्यंतरी मी 'भारतीय भाषा व साहित्य' 'भारतीय साहित्यिक', 'समकालीन साहित्यिक', 'साहित्य आणि संस्कृती' सारखी पुस्तके लिहिली, तेव्हा या पुस्तक नि कोशांचा मी अभ्यास केला होता असे आठवते. ती अभ्यासत असताना तर्कतीर्थ व त्या ग्रंथांचे संपादक, लेखक सर्वश्री स. ज. धर्माधिकारी, भाऊ धर्माधिकारी, श्रीपाद जोशी, प्रा. एन. एस. गोरेकर, पुंडलिकजी कातगडे, गु. व्यं. दिवेकर, सरोजनी कमतनूरकर, स. ग. सुखटणकर, रा. वि. मराठे, डॉ. गो. रा. परांजपे यांनी घेतलेली मेहनत वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन केलेली होती, हे लक्षात येत होते. यातील 'इंग्रजी-मराठी स्थापत्य शिल्प-कोश', 'पदनाम कोश', 'वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा', 'मराठी विश्वकोश (खंड-१८)-परिभाषा संग्रह', 'मराठी विश्वकोश (खंड-२१) सूचिखंड' माझ्या कायम संग्रही असून मी त्यांचा अनेकदा वापर करून हे सांगतो आहे. यातील 'इंग्रजी-मराठी स्थापत्य-शिल्प कोश'ने तर मला शब्दसमृद्ध केले. या एकट्या कोशाच्या वापराने मराठी-इंग्रजी संसर्ग व प्रदूषण मुक्त करणे शक्य आहे, अशी माझी केवळ धारणा नसून खात्री आहे. त्याची वानगी म्हणून मी सर्रास लेखनात वापरत असलेले शब्द सांगतो. तुम्हीही वापरास प्रवृत्त व्हाल. फक्त त्यासाठी मनात मराठीसाठीचे विशुद्ध प्रेम हवे नि वापराची बांधिलकी, सामीलकी आणि प्रतिज्ञाबद्धता. सुमेध (सिमेंट), आकार्य (प्लॅस्टिक), नभोवाणी संच (रेडिओ), सुटसुटीत, आटोपशीर (कॉम्पॅक्ट), पूर्वस्थ (Prefix), यांत्रिक नांगर (ट्रॅक्टर). विशेष म्हणजे हा कोश सचित्र आहे. सदर कोशाचे प्रयोजन स्पष्ट करत प्रस्तावनेत ('निवेदन') तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समजावतात की, ''महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने हा कोश प्रकाशनासाठी स्वीकारला याचे मुख्य कारण हे आहे की, तांत्रिक क्षेत्रात देशी परिभाषा रूढ होण्याच्या काळात विविध प्रकारचे पर्यायशब्द लेखक व तंत्रज्ञ यांच्यापुढे आले म्हणजे त्यातील समर्थ, अर्थपूर्ण व देशी भाषांच्या स्वभावास अनुरूप अशा शब्दांची निवड करता यावी. अशी निवड होतानाच जे शब्द टिकाव धरून राहतील तेच त्या त्या विषयांमध्ये योग्य ठिकाणी स्थानापन्न होऊ लागतील. दुसरे कारण असे की, या कोशात स्वीकारलेली परिभाषा मोठ्या प्रमाणात मान्य होवो वा न होवो, परंतु स्थापत्य व शिल्प (Engineering and Architecture) विषयातील इंग्लिश शब्दांचा अर्थ मराठी वाचकास व तंत्रज्ञास खुलासेवार कळावा हे या कोशाचे मुख्य प्रयोजन आहे. देशी परिभाषा सुचविणे हे या कोशाचे दुय्यम प्रयोजन आहे.''[२७] विशेष म्हणजे आपल्या या प्रस्तावनेत तर्कतीर्थ सदर कोशाची मर्यादा व उणीव सांगायला विसरत नाहीत. ते म्हणतात की, ''या कोशाची रचना करीत असता इंग्लिशमध्ये वापरलेल्या शब्दांच्या व्याकरणांची शहानिशा केलेली दिसत नाही. ही या कोशाची महत्त्वाची उणीव आहे. ही उणीव राहण्याचे कारण प्रस्तुत कोशकारांचा पेशा भाषाशास्त्रज्ञाचा नाही. ही उणीव भाषाशास्त्रज्ञांच्या साहाय्याने काढून टाकण्याचा प्रयत्न पुन्हा या कोशाची सुधारलेली आवृत्ती काढण्याचा योग आल्यानंतर करण्यात येईल.''[२८] या संदर्भात मी मंडळाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो,

की सदर कोश आता उपलब्ध होत नाही. तेव्हा मंडळाने त्याची सुधारित आवृत्ती (पुनर्मुद्रण नव्हे!) प्रकाशित करण्याची योजना हाती घ्यावी ही विनंती.

भारतीय भाषांतील साहित्यिक ग्रंथ

टी. पी. कैलासम् कृत 'टोळ्ळु-गट्टी' (कन्नड नाटिका), डॉ. मास्ती व्यंकटेश अय्यंगार लिखित 'सुबण्णा' (कन्नड कादंबरी), तिरुवळ्ळुवर रचित 'तिरूक्कुरळ' (तमीळ मुक्तक काव्य), धर्मानंद कोसंबीकृत 'बुद्धलीला सारसंग्रह' आणि 'बुद्धलीला' (पाली कथात्मक धर्मसाहित्य), जातककथा खंड-१, २, ३ (पाली कथा) या सारख्या सार्वकालिक साहित्याची मंडळद्वारा निर्मिती हा तर्कतीर्थांच्या भारतीय एकात्मक राष्ट्र निर्मितीसाठी केलेला संवेदनशील उपक्रम होय. अशा ग्रंथांच्या निर्मितीमागे भारताचे बहुभाषी, बहुप्रादेशिक, बहुसांस्कृतिक रूप लक्षात घेऊन राष्ट्रीय उपक्रम म्हणून या योजनेकडे पाहावे लागते. अशा ग्रंथांपैकी एका ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी विस्ताराने आपली भूमिका विशद करत लिहून ठेवले आहे की,

''भारत हे बहुभाषी राष्ट्र आहे. भारताची राष्ट्रीय एकात्मता ही पश्चिमी देशातील 'एक राष्ट्र एक भाषा' अशा समीकरणाची नाही. येथे वैविध्यपूर्ण व साहित्यसंपन्न अशा १४ इतर भाषा आहेत. या भाषांची व साहित्याची वाढ मुख्यत: संस्कृत भाषेच्या व साहित्याच्या प्रभावाखाली झाली आहे. इंग्रजी राज्य झाल्यानंतरच्या काळात पश्चिमी संस्कृतीच्या, पश्चिमी ज्ञानाच्या व आधुनिक शिक्षणाच्या द्वारा विचार व भावना यांचे संवादित्व या भारतीय भाषांमध्ये निर्माण होऊ लागले आहे. स्वातंत्र्याच्या आंदोलनाने व राजकीय एकात्मतेमुळे या भाषांचे वैचारिक संबंध अधिक निकटचे बनले आहेत. परंतु, या भाषांचा भाषिक सीमाप्रदेश सोडल्यास, अन्योन्यसंबंध फार थोडा आहे. परंपरागत धर्म आणि इंग्लिश भाषा यांच्या द्वारेच वैचारिक, भावनात्मक व सांस्कृतिक मूल्यांची देवघेव होत आहे. ही परस्पर देवघेव मोठ्या प्रमाणात होणे आपल्या सांस्कृतिक प्रगतीचा वेग वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक आहेत. परंतु, त्याहीपेक्षा भारताची राष्ट्रीय एकात्मता दृढ व अभेद्य बनविण्याकरिता अधिक आवश्यक आहे. याकरिता, महत्त्वाचा उपाय म्हणजे प्रादेशिक मातृभाषा बोलणाऱ्या लोकसमूहांमध्ये लगतच्या किंवा दूरच्या भारतीय प्रदेशांच्या भाषा उत्तम रीतीने अवगत केलेले, त्यापैकी एक किंवा अनेक उत्कृष्ट रीतीने लिहू किंवा बोलू शकणारे आणि त्याचप्रमाणे त्या त्या अन्य प्रादेशिक भाषेतील प्रथितयश लेखांचे, ग्रंथांचे व ग्रंथकारांचे साहित्य स्वत:च्या प्रादेशिक मातृभाषेत चांगल्या रीतीने भाषांतरित व रूपांतरित करण्यास समर्थ असलेले सुशिक्षित निर्माण होण्याची मोठी निकड आहे.''[२९]

आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणजे तर्कतीर्थांना सर्व जाती, धर्म, पंथ, संस्कृती यांचं असलेलं भान. हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध, पारशी, शिख धर्मांचं प्रतिनिधित्व आहे नि प्रांताचं पण. आसेतु हिमालय भारत एक व्हावा ही तर्कतीर्थांची तळमळ अनुकरणीय खरी!

विज्ञानविषयक ग्रंथ

विज्ञान म्हणजे विशिष्ट ज्ञान. विचार, निरीक्षण, अभ्यास, प्रयोग यातून जे ज्ञान मानवाच्या हाती लागतं ते विज्ञान. विज्ञानात ज्ञानाचं सिद्धांतन असतं नि क्रमबद्धताही. प्रयोगांती जे निष्कर्ष हाती येतात, त्यातून वैज्ञानिक सिद्धांत निर्माण होतात. या सिद्धांतांच्या अनुरोधाने निरंतर प्रयोग होत राहतात. त्यातून सिद्धांत बदलत, परिवर्तित, परिवर्धित होत राहतात. विज्ञान भौतिक म्हणून मौलिक. कारण त्याचा संबंध निसर्ग, प्रकृतीशी असतो. समाजविज्ञाने मानवी व्यवहाराशी निगडित असतात, तर मौलिक विज्ञाने भौतिक संबंधित विज्ञानात निरंतर विकास होत राहतो व ते नित्य नव्या नि अधिक समृद्ध स्वरूपात आपणासमोर येतं.

मौलिक विज्ञान शाखांचा सर्वाधिक विकास पाश्चात्त्य जगात झाला. गणितशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान इ. क्षेत्रे इंग्रजीत विकसित झाली. भारतासारख्या तुलनेने विज्ञानात विकसनशील देशांतील भाषा ही ज्ञानविज्ञाने पेलण्यास नि त्यातील संकल्पना आपल्या भाषेत अभिव्यक्त करण्यात असमर्थ असतात. त्याचे कारण त्या भाषेत असलेली परिभाषा, संज्ञा, संकल्पना, पर्यायी शब्दांची उणीव नि अभाव. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर मराठीस ज्ञानसमृद्ध करण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर परिभाषा कोश, स्थापत्य-शिल्प कोश, पदनाम कोश तयार करण्यात आले, तसेच इंग्रजीतील वैज्ञानिक ग्रंथ भाषांतरित करण्यात आले. काही वैज्ञानिक ग्रंथांची मराठीत निर्मिती करण्यात आली. 'सैद्धांतिक मृत्तिका बलविज्ञान' (Theorotical Soil Machanics), 'ग्रहगणित मालिका' 'सृष्टिज्ञान', 'अंतरीक्ष दर्शन', 'संक्षिप्त संख्यानक', 'खनिज तेल व तज्जन्य रसायने', 'स्त्री-रोग चिकित्सा', 'अंकीय संगणकाचा परिचय', ही शीर्षके वाचली तरी लक्षात येते, की महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी किती दूरचा विचार केला होता.

विविध विज्ञानविषयक ग्रंथ मराठीत तुलनेने कमी आहेत. मराठीत वैज्ञानिक संज्ञांची उणीव हे कारण आहेच. पण या उणिवेमुळे चांगल्या तज्ज्ञांचे मराठीत लिहिण्यास हात उचलत नाहीत हे निरीक्षण तर्कतीर्थांनी नोंदवले आहे. शिवाय आपल्याकडे एका संज्ञा वा संकल्पनेस विविध विद्वान विविध पर्याय सुचवतात. प्रश्न निर्माण होतो तो प्रमाण संज्ञा पर्यायाचा. शासकीय कोशांतील परिभाषा वा संज्ञा कठीण, किचकट, अर्थवाहितांची कमी असलेल्या राहिल्याने त्या प्रचलित न होता, कोशात तशाच पडून राहतात. काही विद्वान शुद्धतेचा कमालीचा हट्ट धरतात. भाषा शुद्धी हवी; पण त्याचा अतिरेक निरुपयोगाकडे नेणारा ठरतो. परिणामी मराठीसारख्या प्रादेशिक भाषांमध्ये वैज्ञानिक लेखन अभावाने होते.

या संदर्भात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा कोश'च्या प्रस्तावनेत विस्तृत खल केला आहे नि मध्यम मार्ग सुचविला आहे. त्यावर विचार होईल तर वर्तमान अवरुद्धता संपुष्टात येण्यास साहाय्य होईल. ते म्हणतात की , ''पश्चिमी विज्ञान व

तंत्र यांच्या संज्ञा व परिभाषा स्वभाषेत उचलून घेऊन आत्मसात करण्यात अनमान करू नये. त्याबरोबर देशी भाषा किंवा संस्कृतमधील पर्यायही अन्वर्थक रूपाने घेता आल्यास त्यांच्या बरोबरीने वापरावे. आंतरराष्ट्रीय किंवा इंग्रजी संज्ञा वा परिभाषा तशाच ठेवल्याने विज्ञान व तंत्र यांचे अर्जन करणे अधिक सुलभ होईल. विज्ञान व तंत्र यांचा दैनंदिन अतिवेगशाली विकास पश्चिमी भाषांमध्ये चालू आहे. असा वेग व विकास साधण्याइतकी गती भारतीय साहित्याला अजून यावयाची आहे. त्यास अजून अवधी आहे. आपण सध्या मंद अशा अनुकरणावस्थेत आहोत. अशा स्थितीत आपल्या ज्ञानार्जनाचा सांधा मजबूत व कायम ठेवण्याकरिता शब्दांची उचल चालू ठेवणे अत्यंत हितावह आहे. नव्या संज्ञा व परिभाषा निर्माण करण्याचे प्रयत्नही जरूर करावेत; पण त्यात शुद्धीकरणाचा अशुद्ध हेतू असू नये. अशा प्रयत्नाच्या मुळाशी दोन उद्दिष्टे आहेत. एक निरनिराळ्या ज्ञानक्षेत्रातील व्यक्तींना देशी भाषामध्ये विषय प्रतिपादन करण्याच्या वेळी अन्वर्थक शब्दांची वारंवार अडचण भासते. कारण वैज्ञानिक व तंत्रज्ञ पंडित स्वभाषाभिज्ञ असतातच असे नाही. दुसरे असे की, संज्ञा व परिभाषा यांच्या सुसूत्रता व मेळ साधावा. त्याच कल्पनांचे व पदार्थांचे वाचक विविध पर्याय वापरल्यास विचाराचा व अर्थाचा जो गोंधळ होतो तो त्यामुळे टाळता येईल.''[३०]

मधल्या काळात या अनुषंगाने सामंजस्य दाखवल्याने मराठी विज्ञान परिषदेच्या प्रयत्नांमुळे गती येऊन मराठी भाषा व साहित्यात विपुल वैज्ञानिक ग्रंथ आढळून येत आहे. शिवाय अनेक मौलिक विज्ञानांच्या मराठी अध्ययन, अध्यापन, संशोधन, लेखन, भाषांतरास गती आली आहे. डॉ. जयंत नारळीकर यांच्यासारख्या वैज्ञानिकास अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या ९४ व्या नाशिक येथे संपन्न अधिवेशनाचे अध्यक्षपद मिळणे त्याचेच प्रत्यंतर होय.

तंत्रज्ञानविषयक ग्रंथ

विज्ञानाचे परिणत रूप म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान होय. विसावे शतक यंत्रयुग होते. एकविसावे शतक तंत्रयुग झाले आहे. तंत्रज्ञान हे विज्ञानाचे उपयोजित रूप होय. तंत्रज्ञान ही विज्ञानाची प्रगत अवस्था होय. यंत्र, अवजार यांच्या उपयोजनांतून प्रणाली, प्रक्रिया जन्मतात. त्यातून नवी व्यवस्था व कार्यप्रणाली अस्तित्वात येते. सन १९९० नंतरच्या जागतिकीकरणाच्या काळात माहिती, तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती होऊन अंतरजालीय संपर्क यंत्रणा विकसित झाली. तंत्रज्ञानाच्या या विकसित प्रणालीने गत शतकातील काळ, काम, वेगाचे सूत्र बदलले. पृथ्वी स्थिर झाली व प्रणाली गतमान होऊन अंतर व वेग शून्य झाला. तुम्ही जिथे असता, तिथे जग असते. पण सन १९६० ते १९९० या जागतिकीकरण पूर्व काळात तंत्रज्ञानाधारित ग्रंथ निर्मिती मोठे जिकिरीचे व जोखमीचे कार्य होते. मराठीस ज्ञानभाषा बनवण्याच्या ध्यासाने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने विज्ञानमालेत तंत्रज्ञानविषयक ग्रंथ निर्मितीकडे लक्ष पुरवले. या संदर्भात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

यांच्या विचक्षण प्रतिभेचे आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही. त्यांनी मराठी विश्वकोश नोंद लेखनाची जी पद्धती आत्मसात केली होती, ती संगणक, अंतरजालीय लेखन पद्धतीशी सामंजस्य साधणारी होती, ही मराठी विश्वकोशाच्या अंकीय आवृत्ती प्रकाशनाच्या वेळी लक्षात आलेली गोष्ट होय. तर्कतीर्थांनी आपल्या कार्यकाळात 'वस्त्रोद्योग', 'गणकयंत्रे', 'ध्वनिवर्धन व वितरण व्यवस्था', 'भारतीय रेल्वे', 'प्रकाशचित्रणकला', 'रंग', 'कृत्रिम धागे', 'खनिज तेल व तज्जन्य रसायने', 'पुस्तक बांधणी', 'मोटार दुरुस्ती', 'विमानविद्या', 'अवकाशयान', 'सागरनिर्मिती' सारखे ग्रंथ निर्माण करण्याची योजना केली व त्यातील अनेक प्रकाशितही झाले आहेत. या ग्रंथांचे वैशिष्ट्य हे आहे की, ती सर्वसामान्य सुशिक्षित वाचकांकरिता तयार करण्यात आली आहेत. शिवाय इंग्रजी न येणाऱ्या कुशल कामगार व तंत्रज्ञाला ती उपयोगी ठरतील असा प्रयत्न केला गेला आहे. एका अर्थाने तर्कतीर्थांनी तयार केलेल्या या ग्रंथांतून ते समाजात तंत्रज्ञानविषयक जागृती निर्माण करून तंत्रज्ञान साक्षरता रुजवू पाहत होते, हे स्पष्ट होते.

तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ

'धर्म आणि विज्ञान', 'बुद्धी, प्रेरणा आणि क्रांती (भाग १, २)', 'सामाजिक करार', 'स्वातंत्र्याविषयी', 'समाजवाद विरुद्ध भांडवलशाही', 'विसावे शतक आणि समाजवाद', 'गांधी : कार्य व विचारप्रणाली', 'मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा', 'देकार्तची चिंतने', ही अशी काही पुस्तके होत, की ज्यांनी वैश्विक पातळीवरील मानवी जीवन नवमानवतावादी बनवले. मानवी समाज सामंतशाही, भांडवलवादी समाजरचना, समाजवाद, रॉयवाद, गांधीवाद, मार्क्सवाद आणि नवमानवतावाद असा टप्प्याटप्प्याने मानवकल्याणी, मानव विकासक आणि मानवाधिकार आधारित बनत गेला. त्यामागे विविध तत्त्वज्ञानांनी कालौघात आपापले योगदान दिले आहे. कितीही अत्याचारी धर्मसत्ता, राजसत्ता उदयाला आल्या तरी अंतिमत: सरशी ही विचारांचीच झालेली आहे. गॅलिलिओवर केलेल्या अत्याचाराचे पापक्षालन पोपने क्षमायाचनेने केले आहे.

अस्तित्व, ज्ञान, मूल्ये, विवेक, तर्क, मन इ. तत्त्वांच्या आधारे मूलभूत मानवी व सामाजिक प्रश्नांची चिकित्सा व मार्गदर्शन हे तत्त्वज्ञानाचे कार्यक्षेत्र होय. भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञाने विवेचनाच्या अंगाने भिन्न असली तरी त्यांचे अंतम लक्ष्य वैश्विक असते. प्रसंगोपात व कालौघात जात, धर्म, वंश इ. चा अतिरेक करणाऱ्या विचारसरणी उद्भवतात. त्यातून संघर्ष, युद्ध, राष्ट्रनिर्मिती, सत्ता उदय, ऱ्हास, विकास या प्रक्रिया घडत राहतात. पण विजय मानवी कल्याणाचा होतो, कारण ते वैश्विक असे चिरंतन मूल्य आहे. महात्मा गांधी, गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त हे चिरंतन होतात, ते मानवी विचारांमुळे.

तत्त्वज्ञानविषय भारतीय व पाश्चात्त्य विचारसरणींचे तर्कतीर्थांनी दीर्घकाळ चिंतन, मनन, वाचन केलेले त्यांच्या चरित्रांमधून स्पष्ट होते. माणूस आणि समाज, विज्ञान आणि अध्यात्म,

यंत्र आणि मनुष्य अशा अनेक अंगांनी त्यांनी मानवी जीवनाचा दीर्घकाळ विचार करून 'नव्या विचारयुगाचे तत्त्वज्ञान' शीर्षकाचा एक प्रदीर्घ लेख (पूर्वाध/उत्तरार्ध) किर्लोस्कर मासिकात लिहिला आहे. त्याचा समारोप करत त्यांनी तत्त्वज्ञानासंबंधीची आपली धारणा विस्ताराने मांडली आहे. ती वाचली, की लक्षात येते की तर्कतीर्थांनी विविध ज्ञानविज्ञाने आणि विविध विचारसरणींवर मंडळामार्फत ग्रंथनिर्मिती का केली. त्यात ते सांगतात की, ''यापुढे भ्रमावर उभारलेली धार्मिक विचारसरणी व कल्पनेवर उभारलेली तत्त्वज्ञानात्मक विचारसरणी मागे पडून विज्ञानपद्धती प्रभावी ठरण्यास जगातील विद्यमान भांडवलशाही समाजपद्धती नष्ट करणे जरूर आहे. जोपर्यंत ही समाजपद्धती कायम राहील, तोपर्यंत निसर्गाच्या अनंत शक्तींचा अभ्यास करण्यास मनुष्याच्या बुद्धीस पाहिजे तितका अवसर मिळणे शक्य नाही. कारण सत्ताधीश व संपत्तीमान वर्गाच्या विशिष्ट हितसंबंधांच्या मर्यादेतच विज्ञानाची वाढ होणार. योग्य संधी व उत्साहप्रद वातावरण न मिळाल्यामुळे असंख्य मनुष्यांची शक्ती व बुद्धी निर्माल्य होऊन फुकट जात आहे.''[३१]

पुढे त्यांनी म्हटले आहे, ते अधिक महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, ''ज्या बहुजन समाजाची कुचंबणा आज सुरू आहे, त्यासच या सकंटातून सुटण्यास संघटित व्हावयास पाहिजे. जगातील बहुजन समाज ज्यावेळी हल्लीच्या वर्गदास्यातून मुक्त होईल तेव्हाच मानवबुद्धी अज्ञानाच्या अनंत बंधनांतून मुक्त होण्यास समर्थ होईल.''[३२] शेवटी तत्त्वज्ञान हे मानव मुक्ती व विकासासाठी असते हेच खरे. युग कोणतेही असो, मूल्ये शाश्वत असतात नि म्हणून काळ कितीही लोटला, जग कितीही बदलले तरी त्यांचे मानवी जीवनातील अढळपद कायम असते.

संकीर्ण ग्रंथ

उपरोक्त वर्गवारी व्यतिरिक्त असे अनेक ग्रंथ आहेत की, ज्यांना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'निवेदन' रूप प्रस्तावना लिहून त्यांचे महत्त्व रेखांकित केले आहे. 'आरोग्य आणि आहारशास्त्र', 'मधुमेह', 'मानवी आनुवंशिकता', 'मिष्टखाद्ये', 'पाणीपुरवठा', 'साखर', 'सिमेंट', 'लुकेना : क्रांतिकारी वृक्ष', 'कागद' हे नि असे ग्रंथ विषय म्हणून किरकोळ वाटत असले तरी त्यांच्या विचार आणि अभ्यासाअभावी मनुष्य जीवन अपूर्ण राहील. तर्कतीर्थ जीवनाकडे समग्रतेने पाहणारे विद्वान होते. त्यामुळे आहार, आरोग्य, फळे, झाडे, पाणी, अन्न असा फेर धरीत ते ग्रंथ योजना करीत आणि त्या त्या विषयांमधील तज्ज्ञ शोधून काढून नवनव्या विषयांवर लिहून घेत व मग स्वत: त्यावर हात फिरवून प्रस्तावनासदृश निवेदन लिहीत.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या माध्यमातून तर्कतीर्थांनी ज्या बहुविध ग्रंथांची निर्मिती केली. परंतु सन १९६० ते १९८० अशा दोन दशकांत त्यांच्या अपेक्षेप्रमाणे

कार्यपूर्ती न झाल्याचे शल्य जीवनाच्या अंतापर्यंत डसत राहले होते. आपले शिक्षण विद्वानांची फळी निर्माण करण्याच्या दृष्टीने कमकुवत आहे असे त्यांचे म्हणणे होते. ते त्यांनी अनेक भाषणे, मुलाखती, लेख इ. मधून व्यक्त केल्याचे दिसते. त्यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत जी ग्रंथसंपदा निर्माण केली, तिने मराठीस ज्ञानभाषा म्हणून सशक्त केले, हे नाकारता येत नाही.

(क) अन्यांच्या ग्रंथ, गौरविका, संपादने आणि कोशांना लिहिलेल्या प्रस्तावना

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी साहित्यिक म्हणून बहुआयामी व्यक्ती होते. त्यांनी भाषणे, लेख, मुलाखती, पत्रे, प्रस्तावना, परीक्षणे, भाषांतरे, संपादने, कोश निर्मिती, सूची संपादन, गौरव ग्रंथ संपादन असे बहुविध साहित्यिक कार्य केले. साहित्यिक दोन प्रकारचे असतात - ललित आणि वैचारिक. त्या दृष्टीने पाहता तर्कतीर्थ दुसऱ्या पठडीचे साहित्यिक. व्यक्ती म्हणून ते मनुष्यसंग्रही व समाजशील गृहस्थ होते. महाराष्ट्राच्या साहित्य, संस्कृती, समीक्षा, प्रबोधन, राजकारण या क्षेत्रात त्यांचा आदरयुक्त दरारा होता. असे असले तरी त्यांच्याभोवती सर्वस्तरीय माणसांचं मोहळ असायचं. त्यातही तर्कतीर्थांनी आपल्या साहित्यकृतींना प्रस्तावना लिहावी अशी अपेक्षा धरणारा मोठा वर्ग होता. तर्कतीर्थांनी आपल्या जीवनकालात ज्यांच्या ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या त्यात असामान्य असामी होते, तशी सर्वसाधारण माणसेही.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी तत्त्वज्ञान, वैचारिक, धर्म, इतिहास, कादंबरी, साहित्यविषयक ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या. त्यात लेखसंग्रह, कादंबरी, काव्य, भाषण, वृत्तांत, आख्यान व कीर्तन, समीक्षा, संशोधन अशा प्रकारचे ग्रंथ दिसून येतात. अशा शंभर एक ग्रंथांना तरी त्यांनी प्रस्तावना लिहिल्या असाव्यात. पैकी ज्या ७०-७५ प्रस्तावना उपलब्ध झाल्या त्यांचा अंतर्भाव 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पातील या १० व्या खंडात संग्रहित करण्यात आल्या असून वाचक त्या प्रस्तावना वाचू, विचार करू शकतात. त्यातही काही औपचारिक, संक्षिप्त आहेत, तर काही विस्तृत नि व्यासंगपूर्णही! तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी इतरेजनांच्या ग्रंथांना विस्तृत व व्यासंगपूर्ण प्रसतावना लिहिल्या आहेत, त्या केवळ ग्रंथांच्या रचना व विषयांची चर्चा करतात असे नाही तर इतिहास, परंपरेचा आढावा घेत ते मुक्तचिंतनही करतात. त्यामुळे आपोआपच अशा प्रस्तावनांतून व्यापक विचारपट प्राप्त होतो व त्यामुळे मूळ ग्रंथाचा वैचारिक स्तर आपोआपच उंचावला जातो. ग्रंथलेखक आपल्या कृतीस मान्यवरांची प्रस्तावना घेतो तेच मुळी मान्यता नि प्रतिष्ठा मिळवण्यासाठी. शिवाय त्याचे तटस्थ मूल्यांकन व्हावे ही रास्त अपेक्षा असतेच. त्यामुळे प्रस्तावना ही त्या साहित्यकृतीची पहिली समीक्षा व प्रतिक्रिया असते. म्हणूनही प्रस्तावना महत्त्वाची असते.

वैचारिक ग्रंथ

वैचारिक साहित्य हे एखाद्या वाद, विचाराची व्यवस्थित मांडणी करण्यासाठी लिहले जाते. प्राचीन काळात धर्म, ईश्वर, सत्ता (राजा) इ. बद्दल वाङ्मयात चिकित्सा असायची. संतांच्या साहित्यात जीवन, सदाचार, नैतिकतेवर भर असायचा. इसवी सनाच्या चौदाव्या, पंधराव्या शतकात व तद्नंतर पाश्चिमात्य विश्व मानव केंद्रित विचार करू लागले. गुलामीऐवजी स्वातंत्र्य, समता, बंधुता तत्त्वांना महत्त्व येऊन लोकसत्ता श्रेष्ठ मानली गेली. परिणामी धर्म, राजसत्ता यांची जागा धर्मसुधारणा, मानवी कल्याण, लोकशाही विचारांनी घेतली. ब्रिटिश साम्राज्यात यास गती आली. वसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात राष्ट्रवाद, गांधीवाद, मार्क्सवाद, समाजवाद इ. विचारांचे वर्चस्व वाढले. या संबंधीचे काही ग्रंथ इंग्रजीतून भाषांतरित झाले तर काही मूलत: मराठीत लिहिले गेले. यापूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे प्रस्तावनाकार म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी उदयाला आले तेच मुळी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या 'Historical Role of Islam', 'Facism', 'New Humanism' सारख्या ग्रंथांच्या भाषांतरांना प्रस्तावना लिहिल्यामुळे. तत्कालीन रॉयवादी मंडळींनी रॉयवाद व त्यावर आधारित ‘रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी’च्या प्रचार, प्रसारार्थ करून घेऊन प्रकाशित केली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी कायदेभंगाच्या चळवळीत झालेल्या शिक्षेत तुरुंगवासात असताना त्यांचा संपर्क कर्णिक बंधूंशी आला. त्यांच्याच सुचवण्यावरून तर्कतीर्थांनी तुरुंगात असताना मार्क्सवादाचा अभ्यास केला (१९३२). नंतर सन १९३७ला ते मानवेंद्रनाथ रॉय यांच्या संपर्कात आले व प्रभावित झाले. परिणामी त्यांनी वरील भाषांतरे करवून घेऊन त्यांना प्रस्तावना लिहून ती प्रकाशित केली.

मानवेंद्रनाथ रॉय

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या मूळ इंग्रजी ग्रंथ 'Historical Role of Islam' चे मराठी भाषांतर श्रीनिवास व्यंकटेश नखाते यांनी ‘इस्लामी संस्कृतीचे क्रांतिकार्य’ शीर्षकाने केले असून त्यास तर्कतीर्थांची प्रस्तावना आहे. ती तर्कतीर्थ लिखित उपलब्ध पहिली प्रस्तावना. या प्रस्तावनेत आपण मानवेंद्रनाथ रॉय यांच्या कसे संपर्कात आलो नि त्यांच्या व्यक्तिमत्त्व आणि विचारांनी कसे प्रभावित झालो हे स्पष्ट केले आहे. तर्कतीर्थ मूलत: भारतीय तत्त्वज्ञानाचे अभ्यासक असले तरी ते केवळ शंकराचार्य विवेचित वेदांताचे अनुयायी नव्हते. त्यांनी कपिल, कणाद, चार्वाक, बुद्ध, महावीर यांचे विचार अभ्यासले असल्याने आध्यात्मिक व भौतिकवादी विचारधारा ते जाणून होते. समग्रत: तर्कतीर्थ एक विचारक म्हणून सर्वांचे विश्लेषण करीत असले तरी जीवनाविषयी त्यांचा असणारा प्रागतिक दृष्टिकोन हेच मानवेंद्र रॉय यांच्या विचारांच्या आकर्षणाचे कारण होय. आपल्या प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी म्हटलं आहे की, इस्लाम अन्य धर्मांपेक्षा सुगम, सुबोध धर्म आहे. इस्लामने क्रौर्य व जुलूममुक्त समाज निर्माण केला. अरबांचा पूर्व धर्म मूर्तिपूजक होता. इस्लाममुळे तो एकेश्वरवादी बनला.

या धर्मात विरक्ती, संन्यास नाही. अरबस्तान पूर्वी संस्कृती संगम स्थली होती. इस्लाम धर्म सेमेटिक व मंगोल वंशांचा विचार करता दोन प्रकारचा दिसतो. मोगल काळात अनेक शूद्र हिंदू अत्याचारांना कंटाळून इस्लाम झाल्याचे इतिहासात आढळते. मानवेंद्र रॉय यांच्या या ग्रंथामुळे इस्लाम धर्मविषयक पूर्वग्रह दूर होण्यास मोठी मदत होत असल्याचे तर्कतीर्थांनी प्रस्तावनेत मान्य केले आहे. श्री. नखाते यांनी अनुवादात मूळ ग्रंथाचा भावार्थ यथार्थपणे प्रतिबिंबित केल्याची प्रशंसा करण्यास तर्कतीर्थ विसरत नाहीत. या ग्रंथास अनुवादक नखाते यांनी मानवेंद्रनाथ रॉय चरित्र जोडल्याबद्दल तर्कतीर्थ आनंद व्यक्त करतात. या प्रस्तावनेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या नि मानवेंद्रनाथ रॉय यांच्यातील स्नेहबंधावर प्रकाश टाकला आहे. प्रारंभिक असली तरी ही एक प्रभावी प्रस्तावना होय.

वरील ग्रंथ दयार्णव रघुनाथ कोपार्डेकर यांच्या 'प्रकाश मंडळ' तर्फे प्रकाशित करण्यात आला होता. तद्नंतर सुमारे दोन वर्षांनी सन १९४० मध्ये त्यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या 'Facism' चे बा. कृ. गलगली यांनी मराठीत केलेले भाषांतर प्रकाशित केले. त्यासही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची विवेचक प्रस्तावना आहे. 'फासिझम' ही मूलत: संहारक विचारधारा असल्याचे प्रारंभीच स्पष्ट करून तर्कतीर्थांनी प्रस्तावनेत सांगितले आहे की, ही विचारधारा हिटलर आणि मुसोलिनी यांनी अनुक्रमे जर्मनी व रशियात अवलंबिली. पुढे या विचारधारेने फ्रान्स, इंग्लंड, स्पेनसारख्या भांडवलदारी देशांत आपले पाय पसरले. मानवेंद्रनाथ रॉय यांनी या विचारधारेच्या विध्वंसक रूपावर प्रहार केला आहे. मूलत: हा विचार वंशवाद व श्रेष्ठत्वावर आधारित आहे. यात व्यक्तिस्वातंत्र्यास वाव नसल्याचे तर्कतीर्थांनी प्रस्तावनेत लक्षात आणून दिले आहे. यात सत्ता, प्रभुत्व, अधिकारास महत्त्व असल्याने फासिझम ही एक फलवाद आधारित विचारधारा (Pragmatism) असल्याचेही स्पष्ट केले आहे. मानवेंद्रनाथ रॉय यांनी आपल्या मूळ ग्रंथात फासिझम विचारधारेची चिकित्सा तर्कनिष्ठ नसून समाजशास्त्रीय असल्याचे तर्कतीर्थांनी आपल्या प्रस्तावनेतून लक्षात आणून दिले आहे. बा. कृ. गलगली यांनी भाषांतर कार्य समाधानकारक केल्याबद्दल तर्कतीर्थांनी प्रस्तावनेत आनंद व्यक्त केला आहे.

मे, १९४० ला डेहराडून येथे जहाल संघाची परिषद योजण्यात आली होती. त्या परिषदेत मानवेंद्रनाथ रॉय यांनी 'हिंदू-मुस्लीम प्रश्न' विषयावर भाषण दिले होते. त्या भाषणावर रेनासान्स पब्लिशिंगने छोटी पुस्तिका प्रकाशित केली होती. तिचे भाषांतर व. भ. कर्णिक यांनी 'जातीय प्रश्नांची चर्चा' शीर्षकाने तेव्हाच प्रकाशित झाले होते. त्यास तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची छोटी प्रस्तावना आहे. त्यात त्यांनी हिंदू-मुस्लीम प्रश्नाविषयी मानवेंद्रनाथ रॉय यांचा दृष्टिकोन नवा असल्याचे म्हटले आहे. त्यांनी असे मत व्यक्त केले आहे की, सध्याचा हिंदू-मुस्लीम प्रश्न ही ब्रिटिशांच्या 'फोडा नि झोडा' नीतीचा परिणाम

आहे. हा प्रश्न सामाजिक तत्त्वज्ञानाच्या आधारेच सुटू शकेल असा विश्वास नि आशावाद तर्कतीर्थांनी प्रस्तावनेत व्यक्त केला आहे. गांधीवादी काँग्रेस दृष्टिकोनामुळे मुस्लीम लीगची निर्मिती झाली, हे सांगायलाही ते विसरत नाहीत.

या तीनही प्रस्तावना मूलत: मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचे समर्थन करणाऱ्या आहेत. तर्कतीर्थांवर रॉयवादाचे गारूड स्वार होण्याचा हा आरंभिक काळ आहे. भौतिकवादी विचारांचे आकर्षण या मागे आहे नि गांधीवादी विचारांप्रती झालेला मोहभंगही याचे एक कारण आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या छायेत सर्वांना भौतिकवादाकडे आशा म्हणून पाहण्याची सवय झडली होती. ही त्याची फलश्रुती वा परिणाम मानावा लागतो.

मानवेंद्रनाथ रॉय यांनी आपल्या आयुष्यभराच्या चिंतन, मनन, अनुभवावर आधारित 'New Humanism' या २२ सूत्री (Hypothisis) नव तत्त्वज्ञानाची मांडणी केली. सन १९४८ च्या डिसेंबरला त्यांनी आपल्या 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी' चे कलकत्त्याला विसर्जन करताना याची मांडणी केली होती. या अधिवेशनाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीच होते. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या प्रथम स्मृतिदिनी म्हणजे २५ जानेवारी १९५५ रोजी प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईने या मराठी भाषांतराचे प्रकाश केले. 'प्राज्ञमाला'चे हे पहिले पुस्तक. प्रा. गोवर्धन पारीख यांनी या ग्रंथाचे भाषांतर करून मानवेंद्रनाथ रॉय यांना सश्रद्ध आदरांजली वाहिली. या ग्रंथास लिहिलेल्या प्रस्तावनेत तर्कतीर्थ स्पष्ट करतात, की हा विचार मार्क्सवादाच्या अनुभवावर आधारित एका अर्थाने पुनर्मांडणीच होय. यात मार्क्सवादातील दोष दूर कण्याचा प्रयत्न आहे. स्वतंत्र बुद्धीने रॉय यांनी हा विचार मांडला आहे. हा विचार रूढीशरणता, शब्दप्रामाण्य, अंधविश्वास, गुरू, नेता इ. प्रभावातून समाजमुक्तीचा व व्यक्तिस्वातंत्र्यास प्रतिष्ठित करण्याचा प्रयत्न होय. बुद्धिवाद याचा पाया आहे. जगात मार्क्सवादी विचारांवर ज्या सत्ता आल्या त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेतले होते. मूल्ये विसर्जित झाली होती. नवमानवतावादाकडे त्या सर्व दोषांची वा उणिवांची पुनर्स्थापना म्हणून पाहता येते.

या साऱ्यातून मानवेंद्रनाथ रॉय आणि तर्कतीर्थ जोशी आपणास समांतरपणे समजत जातात. फॅसिझमला विरोध म्हणजे साम्राज्यवादाला विरोध व लोकशाहीचे समर्थन असे रॉय मानत. काँग्रेसने मात्र ब्रिटिशधार्जिणी भूमिका घेतली होती. मार्क्सवादातील वैगुण्ये दूर सारणारा मानवतावाद त्यांना हवा होता. हिंदू-मुस्लीम एकता हवी होती. मानवेंद्रनाथ रॉय यांचे योगदान व व्यक्तिमत्त्व शब्दांकित करत ना. अ. नाईक यांनी लिहिले आहे की, ''केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील सर्व शोषित, पीडित व वंचित जनतेच्या मुक्तीसाठी आणि कल्याणासाठी देश, काल, धर्म आणि वर्ण आदी सर्व भेदांच्या पल्याड जाऊन सर्वस्व त्यागास सिद्ध झालेला भारताचा पहिला सुपुत्र रॉय होय. तो कोणत्याही देशाचा नेता व नागरिक नव्हता, तर खऱ्याखुऱ्या अर्थाने तो 'विश्वमानव' होता.''[३३]

महात्मा गांधी

महात्मा गांधींची हत्या ३० जानेवारी १९४८ ला झाली. तद्नंतर महात्मा गांधींच्या जीवन, कार्य, विचारांचे परिशीलन मोठ्या प्रमाणात सुरू झाले. अशा काळात प्रा. गोवर्धन पारीख यांनी 'सत्यकथा' मासिकातून सन १९४८ च्या प्रत्येक अंकात गांधी तत्त्वज्ञानावर आधारित लेख लिहिले. त्या लेखांना लगेचच ग्रंथरूप देण्यात आले. या 'महात्मा गांधी' शीर्षक ग्रंथास तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रस्तावना लिहिली आहे. ती सत्यकथा, जानेवारी १९४९ च्या अंकात प्रकाशित झाली होती. महात्मा गांधींची हत्या झाली तेव्हा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी रॉयवादी विचारविमर्षासाठी म्हणून कलकत्त्यात होते, त्यावेळच्या त्यांच्या नि मानवेंद्रनाथ रॉय यांच्या भावना, प्रतिक्रिया या प्रस्तावनेत आहे. प्रा. गोवर्धन पारीख यांनी आपल्या लेखनातून गांधी विचार हा दिग्दर्शित व रचनाबद्ध विचार असल्याचे नमूद केले आहे. महात्मा गांधींनी विज्ञानाने निर्मिलेल्या यंत्रांसंबंधी जे विचार व्यक्त केले होते, त्याची तर्कतीर्थ प्रस्तावनेत चिकित्सा करतात. महात्मा गांधी विचारात आत्मबलाचे महत्त्व विशद केले आहे. महात्मा गांधींचा अंतर्नादावर (Intution) भर होता. त्यांनी हिंदू धर्म सुधारणांचे समर्थन केले होते. तथापि ख्रिस्ताप्रमाणे गांधींचे पुनरुत्थान (Resurgence) होईल की नाही याबद्दल तर्कतीर्थ साशंकता व्यक्त करतात. या साशंकतेतच महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्त्वाची थोरवी सामावलेली आहे. महात्मा गांधींच्या हत्येनंतर त्यांची मंदिरे उभारण्याची टूम निघाली होती. तर्कतीर्थांचे म्हणणे होते की मंदिरांपेक्षा महात्मा गांधी अजरामर होतील ते त्यांच्या मूल्यांच्या अनुसरणामुळे! ते विस्ताराने समजावत प्रस्तावनेत तर्कतीर्थ आत्मविश्वासाने सांगतात की, ''विज्ञानाने दिसणाऱ्या सत्याच्या पोटीच नैतिक मूल्यांचे उगमस्थान सापडले पाहिजे. भौतिक पृथ्वीनेच तितिक्षेचा आदेश दिला पाहिजे. जड सूर्यानेच ज्ञानाची महती पटवली पाहिजे. मेघाने आत्मविसर्जनाचे महत्त्व घोषित केले पाहिजे. भौतिक विश्व नीतीचा आदेश जाहीर करण्यास तयार होईल, सौंदर्याचे मर्म पटवेल, असा भरवसा बाळगून शोध केला पाहिजे.''[३४] हे शब्द म्हणजेच महात्म्याची महात्मता होय.

'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील

'दीनमित्र' हे 'केसरी' परंपरेच्या विरुद्ध विचारधारेचे वृत्तपत्र होते. सन १८८४ ला 'दीनबंधु सार्वजनिक सभा' स्थापन झाल्यावर तिचे मुखपत्र म्हणून 'दीनमित्र' मासिक सुरू झाले. ते गणपतराव पाटील (भालेकरांचे भाचे) चालवीत असत. नंतर ते साप्ताहिक रूपात प्रकाशित होऊ लागले. पुन्हा मासिक करूनही ते गणपतराव पाटील यांच्या निधनानंतर बंद पडले (१८९२). सत्यशोधक सामाजिक कार्यकर्ते कृष्णराव भालेकर यांनी आपला मुलगा बहिणीला, म्हणजे गणपतराव पाटील यांच्या विधवा पत्नीस दत्तक दिला. तो म्हणजेच मुकुंदराव पाटील. त्यांनी सन १९१० मध्ये आपल्या पूर्वजांच्या 'दीनमित्र'चे पुनरुज्जीवन वृत्तपत्राच्या रूपात केले व आपले जनक वडील कृष्णराव भालेकरांना दिलेल्या वचनाप्रमाणे

ग्रामीण भागात (सोमठाणे, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर) ५७ वर्षे चालवले. त्या काळातील अग्रलेखांचा संग्रह 'विचारकिरण' या नावाने सन १९५२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. त्यास तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची प्रस्तावना आहे. 'दीनमित्र' सत्यशोधक चळवळीचे मुखपत्र होते. ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीत त्यांनी ब्राह्मणेतरांचा म्हणजेच बहुजनांचा पक्ष घेतला व लिखाण केले. हे लिखाण बऱ्याचदा पौरोहित्यावर टीका करणारे असायचे. पण ही टीका केवळ ब्राह्मणांवर नाही तर सर्व जातीतील पुरोहितांवर असे. श्राद्ध, मूर्तिपूजा, नवस, मंत्रतंत्र, दक्षिणा, पंचांग मुहूर्त इत्यादी गोष्टींचा 'दीनमित्र' समाचार घेत असे. 'सुधारक'कार गोपाळ गणेश आगरकरांप्रमाणे 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील अंधरूढींच्या सर्व बाबींची तपशीलवार चर्चा करीत, हे या प्रस्तावनेत तर्कतीर्थ आवर्जून लक्षात आणून देतात. ब्राह्मण जात पुरोहित कार्य करी. तिने पुराणकथा, व्रत-वैकल्ये इ. आधारे बहुजन वर्गाच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन शोषण केले, नि विषमताही वाढवली. याचे पर्यवसान पुढे समाजात जातीय द्वेषात झाले. युरोपात हीच गोष्ट यहुदींबाबत झाल्याचे तर्कतीर्थ प्रस्तावनेतून लक्षात आणून देतात. 'विचारकिरण'मध्ये संग्रहित 'दीनमित्र'चे अग्रलेख म्हणजे जागृती करणारे लेख होते. ते विचार देत व त्या किरणांद्वारे अज्ञान-अंधश्रद्धेचा अंधकार दूर करण्याचा प्रयत्न करीत असत.

चार्वाक

'चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान', प्रा. सदाशिव आठवले (१९५९) आणि 'चार्वाक समीक्षा', संपा. डॉ. गणेश थिटे (१९७८) अशा दोन ग्रंथांना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत. पैकी पहिला ग्रंथ स्वतंत्र लेखन असून दुसरा चार्वाकवरील एका परिसंवादातील निबंध, भाषणांचे संपादन आहे. 'चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान' ग्रंथ प्रा. सदाशिव आठवले यांनी मासिक 'नवभारत'मध्ये लिहिलेल्या लेखमालेचे ग्रंथरूप होय. यात ९ लेख संग्रहित आहेत. या ग्रंथ प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी विशद केले आहे की, इसवी सन पूर्व काळात जे वेद साहित्य निर्माण झाले, ते अध्यात्मवादी होते. त्यात मोक्ष संकल्पनेचा अंतर्भाव होता. पूर्वजन्म नि पुनर्जन्माची त्यात चर्चा होती. याला छेद देणारे विचार चार्वाकांनी मांडले. ते लोकायत वा इहवादी होते. चार्वाकाने वैदिक इतिहासात सर्वप्रथम आत्मा, परमात्मा, मोक्षादी कल्पना झुगारून भौतिकवादी प्रत्यक्ष दर्शनाची मांडणी केली. वर्तमान विज्ञान युग त्याचीच परिणती होय. 'सत्' आणि 'असत्' चा संबंध अलौकिकाशी नसून इहलोकाशी व प्रत्यक्ष अनुभूत जगाशी आहे. लौकिक सत्याचा शोध हे चार्वाकाचे योगदान असल्याचे तर्कतीर्थांनी प्रस्तुत प्रस्तावनेत प्रकर्षाने विवेचित केले आहे. प्रा. सदाशिव आठवले यांनी या विचाराची ऐतिहासिक व तात्त्विक मांडणी या ग्रंथात केल्याचे तर्कतीर्थांनी दाखवून दले आहे. त्याची शैली समीक्षात्मक आहे नि चर्चा विश्लेषणात्मक.

दुसरा डॉ. गणेश थिटे संपादित ग्रंथ. ३ व ४ जून १९७५ ला भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणेच्या सभागृहात संपन्न या परसंवादाचे संयोजन प्रा. ग. ह. खरे, राघवेंद्र कुलकर्णी, डॉ. गणेश थिटे व आचार्य वि. प्र. लिमयेंनी केले होते. याचे अध्यक्षस्थान तर्कतीर्थांनी भूषविले होते. ते अध्यक्षीय प्रास्ताविक व उपसंहार सार म्हणजेच या ग्रंथाची प्रस्तावना होय. परिसंवादात सर्वश्री आचार्य वि. प्र. लिमये, प्रा. वि. म. बेडेकर, ग. श्री. खैर, डॉ. स. रा. गाडगीळ, राघवेंद्र कुलकर्णी, डॉ. गणेश थिटे, डॉ. म. ना. बोपर्डीकर, प्रदीप गोखले, पंडित शिवरामकृष्ण शास्त्री, पंडित श्रीनिवास शास्त्री, प्रकाश जोशी, प्रा. ग. ह. खरे यांनी चार्वाक दर्शनाच्या विविध पैलूंचा ऊहापोह केला. त्या भाषणांच्या लिखित संहितेचे ग्रंथरूप म्हणजे 'चार्वाक समीक्षा' असून त्यात तर्कतीर्थांनी चार्वाकाचा देहात्मवाद विसाव्या शतकात काळाने उजळून दाखविला असल्याचे विधान केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

समाजवादी सांसद मधू लिमये राजकारणात विचार केंद्रित व्यवहार करणारे राजनीतिज्ञ म्हणून ओळखले जात. त्यांनी 'प्राइम मूव्हर्स : रोल ऑफ इंडिव्हिज्युअल रेव्होल्यूशनरी' पुस्तक लिहिले होते. त्याचे मराठी भाषांतर अमरेन्द्र -नंदू धनेश्वर यांनी केले होते. त्यास तर्कतीर्थांची प्रस्तावना आहे. 'डॉ. आंबेडकर : एक चिंतन' शीर्षकाने प्रकाशित ग्रंथ उपरोक्त इंग्रजी ग्रंथातील 'डॉ. आंबेडकर : ए सोशल रेव्होल्यूशनरी' लेखाचे मराठी भाषांतर होय. प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी म्हटले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजक्रांतिकारी होते. त्यांनी दलित समाजाला संघर्षातून प्रतिष्ठा नि हक्क मिळवून दिले. भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राज्यघटनेच्या कलम १५, १६ नुसार दलित समाजास आरक्षणाद्वारे सामाजिक न्याय मिळवून दिला. या संघर्षात डॉ. आंबेडकरांना अनेकांशी संघर्ष करावा लागला. त्यापैकी महात्मा गांधी एक होते. महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर हे परस्परविरुद्ध सामाजिक वातावरणात वाढले होते. त्यामुळे उभयतांचे राजकीय दृष्टिकोन भिन्न होते ही वस्तुस्थिती आहे. तथापि महात्मा गांधींनी राखीव मतदारसंघप्रश्नी जे मतभेद झाले त्यातून धडा घेऊन स्वत:त परिवर्तन करून अस्पृश्यता निर्मूलनाचे मोठे कार्य हाती घेतले. महात्मा गांधी आध्यात्मिक होते, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे इहवादी होते. डॉ बाबासाहेबांनी हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेस विरोध दर्शविण्यासाठी व तो संपविण्यासाठी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. मधू लिमये यांनी मांडणी केलेल्या विचारांचे प्रभावी विश्लेषण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या प्रस्तावनेत केले आहे. आपल्या या प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चिंतन ज्या सामाजिक घटनांमधून आकारले, त्या सर्वांची चर्चा प्रस्तावनेत करून त्यांचे विचार स्पष्ट केले आहेत. मधू लिमये यांनी आपल्या मूळ प्रबंधात साधकबाधक बाबींची चर्चा करत विचाराची मांडणी केल्याचे तर्कतीर्थांनी प्रस्तावनेतून सिद्ध केले आहे. डॉ. आंबेडकरांचा कायदेशास्त्र आणि अर्थशास्त्र यांचा अभ्यास असल्याने

त्यांनी आपले विचार तर्कसंगत पद्धतीने मांडले. त्यांचा युक्तिवाद बिनतोड असे हे हा ग्रंथ आपणास समजावतो. तर्कतीर्थांनी ही प्रस्तावना लिहून डॉ. आंबेडकर चिंतनास एक प्रकारे मान्यता देऊन त्याचे समर्थनच केले आहे.

कॉम्रेड शरद पाटील

'दासशूद्रांची गुलामगिरी' हा वैचारिक ग्रंथ कॉम्रेड शरद पाटील यांच्या दीर्घ चिंतन-मननाची फलनिष्पत्ती होय. भारतीय संविधान अंमलात आल्यानंतरच्या किंवा स्वातंत्र्यानंतरच्या ३५ वर्षांच्या कालखंडातील भारतीय समाजमनाचे हे प्रतिबिंब होय. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या ग्रंथाच्या प्रस्तावनेत समजावतात की भारतीय समाजरचनेचा अभ्यास चार प्रकारे होत आला आहे. १) साम्राज्यवादी पद्धती, २) राष्ट्रीय अस्मिता-संवर्धन पद्धती, ३) ऐतिहासिक पद्धती, ४) मार्क्सवादी पद्धती. या ग्रंथात उपरोक्त चतुर्दिक पद्धतीने अभ्यास करून भारतीय समाज मानसाच्या गेल्या शंभर-दीडशे वर्षांचे मूल्यांकन उपस्थित करण्यात आले आहे. ते असे सांगते की 'भारतीय संस्कृतीचा अत्यंत दृढ व खोल आर्थिक पाया म्हणजे सुमारे ६० ते ७० टक्के समाजसदस्यांची गुलामगिरी होय.' 'हा निष्कर्ष म्हणजे भारतीय विचारवंतांना दिलेले फारच मोठे वैचारिक आव्हान होय,' असे तर्कतीर्थ या प्रस्तावनेच्या उपसंहारात विधान करतात.

यातील कळीचा मुद्दा भारतीय संस्कृतीच्या आकलनाचा आहे. खुद्द तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'हिंदुधर्माची समीक्षा', 'सर्वधर्मसमीक्षा', 'वैदिक संस्कृतीचा विकास'सारखे ग्रंथ लिहून हिंदू हा धर्म नसून संस्कृती असल्याचे स्पष्ट केले आहे. सिंधु, हरप्पा संस्कृती अवशेष धर्मनिर्देश न करता संस्कृती अधोरेखित करतात. भारतात झालेले विविध वंशीय व देशीय जनसमूहांचे प्रारंभिक आगमन व त्यांच्या सामाजिक संकरातून निर्माण झालेली बहुसांस्कृतिक, बहुभाषी, बहुप्रादेशिक (इतिहास, भूगोल, मानववंश इ.) संस्कृती, जिला अलीकडे 'गंगा-जमुनी तहजीब' संबोधले जाते, यात समकालिक तथ्य आहे. तर राष्ट्रीय संस्कृती म्हणजे एक भाषा, एक प्रदेश, एक संस्कृती अशी पाश्चात्त्य राष्ट्रवादी मांडणी करणाराही एक वर्ग आहे.[३५] राष्ट्राची एकच संस्कृती असते म्हणत जात, धर्म, वंश, प्रांत अस्मितेच्या बळावर एक रंगी जग निर्माण करण्याचा (फॅसिस्ट) इतिहासात वारंवार प्रयत्न केला गेला व आजही तो केला जात आहे. इथले समाजवास्तव समजून घेतल्याशिवाय तुम्हास देश कळणार नाही, हे महात्मा गांधींनी सांगितलेले सत्य-त्यातच खरी बहुजिनसी भारतीय संस्कृती आहे, हे या निमित्ताने आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

वादविमर्श

वरील सर्व प्रकारच्या विचारधारांवर म्हणजे रॉयवाद, गांधीवाद, मार्क्सवाद, समाजवाद इ. वर साकल्याने विचार करणारा ग्रंथ म्हणून 'वादविमर्श'चा उल्लेख करावा लागेल. डोंबिवलीच्या के. वि. पेंढरकर महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष १९८४-८५ मध्ये 'वादविमर्श'

असे चर्चासत्र योजले होते. त्यात कौटिलीय अर्थशास्त्र, राष्ट्रवाद, एकात्ममानवतावाद, गांधीवाद, साम्यवादावर वमर्श झाला होता. त्यात सर्वश्री प्रा. धों. वि. देशपांडे, डॉ. नलिनी पंडित, प्रा. ग. भा. कानिटकर, प्रा. राम जोशी, डॉ. य. दि. फडके यांनी आपले विचार व्यक्त केले होते. त्यांचे संपादन त्या महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य न. गो. काळे यांनी केले होते. या चर्चासत्राचे उद्घाटन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले होते. ते उद्घाटनपर भाषणच या ग्रंथाची प्रस्तावना झाली.

या प्रास्ताविकाचा आणि या खंडातील वैचारिक नि तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांच्या प्रस्तावनांच्या उपसंहाराचा योग जुळून आला आहे. उपरोक्त ग्रंथाच्या या प्रस्तावनेत तर्कतीर्थ म्हणतात की, समाज हा व्यक्ती समूह होय. त्याचा आधार असते कुटुंब. मनुष्य स्वत:साठी जगत असताना समांतरपणे अप्रत्यक्षरित्या समाजासाठी जगत काही करत राहतो. त्याचे व्यक्ती जगणे परोक्ष रूपाने समाजहितार्थच असते. समाज व निसर्गात नित्य बदल होतात तसे विचारधारांमध्येही होतात. म्हणून समाजात वाद वा विचारधारा वैविध्य दिसून येते. यातून राजसत्ता, धर्मसत्ता, समाजसत्तांचा उदय-अस्त होत राहतो. ते सृष्टिचक्रासारखे आहे. सारे वाद जन्मतात तेच मुळी विकासार्थ. ‘वादे वादे जायते तत्त्वबोध:’ हाच खरा वादविमर्श होय.

प्रस्तावनेस ‘भूमिका’ असा एक पर्यायी शब्द वापरला जातो. तो वाद व विचारधारांनाही लागू पडतो. प्रत्येक वाद, विचाराची एक भूमिका - ध्येय, लक्ष्य असते. तत्त्वज्ञानाची मांडणी त्या अनुषंगाने होते. लक्ष्य निश्चितीची इतिश्री म्हणजे विचारधारा. कोणतीही विचारधारा, वाद वा तत्त्वज्ञान अंतिम असत नाही. 'Theory of Negation' या संदर्भातील तत्त्व होय. त्यात असलेली निरंतरता व सातत्य हे स्थापन, प्रतिरोध व नवनिर्मितीचा नित्यक्रम सूचित करते. विचारांच्या संदर्भात तेच सत्य आहे. कोणतेही सत्य अंतिम नसते. ते स्थल, काल सापेक्ष हेच खरे! म्हणून माणूस समाज, संस्कृती विचार बदलतात ते उच्चतम उज्ज्वल विकासार्थ!

धर्मविषय ग्रंथ

धर्म ही एक सामाजिक, सांस्कृतिक व्यवस्था आहे. यात ईश्वरीय तत्त्वावर विश्वास ठेवून विविध पूजा, पाठ, कर्मकांड केले जात. अनेक धर्मांना त्यांचे धर्मग्रंथ आहेत, तसेच संस्थापकही. काही धर्मगुरू धर्मांचे प्रमुख असतात. काही धर्म पारंपरिक संस्कृतीरूप असतात. ईश्वर रूप भिन्न आहेत. एकेश्वर धर्म आहेत. बहुदेववादीही धर्म आहे. ईश्वर अवतारी आहे. तो सगुण आहे तसा निर्गुणही. काही धर्म या सर्वांपलीकडे केवळ सदाचार, सद्विचार, नैतिकतेस धर्म मानतात. मानव धर्म माणसातच देव पाहतो. हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, पारसी, शीख, यहुदी, शिंतो, कन्फ्युशियन इ. १८ धर्म जगात अस्तित्वात आहेत. प्रत्येकांचे आराध्य व आराध्यपद्धती भिन्न आहे. जगात धर्म नाही असा मानव समाज नाही. उपवास, पूजा, नवस, तीर्थाटन, गुरू, ईश्वर यांचे धर्मनिहाय वैविध्य आहे. सर्व धर्म मानव कल्याणार्थ जन्मले. काही धर्म प्रसारक आहेत तर काही अप्रसारक. सर्व धर्म सदाचार समर्थक असतात.

अशा धर्मासंबंधीचे साहित्य पूर्वापार प्रत्येक समाज, देश, भाषेत आढळते. काही लोकधर्मही आहेत. धर्म समर्थन, धर्म चिकित्सा, धर्म सुधारणा, धर्म समीक्षा, धर्म परंपरांसंबंधी साहित्य सर्व काळात कमीअधिक प्रमाणात लिहिले जाते. विसाव्या शतकाच्या मध्य नि उत्तर काळात असे जे लेखन झाले, त्यातील अनेक ग्रंथांना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत. तर्कतीर्थ स्वत: मूलत: धर्म अभ्यासक व अध्यापक. या नात्याने त्यांनी धर्मविषयक ग्रंथ मराठी व संस्कृतमध्ये लिहिले. कोश तयार केले. त्यांची हिंदी, इंग्रजी भाषांतरे, समीक्षा उपलब्ध आहेत. शिवाय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची धर्मविषयक भाषणे, कोश नोंदी, मुलाखती, प्रस्तावना, पुस्तक परीक्षणे, लेख, सूची, भाषांतरे उपलब्ध आहेत. विशेषत: धर्मविषयक स्वसाहित्यास जशा त्यांनी प्रस्तावना लिहिल्या, तशा अन्यांच्या धर्मविषयक ग्रंथांनाही प्रस्तावना लिहिल्या. इथे आपण त्यांचा विचार करत आहोत.

'कीर्तने व आख्याने आणि भक्तिपर पद्ये व इतर किरकोळ लेखसंग्रह' असा संकीर्ण स्वरूपाचा असलेला हा ग्रंथ. सुविख्यात कीर्तनकार वामन आबाजी मोडकांचे साहित्य यात आहे. ते त्यांचे चिरंजीव नारायण वामन मोडक यांनी संग्रहित करून आपणापुढे सादर केले आहे. त्यास तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची प्रस्तावना आहे. त्यात प्रारंभी तर्कतीर्थांनी येथील धर्म सुधारणांचा इतिहास संक्षेपाने मांडला आहे. त्याचे कारण असे की कीर्तनकार वामन आबाजी मोडक हे धर्मसुधारक होते. त्यांचा प्रार्थना समाजाशी निकटचा संबंध होता. या ग्रंथात त्यांचे एक 'धर्मभ्रम' नावाचे व्याख्यान असून त्यातील विचार प्रागतिक आहेत. जुन्या धर्मकल्पना भ्रामक असून विज्ञानयुगाचा विचार करता अशा विचारांना रजा देणे समाजहिताचे असल्याचे मत तर्कतीर्थांनी विवेचनाच्या ओघात व्यक्त केले आहे, ते अनुकरणीय होय. या ग्रंथात कीर्तनांचा संग्रह असून त्या कीर्तनांमधून मोडक नीतीची प्रतिष्ठा करतात असे दिसून येते. मोडकांची ही कीर्तने प्रासादिक भाषेचा उत्तम नमुना होय. मोडक स्वत: धर्माच्या उच्च भावनेने प्रेरित गृहस्थ होते. त्यांचा संस्कृत साहित्याचा व्यासंग उच्च कोटीचा होता. यातील 'वक्तृत्व' शीर्षक व्याख्यान उदाहरण म्हणून पुढे करता येईल.

गौतमबुवा पाठक (पिंपळनेरकर) रचित ग्रंथ 'सोमनाथ तीर्थ' एक महत्त्वाचा संदर्भ ग्रंथ असून तो त्यांनी कष्टपूर्वक संदर्भ व इतिहास जमा करून लिहिला आहे. या मंदिराच्या सन १९५२ साली झालेल्या प्राणप्रतिष्ठापना महोत्सवाचे पौरोहित्य स्वामी केवलानंद सरस्वती आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केली होती. देशाच्या संदर्भात मंदिर जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा महोत्सव ऐतिहासिक व सामाजिक दृष्टीने महत्त्वाचे ठरले होते. इतिहासात धर्मांध मुस्लीम आक्रमक सत्ताधीश, महंमद घोरी, अल्लाउद्दीन खिलजी यांनी हिंदू धर्मीयांचे पहिले ज्योतिर्लिंग मानल्या गेलेल्या या मंदिराचा विध्वंस केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. न. वि. गाडगीळ, डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या कल्पनेतून या मंदिराच्या

जीर्णोद्धाराची योजना प्रत्यक्षात अमलात आली. महात्मा गांधींनी हा जीर्णोद्धार लोकवर्गणीतून व्हावा असे म्हटले. त्यामुळे तर या जीर्णोद्धाराचे सामाजिक महत्त्व वाढले. मंदिर उभे राहत असताना ते सर्वांसाठी (अस्पृश्यांसह) खुले राहणार असल्याचे विश्वस्तांनी जाहीर केले. त्यामुळे तत्कालीन मंदिर मुक्ती आंदोलनास बळ प्राप्त झाले. मंदिरपूर्तीनंतर तत्कालीन शंकराचार्यांना सदर मंदिराच्या प्राणप्रतिष्ठापनेसाठी पौरोहित्य करण्याची विनंती करण्यात आली, पण त्यांनी ती मुक्त प्रवेश योजना लक्षात घेता पारंपरिक धर्माविरुद्ध असल्याचे सांगत प्राणप्रतिष्ठापनेत सहभागी होण्याचे नाकारले. परिणामी अन्य ब्रह्मवृंदानी पण यावर बहिष्काराचे धोरण अंगीकारले. राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसादांना महात्मा गांधींच्या अस्पृश्यता निवारण कार्यातील व आंतरजातीय विवाहासंबंधी पुरोगामी भूमिकेमुळे तर्कतीर्थांची माहिती व परिचय होता. राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी तर्कतीर्थांना अडचण सांगून सहकार्याची विनंती केली. ती त्यांनी स्वामी केवलानंद सरस्वतींच्या मार्गदर्शनाखाली कार्य करण्याच्या अटीवर मान्य केली. त्यामुळे ब्रह्मवृंदाने तर्कतीर्थांवर बहिष्कारही घातला होता.

या सर्व पार्श्वभूमीवर या प्रस्तावनेस असाधरण महत्त्व येते. 'श्री सोमनाथ तीर्थ' ग्रंथ या सर्व संदर्भांचा खजिना व वृत्तांत म्हणून महत्त्वाचा ठरतो. प्रस्तावनेत ग्रंथाची प्रशंसा करत तर्कतीर्थांनी सांगितले आहे की, हा ग्रंथ श्रद्धावान शिवभक्तांइतकाच अभ्यासकांनाही उपयुक्त आहे. यात १९५२ च्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवाचा बारीक-सारीक तपशील मिळतो, तसाच सोमनाथाचे ज्योतिर्लिंग म्हणून असलेले महत्त्व व मंदिर नष्ट करण्यासाठी अकराव्या शतकापासून चौदाव्या, पंधराव्या शतकापर्यंत ज्या विविध स्वाऱ्या झाल्या त्यांचा इतिहासही या ग्रंथात असल्याचे तर्कतीर्थांनी स्पष्ट केले आहे. सोमनाथ ही मूलत: अवैदिक परंपरेस जोडणारी संज्ञा आहे. प्राचीन साहित्यात सोमयागाचे जे वर्णन आढळते त्याच्याशी या दैवताचा संबंध आहे. ह. भ. प. गौतमबुवा पाठक यांनी या सर्वावर मोठा प्रकाश टाकला आहे. स्वामी केवलानंद सरस्वती उत्तरमीमांसा पंडित होते, तर तर्कतीर्थ धर्मसुधारक. त्यामुळेही ते या प्रस्तावनेचे अधिकारी ठरतात. हा ग्रंथ धर्म, समाज, परंपरा, इतिहास, सुधारणा इ. अंगांनी परपूर्ण आहे.

'सद्गुरू प्रसाद अर्थात् जीवन रहस्य दर्शन' हा सदाशिव मनोहर जोशी लिखित प्रबंध होय. त्यास तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रस्तावना दिली आहे. तर्कतीर्थांच्या म्हणण्यानुसार प्रस्तुत ग्रंथ 'सहज-साधना' कशी करावी याचे मार्गदर्शन करतो. यात प्रारंभी जगातील धर्मांचा ऐतिहासिक आढावा घेण्यात आला आहे. लेखकाच्या म्हणण्यानुसार धर्म हे 'अध्यास' मूलक असतात. म्हणजे ते एकात अन्य दाखवतात. मानवास ईश्वर दर्शनाची अनुभूती देतात. दोरीत सापाचा भास होतो तसे मानवात ईश्वरीय दर्शन सद्गुरूच्या रूपात होते. बुद्धी व मनाचे सामर्थ्य सर्वांस झुगारून देता येते असे नाही. पण काही अपवाद व्यक्ती ते करू जाणतात. तेच सद्गुरू होत. सद्गुरू देव प्राप्तीचा मार्ग दाखवतात. म्हणून ते ईश्वरीय अंश असतात. धर्म, देव

यासारख्या विचारधारा या बद्ध आहेत. व्यक्ती तिच्याशी बद्ध वा श्रद्ध झाली की तिचे स्वतंत्र अस्तित्व लोप पावते. बुद्ध, ख्रिस्त, पैगंबर हे धर्म संस्थापक सद्गुरू होत. त्यांच्या वचनांचा सर्वसामान्यांवर परिणाम होऊन ते अनुयायी बनतात. सदगुरूठायी वसलेली 'सहजस्थिती' ही महात्मता होय. तेच जीवनरहस्य आहे. ते तर्कतीर्थांनी प्रस्तावनेतून लक्षात आणून दिले आहे. ही प्रस्तावना म्हणजे ग्रंथसार होय.

श्री समर्थ रामदासस्वामी रचित 'श्री दासबोध' एक मध्ययुगीन काव्य असून ती श्री स्वामींची स्वतंत्र रचना वा निर्मिती आहे. त्यास तर्कतीर्थांची प्रस्तावना जोडण्यात आली आहे. त्या अनुसार तर्कतीर्थांनी प्रारंभी समर्थ चरित्र सांगून त्यांची थोरवी वर्णिली आहे. नंतर 'दासबोध'चा बोध सुबोध पद्धतीने दिला आहे. प्रपंच व परमार्थ समान असतात असे दासबोध सांगतो. प्रपंच नेटका केल्यानेच परमार्थ साधता येतो असे 'दासबोध' चे सार आहे. 'आधी प्रपंच करावा नेटका। मग ध्यावे परमार्थ विवेका॥' तर्कतीर्थ सांगतात की 'दासबोध' मधील अध्यात्म दुसरे-तिसरे काही नसून तो सरळ, सुबोध मानवतावाद आहे. देवकारण व राजकारण हे मूलत: समाजकारण होय. सामाजिक ध्येय कल्याणकारी राज्यकारभारातून साधता येते. छत्रपती शिवाजी महाराजांचे कल्याणकारी राज्य याच विचाराने अवतरले होते. रामराज्य म्हणजे खरे तर विवेक, विचार व सद्गुणाचे राज्य होय.

डॉ. केशव लक्ष्मण दप्तरी हे सुप्रसिद्ध भारतीय ज्योतिर्गणितज्ज्ञ, संशोधक व बुद्धप्रामाण्यवादी विचारवंत होते. त्यांचे लेखसंग्रह प्रा. गणेश महादेव डोळके आणि डॉ. यादव केशव दप्तरी यांनी संपादित करून प्रकाशात आणले आहेत. त्यापैकी लेखसंग्रह भाग १ आणि ३ ला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या प्रस्तावना आहेत. पैकी भाग एकमध्ये धर्मशास्त्र, प्राचीन भारतीय इतिहास, पंचांग, कालनिर्णय, वैद्यकशास्त्र भारताचे सामाजिक प्रश्न, ग्रंथ समीक्षणे संग्रहित आहे. लेखांचे वैविध्य पाहता हा संकीर्ण लेखसंग्रह होय. तिसरा भाग 'भारतीय युद्धकाल निर्णय'चा आहे. यात 'महाभारत', 'रामायण' 'पुराणे' यांच्या कालनिर्णयाची चर्चा आहे. डॉ. दप्तरी यांनी 'धर्मरहस्य', 'धर्मविवादस्वरूप', 'जैमिन्यर्थदीपिका', 'स्वतंत्र भारताचा पुढील मार्ग' सारखे ग्रंथ रचले आहेत. डॉ. दप्तरी यांचे तत्त्वज्ञान हे 'उपनिषद'वर आधारित आहे. भारताची स्वातंत्र्योत्तर समाजपद्धती लोकशाहीनिष्ठ असावी या मताचे ते होते. डॉ. दप्तरी यांचे महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे प्राचीन ग्रंथांच्या आधारे भारतीय इतिहास व संस्कृतीची कालगणना होय. तर्कतीर्थांनी आपल्या प्रस्तावनेत डॉ. दप्तरींच्या या योगदानाकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. विशेष म्हणजे डॉ. दप्तरी हे संस्कृत साहित्याबरोबर विज्ञानाचेही गाढे अभ्यासक होते.

दुसरा जो लेखसंग्रह आहे, तो प्राचीन वाङ्मयावर आधारित कालगणनेस समर्पित आहे. आजवर दैवी कालगणनेवर आधारित इतिहास प्रचलित होता. त्यास कोणताही शास्त्रीय आधार नव्हता. डॉ. दप्तरी यांनी मानव समाजलक्ष्यी कालगणना निश्चित करून शास्त्राधार

उपलब्ध करून दिला. डॉ. दप्तरी यांनी ऐतिहासिक वंशावळयांचा अभिनव उपयोग केला. त्यामुळे प्राचीन प्रचलित इतिहासाशी वाङ्मयाचा मेळ घालणे शक्य झाले. विशेष म्हणजे डॉ. दप्तरी यांची ही संशोधन पद्धती पुरातत्व विभागाशी अनुरूप ठरली. कल्पित व अद्भुत इतिहासाला छेद देत तो वास्तववादी बनवला. त्यामुळे पुरातत्व संशोधक डॉ. सांकलिया यांनादेखील या संशोधनाचा फायदा झाला. ज्ञान-विज्ञानाच्या अनेक प्रांतांत डॉ. दप्तरी यांचे कार्य हे त्यांच्या असाधारण प्रज्ञेचे द्योतक होय. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना त्यांच्याबद्दल आदर होता. त्यांची मतभेदपूर्ण मैत्री ज्ञानसमाजास उपकारक ठरली.

महात्मा जोतीराव फुलेकृत 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकाचा सारसंक्षेप रमेश चव्हाण यांनी संपादित केला आहे. त्यास तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची प्रस्तावना आहे. याचे लेखन सत्यशोधक कार्यकर्ते रा. ना. चव्हाण यांनी केले आहे. महात्मा फुले यांनी लिहलेला शेवटचा ग्रंथ. उत्तरायुष्यात महात्मा फुले पक्षाघाताने बाधित होते. तशाही स्थितीत त्यांनी हा ग्रंथ डाव्या हाताने लिहून पूर्ण केला. यावरून जोतीराव फुले यांची लेखन-असोशी लक्षात येते. या ग्रंथाचा परामर्श घेत तर्कतीर्थांनी म्हटले आहे की, सत्यशोधक चळवळीचे कार्य अपूर्ण आहे. या ग्रंथात महात्मा फुले यांनी बुद्धिवाद व विचार-विवेक या आधारे जीवनाचे मूलभूत तत्त्वज्ञान मांडले आहे. महात्मा जोतीराव फुले यांची सत्यशोधक चळवळ अज्ञान बहुजन समाजास पुरोहितांच्या कर्मकांडी शोषणातून मुक्त करणारी होती. तिची समाज उपयोगिता ही परंपरेस पर्याय होती. तिचे क्षेत्र धर्म नि समाज होते. पण कालौघात ब्राह्मण-ब्राह्मणेतर विचाराचा प्रभाव सत्तेच्या अभिलाषेने वाढला. सत्तेपुढे सत्य मागे पडले. त्या चळवळीस वकृत असे जातीयवादी रूप आले. त्याची चिकित्सा करत या प्रस्तावनेत तर्कतीर्थ म्हणतात की, ''बहुजन समाज हा उच्चनीच जातिभेदाच्या अहंकाराने फुटीर, विस्कळीत व दुर्बळ झाला आहे. अंधश्रद्धेच्या अंधारात चाचपडत आहे. लोकभ्रमाची पिशाचे व भुते अजून बहुजन समाजाच्या मानगुटीस पकडून बसली आहेत.''

हा मूळ ग्रंथ पारंपरिक दैववादी ईश्वराजागी निर्मिक असलेल्या बुद्धिवादी, विवेकनिष्ठ धर्माचाराचे समर्थन करतो. तो सदाचार व सद्विचार समर्थक सत्य धर्म आहे. या सत्यधर्मात पारलौकिक तत्त्वास व कर्मकांडास फाटा देण्यात आला आहे. ''यात स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मूलभूत मानवी मूल्यांच्या आधारावर समाजरचना कशी असावी, हे सांगितले आहे. ज्या तत्त्वांच्या आधारावर अमेरिकन राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांती झाली, तीच तत्त्वे या पुस्तकात भारतीय समाजरचनेच्या संदर्भात मांडली आहेत. यात सांगितलेला सत्यधर्म हा 'यूटोपिया' आहे.''[३६] असे जे तर्कतीर्थांनी 'मराठी विश्वकोश' नोंदीत म्हटले आहे त्यात तथ्य आहे.

विसावे शतक हे धर्म नि समाज सुधारणांचे शतक म्हणून ओळखले जाते. या शतकात सुधारणा हा परवलीचा शब्द होता. या काळात अशा विषयांवर विपुल ग्रंथ लेखन होणं, हे

ओघानं आलंच. त्यातही पुरोहितवर्चस्व झुगारून देऊन अज्ञानी समाजास बंधमुक्त करण्याची समाजात अहमहमिका लागल्याचे दिसून येते. समाज आणि इतिहास अभ्यासक डॉ. सुमंत मुरंजन यांनी सन १९७३ मध्ये 'पुरोहितवर्ग वर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास' या ग्रंथात हा प्रश्न पोटतिडकीने मांडला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी हे लेखन आपल्या 'नवभारत' मासिकात मालिका म्हणून प्रकाशित केले. नंतर त्यास ग्रंथरूप यायचे म्हणून मग प्रस्तावनाही लिहिली. त्यात तर्कतीर्थांनी विषय महात्म्य समजावले आहे. या ग्रंथात पुरोहित वर्ग वर्चस्वाचा ऐतिहासिक धांडोळा घेण्यात आला आहे. भारतीय समाज जातिबद्ध आहे. त्यामुळे चातुर्वर्ण्यात त्याचे विभाजन दिसते. हे वर्ण गुणकर्मविभागश: निर्माण झाले असले तरी नंतरच्या काळात त्यांना जन्मसिद्ध रूप प्राप्त झाले. परिणामी समाजावर वरिष्ठ जातींचे वर्चस्व वाढले व शेकडो वर्षे तसेच चालत राहले. तत्कालीन समाज रूढीग्रस्त असल्याने सवर्णांचे फावले. आपल्या उच्चपद नि अधिकारांचा वापर सवर्ण वर्चस्व, अत्याचार, शोषणासाठी लागले. त्यातही शूद्र वर्गाची होणारी पिळवणूक अमानुष नि हृदयद्रावक होती. हे सारं चित्र डॉ. सुमंत मुरंजन यांनी सप्रमाण मांडल्याचं तर्कतीर्थ या प्रस्तावनेतून व्यक्त करतात. ही प्रस्तावना दीर्घ आहे नि ग्रंथाचे महत्त्व व परिणाम विशद करणारी आहे. तर्कतीर्थांनी प्रस्तावनेत विषयानुकूल भर घालत विषय विवेचन केले आहे. दासप्रथेचा यातील साद्यंत इतिहास दृष्टांत म्हणून सांगता येईल. याज्ञिक संस्थेस जैन व बुद्ध धर्मांनी केलेल्या विरोधाची कारणमीमांसा करत तर्कतीर्थ पुरोहितवर्चस्व किती टोकाचे होते, हे दाखवून देतात. जातसंस्था या सर्वांचे मूळ असून ही संस्था जगात फक्त भारतातच असल्याचे दाखवून देण्यात ते विसरत नाहीत. अन्य धर्मांच्या तुलनेत हिंदू धर्मात असलेले पुरोहितवर्चस्व कायम राखण्यासाठी केल्या जाणाऱ्या क्लृप्त्याही यात उघड करण्यात आल्या आहे. ही प्रस्तावना प्रबोधक आहे.

हिंदू धर्माचे मूळ रूप सांस्कृतिक असून तिच्यात सण, समारंभ, संस्कार, व्रत-वैकल्ये, पूजा-विधी, मुहूर्त यांची जी रेलचेल आहे, ती तुम्हास जगातील अन्य धर्मांमध्ये दिसणार नाही. भारतात १८ पगड जाती आहेत नि जगात १८ पगड धर्म अनुभवायला मिळतात. आस्तिक, नास्तिक, बहाई, बौद्ध, जैन, हिंदू, कन्फ्युशियस, ख्रिश्चन, इस्लाम, पारशी, शीख, शिंतो, झोरास्ट्रियन, यहुदी, आफ्रिकन, अमेरिकन या सर्व धर्मांपेक्षा हिंदू धर्म अनेक अंगांनी वेगळा आहे. त्याचा एकच एक देव नाही, तसा धर्मग्रंथही! त्याचा एकच एक धर्मगुरू नाही, उलटपक्षी जात, पंथनिहाय गुरूंचे प्राबल्य व वैविध्य या धर्मात आहे. असे असले तरी येथील सण, संस्कार, मिथक, अवतार एक असल्याने तो एकत्व धारण करतो व हजारो वर्षे टिकून आहे. त्याचा आधार रामायण, महाभारत, भगवद्गीतासारखे ग्रंथ होत. यातही या धर्माच्या सण, समारंभ, उत्सवांचे वर्णन जागोजागी आढळते. वामन मंगेश दुभाषी अर्थात् ऋग्वेदी यांनी 'आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास' लिहून फार मोठे सांस्कृतिक

संचित वाचकांसमोर सादर केले आहे. तर्कतीर्थांनी या ग्रंथास लिहिलेल्या प्रस्तावनेतून 'सण' शब्दाच्या निर्मितीपासून ते सणांच्या क्रियाविधींपर्यंत विस्ताराने प्रकाश टाकला आहे. छण, क्षण सारख्या शब्दातून सण शब्द साकारला आहे, हे स्पष्ट करत तर्कतीर्थ प्रस्तावनेत सांगतात की Feast And Festive यात त्याचे मूळ आहे. कंटाळा, परिपाठी (Routin) ला छेद देण्यासाठी सण असल्याने त्यात रंग, रस इ.ची उधळण असते. यात सणांच्या इतिहासाची (आख्यान, दंतकथा) चर्चा आहे, तशीच कार्यविधीचीपण. प्रत्येक सणांची गाणी, आरत्या इ. विपुल लोकसाहित्याच्या खजिन्यानी आपले लोकसाहित्य समृद्ध असून प्रत्येक सण चर्चेत ऋग्वेदी यांनी त्यांचे संदर्भ दिले आहेत. सण प्राचीन नाहीत. अर्वाचीन काळातही त्यात भर पडली असल्याचे दिसते. सण-समारंभात ग्राह्य-अग्राह्य बाबी प्राचीन वाङ्मयात विशद केल्या आहेत. ऋग्वेदी यांनी त्या सांगून सण-वमर्श सर्वांगीण केल्याचा अभिप्राय तर्कतीर्थांनी प्रस्तुत प्रस्तावनेत दिला आहे. ही प्रस्तावना अनेक नव्या संदर्भांनी युक्त असल्याने वाचनीय झाली आहे.

ईश्वर नि धर्माचे अद्वैत जगजाहीर आहे. त्यातही 'ईश्वर' ही संकल्पना नेमकी माणसाच्या मनात कशी नि कधी निर्माण झाली याचे माणसाच्या मनातले औत्सुक्य विज्ञानाइतकच उत्कंठावर्धक राहले आहे. या जिज्ञासेची पूर्ती करत लिहिलेला शंकरराव सावंत यांचा प्रबंध 'युगे युगे चाललेला ईश्वराचा शोध' युगांइतकाच प्राचीन आहे. विशेष म्हणजे हा प्रबंध अध्यात्मवादी नसून विवेकवादी आहे. विवेचनाचे हे अंग पाहता प्रबंध विवेचन अभिनव होऊन जाते. प्रस्तावनेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लक्षात आणून दिले आहे की प्रबंध लेखकाने प्राचीन वाङ्मयाचा धांडोळा घेत विषयप्रवेश केला आहे. ईश्वर व विज्ञान परस्परविरुद्ध तत्त्वे असली तरी समाजात आपणास काही वैज्ञानिक ईश्वरीय सत्तेवर विश्वास ठेवताना दिसतात नि मग याचे आश्चर्य नि गूढ आधिकच वाढते. प्रस्तुत प्रबंधात आदमानवापासून ते आधुनिक मानवापर्यंतच्या विकास प्रवासात झालेला ईश्वरीय संकल्पना विस्तार रोचक आहे. तर्कतीर्थांनी मूळ प्रबंधाच्या आधारे प्रस्तावनेत हे दाखवून दिले आहे की, ईश्वरीय सत्ता व अस्तित्व मानणारे लोक तीन प्रकारचे असतात - १) धर्म ग्रंथ वा शब्दप्रमाण, २) गूढ साक्षात्कारवादी, ३) युक्तिवादी तत्त्वज्ञ (प्लेटो, ॲरिस्टॉटल, लॉक इ.) पाश्चात्त्य तत्त्वज्ञांमध्ये कांट ईश्वरीय सत्ता मान्य करताना दिसतो.

खरे पाहले असता हा प्रबंध तटस्थ वृत्तीने केले ईश्वरीय समालोचन होय, असे तर्कतीर्थांचे मत आहे, ते अधिक महत्त्वाचे वाटते. या भूमिकेमुळे वाचक सर्व धर्मांचे समालोचन करू शकतो. मुळात धार्मिकता हा व्यक्तिकेंद्रित भाग आहे. बुद्धिवादी माणसे ईश्वरीय अस्तित्वच नाकारत असल्याने त्यांच्या धार्मिक होण्याचा प्रश्नच उद्धवत नाही. आधुनिक काळातील विवेकवाद हा विज्ञाननिष्ठ विचार होय. तिथेही ईश्वराच्या अस्तित्वाचा प्रश्न उद्धवत नाही. मग लक्षात येते की ही संकल्पना व्यक्तिनिष्ठ असून तिच्या समानधर्मी मनुष्य समूहातून

धर्म कल्पना उदयास आली व त्यांच्या सामूहिक आचरणातून धर्म संघटनेचा उदय झाला. तर्कतीर्थांनी प्रबंधाचा मूळ क्लिष्ट विषय प्रस्तावनेत सुबोध पद्धतीने मांडला आहे.

ऐतिहासिक ग्रंथ

इतिहास म्हणजे घटिताची सुसंगत आणि कालक्रमवार मांडणी. इति+ह+आस अशी या शब्दाची व्युत्पत्ती सांगितली जाते. त्याचा अर्थ 'असे घडले'. हे सांगत इतिहासकार स्थळ, काळ, व्यक्ती, प्रसंग इ. ची सविस्तर मांडणी करत असतो. माणूस इतिहास लिहितो ते संस्कृती जतनार्थ; पण वाचन करतो ते शिक्षण, शहाणपण मिळावे म्हणून. शहाणी माणसे इतिहासापासून बोध घेतात नि भूतकाळात पूर्वजांनी केलेल्या चुका टाळण्याचा प्रयत्न करतात. इतिहास नुसती वंशावळ नसते नि चरित्रही. तो त्या काळचा एकप्रकारे लेखाजोखाही असतो. काळाचे प्रतिबिंब असते त्यात. काळ एक तर अल्प स्मरणशील असतो. आजचे उद्या लक्षात राहत नाही. म्हणून भूतकाळ स्मरणशील नि स्मरणीय राहावा म्हणून इतिहास लिहायचा. केवळ भूतकाळाचे स्मरण, त्याने हाशिल काहीच होत नाही. भूतकाळ वर्तमानाशी जोडत सुधारणावादी जीवन जगण्यात इतिहासाची खरी फलश्रुती असते. असे लक्षात येते की केवळ अस्मिता नि अहंकार जोपासत इतिहासाचे गौरवीकरण होत राहते. ते विकासाचे लक्षण नव्हे नि प्रगल्भतेचे तर नव्हेच नव्हे. इतिहास हे जर शास्त्र असेल तर तो वस्तुनिष्ठ लिहायला हवा. पूर्वग्रह दूषित इतिहास लेखन अपराधच. दुरुस्तीच्या नावावर सोईस्कर इतिहास लेखनात बऱ्याचदा जुनीच चूक होत असते. म्हणून इतिहास ग्रंथ लेखन जोखीम नि जबाबदारीचे काम असते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'वैदिक संस्कृतीचा विकास', 'हिंदुधर्माची समीक्षा', 'भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्', 'शिखांचा पंथ व इतिहास', 'आद्यशंकराचार्य : जीवन व विकास', 'शुद्धिसर्वस्वम्' सारखे लिहिलेले ग्रंथ हे स्वरूप म्हणून भाषण, निबंध असले तरी त्याद्वारे ते इतिहासच मांडताना दिसतात. शिवाय या संस्कृत, मराठी ग्रंथांबरोबर त्यांनी अनेक ऐतिहासिक ग्रंथांची परीक्षणे केली असून काही इतिहासविषयक ग्रंथांना प्रस्तावनाही लिहिल्या आहेत. त्या वाचताना लक्षात येणारी गोष्ट अशी, की तर्कतीर्थ इतिहास उगाळण्यापेक्षा उजाळण्यावर भर देतात. त्यात द्विरुक्ती ऐवजी विश्लेषण असतं. ते परत पारंपरिक न राहता नवा दृष्टिकोन देणारे असते. म्हणूनही तर्कतीर्थलिखित प्रस्तावना वाचायच्या नि विचार करायचा.

पुंडलिकजी कातगडे हे गांधीवादी स्वातंत्र्यसैनिक. त्यांनी कायदेभंग चळवळ आणि भारत छोडो आंदोलन यांवर लेखन केले आहे. त्यांच्या 'भारत छोडो पर्व' (१९७०) ग्रंथास तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी विवेचक प्रस्तावना लिहिली आहे. त्यानुसार पुंडलिकजी कातगडे यांनी बेळगाव, सांगली भागात भारत छोडो आंदोलनाचे, तर आजरा (जि. कोल्हापूर) येथे साराबंदीचे कायदेभंग आंदोलन केले होते. कायदेभंग आंदोलन हे सनदशीर व अहिंसक असल्याचे तसेच भारत छोडो हे हिंसक असल्याचे आपले निरीक्षण

तर्कतीर्थांनी या प्रस्तावनेत नोंदले आहे. दोन्ही आंदोलने ब्रिटिश सरकारने दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु भारत छोडो आंदोलन अधिक आक्रमक झाल्याने ब्रिटिशांनी काढता पाय घेतल्याचे निरीक्षण तर्कतीर्थ नोंदवतात. 'भारत छोडो'च्या ठरावात काँग्रेसने स्पष्ट केले होते की, ''ब्रिटिशांनी भारतास त्वरित, विलंब न लावता स्वातंत्र्य द्यावे. भारत एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून दोस्तांच्या गटात ॲक्सिस राष्ट्रांच्या विरुद्ध उभे राहण्यास त्यामुळे उत्साहित होईल.'' या आंदोलनाची सविस्तर माहिती या प्रस्तावनेत आहे. 'भारत छोडो' हा नि:शस्त्र परंतु हिंसक उठाव होता हे तर्कतीर्थांनी प्रस्तावनेत नि:संदेह स्पष्ट केले आहे. पुढे आणखी एक गोष्ट तर्कतीर्थांनी नमूद केली आहे ती अशी की, स्वातंत्र्योत्तर काळात आज भारतात जे संप, हरताळ, बंद, तोडफोड, जाळपोळ होते, ती 'भारत छोडो'ची परिणती होय. ''ऐतिहासिक महान घटनांमध्ये प्रकट रूपाने काव्यमयता वास करीत असते. ते काव्य इतिहास लेखकांनाही दिसत असते; परंतु ते काहींना इतिहासलेखनात उतरविता येतेच असे नाही.'' पण ''पुंडलिकजींनी लिहिलेले हे स्मृतिचित्र उत्कृष्ट वठले आहे. मात्र ते पन्नास पृष्ठांपर्यंत कलात्मक बनले आहे. परंतु त्यानंतरच्या भागातील वर्णने यथार्थ असली तरी त्यात कलात्मकता मावळलेली दिसते,'' असा सुस्पष्ट अभिप्राय द्यायला तर्कतीर्थ विसरत नाहीत. पुंडलिकजी कातगडे हे तर्कतीर्थांचे समकालीन. तर्कतीर्थ त्यांचा आदर करीत. त्यांच्या काही आठवणी भाई माधवराव बागल यांनी सांगितल्या आहेत. त्यातून याची प्रचिती येते. सदर प्रस्तावना हे पुंडलिकजी कातगडे यांच्या कार्याचे मूल्यमापन म्हणूनही महत्त्वाचे ठरते.

'तुमची नगरे' हे हेमचंद्र दयार्णव कोपार्डेकर लिखित पुस्तक अत्यंत आवश्यक असणाऱ्या विषयावर लिहिलेले पुस्तक आहे असे या पुस्तकाच्या प्रस्तावनेच्या प्रारंभीच म्हणत तर्कतीर्थांनी पुस्तकाचे वेगळेपण लक्षात आणून दिले आहे. नगररचना हा खरे तर मानवी समाजाच्या जगण्याचा अत्यावश्यक भाग. नियोजन, अंमलबजावणी व विकास यांचा एकदुसऱ्याशी घनिष्ठ संबंध असतो, हे युरोप पाहत असताना प्रकर्षाने लक्षात येते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे म्हणणे आहे की 'नगर' हे संस्कृती निधान आहे. पूर्वी सुसंस्कृत समाजरचनेस 'नगर' संबोधन वापरले जायचे. आज नगर म्हटले की गगनचुंबी इमारती, त्याच्या पायथ्याला बकाल झोपडपट्ट्या, अव्यवस्था, अस्वच्छता यांचे साम्राज्य समोर येते. या सर्व पार्श्वभूमीवर आज, नगरपालिका, महापालिका क्षेत्रात नगररचना विभाग नियोजनाधारित नगर विकास धोरण राबवीत आहे. या पुस्तकात सदर बिकट विषयांची चर्चा आहे. वेदकालापासूनच्या नगररचनेचा आढावा घेत हे पुस्तक दळणवळण, प्रदूषणसारख्या विषयांवर मार्गदर्शन करते. नगररचना म्हणजे केवळ मनुष्य वस्तीचा विचार नाही. तर व्यापार, उद्योग, दळणवळण, रस्ते, सुविधा यांचा एकत्रित विचार होय असे 'तुमची नगरे' पुस्तक समजावते.

असेच नगराचा विचार इतिहासाच्या अंगाने करणारे आणखी एक पुस्तक आहे, 'अशी आमुची वाई'. त्याचे संपादक आहेत प्रा. ग. ह. खरे व वसंतराव बोराटे. 'तुमची नगरे' व 'अशी आमुची वाई' शीर्षकातील 'तुमची' आणि 'आमुची' हा आपपरभेद यात आपल्या समाज जीवनाचा पराभव आहे. नगर आपले नि विकास कार्य पालिकेचे या भेदात सारे आपण गमावले आहे. असो. 'अशी आमुची वाई' एका गावचा इतिहास सांगणारे पुस्तक. वाई गावाशी लेखकद्वयांचा जितका घनिष्ठ संबंध तितकाच प्रस्तावनाकारांचाही. ग. ह. खरे यांचे बालपण, शिक्षण वाईतच झाले. तर्कतीर्थ तर आजन्म वाईकर. त्यामुळे पुस्तकाची प्रस्तावना आत्मीयतेने भरलेली असणे स्वाभाविक. खरे आणि जोशी दोघेही इतिहासप्रेमी. या पुस्तकात वाईचा २०० वर्षांचा इतिहास कथन केल्याचे तर्कतीर्थ आपल्या लक्षात आणून देतात. वाई हे मूलत: विणकरांचे गाव असावे. नंतर ते वेद अध्ययन केंद्र बनले. वाईचा निसर्ग (भूगोल) जसा समृद्ध आहे तसेच सांस्कृतिक जीवनही (इतिहास)! इतिहासकालीन वाईची दोन चित्रे आहेत. पेशवाईपूर्व आणि पेशवाईउत्तर. इथे मूर्ती, मंदिरे, शिल्प, चित्रे, वाद्य, संगीताची प्राचीन परंपरा दिसून येते. इथे घराण्यांचा इतिहास म्हणजे समृद्ध वारशाची परंपरा. वैदिक, शास्त्री, कीर्तनकार, प्रवचनकार, गायक, चित्रकार, वादक यांची मोठी परंपरा इतिहासात दिसते. पेशवाई काळात वैदिक संस्कृती इथे फोफावली. पुढे शिवकालात मुघलांच्या स्वाऱ्या इथे झाल्या नि परंपरेस धक्का बसला तरी अव्याहत परंपरा संवर्धन होत राहले. कृष्णाकाठ हे या गावचं वैभव. त्यामुळे ते तीर्थक्षेत्र बनले. विसाव्या शतकात वाई गाव वेदाध्ययन केंद्र म्हणून प्रसिद्धीस आले, ते पाठशाळा नि घराण्यात असलेल्या वेदाध्ययन परंपरेमुळे. इथे संस्कृतबरोबर प्राकृत परंपराही विकसित झाली. 'प्राकृत कवितेचे पहिले पुस्तक' इथेच प्रकाशित झाले. 'मोदवृत्त', 'धर्म'सारखी नियतकालिके इथेच वर्षोन्वर्ष प्रकाशित होत राहिली. इथे मूलभूत भाषांतरे झाली. इंग्रजी, संस्कृतचे जाणकार इथे होते. प्रकाशन, संपादन, भाषांतर, लेखन, अध्ययन, अध्यापन, संशोधनाची मोठी ऐतिहासिक परंपरा लाभलेले गाव वाई. प्राज्ञपाठशाळा, स्वामी केवलानंद सरस्वती, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यामुळेही परंपरा विसाव्या शतकाच्या अंतापर्यंत टिकून होती. 'मराठी विश्वकोश' (२३ खंड), धर्मकोश (२५ खंड), 'मीमांसाकोश' (७ खंड) हे या गावचे अलीकडचे योगदान. तर्कतीर्थांनी या गावात आठ दशके वास्तव्य केल्याने मूळ पुस्तकास समांतर इतिहास त्यांनी या प्रस्तावनेतून उभा केला आहे. ब्राह्मो समाज, सत्यशोधक समाज, राष्ट्रीय आंदोलन, धर्मसुधारणा यांचाही मोठा इतिहास इथे घडला. तर्कतीर्थ त्या सर्वांचे साथीदार, साक्षीदार, भागीदार म्हणून सक्रिय होते. एक छोटे गाव इतिहास जपत किती मोठा इतिहास निर्माण करते याची प्रचिती 'अशी आमुची वाई' पुस्तक देते. ते पुणेस्थित वाईकर स्नेहसंमेलन (१९७९) च्या निमित्ताने लिहिले गेले. तर्कतीर्थांनी प्रस्तावना समारोपात म्हटल्याप्रमाणे, ''हा वाईचा इतिहास क्रमवार झालेल्या घटनांचा केवळ इतिहास नाही.

सामाजिक जीवन बदलत आहे. प्रगत होत आहे, याचे दर्शन घडविणारा हा इतिहास आहे. ही केवळ घटनांची जंत्री नाही. सामाजिक जीवनातील शक्तीचे विविध स्वरूपात व काळाच्या प्रवाहात घडणारे दर्शन म्हणजे इतिहास,'' ही इतिहास व्याख्याही नि पुस्तक समीक्षाही!

क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड हे कुंडल, पलूस, सांगली भागातील स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील एक प्रेरक व्यक्तिमत्त्व! कुंडल परिसर अण्णासाहेब किर्लोस्कर, रा. ग. गडकरी, क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, नागनाथ अण्णा नायकवडी, शंकरराव नि लक्ष्मणराव किर्लोस्कर प्रभृती मान्यवरांच्या पुरुषार्थाचा साक्षीदार जी. डी. (बापू) लाड यांनी 'भारत छोडो' आंदोलनात या भागात जागृती व संघटनाचे मोठे कार्य केले. ते त्यांनी 'पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य' या आपल्या आत्मकथासदृश ग्रंथात कथन केले आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेली मूळ विस्तृत प्रस्तावना इथे आपणास सारांश रूपाने वाचावयास मिळते. या प्रस्तावनेत तर्कतीर्थ स्वातंत्र्य लढ्यांचा आढावा घेत त्यात असलेली क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड यांची भूमिका स्पष्ट करतात. 'भारत छोडो' आंदोलन म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील मंतरलेले दिवस होते. कितीतरी तरुणांनी महात्मा गांधींच्या आवाहनास प्रतिसाद देऊन जीवन समर्पित केले. जी. डी. (बापू) लाड हे अशांपैकी एक होत. स्वातंत्र्यलढ्याचे हे पर्व रोमांचकारी होते, अशासाठी की या पर्वाने ब्रिटिशांना आपल्या साम्राज्याच्या अस्ताची जाणीव लोकांच्या आक्रमक त्वेषाने करून दिली. या काळात प्रतिसरकार उदयाला येण्यापर्यंत भारतीय जनतेने मजल मारली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे नेहमीच आपल्या प्रस्तावनेत इतिहासाला वर्तमानाशी जोडताना दिसतात. इथेही ते लक्षात आणून देतात की, ''आज ४० ते ५० टक्के प्रजा दारिद्र्य रेषेखाली जगत आहे. इतकी भयानक स्थिती असूनही काँग्रेसची संसदीय लोकशाही स्वत:स समाजवादी म्हणून वारंवार जाहीर करत आहे. परंतु समाजवाद फार दूर आहे. म्हणून समाजवादी लढ्याकरिता जनतेच्या उठावाची तयारी व्हावयास हवी.'' 'भारत छोडो' आंदोलन ही स्वातंत्र्यासाठी भारतीय जनतेने ब्रिटिशांच्या विरुद्ध केलेला उठाव होता. तर्कतीर्थ स्वातंत्र्याचे रूपांतर 'सुराज्य'मध्ये होण्यासाठी उठावाची अपेक्षा करतात, तेव्हा लक्षात येते की तर्कतीर्थांचा मूळ पिंड हा क्रांती, परिवर्तन, सुधारणांसाठी नित्य आसुसलेला असतो. ती त्यांची मूळ प्रवृत्ती होय.

वाङ्मयीन ग्रंथ

वाङ्मय शब्द मूलत: वाङ्मय रूप सूचित करणारा आहे. साहित्याचा प्रारंभ मौखिक आहे. लेखन कला नंतर विकसित झाली. मौखिक साहित्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात राहले ते पाठांतर, स्मरणशक्तीच्या आधारावर. त्यामुळे एकेकाळी साहित्य क्षेत्रात ज्याचे पाठांतर, स्मरण चांगले तो बुद्धमान मानला जायचा. पुढे लेखन कला विकसित झाली.

हस्ताक्षर सुरेख ज्याचे तो लेखक (Scriber) गणू लागला. नंतर साहित्यात कित्ता गिरवणे दुय्यम ठरले, जेव्हा माणूस आपले अनुभव लिहू लागला. मधल्या काळात इतिहासकारांनाच लेखक मानले जायचे. पण मध्यकाळानंतर जग बदलले. युरोपात प्रबोधन काळ आला नि मूल्य, तत्त्व, स्वातंत्र्य त्यातही व्यक्तिस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्याने धर्मसत्ता व राज्यसत्ता पराभूत झाली. जगावर तत्त्वज्ञ राज्य करू लागले. अगदी अलीकडच्या काळाचे उदाहरण म्हणजे कार्ल मार्क्स, महात्मा गांधींच्या विचाराची मोहिनी सर्व जगावर होती. त्यातही मार्क्सवाद शतकजयी ठरला; पण गांधीवादाने सहस्रक ओलांडले तरी आपली मोहिनी टिकवून ठेवली. त्याचे कारण या विचारात अधिकांचा विचार मूल्याधारित राहिल्याने तो अधिक मानव विकासी ठरला. पहिल्या नि दुसऱ्या महायुद्धानंतर समाजवाद, साम्यवाद, मार्क्सवाद प्रबळ झाला; पण त्यातून आलेल्या सत्ताधीशांनी मूळ विचारांनाच हरताळ फासला. मानवतावाद हा चिरंतन साहित्य विचार आहे. असं साहित्यच श्रेष्ठ! तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचार व जीवनाचा प्रवास पाहता क्रांतिकारी, गांधीवादी, रॉयवादी, काँग्रेसी व अंतमत: मानवतावादी राहिला आहे. त्यांनी स्वत: वैविध्यपूर्ण साहित्य लिहले नि वैविध्यपूर्ण साहित्य प्रकारांच्या (कथा, कादंबरी, काव्य, वैचारिक इ.) रचनांना प्रस्तावना दिल्या व पुस्तक परीक्षणे केली. त्यातून त्यांचे साहित्यप्रेम अधोरेखित होते. त्यांची साहित्यविषयक भाषणे व लेख यांतून साहित्याप्रती असलेला त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. शब्दप्रमाण साहित्याकडून स्वत:प्रमाण (A Priori) साहित्याकडे झालेली तर्कतीर्थांची वाटचाल हा अनुभवजन्य विकास म्हणून पाहता येतो. स्वत:प्रमाण साहित्य हे शुद्ध ज्ञान होय आणि ते सत्य मानले गेले आहे. सत्य म्हणजे 'स्व' शोधातून हाती आलेले आत्मभान. तेच खरे साहित्य होय.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी इतरेजनांच्या ज्या साहित्यिक रचनांना प्रस्तावना लिहिल्या त्यात कथा, कादंबरी, काव्य इ. ललित साहित्य आहे तसे संशोधन, समीक्षा क्षेत्रातलेही!

कादंबरी

वामन मल्हार जोशीलिखित 'सुशीलेचा देव', श्री. द. कुलकर्णींची 'कल्पवन', रवींद्र भट रचित 'भगीरथ' आणि वसंतराव पटवर्धन यांच्या 'आर्य' या कादंबऱ्यांना तर्कतीर्थांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत. पैकी 'सुशीलेचा देव' कादंबरीचा संबंध सेनापती बापट आणि महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या जीवन, कार्य आणि विचाराच्या ध्येयवादाशी संबंधित आहे. यातील सुनंदराव, बळवंतराव आणि सुशीला तिघेही ध्येयवादी आहेत. विधवा सुशीला उत्तरायुष्यात विश्वकुटुंबवादी किंवा समाजवादी बनल्याचे तर्कतीर्थांचे निरीक्षण तिच्या विदेशातून नव्या पतीस (बळवंतराव) पाठवलेल्या पत्र संवादावर आधारित आहे. त्यात ती म्हणते की, 'तूच माझे सत्य, तूच माझे सौजन्य आणि तूच सौंदर्य!' तिचे जग शेवटी

कुटुंबात विसावते. माणसात देव शोधण्याचा हा प्रयत्न असल्याचे वि. स. खांडेकरांनी या कादंबरीच्या संपादित आवृत्तीस लिहिलेल्या प्रस्तावनेत स्पष्ट केले आहे. श्री. द. कुलकर्णींची ‘कल्पवन’ नियोजन युगाची कथा आहे. ही कादंबरीही ‘सुशीलेचा देव’ सारखी आदर्शवादी आहे. ती विचारप्रधान कादंबरी असल्याचे तर्कतीर्थांचे मत कादंबरीचे खरे मूल्यमापन होय. रवींद्र भटांची ‘भगीरथ’ ही ऐतिहासिक कादंबरी आहे. ‘भगीरथ प्रयत्न’ या मिथकात या कादंबरीचे बीजसूत्र आहे. प्राचीन कथाबीजाद्वारे वर्तमानाची व्याख्या असे या कादंबरीचे स्वरूप आहे. ते प्रस्तावनेतून प्रभावीपणे समजते. अंतम ‘आर्य’ शीर्षकाची जी कादंबरी आहे, तीही ऐतिहासिकच. पण तिचा घाट वेगळा आहे. या कादंबरीचा कालपट विशाल असून इतका विस्तृत इतिहास कथानकात गुंफणे हे मोठे आव्हानात्मक कार्य होते. ते वसंतराव पटवर्धन यांनी लीलया पेलून आपण समर्थ कादंबरीकार आहोत, हे सिद्ध केले आहे. ‘‘मराठीमध्ये गेल्या दीडशे वर्षात पुष्कळ ऐतिहासिक कादंबऱ्या झाल्या आहेत. त्यातील काही नामवंत कलाकारांनी लिहिल्या आहेत. या सर्व ऐतिहासिक कादंबऱ्यांमध्ये आशयाच्या दृष्टीने ही कादंबरी पहिल्या क्रमांकात विराजमान व्हावी अशीच आहे,’’ हे तर्कतीर्थांचे या प्रस्तावनेतील प्रशस्तीपत्र बरेच काही सांगून जाते.

काव्य

यशवंत कानिटकरांचा कवितासंग्रह ‘मेनका’, श्री समर्थ रामदासकृत ‘दासबोध’, ‘रणगर्जना’, कवी चोंभा रचित ‘उखाहरण’ आणि द. वि. केसरकरांची ‘चंद्रफुलांची गाणी’ अशा पाच काव्यकृतींना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रस्तावना लिहून आपणास काव्यातही रस होता हे सिद्ध केले आहे. यशवंत कानिटकरांच्या ‘मेनका’च्या प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी स्पष्ट केले आहे की, ‘या कवितासंग्रहात उच्च प्रतिभेची अप्रतिम लेणी पुष्कळच आहेत.’ हा काव्यसंग्रह विचारप्रवर्तक कवितांचा असून त्याची ओळख तर्कतीर्थांनी प्रस्तावनेत अनेक उदाहरणे देऊन करून दिली आहेत. श्रीसमर्थ रामदासकृत ‘दासबोध’ सतराव्या शतकातील काव्य असून वर्तमानातही ते पाचशे वर्षे उलटून गेली तरी सार्थक वाटते यातच या काव्याची थोरवी सामावलेली आहे. दशक आणि समासात हे काव्य रचले गेले आहे. ते एक सदाचार शास्त्र आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. आध्यात्मिक मानवतावादाचे काव्य म्हणत तर्कतीर्थांनी याचा महमा वर्णिला आहे. जीवनाच्या सर्व प्रश्न व समस्यांचे मार्गदर्शन आपणास ‘दासबोधा’तून मिळते. दासबोध हे स्वतंत्र काव्य आहे. ते भारतीय जीवनाचे तत्त्वज्ञान असल्याचे तर्कतीर्थ म्हणतात. ‘रणगर्जना’ भारतीय विविध भाषी समरगीतांचा संग्रह आहे. तो युद्धकालात प्रेरक ठरणारा आहे. मराठी कवींनी भारतीय विविधभाषी समरगीत, राष्ट्रगीतांचे मराठीत केलेले ते भाषांतर आहे. कवी चोंभाचे ‘उखाहरण’ (उषाहरण) काव्य प्रथम इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी शोधले तेव्हा त्यांना त्याची अपूर्ण प्रत मिळाली होती. नंतर डॉ. यू. म. पठाण यांनी त्याची मूळ पूर्ण प्रत

शोधली. त्यामुळे डॉ. यू. म. पठाण यांची मते वि. का. राजवाडे यांच्यापेक्षा ग्राह्य ठरली आहेत. हा यादवकालीन कवी असून त्यावर महानुभाव पंथाचा प्रभाव दिसतो. हे काव्य रंजक, शृंगाररसपूर्ण आहे. 'चंद्रफुलांची गाणी' द. वि. केसरकरांचा कवितासंग्रह आहे. त्यास तर्कतीर्थांची छोटी प्रस्तावना आहे. हा भक्तिगीतांचा संग्रह आहे, तसाच निसर्ग कवितांचा पण. त्यात शृंगार आहे, प्रेम आहे. हा त्यांचा पहिलाच संग्रह. त्यांची गीते 'घरात हसरे तारे', 'प्रतिमा उरी धरोनी' रसिकांनी पसंत केली आहेत. तर्कतीर्थ आस्वादक व चोखंदळ काव्य रसिक होते, हे या प्रस्तावना सिद्ध करतात.

समीक्षा

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अनेक पुस्तकांची परीक्षणे लिहून आपण कुशल समीक्षक असल्याचे दाखवून दले आहे. तद्वतच अनेक समीक्षा ग्रंथांना प्रस्तावना लिहून आपणास समीक्षेची पण समीक्षा करता येते हे सिद्ध केले आहे. डॉ. सौ. चारूशीला गुप्ते यांचा प्रबंध 'नाथ माधव : व्यक्ती आणि वाङ्मय', डॉ. वसंत जोशी संपादित 'ज्ञानदेवचिंतन', गो. के. भट यांचा 'वागीश्वरी' हा नाट्यसमीक्षेस वाहलेला ग्रंथ, डॉ. अर्जुन डांगळे संपादित 'दलित साहित्य : एक अभ्यास', संपादक मो. नि. ठोकेंचा 'रा. ना. चव्हाण निवडक वाङ्मय' आणि लालचंद हिराचंद लिखित 'वाल्मीकी रामायण : एक स्वतंत्र विचार' या समीक्षा ग्रंथांना प्रस्तावना लिहून समीक्षेची समीक्षा केली आहे. नाथ माधव यांना अवघे ४६ वर्षांचे आयुष्य लाभले. त्यातला अधिकांश काळ त्यांनी छ. शिवाजी महाराजांच्या संशोधनावर घालविला. कादंबरीकार म्हणून ते प्रसिद्ध होते. त्यांच्या जीवन व साहित्यावर लिहिलेल्या डॉ. चारूशीला गुप्तेंच्या प्रबंधास तर्कतीर्थांनी प्रस्तावना लिहून या प्रयत्नास बळ दिले आहे. एका पिढीस रंजविण्याचे, त्यांच्यात देशभक्तीचे पोषण करण्याचे कार्य नाथ माधवांच्या साहित्याने केले आहे, असे म्हणत तर्कतीर्थ त्यांचे योगदानच रेखांकित करतात. 'ज्ञानदेव चिंतन' हे ज्ञानदेव व त्यांचे काव्य नि विचार यावर आधारित लेखांचा संग्रह असून त्याचे संपादन डॉ. वसंत जोशी यांनी केले आहे. यात तर्कतीर्थांशिवाय पं. बाळाचार्य खुपेरकर, प्रा. वा. ल. कुलकर्णी, डॉ. यु. म. पठाण, प्रा. रा. ग. जाधव, डॉ. रा. चिं. ढेरे प्रभृती २१ मान्यवरांचे लेख असून प्रस्तावनेत या सर्वांचा आढावा आहे. ही प्रस्तावना मूळ ज्ञानेश्वरीचे रसग्रहण होय. प्रा. गो. के. भट यांचे 'वागीश्वरी' नाट्यसमीक्षा ग्रंथ आहे. नाट्यशास्त्र या समीक्षेचा आधार आहे. मूलत: ही संस्कृत साहित्य समीक्षा होय. 'दलित साहित्य : एक अभ्यास' संपादित ग्रंथ होय. डॉ. अर्जुन डांगळे या ग्रंथातून उपेक्षित समाजाच्या अपेक्षा मांडत दलितांचे जीवन सुसह्य व्हावे म्हणून प्रयत्नशील आहेत. दलित साहित्य अभिजात बनत असल्याचा सार्थ अभिमान नि आनंद तर्कतीर्थ या प्रस्तावनेत बोलून दाखवतात. 'रा. ना. चव्हाण निवडक साहित्य' हे व्यापक तत्त्वनिष्ठ भूमिकेतून झालेले लेखन आहे. धर्मसुधारणा, समाजसुधारणा त्यांचा पाया आहे. आजचे सुधारवादी आंदोलन

रा. ना. चव्हाण यांच्या परिश्रमाचे फलित होय म्हणत तर्कतीर्थ या लेखनाची सामाजिक तळमळ लक्षात आणून देतात.

संकीर्ण

कादंबरी, काव्य, समीक्षासारख्या साहित्य प्रकारांच्या रचनांशिवाय ज्याला संकीर्ण म्हणता येईल अशा बहुविध प्रकारच्या ग्रंथांना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्यातून त्यांची साहित्यविषयक जाण चतुरस्र होती हे लक्षात येते. 'शिवसमर्थ स्मरण मुद्रा', 'पार्टी', 'चौफेर', 'कृतार्थ', 'ही ज्योत अनंताची', 'प्राचीन भारतीय भौतिक विज्ञान', 'समाजभूषण पुरुषोत्तम', 'सोव्हिएत अंतरंग आणि सोव्हिएत भारत मैत्री', 'विदेश दर्शन' (पत्रसंग्रह), 'अक्षर श्रद्धांजली' अशा विविध ग्रंथांना तर्कतीर्थांनी प्रस्तावना लिहिल्या. हे ग्रंथ स्फुटसंग्रह, गौरविका, पत्रसंग्रह, राज्यशास्त्र अशा प्रकारचे आहेत. 'शिवसमर्थ स्मरणमुद्रा' ग्रंथ छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्या तीनशेव्या स्मृती शताब्दी नमित्त प्रकाशित करण्यात आला होता. 'सोव्हिएत अंतरंग आणि सोव्हिएत-भारत मैत्री' मध्ये भारत-रशिया यांच्या राजकीय संबंधांची चर्चा आहे. 'चौफेर' हा माधव गडकरी यांचा स्फुट लेखन संग्रह आहे. 'विदेश दर्शन' हा यशवंतराव चव्हाण यांच्या पत्रांचा संग्रह असून ही पत्रे त्यांनी आपल्या पत्नी वेणुताई चव्हाण यांना विदेश दौऱ्यावर असताना लिहिली आहेत. यशवंतराव चव्हाण यांची ही पत्रे म्हणजे त्यांचे विश्वसंस्कृतीचे आकलन होय. ही पत्रे एकीकडे विदेशी प्रवास वर्णने आहेत तर दुसरीकडे ती एका सजग, संवेदी भारतीयाचे विश्वनिरीक्षण व विश्वभान आहे. यशवंतराव चवहाण एक सुसंस्कृत भारतीय म्हणून किती मोठे होते, हे ज्यांना जाणून घ्यायचे असेल त्यांना ही पत्रे आरसा दाखवतील. या ग्रंथास तर्कतीर्थांची असलेली प्रस्तावना हृद्य आहे. 'प्राचीन भारतीय भौतिक विज्ञान' हा श्री. भि. वेलणकरांचा ग्रंथ विज्ञान किती प्राचीन आहे, याची प्रचिती देतो. 'पार्टी' सारखा प्रकार खरे तर पाश्चात्त्य. पण तर्कतीर्थ हा भारतीय संस्कृतीत पण कसा होता, त्याची आचारसंहिता काय असे याची माहिती पुरवत लेखन व व्यासंग, जिज्ञासा यांना कोणतेच क्षेत्र वर्ज्य असत नाही हे अप्रत्यक्षपणे समजावतात. या सर्व प्रस्तावना म्हणजे तर्कतीर्थांच्या ज्ञानविस्ताराचा अभिकल्पच!

तर्कतीर्थलिखित प्रस्तावनांची मीमांसा

या खंडात ज्या शंभरहून अधिक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित प्रस्तावनांचा आपण विचार केला, त्यांचा साकल्याने विचार करताना लक्षात येते की तर्कतीर्थांनी स्वत:च्या हयातीत जे ग्रंथ प्रकाशित केले त्यांना प्रस्तावना लिहिल्या असून त्या संबंधित ग्रंथ विषयांचे विवेचन करत त्या लेखनामागची भूमिका व दृष्टिकोन व्यक्त करतात. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे तर्कतीर्थ सन १९६० ते १९८० अशा २०

वर्षांच्या दीर्घकाळात अध्यक्ष होते. मराठी भाषेस ज्ञानभाषा बनवायची म्हणून त्यांनी अनेक अभिजात साहित्यकृती विशेषत: इंग्रजी व संस्कृत भाषेतून मराठीत आणल्या. त्याचे स्वरूप अर्थातच भाषांतरित होते. काही विज्ञानविषयक उपयोजित ग्रंथ त्यांनी त्या त्या विषय तज्ज्ञांकडून लिहून घेतले. अशा ग्रंथांची अधिकृत सूची उपलब्ध नसली तरी जे १०० ग्रंथ हाती लागले त्यांना 'निवेदन' रूपात अध्यक्ष या नात्याने तर्कतीर्थांनी अनिवार्यत: प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्यांचे स्वरूप औपचारिक असले तरी संबंधित ग्रंथ प्रकाशनाची भूमिका त्या प्रस्तावना मांडतात. या शिवाय त्यांनी अन्यांच्या ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या आहेत, त्यांच्या रुंद कक्षा पाहता तर्कतीर्थांच्या व्यासंगाचे आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही. शिवाय काही दीर्घ प्रस्तावना हाती राहतात. त्या 'मराठी विश्वकोश', 'धर्मकोश', 'शब्दकोश' आणि तर्कतीर्थांनी संपादलेले लेखसंग्रह यांना लिहिलेल्या आहेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेले ग्रंथ व त्यांच्या प्रस्तावना म्हणजे एका विशिष्ट भूमिकेचा स्पष्टोच्चार आहे. 'शुद्धिसर्वस्वम्' द्वारे ते सनातन धर्मावरोधी धर्मसुधारणांचे समर्थन करत मानव समन्वयी भूमिका रुजवू पाहतात. 'जडवाद अर्थात् अनीश्वरवाद' म्हणजे भौतिकवादी तत्त्वज्ञान. त्यात अध्यात्मास वाव नाही. तो एक वैज्ञानिक दृष्टिकोन आहे. त्याच आधारे ते 'हिंदुधर्माची समीक्षा' लिहितात नि मार्क्सवादी अर्थात् द्वंद्वात्मक भौतिकवाद मांडतात. 'वैदिक संस्कृतीचा विकास' ग्रंथ भारतीय प्राचीन समाजरचनेचा विचार ते मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, पुराभिलेखशास्त्र यांच्या आधारे मांडत वैदिक वाङ्मय आणि वैदिक संस्कृती यांचा अनुबंध स्पष्ट करतात. ही सर्वथा इतिहासाची सांस्कृतिक मांडणी असून ती इतिहासास शास्त्र बनवत कल्पनेस छेद देत वास्तववादी मानवी विकास पट समजावते.

तीन लेखसंग्रहांच्या दीर्घ प्रस्तावनांपैकी एक स्वलेखनासंबंधी आहे. सन १९८२ मध्ये श्रीविद्या प्रकाशनाने जो 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड-१)' प्रकाशित केला होता, त्याची जी प्रस्तावना आहे, ती खरे तर तर्कतीर्थांच्या बहुआयामी लेखनाचा आलेख आहे. यात लेख, भाषणे, नोंदी, भाषांतरे असे वैविध्य आहे. पण हा लेखसंग्रह म्हणजे 'निवडक तर्कतीर्थ' असे त्याचे प्रातिनिधिक रूप (Anthology) आहे. पण या लेखनाच्या कक्षा पाहिल्या की त्या पूर्व-पश्चिम सीमा ओलांडत वैश्विक बनून समोर येतात. Encyclopedic Writing मध्ये सर्वसमावेशकता असते तसं तर्कतीर्थांचं प्रस्तावना लेखन असतं. ते केवळ त्या ग्रंथ विषयाच्या चौकटीत लेखन न करता विषयानुषंगिक इतिहास उद्धृत करीत ते विषयविवेचनाकडे लक्ष वेधतात. बऱ्याचदा तर्कतीर्थ सोदाहरण विवेचन करतात. ऋचा, काव्यपंक्ती यांचे विषयविवेचन करत त्यांना अपेक्षित भूमिका मांडतात. अशा प्रस्तावना बऱ्याचदा विषयानुषंगिक चिंतन रूपात सादर करताना आपण पाहतो. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या ग्रंथांना लिहलेली 'निवेदने' आणि या विस्तृत विवेचक प्रस्तावना या एकमेकाच्या विरूद्ध स्वरूपाच्या आहेत.

कोश नि लेखसंग्रहांच्या प्रसतावना व इतरेजनांच्या ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावनांमधून तर्कतीर्थांमधील जो प्रस्तावनाकार आपल्याला दिसतो तो चिंतक, विश्लेषक, तत्त्वज्ञ असतो. त्यांचं हे प्रस्तावनालेखन म्हणजे विषयाची पूर्वपीठिका असते, तर कधी विश्लेषण तर कधी सरळ सरळ त्या ग्रंथाची समीक्षाच असते. बालबोध, सुबोध प्रस्तावना अपवाद म्हणाव्या लागतील. ते एक प्रकट भाष्य बनून समोर येते. ते वाचकांना प्रगल्भ, जिज्ञासू करणारे असते; पण त्यापेक्षा वाचकाला तर्कतीर्थांच्या प्रस्तावना स्वतंत्रपणे विचार करायला शिकवतात, हीच त्यांच्या प्रस्तावनांची खरी ओळख होय.

'धर्मकोश'च्या विविध खंडांना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आठ छोट्या -मोठ्या प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्या संस्कृत व इंग्रजीत आहेत. त्या उपनिषदिक तत्त्वज्ञानावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. शिवाय त्या त्या खंडाची वा भागाची रचना समजावणाऱ्या आहेत. 'धर्मकोश' खंड-२, भाग-१ ची प्रस्तावना सर्वात दीर्घ असून ती संस्कृत व इंग्रजीत आहे. इथे तिचा मराठी अनुवाद सर्वसामान्यांसाठी दिला आहे. ही प्रस्तावना 'धर्मकोश' प्रकल्पाची भूमिका म्हणून महत्त्वाची आहे, तशीच तात्त्विकता स्पष्ट करणारी पण आहे. केवळ भारतीय नाही तर पाश्चात्त्य अभ्यासक, संशोधक, समीक्षकांचा विचार करून 'धर्मकोश' विवेचन करण्यात आले असल्याने या प्रस्तावना सर्वग्राही व सर्वसमावेशक करण्याचा प्रयत्न महत्त्वाचा आहे. त्यामुळे या प्रकल्पास वैचारिक उदारतेची बैठक आहे. ती पारंपरिक वेद, वेदान्त समीक्षांपेक्षा सर्वथा नवा दृष्टिकोन प्रस्तुत करणाऱ्या आहेत. या संबंधीचे आपले लक्ष्य वा उद्दिष्ट स्पष्ट करत तर्कतीर्थांनी म्हटले आहे की, "The chief object of Part I (Vol 2) is to show the historic background and the tradition of the Upanishadic philosophy. It is in the Pre-Upanishadic Vedic literature that we must study the process of evalution of the basic and the highest philosophical thoughts incorporated in the Upanishadic philosophy."[३७]

उपनिषद तत्त्वज्ञानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी व मूलभूत तत्त्वज्ञानाची विवेचना हाच 'धर्मकोश'चा मूळ उद्दश आहे, नि तो तर्कतीर्थांनी या विविध प्रस्तावनांतून सुस्पष्ट स्वरूपात व्यक्त केला आहे.

भाषांतरित ग्रंथ, ललितकला ग्रंथ, क्रीडा ग्रंथ, इतिहास ग्रंथ, बोली व भाषा ग्रंथ भारतीय भाषांतील साहित्यिक ग्रंथ, विज्ञानविषयक ग्रंथ, तंत्रज्ञानविषयक ग्रंथ, तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ, आणि संकीर्ण ग्रंथ ही साहित्य आणि संस्कृती मंडळाची शृंखला एका नजरेत अभ्यासली तरी संपादक तर्कतीर्थ यांची प्रतिभा, तिचे विभ्रम आश्चर्यकारक वाटल्याशिवाय राहत नाहीत. तीच गोष्ट अन्यांच्या ग्रंथांच्या प्रस्तावनांची पण!

दि. १ मे, २०२२. **- डॉ. सुनीलकुमार लवटे**
महाराष्ट्र दिन संपादक

संदर्भ सूची

१) आपटे, वामन शिवराम: **संस्कृत-हिंदी-कोश,** (२००१), मोतीलाल बनारसी दास, ८, महालक्ष्मी चेम्बर, २२, भुलाभाई रोड, मुंबई-२६, पृ. ६८१

२) पळशीकर, वसंत (संपा.): **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी :** व्यक्तित्व, कार्य आणि विचार, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई. (फेब्रुवारी, १९९६), पृ. ८९.

३) शास्त्रीः, महामहोपाध्याय- श्री सीताराम: **धर्मप्रदीप :** संपादक - महाममहोपाध्याय श्री अनंतकृष्णशास्त्रीः, श्री. श्रीजीवभट्टाचार्यश्च एम्. ए. प्रकाशक - महामहोपाध्याय श्रीअनंतकृष्णशास्त्री, ३२, कॉलेज स्ट्रीट, कलकत्ता, मूल्य - ५ रुप्यकाणि, वर्ष - १५ डिसेंबर, १९३७, पृष्ठे - २७८

४) भिडे, सदाशिवशास्त्री: **शुद्धिसर्वस्व** (पुस्तक परीक्षण) - (पूर्वार्ध व उत्तरार्ध), पूर्वार्ध - साप्ता. केसरी, ता. २२ जानेवारी १९२९, पृ. ३२. उत्तरार्ध - साप्ता. केसरी, ता. २९ जानेवारी १९२९, पृ. ४४. (केसरी सारसंग्रह / न. चिं. केळकर, धों. वा. विद्वंस)

5) Roy, M. N.: **Materialism**, Renaissance Publication, The Indian Renaissance Association Ltd., Dehra Dun (U. P.) - 1940, Pages-268

६) जोशी, यशवंत गोपाळ: **जडवाद अर्थात् अनीश्वरवाद** - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रकाशक - ६२३/१५, सदाशिव पेठ, पुणे, प्रथमावृत्ती - २०-१०-१९४१, किं.१/- रुपया, पृष्ठे १०३, प्रस्तावना - पृ. २

७) कुरुंदकर, नरहर: **मी विचाराचा ठोकळेबाजपणा मानत नाही** , साप्ताहिक साधना, १८ जुलै २०२०, पृ. ४०, (प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या ८८ व्या जयंतीनिमित्त त्यांचे विद्यार्थी डॉ. जगदीश कदम, नांदेड यांनी १९७८ मध्ये घेतलेली मुलाखत)

८) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री: **हिंदुधर्माची समीक्षा,** प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई. (१९४१), प्रस्तावना पृ. ३

९) मनोहर, डॉ. यशवंत: **समर्थ ज्ञानमीमांसा**, दै. महाराष्ट्र टाइम्स, ६ जानेवारी २०१८

१०) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री: **वैदिक संस्कृतीचा विकास,** प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई (१९५१), 'प्रस्तावना'मधून उद्धृत

११) भागवत, दुर्गा: **जिवंत प्रज्ञेच्या स्फुरणाचे उत्कृष्ट प्रत्यंतर**, ('वैदिक संस्कृतीचा विकास'ची समीक्षा), साप्ताहिक मौज, १६ जानेवारी १९५२, पृ. ९

१२) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.):**लोकमान्य टिळक लेखसंग्रह,** साहित्य अकादमी, नवी दिल्ली, (१९६९), प्रस्तावना, पृ. ६१

१३) खरे, प्रा. ग. ह. आणि बोराटे, व. म.: **अशी आमुची वाई,** प्रकाशक - वाईकर स्नेहसंमेलन, पुणे, दि. २६ जानेवारी १९७९, मूल्य १० रु.

१४) रेगे, प्रा. मे. पुं.: **तर्कतीर्थांची वैचारिक वाटचाल**, लेखसंग्रह (खंड-१) - पुस्तक परीक्षण/समीक्षा, दै. महाराष्ट्र टाइम्स, मुंबई, पुनर्प्रकाशन - नवभारत, फेब्रुवारी १९८३
१५) कर्णिक, द्वा. भ.: **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा लेखसंग्रह (ललित शिफारस),** ललित, मार्च १९८३, पृ. २१
१६) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री: **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड पहिला),** प्रकाशक दामोदर दिनकर कुलकर्णी, श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे-३०, वर्ष -१९८२, किं. ५५५ रुपये, पृष्ठे - ६००, प्रस्तावना - पृ. ५
१७) **तत्रैव**, पृ. ६

१८) रेगे, प्रा. मे. पुं.: **तर्कतीर्थांची वैचारिक वाटचाल,** लेखसंग्रह (खंड-१) परीक्षण / समीक्षा, दैनिक महाराष्ट्र टाइम्स, मुंबई, पुनर्प्रकाशन - नवभारत, फेब्रुवारी १९८३, पृ. २९
१९) मेहंदळे, म. अ.: **मंत्रब्राह्मणोपनिषद** - 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्तित्व, कार्य आणि विचार', संपा. वसंत पळशीकर, प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई / १९९६, पृ. ११०
20) **Prospectus of The Dharmakosa**, Published by The Dharmakosa Editorial Board, Wai. - 1953, Page -10.
२१) **दैनिक लोकसत्ता**, बुधवार, दि. ३० मार्च २०२२, पृ. २ (विविधा)
२२) डफाळ, चं. न.: **देशनांक** - निर्देशांक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. (१९६४), 'निवेदन'मधून उद्धृत (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी)
२३) काणे, पां. वा. (अनु.) भट, यशवंत आबाजी,: **धर्माचा इतिहास**, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (१९६७), 'प्रस्तावना'मधून उद्धृत (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी)
२४) **तत्रैव,** पृ.
25) **French Records -** Correspondance of M. Anquetil de Briancourt, French Consul at Surat (1774 - 1780), Correspondance of M. de St Lubin, French Envoy to the maratha court at poona, Translated by Dr. V.G. Hatalkar, Preface by Tarkteerth Laxmanshastri Joshi, (6th March, 1978)
26) Ghatage, Dr. A. M.: **A Survey of Marathi Dialects : KUDALI**, (Deccan College, Poona-6), The State Board for Literature and Culture, Bombay. (1965), * Preface - Tarkteerth Laxmanshastri Joshi, Page - 1 and 2

२७) मराठे, रा. वि.:**इंग्रजी-मराठी स्थापत्य- शिल्पकोश,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. (१९६५) - 'निवेदने'- पृ.-१ (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी)

२८) - तत्रैव -

२९) दिवेकर, गुरुनाथ: **कन्नड साहित्य परिचय,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (१९७१), 'निवेदने' - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पृ. १

३०) परांजपे, प्राचार्य गो. रा.: **वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञाकोश,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, (१९६९), प्रस्तावना - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पृ. ३, ४

३१) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री: **नव्या विचारयुगाचे तत्त्वज्ञान (पूर्वार्ध/उत्तरार्ध),** किर्लोस्कर (नोव्हेंबर, डिसेंबर १९३७), (अनुक्रमे पृ. ३५४ ते ३५८ आणि पृ. ३४३ ते ३४७)

३२) - तत्रैव -

३३) नाईक, ना. अ.: **विश्वमानव श्री मानवेंद्रनाथ रॉय**, व्ही. बी. कर्णिक स्मारक संस्था, ए-६८, आदर्शनगर, वरळी, मुंबई-४०००२५, वर्ष - १९९३, पृ. २०५ मधून उद्धृत

३४) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री: **महात्मा गांधी**, सत्यकथा, जानेवारी १९४९, पृ. ५७

३५) साठे, रवींद्र माधव: **इथे फक्त भारतीय संस्कृतीच!**, दैनिक लोकसत्ता, शुक्रवार, दि. १ एप्रिल २०२२, विचार, पृ. -६

बिस्मिल्ला ते बोम्मई (संपादकीय): दै. लोकसत्ता, शुक्रवार, १ एप्रिल २०२२, पृ.७

३६) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री: **महात्मा जोतीराव गोविंदराव फुले**, मराठी विश्वकोश, खंड - १०, पृ. ९७०

37) Joshi, Laxmanshastri: **Dharmakosa,** (Vol - 2, Part I), Prajna Pathashala Mandala, Wai, 1950, Preface, Page - 6.

○○○

प्रस्तावना संग्रह

(अ)

संपादित साहित्य प्रस्तावना

(१)

राजवाडे लेखसंग्रह

प्रस्तावना

जन्म व बाल्यावस्था

श्री. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचा जन्म शके १७८५ (सन १८६३) आषाढ शुद्ध ८ ला कोकणात वरसई येथे झाला. त्यांचे बालपण व प्राथमिक शिक्षण पुणे जिल्ह्यातील वडगाव येथे झाले. त्यांचे पितामह वडगावजवळील लोहगडचे किल्लेदार होते. त्यांचे वडील बालपणीच वारले. शिक्षण प्रथम चुलत्याजवळ झाले. भाषा व गणित या विषयांत गती उत्तम होती; परंतु धांगडधिंगा, मस्ती, मारामारी इत्यादी हूडपणा करण्यात व विटीदांडू, पोहणे, पळणे, आट्यापाट्या, खो-खो इत्यादी खेळांत लहानपण गेले. महाविद्यालयीन शिक्षण संपेपर्यंत कसरतीचा नाद खूप राहिला. त्यामुळे शरीर बळकट व काटक बनले.

मध्यम व उच्च शिक्षण

माध्यमिक व बहुतेक उच्च शिक्षण पुणे येथे झाले. त्यांनी आपले विद्यार्थिदशेतील शिक्षणविषयक अनुभव ‘कनिष्ठ, मध्यम व उच्च शालांतील अनुभव’ या विस्तृत (छापील ५० पृष्ठांच्या) लेखांत नमूद केले आहेत. त्यांचा आत्मचरित्राचे हे एक उत्तम प्रकरण आहे. हा लेख उत्कृष्ट साहित्याचा एक नमुना म्हणून मराठीत कायम राहीलच; पण त्याशिवाय त्यात त्या वेळच्या भारतीय शैक्षणिक संस्थांचेही दर्शन घडते आणि इंग्लिशांनी निर्माण केलेल्या शिक्षणपद्धतीच्या गुणावगुणांची गंभीर मीमांसाही वाचावयास मिळते. राजवाडे यांची नैसर्गिक बुद्धिमत्ता विशाल होती. त्या बुद्धिमत्तेचा संपूर्ण उपयोग होऊन बौद्धिक प्रगती व्हावी अशा प्रकारचे सकस शिक्षण देण्याची योग्यता असलेल्या शिक्षकांचा आजसारखाच दुष्काळ त्या वेळच्या मध्यम व उच्च शिक्षणसंस्थांमध्येही होता. म्हणून राजवाडे या संबंधी म्हणतात की, ‘पंतोजी (शिक्षक) आडमुठे, पोटभरू, इकडची पाटी तिकडे नेऊन टाकणारे

होते', 'जर चांगला शिक्षक (हायस्कूलमध्ये) मिळता तर ३ वर्षांत बी. ए. इतकी तयारी झाली असती.' मध्यम शिक्षण देणाऱ्या इंग्लिश शाळांबद्दल ते आपल्या लेखांत असे सांगतात की, त्यांना एकंदर पुणे येथील तीन इंग्लिश शाळांमध्ये क्रमाने शिकण्याचा योग आला. प्रथम सन १८७६ मध्ये बाबा गोखले यांच्या शाळेत ते दाखल झाले. शाळेचे ठिकाण गलिच्छ, दुर्गंधाचे माहेरघर, पडक्या भिंती, जवळच उघडी गटारे, आणि पाट्यांचे पायखाने. शिक्षक चुकार, एका तासात ५-१० मिनिटेच वर्गशिक्षण देत. नंतर ते वासुदेव बळवंत फडके (बंडवाले) यांनी स्थापन केलेल्या हायस्कूलमध्ये प्रविष्ट झाले. या संस्थापकाने सद्बुद्धीने शाळा काढली होती; परंतु तेथेही नालायक शिक्षक पुष्कळ. नंतर ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या हायस्कूलमध्ये प्रवेश मिळविला. तेथेही अनेक शिक्षक व्यसनी, दारूडे व अनाचारी दिसले. सर्वत्र आचारहीन व देशभक्तीचा लेशही नसलेलेच शिक्षक भरलेले होते. त्यास मोठा अपवाद म्हणजे कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी स्थापलेले न्यू इंग्लिश स्कूल होय. या संबंधी राजवाडे लिहितात की, ते स्थापताना चिपळूणकरांनी अशी प्रतिज्ञा केली होती की, आपल्या शिक्षणसंस्थेला गोऱ्या इंग्लिश साहेबाचा पाय लागू द्यावयाचा नाही; परंतु चिपळूणकर अल्पायुषी ठरले. त्यांच्याही संस्थेत संस्थाचालकांनी मागाहून इंग्लिश गोऱ्या अधिकाऱ्यांचे सुस्वागत करण्याची प्रथा सुरू केली.

सन १८८२ च्या जानेवारीत राजवाडे मुंबई विद्यापीठाची प्रवेश परीक्षा (मॅट्रिक) उत्तीर्ण झाले. मुंबईच्या सुप्रसिद्ध एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये पहिली सहामाही काढली. नंतर पैसे नसल्यामुळे कॉलेज सोडावे लागून पोट भरण्याकरिता खाजगी माध्यमिक शिक्षण देण्याचा वर्ग काढला. पुढे १८८४ साली वडील बंधू प्रा. वैजनाथ काशीनाथ राजवाडे यांस पुणे येथील डेक्कन कॉलेजात फेलोशिप मिळाली. त्यामुळे वडील बंधूंच्या मदतीने डेक्कन कॉलेजात फेलोशिप मिळाली. त्यामुळे वडील बंधूंच्या मदतीने डेक्कन कॉलेजात विश्वनाथपंत राजवाडे यांना शिक्षणास अवसर मिळाला. या कॉलेजात त्या वेळी भारतीय कीर्तीचे विद्वान न्यायकोशकर्ते म. म. भीमाचार्य झळकीकर, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर इत्यादी प्राध्यापक होते. या कॉलेजमध्ये राजवाडे यांनी ६ वर्षे काढली. १८९० साली जानेवारीत ते बी. ए. उत्तीर्ण झाले. क्रमाने प्रत्येक वर्षी ते परीक्षेस बसलेच नाहीत. लहर येईल तेव्हा एका वर्षाचा अध्ययनक्रम २ महिन्यांत तयार करून परीक्षेस बसायचे व उत्तीर्ण व्हावयाचे; मधली अनेक वर्षे गाळली. कारण कॉलेजमधील परीक्षेस नेमलेल्या अनेक पुस्तकांच्या अध्ययनात त्यांना कालक्षेप करणे आवडले नाही. तर्कसंग्रह, लॉर्ड बेकन इत्यादी पुस्तके जुन्या पुराण्या बाधित झालेल्या सिद्धांतांनी भरलेली होती. अतएव त्यांचे अध्ययन व्यर्थ होय, असे त्यांना वाटे. म्हणून त्यांनी या कालखंडात पाश्चात्त्य ग्रंथकारांच्या इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, साहित्य या दृष्टीने महत्त्वाच्या मोठमोठ्या ग्रंथांचे परिशीलन करण्यात व समवयस्क विद्यार्थ्यांबरोबर गप्पा छाटण्यात बराच वेळ घालविला आणि त्याबरोबरच

शारीरिक व्यायाम करून शरीरसंपत्ती कमावली. कॉलेजच्या ७ वर्षांत ते कधीही आजारी पडले नाहीत. कॉलेज-शिक्षणातील परीक्षांची पद्धती त्यांना कंटाळवाणी व खुळचटपणाची वाटली. कॉलेजमध्ये दाखल झाल्यापासूनच त्यांनी सरकारी नोकरी करावयाची नाही असा निश्चय केला होता, त्यामुळे परीक्षा उत्तीर्ण होण्याला त्यांनी बिलकूल महत्त्व दले नाही व त्यामुळे तेथील शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंधही निर्माण झाले नाहीत. या संबंधी ते म्हणतात, ''शिक्षकांशी व परीक्षार्थ्यांशी माझा फारसा स्नेह झाला नाही याचे मुख्य कारण हेतूंची भिन्नता हे होय. शिक्षकांचा हेतू मुले परीक्षेकरिता तयार करण्याचा; मुलांचा हेतु परीक्षा देऊन नोकरी मिळविण्याचा; आणि माझा हेतू केवळ विद्यार्जन करून पूर्णपणे स्वतंत्र धंदा करण्याचा. केवळ विद्यार्जन करण्याचा हेतू बाळगणारा मी नोकर तयार करण्याच्या गिरणीत जाऊन पडलो... सरकारी नोकरी म्हणून करावयाची नाही असा दृढतर ग्रह माझ्या मनाचा झाला... वाजवीच आहे की या भाडोत्री शिक्षकांच्या गुलामगिरीच्या नोकऱ्यांचा व कंटाळवाण्या परीक्षांच्या पासून मी पराङ्मुख झालो व पुस्तकालयांतील ग्रंथाकडे एकदिलाने वळलो. १८८४ पासून १८९० पर्यंतच्या सात वर्षांत व पूर्वीच्या दोन वर्षांत युरोपियन इतिहास, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, राजनीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र व मानसशास्त्र यांवरील प्राचीन व अर्वाचीन, अस्सल व भाषांतरित बरेच ग्रंथ मी मननपूर्वक वाचले. शिवाय वनस्पतिशास्त्र व फारशी भाषा कामापुरती मी शिकलो... प्लेटोचे सुराज्य (रिपब्लिक) मी याच वेळी सबंध मराठीत उतरले... या (सरकारी) शिक्षणपद्धतीचा मुख्य हेतू जो नोकरीकरिता परीक्षा देणे तो मी बहुतेक अजीबात झुगारून दिला. त्यामुळे या शिक्षणपद्धतीने जे एकप्रकारे मानसिक दौर्बल्य येते व कर्तृत्वशक्तीचा ऱ्हास होतो तो माझ्या ठायी झाला नाही. परंतु एका दुष्ट खोडीने मात्र मला अतोनात ग्राशले. ती खोड म्हणजे दुसरी तिसरी काही नाही. इंग्रजी बोलण्याची व इंग्रजीत विचार करण्याची... सतत पंधरा वर्षे, बारा आणि बारा चोवीस तास सर्व कामे मी इंग्रजीत करू लागलो... परंतु दोघा-तिघा गृहस्थांनी मला या विपत्तीतून वाचवले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या टीकात्मक निबंधांनी इंग्रजीच्या या खग्रासापासून माझा बचाव केला. काव्येतिहाससंग्रहकारांच्या ऐतिहासिक पत्रांनी स्वदेश म्हणून काही आहे हे मला कळले व परशुरामतात्या गोडबोले यांनी छापलेल्या काव्यांनी महाराष्ट्रसारस्वताचा मला अभमान वाटू लागला.'' यावरून राजवाडे यांच्या ध्येयवादी जीवनाची नांदी महाविद्यालयीन शिक्षणाच्या समयीच सुरू झाल्याचे निदर्शनास येते.

भारतीय पुनरुज्जीवनाची प्रेरणा

महाविद्यालयीन शिक्षण संपल्याबरोबर त्यांचा विवाह झाला; परंतु पत्नी थोड्याच अवधीत कालवश झाल्यानंतर राजवाडे यांच्या ध्येयवादी जीवनाला म्हणजे दीर्घ अशा ज्ञानमय तपाला एकाग्रता लाभली. सन १८९५ मध्ये त्यांनी 'भाषांतर' हे मराठी मासिक

सुरू केले. त्यात प्लेटो, ॲरिस्टॉटल, गिबन इत्यादी पाश्चात्त्य ग्रंथकार व शंकराचार्य इत्यादी भारतीय ग्रंथकार यांच्या ग्रंथांची भाषांतरे क्रमाने प्रसिद्ध करणे हा त्यांचा उद्देश होता. त्याकरिता अनेक संस्कृतच्या व इंग्लिशच्या विद्वान पदवीधरांचे साहाय्य त्यांना मिळू लागले. ते 'भाषांतर' मासिक दोन वर्षे पुरी होण्याच्या आत बंद पडले; परंतु त्या मासिकाच्या प्रथम अंकातील प्रास्ताविक लेखावरून राजवाडे यांचा जीवनोद्देश व्यक्त होतो. ज्या ज्ञानाच्या प्रकाशामुळे युरोप हा अंधकारमय मध्ययुगातून जागा झाला ते ज्ञान भारतालाही प्राप्त होणे जरूर आहे. त्यायोगेच येथील बौद्धिक व मानसिक अवनती संपून पुनरुज्जीवन (Renaissance) सुरू होईल. नव्या ज्ञानाचा प्रकाश येथील लोकांना लोकभाषेतून मिळावा म्हणून त्यांनी 'भाषांतर' मासिक सुरू केले. 'भाषांतर' मासिक लवकर बंद पडले. परंतु त्यामुळे राजवाडे यांच्या पुनरुज्जीवनाच्या किंवा नवजीवनाच्या प्रयत्नांत खंड पडला नाही. त्यांनी त्याकरिता इतिहासविद्येचा आश्रय केला. चौदाव्या शतकातील युरोपच्या पुनरुज्जीवनापेक्षा एकोणसाव्या शतकातील भारतीय पुनरुज्जीवनाची पार्श्वभूमी अत्यंत निराळी दिसल्यामुळे राजवाडे यांनी त्याला ऐतिहासिक जाणिवेचे अधिष्ठान पाहिजे असे निश्चित केले. कारण हा देश परकीय राज्यसत्तेने जिंकलेला असल्यामुळे त्याच्या पराभूत मनोवृत्तीला अस्मितेची व आत्मस्मृतीची आवश्यकता होती. म्हणून इतिहासविद्येच्या स्थापनेची गरज निर्माण झाली; परंतु या अस्मितेच्या जाणिवेबरोबरच बुद्धिवादी अशा आधुनिक वैज्ञानिक संस्कृतीचेही बल प्राप्त करून घेणे आवश्यक झाले. राजवाडे यांनी आपल्या इतिहासमीमांसेत भारत पाश्चात्त्यांनी कसा जिंकला व भारत त्यांच्यापुढे का पराभूत झाला या संबंधी कार्यकारणभाव सांगताना पाश्चात्त्यांची संस्कृती ही भारतीय हिंदुंपेक्षा अधिक प्रगत अतएव अधिक समर्थ होती हे सांगितले आहे. याचा अर्थ असा, की भारतीयांना स्वाभमान व वैज्ञानिक संस्कृती या दोन्ही गोष्टींचा लाभ झाल्याशिवाय भारतात नवजीवन येणार नाही, असा सिद्धांत राजवाडे यांनी सूचित केला. या ऐतिहासिक चिंतनाने मराठी भाषेत नवजीवनाचे बीजच रोवले.

मराठ्यांचा इतिहास, मराठी भाषेचे व संस्कृतचे ऐतिहासिक व्याकरण, जुन्या मराठी वाङ्मयाचा इतिहास व भारतीय वा हिंदू समाजाच्या इतिहासाची समाजशास्त्रीय मीमांसा या संबंधात इतिहाससंशोधक राजवाडे यांचे संशोधनमय लेखन व त्यांनी संपादित केलेले ग्रंथ यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मराठ्यांच्या इतिहासाची साधने त्यांनी गोळा करून प्रसिद्ध केली किंवा मराठी वाङ्मयाची मध्ययुगीन ग्रंथसंपत्ती व अनेक ग्रंथकार परिश्रमपूर्वक शोधून प्रकाशात आणले एवढीच त्यांची इतिहासक्षेत्रातली कामगिरी नाही; तर त्यांनी इतिहासाची आधुनिक तत्त्वदर्शने, समाजशास्त्रीय विविध विचारप्रणाल्या आणि भाषाशास्त्र यांचेही चिरकाल मनन करून त्या संबंधी स्वत:चे सिद्धांत रचले व भारतीय समाजेतिहास व भाषेतिहास यांना ते सिद्धांत लागू करून काही महत्त्वाच्या निर्णयांप्रत ते येऊन पोचले. त्याकरिता त्यांनी ग्रीस, रोम, मध्ययुगीन व आधुनिक युरोप याचे जे सुप्रसिद्ध इतिहास व जागतिक इतिहास प्रथितयश ग्रंथकारांनी लिहले त्यांचाही व्यापक व्यासंग केला होता.

लेखनकार्याचा तपशील

राजवाडे यांच्या लेखनकार्याचा तपशील पुढील प्रकारचा आहे. राजवाडे यांच्या सन १८९० ते १९२३ पर्यंतच्या प्रौढावस्थेतील कालात भारतीय व विशेषत: महाराष्ट्रीय आधुनिक पंडितांच्या लेखनात व चर्चेत जे ऐतिहासिक मुद्दे उपस्थित होत होते व त्या संबंधी जी लेखन-भाषणात्मक चळवळ चालू होती त्या मुद्यांना व वैचारिक चळवळीला धरून राजवाडे आपले संशोधन व मनन करीत व संशोधनाचे व मननाचे फलित लेखन रूपाने वेळोवेळी प्रसिद्ध करीत. १) कॉलेजमध्ये शिकत असतानाच प्रथम त्यांनी प्लेटोच्या 'गणराज्या'चे ('Republic') मराठी भाषांतर केले; ते अंशत: त्यांनीच सुरू केलेल्या 'भाषांतर' मासिकात १८९५ मध्ये प्रसिद्ध झाले. परंतु ते मासिक दीड वर्षांतच बंद झाल्यामुळे 'गणराज्य' ('Republic') संपूर्ण प्रसिद्ध होऊ शकले नाही. २) सन १८९८-१९२३ पर्यंतच्या अवधीत त्यांनी आपल्या जीवितोद्देशांतील महत्त्वाचे कार्य म्हणून 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या संग्रहाचे २२ खंड (सुमारे ११ सहस्र पृष्ठे) प्रसिद्ध केली. या बावीस खंडांपैकी १-६, ८ या खंडांना आणि १० व ११ या खंडांना त्यांनी ऐतिहासिक विवेचनात्मक निबंध या स्वरूपाच्या प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्यातील १, ३, ४, ६, ८ या महत्त्वाच्या असून पहिल्या खंडाची प्रस्तावना ही सर्वात मोठी म्हणजे १२३ पृष्ठांची आहे; त्यामध्ये मराठ्यांच्या इतिहासाचे काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करून उलगडून दाखवले आहेत, त्याचप्रमाणे स्वत:चा इतिहासदर्शनाचा मौलिक दृष्टिकोनही मांडला आहे. या प्रथम खंडाच्या प्रस्तावनेने राजवाडे यांची महाराष्ट्रीय सुशिक्षितांत खूप प्रशंसा झाली व त्यांनी थोर इतिहासचिंतक म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाली. ही त्यांची प्रतिष्ठा शेवटपर्यंत केवळ टिकली एवढेच नाही, तर लेखनकार्याच्या वाढीबरोबर ती वाढत गेली. तिचे अनेक तेजस्वी पैलू प्रकट होत गेले. ३) मराठीमध्ये त्यांच्या समयी जी महत्त्वाची वैचारिक विषयाला स्थान देणारी मासिके वा नियकालिके होती, त्यामध्ये म्हणजे 'विश्ववृत्त', 'ग्रंथमाला ', 'सरस्वती मंदिर', 'प्राची प्रभा', 'इतिहास व ऐतिहासिक', 'रामदास व रामदासी', 'केसरी', 'भारतेतिहास संशोधक मंडळा'चे वार्षिक 'संशोधनवृत्त' इत्यादिकांमध्ये मधून मधून लेख प्रसिद्ध करीत. त्यातून त्यांचे अनेक मोठे निबंधही आले आहेत. ४) 'महाराष्ट्राचा वसाहतकाल' हा ग्रंथ 'इतिहास व ऐतिहासिक' मासिकात खंडश: प्रसिद्ध झाला. ५) 'तिङन्त विचार' हा मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणावरील निबंध 'प्राची प्रभा' या मासिकात प्रसिद्ध झाला. त्यांचा 'सुबन्त विचार' हा निबंध भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे या संस्थेने; 'संस्कृत भाषेचा उलगडा' हा निबंध स्वतंत्र पुस्तक म्हणून सत्कार्योत्तेजक सभा, धुळे या संस्थेने व 'मराठी धातुकोश' हा मराठी ३० सहस्र धातुंच्या निरुक्तावरील ग्रंथ धुळे येथील राजवाडे संशोधन मंदिराने प्रसिद्ध केला आहे. सन १९०३ साली ग्रंथमाला मासिकाच्या संपादकांनी राजवाडे यांचा त्या समयापर्यंत प्रसिद्ध झालेल्या लेखांचा 'संकीर्ण लेखसंग्रह' प्रकाशित केला. राजवाडे

यांच्या निधनानंतर त्यांनी ग्रंथांच्या प्रस्तावना म्हणून किंवा स्वतंत्र लेख म्हणून जे काही लेखनकार्य केले त्याचा संपूर्ण संग्रह तीन खंडात मिळून चित्रशाळा, पुणे या संस्थेने प्रसिद्ध करून प्रशंसनीय कामगिरी केली आहे. या तीन भागांच्या संग्रहाशिवाय आणि वर निर्दिष्ट केलेल्या लेखनकार्याव्यतिरिक्त अत्यंत चिरस्थायी महत्त्वाचे राजवाडे यांचे निबंध म्हणजे 'राधामाधवविलास चंपू' व 'महिकावतीची बखर' यांच्या प्रस्तावना होत. या प्रस्तावना म्हणजे भारताच्या व महाराष्ट्राच्या इतिहासाचे गंभीर तत्त्वचिंतनच होय; त्यांचे वैचारिक मूल्य मोठे आहे.

मराठ्यांच्या इतिहाससाधनांची जुळवाजुळव करण्याकरिता राजवाडे यांनी आपले सर्व आयुष्य वाहले. राजवाडे यांचे असे मत होते की, भारताचा व महाराष्ट्राचा शास्त्रशुद्ध इतिहास उपलब्ध होण्याकरिता इंग्लिश इतिहासकारांवर अवलंबून राहणे धोक्याचे आहे, त्यांनी लिहलेला इतिहास हा बहुश: जेत्यांच्या दृष्टिकोनातून लिहलेला जितांचा इतिहास असण्याचा संभवच फार; आपला इतिहास शास्त्रशुद्ध, नि:पक्षपाती व पूर्वग्रहशून्य मनाने लिहिला जावा व तो तथ्य (Fact) निष्ठ प्रमाणांवर आधारला जावा; अशा इतिहासानेच राष्ट्राला आत्मस्मृति लाभेल; म्हणून ऐतिहासिक प्रमाणांची जुळणी करणे हे इतिहासकाराचे प्रथम कर्तव्य होय; त्याकरिता अनेक इतिहासकारांनी जन्मभर तप:साधनाच करणे आवश्यक आहे अशी त्यांची श्रद्धा होती.

राजवाडे यांची ज्ञानमय तपश्चर्या

अशी श्रद्धा त्यांच्या ठिकाणी तारुण्यात, विद्यार्थिदशेतच उत्पन्न झाली. त्यानंतर त्यांनी आपले सर्व जीवित इतिहासाच्या ज्ञानमय तपात व्यतीत केले. इ. स. १८९५-१९२६ पर्यंत, अंतकालापर्यंत, लोकनिरीक्षणार्थ व इतिहाससाधनांचा शोध करण्याकरिता भारताची व विशेषत: मराठी भाषिक प्रदेशाची निरंतर यात्रा करीत ते राहले. ही यात्रा त्यांनी अनिकेत बनून परंतु स्थिरमतीने केली. गृहस्थाश्रमाचा बंध म्हणजे पत्नी, २७ वर्षे वय होण्याच्या आत त्यांच्या पत्नी निधन पावल्या. नंतर ते परिव्राजक म्हणजे चिरयात्रिक बनले; इतिहासात व पुराणात वर्णलेली स्थले पाहत हिंडले. त्यातील काही इतिहासदृष्ट्या महत्त्वपूर्ण वाटणाऱ्या स्थलांची वारंवार दर्शने घेतली. प्रांत, ग्रामे, नगरे, सरोवरे, नद्या, पर्वत, गड व गढ्या पाहिल्या. हे अवलोकन करताना इतिहासवर्णित घटनांची त्या स्थलकालाशी तुलना करीत

• राजवाडे यांनी कॉलेजमध्ये इतिहास पठण करतांना काय मनांत आले ते लिहिले आहे "हिंदुस्थानच्या विशेषतः महाराष्ट्राच्या इतिहासावर इंग्लिश लेखकांनी जी पुस्तके लिहिली आहेत त्यांपैकी पुष्कळ या वेळी पाहण्यांत आली आणि ह्या देशाचा इतिहास लिहिण्यास हे लोक किती नालायक आहेत हे युरोपियन इतिहासकारांशी तुलना करता माझ्या पूर्णपणे ध्यानांत आले."

इतिहासाचे मनन करीत. त्या स्थलांतील किंवा प्रदेशांतील जमाती, त्यांच्या चालीरीती, वाङ्‌मय, भाषोपभाषा, संज्ञा व उच्चार यांचा निरुक्तशास्त्र, वंशशास्त्र व समाजसंस्थाशास्त्र द्वारे छडा लावीत. प्रवासातले काही दिवस, आठवडे किंवा महिने एखाद्या मुक्कामात राहून वाचन, लेखन व मनन याकरिता काढीत.

अशा मुक्कामांत ऐतिहासिक कागदपत्रे किंवा हस्तलिखित पोथ्यापुस्तके यांचा संग्रह कोणाकडे आहे काय त्याची चवकशी करून तो मिळविण्याची खटपट करीत व मिळाल्यावर महत्त्वाचे लिखाण हाती आले की त्यावर बुभुक्षिताप्रमाणे तुटून पडत. मालकाची खुशी असली व त्यामुळे तो संग्रह अन्यत्र सोयीच्या स्थळी अध्ययनार्थ व संग्रहार्थ नेण्यास मिळाला तर तिकडे न्यावयाचा. जर तितकी खुशी नसली तर मालकाच्या मर्जीपमाणे त्याच गावी मुक्काम ठोकून वाचन, तर्जुमा इत्यादी कामे करावयाची. राजवाडे यांची मन:प्रकृति दुर्वासमुनीप्रमाणे होती हे सर्वत्र प्रसिद्ध आहे; परंतु इतिहाससाधनांचा लाभ ज्याच्याकडून होण्याची शक्यता असे त्याच्याशी त्यांचे वर्तन पुष्कळदा विनयशील किंवा निदान संयमी असावयाचे. नवी कागदपत्रे किंवा वैशिष्ट्यपूर्ण असे अन्य प्रकारचे लिखाण हाती पडल्याबरोबर त्याच्या वाचनात व प्रतिलिपी करण्यात देहभान विसरून त्यांचे अहोरात्र काम चालावयाचे. मितनिद्रा व मित आहारविहार असावयाचे. दुपारी एकदाच २ किंवा ३ वाजता स्वहस्तानेच बहुश: पाकसिद्धी करून दूधभातासारखा सात्त्विक आहार घेत. रात्री फलाहार किंवा दूध घेत. स्वच्छतेची फार काळजी घेत. एकच लहानसे व्यसन होते. ते म्हणजे विडी. कित्येकदा चार-पाच विड्याही एकदम शिलगावून पीत बसत व धुराच्या वलयाकडे मंद नजर टाकीत ऐतिहासिक प्रश्नांच्या चिंतनात नमग्न होत.

हस्तलिखितांची दप्तरे तपासताना खूप कष्टही पडत. स्वच्छ व व्यवस्थित रीतीने ठेवलेली दप्तरे त्यांना फार थोड्या ठिकाणी आढळली. बऱ्याच ठिकाणी मालक दप्तरे दाखविण्यास नाराज असत. त्यांना राजी करण्याकरिता खटपट करावी लागे. लागेबांधे किंवा वजनदार माणसांचे दडपण यांचा उपयोग करणे भाग पडे. त्यात पुन: दप्तरे पाहावयास मिळाली तरी तर्जुमा करण्यास किंवा योग्य ठिकाणी संग्रह करण्याकरिता नेण्यास पुष्कळच आर्जवे करावी लागत. प्रथम पुष्कळदा दप्तरे सुरक्षित नसावयाची. अडगळीच्या माडीत जाळया-जळमटांनी भरलेल्या जागेत अस्ताव्यस्त रीतीने टाकलेल्या राशीत पडलेली असावयाची. त्यावर पाऊस गळून कित्येक दप्तरांचा कागद एकमेकांस चिकटून कागदपत्रांच्या विटाच बनलेल्या असावयाच्या. अक्षरे व ओळी ओघळ जाऊन अस्पष्ट झालेल्या स्थितीत असायची किंवा उंदीर व बागुर्डे यांनी खराबी केलेली किंवा कसरींनी अर्धवट नष्ट झालेली कागदपत्रे असावयाची. अशा स्थितीत कसलाही निर्वेद उत्पन्न होऊ न देता शांतपणे बिनतक्रार त्या कागदपत्रांची नीट जुळणी करून व साफसफाई करून त्यांचे अध्ययन करून विल्हेवाट लावत. असे हे तप ३५-४० वर्षे राजवाडे यांनी केले आणि मराठी भाषेत इतिहासाची साधने

सिद्ध केली. असे अविश्रांत श्रम करीत असता अडचणी व संकटेही आली; परंतु त्यांना तोंड देऊन अधिक उत्साहाने कामे केली.

उदाहरण म्हणून प्रथम खंडाच्या संपादनाची हकीकत ध्यानात ठेवण्यासारखी आहे. त्यांच्या इतिहाससाधनांच्या संशोधनास खरा प्रारंभ वाई प्रांतीच झाला. वाई येथील श्री. एरंडे यांच्या वाड्यात पानिपतच्या संग्रामाच्या काळातील कागदपत्रांचा कातडी पेटीत सुरक्षित ठेवलेला व अव्वल दर्जाच्या प्रमाणांनी भरलेला असा संग्रह त्यांच्या हाती लागला. इतिहाससाधनांचा प्रथम खंड त्यावरूनच त्यांनी तयार केला. तो खंड पुणे येथे फडके वाड्यातील विठ्ठल छापखान्यात छापला. परंतु त्या छापखान्यास आग लागून तो जळाला व त्याबरोबर प्रथम खंडाची पुस्तकेही भस्मसात् झाली. पुन: तोच खंड त्यांनी स्वहस्ताने लिहून काढला. त्याकरिता खूप काम करून दप्तरे पुन: तपासावी लागली. तेव्हा एक मित्र त्यांना म्हणाले की, ‘तुम्ही इतके काम करून जीवाला फार ताप करून घेता.’ त्यांनी त्यावर उत्तर दले की, ‘माणूस काम करून मरत नाही, आळसाने मरतो.’ प्रथम खंडाच्या प्रस्तावनेत त्यांनी पानिपतच्या संग्रामात झालेल्या मराठ्यांच्या पराभवाची मीमांसा केली. नंतर त्यांनी वाईच्या जवळ मेणवली येथील नाना फडणवीसांचे दप्तर रात्रंदिवस काम करून तपासले. नंतर वाईजवळील ओझर्डे येथील मोगलांचे देशमुख सूर्याजी पसाळ यांच्या दप्तराचे अध्ययन केले. त्या संबंधात लिहिताना त्यांनी सूर्याजी पिसाळावर तो मोगलांच्या बाजूचा व मराठी लोकांचा गनीम (शत्रू) म्हणून उल्लेख करणारा म्हणून टीकेची झोड उठविली. त्यामुळे ते ओझर्डे-दप्तर राजवाडे यांना नाराज होऊन मालकांनी दले नाही.

राजवाडे यांनी कागपत्रांच्या रूपाने जेवढी इतिहाससाधने प्रसिद्ध केली त्यापेक्षा अधिक मोठा अप्रकाशित असा संग्रह त्यांच्यापाशी राहिला. त्यातील काही अंश त्यांनीच पुणे येथे सन १९१० मध्ये स्वत: स्थापन केलेल्या ‘भारत इतिहास संशोधक मंडळ’ या संस्थेत ठेवला. नंतरच्या संग्रहाचा अंश त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या निधनानंतर स्थापन झालेल्या धुळे येथील ‘राजवाडे संशोधक मंडळ’ या संस्थेत ठेवलेला आहे.

मराठी व संस्कृत भाषा, त्यांचे व्याकरण व हिंदू समाज या संबंधातील त्यांचे संशोधन असेच महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रात व पंजाबात प्रसिद्ध असलेल्या महानुभाव संप्रदायाचे मराठी वाङ्मय हे मराठीतील सर्वात प्राचीन वाङ्मय होय. हे वाङ्मय अनेक गुप्त सांकेतिक लिपींमध्ये लिहले आहे. त्या लिपींचा उलगडा राजवाडे यांनी प्रथम स्वबुद्धीने केला व त्या वाङ्मयाचे द्वार खुले केले. ज्ञानेश्वरीची एकनाथ पूर्वीची प्रत राजवाडे यांनीच प्रथम हुडकून काढून व तिचे व्याकरण काढले व हेच ज्ञानेश्वरकालीन मराठीचे व्याकरण होय हे सिद्ध केले. त्यामुळे त्यांच्या संशोधक प्रतिभेचा प्रकाश अधिक उज्ज्वल दिसू लागला. मुकुंदराज, मुक्तेश्वर, दासोपंत, रघुनाथ पंडित, जनीजनार्दन, शिवदिन केसरी इत्यादी मध्ययुगीन साहित्यकारांचे व संतांचे वाङ्मय, वंशावळी व काळ यांच्या संबंधी महत्त्वाचे शोध राजवाडे

यांनीच प्रथम लावले. तात्पर्य, मध्ययुगीन मराठी वाङ्मय व मराठी राज्य यांच्या संबंधाच्या संशोधनकार्यात राजवाडे यांचे अद्वितीय महत्त्व मान्य करावे लागते.

राजवाडे यांची इतिहासकल्पना

राजवाडे यांची इतिहासाची कल्पना विज्ञाननिष्ठ व जीवनव्यापी आहे. मानवाच्या सार्वदेशिक व सार्वकालिक स्थित्यंतरांचा समावेश करणाऱ्या वैयक्तिक व सामाजिक जीवनाचा संपूर्ण अर्थ त्यांच्या इतिहासकल्पनेत समाविष्ट केलेला आहे. त्यांनी आपली इतिहासाची ही व्यापक कल्पना पाश्चात्त्य इतिहासज्ञ पंडितांच्या सर्व विवेचनांचे मंथन करून निर्माण केली आहे. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' खंड ६ च्या प्रस्तावनेत त्यांनी इतिहासविषयक महत्त्वाच्या पाश्चात्त्य कल्पनांची साधकबाधक चर्चा केली आहे. या चर्चेचे सार त्यांनी 'विद्यासेवक' मासिकातील (वर्ष १ अंक ७) 'भारतीय इतिहासाची मूलतत्त्वे' या लेखात इतिहासाच्या लक्षणात सांगितले आहे, असे म्हणता येईल. ते लक्षण असे : ''इतिहास शब्दाचे दोन अर्थ आहेत. १) गतकाली होऊन गेलेली जी कृत्ये त्यांना इतिहास हे जसे नाव लावतात तसेच २) गतकाली होऊन गेलेल्या कृत्यांच्या परंपरित वर्णनालाही इतिहास हा शब्द लावतात. कृत्ये व त्यांची वर्णने या दोहोंचा वाचक एकच शब्द आहे. पैकी कृत्यपरंपरावाचक जो इतिहास शब्द तो येथे इष्ट समजावा. इतिहासाची मूलतत्त्वे म्हणजे कृत्यपरंपरेची मूल कारणे. मूल कारणे दोन प्रकारची, बाह्य व आंतर. मनुष्याच्या पिंडावर बाह्य सृष्टीचे आघात होतात. आघातांचे सातत्य होऊन मनोरचना बनते. सृष्टी ही मनोरचनेचे ऊर्फ स्वभावाचे बाह्य कारण होते आणि कृत्यरूपाने फलद्रूप होणारा स्वभाव कृत्यांचे आंतर कारण ठरते.'

ही इतिहासाची व्याख्या वैज्ञानिक आहे, गूढवादास बाजूला सारणारी आहे. या इतिहासाच्या व्याख्येत परिस्थिती व मानव यांच्या द्वंद्वावर आधारलेली ऐतिहासिक प्रक्रिया आहे. यात दैवी संकेत किंवा दिव्य व वीर विभूतींचे कर्तृत्व किंवा भौगोलिक कारणे किंवा आर्थिक, राजकीय वा अन्य प्रकारची सामाजिक शक्ती किंवा विशिष्ट वंशाचे वा राष्ट्राचे जन्मसिद्ध सामर्थ्य किंवा इतिहासाची अबाधित गती किंवा युगप्रेरणा इत्यादी कोणते तरी एक कारण इतिहासाला प्रेरणा देऊन त्याची दिशा, उन्नती, अवनती व परिणती ठरविते असे सांगणाऱ्या विविध ऐतिहासिक उपपत्तींना राजवाडे यांनी कमी महत्त्व दले आहे. या व्याख्येत व्यक्त झालेल्या विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाला धरूनच प्रथमपासून इतिहाससंशोधनास राजवाडे प्रवृत्त झाले. राजवाडे यांच्यावर मुख्यत: प्लेटो, हेगेल व कॉंत (Comte) या तत्त्वज्ञांच्या विचारांची छाप पडली होती. त्यामध्ये त्यांनी कॉंतने मांडलेली मानवी समाजाच्या वैचारिक विकासाची क्रमिक सोपानपरंपरा मुख्यत: मान्य केली होती. धार्मिक (Religious) आध्यात्मिक (Metaphysical) व वैज्ञानिक (Scientific) या तीन श्रेणींत वैज्ञानिक

वाय १८२-७

अवस्था सर्वोच्च होय हे त्यांना मान्य झाले होते. उदाहरणार्थ, 'विकार-विचार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांती' या निबंधात त्यांनी धार्मिक कल्पना, धार्मिक ग्रंथ वा धार्मिक कला यांना भ्रमाधिष्ठित म्हणून निर्दिष्ट केले आहे; त्याचप्रमाणे सहाव्या खंडाच्या प्रस्तावनेत तत्त्वज्ञान हे स्वैर कल्पनांचा खेळ असल्यामुळे कालांतराने मानवी ज्ञानाची उत्कृष्ट वाढ होऊन विज्ञानच तत्त्वज्ञानाचा प्रांत आक्रमून टाकील व पारमार्थिक तत्त्वज्ञानाचा पदोपदी पराभव होईल असेही त्यांनी भविष्य वर्तवले आहे. त्यामुळे वैज्ञानिक किंवा भौतिकवादी (Positivist) इतिहासोपपत्तीच सर्वथा ग्राह्य म्हणून त्यांनी मान्य केली. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' खंड १ च्या प्रस्तावनेत त्यांनी 'ऐतिहासिक प्रसंग' म्हणजे काय याचे जे स्पष्टीकरण केले आहे ते या व्याख्येस धरून आहे. तेथे ते म्हणतात : ''मानवी इतिहास काल व स्थल यांनी बद्ध झालेला आहे. कोणत्याही प्रसंगाचे वर्णन द्यावयाचे म्हटले म्हणजे त्या प्रसंगाचा परिष्कार विशिष्ट कालावर व विशिष्ट स्थलावर पसरवून दाखविला पाहिजे. प्रसंगाचा परिष्कार कालाने व स्थलाने विशिष्ट कसा झाला आहे, हे दाखविताना त्या काली व स्थळी कोणत्या व्यक्ती प्रामुख्याने पुढे येतात, हेही इतिहासकाराला स्वाभाविकपणेच सांगावे लागते. सारांश, काल, स्थल व व्यक्ती या त्रयीची जी सांगड तिलाच प्रसंग व ऐतिहासिक प्रसंग ही संज्ञा देता येते.'' (राजवाडे लेखसंग्रह, पृ. ३०). येथे इतिहासाच्या मुळाशी समाज हा न धरता, व्यक्ती ही मूलभूत धरली आहे. म्हणजे इतिहास हा मानवव्यक्तींनी घडवलेला असतो, हा सिद्धांत गृहीत धरला आहे. व्यक्ती ही मूलभूत धरून समाज म्हणजे व्यक्तिसमुदाय असा अर्थ करतात व समाजेतिहासाचा अर्थ सांगातात : ''लहान व्यक्तींची चरित्रे व मोठ्या व्यक्तींची चरित्रे मिळून समाजाचा संपूर्ण इतिहास होतो. समाजात मोठ्या व्यक्ती केव्हाही थोड्या असल्यामुळे मोठ्या व्यक्तींच्या इतिहासाला लहान व्यक्तींच्या म्हणजे बहुजन समाजाच्या इतिहासाचा जोड द्यावा लागतो. केवळ मोठमोठ्या व्यक्तींच्याच चरित्राने समाजाचा इतिहास संपूर्ण होत नाही.'' (पृ. ३१)

इतिहासाची अशा प्रकारची भौतिकवादी व्याख्या स्वीकारल्यावर समाज म्हणजे व्यक्तिसमुदाय, असा अर्थ करावा लागतो. व्यक्ति ही मूलभूत घटक धरून इतिहासमीमांसेस प्रारंभ केला तरी त्या मूल घटकापाशी थांबून भागत नाही. त्या मीमांसेचा विस्तार करण्यास व्यक्तिसमुदायांचे भिन्न भिन्न प्रकार हेही ध्यानात धरावे लागतात. समजातील भिन्न भिन्न कर्मे व त्या कर्मांकरिता आवश्यक अशा भिन्न भिन्न प्रकारच्या मानवी संघटना समजावून घेतल्या तरच इतिहास म्हणजे काय याचा उलगडा होऊ शकतो. संस्था व संस्थेची कर्मे यांच्याशी इतिहासाचे मुख्य कर्तव्य आहे ही गोष्ट राजवाडे यांनी मान्य केली आहे. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' खंड ६ च्या प्रस्तावनेत संस्था म्हणजे शरीर होय अशी ते रूपकात्मक परिभाषा वापरून म्हणतात : ''वासना-यंत्रणा व साधना किंवा इच्छा-शरीर व कर्म अशी मानवसमाजाच्या चळवळीची त्रिविध परंपरा आहे. या त्रिविध परंपरेची हकीकत

देणे म्हणजेच इतिहास लिहिणे होय. कोणत्या वासनेकरिता संस्थायंत्राचे कोणते इंद्रिय निर्माण झाले, त्या इंद्रियाने इष्टकार्य कितपत होते व ते इंद्रिय सबंध यंत्राच्या अनुरोधाने चालते किंवा प्रतिरोधाने चालते ही हकीकत देण्याचे काम शरीरकपद्धतीचे असते. वस्तुत: पाहता संस्थांच्या शरीरांपेक्षा शरीराच्या द्वारा झालेले जे काम त्याच्याशी इतिहासाचे मुख्य कर्तव्य आहे; परंतु काम सिद्ध व्हावयाला शरीराची अपेक्षा असल्यामुळे व शरीराच्या सिध्यर्थ समाजाची झटपटही विशेष असल्यामुळे किंबहुना शरीराची रचना व सुधारणा हेच काही काल किंवा सर्वकाल राष्ट्राचे मुख्य कर्तव्य होऊन बसल्यामुळे शरीर, शरीररचना व शरीर सुधारणा हाच इतिहासाचा मुख्य विषय होऊन बसला आहे... वासनेचा निर्देश केल्यावाचून शरीर का निर्माण झाले ते सांगता येत नाही व कार्याचा निर्देश केल्यावाचून शरीराची लक्षणेही ठरविता येत नाहीत. ही अडचण लक्षात घेऊन शरीरक म्हणून एकच पद्धती मी स्वीकारली आहे.'' (ऐतिहासिक प्रस्तावना, पृ. २२८-२९)

राजवाडे यांच्या दृष्टीने इतिहासाचा निश्चित अर्थ कोणता याची अशी रूपरेखा आहे. असा इतिहास पूर्वग्रहरहित व प्रामाणिकपणे लिहिण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे असे ते वारंवार सांगतात. ते म्हणतात : ''निर्लेप व निरहंकारपणाने इतिहासाचा विचार करावयाला लागणे ही इतिहासाचे खरे स्वरूप जाणण्याच्या मार्गाला लागण्याची पहिली पायरी आहे. ह्या मार्गाला लागण्याची दुसरी पायरी सर्व प्रकारचे अर्धवट ग्रह सोडून देणे ही होय.'' (ऐतिहासिक प्रस्तावना, पृ. १३२). परंतु या संबंधी ते निराशेचे उद्गार काढतात : ''वर्तमानक्षणाच्या पाठीमागील गतकाळी पृथ्वीवरील नव्या व जुन्या दरोबस्त सर्व समाजांच्या सर्व तऱ्हेच्या उलाढालींची जी साद्यंत व विश्वसनीय हकीकत ती इतिहास होय. असला साद्यंत व विश्वसनीय इतिहास पृथ्वीवरील कोणत्याही भाषेत अद्यापपर्यंत लिहिला गेला नाही... प्रत्येकाचा इतिहास त्याच्या त्याच्या स्वदेशाभमानाच्या रंगाने चितारला गेल्यामुळे इतर देशांतील इतिहासज्ञांच्या पसंतीस सहजच उतरत नाही. जो तो आपापला देश त्रिभुवनाचा केंद्र समजून तत्प्रवण सर्व देशांची चरित्रे होत आहेत असे चित्र काढण्याचा, नि:पक्षपातीपणाची प्रतिज्ञा करूनही, प्रयत्न करीत असतो. या स्वदेशाभमानाखेरीज प्रत्येकाचे काहीना काही तरी वैयक्तिक खूळ असतेच. कोणी केवळ भौगोलिकदृष्ट्या, कोणी केवळ काळदृष्ट्या, कोणी निवळ व्यापारीदृष्ट्या व कोणी स्वदेशसंस्कृतीदृष्ट्या जगाच्या इतिहासाची अजमावणी करीत असतात. ...असा प्रकार असल्यामुळे समाजाच्या चरित्राचे खरे स्वरूप काय, त्याचे केंद्र कोठे आहे, ते प्रागतिक आहे किंवा अधोगतिक आहे किंवा स्तब्ध आहे, वगैरे प्रश्नांचा जसा समाधानकारक निकाल लागावा तसा लागत नाही. वैयक्तिक मते बाजूला सारून व स्वदेशाभमानाचा दर्प बाजूला ठेवून हे काम केले तरच शुद्ध व वमल तत्त्व हस्तगत होण्याचा संभव आहे.'' (ऐतिहासिक प्रस्तावना, पृ. ३१२).

परंतु अशा प्रकारे पूर्वग्रहमुक्त मन असलेला इतिहासकार कोठे मिळणार? निर्लेप व निरंजन होऊन इतिहासाचा विचार करणे दुर्घट आहे. झाडून सर्व पूर्वग्रह टाकून देणे मनुष्यस्वभावाला निसर्गत: अशक्यप्राय आहे. सांस्कृतिक संप्रदायाच्या परिसरात मानवी मन बाल्यापासून वाढत असते. मनुष्य बाल्यांत स्वसमाजाची भाषा जशी साहजिक आत्मसात करतो त्याप्रमाणे स्वसमाजाच्या इष्टानिष्टत्वाच्या भावना, परंपरेसंबंधी अभमान, अभिरुची इत्यादी सर्व काही आत्मीय बनवितो. या सर्व मानसिक बनावाच्या अनुरोधाने सत्यासत्य व सारासार ठरविणारी स्वाभाविक बुद्धी विवेक व निर्णय करू लागते. म्हणून प्रत्येक समाजाची, कालाची व व्यक्तीची जगाच्या व स्वत:च्या इतिहासाकडे पाहण्याची तऱ्हा एकसारखी असणे कठीण आहे. ही गोष्ट राजवाडे यांनी लक्षात घेतली आहे. ते म्हणतात : ''या भिन्न दृष्टीचा परिणाम असा होतो की एका काळी व एका समाजाला जी विधाने सिद्धान्तवत् भासतात तीच दुसऱ्या काळी दुसऱ्या समाजाच्या अश्रद्धेचे विषय होतात. या विरोधाचे कारण असे आहे की विकार व विचार यांनी खळबळून जाणाऱ्या व्यक्तींशी व समाजांशी मानवइतिहासाला कर्तव्य असते. ज्या निर्विकार दृष्टीने दगडाकडे किंवा वनस्पतीकडे मनुष्य पाहू शकतो, तिचा उपयोग मनुष्यसमाजावर करता येत नाही. कारण निर्विकार दृष्टीचा उपयोग करू पाहणारी व्यक्ती स्वत: विकारवश असते; व ज्या समाजांवर दृष्टीचा प्रयोग करावयाचा ते समाजही विकारवश असतात.'' (ऐतिहासिक प्रस्तावना, पृ. ३१६)

इतिहासविषयक विवेचनांत या महत्त्वाच्या अडचणीबरोबर दुसरी एक महत्त्वाची अडचण उभी असते; ती म्हणजे इतिहासातील घटनांच्या मूल्यमापनासंबंधी होय. अमुक एक ऐतिहासिक कृत्य, विधि, निषेध, संस्था, चाल, प्रवृत्ती अधम की उत्तम, हितकारक की अहितकारक, प्रगत की अप्रगत इत्यादी प्रश्न मूल्यमापनात अंतर्भूत होतात. या संबंधी राजवाडे यांचे मत असे आहे की मूल्यमापन हे इतिहासकाराचे उद्दिष्ट किंवा प्रयोजन नाही; कारण मूल्यमापन हे नीतिशास्त्राशी संलग्न कार्य आहे; परंतु नीतिशास्त्र हे शाश्वत निकष देण्यास असमर्थ आहे. कारण ते विशिष्ट देशकालाशी सापेक्ष असते. ते म्हणतात : ''मानवसमाजाची हकीकत देताना संस्थांचे किंवा कृत्यांचे अधमोत्तमत्व ठरविण्याला स्थिर मान असू शकत नाही. असू शकते, असे म्हणणे म्हणजे एका पूर्वग्रहाचाच आश्रय करणे आहे. आणि पूर्वग्रहाचा आश्रय करणे म्हणजे इतिहासाच्या सशास्त्र परिशीलनाला सर्वस्वी घातक आहे. बरे, वाईट; शुभ, अशुभ; वगैरे नीतिशास्त्रातले जे अर्थ आहेत ते गृहीत धरून ऐतिहासिक प्रसंगांची, समाजांची व संस्थांची परीक्षा करणे म्हणजे ठरीव नीतिशास्त्रांतल्या अर्थाच्या पलीकडे जाण्यात मानवसमाजाला अटकाव करण्यासारखेच आहे. ...तात्पर्य, प्रगती झालेली आहे किंवा अधोगती झालेली आहे हे पाहण्याचे काम नीतिशास्त्राचे आहे, इतिहासाचे नाही.''

''सूक्ष्मतेने पाहता, निर्भेळ इतिहास म्हणून ज्याला म्हणता येईल त्याचे काम फक्त झालेल्या प्रसंगांची विश्वसनीय हकीकत देण्याचे आहे. कालाचे पौर्वापर्य लावून व प्रसंगांचे कार्यकारणत्व सिद्ध करून भूत गोष्टी अशा अशा सातत्याने झाल्या इतके सांगितले म्हणजे इतिहासाची कामगिरी आटोपली;'' ''इतिहास भूतवृत्ताचा विश्वसनीय सारांश देतो व नीतिशास्त्र त्याचे उत्तमाधमत्व ठरविते. ...नि:पक्षपाताने काढलेला सारांश मात्र, यावच्चन्द्रदिवाकरौ अजरामर राहतो.'' (ऐतिहासिक प्रस्तावना, पृ. ३१७, १८)

या प्रतिपादनाचा भावार्थ असा आहे की, राजवाडे हे, इतिहास ही विज्ञानाप्रमाणेच एक ज्ञानशाखा आहे, असे मानतात. ज्ञानशाखेचा दर्जा इतिहासास आणण्याचा प्रयत्न आधुनिक काळातच सुरू झाला. आधुनिक कालापूर्वी जगात जे इतिहास झाले त्यांचा उघड हेतू भूतवृत्तानुवाद हाच असला तरी त्याबरोबर भिन्न अंत:स्थ हेतू दडलेले होते. विशिष्ट व्यक्ती, कुले, वंश, राष्ट्रे, संप्रदाय, प्रसंग किंवा घटना यांचे माहात्म्य वाढविणे किंवा क्षुद्रत्वारोप करणे हाच अंत:स्थ हेतू इतिहासनिवेदकांत वसत होता. त्यामुळे त्यात वाटेल तेथे अवास्तवाची वा अतिशयोक्तीची भर पडल्याशिवाय राहत नसे. त्या काळी वस्तुत: काही थोड्याच वस्तुनिष्ठ दृष्टीच्या महानुभावांना सत्यकथनाची प्रेरणा लाभलेली असे. त्या काळी इतिहास हा निर्भेळपणे वस्तुनिष्ठच असला पाहिजे, असा नियम सर्वसंमत होण्याची प्रवृत्ती समाजात नसे. अद्भुत व कल्पित कथांची इतिहासात भर टाकल्याने काही बिघडले आहे अशी जाणीवच त्यावेळी नव्हती. अशा पूर्वपरंपरेच्या विपरीत वातावरणातून बाहेर पडलेली इतिहासकाररीति हे या आधुनिक युगाचेच लक्षण आहे; परंतु नैतिक मूल्यमापन व इतिहास यांच्या संबंधी सापेक्ष नीतिवादाच्या आधारे राजवाडे यांनी जे प्रतिपादन केले आहे त्यातली महत्त्वाची अडचण राजवाडे यांनी ध्यानात घेतलेली दिसत नाही. ती अशी की, इतिहासाचा विषय मानवी कृत्ये हा असल्यामुळे त्यात मानवी कृत्यांची सदसद्विवेकबुद्धीशी नित्यसंलग्नता ध्यानात घ्यावी लागते. मानवी विश्वच नैतिक विश्व आहे, त्याच्या संबंधी कोणतेही विवेचन नैतिक विवेकाच्या स्पर्शापासून मुक्त असे करणे अशक्य आहे. म्हणजे मानवी ऐतिहासिक प्रसंग हा नैतिक प्रसंगच आहे; या प्रसंगाच्या कोणत्याही तथ्यकथनपर वा कार्यकारणत्वनिर्णयपर इतिहासात चांगले व वाईट या कोटींचा म्हणजे नैतिक मूल्यांचा अनुकूल वा प्रतिकूल निर्देश अपरिहार्यपणेच करावा लागतो. उदाहरणार्थ, स्वत: राजवाडे हेच इतिहासविवेचनात अशी सतसत् मूल्यांचा निर्णय दर्शविणारी शेकडो विधाने करताना दिसतात. उदाहरणार्थ, 'मराठ्यांच्या इतिहासाचे कार्य व पराभव', 'मराठी राज्याचा विकास', 'मराठेशाहीचा पाया घालणारा शहाजी' व 'शिवाजीची गुणसंपदा' (पृ. १८७-२२८) ही या पुस्तकांतील प्रकरणेच पाहावी. यांत गुणदोषविवेचन म्हणजे नैतिक मूल्यांवर आधारलेली चर्चाच प्राधान्याने आली आहे. '१८ व्या शतकाच्या पूर्वार्धात व उत्तरार्धात मराठ्यांची संस्कृती युरापोतील प्रगत राष्ट्रांच्या संस्कृतीहून कमी दर्जाची होती' (पृ. १९३) हे वाक्य

अत्यंत मौलिक महत्त्वाचे आहे. यात सांस्कृतिक मूल्यांचा तुलनात्मक निर्णय राजवाडे यांनी जाहीर केला आहे. मराठ्यांचा पराभव ब्रिटिश का करू शकले या तथ्याच्या मुळाशी असलेले कार्यकारणत्व दाखविणे हाच राजवाडे यांचा उद्देश असला तरी त्याकरिता हिंदुंची संस्कृती युरोपियन संस्कृतीपेक्षा हीन होती हा नैतिक निर्णय करूनच हिंदुंच्या पराभवाची मीमांसा राजवाडे करू शकले व राजवाडे यांचा 'शिवाजीची गुणसंपदा' हा लेख शिवाजीसंबंधी नैतिक निर्णय सिद्ध करणारा आहे. समाजमनोरचनेची मीमांसा इतिहासाचा भाग आहे, असे राजवाडे मानतात; (ऐतिहासिक प्रस्तावना, पृ. ३६१) त्यात नैतिक कल्पनांचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो. या संबंधांत हिंदुंचा इतिहास काय संदेश देतो हे राजवाडे स्वत: सांगतात. ''हिंदू लोकांची ही तात्त्विक संन्यासप्रवण मनोरचना बदलण्याचा दीर्घोद्योग केला पाहिजे असा सल्ला इतिहासाचा हा भाग सांगतो.'' नैतिक वा कलात्मक मूल्यांचा सापेक्षतावाद मान्य केला तरी इतिहास हा मूल्यचर्चेच्या जाळ्यातून कधीही सुटणे शक्य नाही. कारण मानवी विश्वातील हालचालींचा तथ्य (Fact) व मूल्य (Value) यांचा प्रांत वेगळा करून विचार करणे अशक्य आहे. हा वदतोव्याघात किंवा स्वविरोध (Inner Contradiction) राजवाडे यांच्या ध्यानात आला नाही.

राजवाडे यांनी स्वीकारलेली ही इतिहासकल्पना पाश्चात्त्य इतिहासतत्त्वविचारांत अत्यंत महत्त्वाची मानलेली व गाजलेली आहे. पाश्चात्त्य देशांत गेली दोन शतके इतिहासतत्त्वाची मीमांसा सुरू आहे. इतका अत्यंत खोलात जाऊन त्यामध्ये भाग घेणारा पहिला भारतीय इतिहाससंशोधक म्हणजे राजवाडे हेच होत म्हणून त्यांचा या संबंधातला दृष्टिकोन अत्यंत संक्षेपाने वर मांडला आहे.

राजवाडे यांनी इतिहासतत्त्वमीमांसेच्या दृष्टिकोनातून संस्कृत व मराठी भाषेचा व्याकरणरूप इतिहास ज्याप्रमाणे लिहिला आहे, त्याचप्रमाणे भारतीय समाज व महाराष्ट्र यांचा सामाजिक व राजकीय इतिहासही लिहिला आहे. त्याचे दिग्दर्शन या लेखसंग्रहात वाचकांस होईलच.

या पुस्तकातील संग्रहाचे स्वरूप

राजवाडे यांच्या लेखनसंपत्तीतील काही निवडक भागच या संग्रहात संगृहीत केले आहेत. राजवाडे यांच्या विविध व समृद्ध साहित्याच्या काही विशिष्ट नमुन्यांचेच दर्शन वाचकांस या संग्रहात घेता येईल. राजवाडे यांनी जेव्हा ऐतिहासिक विवेचनास प्रारंभ केला तेव्हा मराठ्यांच्या इतिहासाची स्थिती फार शोचनीय होती; त्रोटक आधार, विपर्यस्त माहिती, पूर्वग्रहदूषित असलेली व अपुऱ्या माहितीवर लिहिलेली युरोपियनांची किंवा एतद्देशीयांची पुस्तके अशी पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्यांनी ते विवेचन लिहिले. त्यांनतरच्या काळात स्वत: राजवाडे व इतर पंडित यांच्या परिश्रमाने भारताच्या व महाराष्ट्राच्या इतिहासाची प्रमाण

सामग्री मोठ्या प्रमाणावर जमा होऊन त्या वेळी विवाद्य वाटणाऱ्या व अंधारात असलेल्या गोष्टींवर प्रकाश पडल्यामुळे पुष्कळच प्रगती झाली आहे. म्हणून आजही ज्या चर्चेचे महत्त्व शिल्लक आहे. अशा चर्चेमधील पुष्कळसा विस्तार वगळून त्यांतील साहित्यगुणालंकृतच असे सारभूत भाग तेवढे येथे उद्धृत केले आहेत. साहित्यगुणालंकृतच का निवडले? तर साहित्यगुणांशी संबंध नसलेले; परंतु निरुक्त विद्येशी वा संस्कृत व प्राकृत व्याकरणाशी संबंध असलेले अत्यंत नवीन सिद्धांत प्रस्थापित करणारे निबंध राजवाडे यांनी लिहले आहेत. त्यांतील अंश आम्ही येथे उद्धृत केले नाहीत. उदाहरणार्थ, 'ज्ञानेश्वरीचे व्याकरण', 'संसकृत भाषेचा उलगडा', 'सुबंतविचार', 'तिङन्त विचार', 'गुण व वृद्धी' इत्यादी राजवाडेकृत निबंधांना आम्ही संपूर्ण वगळले आहे. त्याचप्रमाणे 'पाणिनिकालनिर्णय', 'सप्तशती' इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण लेखही स्थलसंकोचास्तव वगळावे लागले आहेत.

परंतु या ठिकाणी जे लेख किंवा निबंधांश उद्धृत केले आहेत; त्यावरून राजवाडे यांच्या ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचे व भारताच्या व महाराष्ट्राच्या सोपपत्तिक इतिहासाचे सम्यक् दर्शन होईल अशी आमची अपेक्षा आहे. ज्या ठिकाणी राजवाडे यांची साहित्यिक शैली, ऐतिहासिक तत्त्वमीमांसा व ऐतिहासिक निर्णय यांचा संगम झाला आहे असेच भाग येथे उद्धृत केले आहेत. 'विकार-विचार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांती', 'इतिहासाच्या दोन बाजू : आधिभौतिक व आध्यात्मिक' व 'इतिहास म्हणजे काय?' हे या संग्रहातील पहले तीन लेख राजवाड्यांच्या ऐतिहासिक तत्त्वमीमांसेचे स्वरूप संक्षेपाने दर्शित करतात. 'हिंदू समाजात हिंदितरांचा समावेश' या निबंधात राजवाडे यांनी हिंदू समाज, युरोपियन समाज किंवा ख्रिश्चन समाज व मुसलमान समाज यांच्या सामाजिक विस्ताराची संस्थात्मक पद्धती यांचे विवेचन केले आहे. या निबंधात हिंदू समाजरचनेच्या ऐतिहासिक सिद्धांतांची काही मूलतत्त्वे दिग्दर्शित केली आहेत. भारतीय सामाजिक इतिहासाच्या ममनाचे हा निबंध एक उत्कृष्ट साधन आहे. त्यानंतरच्या 'हिंदुस्थानातील आर्य लोकांचा वर्ण', 'आमची पुराणे व असीरियातील नवे शोध', 'मग ब्राह्मण कोण', 'मगध', 'नट व निच्छवि' या लेखांत अतप्राचीन भारताच्या वंशविषयक इतिहासाची रूपरेखा सूचित केली आहे. 'प्राकृतिक भाषांचा व वाङ्मयाचा इतिहास' हा लेख मराठी भाषेच्या संदर्भांत लिहलेला आहे; यात भाषा व वाङ्मय यांच्या ऐतिहासिक चिंतनाचे दृष्टिक्षेत्र किती व्यापक असणे आवश्यक आहे, याची कल्पना मिळते. त्यानंतरच्या 'महाराष्ट्राची वसाहत' व 'महाराष्ट्र व उत्तर कोकणची वसाहत' या लेखात महाराष्ट्राच्या अतप्राचीन इतिहासाचे चित्र भाषिक, वांशिक व सामाजिक संस्थारूप प्रमाणांच्या आधारावर निर्माण केलेले पाहावयास सापडेल, व त्याबरोबर भारताच्या राजनैतिक इतिहासाचे रहस्योद्घाटन केलेले दिसेल. या नंतरच्या रामदासापर्यंतच्या लेखांत मराठी राज्याची ऐतिहासिक मीमांसा मांडलेली वाचकांस वाचावयास मिळेल. ही मीमांसा महाराष्ट्रातील आधिभौतिक व आध्यात्मिक संस्कृतीच्या

गुणदोषांच्या चर्चेवर आधारलेली आहे. त्या चर्चेचाच भाग म्हणूनच 'रामदास' हा निबंध येथे उद्धृत केलेला आहे. अखेरीस 'कादंबरी' हा अत्यंत नामांकित निबंध उद्धृत करून या पुस्तकाची समाप्ती केली आहे. या निबंधात पाश्चात्त्य कादंबरी वाङ्मयाच्या अद्भुत (Romantic) आणि वस्तुवादी (Realist) या दोन ऐतिहासिक अवस्थांची मीमांसा प्रथम करून शेवटी त्या पार्श्वभूमीवर तुलनात्मक दृष्टिकोनातून श्री. हरी नारायण आपटे या कादंबरीकारापर्यंतची मराठी कादंबरी वाङ्मयाची समीक्षा केली आहे.

- लक्ष्मणशास्त्री जोशी

प्रकाशक - **साहित्य अकादमी,**
नवी दिल्ली १९१८

ooo

(२)

लोकमान्य टिळक लेखसंग्रह

प्रस्तावना

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा केसरीतील निवडक लेखसंग्रह असे या ग्रंथास नाव दले आहे. याचे कारण टिळकांनी बहुतेक मराठी स्फुटलेखन केसरीतच केले आहे; अन्यत्र केले नाही. केसरीव्यतिरिक्त लेखन टिळकांनी इंग्लिशमध्ये मराठा या इंग्रजी वृत्तपत्रात केले. त्यातील मजकूर व केसरीतील मजकूर बहुतेक समानार्थकच असल्यामुळे या लेखसंग्रहात समावेश करण्याचे प्रयोजन नाही. राहता राहले केसरी व मराठा या साप्ताहिकांच्या बाहेर टिळकांनी केलेले स्फुटलेखन होय. ते फार अल्प आहे. उदाहरणार्थ लिमयेकृत भारतीय युद्ध या ग्रंथाची टिळकलिखित प्रस्तावना आणि अवंतिकाबाई गोखलेकृत गांधीचरित्र प्रस्तावना होय. मराठीत त्यांनी सलग असा एकच ग्रंथ लिहिला, तो म्हणजे गीतारहस्य होय. बाकीचे ग्रंथ त्यांनी इंग्लिशमध्ये लिहिले आहेत. इंग्लिशमध्ये त्यांचे दोनच ग्रंथ प्रसिद्ध आहेत. एक ओरायन व दुसरा आर्क्टिक होम इन् दि वेदाज्. गीतारहस्य व वरील दोन इंग्लिशमध्ये लिहलेले ग्रंथ यांतील मजकूर आम्ही येथे दिला नाही; कारण ते ग्रंथ वाचकांना पुस्तकांच्या बाजारात स्वतंत्रपणे उपलब्ध आहेत.

लोकमान्य टिळकांचे केसरीतील समग्र लेखांचे प्रकाशन केसरी-मराठा संस्थेने चार भागात अनुक्रमे सन् १९२२, १९२३, १९२४ आणि १९३० साली प्रकाशित केले. त्यांची एकूण पृष्ठसंख्या २४४७ इतकी मोठी आहे. ते चारही भाग आता पुस्तकांच्या बाजारात उपलब्ध नाहीत. या सर्व भागांना कै. न. चिं. केळकर यांच्या छोट्या प्रस्तावना आहेत. पहले तीन भाग राजकीय खंड म्हणून निर्दिष्ट केले असून भाग ४ था संकीर्ण लेखसंग्रह (सामाजिक, धार्मिक, वाङ्मयविषयक) म्हणून निर्दिष्ट केला आहे.

आम्ही निवडलेल्या लेखांचे सात खंडांमध्ये वर्गीकरण केले असून त्यांस अनुक्रमे खंड १ - आधी सामाजिक की राजकीय, खंड २ - स्वराज्य हा जन्मसिद्ध हक्क, खंड ३ - काँग्रेस

अर्थात् राष्ट्रीय सभा, खंड ४ - हिंदू-मुसलमान संबंध, खंड ५ - परतंत्र भारताच्या आर्थिक समस्या, खंड ६ - शैक्षणिक प्रश्न व राष्ट्रीय शिक्षण, खंड ७ - संकीर्ण (शिवाजी उत्सव, गणेश उत्सव व राष्ट्रीय उत्सवाची आवश्यकता; धर्म व तत्त्वज्ञान आणि प्रसिद्ध व्यक्ती) अशी शीर्षके दिली आहेत. टिळकांच्या संपादकत्वाखाली केसरी साप्ताहिक जाहीरपणे सन १८८७ साली प्रसिद्ध होऊ लागले. त्यापूर्वीही आगरकरांच्या संपादकत्वाखाली चाललेल्या केसरी साप्ताहिकात टिळक थोडेसे लिहीत व त्यातल्या त्यात ते प्राय: सामाजिक किंवा धार्मिक विषयांवर लिहीत, असे पहिल्या भागाच्या प्रस्तावनेत कै. न. चिं. केळकर म्हणतात. केसरी-मराठा संस्थेने प्रसिद्ध केलेल्या चार खंडांतील सर्व लेख टिळकांचे लेख म्हणून न. चिं. केळकर यांनी निवडलेले असले तरी त्यात सर्वच लेख स्वत: टिळकांनी लिहले आहेत असा निर्वाळा केळकरही देत नाहीत. पुष्कळ वेळा संपादकीय लेख दुसऱ्या सह-संपादकांनी किंवा उपसंपादकांनीही अडीअडचणीच्या वेळी लिहलेले असू शकतात. आम्ही निवडलेल्या लेखांच्या बाबतीत केळकरांपेक्षा अधिक निर्णायक अनुकूलता लाभली ती अशी की टिळकांच्या वेळचा व नंतरचा केळकरांचा सर्व लेखसंग्रह आणि टिळकांच्या वेळचा व नंतरचा कै. कृ. प्र. खाडिलकर यांचा सर्व लेखसंग्रह अगोदरच प्रसिद्ध झाला असल्यामुळे वरील चारही भागांतील लेखांतील खास टिळकांचे लेख कोणते याचा निर्णय करणे अधिक सुलभ झाले. आम्ही हा निवडक लेखसंग्रह तयार केल्यानंतर आमचे मित्र प्रा. न. र. फाटक यांना दाखविला व त्यांच्याही सूचना आम्हास यासंबंधात उपयोगी पडल्या हे निर्दिष्ट करणे आमचे कर्तव्य आहे.

हे लेख निवडत असताना राजकीय किंवा सामाजिक दृष्टीने केवळ तात्कालिक उपयुक्तता असलेले परंतु टिळकांच्या वा भारताच्या सार्वजनिक जीवनात व वैचारिक विकासात फारसे स्थान नसलेले लेख वगळण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे ज्या लेखात विचारांची वारंवार पुनरुक्ती कमी महत्त्वाच्या संदर्भात झालेली आहे तेही लेख आम्ही यातून वगळलेले आहेत. लेख निवडताना कमी महत्त्व कशास आहे व अधिक महत्त्व कशास आहे याचा विवेक करणे मोठे दुर्घट असते. या गोष्टीचे अवधान राखून आम्ही लेखांची निवड केली आहे. त्याचप्रमाणे लेख निवडताना टिळकांच्या सामाजिक, राजकीय व तात्त्विक विचारांच्या विकासाचे टप्पेही ध्यानात घेऊन ही निवड केली आहे. केवळ विकासाचेच टप्पे नव्हे, तर त्यांच्या लेखनामध्ये एक प्रकारची तालबद्धता आढळून येते, तीही ध्यानात घ्यावी लागते. ही तालबद्धता भारतीयांच्या सामाजिक व राजकीय जीवनातील आणि जगाच्या ऐतिहासिक जीवनातील अर्थपूर्ण घटनांच्या संदर्भात निर्माण झालेली आहे. त्यात विचारांचा व भावनांचा आरोह व अवरोह, तीव्रता व मृदुता, कठोरता व शालीनता, चढाई व माघार, स्वैरता व संयम, गर्व व विनय, एकदा आशा व दुसऱ्यांदा निराशा , वैचारिक तर्कशुद्धता व भावनांचा प्रक्षोभ यांचे अंतर्विरोधी प्रत्यंतर मिळते.

टिळकांचे चरित्र म्हणजे विशाल द्रष्टेपणा व अदम्य कर्तेपणा यांचा भव्य संगम होय. टिळकचरित्र म्हणजे १८८५ ते १९२० पर्यंतच्या आधुनिक भारताच्या इतिहासाचा गाभा होय. ते एक प्रत्यक्षात घडलेले महाकाव्य आहे. हे महाकाव्य साहित्यरूपात प्रकट करणारा प्रतिभासंपन्न चरित्रकार मात्र अजून झाला नाही व त्यांचे दीर्घ जीवन प्रत्यक्ष पाहलेले कोणी उरलेले नाही म्हणून पुढे कधी काळी तसा कोणी चरित्रकार होईल असेही वाटत नाही. परंपरागत आध्यात्मिक भारतीय संस्कृतीच्या कुशीत जन्मलेला व आधुनिक संस्कृतीच्या सिंहिणीच्या स्तनातील सकस दुग्ध प्राशन केलेला हा 'बाळ' आहे. या दुधाची त्यांनी आपल्या लेखनात अनेकदा विशेष प्रशंसा केली आहे. पहिल्या विद्यार्थिदशेतील विचारांच्या उष:कालातच त्यांना भारतीय भावी स्वराज्याचे दिव्य स्वप्न दिसले. ते स्वप्न प्रत्यक्ष सृष्टीत पाहण्याचा जो ध्यास लागला त्या ध्यासाने सर्व टिळकजीवन अखेरपर्यंत भारले गेले. लोकशाही स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे भारतव्यापी अधिष्ठान निर्माण करणारे अग्रणी आणि राष्ट्र-पिता महात्मा गांधी यांच्या कर्तृत्वाला सफल करणाऱ्या लोकशाही शक्तींना गांधींच्यापूर्वी जागृत करणारा दिव्य दिनमणी म्हणजे लोकमान्य टिळक होय. विद्यार्थिदशा संपल्यापासून अखेरपर्यंत सतत ४५ वर्षे एकाच ध्येयाच्या दिशेने सर्व प्रकारे वैचारिक वा सांसारिक मोह टाळून सतत संग्रामस्थ राहणे हाच टिळकांच्या द्रष्ट्रत्वाचा अस्सल निकष आहे. टिळकांच्या प्रस्तुत लेखसंग्रहाच्या रूपाने हाच निकष आम्ही वाचकांच्या हाती देत आहो.

वस्तुत: केसरी-मराठा संस्थेने पूर्वी प्रसिद्ध केलेले चार भाग पुन: अधिक विस्तृत टिप्पण्या देऊन प्रसिद्ध झाले तर त्यांची गरज विशेषच आहे. ही गरज कधी संपणारी नाही. भारतीय लोकशाही स्वातंत्र्याचे पहले तळपणारे कोवळे वैचारिक किरण त्या संग्रहात पृष्ठागणिक दिसतात. देशाच्या राजकीय व सामाजिक इतिहासाच्या प्रक्षुब्ध गंगाप्रवाहाचे तपशीलवार दर्शन घडते. अशा तपशीलवार दर्शनाची अपेक्षा आम्ही तयार केलेल्या या निवडक लेखसंग्रहाकडून वाचकांनी करू नये.

टिळककालीन चार विचारधारा

टिळकांनी सार्वजनिक जीवनात सर्वस्व अर्पण करण्याची मानसिक तयारी महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच केली होती. अव्वल इंग्रजी सत्तेचा अंमल संपून थोडी वर्षे लोटली होती. पश्चिमी आधुनिक विद्येचा व संस्कृतीचा प्रभाव पडलेल्या नवशिक्षितांच्या दोन पिढ्या चमकून गेल्या होत्या. पांढरपेशा भारतीयांमध्ये वैचारिक द्वंद्व दोन पिढ्या चालले होते. ब्रिटिशांच्या शिस्तबद्ध, कायदेशीर राज्यसत्तेखाली भारतातील सर्व धर्मांचे व सर्व जातींचे लोक एकवटले होते. आधुनिक वैज्ञानिक शोधांवर आधारलेली यांत्रिक सुधारणा आणि विज्ञान, इतिहास, सामाजिकशास्त्रे व पश्चिमी आधुनिक तत्त्वज्ञान हे डोळे दिपवीत होते. थोडेफार अपवाद सोडल्यास सर्वत्र सामान्य जनतेत भयाण राजकीय शांतता नांदत होती. सर्वांचे

डोळे दिपविणारा पश्चमी सत्तेचा प्रकाश सुशिक्षितांतील काही अपवादादाखल असलेल्या मोजक्या मूठभर लोकांना प्रथमपासूनच दिपवीत नव्हता. राजकीय शांततेच्या साम्राज्याखाली नमूटपणे दारिद्र्य व दु:ख सहन करीत कण्हणाऱ्या व अज्ञानांधकारात झोपलेल्या सामान्य जनतेची केविलवाणी दशा पाहून मूठभर सुशिक्षितांचा गट उद्विग्नमनस्क होऊन विचार करू लागला की या परिस्थितीस जबाबदार कोण? या गटात भव्य भूतकाळाबद्दल अभमान बाळगणारे काही होते ते परकीय राज्यसत्तेसच या परिस्थितीस सर्वस्वी जबाबदार मानू लागले. त्यांच्यातून भारतातील सशस्त्र स्वातंत्र्यवाद्यांची परंपरा निर्माण झाली. त्याच शंभर वर्षांच्या परंपरेतील अखेरचे सशस्त्र क्रांतिवादी नेताजी सुभाषचंद्र बोस होत. ही पहिली विचारधारा होय. त्या गटातील दुसरे काही भारताच्या अवनतीची व पारतंत्र्याची मीमांसा आधुनिक पश्चमी संस्कृतीच्या बुद्धिवादी दृष्टिकोनाच्या आधारे करू लागले व अशा निष्कर्षांस पोचले की, भारताची परंपरागत धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक रचनाच या अवनतीस जबाबदार आहे. धर्माच्या अंध रूढी, जन्मसिद्ध उच्चनीच मानणारा जातिभेद व त्यांना कारणीभूत असलेली अंधश्रद्धाच समूळ नष्ट झाल्याशिवाय भारत नव्या लोकमतास, जबाबदार राज्यपद्धतीस पात्र होणार नाही. ब्रिटिश राज्यकर्त्यांना केवळ जबाबदार धरण्यात काही हशील नाही; ब्रिटिश संस्कृतीत उदारमतवादी मूल्ये ओतप्रोत भरलेली असली तरी ब्रिटिश राज्यकर्ते, आमची सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय, सहानुभूतीने लोकमतास जबाबदार राज्यपद्धतीची तत्त्वे कार्यवाहीत आणू शकणार नाहीत; त्याकरिता आत्मसंशोधन व आत्मपरिवर्तन करण्याची आवश्यकता आहे. या प्रकारच्या मंडळीत राजा राममोहन रॉय, जोतीराव फुले, लोकहितवादी, ईश्वरचंद्र विद्यासागर, डॉ. रा. गो. भांडारकर, रँग्लर परांजपे इत्यादिकांची गणना होते. ही दुसरी विचारधारा होय. तिसरे, काही सुशिक्षित तत्कालीन सद्य:परिस्थितीच्या दोन्ही घटकांना म्हणजे परंपरागत समाजरचना व परकीय जुलमी व बेजबाबदार सत्ता यांना जबाबदार धरून सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा या दोन्ही एकसमयावच्छेदेकरून व्हावयास पाहिजेत असा सव्यसाची पवित्रा घेऊन जीवनसंग्रामात उतरले. हे लोक अत्यंत थोडे बोटांवरच मोजण्याइतके होते, त्यांच्यातील अद्वितीय अग्रणी गोपाळ गणेश आगरकर होते. न्यायमूर्ती म. गो. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले इत्यादी थोर नेमस्त राजकीय नेते याच तिसऱ्या प्रकारात मोडतात. दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारच्या लोकांमध्ये अनेक प्रकारच्या गडद, मध्यम व सौम्य छटा असलेल्या व्यक्ती होत्या. मोठ्या खेदाची गोष्ट अशी की, राजकीयदृष्ट्या मवाळ अशा समाजसुधारकांमध्ये केवळ बोलके, अंगचुकार, संधसाधू व ब्रिटिश सत्तेस धार्जिण्या अट्टल स्वार्थी लोकांचा भरणाच मोठा होता; लहान मोठ्या, ब्रिटिश सत्ताधीशांना खुश करू पाहणारे खुशमस्करे त्यात थोडेथोडके नव्हते; याचे वर्णन टिळकांच्या लेखात अनेक ठिकाणी वाचावयास मिळते. याच कचखाऊ सुधारकांमुळे सामाजिक सुधारणेचे आंदोलन मागे पडले. अखेरचा चौथा विचारधारेचा प्रकार म्हणजे

परंपरागत सामाजिक परंपरा व परकीय राजसत्ता या दोनही गोष्टी भारतीय अधोगतीस कारण असल्या तरी परकीय राजसत्ता अधोगतीस मुख्यत: जबाबदार धरून राजकीय सुधारणेस प्राधान्य देणे अधिक न्याय्य, अधिक इष्ट व अधिक शक्य आहे, असे म्हणणारांचा. यांचे सर्वश्रेष्ठ नेते म्हणजे लो. टिळक होत. या चौथ्या प्रकारात पहिल्या सशस्त्र क्रांतिवाद्यांचाही मोठ्या प्रमाणात उत्तरोत्तर भरणा होत गेला. त्यातील काही तर सामाजिक क्रांती व राजक्रांती दोन्ही हातात हात घालून चालल्या पाहिजेत अशा मतांचे होते. उदाहरणार्थ, स्वातंत्र्यवीर सावरकर हे हिंदू धर्म व समाजपद्धती यांच्यात मौलिक सुधारणा व्हावी याकरिता परंपरेवरील अंधश्रद्धेवर सतत हल्ला करीत राहले. भगतसिंग हे समाजवादी क्रांतीचे पुरस्कर्ते होते. योगी अरविंद हे क्रांतिकार्याबरोबरच हिंदू धर्माच्या नव्या मानवतावादी तत्त्वज्ञानाची बैठक रचित होते; परंतु थोड्याच अवधीत त्यांनी राज्ाकीय क्रांतीच्या आंदोलनातून अंग काढून व निवृत्त होऊन शांत आश्रमवासी जीवनपद्धती स्वीकारली.

आधी सामाजिक की आधी राजकीय

अर्जुनाप्रमाणे एकाच राजकीय लक्ष्याच्या वेधात टिळक तन्मय झाले आणि सार्वजनिक जीवनक्रमाच्या प्रारंभीच 'आधी सामजिक की राजकीय' या प्रश्नाचे उत्तर त्यांनी मनाशी ठरवले. या संबंधात डॉ. रा. गो. भांडारकर, आगरकरांसारख्या ध्येयनिष्ठ अनेक सुधारकाग्रणींशी त्यांना वैचारिक सामना द्यावा लागला. सामाजिक सुधारणेचा दृष्टिकोन एका विशिष्ट अर्थाने तत्त्वत: मान्य होता ही गोष्ट 'हिंदुत्व व सुधारणा' या लेखात त्यांनी स्पष्टपणे मान्य केली आहे. एवढेच नव्हे तर धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्याचे दोन पैलू आहेत म्हणून सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्याकरिता वैचारिक संघर्ष चाललाच पाहिजे, असे त्यांनी 'औद्योगिक पारतंत्र्य' (पृ. २७४) या लेखात स्पष्ट म्हटले आहे. सुधारकांशी वैचारिक संग्राम सुरू असता त्यांना दोन प्रकारच्या सुधारकांशी लढत द्यावी लागली. एक म्हणजे सामाजिक अगोदर नंतर राजकीय, असे प्रतिपादन करणाऱ्यांशी. आधी सामाजिकवाले म्हणतात की, घरात स्त्रीदास्य व समाजात जन्मसिद्ध विषमता जे राखतात त्यांना स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्त्वांवर अधिष्ठित असे राजकीय हक्क इंग्रजांकडे मागण्याचा काय अधिकार आहे? हे हक्क कोणाच्या तोंडाने मागता? इंग्रजांकडून राजकीय हक्क मिळविण्यास सामाजिक सुधारणा अगोदर केल्या पाहिजेत, असे म्हणणाऱ्या सुधारकांना टिळकांनी असे उत्तर दले की, सामाजिक सुधारणेच्या बाबतीत इंग्लिशांच्या बरोबरीने सामाजिक सुधारणेत पुढे असलेल्या व इंग्लिशांशी रक्तसंबंधाचे नाते असलेल्या ऐरिश राष्ट्राला इंग्लिश राज्यकर्ते बरोबरीचे राजकीय स्वातंत्र्य देत नाहीत हे उघड आहे; असे असताना, आधी सामाजिक सुधारणा केली तर नंतर राजकीय हक्कप्राप्ती होईल, असा कार्यकारणभाव सिद्ध होत नाही. दुसरे असे की, सामाजिक सुधारणेला सामान्य लोकमत अनुकूल नाही. सामाजिक सुधारणा इष्ट असली तरी त्यास सुशिक्षित मध्यमवर्गाचा बहुमताने पाठिंबा नाही तर अशिक्षित बहुजनांची

काय कथा? सामाजिक सुधारणेचा प्रयत्न करीत असता समाजातील प्रत्येक वर्गात, जातीत व जमातीत अंतर्विग्रह उसळतो, राजकीय सुधारणेच्या बाबतीत तसे होण्याचे कारण नाही. सर्वच सुशिक्षित व अशिक्षित जनतेचा म्हणजे बहुसंख्य समाजाचा स्वराज्याच्या हक्काच्या मागणीला सहज पाठिंबा मिळतो. एवढेच नव्हे तर राजकीय ह्यांच्या योगाने अनेक आर्थिक अडचणी व आपत्तींतून बाहेर पडता येते, याची जाणीव जनतेला चटकन होऊन त्यांच्यात एकजूट तयार होऊन एकमुखी मागणी होऊ शकते. दोन्ही प्रश्न एकदम हाती घेतल्यास राजकीय हक्काच्या मागणीकरिता आवश्यक असलेल्या एकजुटीस तडे जाऊ लागतील. हिंदू, मुसलमान इत्यादी सर्व जमातींना एकत्र आणून एकजूट करण्याचा मार्ग राजकीय प्रश्नांचा उठाव हाच होय. तिसरे असे की, ''स्वातंत्र्यतेचा किंवा राष्ट्रीयत्वाचा अभमान म्हणून जो जोम आहे तो जोपर्यंत जागृत असतो तोपर्यंत समाजरचना कशीही असली तरी त्यातील दोष राष्ट्राच्या उन्नतीस अथवा भरभराटीस आड येत नाहीत; पण एकदा का तो जोम नाहीसा झाला म्हणजे तेच दोष रावणाच्या धनुष्याप्रमाणे छातीवर बसून जगात या लोकांची उपहास्यता होण्यास कारण होतात. जुन्या संस्थांबद्दल खरोखर योग्य अभमान वाटावयास पाहिजे. 'योग्य' म्हणण्याचे कारण एवढेच की हल्लीच्या काळात सर्वांशी व सर्वतोपरी जुन्या संस्था चालणे दुर्घट आहे, हे आम्हासही मान्य आहे. पाश्चात्त्य राष्ट्राची व आमची कर्मधर्मसंयोगामुळे जी सांगड पडली आहे तिचा साखळीच्या दोन्ही दुव्यांवर परिणाम झाल्याखेरीज राहावयाचा नाही. तथापि तेवढ्यामुळेच आमच्या समाजरचनेचा पाया खणून काढून पुन: नवा पाया घातल्याखेरीज चालावयाचे नाही असे मात्र आम्हांस वाटत नाही,'' असे टिळक सांगतात (सामाजिक सुधारणेचे मार्ग). चौथे असे की, सामाजिक सुधारणाही परिस्थितीच्या कचाट्यात सापडल्याशिवाय होत नसते. टिळक यासंबंधी दाखले देत असता असे म्हणतात की, हिंदू धर्मात वेळोवेळी सुधारणा व परिवर्तने बदललेल्या देशकाल परिस्थितीप्रमाणे होत आली आहेत, असे हिंदू धर्माचा इतिहास सांगतो. ब्रिटिशपूर्वकाल पेशवाईत सैन्यामध्ये अन्नपाण्याचा विटाळ मानीत नसत. राजकीय हक्क मिळाल्यावर हिंदी लोक जसजशी आवश्यकता उत्पन्न होईल तसतसे बदलत जातील.

सामाजिक सुधारणांचे अधिष्ठान अध्यात्मवाद

केवळ बुद्धिवादाच्या आधारे धर्मनिरपेक्ष सुधारणेचा पुरस्कार करताना परंपरागत हिंदू धर्मशास्त्र ग्रंथावर आधारलेल्या अनेक धर्मकल्पनांचा मूर्खपणा सुधारक शाबीत करीत. त्यावर टिळकांनी असे उत्तर दिले की, सर्वच पवित्र ग्रंथांवर आधारलेल्या धर्मांच्या मध्ये अशा बुद्धिवादास न पटलेल्या कल्पना आहेत. त्याबाबतीत एका हिंदू धर्माच्याच उणिवांवर बोट ठेवण्यात परधार्जिणेपणाच सिद्ध होतो. त्यामुळे लोक आत्मविश्वास व स्वत्व गमावून बसतात व अधिक नेभळे बनतात. हिंदू धर्मावरील श्रद्धा ढळली तर एवढ्या मोठ्या संख्येच्या हिंदुंना एकत्र श्रद्धेने बांधणारा दुवाच नष्ट होऊन ते राष्ट्रदृष्ट्या विस्कळीत व दुर्बळ होतील.

टिळकांच्या मते जातिभेद, व्रतवैकल्ये, पूजाअर्चा इत्यादी आचारधर्म हे हिंदू धर्माचे बाह्यांग होय, त्याचे अंतरंग अध्यात्मवाद होय, हे अंतरंगच हिंदू धर्माचे रहस्य होय; नैतिक तत्त्वे व वेदान्त तत्त्वज्ञान या स्वरूपाचा शाश्वत हिंदू धर्म अबाधितपणे शिल्लक राहतो. हिंदू धर्म हा जगातील सर्व धर्मांना परमार्थप्राप्तीचे विविध मार्ग म्हणून मान्यता देतो; या दृष्टीने हिंदू धर्म हा जगातील सर्व धर्मांपेक्षा व्यापक व श्रेष्ठ ठरतो; या धर्मतत्त्वाच्या अधिष्ठानावरच सामाजिक सुधारणा आधारलेल्या पाहिजेत. आमच्या सामाजिक रचनेचा हा आध्यात्मिक पाया होय. टिळक म्हणतात की, गुणकर्मानुसार वर्णव्यवस्था हेच प्राचीन भारतीयांच्या समाजरचनेचे तत्त्व आहे. कर्माने जो ब्राह्मण तो मग जातीने कोणीही असो तो ब्राह्मणच मानला पाहिजे. जो ब्राह्मण कर्माने शूद्र आहे तो शूद्रच मानला पाहिजे हे तर्कशुद्ध गृहीतकृत्य आमच्या समाजरचनेत आहे. म्हणून 'आमच्या समाजरचनेचा पाया खणून काढून पुन: नवा पाया घातल्याखेरीज चालावयाचे नाही, असे मात्र आम्हांस वाटत नाही.'

यावर असे म्हणता येते की, वरील गूढ आध्यात्मिक पायावरील भारतीय हिंदुंची वर्णविषमताप्रधान समाजरचना वकृत होऊन शिलावत अशा जातिभेदाच्या रूपाने युगानुयुगे टिकली. भारताच्या आधुनिक जीवनपद्धतीशी व लोकमतास जबाबदार अशा राज्यसंस्थेशी ती सुसंगत नाही. लोकशाहीशी सुसंगत अशी समाजरचना निर्माण करावयाची तर ती मूलभूत मानवी हक्कांच्या पायावरच करावी लागेल. लोकशाही राज्यव्यवस्थेशी सुसंगत अशा सामाजिक सुधारणेशिवाय लोकशाही चिरकाल स्थिरावणार नाही; टिळकांनी हा मुद्दा टाळला आहे. तो टाळला याचे कारण उघड आहे; राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये सबंध भारत राष्ट्राला ओढावयाचे हा त्यांचा आत्यंतिक जीवनोद्देश होता व त्यात टिळक यशस्वी झाले याची साक्ष टिळकोत्तर घडलेला भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास देत आहे यात शंका नाही. हे खरे की, ऐहिक मानवी हक्कांच्या बुद्धिसिद्ध आधारावर भारताचा सामाजिक क्रांती व राजकीय क्रांती यांचा समतोल इतिहास घडला असता तर भारतीय लोकशाही अधिक भक्कम पायावर उभारली गेली असती व आज ज्या सामाजिक व राजकीय समस्यांना भारतीय लोकशाहीला तोंड द्यावे लागते आहे, ज्या संकट कालातून जावे लागत आहे त्या समस्या व संकटे इतकी भयानक ठरली नसती; परंतु एका अर्थी हेही खरे आहे की, जे घडले ते अपरिहार्य अशा ऐतिहासिक नियतीमुळेच घडले आहे.

सामाजिक प्रश्न राजकीय प्रश्नातच गुंतलेले व अटळ

सामाजिक प्रश्न व राजकीय प्रश्न मूलत: एकाच प्रश्नाच्या दोन कक्षा असतात. सामाजिक प्रश्न दृष्टीआड करण्याचा प्रयत्न करून त्यांना चुकविता येत नसते; ते टाळून टळत नसतात. त्यांच्याकडे पाठ केली तरी ते पुढे येऊन दत्त म्हणून उभे राहतात; टिळकांच्या हयातीतच हिंदू-मुसलमान व ब्राह्मण-ब्राह्मणेतर यांच्या धर्ममूलक व सामाजिक वैमनस्यातून राजकीय समस्यांनी डोके वर काढले. राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयाने त्यांच्यात अपेक्षित असलेली

अभेद्य एकजूट निर्माण होऊ शकली नाही. त्याकरिता मुसलमान नेत्यांशी हिंदू नेत्यांना वारंवार लखनौ करारासारखे तडजोड करण्याचे प्रयत्न करावे लागले. ते सर्व प्रयत्न अखेरीस व्यर्थ गेले. याचे स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाही. टिळक वारंवार बजावीत की, हिंदू व मुसलमान यांचे राजकीय ध्येय एकच आहे; परंतु मुसलमान हे हिंदूंच्या मानाने मागासलेले असल्यामुळे ब्रिटिश सत्ताधारी 'फोडा व झोडा' या नीतीचा यशस्वी रीतीने अवलंब करू शकतात. 'फोडा व झोडा' या कुटिल नीतीने ब्रिटिशांनी ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यातही फूट पाडण्याचा प्रयत्न केला. तो प्रारंभी एक दोन दशके सफळही होऊ लागला; याचे थोडे-बहुत प्रत्यंतर महाराष्ट्रातील व मद्रासेतील ब्राह्मणेतर पुढाऱ्यांच्या पहिल्या महायुद्धाच्या व मॉंटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणेच्या कालखंडात आले. मद्रासच्या जस्टिस पार्टीच्या नेत्यांनी पहिल्या महायुद्धात १९१७-१८ साली टिळक राजकीय हक्कांच्या मागणीची अट ब्रिटिशांना घालतात म्हणून त्यांना बंदिवासात टाकावे, अशीही मागणी केली होती; परंतु कालांतराने १९३० च्या सत्याग्रह आंदोलनाच्या लाटेमध्ये दक्षिण भारतातील व विशेषत: महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळ विलीन झाली. १९२० साली टिळकांनी असेच भविष्य वर्तवले व ते महाराष्ट्राच्या बाबतीत खरे ठरले. हिंदू-मुसलमानांचा प्रश्न सोडवीत असता टिळकांनी सन १९१७ साली लखनौ येथील भाषणात असेही एकदा ब्रिटिश राज्यकर्त्यांना बजावले की, हिंदूंना वगळून मुसलमानांच्या हाती स्वराज्याचे हक्क सोपवले तरी चालतील; परंतु तुमच्या हातातील सत्ता सोडा. सन १९२० साली महाराष्ट्रातील काही ब्राह्मणेतर नेते स्वराज्याच्या मागणीला विरोध करू लागले तेव्हा टिळकांनी असे लिहिले की,

''मि. मॉंटेग्यू हे स्वराज्यविषयक चर्चा करण्याकरिता हिंदुस्थानात येणार असे जाहीर झाल्यापासून स्वराज्याच्या चळवळीस विरोध करणाऱ्या आमच्या काही ब्राह्मणेतर बंधूंनी बरीच उचल खाल्ली आहे, व ब्राह्मणजातीसंबंधाने आपल्या मनात उंचबळत असलेली खळमळ ओकण्यास अवेळी सुरुवात केली आहे. तथापि त्यातल्या त्यात आनंदाची गोष्ट इतकीच की, स्वत: ब्राह्मणेतर असून स्वराज्याच्या चळवळीस विरुद्ध नसणारे असेही पुष्कळ प्रतिष्ठित लोक वेळीच पुढे येऊन वरील आत्मघातकी प्रकारास आळा घालू लागले आहेत. यामुळे या अनिष्ट वादास भलतेच स्वरूप न येता, अखेर समुद्रातील मोठ्या माशाने लहान मासा खाऊन टाकावा त्याप्रमाणे ब्राह्मणेतरांतला स्वराज्यास अनुकूल असणारा मोठा पक्ष स्वराज्यास विरोध करणाऱ्या लहान पक्षास खाऊन टाकील अशी आशा वाटू लागली आहे. ब्राह्मण व ब्राह्मणेतर हा विरोध मद्रास इलाख्यात जितका दृढमूल आहे तितका तो इतर प्रांतांत नाही.''

''प्रस्तुतच्या वादाचे प्रथमत:च दोन भाग आपोआपच पडतात. पहिला असा की, ब्राह्मणेतरांस खरोखरच स्वराज्य नको की काय? व दुसरा असा की, त्यांनाही जर स्वराज्य हवे तर ते हरकत तरी कोणत्या गोष्टीला घेतात? ब्राह्मणेतरांच्या तर्फे म्हणून जे गृहस्थ आज

वादास प्रवृत्त झाले आहेत ते स्वत: सुशिक्षितच असल्यामुळे हिंदुस्थानातील हल्लीची एकतंत्री राज्यपद्धती त्यांना झाली तरी मनापासून आवडणे शक्यच नाही. इंग्रज लोकांनी दलेल्या शिक्षणाचा गुणच स्वातंत्र्यप्रयता हा असल्यामुळे सुशिक्षित लोक ब्राह्मणेतर असले तरी त्यांनाही आपण आपल्याच देशात नादान व खुरटलेले राहावे आणि आपला सर्व कारभार परक्यांनी आपली संमती न घेता करावा ही गोष्ट कशी आवडणार? ब्राह्मणवर्गाच्या मानीव सामाजिक जुलमापासून का होईना पण स्वतंत्र होण्याच्या बुद्धीत जे स्वाभिमानाचे बीज आहे ते राजकीय विचाराच्या भूमीतही फलद्रूप झालेच पाहिजे.''

टिळक पुढे जाऊन लिहितात की, ''ब्राह्मणेतरांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची कोणतीही सूचना पुढे आल्यास ब्राह्मण लोक तिचा विचार नुसत्या सहानुभूतीनेच नव्हे तर थोड्याबहुत दिलदारीनेही करण्यास तयार आहेत. कै. ना. गोखले यांनी आपल्या भाषणांतून व लेखांतून आणि मृत्युसमयी करून ठेवलेल्या स्वराज्ययोजनेतून ब्राह्मणेतरवर्गाच्या हक्कांचे संरक्षण करणे योग्य आहे असे ठिकठिकाणी प्रतिपादले असल्याचे प्रसिद्धच आहे, आणि लो. टिळकांनीही लखनौ येथील राष्ट्रीय सभेच्या प्रसंगी मुसलमानबंधूंच्या महत्त्वाकांक्षेसंबंधाने जे उद्गार काढले ते लक्षात घेतले म्हणजे स्वराज्याच्या बाबतीत ब्राह्मणेतरांना किती प्रेमळपणाने वागविण्यास ते तयार आहेत हे दिसून येते. कायदे कौन्सिलात उद्या एक वेळ सगळेच ब्राह्मणेतर आले तरी चालतील; पण तेथे लोकनयुक्त हिंदू लोकांचे प्राबल्य असले पाहिजे. परक्यांचे किंवा सरकार नयुक्तांचे प्राबल्य नसले पाहिजे हे त्यांचे शब्द कोणाही ब्राह्मणेतराने विसरू नये. हे शब्द अगदी शब्दश: कोणी घेणार नाही. ते तात्पर्यार्थानेच घेतले पाहिजेत हे कोणाही समंजस मनुष्यास सांगण्याचे कारण नाही; पण या अतिशयोक्तीच्या मुळाशी खऱ्या राष्ट्रीय भावनेचे बीज आहे हे कोणासही नाकबूल करता यावयाचे नाही. हिंदुस्थानात ब्राह्मणेतरांतील सर्वांत मोठा वर्ग म्हटला म्हणजे तो मुसलमानांचा; पण या वर्गासंबंधाने सर्वसंमत अशी तडजोड लखनौस होऊन ती राष्ट्रीय सभेच्या स्वराज्य योजनेत नमूदही झाली आहे, हे ज्यास माहीत आहे तो हिंदुंचे मुसलमानांच्या हक्कसंरक्षणाविषयी खरे धोरण काय आहे याविषयी साशंक राहू शकणार नाही, व मुसलमानासंबंधीने सर्व हिंदुंचे जे धोरण तेच तत्त्वत: ब्राह्मणांचे ब्राह्मणेतरांविषयीही असणार हे उघड आहे. त्यात बदल होण्याचे काय कारण?''

१९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकापासून हिंदू-मुसलमानांचे द्वैत पेटावयास लागले. हिंदू-मुसलमानांमधील द्वैत म्हणजे धर्माच्या अधिष्ठानावर उभारलेल्या दोन धार्मिक समाजांमधील द्वैत होय. गेली सहाशे वर्षे हे दोन समाज एकाच देशाचे दोन भाग म्हणून नांदले. मुसलमानी राजवटीत मुसलमान राज्यकर्ते मुसलमानांच्या बाबतीत पक्षपाताने वागत होते तरी दोन धार्मिक समाजातील धर्मभेदमूलक दंगा कधीच पेटला नाही. इंग्रजी राजवटीतही १८८५ पर्यंत म्हणजे जवळजवळ एक शतक हे दोन्ही समाज एकाच गावात, एकाच शहरात,

एकाच प्रांतात एकमेकांच्या सामाजिक सहकार्याने शांततेने जगले. या शांततेस महत्त्वाचे एक कारण हिंदू धर्माचा परधर्मसहिष्णुतेचा मूलगामी दृष्टिकोन हे होय. दुसरे कारण म्हणजे राजकीयदृष्ट्या भारतातील सगळ्याच जमाती राजकारणवमुख होत्या. जनमानसात राजकीय सत्ता कोणाची असावी याबद्दल अभमान भावना नव्हती. किंबहुना समाज ही राजकीय संघटना असून समाजाचा घटक असलेल्या जाती वा व्यक्ती यांचे राजकीय हिताहितसंबंध म्हणून काही असतात व त्यांचा राज्यसत्तेशी अविभाज्य संबंध असतो, आणि राज्य कोणाचे व कशाप्रकारचे असले म्हणजे आपले हिताहिताचे संबंध कसे ठरतात व बदलतात याचीही जाणीव नव्हती.

ब्रिटिशांनी भारतात राजकीय जागृती होऊ लागली आहे हे पाहिल्यावर हिंदू-मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर इत्यादी भेदांना राजकीय वितुष्टांचे कारण बनवले. साम्राज्यशाही दृढमूल करण्याकरता हा एक प्रकारचा शासित प्रजांमध्ये एकजूट होऊ नये म्हणून रचलेला कटच होता. यालाच टिळकांनी 'फोडा व झोडा'ची राजनीती असे समर्पक रीतीने म्हटले.

ब्रिटिश राज्यकर्ते मुसलमानास सांगू लागले की, हिंदू लोक राजकीय हक्क मागत आहेत, या राजकीय हक्कांच्या प्राप्तीने हिंदू समाज बलवान होऊन अल्पसंख्याक जमातींना डोईजड व खाऊन टाकील. वस्तुत: मुसलमान लोकांना हे समजावयास पाहिजे होते की, आधुनिक राजकीय हक्क हे जाती-जमातींचे सवता-सुभा निर्माण करणारे हक्क नसतात, ते हक्क सर्वांचे समान हक्क असतात, त्यात प्रत्येक धर्माचे धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्य शाबूत राहते आणि त्या हक्कांनी समाजातील सर्व वर्गांचे व व्यक्तींचे सामर्थ्य वाढीस लागते, कारण त्यात स्वातंत्र्याचा विकास अभप्रेत असतो. मुसलमान समाजात त्याकाळी आधुनिक शिक्षणाचा हिंदूंच्या मानाने अत्यंत अल्प प्रसार झाला असल्यामुळे वरील प्रकारची राजकीय जाणीव देणाऱ्या सुशिक्षित वर्गाची त्यांच्यात वाण होती. त्यामुळे इंग्रज सत्ताधीशांना त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन दुही माजविण्याच्या कार्यात यश आले.

त्या वेळच्या हिंदू-मुसलमानांमधील दुहीच्या कारणांचा विचार करू गेले असता दंगे कसे उद्भवतात याचे कोणतेही एक कारण सापडत नाही. एखाद्या वेळेस गोरक्षण, एखाद्या वेळेस ताबूत आणि दुसऱ्या एखाद्या वेळेस हिंदू अगर मुसलमानांची यात्रा, असली काहीतरी फालतू नमित्ते सापडतात. दंगे सुरू होण्याच्या पूर्वी शंभर वर्षे गोवधबंदी नव्हती. मुसलमान, इंग्रज, ख्रिश्चन हे गोमांस खात असत. ताबूतही शेकडो वर्षे निघत, उरूस व यात्रा भरत; परंतु केव्हाही दंगा झालेला नाही. इंग्रजांनी मुसलमानांच्या मनात राजकीय स्वार्थबुद्धिस्तव पाप भरले. त्यामुळेच गोरक्षण, ताबूत, यात्रा इत्यादी थोड्याशा नमित्तांनी ते पाप पेटू लागले. हायकोर्टातील इंग्रज न्यायाधीशसुद्धा हे पाप भरविण्याच्या कामी हातभार लावू लागले. उदाहरणार्थ कोणत्याही मुसलमानास हवी तेथे गाय मारण्याचा अधिकार आहे, भर रस्त्यात मुसलमानाने गाय मारली तरी हिंदू लोकांची मने धर्मदृष्ट्या दुखवण्याचा त्यांच्यावर गुन्हा

लागू होत नाही, असे निर्णय हायकोर्टातील न्यायाधीशसुद्धा सांगू लागले. एकप्रकारे मुसलमानास फूस देण्याचाच गुन्हा ते करीत होते. ख्रिश्चन लोक गोमांस खातात म्हणून हिंदू लोक चिडल्याचे एकही उदाहरण सापडत नाही. धारवाडी काट्यात घातल्याप्रमाणे समतोल एका मापाने हिंदू-मुसलमानांस न्याय देण्याचे धोरण ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी सोडून दले.

टिळकांनी यासंबंधी महत्त्वाचे उपाय सुचवले आणि मुसलमानांनाही समजावून सांगितले की, या देशात दोनच विरोधी बाजू आहेत. एक बाजू इंग्रजी राज्यकर्त्यांची आणि दुसरी बाजू शासित प्रजेची; हिंदू, मुसलमान, पारशी, शीख, ख्रिश्चन इत्यादी प्रजांचे राजकीय हितसंबंध समान आहेत. राजकीय हक्क मिळाले तर त्यात सर्वांचाच उद्धार व उत्कर्ष आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीचे श्रेष्ठ साधन काँग्रेस असून ती हिंदू व मुसलमान असले भेद गृहीत धरीत नाही. टिळकांनी राज्यकर्त्यांना सुचवले की, हिंदू लोक गाईस पूज्य मानतात म्हणून जर ते मुसलमान मोहल्ल्यात जाऊन बलात्काराने गाय सोडवून आणतील तर त्यांचाही इंग्रज सरकारच्या कायद्याने बंदोबस्त झाला पाहिजे. हिंदू लोकांस ज्याप्रमाणे आपले सणवार करण्याचा अधिकार आहे त्याचप्रमाणे मुसलमान लोकांसही आहे व जाणूनबुजून जोपर्यंत एकजण दुसऱ्याच्या वाटेस जात नाही अगर मन दुखविण्याचा प्रयत्न करीत नाही तोपर्यंत सरकारने नि:पक्षपाताने दोघांचेही सारखेच संरक्षण केले पाहिजे. महादजी शिंद्यांप्रमाणे इंग्रज लोकांनी हिंदू लोकांसाठी गायी न मारण्याची सनद मुसलमान लोकांपासून घ्यावी असे आम्ही म्हणत नाही व म्हटले असता इंग्रज सरकार ऐकावयाचे नाही; परंतु ज्या ठिकाणी गायी मारण्याची दुकाने नव्हती त्या ठिकाणी हिंदुंच्या भर वस्तीत मुसलमानांना सदर दुकाने घालण्याची परवानगी देणे म्हणजे हिंदू लोकांस विनाकारण चिथविण्यासारखे आहे. कोणत्याही धर्माचा अभमान न ठेवता दोघासही आपापल्या धर्माने वागण्याची सवलत द्यावी व विनाकारण एका जातीचे लोक दुसऱ्या जातीच्या लोकांस हरकत करू लागल्यास त्याचे राजाने शासन करावे हेच शहाणपणाचे तत्त्व आहे. टिळकांनी दुसरा उपाय असा सुचविला की, ''हिंदू-मुसलमानांमध्ये जो काही स्वभावत:च द्वैतभाव आहे तो शिक्षणाचा अधिक प्रसार झाल्याखेरीज व मुसलमानी धर्ममतांत आमच्या वेदान्ताची अधिक मिसळ झाल्याखेरीज कधीही पूर्णपणे नाहीसा व्हावयाचा नाही. यापैकी शिक्षण प्रसाराचे काम सरकारनेच अंगावर घेतले पाहिजे. दुसरे काम मौलवींच्या हातून होईल; परंतु या दोन्ही गोष्टी घडून येण्यास दिनावधी लागेल.'' ('हिंदू-मुसलमान संबंध' पृ. २४३-२५८)

सामाजिक रचनेतून निर्माण होणारे प्रश्न व राजकीय प्रश्न यांची गुंतागुंत कशी असते याचे स्वरूप वरील विवेचनावरून लक्षात येते.

हिंदू-मुसलमानांसंबंधी समस्या टिळक व गांधी यांना अखेरपर्यंत नडली. दोघांनी शर्थीने प्रयत्न केला तरी यश येऊ शकले नाही. पाक व भारत अशी एका राष्ट्राची शकले पडली. ब्राह्मणब्राह्मणेतर प्रश्नाचा निकाल मात्र स्वराज्याच्या आंदोलनाच्या अखेरच्या पर्वात म्हणजे

गांधी युगाच्या दुसऱ्या कालखंडात अनुकूल लागला. गांधी युगाचे असहकारिता काल, सविनय कायदेभंग काल व 'भारत छोडो' काल असे तीन कालखंड पडतात. त्यापैकी हे दुसरे व तिसरे कालखंड होत.

ब्रिटिश सत्ता व भारताची एकराष्ट्रीयता यांचा संबंध

भारताची एकात्मक संस्कृती सामान्यपणे गेल्या तीन सहस्र वर्षांनी घडवलेली असली तरी हिंदू-मुसलमान, ख्रिस्ती, पारशी इत्यादिकांचे एक राष्ट्र बनण्याचा पाया ब्रिटिश राज्यसत्तेखाली घातला गेला; याची दखल हिंदू-मुसलमानादिकांचे राजधर्मबंधुत्व या शब्दाने टिळकांनी अनेक ठिकाणी घेतली आहे. ''राजधर्माचे नवे उपदेशक यांतील बीज काय?'' (सन १८९३) या लेखात दादाभाई नौरोजींच्या थोर विचारांचे सारग्रहण करीत असता विस्ताराने याच मुद्याचा ऊहापोह टिळकांनी केला आहे, ते म्हणतात, ''महाराणीच्या सार्वभौम सत्तेखाली सर्व हिंदुस्थानभर शांतता होऊन हिंदू, मुसलमान, पार्शी वगैरे सर्व जातींच्या व धंद्यांच्या लोकांस त्यांनी एकाच वर्गात ओढून त्यांच्या हिताहिताचा एकसंबंध करून टाकिला आहे. इंग्रजी राज्यापूर्वी कोठे मराठे, कोठे मुसलमान, कोठे शीख व कोठे राजपूत आपापल्या सामर्थ्याप्रमाणे राजवैभवाचा उपभोग घेत अगर दुसऱ्याचे अंकित होऊन राहत. आमच्या दुर्दैवाने अगर सुदैवाने तसा प्रकार आता राहिला नाही. राज्यवैभव सर्व इंग्रज लोकांनी आपल्या हातात राखून ठेवले आहे, व हिंदू, मुलसमान व पार्शी वगैरे निरनिराळ्या जातीतील लोकांच्या गुणदोषात कितीही अंतर असले तरी ह्या सर्वांस 'नेटिव्ह' या एकाच वर्गात घालून त्यांस जे काय अधिकार अथवा हक्क द्यावयाचे तेही सारखेच दले आहेत; सारांश राज्यकर्ते व प्रजा असे राजकीयदृष्ट्या दोनच वर्ग हल्ली हिंदुस्थानात आहेत असे म्हटले तरी चालेल. निरनिराळ्या जातीतील लोकांस आपली खरी स्थिती कळू लागेपर्यंत जातीजातींतील पूर्वापार चालत आलेली वैमनस्ये नष्ट व्हावयाची नाहीत हे खरे आहे; तथापि तसा दिवस येण्यास फार अवकाश लागेल असे हल्लीच्या चिन्हांवरून दिसत नाही. सर्व जातींतील सुशिक्षित लोक एकदिलाचे आहेत हे काँग्रेससारख्या संस्थांवरून व मुंबईतील दंग्याच्या हकीकतीवरून व्यक्त होत आहे व इंग्रज सरकारचे राज्य कांही दिवस राहिल्यास हे आमचे राजधर्मबंधुत्व उत्तरोत्तर वाढत जाऊन अखेरीस आम्ही व राज्यकर्ते असे दोनच लौकिकदृष्ट्या वर्ग होतील अशी आमच्या राज्यकर्त्यांची व आमची उमेद व आशा आहे; परंतु जे दोन वर्ग सांगितले त्यांची व्यावहारिक स्थिती एकमेकांहून फार भिन्न आहे. हमालयापासून कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र शांततेची ध्वजा फडकत आहे हे खरे; पण ही शांतता राखण्यास आमच्या भाकरीपैकी निम्मी भाकर राज्यकर्ते व त्यांचे व्यापारी बंधू यांस दरवर्षी द्यावी लागत असल्यामुळे आम्ही उत्तरोत्तर कंगाल होत चाललो आहो, व स्थिती कायम राहिल्यास 'आमचे पुढे होणार तरी काय?' याची विचारी मनुष्यास धास्ती वाटू लागली आहे. पूर्वीच्या काळी हिंदू, मुसलमान, शीख यांपैकी कोणाच्याही मनात

असले विचार आले असता जो तो आपापल्या जातीपुरते पाहत असे; परंतु तसा विचार आपणांस आता करता येत नाही, इतकेच नव्हे तर कोणी करूही देणार नाही. आमच्या राज्यकर्त्यांचे सामर्थ्य इतके जबर आहे की, वर सांगितलेल्या जातींपैकी कोणाचाही निरर्थक शिरजोरपणा ते चालू देणार नाहीत. सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांस जे काय करणे असेल ते त्यांनी एकदिलाने केले पाहिजे मग कोणाचे सामर्थ्य कमी असो किंवा जास्त असो, ते भेद लक्षात घ्यावयाचे नाहीत, इंग्रजी राज्याने हिंदुस्थानातील सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांची एक मोळी केली आहे व त्या मोळीचा बंध तुटून पुन: त्यातील लाकडे निरनिराळी होऊ नयेत अशी व्यवस्था करण्याचे सामर्थ्यही त्यांच्यात आहे. 'ब्रिटिश राज्यामुळे आम्ही एकत्र आलो, ब्रिटिश लोकांनीच आम्हास एकत्र होण्यास शिकवले,' असे जे ऑनरे. मि. दादाभाई वरचेवर उद्गार काढितात त्यातील रहस्यही हेच होय, हे कोणीही विसरता कामा नये. किंबहुना जो विसरेल तो घसरेल, किंबहुना तो पडेलच. या राजकीय स्थितीचे खरे स्वरूप व महत्त्व मि. दादाभाई यांनी जितक्या चांगल्या रीतीने ओळखले तितके ते दुसऱ्या कोणत्याही हिंदुस्थानाच्या मुत्सद्याच्या मनात बिंबले असेल की नाही याची वानवा आहे. आमच्या भोवती इंग्रजी राज्याची जी मिठी पडली आहे ती अभेद्य आहे. इतकेच नव्हे तर तिनेच आपणास एकत्र केले आहे. तिचे बंधन कायम असेल तरच आमचा सांधा बेमालूम जडेल अशी या महापुरुषाची दृढ खात्री झाली आहे.''

हिंदू, मुसलमान इत्यादिकांचे एकराष्ट्रीयत्व

दादाभाईंची ही भारताच्या राष्ट्रीय ऐक्याची ऐतिहासिक उपपत्ती टिळकांनी सर्वस्वी स्वीकारून आपला राजकीय ध्येयवाद उभारला. हिंदू-मुसलमान इत्यादिकांचे भारत हे एक राष्ट्र म्हणून निर्माण होत आहे, या एकराष्ट्रीयत्वाच्या शक्तीनेच भातर स्वतंत्र व स्वराज्यसंपन्न होईल असा पक्का कयास बांधला. हिंदू-मुसलमान इत्यादी समान हितसंबंधांचे नात्याने बांधलेल्या नागरिकांचे एक स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याच्या उद्योगास टिळक लागले. गांधी, हेच वैचारिक सूत्र गृहीत धरून अखेरपर्यंत लढले. टिळकांनी लोकशाही स्वराज्य पक्षाचा जाहीरनामा १९२० साली काढला त्यातही याच हिंदू-मुसलमान ऐक्याच्या सूत्रानुसार 'हिंदू-मुसलमान ऐक्य' हा कार्यक्रमाचा भाग म्हणून समाविष्ट केला. या ठिकाणी ही गोष्ट विशेषपणे ध्यानात धरली पाहिजे की टिळक हिंदू-मुसलमान बेबनावाच्या चर्चेच्या संदर्भात हिंदू, मुसलमान व ब्रिटिश राज्यकर्ते असे तीन पक्ष निर्दिष्ट करतात, तो निर्देश पक्ष म्हणजे राजकीय पक्ष या अलीकडे रूढ झालेल्या अर्थाने नव्हे तर भांडणातील तीन बाजू या अर्थाने. कित्येक ठिकाणी 'हिंदुराष्ट्र', 'महाराष्ट्र हे राष्ट्र' अशीही शब्दावली वापरतात. त्यात 'राष्ट्र' शब्द राज्यशास्त्रातील प्रसिद्ध अर्थाने वापरलेला नसून सांस्कृतिक वैशिष्ट्यांनी बांधलेला किंवा भाषिक ऐक्याने बांधलेला प्रादेशिक लोकसमूह एवढ्याच अर्थी वापरलेला आहे असे मानले पाहिजे, राजकीय अर्थाने नव्हे. तसाच 'हिंदुराष्ट्र' म्हणजेच सांस्कृतिक वैशिष्ट्यांनी

बांधलेला एक लोकसमूह व महाराष्ट्र म्हणजे भाषिक व प्रादेशिक ऐक्याने एकवटलेला लोकांचा समूह, राजकीय अर्थाने नव्हे. भाषिक व प्रादेशिक वैशिष्ट्ये राहूनच सांस्कृतिक समानता कायम होते व त्याप्रमाणे सांस्कृतिक वैशिष्ट्ये कायम राहूनही भिन्न सांस्कृतिक लोकसमूहाच्या राजकीय व राष्ट्रीय एकात्मतेला बाधा येऊ नये अशी टिळकांची धारणा होती व ती खऱ्या अर्थाने आधुनिक अमेरिका, ब्रिटन इत्यादी राष्ट्रांनाही लागू होते. परंपरागत हिंदुत्व किंवा एकभाषिक प्रादेशिकता यांनी भारताचे एकराष्ट्रीयत्व मर्यादित होऊ शकत नाही. हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, शीख, आदिवासी इत्यादी भारतात राहणारे एकराष्ट्रीयच होत. जातिभेद वा धर्मभेद यांच्या अतीत अशा नूतन ऐहिक राजधर्माने भारतास एकराष्ट्रीयत्व देणे आवश्यक आहे अशी टिळकांची धारणा होती व अशी धारणा सतत व्यक्त केली जाई. ते म्हणतात - ''हिंदुस्थान ही आमची मातृभूमी आणि देवता, हिंदुस्थानवासी हेच आमचे बांधव आणि वस्तुस्थिती; हे लक्षात आणून आमची राजकीय व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी एकनिष्ठपणाने व स्वार्थाकडे लक्ष न देता सतत परिश्रम करणे हाच आमचा राजधर्म आहे. भारताबाहेरच्या क्षेत्रातही हेच धोरण पूर्णपणे व्यक्त होत आहे; व त्यास (दादाभाईस) हल्ली जो सन्मान मिळत आहे त्यावरून या राजधर्माचा हिंदुस्थानभर लवकरच प्रसार होईल अशी आमची खात्री आहे.'' ('राजधर्माचे नवे उपदेशक')

इंग्रजी राज्याचे श्रेय आधुनिक जीवनदृष्टी

इंग्रजी राज्यामध्येच भारताला आधुनिक एकराष्ट्रीयत्व प्राप्त होण्याची मोठी सुवर्णसंधी मिळाली आहे. हे इंग्रजी राज्याचे श्रेय टिळक वारंवार निर्दिष्ट केल्यावाचून राहत नाहीत. इंग्रजी राज्याचे एवढेच श्रेय नव्हे तर इतर पुष्कळशा गोष्टीत जे श्रेय मिळाले आहे त्याची तपशीलवार दखल 'इंग्रजी राज्यामध्ये आम्हांस फायदा काय झाला' या लेखात (पृ. ५०) त्यांनी घेतली आहे. आधुनिक जीवनदृष्टी, लेखनस्वातंत्र्य, कायद्याचे राज्य, आधुनिक विज्ञानावर आधारलेला आर्थिक व औद्योगिक विकासाचा पाया, सार्वजनिक आरोग्य व आधुनिक शिक्षणामुळे प्राप्त झालेली लोकशाही स्वराज्याची कल्पना इत्यादी गोष्टी होत. उदारमतवादी ब्रिटिश संस्कृतीशी संबंध आल्यामुळे एक प्रकारची क्रांती घडून आली आहे व त्या क्रांतीच्या योगाने भारत या नव्या युगात प्रवेश करून स्वातंत्र्याकरिता झगडत राहील व स्वराज्य प्राप्त करून घेईल असा आत्मविश्वास टिळकांनी व्यक्त केला आहे. ते म्हणतात : ''पाश्चात्त्य शिक्षणाच्या योगाने तद्द्वारा परिचित झालेल्या अनेक प्रकारामुळे आम्ही राजकीय हक्कांची मागणी केली व त्यासाठी राजकीय व्यवस्थेचाही विचार करू लागलो. आम्हाला राज्यकारभारात घ्या व आमच्या सल्लामसलती घ्या, तुमच्यातला हा दोष काढा, अमुक संग्रह करा, अमुक कर नको आणि तमुक नको, येथे तुम्ही चुकता, तिकडे तुमचे लक्ष पोचत नाही इत्यादी गोष्टी नीटपणे सरकारला सांगण्याचा आमचा हक्क आहे. हे तत्त्व आमच्या हल्लीच्या राजकर्त्यांनी कबूल केले आहे व त्याप्रमाणे प्रजेचे म्हणणे ऐकावयास मिळण्यास

त्यांनी आपण होऊन साधन तयार केले. वर्तमानपत्रांचे स्वातंत्र्य आणि उच्च शिक्षणाची सोय यांचा मुख्य हेतू हाच आहे.''

टिळकांच्या पुढील एक मुख्य प्रश्न - ''की इंग्रजी राज्यात शांतता असली तरी आमची स्थिती अत्यंत खराब आहे, दारिद्र्याची आमच्यावर अत्यंत पकड बसत चालली आहे. शौर्य, नीती, अभमान, साहस वगैरे राजतेजांचा लोप शोचनीय रीतीने कसा होत चालला आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. अशा वेळी ही स्थिती सुधारावयास आता आम्हास काही मार्ग आहे काय असा प्रश्न उत्पन्न होतो.'' टिळकांनी राजकारणात प्रत्यक्ष प्रवेश केल्यानंतर, त्यांच्या राजकीय जीवनाच्या पहिल्या कालखंडात त्यांच्या मनाला छळणाऱ्या वरील प्रश्नांचे प्रथम उत्तर कसे मिळाले? त्यांची ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या उदार धोरणावर श्रद्धा होती. कारण भारताला खऱ्या अर्थाने जबाबदार राज्यपद्धतीचा हक्क देणे आवश्यक आहे ही गोष्ट अनेक ब्रिटिश तत्त्ववेत्त्यांनी व ब्रिटिश राजकीय नेत्यांनी वारंवार बोलून दाखविली होती. त्यांना असे वाटत होते की ''आमच्या दु:स्थितीबद्दल विलायतच्या लोकांना समजावून दले पाहिजे. ३० कोटी प्रजेस न्याय द्या अशी त्यांच्या कानीकपाळी ओरड केली व ब्रिटिश पार्लमेंटमध्ये दादाभाईसारखे भारताचे मुखत्यार म्हणून निवडून आले आणि राजकीय सुधारणा क्रमाक्रमाने प्राप्त होऊ लागली. आमच्या मागण्यांपैकी सर्वच नाही तर बऱ्याच मंजूर करून ते परतले. सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा हिंदुस्थानात होऊ शकली व स्थानिक स्वराज्याचा अधिकार देऊन आमच्या देशातील राज्यकारभारात आमची मतेही घेण्यात येऊ लागली. या सर्व गोष्टी न्याय्य आहेत व केव्हा ना केव्हा तरी आम्हाला न्यायच प्राप्त होईल हे खरे आहे. विलायतच्या लोकांच्या न्यायबुद्धीचे आम्हास आश्चर्य वाटते.''

ब्रिटिश राज्यकर्त्यांविरुद्ध असंतोष, टीका व काँग्रेसची स्थापना

जसजसा काळ पुढे लोटत गेला तसतसे ब्रिटिश सत्तेचे दुष्परिणाम वाढत गेले व येथील राजकीय दृष्टीने जागृत झालेले सुशिक्षित नवे नेते गोखले, रानडे, फेरोजशहा मेहता, बिपीनचंद्र पाल, लाला लजपत राय इत्यादी मंडळी भारताच्या राजकीय आकाशात तेजाने तळपू लागली. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही की भारताकडे राजकर्मचारी म्हणून आलेले वेडरबर्न, ह्यूम इत्यादी उदारमतवादी व भारतीय जनतेबद्दल सहानुभूती बाळगणारे ब्रिटिश गृहस्थ भारतीय नेत्यांच्या सहवासात आले व ब्रिटिश राजवटीच्या बळकट व जुलमी पद्धतीचे दोषान्वेषण अधिक जिद्दीने, मोठ्या कळकळीने व अभ्यासपूर्ण रीतीने करू लागले. सर ह्यूम व वेडरबर्न यांनी पुढाकार घेऊन देशातील लोकांच्या साहाय्याने इंडियन नॅशनल काँग्रेस या महान संस्थेची स्थापना केली. ही संस्था भारताच्या राजकीय जागृतीचे सर्वश्रेष्ठ लक्षण ठरली. या संस्थेच्या शाखा देशभर पसरू लागल्या. त्यात वारंवार ब्रिटिश राजनीतीच्या दोषांचे आविष्कार होऊ लागले. त्यांचे पडसाद उठू लागले. ब्रिटिश राज्यकर्ते याची दखल घेऊ लागले, एवढेच नव्हे तर खुशीने वा नाखुशीने देशाच्या राजकीय

परिस्थितीचे संपूर्ण मूल्यमापन करण्याकरिता अखेर रॉयल कमिशन नेमण्यात आले. या कमिशनपुढे १८९७ साली महत्त्वाच्या साक्षी झाल्या. तयात गोपाळ कृष्ण गोखले यांची साक्ष फार प्रभावी ठरली. टिळकांनी केसरीत यासंबंधात एक विस्तृत लेख लिहिला. त्यात ते म्हणतात - ''इंग्रजी राज्याचा आमच्या लोकांवर काय परिणाम होत आहे यावर प्रा. गोखले यांची टीका कळकळीची आणि जोरदार आहे. ते म्हणतात की इंग्रजी राज्याचे जे परिणाम झाले ते हे की आमच्या सर्व तऱ्हेच्या महत्त्वाकांक्षा विरून जाऊन उंबरांतल्या किड्यांप्रमाणे आमची स्थिती झाली आहे. इंग्रजी राज्य म्हणजे एक रूळ असून तो आमच्या डोक्यावरून फिरवला जात आहे, व सर्वांची योग्यता एकसारखी परंतु क्षुद्र अशी होणार आहे; तरी स्वराज्याचे स्वत्व जे असते, तेज:पुंज जे असते, पाणी जे असते, ते आजच्या या स्थितीत नाहीसे झाले आहे.''

या परिस्थितीमुळे नैसर्गिक रीतीने जे विचार प्रकट व्हावयाचे ते देशाच्या वृत्तपत्रांमधून ब्रिटिश राजवटीविरुद्ध प्रकट होऊ लागले. याकरिता राजद्रोहाचा कायदा बदलल्याशिवाय गत्यंतर नाही असे राज्यकर्त्यांनी ठरवले. वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर नियंत्रण घालण्याचा राजकर्त्यांचा विचार स्पष्ट होऊ लागला. इंग्रजांच्या राज्यात लोकांच्या गाऱ्हाण्यांची दाद लागेल असे वाटेनासे झाले. अज्ञान, दारिद्र्य, विपत्ती, जुलमी कायदे व आर्थिक अवनती यांच्या योगाने जनता नि:सत्व होऊन अवनतीच्या तळाला कशी पोचली याची मीमांसा सुरू झाली.

साम्राज्यशाहीची मीमांसा

टिळक १८९९ मध्ये दोन वर्षांच्या कारावासातून सुटले व पुनश्च हरि:ॐ (४ जुलै १८९९, पृ. ९४) म्हणून राष्ट्राचे म्हणजे भारतीय जनतेचे ऋण आपणावर आहे अशा कृतज्ञतेच्या व कर्तव्यनिष्ठेच्या धारणेने स्वराज्यप्राप्तीच्या यत्नास लागले. ते 'पुनश्च हरि ॐ' या लेखात म्हणतात की, ''काँग्रेससारख्या संस्थेने आमच्या मनात ज्या आशा उत्पन्न केल्या आहेत त्या सफल करण्याच्या उद्योगास हरएक प्रकारे लागले पाहिजे.'' त्यांनी कारावासात असताना पश्चिमी साम्राज्यशाहीचे स्वरूप व कार्य यांचे आमूलाग्र चिंतन केले व बाहेर पडले तेव्हा मनाशी निर्णय केला की, गेल्या दोन शतकांत आधुनिक युरोपियन साम्राज्यशाह्यांचा पृथ्वीच्या सर्व खंडांवर विस्तार झालेला आहे व अजूनही ब्रिटिश साम्राज्यशाही विस्तारवादी असुरी महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन आशियाई जग संपूर्ण पादाक्रांत करण्यास सरसावली आहे; ('खोटे कोण', 'आणीबाणीची वेळ', 'लॉर्ड कर्झनची कारकीर्द', 'तत्त्ववेत्ता व मुत्सद्दी' इ. लेख पाहा.) व ती भारताच्याच नव्हे तर आशियाई जनतेच्या किंबहुना सर्व मानवजातीच्या नैतिक व सांस्कृतिक अध:पाताचे कारण बनली आहे. टिळकांच्या साम्राज्यशाही मीमांसेत कार्ल मार्क्स व लेनिन यांच्या साम्राज्यशाही मीमांसेचेही निष्कर्ष अंतर्भूत होतात; परंतु या संदर्भात हे लक्षात ठेवले पाहिजे की, कार्ल मार्क्सचे विचार त्यांच्या अध्ययनात आले होते,

असे म्हणता येत नाही. लेनिनची माहिती तेव्हा रशियाबाहेर नव्हती. ही त्यांची मीमांसा भारतीय परिस्थितीच्या व नेत्रांसमोर प्रत्यक्ष घडत असलेल्या साम्राज्यशाहीच्या इतिहासाच्या अनुभवातून निघाली आहे. त्यामुळेच आधुनिक साम्राज्यशाहीच्या विरोधी क्रांतीचा पहिला नेता ही पदवी टिळकांना प्राप्त होते, असे आधुनिक मानवेतिहासाला सांगावे लागेल. मार्क्स व लेनिन यांच्या मीमांसेत टिळकांनी भरही घातली आहे. ते थोर आध्यात्मिक तत्त्वचिंतक होते. त्यांनी असा सिद्धान्त मांडला आहे की, मानवी स्वातंत्र्याचा अपहार करणाराही स्वत: स्वातंत्र्य गमावतो; म्हणून जी राष्ट्रे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने साम्राज्यवादी बनली तीही मानवी स्वातंत्र्य गमावून बसत आहेत.

'पाच्छाहीपणा का गुलामगिरी' (पृ. १०६ ते ११२, १६ डिसें. १९०२) या लेखात ते म्हणतात : ''हल्ली पाश्चमात्त्य राष्ट्रांमध्ये इंपीरअ‍ॅलिझम्ची अथवा पाच्छाहीपणाची जी एक भयंकर लाट उसळली आहे व जिने मोठमोठ्या मुत्सद्दी, धीर व विचारी लोकांसही घेरून टाकले आहे, तिचे थोडक्यात स्वरूप सांगावयाचे म्हणजे आमच्या आंगात तुमच्यापेक्षा अधिक बळ आहे म्हणून तुम्ही आमचे वर्चस्व सर्वस्वी कबूल करून आमचे गुलाम म्हणून राहले पाहिजे अशा प्रकारची स्वत:च्या बलिष्ठपणाविषयीची आसुरी कल्पना होय... इंग्रज लोक हे जगाचे स्वामी, त्यांच्या सुखाकरिता उपभोग्य वस्तुंचा संग्रह म्हणून इतर देश परमेश्वराने निर्माण केले आहेत व यामुळे या परमेश्वराच्या लाडक्या लेकरांच्या बरोबरीचे हक्क इतर देशांतील लोकांस देणे हे आमच्या आकाशातील बापाच्या इच्छेविरुद्ध आहे; अशा प्रकारच्या कल्पना हळूहळू इंग्रजी समाजात पसरत चालल्या आहेत... यावर कोणी आम्हास असा प्रश्न करतील की, इंग्रजी राष्ट्रात संचार करीत असलेल्या या पाच्छाहीपणामुळे इतर देशांची हानी होऊन ते देश गुलामगिरीच्या चिखलात जरी अधिकाधिक रुतत गेले तरी त्यामुळे इंग्रजी राष्ट्राची तर उन्नती होईल ना? व होत असेल तर इंग्रजी मुत्सद्यांस दुसऱ्या राष्ट्रांच्या हिताहिताकडे पाहण्याची जरूर नाही; खरे आहे; पण सर्वांनी नेहमी एवढेच लक्षात ठेवले पाहिजे की, अधिकार व गुलामगिरी या काही नित्य परस्परविरोधी गोष्टी नाहीत... व जे राष्ट्र अधिकाधिक अधिकार मिळवीत चालले आहे त्यास ते त्याचप्रमाणे गुलाम बनत चालले आहे असे म्हणणे असंभवनीय नाही... इंग्रजी राष्ट्र अथवा समाज व्यक्तींचा समुदाय आहे व यातील प्रत्येक व्यक्तीस ज्यामानाने अधिकाधिक स्वातंत्र्य भोगता येईल त्या मानाने तो समाज गुलामगिरीपासून अलिप्त राहील. या दृष्टीने जर हल्लीच्या पाच्छाहीपणाच्या कल्पनेने इंग्रजी समाजातील व्यक्तिस्वातंत्र्य कमी होत चालले आहे असे दाखविता येईल तर ही कल्पना जसजशी अधिकाधिक बळावत जाईल तसतसे व्यक्तिस्वातंत्र्य कमी कमी होत जाणार हे उघड आहे. आणि पाच्छाहीपणा म्हणजे गुलामगिरीच होय, हे यावरून सहज सिद्ध होण्यासारखे आहे... मालक आणि चाकर हे शब्द जरी अन्योन्य प्रतियोगी असले तरी... या दोघांपैकी चाकर तेवढाच मात्र गुलाम असे नसून, मालक आणि चाकर हे दोघेही

गुलाम आहेत. जो मनुष्य दुसऱ्याला आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करतो तो स्वत:च त्याच्या ताब्यात असणाऱ्या मनुष्याइतका आपण बांधला गेलेला असतो.''

असा शुद्ध तर्कशास्त्र पद्धतीने सिद्धांत मांडून टिळक दृष्टांताने तो स्पष्ट करतात - ''दूरवरच्या अंतरावरून पकडलेल्या वहमी गुन्हेगारांस कैद करून नेणाऱ्या व दंडाधिकाऱ्याच्या स्थानाकडे नेणाऱ्या प्रवासी पोलीस लोकांची रात्री अपरात्री काय स्थिती होते? रेल्वेचा प्रवास करीत असता पोलिसांना सतत जागृत राहावे लागते. कैद्यावर लक्ष ठेवावे लागते, त्यांच्या नैसर्गिक क्रियांच्यावेळी मदत करावी लागते वगैरे वगैरे. जिंकलेले राष्ट्र किंवा जिंकणारे राष्ट्र हे कैदी व पोलीस यांच्यासारखेच असतात.'' असे विस्ताराने सांगून त्याकरिता ब्रिटनमधील संसदीय निवडणुकींची व इतर उदाहरणे देतात; ते म्हणतात - साम्राज्यवादी सत्ता व दडपण व पैसा याचा वापर करून आपल्या कच्छपि असलेल्या बगलबच्चांची संसदेमध्ये भरती करून बहुमत मिळवितात. त्यामुळे तत्त्वज्ञ हर्बर्ट स्पेन्सर म्हणतो त्याप्रमाणे लोकशाहीचा नुसता देखावा मात्र शिल्लक राहतो. पैसेवाल्यांचे प्राबल्य तर वाढत चाललेच आहे; परंतु या सधन लोकांपेक्षाही लष्करी लोकांचे महत्त्व अधिकाधिक होत चालले आहे. लष्करी लोकांचे प्रस्थ इंग्लंडमध्ये माजल्यामुळे गोरगरबांवरील करांचा भारही सतत वाढत आहे. बुद्धीचा व उच्च शिक्षणाचा मान कमी होऊन लष्करी शिपाई बनण्याची इंग्रजी पोरांना हाव सुटली आहे. मानसिक शक्तीपेक्षा शारीरिक शक्तीचाच विशेष गौरव करण्यात येत आहे. विद्यापीठीय पंडित व बुद्धमान विद्यार्थी यांच्या पेक्षा क्रीडापटूंची वाहवा वृत्तपत्रांतून व सचित्र नियतकालिकातून अधिक होत असते. धर्मसंस्थेचाही अध:पात झाला आहे; धर्मोपदेशक गुरू प्रार्थना मंदिरांतून युद्धाच्या प्रवचनांवर भर देऊ लागले आहेत व ख्रिश्चन धर्माचे आचार्य आपणास सेनापती, कर्नल, कप्तान अशा पदव्या घेऊन लष्करी मानाबद्दलचा अभिलाष पुरा करून घेत आहेत. साम्राज्यवाद्यांना नित्य युद्धार्थ सज्ज राहावे लागते त्यामुळे स्पेन्सरने म्हटल्याप्रमाणे पार्लमेंट हे लष्करी खात्यास सर्व सामग्रीचा पुरवठा करणारे एक कमिसरिएटच बनल्यामुळे सभासदांचे व्यक्तिश: हक्क कमीतकमी होत आहेत. आणि पार्लमेंटच्या हातातील सत्ता दुबळी होऊन सालीसबरीच्या कुटुंबातील मुत्सद्दी सर्व सूत्रे हालवीत आहेत; यावरून इंग्रजी राष्ट्र अधिकाधिक गुलाम बनत चालले आहे ही गोष्ट सिद्ध होत नाही काय? इंग्रज लोक सुधारणेच्या माार्गावरून पुन: रानटीपणाच्या मार्गास लागत चालले आहेत ही गोष्ट कबूल करणे भाग नाही काय? राज्यलोभामुळे व पाच्छाहीपणामुळे इतर देशांचेच नव्हे तर स्वत: इंग्लंडचे नुकसान होत आहे व त्यापासून दूर राहणे हे इंग्रजी राष्ट्राचे कर्तव्य आहे. स्वत:चा व दुसऱ्याचा असे दोघांचेही गळे दोरीने एकत्र बांधले जात असता ती दोरी आवळण्याचा प्रयत्न करणे हे उभयतांसही श्रेयस्कर नव्हे. एवढ्यासाठीच इंग्लंडने जिंकलेल्या देशांना स्वातंत्र्याची जोड मिळवून देण्यास झटावे हेच हिताचे व नीतिदृष्ट्या भूषणास्पद आहे.''

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' अशी तुकारामाची बैठक धरून टिळक साम्राज्यवाद्यांना श्रेयाचा मार्ग दाखवीत आहेत - ''आधुनिक साम्राज्यशाही नष्ट होणे हा केवळ भारतापुरताच प्रश्न नसून तो अखिल मानवजातीच्या हिताचा प्रश्न आहे; असा मानवतावादी विचार हा द्रष्टा एका ठिकाणी (निकराने एकमुखी मागणी करा- दि. ९ ऑक्टोबर १९१७, लेखांक पृ. १७५ ते १८१) मांडतो. तो म्हणतो - महायुद्धाने युरोपातील राजकीय विचारांत क्रांती घडवून आणली आहे व स्वातंत्र्य, समता, लोकमत इत्यादी प्रश्नांना महत्त्व आले आहे. भारताचे स्वराज्य हा काही विशिष्ट जातींपुरता किंवा भारतापुरताच प्रश्न नसून 'पृथ्वीच्या पाचही खंडांत पसरलेल्या ब्रिटिश साम्राज्याच्या किंबहुना मानव जातीच्या हिताचा प्रश्न आहे. हिंदुस्थानास त्यापूर्वीच स्वराज्याचे हक्क दले गेले असते, तर त्याचे स्वरूप वेगळे दिसले असते. असा विचार मनात आला म्हणजे हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या मागणीत मानवजातीचा हितसंबंध कसा कसा ग्रथित झालेला आहे ते दिसून येईल.'' (पृ. १८१)

साम्राज्यशाहीच्या पाशातून मुक्त होणे ही भारताप्रमाणे आशियाचीही गरज आहे व आशियाच्या मुक्ततेत सर्व मानवजातीच्या आध्यात्मिक विकासाचा प्रश्न गुंतला आहे. अशा पारमार्थिक व राजकीय दृष्टिकोनातून प्रा. ओकाकुरा यांच्या एका उत्कृष्ट ग्रंथाच्या समीक्षेच्या संदर्भात ते आपले विचार मांडतात - ('पूर्वेकडील लोकांचे विचारैक्य' - दि. २८ एप्रिल १९०३, पृ. ११३ ते ११७) ''आशियाखंडातील लोकांचे विचारैक्य म्हणजे काय याचेच आधी पुष्कळास गूढ पडले; परंतु जगाच्या नकाशाकडे दृष्टी दिली असता आशियातील देशांस युरोपखंडातील राष्ट्रे कशी ग्राशीत चालली आहेत हे लक्षात येईल व ते लक्षात आले म्हणजे या ग्रासास पात्र झालेल्या देशांना असे काही सामर्थ्य आहे की नाही की जेणेकरून ही आपत्ती त्यांना टाळता येईल, असा कोणासही सहज विचार सुचणार आहे. फार प्राचीन काळापासून युप्रेटिस, सिंधु, गंगा, ब्रह्मपुत्रा व हो-हांग-हो या नद्यांचे काठी आशियातील राष्ट्रांच्या सुधारणेचा ध्वज फडकलेला आहे. अशोक राजाचे वेळी हिंदुस्थानात व सिरिया पॅलेस्टाईनपर्यंत एकीकडे व दुसरीकडे चीन-जपानपर्यंत हिंदू धर्माच्या छायेखाली वाढलेल्या बौद्ध भिक्षुंनी व उपदेशकांनी दोन्ही समुद्रांचा मानदंड असल्याप्रमाणे बौद्धधर्माचा दंड पसरून दिला. केव्हा ना केव्हा तरी चीन, ब्रह्मदेश, हिंदुस्थान आणि जापान या राष्ट्रातील 'आपण लोक एक आहोत' ही कल्पना कोणाही स्वतंत्र विचाराच्या पुरुषाचे डोक्यात आल्यावाचून राहिली नसती व तीच कल्पना प्रा. ओकाकुरा यांनी आपल्या ग्रंथात मांडली आहे. चीन व तिबेट या राष्ट्रांना हमालय पर्वत हिंदुस्थानापासून वेगळे करतो, हे खरे आहे पण त्या अत्युच्च पर्वतासही या दोन राष्ट्रातील विचारैक्य मोडवले नाही, हिंदुस्थान, चीन व जपान हे एकाच पंख्याचे भाग आहेत असे पंख्याचे रूपक प्रा. ओकाकुरा यांनी मांडले आहे.''

''पाश्चिमात्य राष्ट्रांची धाव ज्याप्रमाणे सुखोपभोगांकडे आहे त्याप्रमाणे पूर्वेकडील लोकांची नाही व आयुष्य सुखात घालविण्याच्या साधनांपेक्षा आयुष्याचे परिणामी साफल्य कसे होईल हाच विचार त्यांच्या डोळ्यापुढे नेहमी उभा असतो. आज जगात प्रचलित असलेले सर्व धर्म पूर्वेकडे म्हणजे आशिया खंडातील राष्ट्रांमध्ये प्रथमत: का निपजले याचे बीजही वरील भेदात आहे हे प्रा. ओकाकुरांचे म्हणणे बरोबर आहे. पूर्वेकडील राष्ट्रांतील लोकांमध्ये पाश्चमात्य राष्ट्रांतील लोकांपेक्षा विलक्षण असे जर एखादे विचारैक्य असेल तर ते वर निर्दिष्ट केलेलेच होय. जपानसारख्या स्वतंत्र राष्ट्रातील एका मर्मज्ञ विद्वानास पूर्वेकडील राष्ट्रांमध्ये असलेल्या ऐक्याची अशा रीतीने एकदा प्रचीती आल्यावर लवकरच त्यास 'सर्व ब्रह्ममयं जगत्' असे वाटू लागल्यास त्यात काही नवल नाही.''

टिळक अशा तऱ्हेने अध्यात्मवादी विचार सांगत असताना त्यांना पश्चमी ऐहिक भौतिक सुखवादी संस्कृतीची छाप जपानसारख्या अध्यात्मवादी परंपरेच्या देशावरही पडत आहे याची दु:खद जाणीव होऊन ते त्याची दखल घेतात नि नंतर म्हणतात - ''पाश्चिमात्य राष्ट्रांनी पूर्वेकडील राष्ट्रांतील हे विचारैक्य मोडून टाकून त्यास साम्राज्यशाही बंधनात कायम जखडून ठेवणे जरूर व शक्य आहे व असाच ईश्वरी संकेत आहे असे म्हणण्यापर्यंत काही पाश्चमात्य ग्रंथकारांची मजल येऊन ठेपली आहे; परंतु ज्या विचारैक्याला हिमालय पर्वत आड येऊनही बाधा झाली नाही ते विचारैक्य बुडवलेल्या भोपळ्याप्रमाणे केव्हा ना केव्हा तरी पाण्याच्या सपाटीवर तरंगून दृक्प्रत्ययास येईल हे निश्चित आहे. भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे भेदातही साम्य पाहणारी अशा प्रकारची दृष्टी कालांतराने प्रसार पावेल, फारशी पंचाईत पडणार नाही, असा ऐतिहासिक अनुभव आहे.'' टिळक पाश्चात्त्यांना इशारा देताना दुसरीकडे लिहितात - (खोटे कोण,? २१ फेब्रु. १९०५, पृ. ११८) ''युरोपियन राष्ट्रांत जर सत्याचा अभमान वाढला असेल तर तो एशियात उत्पन्न झालेल्या ख्रिस्ती धर्मामुळेच वाढलेला आहे. किंबहुना ख्रिस्त, महंमद, श्रीकृष्ण, बुद्ध व कन्फ्यूशस् वगैरे जे धर्मप्रवर्तक झाले ते सर्व एशियातच उत्पन्न झाले असून एकही युरोपात जन्मला नव्हता हे युरोपियन राष्ट्रांनी लक्षात ठेवले पाहिजे.''

भारतीय पारतंत्र्याचे सर्वांगीण स्वरूप टिळकांनी थोडक्यात मांडून औद्योगिक पारतंत्र्य हे ब्रिटिश साम्राज्यशाहीखाली भारतास कसे प्राप्त झाले आहे याची सविस्तर मीमांसा 'औद्योगिक पारतंत्र्य' (पृ. २७४ ते २७६), 'यापेक्षा जास्त अन्याय तो कोणता?' (पृ. २७७ ते २८०), 'दोन चांगली पुस्तके' (पृ. २८५ ते २९५), 'आमचे उद्योगधंदे कसे ठार झाले'? (पृ. २९६ ते ३०४) या केसरीतील लेखांमध्ये केली आहे. त्याप्रमाणे भारतीय शेतकीच्या धंद्याचा, शेतकरी समाजाचा व ग्रामीण अर्थव्यवस्थेचा ऱ्हास व अवनती होऊन शेतकरी कर्जबाजारी व भुकेकंगाल कसा झाला व या शोकांतिकेस ब्रिटिश राजकीय अर्थनीती कशी सर्वथा कारण झाली याचे हृदयविदारक चित्र 'शेतकऱ्यांचा कायदा', 'हिंदुस्थानातील शेतकरी लोकांस खरोखर बंड करावे लागेल काय?', 'शेतकऱ्यांच्या कमिशनाने काय केले?',

‘शेतकऱ्यांच्या कमिशनाने सुचवलेले उपाय’ या लेखांमध्ये (पृ. २५९-२७३) रेखाटले आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक अवनतीची संपूर्ण जबाबदारी ब्रिटिश अर्थनीतीवर कशी आहे याचे अर्थशास्त्रोक्त पद्धतीने हृदयाला खेचणारे व बुद्धीला वेधणारे विवरण टिळकांनी तर्कशुद्ध व प्रसन्न साहित्यिक शैलीने या लेखांमध्ये केले आहे.

सर्वांगीण पारतंत्र्याची सूत्रमय मांडणी करताना ते म्हणतात -

‘‘या आपल्या संसारात पारतंत्र्य अनेक प्रकारचे आहे. राजकीय पारतंत्र्य, धार्मिक पारतंत्र्य, औद्योगिक पारतंत्र्य आणि सामाजिक पारतंत्र्य, असे स्थूल मानाने या पारतंत्र्याचे भेद करता येतील. आता हल्लीची परिस्थिती पाहिली असता आपण राजकीय पारतंत्र्याचा विचार राष्ट्रीय परिषदेमध्ये, वर्तमानपत्रांमध्ये व सभांतून बराच करीत आहो असे दिसेल. धार्मिक पारतंत्र्य, विचारपारतंत्र्य व सामाजिक पारतंत्र्य यांचाही खल इंग्लिश लोकांचे राज्य स्थापन झाल्यापासून सुरू झाला आहे व सुधारक आणि नवविद्वेषी असे समाजामध्ये दोन पक्ष उत्पन्न होऊन उभयतांमध्येही मोठा संग्राम माजून राहिला आहे. या गोष्टी अर्थातच अत्यंत इष्ट होत. म्हणजे पूर्वोक्त पारतंत्र्याविषयी कडाक्याची भांडणे होत आहेत हा प्रकार आम्हांस फारच चांगला वाटतो. कारण उघडच आहे की, एकदा वाद उभा राहिला म्हणजे जुन्या गोष्टीत चांगला अंश किती, त्याज्य भाग किती, अथवा नव्यामध्ये घेण्यासारख्या गोष्टी कोणत्या व अनादर करण्यासारख्या गोष्टी किती यांचा वादामध्ये निकाल होऊन सामान्य जनास अथवा आग्रहशून्य लोकांस ‘वादे वादे जायते तत्त्वबोध’ या न्यायाने कोणते घ्यावयाचे, कोणते टाकावयाचे या गोष्टींचा तत्त्वबोध होऊन उत्तरोत्तर त्यांचे वर्तन सुधारत जाते, आणि वादाच्या सवयीने बुद्धीस कुशाग्रत्व येऊन विचार करण्याचा सराव राहतो. या विवेचनावरून वाद होणे हे इष्ट आहे, असे सहजच कळून येईल. आता राहल्यांपैकी औद्योगिक पारतंत्र्य अथवा उद्योगासाठी दुसऱ्याच्या तोंडाकडे बघत बसणे या अनिष्ट अवदसेबद्दल आपल्या लोकांत जितकी चर्चा होऊ लागावी, तितकी अजून झाली नाही हे आपणा सर्वांसच अहितकर होय.’’

श्री. दादाभाई नौरोजींचे 'Poverty and Unbritish Rule in India' म्हणजे हिंदुस्थानातील दारिद्र्य आणि इंग्रज लोकांचे शीलास न शोभणारी राज्यपद्धती हे पुस्तक व विल्यम डिग्बी 'Prosperous India' यांचे म्हणजे भरभराटलेले हिंदुस्थान असे व्याजोक्तीने नाव दिलेले पुस्तक अशी दोन पुस्तके १९०१ साली प्रसिद्ध केली. या पुस्तकांचे सारग्रहणात्मक दोन लेख टिळकांनी लिहिले. भारताचे भयंकर आर्थिक शोषण ब्रिटिश राज्यतंत्रामुळे होत आहे व ते थांबवण्याकरिता आवश्यक एकच उपाय म्हणजे स्वराज्य होय. या दोन मुद्यांची मांडणी सुसंगत रीतीने करून त्याकरिता जीवनभर लढा दादाभाईंनी भारताच्या इतिहासात प्रथम दिला याची दखल टिळकांनी अनेक ठिकाणी वारंवार घेतलेली आहे. या लेखांमध्येही प्रारंभीच त्यांनी नितांत आदरपूर्वक दादाभाईंचा उल्लेख केला आहे.

ते म्हणतात - ''दादाभाई नौरोजी यांनी आपला देह हिंदुस्थानच्या कल्याणाकरिता अर्पलेला असून इंग्रजांसारख्या बलाढ्य व सुशिक्षित सार्वभौम राज्यकर्त्यांच्या अमलाखाली हिंदुस्थान देश इतका दरिद्री का झाला याची अर्थशास्त्रदृष्ट्या सोपपत्तिक खरी कारणे विलायतेतील इंग्रज लोकांस समजून देऊन त्यांच्या हातून हिंदुस्थानचे काही कल्याण झाल्यास पाहावे या सद्हेतूने ते आयुष्याची शेवटची पंधरा वीस वर्षे स्वदेशाचा व स्वकीयांचा त्याग करून परदेशात एकनिष्ठपणे काढीत आहेत हे सर्वांस श्रुत आहेच. किंबहुना राजकीय बाबतीत खटपट करणाऱ्या हिंदुस्थानातील सुशिक्षित वर्गाचे पुढारीच नव्हे तर त्यातील महर्षी ही संज्ञा दादाभाई नौरोजी यांसच लागू पडते.'' दादाभाई नौरोजी यांच्यासंबंधी टिळकांनी जेव्हा जेव्हा लिहले तेव्हा तेव्हा मनोभावाने असाच स्तुतसुमनांचा 'महापुरुष', 'अनन्य देशभक्त', 'स्वराज्याचा देवदूत' इत्यादी विशेषणांनी गहिवरून वर्षाव करून अपरंपार कृतज्ञता व्यक्त केली आहे.

विल्यम डिग्बी, टिळकांनी उद्धृत केल्याप्रमाणे, साम्राज्यशाही पिळवणुकीचे वर्णन असे थोडक्यात करतात की, या देशात १) गावोगाव पूर्वीपासून धान्यपुरवठा करणारी भरलेली पेवे नाहीशी होत चालली आहेत; २) सोन्यारुप्याचे दागिने किंवा त्या रूपाने आलेली शिल्लक बहुतेक नष्ट झाली आहे; ३) लोकांचे निरनिराळ्या प्रकारचे समुद्रातील किंवा जमिनीवरील उद्योगधंदे नाहीसे होऊन सर्वजण शेतकीवर येऊन पडले आहेत; ४) ज्या गलबतांच्या योगाने देशातील धान्य किंवा उत्पन्न परदेशात जाते ती गलबतेदेखील परकीयांनी बांधलेली व परकियांनी चालवलेली आहेत व त्यांचा फायदा परकीयांकडेच जात आहे; ५) नीळ, चहा, कॉफी वगैरे ज्या नव्या उत्पन्नाच्या बाबी आहेत, त्या सर्व परकीय भांडवलाने परकीय लोकांच्या फायद्याकरिता चाललेल्या आहेत; ६) व्यापार किंवा मोठमोठे उद्योगधंदे हे सर्व किंबहुना किफायतीचा सर्व रोजगार या देशात परकीयांच्या हातात आहे आणि ७) राज्यकारभारातील मोठमोठ्या पगाराच्या वा हुद्याच्या नोकऱ्या सर्व परदेशातील लोकांच्या ताब्यात आहेत; या सर्व गोष्टी ध्यानात घेतल्यास या देशास भीक लागून एक वर्ष पाऊस न पडताच लोक अन्नान्न दशेस लागले तर त्यात नवल काय?

या संदर्भात टिळक म्हणतात, ''इंग्रजी राज्यामुळे हिंदुस्थान देशास दारिद्र्य व दुर्बलता ही कशी प्राप्त झाली, देशाचे राष्ट्रीयत्व नाहीसे होऊन त्यात मुत्सद्दी योद्धे, विद्वान आणि साहसी पुरुष निपजण्याची अजबात कशी बंदी झाली, राष्ट्राच्या मानसिक व आधिभौतिक संपत्तीचा कसा ऱ्हास होत गेला आणि चोहों बाजूने आम्ही हिंदुस्थानवासी लोक हतवीर्य आणि उत्साहहीन होऊन अक्काबाईच्या फेऱ्यात कसे सापडलो हे विलायतेतील लोकांस व आमच्या राजकर्त्यास स्पष्टपणे कळविणे जरूर होते; ते काम या दोन पुस्तकांनी केले आहे.''

ही साम्राज्यशाही शोषणाची व त्यामुळे होणाऱ्या देशाच्या मानसिक व आर्थिक अधोगतीची उपपत्ती टिळकांना तत्पूर्वी पुष्कळ वर्षे माहीत होती; परंतु त्याचे सप्रमाण संपूर्ण

विवरण वरील दोन पुस्तकात मांडले तसे पूर्वी एकत्रित कोणी मांडले नव्हते. टिळकांनी तत्पूर्वी त्याच प्रकारचा विचार भिन्न भिन्न संदर्भात वेळोवेळी मांडलेला आढळतो. 'राणीसरकारचा जयजयकार' (दि. २२ जून १८९७, पृ. ८०-८६) हा लेख उदाहरणार्थ वाचकांनी पाहावा. हा लेख त्यांनी महाराणी व्हिक्टोरिया हिच्या राज्यारोहणाच्या साठाव्या वार्षिक उत्सवाच्या नमित्ताने लिहिला आहे. या लेखाच्या प्रारंभी ते म्हणतात -

''ज्या राष्ट्राच्या (म्ह. ब्रिटनच्या) राज्याचा विस्तार गेल्या साठ वर्षांत पाऊणपटीने वाढला आहे, त्यातील लोकसंख्या तितक्याच अवधीत दुप्पट जास्त झाली आहे व ज्याची संपत्ती तिप्पट व व्यापार साठ वर्षांपूर्वी होता त्याच्या नऊपट जास्त झाला आहे, त्या वैभवाच्या शिखरास चढलेल्या राष्ट्रातील लोक आपल्या (व्हिक्टोरिया) राणीच्या जुबिलीच्या निमित्ताने आपल्या उत्कर्षाबद्दल प्रचंड उत्सव करीत आहेत. आता इतक्या अवधीत हिंदुस्थानच्या स्थितीत काय अंतर झाले आहे ते पाहू. आमच्या अलंकारशास्त्रात असा एक नियम आहे की, रावणाचे बरेचसे वर्णन केले म्हणजे रामचंद्राचे फारसे वर्णन करावे लागत नाही. फक्त अशा अशा शत्रूस त्याने जिंकले असे म्हटले म्हणजे त्याच्या पराक्रमाचे सहजच वर्णन होते. हाच न्याय प्रकृत स्थलीही लागू पडतो. इंग्लंडचा अफाट राज्यविस्तार, व्यापार व वैभव वर्णन केल्यावर तेथील लोकांच्या अंकित देशांपैकी हिंदुस्थान हा एक गरीब देश आहे असे म्हटले म्हणजे मार्मिक वाचकांस आमच्या स्थितीचे आणखी वर्णन करण्याची जरूरी नाही. आमचे राज्यकर्ते मोठे हुशार, दक्ष, बुद्धिमान आणि नऊ कोटी नव्हे तर नऊशे नऊ कोटीहूनही अधिक नारायण आहेत एवढीच काय ती आम्हांस आनंद मानण्यासारखी गोष्ट आहे. बाकी हिंदुस्थानच्या स्थितीकडे पाहिले म्हणजे आमच्या वैभवाचा नव्हे तर ऱ्हासाचा हा साठावा उत्सव आहे असेच म्हणणे भाग पडते.''

टिळक केसरीचे संपादक म्हणून देशाच्या आर्थिक अवनतीवर लिहू लागले तेव्हा प्रथम त्यांनी ग्रामीण जीवनाच्या दुर्दशेवर क्ष-किरण टाकून साम्राज्यशाही शोषणाचे भयानक स्वरूप दाखविण्यास प्रारंभ केला. कारण भारताचा सामान्य माणूस बहुसंख्येने ग्रामीण भागांत भरलेला आणि त्याची दुर्दशा म्हणजेच राष्ट्राची दुर्दशा असे समीकरण त्यांनी आपल्या मनापुढे मांडले होते. त्याचे प्रत्यंतर त्यांच्या स्वदेशी व बहिष्कार या कार्यक्रमावरील लेखांमध्ये पुन: पुन: मिळते. सामान्य जनांचे जीवनमान उन्नत झाल्याशिवाय कोणत्याही राष्ट्राची उन्नती झाली असे ते मानीत नाहीत. वर्गहीन सामाजिक समतेचा जरी ते पुरस्कार करीत नसले वा समाजवादी परिभाषेमध्ये बोलत नसले तरी त्यांच्या कल्पनेतील संपन्न राष्ट्र म्हणजे मानसिक व भौतिक संपन्नतेचा उपभोग घेणारा सामान्यजनांचा समाज आहे. ते चातुर्वर्ण्याच्या तत्त्वाचा पुरस्कार करतात हे खरे आहे; परंतु त्या चातुर्वर्ण्यात जातिभेद वा आर्थिक दु:स्थितीतला शूद्र येत नाही. बोल्शेविक क्रांतीनंतर चातुर्वर्ण्य तत्त्वाचा पुन: विचार केला पाहिजे असेही ते एका ठिकाणी म्हणतात. यावरून बोल्शेविक क्रांतीनंतर

दोनच वर्षांमध्ये ते आपल्या तात्त्विक विचारांचे पुन: संशोधन करण्यास तयार होतात हे अष्टावधानी व मानवतावादी चित्ताचे गमक आहे.

शेतकऱ्यांच्या दु:स्थितीचे वर्णन करताना त्यांच्या अंगावर काटा उभा राहतो; ते म्हणतात -

''हिंदुस्थानातील एकोणीस-विसांश लोकांचा उदरनिर्वाह परोक्ष किंवा अपरोक्ष रीतीने जमिनीवर चालतो; पण त्या जमिनीची लागवड करणाऱ्या शेतकरी वर्गास कोण विपन्नावस्था प्राप्त झाली आहे याचा विचार केला म्हणजे आंगावर काटा उभा राहतो. घरात अठरा विश्वे दारिद्र्य! कर्जाचा बोजा डोईवर इतका की, घरदार-गुरेढोरे गहाण पडली तरी सालअखेर कशी मजल पोचेल ह्याची पंचाईत! सरकारदस्त तर दरवर्षास तारखेच्या तारखेस भरला पाहिजे, नाहीतर जमिनीचा लिलाव होण्याची पाळी यावयाची. त्यात अवर्षण, टोळधाड वगैरे अवांतर अरिष्टे अलीकडे वरचेवर कृपादृष्टी करू लागल्यामुळे दोनचार वर्षांनी यमस्वरूपी दुष्काळ दत्त म्हणून उभा आहेच! वर्षातून आठ महिने उपासमार सोसून केवळ पुढच्या हंगामाच्या आशेवर कसे तरी जीवित कंठावे, व शेवटी ऐन वेळी पावसाने टाळा दिला म्हणजे सावकारांचे घर पाहावे अशी बिचाऱ्या शेतकऱ्यांची स्थिती पाहून कोणास बरे कीव येणार नाही? पूर्वी अशा प्रसंगी सावकार लोक उदारपणाने शेतकऱ्यास मदत करीत, व वेळी राजेलोकही सूट देत; पण अलीकडे तेही मार्ग बंद झाले. शेतकऱ्यांचा कायदा झाल्यापासून सावकार कर्ज देईनातसे झाले, कारण आपले पैसे परत मिळतील असा त्यांना मुळीच भरवसा नाही. सरकार तर बोलून चालून व्यापारी, तेव्हा सुटीची गोष्टच नको. पाऊस असो वा नसो, पीक येवो अगर न येवो, शेतकरी व त्यांची मुले-माणसे उपाशी मरोत किंवा तुरुंगात जावोत, सरकारदस्त नेमलेल्या तारखेच्या आत कचेरीत भरलाच पाहिजे. यंदा सोलापूर जिल्ह्यात दुष्काळ इतका आहे की, सध्याच लोक दोन पैशाला गाई-बैल विकू लागले, तरी सरकार देणे थकले काय ते तेवीस रुपयेच! आणि ही स्थिती येण्याला कारण सावकार लोकांचा जुलूम अशी सरकारची पक्की समजूत झाली! तेव्हा सावकारांच्या त्रासापासून शेतकऱ्यांचे रक्षण करण्याकरिता म्हणून सरकाराने शेतकऱ्यांचा कायदा केला; पण त्यापासून उपयोग काही एक न होता ज्यांच्या हिताकरिता तो करण्यात आला त्यांचे हाल वाढतच चालले. सावकारांचा जाच कमी व्हावा म्हणून सरकारने पतपेढ्या काढल्या, व स्वत:च सावकारी करण्यास सुरुवात केली; तरी शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत्या दिशेलाच आहे. इतकेच नाही तर शेतकऱ्यांचे दारिद्र्य कमी करण्याकरिता जो कायदा केला तोच उलटा त्यांना घातक होतो अशी लोकांची ओरड आहे.

...शेतकरी, सावकार व सरकार. कोणत्याही व्यवस्थेने या तिघांचे हित होईल तर ती उत्तम; पण हल्ली तिघांचेही नुकसान होत आहे. रयतेच्या पाठीस तर हाल लागले आहेत. या सर्व अरिष्टाला कारण सावकार अशी पुष्कळांची समजूत असल्यामुळे त्याची कोणाला कीव येत नाही; पण ही चूक आहे. वस्तुत: सावकारावांचून रयतेचे चालावयाचेच नाही. शेतकीस

लागणारे भांडवल तो पुरवितो; पण कर्जदार बुडाला की तो बुडालाच; इतकेच नाही तर ते भांडवलही पुष्कळदा त्याचे नसून त्याने दुसऱ्या मोठ्या पेढीवरून आणलेले असते. शेतकरी एखादेवेळेस सुटून जातो; पण तो मात्र मध्येच बुडतो. म्हणूनच सर रेमंड वेस्टसाहेबांनी म्हटल्याप्रमाणे दिवाणी तुरुंगात या सावकारांचाच विशेष भरणा आढळतो. बरे सरकारचाही फायदा होतो असे नाही. सार्वजनिक कामे पुष्कळ करावयाची असतात; पण वसुलीची रक्कम कायम. तेणेकरून दुष्काळाच्या वर्षी सूट मदत म्हणून तोटा येतो व सुकाळी मात्र काही फायदा होत नाही. वसूल रुपयांनी आल्यामुळे बट्टा पडतो तो निराळाच. एकंदरीत हल्लीच्या रीतीने सर्वांचेच नुकसान होते. रयतेची नेहमी हातातोंडाशीच गाठ असल्यामुळे जमिनीत सुधारणा करण्यास त्याला सामर्थ्य नाही व उत्तेजनही मिळत नाही.

...इंग्रज सरकारच्या अमलातील शांतता अगदी तारीफ करण्यासारखी अवर्णनीय आहे खरी; परंतु ती शांतता विकत घेण्याकरिता आम्हांस आपल्या भाकरीपैकी अर्धी भाकर मोठमोठ्या इंग्रजी कामगारांच्या अगर गोऱ्या शिपायांच्या भरीस घालून अर्काटच्या वेढ्यात ज्याप्रमाणे तांदूळ सोल्जरांस आणि पेज नेटिव शिपायास खाऊन राहाण्याचा प्रसंग आला होता तसा अर्धपोटी अगर एका जेवणाने दिवस काढण्याचा हिंदुस्थानच्या कोट्यावधी प्रजेवर प्रसंग येऊन ठेपला आहे! सन १८९१ साली जी खानेसुमारी झाली त्यावरून असे आढळून येते की, लोकसंख्येचे मान सरासरीने दर चौरस मैलास २० या प्रमाणाने सर्व हिंदुस्थानभर १८८१ पासून १८९१ पर्यंच्या दहा सालात वाढले आहे; परंतु लागवडीची जमीन त्या मानाने वाढली नाही. तिकडे राज्याचा खर्च उत्तरोत्तर एकसारखा वाढत चालला आहे. अर्थात त्याच मानाने रयतेवरचे कराचे ओझेही वाढत चालले आहे हे सरकारी रिपोर्टावरून प्रत्यक्ष होत आहे. वाढती लोकसंख्या, बुडता व्यापार, सरकारचा अवाढव्य होत असलेला खर्च, आणि उत्तरोत्तर नि:सत्त्व होत चाललेली जमीन, यामुळे हिंदुस्थानची इंग्रजी राज्याखाली काय स्थिती होईल याची कोणाही विचारी मनुष्यास सहज भीती पडेल.

... शेतकीची नकृष्टावस्था म्हणजे आमच्यासारख्यास साऱ्या राष्ट्राचीच नकृष्टावस्था होय. आम्ही इंग्रज सरकारच्या चातुर्यास, वैभवास आणि कर्तबगारीस, दुवा देऊन त्यांचे गुण गाऊ व त्यांचेच राज्य चिरकाल हिंदुस्थानावर राहो अशी इच्छा बाळगू; पण दुपारची वेळ कठीण आहे. राष्ट्रातील लोकांस पुरेल इतके धान्य देशातल्या देशात उत्पन्न होण्याची पंचाईत पडू लागली व इतर उद्योगधंदे करून त्यात उत्पन्न झालेला माल परदेशी नेऊन त्याचा मोबदला त्या देशातून इकडे धान्य आणण्याची सोयही नाहीशी झाली म्हणजे वेळ कठीण आहे. राष्ट्रातील हजारो अथवा कोट्यावधी शेतकरी केवळ इंग्रज सरकारचे राज्य सुखशांततेचे आहे म्हणून दुष्काळ आल्याबरोबरच सुखाने मरण्यास तयार होतील असे नाही. अथवा निरुपयोगी झालेल्या घोड्याप्रमाणे सरकारचे हातूनही त्यास गोळी घालून संसारयातनेतून मुक्त करण्याचे धारिष्ट्य व्हावयाचे नाही. मग हे लोक करणार काय? एकदा हे भिकार देशावर अनावर सुटले म्हणजे मग लक्षावधी बागनेटांनीही त्यांचा प्रतिकार होणे

वाय १८२-९

अशक्य आहे. जिकडे तिकडे एकच कल्होळ होईल आणि या झंझावातापुढे लहान मोठी सर्व झाडे ह्यूमसाहेबांनी आपल्या सरक्युलरात लिहिल्याप्रमाणे जमीनदोस्त होतील!

... बंगाल्यातील शेतकरी दोनदा जेवावयास मिळाले म्हणजे आपणांस कृतकृत्य समजतात व बहारप्रांतातील (शेकडा ४० टक्के) शेतकऱ्यांस अन्नही पुरे पोटभर मिळत नाही असे या ठरावात लिहिले आहे. मुंबई इलाख्यासंबंधाने लिहिताना दक्षिणेतील एक-तृतीयांश मुलूखभर दुष्काळाची भीती असते व रत्नागिरीकडे घाटाजवळील शेकडा नव्वद लोकांस आंबे, फणस अगर भाजीपाला याखेरीज काही महिने दुसरे काही खावयास मिळत नाही असे म्हटले आहे. मद्रासेत काही काही जिल्ह्यांतून अशीच उपासमार चालते असे तेथील कलेक्टरांनी कळवले आहे व इलाख्यातील इतर जिल्ह्यांतूनही दरवर्षाचे उत्पन्न त्या वर्षास जेमतेम पुरते असे त्या त्या जिल्ह्यातील कामगारांचे म्हणणे आहे. सारांश, सर्व हिंदुस्थानभर शेतकऱ्यांचे खाण्यापिण्याचे हालच आहेत असे म्हटले तरी चालेल. सुबत्ता असली म्हणजे सरासरी मोठ्या माराकुटीने या वर्षाचे पीक त्या वर्षास पुरेसे होते. एखादे वर्षी पावसाने डोळे वटारले म्हणजे लागलीच निम्मे किंवा तृतीयांश लोक दुष्काळाच्या सपाट्यात सापडून त्यापैकी बरेच परलोकाच्या मार्गास लागतात...''

स्वदेशी व बहिष्कार

साम्राज्यशाही विरोधी प्रतिकारात्मक आंदोलनाची सुरुवात स्वदेशी व बहिष्कार या कार्यक्रमापासून झाली. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ही टिळकांची चतु:सूत्री भारताच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनात कार्यक्रमाची सूचक आहे; त्यात पाचवे सूत्र सत्याग्रह हे गांधींनी नंतर भरीस घातले. भारताच्या स्वातंत्र्य-आंदोलनातील आर्थिक दृष्टिकोन हा एक मूलभूत दृष्टिकोन आहे हे विसरता कामा नये. स्वराज्याच्या आंदोलनाच्या प्रवर्तक विचारांपैकी तो एक विचार आहे. त्यासंबंधात टिळक 'औद्योगिक पारतंत्र्य' (पृ. २७४-७६) या लेखात म्हणतात की, ''हे औद्योगिक पारतंत्र्य व या पारतंत्र्याचे पूर्ण स्वरूप यांची ओळख आपण करून घेत नाही या कारणाने ही पारतंत्र्याची बेडी आपल्यास विशेषच जखडीत आहे ही गोष्ट मात्र दुस्तर होय. त्याच्या योगाने आपल्या कर्तृत्वाचे सर्व अवयव लंगडे पडले आहेत. हे खरे आहे की, आपल्यास भांडवल नाही, औद्योगिक चातुर्य नाही, यंत्रशिक्षण नाही, यामुळे फारच रेंगाळावे लागत आहे; पण भांडवल नाही किंवा इतर गोष्टी नाहीत म्हणून रडून काय उपयोग?... उद्योग काढल्याशिवाय भांडवल जमा होणार नाही किंवा यंत्रज्ञानही मिळणार नाही. तेव्हा तारतम्याने लहान प्रमाणावरच का होईना पण निरनिराळे उद्योग निघाले पाहिजेत म्हणजे भांडवल उभे राहील, परदेशचे लोक आपणास रकमा देतील, परदेशस्थ लोकांचे यंत्रचातुर्यही चाकरीस ठेवू किंवा आपले लोक तयार करवून आणू; पण या सर्वांस मुख्यत: पहिल्या दोन गोष्टीस एक दोन तारणे पाहिजेत. एक उद्योग करण्याची निष्ठा व प्रेम आणि दुसरे प्रामाणिकपणा, या दोहोंना धूर्तपणा व सन्मार्गगामी साहसप्रयता यांची

जर संगती झाली तर वरती डोके काढण्यास फारशी शतके लागणार नाहीत.'' टिळकांची ही स्वदेशीची प्रस्तावना आहे. स्वदेशीसंबंधी ते म्हणतात की, औद्योगिक, राजकीय, सामाजिक, नैतिक किंवा सांपत्तिक यांपैकी एक व अनेक किंवा सर्व दिशेने विचार केला तरीही स्वदेशी चळवळीची आवश्यकता व उपयोग ही पूर्णपणे सिद्ध होतात, ही गोष्ट आता सर्वांच्या प्रत्ययास आली आहे. इतकेच नव्हे तर सुधारलेल्या राष्ट्रांच्या पूर्वेतिहासावरूनही या इतिहासास पुष्टी मिळत आहे.

समर्थनार्थ राजकोटचे बॅरिस्टर श्री. पंडित यांचे मत प्रमाण म्हणून त्यांनी उद्धृत केले आहे. पंडितांनी म्हटले की, स्वदेशी चळवळ ही एक दुष्काळनिवारकच मात्रा होय. कारण या चळवळीमुळे खेडेगावातील उद्योगधंद्यास उत्तेजन येऊन शेतकीवर उदरनिर्वाह करणाऱ्यांची संख्या कमी होईल. आणि तसे झाले म्हणजे वारंवार दुष्काळ पडण्याचा संभवही कमी होईल. स्वदेशी चळवळीवरील एक दोन भ्रामक आक्षेपांचे निरसन करण्याच्या संदर्भात टिळक म्हणतात की, ''अर्थशास्त्रदृष्ट्या पाहले असता स्वस्त परकीय मालापेक्षा महान स्वकीय माल घेतल्याने राष्ट्राचे सांपत्तिक नुकसान होते हा जुन्या अर्थशास्त्राचा सिद्धांत निराधार ठरला आहे. कारण असे की, महाग स्वकीय माल घेतल्यास गिऱ्हाईकांस जो अधिक पैसा द्यावा लागतो तो देशातल्या देशात राहून त्याचा अखेर विनियोग भांडवलाच्या रूपाने नवीन कारखाने काढण्यात होऊ शकतो. त्याच्या जोडीला देशातील धंद्यांना उत्तेजन येण्याकरिता परदेशी मालावर बहिष्कार टाकावा आणि देशातील उद्योगधंद्यास उत्तेजन येण्याकरिता परदेशी मालावर जकात बसवून तो महाग करावा. परदेशी मालावर जकात बसवण्याचे तत्त्व बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांना आता मान्य झाले आहे. जकात वाढवून स्वदेशी माल घेण्याचा लोकांनी निग्रह करावा. आलेल्या नफ्याला भांडवलाच्या रूपाने कारखान्यांचे स्वरूपात रूपांतर करावे. सप्रतिबंध अथवा संरक्षित व्यापार, स्वदेशी चळवळ व परदेशी मालाचा बहिष्कार यांच्या योगाने भांडवल वाढत गेल्याने नवीन नवीन कारखाने निघतात. ते भरपूर प्रमाणात वाढत गेल्याने स्वदेशी मालाच्या कमती उतरत उतरत अखेर परदेशी मालाच्या कमतीबरोबर होतील. अर्थशास्त्रात मागणी आणि पुरवठा यांच्या समीकरणाची जी प्रक्रिया सांगितली आहे ती अशाच प्रकारची होय. यात अडचणी पुष्कळ आहेत, परकीय सरकार आहे, सुशिक्षितांच्या चैनीच्या सवयी आहेत, काही सुशिक्षितांचा विरोधी प्रचार आहे. ज्यांच्यात सुप्त कर्तृत्वशक्ती आहे त्यांच्यात निराशा आहे, नुकसानीची भीती आहे, या सर्व अडचणीतून निश्चयाने उद्योग केल्यास नि:संशय पार पडता येईल. आरंभ स्वल्प झाला तरी भावनेच्या व श्रद्धेच्या बळावर औद्योगिक पारतंत्र्याच्या महाभयातून खात्रीने उत्तीर्ण होऊ. 'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्' (भगवद्गीता)''

काँग्रेसने बहिष्काराचा कार्यक्रम स्वदेशी चळवळीचा म्हणजे आंदोलनाचा एक भाग म्हणून स्वीकारला तरी त्याचे मुख्य स्वरूप राजकीय उपाय हे होते. टिळक म्हणतात

- ‘‘राज्यकर्ते बेपर्वा व बेफाम होऊन गेले आहेत. अशा स्थितीत त्यांना ताळ्यावर आणण्यास आमच्याजवळ भिकेखेरीज राजकीय उपाय शिल्लक राहिला नाही. अशा स्थितीत आमच्या म्हणण्याचा राज्यकर्त्यांच्या मनात प्रकाश पाडण्यास हे एकच साधन आहे. सर्व प्रकारचा माल देशात तयार होत नसल्याने आज तारखेस काही परका माल वापरावा लागेल हे निर्विवाद आहे; पण परकीय माल वापरायचा असला तरी आशिया खंडातील किंवा इंग्लंडाखेरीज इतर देशातील माल वापरावा.’’ ते राज्यकर्त्यांना बजावतात की, तुम्ही बेपर्वाई चालविली आहे. तुमच्यासारख्या बेमुर्वत लोकांस ताळ्यावर आणण्याकरिता सध्या तरी दुसरे राजकीयरीत्या प्रतिकार करण्याचे सामर्थ्य आमच्या अंगी नसले तरी बहिष्काराने आम्ही तुमचे अर्ध्या पाव पैचे तरी नुकसान करू शकतो. तरुण पिढीच्या उत्साहावर पाणी ओतण्याचा आमच्यातील काही लोकांचा जो उद्योग चालू आहे तो भित्रेपणाचा, गैरमुत्सद्दीपणाचा आणि मूर्खपणाचा आहे. आमची बहिष्काराची चळवळ राजकीय आहे, निव्वळ औद्योगिक नाही. विनवणी व बहिष्कार ही जोडगोळीची बंदूक आम्ही राज्यकर्त्यांवर रोखलीच पाहिजे.

स्वराज्याच्या आंदोलनाचे जनतेचे साधन म्हणजे काँग्रेस ऊर्फ राष्ट्रीय सभा

काँग्रेसची स्थापना प्रथम ह्यूम, वेडरबर्न इत्यादी वरिष्ठ ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली अनेक भारतीय सुशिक्षितांच्या साहाय्याने झाली. स्वजातीयांचा छळ सोसून, पिशवीस खार लावून आणि झीज सोसून स्वजातीयांच्या कडून होणाऱ्या निंदेची व शिव्याशापांची पर्वा न करता दहा-बारा वर्षे उमेदीने व कर्तव्यबुद्धीने काँग्रेसला वाढीस वरील ब्रिटिशांनी लावले. इ. स. १८८९ पर्यंत ह्यूम काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी होते. भारत सोडण्यापूर्वी ह्यूमनी आपल्या जागी काम करण्याकरिता मॉर्गन ब्राऊन यांना विलायतेहून आणले. १८९३ च्या अखेरीस ह्यूम स्वदेशी निघाले तेव्हा त्यांना हिंदुस्थानभर ठिकठिकाणच्या लोकांनी सभा भरवून मानाचा मुजरा केला. पुण्याच्या सभेत पुणेकरांना त्यांनी सांगितले की, जिवात जीव आहे तोपर्यंत तुम्ही या संस्थेचे पितृवत परिपालन करा. टिळकांनी ‘मे. ह्यूम साहेबांची शेवटची भेट’ (पृ. १९३ ते १९७) या लेखात ह्यूमसाहेबांबद्दल असे म्हटले की, ‘‘परमेश्वरी कृपेने ज्या महात्म्याने एकंदर इंग्रजी राज्यातील प्रजेची राजकीय उन्नती करणाऱ्या साधनांची किल्ली दाखवून दिली त्यांची पुन: भेट होण्याचा योग येऊन आजपर्यंत त्यांच्या भेटीने जसे आम्हास वारंवार उत्तेजन मिळाले तसेच पुढेही मिळत जावो अशी आम्ही मनापासून ईश्वराची प्रार्थना करतो,’’ आणि त्यांनी अशी भीती व्यक्त केली की, ‘‘असल्या संस्था चालविण्याची कुवत हिंदुस्थानच्या लोकांत येण्यापूर्वीच ह्यूमसाहेबांनी राष्ट्रीस सभेस सुरुवात केल्यामुळे ती आपोआप लयास जाण्याचा संभव आहे.’’

टिळकांची ही भीती थोडा वेळच टिकली. राष्ट्रीय सभेला दहावे वर्ष संपून अकरावे वर्ष लागले तेव्हा त्यांनी म्हटले की, आता हिची कौमार्यदशा संपून हिला यौवनावस्थेची छाक आली आहे. हिचं अंतर्बाह्य स्वरूप हळूहळू बदलत चालले असून गांभीर्य, विचारशीलता व

उद्दिष्ट हेतू साध्य करून घेण्याविषयी निश्चयबुद्धी अधिक दिसू लागली आहे. उत्साह व भावी विजयाची आशा वृद्धिंगतच होत आहे. हिंदुस्थानच्या भावी इतिहासकारास राष्ट्रीय सभेची स्थापना व वाढ हा एक अतिशय मनोरंजक भाग होईल... तिची वाढ कशी होत गेली हे वर्णन करण्याला खचित गिबनसारख्या इतिहासकाराची लेखणी लागेल.

राष्ट्रीय सभा ही सर्व राष्ट्राचे मुख असल्याने त्या संस्थेच्या द्वारेच आपली एकमुखी मागणी अधिकाऱ्यांपुढे जाणे इष्ट आहे असे म्हणून टिळक सांगतात की, ''राष्ट्रीय सभेच्या विस्तीर्ण मंडपात बंगाली, मद्रासी, सिंधी, पारशी, मुसलमान आदिकरून सर्व जातीचे लोक एक दिलाने राजकीय व राष्ट्रीय प्रश्नांचा विचार करताना ज्यांनी पाहले असेल त्यांची हिंदुस्थानच्या भावी उदयाचा व ऐक्याचा राष्ट्रीय सभा हा एक मजबूत पायाच होय अशी खात्री होऊन त्यांची मने आनंदाने भरून गेली असतील यात शंका नाही. आमच्या हिंदुस्थानात पूर्वी ५६ देश होते असा इतिहास आहे. पण इंग्रज सरकारच्या सार्वभौम सत्तेखाली हे ५६ देश मोडून त्यांचा एकजीव किंवा एक राष्ट्र होण्याचा समय आला आहे हे राष्ट्रीय सभेवरून जितके पूर्णपणे व्यक्त होते तितके दुसरे कशावरूनही होत नाही. सर्व ठिकाणच्या प्रमुख लोकांचे जे आज राष्ट्रीय प्रश्नासंबंधी ऐकमत्य अथवा समप्रवृत्ती दिसून येते ती राष्ट्रीय सभेच्या उद्योगाचेच फळ होय. आमच्या हल्लीच्या राज्यकर्त्यांनी रेल्वे, तारायंत्रे वगैरे बाह्य साधनांनी आिण राज्य करण्याची एकसारखी पद्धत, एकसारखे कायदे आणि राज्यव्यवहारात उपयोगी पडणारी एक भाषा यामुळे सर्व हिंदुस्थान जणो काय एकत्र करून बांधून टाकला आहे. पण अशा रीतीने बाह्य साधनांनी बांधून टाकलेल्या लोकांची एकदलेकरून त्यांस खरोखर एकराष्ट्रीयत्व आणणे हे काम करण्यास राष्ट्रीय सभा हेच काय ते उत्तम साधन आहे... हिंदुस्थानातील सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या आणि सर्व प्रांतांतल्या लोकांस एक दिलाचे आणि एक विचारांचे करणे हे राष्ट्रीय सभेचे मुख्य कर्तव्य होय.'' ('अकरावी राष्ट्रीय सभा', पृ. २०३ ते २०५)

१९०६ सालाच्या अखेरीस श्री. दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचे अधिवेश भरले. भारताच्या इतिहासातील महत्त्वाची घटना या अधिवेशनात घडली. दादाभाई नौरोजींनी स्वराज्य हेच भारताचे ध्येय होय आणि ते मिळवणे हेच काँग्रेसचे कर्तव्य आहे अशी घोषणा केली. या अधिवेशनावर लिहिताना टिळकांनी म्हटले की, ''स्वातंत्र्य, लोकांनी आपणहून चालवलेले स्वराज्य, आपणांस प्राप्त झाल्याखेरीज आपल्या उद्धाराचा दुसरा मार्ग नाही असे नेटाने स्पष्टपणे सोप्या भाषेने गहिवरून दादाभाई यांनी जेव्हा काँग्रेसच्या व्यासपीठावरून अखेरीस सांगितले तेव्हा कोणी वृद्ध देवदूत आपल्या तरुण पिढीस शेवटचा उपदेश करण्याकरताच अवतरला आहे काय असा क्षणभर भास झाला... राष्ट्रीय सभा आणि स्वराज्याचा हक्क यांचा सभा वयात आल्यानंतर राजकीय चळवळीचे सन्माननीय व वृद्ध-महर्षी उपाध्याय दादाभाई यांच्या हातून गेल्या डिसेंबर महिन्यात सशास्त्र

विवाह लावण्यात आला आहे. हा विवाहसंबंध राष्ट्रीय सभेशी पितृत्वाचे नाते जोडणाऱ्या कित्येक गृहस्थांस जरी पूर्ण पसंत नसला तरी तो तोडणे किंवा त्यात यत्किंचितही व्यत्यय आणणे आता अशक्य आहे. स्वराज्य आम्हास साध्य आहे व स्वदेशी चळवळ, बहिष्कार-योग आणि राष्ट्रीय शिक्षण ही स्वावलंबनाची सदर हेतू सिद्धीस नेण्यास तीन मोठी साधने आहेत असा कायमचा सिद्धांत राष्ट्रीय सभेच्या बावीसाव्या बैठकीत झालेला आहे. उद्योग केल्यास इष्टसिद्धी लवकरच झाल्याखेरीज राहणार नाही अशी आम्हास पूर्ण उमेद आहे.''
('गेल्या राष्ट्रीय सभेत विशेष काय झाले?' पृ. २०६-२१३)

जहाल व मवाळ किंवा गरम व नरम पक्षांचा जोरात झगडा १९०६ पर्यंत काँग्रेसमध्ये चालू होता व तो पुढेही चालू राहिला. फिरोजशहा मेथा, कृष्णस्वामी अय्यर, गो. कृ. गोखले, पंडित मालवीय व अनेक रावबहादूर रावसाहेब सर्व ग्रह उपग्रहांसह या अधिवेशनात उपस्थित होते. अटीतटीचा विरोध असूनही दादाभाईंच्या महनीय विभूतमत्वामुळेच हा विरोध उसळून वर येऊ शकला नाही. काँग्रेसमध्ये अध्यक्षांनी स्वराज्याची घोषणा केलेली ऐकून त्यावेळच्या अँग्लो-इंडियन पत्रांनी आक्रोश केला की, काँग्रेसमधून मवाळ हाकलले गेले. लंडन टाईम्सने रागावून लिहले की, नरम पक्षाची हकालपट्टी झालेली नसली तरी काँग्रेसची इभ्रत व वजन आता कमी झाले आहे; हिंदुस्थान देश तलवारीने आम्ही जिंकला आहे आणि स्वराज्याचे हक्क मागणाऱ्या दादाभाई नौरोजीसारख्यांनी ही गोष्ट लक्षात ठेवावी की, त्यांच्या व त्यांना विरोध करणाऱ्या हिंदुस्थानच्या इतर प्रजेच्या दरम्यान ही तलवार ठाणे देऊन राहिली आहे व तेच त्यांस हितावह आहे. आम्ही हिंदुस्थानात आलो ते काही परत जाण्यासाठी नाही.

जहाल काय किंवा मवाळ काय या दोन्ही पक्षांना स्वराज्य किंवा स्वातंत्र्य प्राप्त व्हावे असे प्रामाणिकपणे वाटत होते. अडत कोठे होते ते मार्गासंबंधी. मवाळ म्हणत की, इंग्रज सरकारची विशेषशी गैरमर्जी न होता जे करता येईल ते करा. इंग्रज सरकार बलिष्ठ व आम्ही क्षुद्र. सिंह धमा खरा पण रागावला तर त्याची तब्बेत सांभाळणे कठीण आहे. इंग्रज कायदेशीर, सनदशीर, उदार व स्वातंत्र्यप्रय असून बलिष्ठ आहेत. त्याकरिता गोंजारून व चुचकारूनच कार्यभाग साधला पाहिजे. ताडण करावयाचे तर ते केवळ शब्दाने करावे. याविरुद्ध जहाल पक्ष असे म्हणत होता की, 'शेतकऱ्यांची जाणूनबुजून दैन्यावस्था करणारी, शंभर वर्षात देशातील उद्योगधंदे बुडवून सर्व बाजूंनी पिळवणूक करून देशाला नागविणारी, बंगालची फाळणी करणारी व हिंदू-मुसलमानांचे दंगे पेटविणारी ब्रिटिश साम्राज्यशाही असल्या भिक्षांदेहीच्या मवाळ मार्गाने लोकाभमुख कधी होणार नाही. स्वावलंबनाचा व प्रतिकाराचाच मार्ग अधिक यशस्वी होऊ शकतो. भीक मागून राजकीय हक्क मिळत नसतात. प्रजेस हक्क पाहिजे असल्यास तिने स्वपराक्रमाने मिळवले पाहिजेत. नाक धरल्याशिवाय तोंड उघडत नाही. जिंकलेल्या लोकांना आपखुशीने स्वातंत्र्य दिल्याचे उदाहरण इतिहासात नाही. हा स्वार्थाचा प्रश्न आहे. धर्माचा किंवा औदार्याचा नाही. राजनीती आहे, धर्मनीती नव्हे. स्वातंत्र्य हेच

प्रत्येक राष्ट्राचे अंतम साध्य आहे. तुमच्यामधील भेद हेच सरकारचे कवच; तुमची दुर्बलता ते त्यांचे बल; तुमचे स्वत:बद्दलचे अज्ञान ते त्यांचे सामर्थ्य; तुम्ही ओळखाल तर सर्व तुमचेच आहे. असे या जहाल म्हणजे राष्ट्रीय पक्षाचे धोरण व कृती असून शरीरद्वारा किंवा द्रव्यद्वारा झीज सोसण्यास हा पक्ष तयार आहे.' अशी मवाळ व जहाल पक्षाची दोन भिन्न धोरणे टिळकांनी अनेक ठिकाणी विशद करून सांगितली. ('राजकीय पक्षोपन्यास', 'समेट कसा होईल', 'खरी अडचण कोठे आहे', 'अडचणीचा निर्वाह', पृ. २१४-२४२).

१९०६ च्या अखेरीस झालेल्या काँग्रेस अधिवेशनात दादाभाईंनी स्वराज्याच्या ध्येयाची घोषणा केल्यानंतर त्या अधिवेशनात मवाळ पक्षाने जरी फारशी गडबड केली नाही तरी धुमसत असलेला त्यांचा असंतोष त्यानंतरच्या सुरतेस भरलेल्या वार्षिक अधिवेशनात उफाळून वर आला. हे अधिवेशन जहाल-मवाळांचे समरांगण ठरले. दोन विरोधी बाजूचे घोडेस्वार एकमेकांवर चालून गेले असता त्यांच्या घोड्यांच्या टापांबरोबर धुरळाही सहज उधळला जातो तद्वत् तेथील वादविवादात खोट्या गोष्टींचीही पुष्कळ धूळ उधळली व त्यामुळे काही काळपर्यंत कित्येकांची नजर बंद झाली. हा धुरळा खाली बसू लागल्यावर वादाचा मुख्य मुद्दा काय याचा खल होऊ लागला. टिळकांचे मत होते की, जहाल व मवाळ असा पक्षभेद असला तरी या पक्षभेदामुळे कोणत्याही एका पक्षाने काँग्रेसमधून फुटून बाहेर जाऊन स्वतंत्र पक्षसंघटना करू नये. कारण दोघांचेही अंतम उद्दिष्ट स्वराज्यच आहे, हे इंग्रज सरकारला, त्यांच्या लोकशाहीस आणि इंग्रज लोकांनी चालवलेल्या वृत्तपत्रांनाही मान्य आहे. मवाळ हे प्रच्छन्न जहाल आणि जहाल हे स्पष्टवक्ते मवाळ असेच ते म्हणतात. लंडन टाइम्सने तर स्वराज्याचा चांदोबा न मागण्याबद्दल मवाळांस शिफारस केली. जहाल मवाळांची अंतर्गत मने जाणणारे सर्वसाक्षीभूत सरकार आमच्या दोघांच्याही बारशाला जेवलेले आहे. वाघ म्हटले तरी खातो, वाघोबा म्हटले तरी खातो. शहाणपणाच्या स्वार्थाने इंग्रज सरकारचे अंत:करण भरलेले आहे.

या संदर्भात टिळकांना अधिक खोलात जाऊन भारताच्या त्यावेळच्या राजकीय मन:स्थितीचे सूक्ष्म पृथक्करण केले आहे. ते म्हणतात - ''स्वातंत्र्याची इच्छा मनात धरणे हा मनुष्य स्वभावाचाच एक धर्म आहे. आपले व्यवहार आपल्या संमतीखेरीज नेहमी परक्यांनी चालवावेत ही स्थिती कोणासही इष्ट वाटणार नाही. त्यातून पाश्चिमात्य शिक्षणाने ज्यांची मने संस्कृत झाली आहेत त्यांस तर ही गोष्ट असह्य होईल यात शंका नाही. स्वातंत्र्याच्या बुद्धीची वाढ सुशिक्षित हिंदी लोकांमध्ये झाली असता गोऱ्या लोकांच्या हातांतील सत्ता केव्हा ना केव्हा तरी कमी होणार हेही त्यांस माहीत नाही असे नाही. पण कोणी झाले तरी आजचे मरण उद्यावर ढकलीत असतो; आणि अशा दृष्टीने गोऱ्या अधिकारी वर्गाने हल्ली दंडुकेशाही चालविली आहे. राज्यकर्त्यांच्या दृष्टीने प्रजेपैकी खराखुरा राजनिष्ठ पक्ष अल्प आणि मर्यादित स्वरूपातच या देशात आहे. अशा प्रकारचा एखादा वर्ग कोणत्याही देशावर परकीय अंमल

सुव्यवस्थित चालू असता नेहमी असायचा. हा वर्ग राजकीय चळवळीत पडू शकत नसतो व यदाकदाचित् पडलाच तर आपणांस जडलेले संसर्गजन्य पातक प्रभुचरणी अर्पण करून तो आपल्या मनाची खवखव काढून टाकतो. मनुष्य जात्याच स्वातंत्र्यप्रय असतो. अशा प्रकारची मंडळी कोणत्याही देशात केव्हा तरी का उत्पन्न व्हावी हा एक मोठा प्रश्नच आहे. राजकीय बाबतीत विचार करता हा वर्ग परकीय सरकारचा गुणग्राहक वर्ग होय असे म्हणावे लागते. परकीय सरकारमुळे आपल्या राष्ट्राचा कसकसा फायदा झाला यांचे तपशीलवार विवेचन देऊन परकीय सरकारचे अन्याय व जुलमी वर्तन यावर पांघरूण घालायचा प्रयत्न हा करतो. हा लहानसा वर्ग सोडल्यास बाकीचे वर्ग स्वराज्यवादीच आहेत असे म्हटले पाहिजे. दुसरा वर्ग म्हटला म्हणजे राज्यकर्त्यांच्या उणिवा त्यांच्या नजरेस आणून त्यांच्याकडून त्या काढून टाकण्यासाठी जितक्या नि:स्पृहतेने बोलणे जरूर आहे तितक्या नि:स्पृहतेने बोलतो. यांना इंग्रजी राज्याचे टीकाकार म्हणण्यास काही हरकत नाही. हे स्वराज्याची मागणी उघडपणे करीत नाहीत. तिसरा वर्ग स्वराज्य हाच काय तो आपला परमपुरुषार्थ आहे असे मानतो; परंतु राज्यकर्त्यांची प्रसन्नता राखून स्वराज्य मिळू शकेल असे या वर्गास वाटते. हल्लीच्या राज्यपद्धतीतील दोष तिच्या वास्तविक स्वभावातील दोष आहेत. ते दोष समूळ नाहीसे होण्यास स्वराज्याखेरीज दुसरा मार्ग नाही असेही हा वर्ग प्रतिपादन करतो. राज्यकर्ते न्यायप्रय असल्यामुळे कालांतराने त्यांच्या परोपकार बुद्धीचा विकास होऊन हिंदी लोकांच्या पदरात स्वराज्याचे माप टाकून ते मोकळे होतील असे त्यांना वाटते. यांच्या पलीकडचा आमचा वर्ग म्हणतो की स्वावलंबनानेच स्वराज्य मिळेल, राज्यकर्त्यांच्या सद्बुद्धीने नव्हे; कारण त्यांना स्वार्थबुद्धी कधीही सोडावयाची नाही. हे स्वराज्य इंग्रजी साम्राज्यांतर्गत स्वराज्य होय, हे स्वराज्य पूर्ण स्वातंत्र्यापेक्षा कमी दर्जाचे आहे हे सांगावयास नकोच; हा काही अंतम हेतू नाही. तथापि हे स्वराज्याचे हक्क प्राप्त झाल्याने राजकीय प्रगतीची मजल अंतिम हेतूच्या पुष्कळच जवळ जाईल. मनुष्यमात्राच्या मनात असणारी स्वतंत्रप्रज्ञतेची बुद्धी हा आमचा पक्ष लपवून ठेवू इच्छित नाही. याही पलीकडचा वर्ग म्हटला म्हणजे लवकरच स्वातंत्र्य म्हणजे संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त व्हावे असे म्हणणारांचा होय. या लोकांची संख्या सध्याच्या स्थितीत थोडी आहे. या पाच वर्गांपैकी पहिला वर्ग सोडला तर गोऱ्या राज्यकर्त्यांच्या दृष्टीने बाकी सर्व कमी अधिक प्रमाणाने राजद्रोहीच होत.

राष्ट्रीय सभेत स्वराज्यवादी आणि स्वातंत्र्यवादी, विनंतीवादी किंवा स्वावलंबनवादी या सर्वांनी एकमतानेच काम केले पाहिजे. हिंदू धर्म ज्याप्रमाणे केवळ शैवांचा नाही आणि वैष्णवांचा नाही तद्वत राष्ट्रीय सभा केवळ जहालांचीही नाही किंवा मवाळांचीही नाही. कोणाचे अंतिम हेतू कसेही असोत, त्याबद्दल एकमेकांनी राष्ट्राच्या अभ्युदयाचा पाया घालण्याच्या प्रयत्नात सामील झाले पाहिजे. राष्ट्राचे अंतम हित कशात आहे याबद्दल सप्रमाण विचार करण्याचा मक्ता परमेश्वराने जहालांनाही दिला नाही किंवा मवाळांनाही दिला नाही,

हे दोघांनी लक्षात ठेवले पाहिजे. या कामी जातिभेद ज्याप्रमाणे विसरून जावयाचा त्याप्रमाणे अंतम हेतूमधील भेदही विसरला पाहिजे. जो तो पक्ष आपापली मते अधिकाधिक लोकप्रय व्हावी यासाठी मांडण्यास मोकळा आहे. राष्ट्रीय सभेत जे बहुमताने ठरेल ते नव्या जहाल पक्षासही मान्य असले पाहिजे. राष्ट्रीय सभेतील बहुमताविरुद्ध आपण बंड करणार असेही त्यांनी म्हणू नये. पाहिजे तर सभेच्या बाहेर प्रत्येक पक्षाने लोकमत जागृत करण्याकरिता आपापले मत मांडावे. पार्लमेंट सभेतील लेबर किंवा रॅडिकल पक्ष बहुमतातील जुन्या पक्षाच्या विरुद्ध लोकमत पुन: जागृत करण्यास मोकळा असतो. त्याप्रमाणे जुन्या-नव्या पक्षांना लोकमत जागृत करण्याकरिता आपापले मत लोकांपुढे मांडण्याचा हक्क कायम असला पाहिजे. दोन पक्षांची जी नेहमी झटापट चालू असते तीच राष्ट्राच्या प्रगतीचे साधन होय. ही झटापट कायम ठेवूनच दोन्ही पक्षांनी विशिष्ट कार्यांपुरते विशिष्ट नियमांनी पार्लमेंटातील भिन्न भिन्न पक्षांप्रमाणे एकत्र झाले पाहिजे आणि वागले पाहिजे. हिंदुस्थानसारख्या अवाढव्य राष्ट्रास एकाच पक्षाचे विचार सर्वदा रुचतील किंवा ग्राह्य होतील असे नाही. पदार्थविज्ञान शास्त्रात असा नियम आहे की, घर्षणाखेरीज गती उत्पन्न होत नाही, राष्ट्राच्या प्रगतीसही हाच नियम लागू आहे. गति आहे तेथे घर्षण आहे व ते असलेच पाहिजे; पण हे घर्षण कमी करण्यास ज्याप्रमाणे वंगण घालावे लागते त्याप्रमाणे राजकीय बाबतीत दोन्ही पक्षांचे घर्षण कमी करण्यास दोन्ही पक्षांस विचार-स्वातंत्र्याची व भाषणस्वातंत्र्याची मोकळीक ठेवून पार्लमेंट सभेच्या धर्तीवर काम चालविण्याचे नियम ठरवावे व पाळावे. राष्ट्रीय सभेचे राष्ट्रीयत्व कायम राहण्यास तीत दोन्ही पक्षांचा समावेश व्हावयास पाहिजे.'' ('राजकीय पक्षोपन्यास', 'समेट कसा होईल'?, 'अडचणींचा निर्वाह' पृ. २१४-२४२)

टिळकांनी राजकीय विचारांच्या व ध्येयवादाच्या उच्च पातळीवर उभे राहून देशातील भिन्न भिन्न राजकीय प्रवाहांमध्ये अभेद शोधण्याचा प्रयत्न करून यश मिळवले. ही अभेद शोधण्याची तात्त्विक दृष्टी त्यांना प्राचीन भारताच्या धार्मिक तत्त्वज्ञानाच्या संस्कारांमुळे व चिंतनामुळे लाभली होती. आधुनिक युगापूर्वीच्या मानव जातीच्या इतिहासात भिन्न समाजसंस्थांचे भिन्नत्व धर्माधिष्ठित होते. धर्म हा तोपर्यंत समाजसंघटनेचे व समाजसंस्थांमध्ये भेद उत्पन्न करण्याचे तत्त्व होते. धर्मैक्य जेथे, तेथे समाजैक्य व धर्मभेद जेथे, तेथे समाजभेद, असे स्वरूप सामाजिक प्राचीन इतिहासाचे दिसते. हिंदू धर्म आणि बौद्ध धर्म हेच तत्त्वत: व व्यवहारत: या भेदांमध्ये ऐक्य शोधणारे ऐतिहासिक धर्म ठरले. हिंदुस्थानच्या पश्चिमेस निर्माण झालेल्या प्रबल प्रेषितनिष्ठ धर्मसंस्थांनी धर्मभेदाला महत्त्व देऊन भिन्न धार्मिक समाजांमध्ये शाश्वत शीतयुद्धाचा पाया घातला. हे शीतयुद्ध अलीकडे काही प्रमाणात पश्चमी ख्रिश्चन संस्कृतीमध्ये शमन पावत असले तरी काही इस्लामी राष्ट्रांमध्ये अजून ते उघड वा दडलेल्या स्वरूपात अस्वस्थता उत्पन्न करीत आहे. टिळकांनी व गांधींनी जे प्रयत्न केले त्यात भेदांमध्ये अभेद दृष्टीला मौलिक महत्त्व दले व त्या दृष्टीचा राजकारणाच्या पातळीवर

मोठ्या प्रमाणात प्रयोग केला. पुरे यश आले नाही; परंतु स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या क्षणापर्यंत या अभेद दृष्टीने मोठे यश मिळवले. टिळकांनी स्वराज्याचा पाया रचला. गांधींनी इमारत उभारून स्वातंत्र्याचा देदीप्यमान सोन्याचा कळस चढविला.

मवाळांना चतु:सूत्रीपैकी बहिष्कारसूत्र अमान्य झाले. गांधींनाही ते बहिष्कारसूत्र ब्रिटिश द्वेषाचा वास आल्यामुळे काहीसे अमान्य होते; परंतु त्यांनी ते प्रत्यक्षात आचरणात आणण्यास हरकत घेतली नाही हे असहकारिता युगातील परदेशी कापडाच्या होळ्यांवरून शाबीत होते. चतु:सूत्रीतील राष्ट्रीय शिक्षण हे सूत्रही सर्व राजकीय पक्षांना मान्य झाले.

इंग्रजांचे इंग्रजी शिक्षण व काँग्रेसचे राष्ट्रीय शिक्षण

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आगरकर व टिळक यांच्या सहकार्याने राष्ट्रीय तेजस्वी शिक्षण देण्याकरिता खाजगी माध्यमिक शाळा स्थापण्याचा उपक्रम केला. डेक्कन एज्युकेशन सोसायटी याच उद्देशाने स्थापन झाली. भारतामध्ये अन्यत्रही अशी खाजगी माध्यमिक विद्यालये व महाविद्यालये शिक्षणसंस्थांच्या द्वारे स्थापन झाली; परंतु त्यांचे रूपांतर होऊन त्या सरकारी शिक्षणसंस्थांप्रमाणे हुबेहूब बनल्या. चिपळूणकरांची प्रतिज्ञा होती की, गोरा पाय माझ्या संस्थेत शिरणार नाही; परंतु गोऱ्याच्या पायी शरण जाऊन नोकऱ्या मागणाऱ्या शिक्षितांची निर्मिती करणाऱ्याच त्यांच्या शिक्षणसंस्थेसह इतर खाजगी शिक्षण संस्था बनल्या.

टिळकांनी शिक्षणविषयक प्रश्नावर केसरीत लिहीत असताना लष्करी शिक्षण सरकारने द्यावे अशी सरकारपाशी इ.स. १८९० मध्ये प्रथम मागणी केली ('लष्करी शिक्षणाची शाळा' पृ. ३२२) विनंती व मागण्या यांचे महत्त्व टिळकांनी कधीच अमान्य केले नाही. नि:स्पृह टीका व स्वावलंबनी प्रयत्न यांची जोड मागण्यांना द्यावी एवढेच त्यांचे म्हणणे होते. शिक्षणाच्या बाबतीत मागणी पलीकडे गेले पाहिजे असा विचार त्यांनी 'पुनश्च हरि: ॐ' मध्ये केल्यानंतर मांडण्यास सुरुवात केली. त्याच्या अगोदर सरकारी विद्यापीठे व शिक्षणसंस्था यांच्यातील उणिवा-दोष दाखविण्याचा सपाटा चालविलाच होता; परंतु त्याबरोबरच पाश्चिमात्य शिक्षणाचे आधुनिक भारताच्या प्रगतीच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे ही गोष्ट त्यांनी वारंवार प्रतिपादिली आहे. ते म्हणतात -

''ज्यावेळी हिंदुस्थानातील लोकांस कोणत्या प्रकारचे शिक्षण द्यावे या प्रश्नाची वाटाघाट होऊन पाश्चिमात्य पद्धतीने इंग्रजी भाषेत त्यांस शिक्षण द्यावे असा ठराव झाला, तेव्हा सदर ठराव करणारांची बुद्धी हल्लीच्या लॉर्ड कर्झनसारख्या अधिकाऱ्याप्रमाणे कोती व संकुचित नव्हती ही गोष्ट त्यांच्या तत्कालीन लेखांवरून सिद्ध होत आहे. इंग्रजी इतिहास, इंग्रजी वाङ्मय, इंग्रजी शास्त्रे, इंग्रजी हुन्नर वगैरे विद्या कोणाही विद्यार्थ्यांचे मन विकसित करून त्याच्या आंगात व मनात हुरूप, देशाभमान वगैरे सद्गुण उत्पन्न करण्यास लायक आहेत याबद्दलही वाद नाही. बुद्धीची कुशाग्रता वाढविण्यास हिंदुस्थानातील न्यायव्याकरणादी

प्राचीन शास्त्रे किती जरी उपयोगी असली तरी देशाभमान, राज्यव्यवस्था, राजनीती, देशाची नैतिक आणि सांपत्तिक अभिवृद्धी, राष्ट्राराष्ट्रांचा परस्पर संबंध वगैरे देशाचा उत्कर्ष होण्यास ज्या विषयांचे ज्ञान लागते त्या विषयांचे शिक्षण या आमच्या जुन्या शाब्दिक शास्त्रांपासून मिळत नाही, आणि मिळणेही शक्य नाही. पाश्चिमात्य राष्ट्रांनी देशाभिवृद्धीस उपयोगी पडणारी ही शास्त्रे व हे विषय नवीन सिद्ध केलेले आहेत. आणि या पाश्चिमात्य राष्ट्रांचा एकंदर इतिहास पाहिला तर त्यांच्या वाङ्मयात किंवा शिक्षणक्रमात याच विषयात प्राधान्य दलेले आढळून येते, अर्थात् जो जो मनुष्य पाश्चिमात्य किंवा इंग्रजी विद्या अगर शास्त्रे सांगोपांग शिकतो त्याचे मन पाश्चिमात्य देशांत स्वदेशाभमानाच्या किंवा स्वदेशाभिवृद्धीच्या ज्या कल्पना आहेत त्यांनी भरून गेलेच पाहिजे. किंबहुना अशा कल्पनांनी त्याचे डोके जर वेडावून गेले नाही तर पाश्चिमात्य शिक्षणाचा एक तर त्याच्या मनावर संस्कार झाला नाही किंवा त्यास ते पचनी पडण्याइतकी त्याची योग्यता नाही असे म्हणावे लागेल. वाघिणीचे दूध खरे; पण ते पचले पाहिजे, आणि असे काही लोक असू शकतील की, या दुधाने त्यास पुष्टी न येता रेचच होऊ लागतील; परंतु अशा प्रकारचे दुर्बल लोक फार कमी असणार. हिंदुस्थानातील सुशिक्षित वर्गाने आज हजारो वर्षे अनेक शास्त्रांच्या गूढ तत्त्वांशी व प्रमेयांशी आपली डोकी घासून आपल्या बुद्धीस तीव्रतेचा इतका दृढ संस्कार दिलेला आहे की, हा एक त्यांच्या आंगचा आनुवंशिक गुणच बनलेला आहे. अशा लोकांस पाश्चिमात्य शिक्षण पचनी पडणार नाही हे म्हणणे असंभवनीय होय. वर सांगितल्याप्रमाणे एखादा दुसरा लेचापेचा निपजेल, पण एकंदर हिंदुस्थानातील लोक पाश्चिमात्य शिक्षणातील सार व विचार आपल्या आंगी मुरू देऊन त्याप्रमाणे आचरण करण्यास समर्थ होणार नाहीत असे मानणे किंवा समजणे हे असमंजसपणाचे लक्षण होय. जपानी लोक आमच्यापेक्षा काही अधिक बुद्धिवान नाहीत, आणि त्यांस जर पाश्चिमात्य विद्या पचनी पडली तर ती हिंदुस्थानातील लोकांस पचनी पडणार नाही असे म्हणण्यास आधार कोणता? ज्या सद्गृहस्थांनी हिंदुस्थानातील लोकांस पाश्चिमात्य शिक्षण देण्याचा प्रथम ठराव केला त्यांच्या डोक्यात या कल्पना आल्या नव्हत्या असे नाही. हिंदुस्थानातील बुद्धिमान लोकांस न्याय-व्याकरण-वेदान्ताच्या खटपटीतच ठेवून इंग्रजांनी राज्य चालवावे, किंवा इंग्रजांना ज्या नवीन विद्या येत आहेत त्या शिकवून प्रजेस हुशार करावे हा त्या वेळच्या मुत्सद्यांपुढे एक मोठा प्रश्न होता. कित्येकांनी तेव्हा असे आक्षेप घेतले होते की, इंग्रजी इतिहास, इंग्रजी शास्त्रे, इंग्रजी राज्यपद्धत, इंग्रजी वाङ्मय यांची हिंदुस्थानातील लोकांस एकदा ओळख झाली म्हणजे माणसाच्या रक्तास चटावलेल्या वाघाप्रमाणे हिंदी लोक स्वातंत्र्याचे, स्वतंत्र संस्थांचे आणि सांपत्तिक वैभवाचे भोक्ते बनतील, व असे झाले म्हणजे स्वार्थाकरिता हिंदुस्थानात आलेल्या इंग्रज लोकांच्या साम्राज्यास धक्का बसेल. ही शंका काही खोटी नव्हती, कारण विद्या आणि शिक्षण या दोन शक्तीच अशा आहेत की, बुद्धिमान माणसांस त्यांच्यायोगे वाटेल ते सामर्थ्य येऊ शकते. स्वतंत्रतेकरता लढणाऱ्या

लोकांचा इतिहास वाचून आपणही स्वतंत्रतेकरता धडपड करावी असे ज्यास वाटणार नाही तो विद्यार्थी नव्हे, पशू होय. विद्यादेवीची श्रद्धेने आणि विश्वासाने जो उपासना करील त्यास ती देवी प्रसन्न झालीच पाहिजे, आणि अशा रीतीने सदर देवीची प्रसन्नता करून घेणे हे प्रत्येक विद्यार्थ्याचे काम आहे. कळणे, आणि उमजणे, पोटात जाणे आणि मुरणे यामध्ये जो भेद आहे तो हाच होय. अर्थात् ज्या इंग्रजी मुत्सद्यांनी पाश्चमात्य शिक्षण प्रथमत: या देशात सुरू केले त्यांना ही भीती होतीच की, हे वाघिणीचे दूध पिऊन हिंदुस्थानातील लोक केव्हा ना केव्हा तरी तयार होऊन स्वराज्याचे हक्क मागू लागतील; परंतु या भीतीला न जुमानता त्या वेळच्या मुत्सद्यांनी या प्रश्नाचे असे उत्तर दले की, 'इंग्रजी शिक्षणाने हिंदी लोक स्वातंत्र्याकरिता खटपट करणारे झाले तरी बेहत्तर आहे, पण त्यांना अज्ञानात ठेवून राज्य करणे बरोबर नाही. यदाकदाचित् त्यांच्या स्वातंत्र्यप्रयतेने हिंदुस्थानातून इंग्रजी राज्य समग्र नष्ट झाले, तरी आपसात फाटाफूट होऊन मागासलेल्या एका मोठ्या देशास स्वतंत्र देशाच्या योग्यतेस आणल्याचे श्रेय तरी इंग्लंड देशास व इंग्रजी राज्यास मिळेल!' हे विचार खरोखरच उदात्त आणि श्रेष्ठ होते. आरंभी आरंभी तर कित्येक मुत्सद्यांनी असेही म्हटले होते की, 'तुम्हास आम्ही जे इंग्रजी शिक्षण देत आहोत ते तुमच्या अंगी राज्य करण्याची योग्यता यावी म्हणून देत आहो आणि ती आली म्हणजे आम्ही येथील आपले चंबूगबाळे आटपून स्वदेशास परत जाऊ.' ज्या लोकांनी अशा हेतूने व बुद्धीने हिंदुस्थानांतील लोकांस पाश्चमात्य शिक्षण देण्याची सुरुवात केली त्यांच्या सद्धेतूची आम्ही मोठ्या आनंदाने तारीफ करतो; परंतु दु:खाची गोष्ट ही की, हा सद्धेतू, ही सद्बुद्धी किंवा वासना शेवटपर्यंत टिकली नाही.''

पाश्चात्य शिक्षण अत्यंत मोलाचे आहे, आमच्या परंपरागत प्राचीन विद्यांचा भावी प्रगत हिंदुस्थानाला विशेषसा उपयोग नाही, हा विचार टिळकांपूर्वी लोकहितवादी, जोतबा फुले इत्यादी धर्मसुधारक व समाजसुधारक यांनी पाऊणशे वर्षेपर्यंत जोराने मांडला. टिळकांना नक्की माहीत होते की, अशा जोरदार नव्या शिक्षणात परंपरागत भारतीय समाजसंस्थेचा व संस्कृतीचा कायापालट होईल. तो त्यांना अत्यंत इष्ट वाटत होता. आधुनिक पश्चिमी संस्कृतीचे मानवी व्यक्तिस्वातंत्र्य हे मूलभूत मूल्य आहे व त्या मूल्याच्या अधिष्ठानावरच सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य विकास पावेल व ते तसे पावावे हेही त्यांना इष्ट व उत्कृष्ट ध्येय म्हणून मान्य होते.

परंतु पाश्चिमात्य शिक्षणाची इंग्रज सरकारनी भारतात केलेली स्थापना होऊन पन्नास वर्षे ('खरे विद्यापीठ कोणते', दि. २५ फेब्रु. १८९६, पृ. ३२५) झाली तरी ते इष्ट दिशेने फलद्रूप होत नाहीत हे पाहून त्यांची फार निराशा झाली. ते म्हणतात की, ''नेमके जे घडायला पाहिजे तेच घडत नाही असे दिसून आले. दुधाने ज्याप्रमाणे ताकाचे अनुकरण करावे त्याप्रमाणे युरोपियन विद्यापीठाचे आमच्या देशातील विद्यापीठे हे अनुकरण होय. या संस्था जशा

असाव्यात तशा नसल्यामुळे कोणत्याही शास्त्राचा शोधक बुद्धीने आस्थापूर्वक अभ्यास करणारे गृहस्थ अलीकडे पैदा होत नाहीत. नवीन शोध करण्याइतकी बुद्धी अथवा योग्यता आमच्या अंगात नाही असे नाही. ज्या देशात पाणिनी, कणाद, शंकराचार्य, भास्कराचार्य वगैरे विद्वान पूर्वकाली होऊन गेले, त्यात सध्या पास्चूर, एडिसन, मिल्ल वगैरे गृहस्थांप्रमाणे विद्वान का निपजू नयेत यांचे खरे वातावरण शोधून काढून त्याचा प्रतिकार करणे हे प्रत्येक विद्यावृद्धी इच्छिणारांचे कर्तव्य आहे. सुधारलेल्या देशात विद्यापीठांची व्यवस्था गुरूंकडे असते. आयुष्य अध्ययन व अध्यापन यात ते घालवितात त्यामुळे विद्यार्थ्यांचे खरे गुण दोष अथवा अडचणी त्यांना समजून येतात. गुरूंच्या विद्याभ्यासाचा आणि सद्वर्तनाचा परिणाम शिष्यांच्या मनावर होण्यास गुरुजी खरोखर विद्याव्यसनी असून छात्रवासी वर्गाशी प्रेमभावाने वागणारे असले पाहिजेत, तसला प्रकार आमच्याकडे नाही. मुंबई विद्यापीठ १८५७ साली स्थापन झाले; पण तेव्हापासून या संस्थेतून एकही जगप्रसिद्ध विद्वान निघू नये हे आश्चर्य नव्हे काय? तेलंग, रानडे, भांडारकर वगैरे काही विद्वान यापूर्वी निघाले आहेत; पण त्यांपैकी काही इतर धंद्यात शिरल्यामुळे शास्त्राभ्यासाच्या कामी त्यांचा जसा उपयोग व्हावा तसा झालेला नाही. बरेचसे कायद्याच्या अभ्यासात गढून गेले आहेत. पण त्याचा उपयोग काय? ज्याने समरांगणी अश्वारूढ होऊन दोन हात करावयाचे त्याने आपले कौशल्य घरात बायकोच्या नथीतून तीर मारण्यात खर्च करावे तसा प्रस्तुतचा प्रकार आहे. आमच्या विद्यापीठात खरे विद्याव्यासंगी गुरू व उपगुरू नाहीत, पदव्यांचे शिक्के ठोकण्यापलीकडे काही काम चालत नाही. विद्यापीठ परीक्षा घेणारी रजिस्टर्ड कंपनी झाली आहे असे म्हटले तरी चालेल.

इंग्रजी शिक्षण एकांगी आहे व ते फक्त सरकारी नोकरीस लागणारे अवश्य गुणच लोकांच्या अंगात आणण्याकरिता योजले आहे. या शिक्षणक्रमात तयार झालेल्या लोकांना धर्म, नीती, शास्त्रीय शोध, धंदेशिक्षण वगैरे राष्ट्राच्या उत्कर्षास अवश्य लागणाऱ्या ज्ञानाची व कलांची बिलकूल माहिती नसते. ज्यास खरे शिक्षण म्हणतात, अशा प्रकारचे शिक्षण हल्लीच्या संस्थांतून आम्हास बिलकूल मिळत नाही. हिंदुस्थानातील लोक पाश्चात्त्य विद्येत, शास्त्रात किंवा कलात नपुण होऊन त्यांनी सुधारलेल्या राष्ट्रातील विद्वानांबरोबर, धंदेवाल्यांबरोबर किंवा व्यापाऱ्यांबरोबर आपल्या बुद्धिवैभवाने, करामतीने, कौशल्याने किंवा हिमतीने टक्कर देण्यास तयार व्हावे अशी आमच्या सरकारची इच्छा नाही. सरकारास खालच्या जागा भरण्याकरिता उच्च प्रतीचेही शिक्षण द्यावयाचे हे तत्त्व आता बहुतेक तयार करणाऱ्या टाकसाळी किंवा हमालखाने म्हणजे विद्यापीठे होत असे शब्दाने नाही तरी कृतीने तरी सरकार स्पष्ट दर्शवीत आहे. सरकार प्रजेस लष्करी शिक्षण स्वतंत्र देशातील राज्यकर्त्यांप्रमाणे देत नाही ही बाबा सोडली तरी रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, उद्योगधंदे किंवा नानाप्रकारच्या कला शिकविण्याकरिता विद्यार्थी जपान पाठविते त्याप्रमाणे सरकार पाठवीत नाही. अत्यंत थोड्या विद्यार्थ्यांना पाठविण्याचे वरपांगी प्रयत्न करीत असले तरी त्यांची बेताबेतानेच वाढ

होण्याबद्दल पहिल्यापासून खबरदारी घेण्यात येते. घरामध्ये शोभेसाठी किंवा चैनीकरिता कुंड्यांतून लावलेल्या झाडांमध्ये आणि मोठ्या बागेत वाढणाऱ्या झाडांमध्ये जे अंतर आहे तेच हिंदी व जपानी विद्यार्थ्यांत दिसून येते.

जपान ४० वर्षांत पुढे येऊन पाश्चमात्य राष्ट्रांच्या पंक्तीस बसते आणि आम्ही दरवर्षी अधिकाधिक हताश, हतवीर्य आणि परकीयांची ओझी वाहणारे बनत चाललो याचा योग्य खुलासा जर कोणास पाहिजे असेल तर तो 'स्वतंत्रता' या एकाच शब्दाने होईल. ('खरे विद्यापीठ कोणते'?, 'युनिव्हर्सिट्या ऊर्फ सरकारी हमालखाने', 'जपान आणि हिंदुस्थान', 'हे आमचे गुरूच नव्हेत' पृ. ३२५ ते ३५९)

सरकारी शाळांतून व महाविद्यालयांतून मिळणारे शिक्षण अपुरे, नेभळे व परावलंबी बनविणारे आहे. हे जाणून खाजगी शिक्षणसंस्था या देशात निरनिराळ्या प्रांतात लोकांनी स्थापन केल्या होत्या. त्याही शिक्षणसंस्था सरकारी मदत घेतल्याशिवाय नीट चालू शकत नाहीत व भरभराटीस येत नाहीत म्हणून ते लोक सरकारी अनुदान भरपूर घेऊ लागले. त्याचा परिणाम असा झाला की, त्यांच्यावर सरकारने अनेक अटी लादल्या होत्या व त्यामुळे सरकारी शिक्षण व खाजगी शिक्षण यांच्यातील अंतर नाहीसे होऊन खाजगी शिक्षणसंस्थांचा सकस राष्ट्रीय वृत्तीचे व स्वावलंबनाचे शिक्षण देण्याचा हेतूही विफल झाला होता. म्हणून राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ टिळकांच्या नेतृत्वाखाली देशात सुरू झाली. प्रत्येक पुढारलेल्या स्वतंत्र देशातील सरकार आपल्या नागरिकांस ज्या प्रकारचे शिक्षण देऊन समर्थ नागरिक निर्माण करते तशाप्रकारचे शिक्षण देणाऱ्या राष्ट्रीय शिक्षणसंस्था निर्माण करणे हा या चळवळीचा हेतू होता. समर्थ विद्यालयासारख्या संस्था याच उद्देशाने निर्माण झाल्या. ब्रिटिशांच्या कारकीर्दीत नवीन शिक्षण देण्यास प्रारंभ होऊन शंभर वर्षे झाली तरी लोकांना आगकाड्या कशा कराव्या हेसुद्धा शिकवले नाही, आगगाड्या तर दूरच राहिल्या; देशात भरपूर ऊस पिकूनही स्वदेशी साखरेचे धंदे बुडले व परदेशी कोट्यवधी रुपयांची साखर या देशात येऊ लागली. कापड, तेल व चामड्याचा धंदासुद्धा बुडाला, टाचणी, सुई व शिवण्याचे यंत्रसुद्धा परदेशीच लोकांना घ्यावे लागे. अनेक विज्ञाने, शास्त्रे, उद्योगधंदे, व्यापार व कला यामध्ये निष्णात व पारंगत होऊन स्वपराक्रमाने व बुद्धिवैभवाने पुढे येणारी व नोकऱ्यांचा शोध न करणारी माणसे ज्या शिक्षणाने तयार होतील, देशाचे राजकीय, औद्योगिक, सामाजिक व बौद्धिक वैभव राखण्यास व वाढविण्यास समर्थ तरुण पिढी ज्या शिक्षणाने तयार होईल त्यासच राष्ट्रीय शिक्षण म्हणता येईल असे टिळकांनी प्रतिपादले, स्वावलंबनाने स्वत:च्या पायावर उभी राहणारी, औद्योगिक प्रगतीची धुरा वाहणारी व देशाभमानी तरुण पिढी तयार करणे असा राष्ट्रीय शिक्षणाचा स्पष्ट उद्देश राष्ट्रीय शिक्षणाच्या नेत्यांनी देशापुढे मांडला. ही चळवळ वाढीस लागली. टिळक अंतर्धान पावल्यानंतर गांधीयुग सुरू झाले. ही चळवळ त्या युगात अधिक जोमाने वाढली. राष्ट्रीय शिक्षणाची विद्यापीठेही निर्माण झाली.

इ. स. १९२० च्या असहकारितेच्या चळवळीत सरकारी, माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या सरकारी विद्यालयांचा बहिष्कारही सुरू झाला. त्याप्रसंगी शेकडो सरकारी व नमसरकारी किंवा तथाकथित खाजगी विद्यालयांतील शिक्षक व विद्यार्थीही राष्ट्रीय शिक्षणसंस्थांना येऊन मिळाले. १० वर्षांत याच राष्ट्रीय शिक्षणसंस्था १९३० च्या सुमारास सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाची केंद्रस्थाने बनल्या.

नि:शस्त्र क्रांतिवादी लो. टिळक व सत्याग्रही महात्मा गांधी

लो. टिळकांच्या राजकीय जीवनाचे व विचारांचे राजकीय सुधारणावाद व नि:शस्त्र क्रांतिवाद असे दोन कालखंड पडतात. पहिला, वरिष्ठ ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या उदारमतवादी विचारांवरील विश्वासाचा व दुसरा अविश्वासाचा म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या दडपशाही व पिळवणुकीच्या धोरणाचा प्रतिकारच केला पाहिजे या निश्चित जाणिवेचा. पहिल्या कालखंडात टिळकांची अशी धारणा होती की वरिष्ठ ब्रिटिश राज्यकर्त्यांना जनतेच्या अडचणींची, दु:खांची व यातनांची जाणीव सतत देत राहिल्याने हळूहळू राज्यकारभार लोकमतानुवर्ती होऊ लागेल. कारण मूळ शासनशक्तीचे अधिष्ठान ब्रिटिशांची संसद आहे व ती संसद उदारमतवादावर आधारलेली आहे. त्यांच्या पहिल्या धारणेतील बदल १९०२ पासून स्पष्ट झाला. त्यांनी साम्राज्यशाहीची मीमांसा (१६/१०/१९०२) तेव्हा मांडली. त्यावरून त्यांचा ब्रिटिश राजनीतीवरचा विश्वास पार उडाला हे स्पष्ट झाले. स्वगृही उदारमतवाद व उलट साम्राज्यांत दडपशाही व निर्घृण पिळवणूक, हेच ब्रिटिशांचे साम्राज्यशाही राजकारण होय; सर्व साम्राज्यशाह्यांचे हेच राजकारण होय, हे निश्चित झाले. त्याकरिता काँग्रेसच्या द्वारे राष्ट्रीय ऐक्य निर्माण करणे, जनतेचा नि:शस्त्र प्रतिकाराकरिता उठाव करणे, जुलमी कायद्याचा प्रतिकार करणे व स्वराज्यांचे देशव्यापी आंदोलन उभारणे याशिवाय अन्य उपाय नाही, अशी त्यांची खात्री झाली, हीच भारतीय स्वातंत्र्याच्या जनताप्रणीत आंदोलनाची नांदी होय. वंगभंगाच्या चळवळीच्या नमित्ताने ह्या आंदोलनास प्रारंभ झाला. ब्रिटिश साम्राज्यशाहीने आपले आसन स्थिर करण्याकरिता व हिंदू-मुसलमान वैमनस्य निर्माण करण्याकरिता 'फोडा व झोडा' हे तत्त्व अमलात आणले व बंगालची फाळणी केली. त्यातून वंगभंगाची चळवळ फोफावली. ती चळवळ दडपण्याकरिता ब्रिटिश राज्यकर्त्यांनी दडपशाहीचे नवे नवे कायदे केले व त्याविरुद्ध असंतोषाची लाट निर्माण करणाऱ्या टिळकांसारख्या नेत्यांवर अधिक बंधने घालण्यात आली. त्यामुळे कायद्याचे अतिक्रमण टाळणे अशक्य होत गेले. राज्यकर्त्यांकडे दाद लागत नाही म्हणून जनजागृतीच्या दबावाने राज्यकर्त्यांना वठणीवर आणण्याचे धोरण हाच मार्ग टिळकांसारख्या काही नेत्यांना दिसू लागला.

सनदशीर व कायदेशीर यांतील भेद

या संदर्भात भारताच्या राजकीय नेत्यांमध्ये एक अत्यंत महत्त्वाचा वाद उत्पन्न झाला. सनदशीर (Constitutional) उपायांनीच आपण राजकीय सुधारणा घडवून आणू शकू,

याशिवाय दुसरा मार्ग उपलब्ध होऊ शकत नाही; कारण ब्रिटिश साम्राज्याची शक्ती अपरंपार आहे, कायद्याच्या बाहेर पाऊल टाकणे अयोग्य आहे, या मताचा पुरस्कार गोखले व त्यांचे नेमस्त अनुयायी करू लागले. टिळकांनी अधिक खोलात जाऊन राज्यशास्त्रदृष्ट्या या मताचे खंडन पद्धतशीर रीतीने केले. त्यांनी पहिला सवाल असा केला की सनदशीर (Constitutional) याचा अर्थ काय? सनदशीर म्हणजे कायदेशीर, असा गोखले करतात. सनदशीर व कायदेशीर (Legal) यांच्यात फार महत्त्वाचा फरक आहे, तो गोखले लक्षात घेत नाहीत. कोणत्याही जनतेच्या मूलभूत हक्कांची सनद अस्तित्वात नसताना राज्यकर्ते आपल्या सोयीप्रमाणे कायदे करतात तेव्हा तेथील कायदा अनियंत्रित राज्यसत्तेचे लक्षण ठरते. त्या कायद्याचा भंग लोकांनी केला तर लोकांचे हे वर्तन असनदशीर म्हणता येणार नाही. कायद्याचे धोरण ठरविण्याकरिता सनद ज्या राज्यपद्धतीत लोकांना मिळालेली असते तेथीलच कायदा हा पालनीय ठरतो. भारतीय जनतेला अशी सनद मिळालेली नाही. सनदशीरपणाचे हे तत्त्व किंवा हा अर्थ जॉन स्टुअर्ट मिल यांच्या 'ऑन लिबर्टी' या ग्रंथावरून टिळकांनी घेतला. जॉन स्टुअर्ट मिल यांनी सनदशीर याचा अर्थ या पुस्तकाच्या प्रस्तावनेत विशद करून सांगितला आहे. या चर्चेत गोखलेपेक्षा टिळक हे अधिक सरस व मूलगामी राज्यशास्त्रज्ञ ठरले. या चर्चेच्या संदर्भात 'सनदशीर' व 'कायदेशीर' (केसरी : ५ मार्च १९०७) या लेखात मौलिक रीतीने या मुद्याचे विवेचन करताना टिळक म्हणतात - ''आजमितीस हिंदुस्थानातील इंग्रजी साम्राज्याची घटना जरी व्यवस्थेशीर असली तरी इतिहासातील रूढ अर्थाप्रमाणे ती 'सनदशीर' नाही, असेच म्हटले पाहिजे. गव्हर्नर जनरल यांचे अधिकार पार्लमेंटच्या कायद्यांनी नियमित आहेत पण या बाबतीत प्रजेच्या हातात कोणताही अधिकार नसल्याने 'सनदशीर' किंवा 'कॉन्स्टिट्यूशनल' हा अर्थ आपल्या राज्यव्यवस्थेला लावता येत नाही. आम्ही जे भांडत आहो किंवा धडपड करीत आहो, ती राज्यकर्त्यांकडून सनदशीर पद्धत प्राप्त करून घेण्याकरता होय आणि हा हक्क राज्यकर्त्यांकडून मिळवावयाचा आहे. तो मिळविण्यासाठीच हा प्रयत्न आहे. त्याला सनदशीर चळवळ असे नाव देणे चुकीचे होईल. सनदशीर शब्द सोडून दिला तर आमचे प्रयत्न कायदेशीर आहेत की बेकायदेशीर आहेत एवढाच प्रश्न शिल्लक राहतो. हल्लीच्या स्थितीत कायदा करणे आमच्या हातचे नाही. तेव्हा आमचे प्रयत्न इतिहासास, मामुली वहिवाटीस, प्रजेच्या नैसर्गिक हक्कांस धरून नीतिदृष्ट्या जरी योग्य असले तरी ते कायदेशीर किंवा बेकायदेशीर ठरविणे ही केवळ सरकारच्या इच्छेची गोष्ट आहे. आमचे योग्य प्रयत्नही एकवेळ यांच्या कायद्याने बेकायदेशीर होऊ शकतील, अशा वेळी आमचे प्रयत्न बेकायदेशीर आहेत असे म्हणणे भाग पडेल. न्याय, नीती आणि ऐतिहासिक परंपरा किंवा प्रगती यांचा आधार आपणांस आहे की नाही एवढेच नीट पाहले पाहिजे आणि लोकांचा आम्हास पाठिंबा असला म्हणजे मग आमचे प्रयत्न कायद्याच्या मर्यादेत येतात की बाहेर पडतात याची आम्ही पर्वा करणे उपयोगी नाही, कारण

कायदा सरकारच्या हातात आहे. आता एवढेच खरे की कायदा मोडला गेला तर शिक्षा ही होणार; परंतु कायदा जर जुलमी असेल तर ही शिक्षा सोसूनच त्याचा प्रतिकार केला पाहिजे, एरवी इलाज नाही. नीती आणि कायदा यांची जेव्हा फारकत होते तेव्हा असेच प्रकार घडावयाचे.''

अनेक राजकीय विचारवंतांकडून भारताच्या स्वातंत्र्यआंदोलनाची मीमांसा करताना अनेक वेळा असे विधान केले जाते की, भारताचा स्वराज्याच्या मागणीचा अर्थ परकीय राज्य नको, परकीय राज्य खराब व जुलमी आहे, ते नष्ट झाले पाहिजे एवढाच नकारात्मक होता. निषेधात्मक भावनेवर आधारलेली स्वराज्याची कल्पना होती; परंतु ही मीमांसा चुकीची आहे. टिळक म्हणतात की, स्वराज्य म्हणजे देशी लोकांचे राज्य एवढाच अर्थ नव्हे. 'स्व' म्हणजे 'आपला' हा मोघम अर्थ आहे. 'जेव्हा प्रजा आणि राजा दोघेही एकाच धर्मातले, एकाच देशातले, एकाच जातीचे आणि एक प्रकारच्या हिताहितसंबंधाचे असणारे असून राजा प्रजेच्या हिताबद्दल नेहमी तत्पर व दक्ष असतो असे जेव्हा घडते, तेव्हा प्रजेस आपल्यावरील राज्य स्वराज्यच आहे असे वाटणे अगदी स्वाभाविक आहे. 'रामराज्य' अशाच प्रकारचे स्वराज्य होते. पण राजे लोक अहंकाराने किंवा अन्य कारणांनी अंध होऊन प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष करू लागले किंवा जुलमी झाले म्हणजे ते राज्य लोकांना नकोसे होते, स्वधर्मातील किंवा स्वदेशातील राजा असताही त्याचे राज्य लोकांस नकोसे होते. पेशवाईच्या अखेरीस शेवटच्या बाजीरावाचे राज्य अव्यवस्थित व दु:खकारक होते. म्हणून खरे स्वराज्य स्वत:च्या राजाचे राज्य नव्हे तर स्वराज्य म्हणजे प्रजेच्या तंत्राने चाललेले राज्य होय.'' अशा अर्थाचे विचार टिळकांनी मांडले. ते वारंवार असे स्पष्ट प्रतिपादन करतात की, ''ज्या राज्याचा कारभार प्रजेच्या किंवा प्रजापक्षाच्या तंत्राने चालतो तेच खरे स्वराज्य होय... नुसता स्वदेशी राजा असला म्हणजे काही सर्व कार्यभाग होत नाही... राजा स्वदेशस्थ की परदेशस्थ या प्रश्नापेक्षा प्रजेच्या हातात सत्ता किती हाच प्रश्न महत्त्वाचा होऊन बसला आहे.'' (स्वराज्य आणि सुराज्य, ०९/०४/१९०७)

''इंग्रजी सरकारची राज्यव्यवस्था केवळ राज्यकर्त्या व थोड्या अधिकारी वर्गाच्या तंत्राने चालत असल्यामुळे आम्हास सुखकर किंवा फायदेशीर होणार नाही आणि स्वावलंबनाची पद्धती कायम राहावी तर तसे होणे अशक्य नाही. राज्यात शिस्त ज्याप्रमाणे अपेक्षित असते ती त्याप्रमाणे इंग्रजी राज्यात नाही व त्यामुळे इंग्रजी राज्याच्या बेशिस्तीने व कायद्याने प्रजा चोहीकडून अडून गेली आहे. राज्यपद्धती नुसती शिस्तवान असल्याने कोणतेही राज्य लोकांना सुखकारक होते, व लोकांच्या तंत्राने चालले म्हणजे ते त्यांना हितकर होते, या दृष्टीने विचार केला म्हणजे प्रजेच्या तंत्राने चालावे असे म्हटले पाहिजे. जेथे सल्लामसलतीने राज्यकारभार चालत असतो तेथे राजा किंवा अधिकारी परदेशस्थ असले तरी, स्वराज्य आणि सुराज्य या दोहोंचे सुख लोकांना प्राप्त होण्यास अडचण पडणार नाही, सर्वात मुख्य

गोष्ट म्हणजे जे आपल्यास हितकारक वाटते त्या दृष्टीने राज्यकारभार चालविण्याकरिता आपणांस सर्वांना अधिकार असावा ही होय आणि खरे स्वराज्य हेच होय. 'स्व' म्हणजे ज्याचा तो, किंवा लोक अथवा एकंदर प्रजा, आणि त्यांचे म्हणजे त्यांच्या सल्ल्याने चालणारे जे राज्य ते स्वराज्य. अशा स्थितीत राजा स्वदेशी असला तर चांगलेच, परदेशस्थ असला तरी फारशी हानी होत नाही. असले राज्य व्यवस्थित व शिस्तवार... सुराज्यच असावयाचे, सुराज्याने स्वराज्याची वाण भरून येत नाही.'' परकीय राज्य जुलमी आहे व बेजबाबदार आहे. स्वराज्याशिवाय आधुनिक जगाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता उन्नती करू शकणार नाही, या विचारावर टिळक येऊन ठेपले. हा त्यांचा वैचारिक ध्येयाचा दुसरा टप्पा होय व तोच भारताच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाचा प्रथम कालखंड होय.

या कालखंडात प्रवेश केल्यानंतर भारताच्या मानवी जीवनाचा आधुनिक रीतीने सर्वांगीण विकास करावयाचा आहे आणि त्यासाठी पाश्चमात्य परचक्राच्या शृंखला तोडल्या पाहिजेत अशा निर्धारावर टिळक येऊन ठेपले. त्यांचे लेखन अधिक धारदार होऊ लागले व लेख तळपू लागले. स्वराज्याचा प्रथमपासून अखेरपर्यंतचा मार्ग त्यांच्या क्रांतदर्शी दृष्टीच्या समोर होता.

टिळक गांधीमार्गाचे पहिले उपदेशक

गांधीजी हे स्वत:स गोखल्यांचे शिष्य म्हणत असले, व वैयक्तिक संबंधामुळे हे शिष्यत्वाचे नाते जरी निर्माण झाले असले तरी राष्ट्रीय आंदोलनाच्या संदर्भात असेच म्हणावे लागते की गांधी हे एकअर्थी टिळकांचे अनुयायी होते. कारण गांधी-मार्ग हा टिळकांना दिसला होता. यावर कोणी असे म्हणेल की टिळक हे सशस्त्र क्रांतीच्या पाठीशी उभे होते हे जर सत्य असेल तर गांधी त्यांचे अनुयायी होते असे कसे म्हणता येईल? सशस्त्र क्रांतीचा मार्ग हा अव्यवहार्य मार्ग आहे असे टिळकांनी वारंवार म्हटले आहे. सशस्त्र क्रांतीचा मार्ग आक्रमणाऱ्या देशभक्तांबद्दल टिळकांना नितांत सहानुभूती वाटत होती हे स्पष्ट असले तरी टिळक हे आपले विचार प्रामाणिकपणे मांडत होते असे जे मानतात त्यांना टिळक हे सशस्त्र क्रांतीच्या मागे नव्हते याबद्दल संशय बाळगण्यास कारण नाही. टिळक हे एका अर्थी गांधी-मार्गाचे पहले उपदेशक होते असेही म्हणता येते. टिळकांची सनदशीर व कायदेशीर या संबंधातील मौलिक मीमांसा लक्षात घेतली असता याबद्दल शंका राहत नाही. १९०७ साली जानेवारी २ या दिवशी कलकत्त्याच्या कॉलेज स्क्वेअरमध्ये टिळकांनी जे व्याख्यान दले त्यात जहाल व नेमस्त या दोन्ही पक्षांचा निर्देश करून दोन्हीमधला फरक स्पष्ट करून दाखविला. जहाल हे स्वावलंबनपूर्वक स्वराज्यासाठी लढावे असे म्हणतात तर नेमस्त हे ब्रिटिशांच्या भल्यासाठी स्वराज्याची भिक्षा मागणारे आहेत, असा दोन्हीतला फरक त्यांनी स्पष्ट केला. ध्येय एक परंतु कार्यक्रम व मार्ग मात्र निरनिराळे.

या संदर्भात कलकत्त्याच्या भाषणात म्हणतात की, ''तुमच्यात सशस्त्र प्रतिकाराची शक्ती नाही हे जरी खरे असले तरी तुमच्यात बहिष्कार आणि असहकार यांची शक्ती खासच आहे. इंग्रजी राज्याच्या विरुद्ध तुम्ही ही शक्ती वापरावयास नको काय? आपण बहिष्कार घालू शकतो. आपल्या राज्याच्या सरहद्दीबाहेर रक्त आणि पैसा वापरला जाणार नाही अशी तजवीज करू शकतो. आपले न्यायासन योग्य वेळी निर्माण करू शकतो आणि अखेरीस करबंदीही करू शकतो. स्वदेशी आंदोलनाबरोबर बहिष्कार हा मात्र परदेशी माल विकणाऱ्या व घेणाऱ्या लोकांवर जबरदस्ती करण्याचा आहे. राजद्रोहाचा कायदा आपण सविनय कायदेभंगाने मोडू शकतो. याचे परिणाम काय होतील याची पर्वा करू नये. तीन-चार हजार लोकांना कारागृहामध्ये राहण्यास प्रवृत्त करून नोकरशाहीची स्थिती केविलवाणी करू शकतो. ही क्रांतीची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. ही क्रांती रक्तहीन क्रांती होय. या क्रांतीमध्ये रक्त सांडले जाणार नाही असे नाही. जनतेला यातना होणार नाही असे नाही. यातना सहन करण्याची तयारी करावी. या यातना भयंकर असतील याची खूणगाठ बांधा!!'' हे गंभीर विचार त्यांनी मोठ्या हिमतीने आणि भीष्मप्रतिज्ञेने आमच्यासमोर मांडले, असे एका राजकीय विचारवंताने लिहून ठेवले आहे. याशिवाय दुसरे प्रमाण असे की, टिळकांनी गांधीशिष्या सौ. अवंतिकाबाई यांनी लिहिलेल्या गांधीचरित्राच्या प्रस्तावनेत म. गांधींच्या सत्याग्रहाचे तात्त्विक रहस्य मांडून सत्याग्रहमार्गाचे समर्थन केले आहे.

टिळकांचे टीकाकार यासंबंधी असा आक्षेप घेतात, की त्यावेळी टिळक हे जर अशा निर्वाणीच्या लढ्याचे उद्गाते होते तर मग त्यांनी १९०८ सालच्या राजद्रोहाच्या खटल्यामध्ये मी राजद्रोह केला नाही, तो सिद्ध होऊ शकत नाही, अशा तऱ्हेचा पवित्रा का घेतला? त्याचप्रमाणे 'मी जे लिहीन ते कायद्याच्या सीमेत राहूनच लिहीन' असे वारंवार का लिहितात? टिळक मुत्सद्दी होते. त्यांना जनतेला पाठीशी ओढावयाचे होते. याकरिता त्यांना कायद्याच्या मर्यादेत लेखनस्वातंत्र्याचा उपयोग करावयाचा होता व तो उपयोग उत्तम रीतीने त्यांनी करून घेतला, याचे प्रत्यंतर त्यांच्या दोन्ही कारागृहवासाच्या शिक्षेनंतर मिळाले. टिळक हे त्यावेळच्या कालखंडाच्या महान जनशक्तीचे प्रतिनिधी होते. त्यांच्या विचाराच्या प्रभावाने लोक कारागृहाच्या दरवाजापर्यंत येऊन ठेपले; परंतु कारागृहाच्या दरवाजाला धक्का मारण्याइतके आत्मबल तोपर्यंत त्यांना प्राप्त झाले नव्हते. टिळकांसारखे फार थोडेच कारागृहाच्या भिंतीआड विजनवासी होऊन यातना सहन करीत होते. एका अर्थाने असे म्हणता येईल की आम्ही तुमच्या मागून येण्यास तयार आहो असे आश्वासन जनतेकडून टिळकांना न मिळाल्यामुळे टिळक कायद्याच्या मर्यादेत राहूनच जनजागृतीचे कार्य करीत राहले. हे आश्वासन गांधीजींना मिळाले म्हणून ते पुढे गेले. तात्पर्य, टिळकयुगातूनच गांधीयुगाचा प्रारंभ झाला.

टिळकांच्या साहित्याची वाङ्मयीन महात्मता

कै. बा. सी. मर्ढेकर हे महाराष्ट्रातील नवकाव्य प्रणालीचे मुख्य प्रवर्तक, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सौंदर्यतत्त्वज्ञ व समीक्षक होते. यांनी काव्यसमीक्षेच्या निकषांमध्ये वाङ्मयीन महात्मता हा काव्याचा एक मुख्य निकष सांगितला आहे. हा निकष म्हणजे अनुभूतीची शुद्ध निष्ठा होय. वैचारिक साहित्यालासुद्धा कलात्मकता किंवा सौंदर्य असते हे मर्ढेकरांना मान्य असो वा नसो; परंतु थोर प्रतिभावंत इंग्लिश नवकवी टी. एस. इलियट व अनेक पश्चिमी काव्यसमीक्षक हे वैचारिक साहित्यालाही कलात्मकता व अप्रतिम सौंदर्य असू शकते असे मानतात. बायबल, स्पिनोझाचे नीतिशास्त्र किंवा तत्त्व ब्रॅडले याचे ग्रंथ अशा वैचारिक कलात्मक साहित्याचे उत्तम नमुने म्हणून ते उद्धृत करतात. टिळकांच्याही केसरीतील लेखसंभाराला व 'गीतारहस्या'ला कलात्मक साहित्याची पदवी प्राप्त झाली आहे. हे नाकारणे म्हणजे प्रज्ञेचे सौंदर्य नाकारणे होय. बायबलप्रमाणेच कुराणाला, ऋग्वेदातील उषासूक्तांना किंवा हिरण्यगर्भ, त्वष्टा, नासदासीय इत्यादी सूक्तांना व प्राचीन उपनिषदांना प्रज्ञेचे सौंदर्य आले. विशेष म्हणजे कुराणाला संगीताची सुस्वरताही लाभली आहे. या सर्व वर उद्धृत केलेल्या साहित्यामध्ये जे क्रांतदर्शी प्रज्ञेचे किरण पसरलेले आहेत त्यांच्या योगाने सात्त्विक व श्रद्धाशील मानवी हृदयातील अनंत काळ साठलेले तम क्षणात विरून त्या हृदयाला विलक्षण दिव्य प्रकाशाचा अनुभव येतो व 'तमसो मा ज्योतिर्गमय' ही उत्कंठित मानवी हृदयाची अनादि काळची प्रार्थना सफल होते, अमरत्वाचा लाभ होऊन मृत्यूचे भय लुप्त होते, अमृतमय जीवनाचा आविष्कार होतो, सत्याचा अनंत मार्ग आक्रमिण्याचे अदम्य धैर्य निपजते. उपनिषदे, भगवद्गीता, बायबल, कुराण यांच्या योगाने अनेक प्राचीन जमातीतील व अनेक राष्ट्रातील लोकांना दिव्य जीवनाचा साक्षात्कार घडून आला, याचे कारण त्यातील वाङ्मयीन महात्मता होय.

टिळक व गांधी यांच्या लेखनातही ही वाङ्मयीन महात्मता प्रतिबिंबित झाली आहे. गांधींच्या लेखनात जी निष्ठा व आत्मप्रत्यय दिसतो तोच टिळकांच्याही लेखनात दिसतो. आत्मप्रत्यय व प्रतिभा यांच्या संगमात साहित्यसौंदर्य निर्माण होते. हा संगम टिळकांच्या लेखनशैलीचे मूळ रहस्य आहे. गांधीच्या लेखनात स्वभावोक्ती व प्रसाद आहे तर टिळकांच्या लेखनात स्वभावोक्ती, प्रसाद व ओज आहे. तत्त्वज्ञान व गणित यावरील प्रभुत्वामुळे टिळकांच्या लेखनास युक्तिवाद, विश्लेषण, चिंतनशीलता, विवेक हे गुण लाभले आहेत. गांधींप्रमाणेच टिळक नैतिक सत्याच्या म्हणजे स्वातंत्र्याच्या शोधात आहेत व वाचकालाही त्या शोधात सामील करून घेत आहेत असा पदोपदी अनुभव येतो. सत्याच्या उच्च पदाकडे होणारी ही यात्रा सत्याकडे जात असता उत्कंठा व उत्साह निर्माण करते. पश्चिमी लोकशाही जीवनमूल्यांचा चमकदार गाभा या सत्याच्या शोधात प्रकट होतो, त्याचे निरनिराळे पैलू दृष्टोत्पत्तीस येतात; स्वातंत्र्याचा अगाध महिमा हिमालयातील यात्रेकरूचे

भान हरपून टाकणाऱ्या हिमालयाच्या महाम्याप्रमाणे प्रत्ययास येतो. स्वातंत्र्याची उंचनीच शिखरे जिंकण्याचे धैर्य या महाम्याच्या दर्शनाने प्राप्त होते. संस्कृत ललित साहित्याचे व महाभारताचे अवगाहन केलेली टिळकांची प्रज्ञा व्यास, कालिदास, वाल्मीकी व भवभूती यांच्यातील उपमा, रूपक, व्याजोक्ती इत्यादी सुंदर अलंकाररत्नांना उचितच स्थळी उद्धृत करते. मात्र कोठेही भाषेचा फुलोरा किंवा वक्तृत्वाचा कृत्रिम हव्यास दिसायचा नाही. एखाद्या लेखात हे साहित्य गुण किंवा हे तर्कयुक्त विश्लेषण लुप्त झालेले दिसले तर असे समजावे की ते टिळकांचे नव्हे. कोणी तरी (Ghost Writer) भूत संपादकाने लिहिले असावे किंवा टिळकांनी घाईघाईने लिहिलेले असावे; खरोखर टिळकांना उथळ लेखन करता येणे शक्य होते काय? उदाहरणार्थ त्यांनी घाईघाईने लिहिलेला महात्मा गांधींच्या चरित्राच्या प्रस्तावनेचा लेख पाहावा, तेथेही त्यांची चिंतनशीलता दगा देत नाही. होमरही डुलक्या घेतो असे म्हणतात. तसेही क्वचित् असेल, नाही असे नाही.

केसरीचे इतर संपादक व टिळक यांच्या लेखनातला मुख्य फरक म्हणजे तर्कशुद्धता अबाधित राखणे हे टिळकांचे वैशिष्ट्य होय. इतरांच्या लेखनात ती बाधित झालेली अनेक वेळेला दिसते, टिळकांच्या निष्ठेला अपवाद नाही. इतरांच्या लेखनात हे अपवाद मधूनमधून आढळतात. टिळकांच्या लेखात लोकशाही स्वातंत्र्याचे मूल्य केव्हाही खाली जात नाही, परकीय पारतंत्र्याच्या विरुद्ध लढण्याचा बाणा कोठेही वाकत नाही, अंतम स्वार्थत्यागाची प्रतिज्ञा कोठेही सुटत नाही वा मर्यादित होत नाही. याच्या उलट इतरांच्या लेखनात असे क्वचित् घडलेले दिसते. टिळकांची स्वराज्याची प्रतिज्ञा ही भीष्मप्रतिज्ञा आहे, या प्रतिज्ञेने स्वत:चे मरण डोळ्याने पाहिले आहे. त्यामुळे टिळकांचे लेखन हे भारताच्या उद्योगपर्वापर्यंतच्या स्वातंत्र्ययुद्धाचे गद्य महाकाव्य बनले आहे.

वाई **- लक्ष्मणशास्त्री जोशी**

१ ऑगस्ट १९६९.

प्रकाशक - **साहित्य अकादमी,**
नवी दिल्ली
(१९६९)

○○○

(३)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

॥ लेखसंग्रह ॥

खंड पहिला

प्रस्तावना

माझा निवडक लेखसंग्रह दोन खंडांमध्ये प्रसिद्ध करण्याचा प्रस्तुत प्रकाशकांचा उद्देश आहे. प्रथम मला सांगावेसे वाटते, की या लेखसंग्रहातील लेखांची निवड अधिक कसोशीने केली असती, तर आजच्या असह्य महागाईच्या काळात अधिक युक्त ठरले असते. असो. आधुनिक भारताच्या आणि महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय आंदोलनाशी मी माझ्या पहिल्या उमेदीपासून एकरूप झालेलो आहे. त्या एकरूपतेचे वैचारिक स्वरूप माझ्या लेखनामध्ये दृग्गोचर होते. जागतिक संस्कृती सतराव्या शतकापासून सुरू झालेल्या वैज्ञानिक युगाच्या प्रभावाने परिवर्तन पावत आहे. विज्ञानयुगाच्या पूर्वीच्या युगामध्ये जगातील संस्कृती या फार सावकाश बदलत होत्या. किंबहुना एका अर्थी त्यांच्यामध्ये जाड्य भरले होते. त्या चिरकाल स्थिरावलेल्या दिसत होत्या, तरीदेखील त्यांमध्ये परिवर्तन किंवा क्रांती घडविणाऱ्याही घटना घडलेला इतिहास सांगतो. परंतु या परिवर्तनकारक किंवा क्रांतिकारक घटना स्थिरावल्यावर एक प्रकारची जडता माणसाच्या सांस्कृतिक जीवनात विज्ञानयुगाच्या प्रारंभापर्यंत भरून राहलेली दिसते. परंतु आता यापुढे सतत परिवर्तन होत राहणार. हे विज्ञानयुग आहे. यात परिवर्तनाचा वेग वाढतच चालला आहे.

या विज्ञानयुगाचे केंद्र व उत्पत्तिस्थान पश्चिमी ख्रिश्चन संस्कृती होय. या विज्ञानयुगाची गर्भधारणा ही चौदाव्या शतकातील युरोपियन इतिहासामध्ये झालेली दिसते. त्याला प्रबोधन युग म्हणतात. ते भारताचे घोर निद्रायुग होते. सतराव्या शतकाच्या प्रारंभी विज्ञानयुगाचा जन्म झाला. त्यानंतर वैज्ञानिक क्रांती व औद्योगिक क्रांती झाली. भारताचे प्रबोधन युग एकोणिसाव्या शतकात सुरू होते. युरोपियन प्रबोधन व वैज्ञानिक आणि औद्योगिक क्रांती या शक्तींचा भारताशी साक्षात घनिष्ठ संपर्क ब्रिटिशांच्या राजवटीमुळे घडून आला. या शक्तींच्या संपर्कामुळे राजा राममोहन राय यांच्या प्रेरणेने भारतीय प्रबोधन युगाची प्रभा प्रकट झाली.

तेव्हा असे दिसू लागले, की भारतातील प्रचलित रूढ धर्मसंस्था ही भारताच्या सामाजिक व सांस्कृतिक अवनतीस कारण झाली आहे. म्हणून भारतातील धार्मिक संस्था शुद्ध व अत्यंत व्यापक अशा तात्त्विक अधिष्ठानावर पुन्हा उभारल्या पाहिजेत. त्यामुळे भारतातील संकुचित व अनैतिक सामाजिक रूढी आणि रीतिरिवाज बदलण्यास योग्य अशी प्रेरणा मिळू शकेल. अशी वैचारिक भूमिका या प्रबोधनकालातील विचारवंतांनी स्वीकारली. त्याकरिता त्यांनी भारतीय धर्माची, विशेषत: हिंदू धर्माची, सर्वांगीण बुद्धिवादी समीक्षा सुरू केली. हिंदुंचे वेद, स्मृती व पुराणे हे धर्मग्रंथ, इस्लामचे कुराण, ख्रिश्चनांचे बायबल इ. सर्व धर्मग्रंथ हे मानवप्रणीत आहेत, असा सिद्धांत स्वीकारून, सर्वधर्मसत्ता स्वीकारून, सर्वधर्मसमन्वय करण्याचा प्रयत्न केला. हे या धर्मसुधारणेच्या आंदोलनाचे प्रधान स्वरूप होय. धर्मग्रंथ हे मानवनिर्मित म्हणून मान्य केल्यावर त्यांच्यामध्ये सत्य आणि असत्य अशा विचारांचा संकर असू शकतो, हे गृहीत कृत्य ठरले. सर्व धर्मांची समीक्षा सुरू झाली.

सामाजिक रूढी, सामाजिक फायदे, जाती व वर्ग यांचे संबंध या सर्वांचे परंपरागत हिंदू धर्माप्रमाणे धर्मग्रंथ हेच प्रमाणभूत आधार मानले गेले होते. हे धर्मग्रंथांचे प्रामाण्य अबाधित व संपूर्णपणे स्वीकारले गेले होते. या प्रामाण्यबुद्धीला किंवा श्रद्धेला नव्या विवेकवादाने व तार्किक समीक्षेने मर्यादा पडू लागल्या व तडे जाऊ लागले. धर्मग्रंथांत नव्या अन्यायरहित सामाजिक रचनेला अनुकूल असे विचार वा सिद्धांत कोणते आहेत व प्रतिकूल आणि प्रगतीला मारक असे विचार व सिद्धांत कोणते यासंबंधी संशोधन सुरू झाले. या संशोधनाचा आढावा या लेखसंग्रहामधील विभाग दोन - ‘धर्म व समाज’मध्ये घेतलेला आढळेल.

सामाजिक जीवनाचा अर्थ किंवा मानवी संस्कृतीचा अर्थ ऐतिहासिक दृष्टिकोनातूनच अधिक चांगल्या रीतीने समजतो. धर्म ही मानवी इतिहासातील एक युगानुयुगे स्थिरावलेली व विभिन्न देशकालांमध्ये अत्यंत विभिन्न व परस्परविरोधी रूपे धारण केलेली संस्था आहे. याचे स्पष्टीकरणही या लेखसंग्रहातील ‘धर्म व समाज’ या विभागात मिळू शकते. सर्व धर्मांच्या मुळाशी अलौकिक दिव्य शक्ती म्हणजे ईश्वराची जाणीव दृढमूल झालेली असते, असे अनेक धार्मिक तत्त्वज्ञ मानत आले आहेत; परंतु दगड-धोंडे, झाडे-झुडपे, नदी-पर्वत, आकाशातील तारे, गाई-बैल, साप, वाघ, सिंह इ. जनावरे, अग्नी, वारा, आकाशातील सूर्य-चंद्रादी ग्रह आणि तारे वा मंत्रतंत्र, विशिष्ट स्त्री-पुरुष, संतमहंत, प्रेषित यांना देव म्हणून शरण जाऊन पूजणारे धर्मपंथ आदम मनुष्यजातीपासून तो अद्ययावत सुधारलेल्या मानवसमाजातही आज आढळतात. वैदिक संस्कृतीचे लोक प्राचीन काळी विविध देवांची पूजा व प्रार्थना करीत होते. एकदेववादी, बहुदेववादी असे अनेक धर्म जगात आहेत व होते. एकेश्वराची कल्पना देखील सर्व धर्मांमध्ये सारखी नाही. यहुदी धर्मातील एकेश्वर कडक स्वभावाचा पिता आहे. तो निराकार असून सर्वज्ञ सर्वसाक्षी आहे. ख्रिश्चनांचा देव प्रेमळ पिता व निराकार, तो ख्रिस्ताचा आकार घेऊनही अवतरतो. ख्रिश्चनांमध्येदेखील पिता, पुत्र व

पवित्र भूत अशा विविध स्वरूपाचा देव मानणारे पंथ आहेत आणि तो केवळ एकरूपच आहे असे मानणारे काही संप्रदाय आहेत. हिंदुंचा देव निराकार आहे व साकारही आहे. यहुदी, ख्रिस्ती व मुसलमान यांचा देव निराकार आहे; परंतु सगुण आहे. हिंदूंचा देव निराकार व साकार, सगुण व निर्गुण, शुद्ध अद्वैतरूप किंवा वेगळा असा आहे. हिंदुंच्या धर्माची तत्त्वज्ञाने देव, जीव व जगत् यांच्या स्वरूपासंबंधी मौलिक मतभेदाने भरलेली आहेत. म्हणून असे म्हणता येते, की सर्व धमसंस्थांचे परस्पर विसंगत व विरोधी स्वरूप पाहले म्हणजे हे सर्व धर्म परस्पर विसंगत असल्यामुळे ते मानवमनोनिर्मित म्हणजे केवळ कल्पित आहेत, हे निश्चित करता येते. त्यातील एक कोणता तरी धर्म सत्य व अन्य धर्म असत्य असे मानण्यात अंधश्रद्धेशिवाय अन्य प्रमाण नाही. जे मानवमनोनिर्मित म्हणजे केवळ कल्पित नसते त्याबद्दल इतके मतभेद होत नाहीत. आकाशात चंद्र व सूर्य आहेत की नाहीत याबद्दल मतभेद नसतो. अन्न हे शरीरपोषक आहे की नाही याबद्दल मतभेद नसतो; परंतु मूर्तिपूजा करावी की नाही याबद्दल धार्मिक मतभेद अत्यंत तीव्र बनून मूर्तिपूजक व मूर्तिपूजा न करणारे धर्म एकमेकांचे शत्रू बनतात. जगातील धर्म हे एकमेकांचे पक्के निरंतरचे शत्रू बनलेत. यासंबंधीच्या पुराव्यांनी ख्रिश्चन व इस्लाम धर्म यांचा इतिहास गच्च भरला आहे. मानवजातिशास्त्रज्ञांनी गेल्या दोनशे वर्षांत जगातील आदम जातिजमातीपासून ते अत्यंत सुधारलेल्या राष्ट्रांच्या धर्मसंस्थांची व तत्संबंधी सामाजिक रीतिरिवाज यांची माहिती गोळा केली आहे, यावरून आधुनिक सुशिक्षित मनुष्याने, मानवजातींच्या परस्परविद्वेषाचे व संग्रामाचे महत्त्वाचे कारण जी धर्मसंस्था त्यासंबंधी, आग्रहाची भूमिका संपूर्ण टाकली पाहिजे. सर्व धर्मांची समानता म्हणजे सर्व धर्म मानवाने मनाने निर्मले आहेत, इतिहासक्रमामध्ये पूर्वीच्या धर्मसंस्थांमध्ये व धार्मिक संकल्पनांमध्ये तारतम्य विचारपूर्वक बदल झाले आहेत व क्रांत्याही झाल्या आहेत. सर्वधर्मसमानता म्हणजे सर्व धर्मांमध्ये एकच एक शाश्वत अंतम सत्य व्ा परम उच्च श्रेयस्कर असे मानवमुक्तीचे साधन सांगितले आहे, असे म्हणता येत नाही. भिन्न धर्म म्हणजे अत्यंत मौलिक मतभेद असलेले धर्म होत. म्हणून त्यांच्यामध्ये अंतम तत्त्वाच्या बाबतीत समानता आहे, असे विधान करणे वस्तुस्थितीचा विपर्यास करणे होय.

शाश्वत सत्य म्हणून काही सांगण्याचा प्रयत्न केला तर तो विफल ठरतो. त्यात ऐकमत्य होत नाही. म्हणून सर्वधर्मसमानता याचा अर्थ स्पष्ट करताना सर्व धर्मांमध्ये एक मूलतत्त्व शोधण्याचा प्रयत्न करू नये; धर्म ही सर्वकालीन मानवसमाजांची पकड घेतलेली संस्था आहे हे लक्षात घेऊन त्यात कसलेही ऐकमत्य सापडत नसले तरी ज्या व्यक्तींना, समुदायांना, जातींना, जमातींना वा राष्ट्रांना जी धर्मपद्धती मान्य असेल त्याप्रमाणे तिचा स्वीकार करण्यास मनापासून संमती देणे म्हणजे सर्वधर्मसमानता मानणे होय. असा सर्वधर्मसमानतेचा अर्थ सांगावा. मात्र कोणत्याही धर्मपद्धतीत सामाजिक विषमता व अन्याय राहणार नाही, अशा दृष्टीने ती ती धर्मपद्धती स्वीकारली गेली पाहिजे.

धर्म हा कोणत्या स्वरूपात आजपर्यंत मानवसमाजांनी कायम टिकवला आहे. याचा अर्थ, धर्म ही मानवी मनाची फार महत्त्वाची गरज आहे, असा होतो. अशात अलौकिक शक्तीची अनेक कारणांस्तव जाणीव आजपर्यंत अनंत मानवांच्या मनात दृढमूल झाली आहे. ही जाणीव बुद्धिवादाच्या निकषाने तपासली असता धर्म हा एक प्रकारचा भ्रम आहे, असेही म्हणता येते. भ्रम म्हणण्याचे कारण धर्म संकल्पनेतील अलौकिक दिव्य शक्ती म्हणजे देव होय, व त्या देवाचे विवरण करताना त्याच्या अस्तित्वाचे कसलेही प्रमाण दाखविता येत नाही. जे दाखवले जाते ते युक्तिवादांनी सहज खोडता येते. इतके असूनही या विविध प्रकारच्या धार्मिक भ्रमाला मनुष्य का परमसत्य समजून कवटाळून बसतो, याचे स्पष्टीकरण मनोविश्लेषणशास्त्रज्ञ करू लागले आहेत. सिग्मंड फ्राइड यांनी 'द फ्यूचर ऑफ द इल्यूझन' या निबंधात या भ्रमाचा छडा लावण्याचा प्रयत्न केला; परंतु तो पूर्ण समाधानकारक ठरत नाही.

धार्मिक तत्त्वज्ञानाचे व धर्माचे खंडन करणारा विचार म्हणजे विज्ञाननिष्ठ भौतिकवाद वा जडवाद होय. या जडवादाच्या आधारे सामाजिक, राजकीय व आर्थिक नवीन समाजरचनेची प्रेरणा देणारी मुख्य विचारसरणी व ध्येयवाद मार्क्सवाद होय. त्याची समीक्षा या लेखसंग्रहातील विभाग १ : भौतिकवाद यामध्ये आली आहे व विभाग ३ : तत्त्वज्ञान यामध्ये जे लेख आले आहेत, त्यांच्यामध्ये आधुनिक ऐतिहासिक दृष्टिकोन लक्षात ठेवून भारतीय तत्त्वज्ञानाचा उदय आणि विकास चर्चिला आहे. भारतीय मौलिक तात्त्विक विचारांचा परामर्श घेणारे लेख यात समाविष्ट केले आहेत. तत्त्वज्ञान विभागातील बहुतेक लेख हे 'मराठी विश्वकोशा'च्या निरनिराळ्या खंडांत प्रसिद्ध झाले आहेत. त्याला अपवाद 'भारतीय तत्त्वज्ञान उदय व विकास', 'आनंदमीमांसा' व 'भारतीय नास्तिकवाद' हे अन्यत्र प्रसिद्ध झालेले लेख होत. मराठी विश्वकोशातील लेख हे विश्वकोशरचना शैलीच्या मर्यादेत लिहिले आहेत. विषयाची सामान्य रूपरेषा व थोडक्यात महत्त्वाचे मुद्दे सांगणे हे या शैलीचे वैशिष्ट्य होय. भारतीय तत्त्वज्ञानास 'दर्शन' अशी संज्ञा आहे. षड्दर्शने (सहा तत्त्वज्ञाने) म्हणून जी प्रसिद्ध आहेत त्यांच्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक दर्शने म्हणजे तत्त्वज्ञाने प्राचीन भारतीयांनी निर्माण केली आहेत. त्यातील कोणतेही महत्त्वाचे तत्त्वज्ञान व्यवस्थित आटोपशीर रीतीने मराठीमध्ये मांडायचे झाले, तर विश्वकोशाची कमीत कमी १०० पाने तरी द्यावयास पाहिजेत. पाच-सहा पानांत हे शंभर पानांत मावणारे तत्त्वज्ञान आटपावे लागले आहे. या लेखसंग्रहातील त्या त्या तत्त्वज्ञानाची मांडणी म्हणजे केवळ त्या तत्त्वज्ञानाची सामान्य रूपरेखाच होय. मग यावर कोणी असे म्हणेल की, हे लेख या निवडक लेखसंग्रहात कशाकरता घेतले आहेत? नसते घेतले तर बरे झाले असते. यावर उत्तर असे, की भारतीय दर्शने इंग्लिशमध्ये व अन्य पश्चिमी भाषांमध्ये विद्वानांनी अभ्यासपूर्वक सविस्तर मांडली आहेत. मराठीमध्येही आचार्य बापट, न. चिं. केळकर, प्रा. दीक्षित इत्यादिकांनी भारतीय दर्शनांची मांडणी केली आहे. पश्चमी भाषांमध्ये भारतीय दर्शनांचा ऐतिहासिक परामर्श ठीक

केलेला असतो. मराठीमधील ग्रंथांत ऐतिहासिक परामर्शाला महत्त्व न देता त्या दर्शनांच्या भावार्थाला महत्त्व दिलेले असते. आचार्य बापटांनी सर्वदर्शनसंग्रहाचे भाषांतर मराठीत केले आहे. अर्थात त्यामध्ये ऐतिहासिक दृष्टी नसणे हे स्वाभाविक आहे. कारण ऐतिहासिक दृष्टीने विचारांचा परामर्श घेण्याची पद्धती भारतात पश्चिमी बौद्धिक संस्कृतीच्या प्रभावामुळे आली आहे. हा ऐतिहासिक परामर्श या लेखसंग्रहातील दर्शनांवरील लेखाचे वैशिष्ट्य आहे. ऐतिहासिक दृष्टीने पश्चिमी विद्वानांनीसुद्धा ज्या संकल्पनांचा ऐतिहासिक परामर्श घेतला नाही. अशा अनेक महत्त्वाच्या संकल्पनांचा ऐतिहासिक परामर्श या लेखांमध्ये घेतला आहे. हे दर्शनांवरील लेख म्हणजे त्या त्या दर्शनांची केवळ सामान्य रूपरेषा असली, तरी त्यांचे आकलन त्या विषयाचे अगोदरच अध्ययन केलेल्या व्यक्तींसच चांगल्या रीतीने होऊ शकेल. उदा. शंकराचार्यांचा 'केवलाद्वैतवाद' हा लेख पाहावा. ज्याने अद्वैत वेदान्ताचे विशेषत: शंकराचार्यांच्या प्रस्थानत्रयीचे अध्ययन केले असेल त्यालाच त्यासंबंधी त्या लेखातील विचारांची विशिष्ट संगती लक्षात भरू शकेल. सामान्य सुशिक्षित वाचकाला हे लेख आकलन करता येतील असा भरवसा देता येत नाही. परंतु जैमिनी, कणाद, गौतम, कपिल, कुमारिलभट्ट हे व्यक्तिविषयक लेख सामान्य सुशिक्षित वाचकास नीट रीतीने समजू शकतील.

येथे सामसंहितेचा आणि कपिष्ठलसंहितेचा निर्देश केला नाही. कारण त्या संहितांमधील वचने उद्‌धृत केलेली नाहीत. अथर्ववेद म्हणताना त्याच्या शौनक आणि पैप्पलाद या दोन्ही शाखा अपेक्षित आहेत. तैत्तिरीयसंहितेपूर्वी अथर्ववेदाचा उल्लेख केला आहे. कारण यजुर्वेदाच्या सर्व संहितांमध्ये अथर्ववेदातील खूप मंत्रांचा उद्धार केला आहे. यजुर्वेद संहितांमध्ये ऋग्वेदातील मंत्रांचा उद्धार आहे तसा तो अथर्ववेदीय मन्त्रांचाही मोठ्या प्रमाणावर आहे. जैमिनीय आणि शतपथ यांचा कालक्रम निश्चित करता आला नाही म्हणून त्याचा निर्देश क्रमवारीने केला नाही.

उपनिषदांमध्ये सविस्तरपणे प्रकट झालेल्या तत्त्वविस्ताराचे ऐतिहासिक दृष्टीने पूर्वरूप मूळ उपनिषत्पूर्व वैदिक वाङ्‌मयात कसे आढळते ते दाखवून देण्यासाठी पहिला भाग रचला आहे. जी तत्त्वे, सूत्रे उपनिषदांमध्ये प्रकट झाली, परिपक्व झाली, त्यांचे बीज, प्रक्रियेने अंकुर फुटणे या प्रकारे पूर्वसिद्धता वैदिक ग्रंथसंभारात झाली होते हे पटवून देण्यासाठी पहिला भाग निर्माण झाला आहे. वास्तविक सर्वच वेद उपनिषदोक्त दर्शनाचा निरपवादपणे कारणरूप आहे असे जाणणे/मानणे शक्य आहे. येथे त्याच वचनांचा परामर्श केला आहे. जी फार विचार न करता उघडउघड उपनिषदांच्या अर्थाचे मूळकारण आहेत, असा निश्चय करता येतो. विचाराच्या विकासाच्या ऐतिहासिक परंपरेला जाणून घेऊन मिळवलेला प्रगत विचाराचा उपयोग दार्शनिक विचारवृद्धीसाठी उपयोगी ठरेल-ठरावा हे प्रथम भागाचे प्रयोजन आहे.

अध्यात्माचे दर्शन घडवण्यासाठी हा उपक्रम असल्यामुळे त्या त्या विषयाला अनुसरून उद्‌धृत केलेल्या वचनांमध्ये त्या वचनांच्या अध्यात्मदृष्ट्या तात्पर्याबद्दल विद्वानांमध्ये मतभिन्नतेला भरपूरच वाव आहे. मतभिन्नता कशी कमी करता येईल, त्यात सामंजस्य कसं निर्माण करता येईल, याचा विचार आम्ही केला आहे. ऋग्वेदातील सूक्ते उद्‌धृत करताना सायणभाष्याचा आधार घेऊन मतभिन्नता येऊ नये अशी व्यवस्था-अपेक्षा आम्ही केली आहे. आम्ही उद्‌धृत केलेल्या वचनांमुळेही मतभिन्नता-वेगळी विचारसरणी निर्माण होऊ शकेल हे आम्हाला मान्य आहे.

वेगवेगळ्या विषयांनुसार संहिता, ब्राह्मण इत्यादींमधील सर्व वचने क्रमाने उद्‌धृत केली आहेत. विषयांचा क्रम असा आहे- आदि देवतारूप परमात्मा, सृष्टि, शारीरिक विश्व, जीवनाची गति, धर्मतत्त्व, श्रेयाचे स्वरूप आणि प्रणव.

वाय १८२-२१

संहितेमध्ये आणि ब्राह्मणांमध्ये या वाक्यांमध्ये अग्नि इत्यादी देवतांचे सर्वेश्वरत्व, सर्वात्मत्व, सर्वदेवतारूपत्व व्यक्त केले आहे, त्यांचाच समावेश प्रथमविशेष विभागात केला आहे. अग्नि इत्यादींच्या वर्णनाची इतर वचने येथे विचारात घेतलेली नाहीत. पृथिवी आदि-सृष्टीच्या निर्मितीबद्दल मंत्र जसे उपनिषदात आढळतात, तसेच ते संहिता-ब्राह्मण इ. ग्रंथांमध्येही येतात. त्यांचे संकलन येथे केले आहे. मन, प्राण, इन्द्रिये इत्यादींसह असलेल्या शरीराचे वर्णन वेदांत अनेक ठिकाणी येते. ती वर्णने आणि मन, प्राण इत्यादींचे विभिन्नत्व सांगणारी वचने तिसऱ्या भागात एकत्र केली आहेत. जीवाच्या गतीचा संक्षेपाने आणि विस्तारानेही वेदांत आलेला विचार येथे समाविष्ट आहे. उपनिषदांपेक्षा वेगळा सर्वच वेद धर्मच सांगणारा आहे पण जो वेदांश, वेदभाग धर्मतत्त्वाची चर्चा करतो तेवढ्याचाच समावेश येथे केला आहे. वेदांचा श्रेयाचे स्वरूप सांगणारा भाग येथे केवळ दिशा दाखवण्यापुरता उद्धृत केला आहे, पूर्णपणे नव्हे. प्रणवाचा उपनिषदांना अभिप्रेत अर्थ जेथे आढळतो तेवढाच भाग येथे दिला आहे, हे विद्वानांच्या सहज लक्षात येईल, ते त्यांच्यापासून लपून राहण्यासारखे नाही.

कर्मविद्ययो: समुच्चयविकल्पचिन्तनेन कर्मकाण्डज्ञानकाण्डयोरैतिहासिका संगति: - कर्म आणि ज्ञान यांचे एकत्र आणि विभक्तपणे चिन्तन करून कर्मकाण्ड आणि ज्ञानकाण्ड यांच्यात घडवून आणलेली ऐतिहासिक संगती-समन्वय.

उपनिषदांचे रहस्य, त्यांच्या तत्त्वांचा परिपूर्णतेने बोध होण्यासाठी पूर्वीच्या आचार्यांनी उपनिषदांवर केलेल्या भाष्यांनंतर पुन्हा नव्या काळात नव्या ऐतिहासिक पद्धतीने पुन: भाष्य करणे आवश्यक आहे. ऐतिहासिक पद्धतीच्या जोरावर केलेलं चिंतन हे वैदिक कर्मविद्येला-कर्मकाण्डाला, त्यातील प्रतिपादित अर्थांची, उपनिषदातील ब्रह्मविद्येशी, त्यातील विचारांशी असलेली सुसंगतता आणि विचारांच्या क्रमाक्रमाने होत जाणाऱ्या विकासाला प्रदर्शित करते. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की ही ऐतिहासिक पद्धत मीमांसापद्धतीला निरर्थक ठरवत किंवा मानत नाही. एकाच वेदाचा दोन्ही पद्धतींनी स्वतंत्रपणे अर्थ लावणे शक्य आहे हे दोन्ही पद्धतींच्या अभ्यास करणाऱ्यांनी लक्षात घ्यायला हवं.

वैदिक कर्मकांडात कर्माशी संबंद्ध असलेल्या उपासना 'वेदन-जाणणे- या क्रियापदाच्या उपयोगासह बऱ्याच वेळा- सांगितलेल्या असतात. खरोखर त्याच उपनिषदांचे, ऐतिहासिक कारण असावे असं मानायला खूप वाव आहे.

हे सर्व वेदवेत्त्यांना मान्य आहे की कर्मकांडाचे अंग असलेल्य, कर्मकांडासह समांतर, त्याला प्रमुखता असणाऱ्या, कर्माला पर्याय असलेल्या उपासना उपनिषदांमध्येही तशाच आढळतात. विद्येचा एक पर्यायी शब्द उपासना हा आहे हे **'यदेव विद्यया करोति'**(छांदोग्य १।१।१०)– जाणीवपूर्वक जो ते कर्म करतो. इत्यादी वाक्यांमधून आचार्यांनी विवेचिले आहे. कर्माचे स्थान घेणाऱ्या, कर्माचा विकल्प/पर्याय ठरणाऱ्या, कर्माचा भाग असलेल्या उपासना, मनातील जाणिवेच्या स्वरूपाच्या असतात हे तैत्तिरीय संहिता आणि ब्राह्मणग्रंथामध्ये दिसून येते. कर्माला पर्याय म्हणून येणाऱ्या वचनांचं उदाहरण पहा– **सर्वं पाप्मानं तरति, तरति ब्रह्महत्यां योऽश्वमेधेन यजते य उ चैनमेवं वेद'** (तैत्तिरीय संहिता ५।३।१२।१,२) – जो हे जाणून अश्वमेध यज्ञ करतो तो सर्व पापांपासून मुक्त होतो. ब्रह्महत्येचे पाप तरून जातो– त्यातून मुक्त होतो. सर्व कर्माला उद्देशून कर्माचा भाग म्हणून आचरणाचे उदाहरण हे आहे– **'एष वै देवयान: पन्था यद्दर्शपूर्णमासौ, य एवं विद्वान् दर्शपूर्णमासौ यजते, यो देवयान: पन्थास्तं समारोहति'** (तैत्तिरीयसंहिता २।५।६।२) – दर्श आणि पूर्णमास यज्ञ म्हणजेच देवयान पंथ. जो विद्वान दर्शपूर्णमास यज्ञ करतो तो देवयान पंथावर आरूढ होतो. **'इन्द्रस्य वा एषा यज्ञिया तनूर्यद्यज्ञ: तामेव तद्यजन्ति, य एवं वेदोपैनं यज्ञो नमति।** (तैत्तिरीय संहिता ३।३।७।३,४) यज्ञ हीच इंद्राची यज्ञीय तनु आहे. हे जाणून जे यज्ञ करतात त्यांना यज्ञ नमस्कार करतो. कर्माच्या एका भागाला उद्देशून कर्माचे अंग म्हणून आचरणाचे हे उदाहरण आहे– **यो वै गायत्रीं ज्योति:पक्षां वेद, ज्योतिषाभासा सुवर्गं लोकमेति।** (तैत्तिरीयसंहिता ७।२।९।२) जो गायत्रीला प्रकाशमान मानतो तो ज्योतीच्या तेजाने स्वर्गलोकाला जातो. कर्माच्या जागी अनुकल्पाची योजनाही करता येते– **'तस्माद्यस्यैवं विदुष:। उतैकाहमुत द्व्यहं न जुह्वति। हुतमेवास्य भवति। असौ ह्यादित्योऽग्निहोत्रम्'** (तैत्तिरीय ब्राह्मण, २।१।६।५). म्हणून तो असे जाणणारा एकदिवसाचा वा दोन दिवसाचा यज्ञ करीत नाही. (तरी) त्याने यज्ञ केल्याप्रमाणे होते. हा आदित्य हेच अग्निहोत्र आहे.

उपासना कर्माला बल देणारी, कर्मातील दोषाचा नाश करणारी, जप अंग असणारी अशी **'एतौ (सोमबृहस्पती) ह वा अस्य सर्वस्य प्रसवस्येशाते यदिदं किं च।' ... कृतमस्य कृतं भवति, नास्याकृतं कृतं भवति, य एवं वेद' इति।** (ऐतरेय ब्राह्मण १०।६) हे सोम आणि बृहस्पतीचे या निर्माण झालेल्या सर्व सृष्टीचे अधिपति आहेत. त्याने केलेलं हे केलेलं होतंच पण त्याने न केलेलंही

केलेलं होतं जो हे जाणतो.

(उपासना) कर्माला मदत करणारी, कर्माशिवायच केलेली असते. **'स एवं विद्वान् छन्दोमयो, देवतामयो ब्रह्ममयोऽमृतमयः संभूय देवता अप्येति। य एवं वेद, यो वै तद्वेद, यथा छन्दोमयो, देवतामयो ब्रह्ममयोऽमृतमयः संभूय देवता अप्येति तत्सुविदितमित्यध्यात्मम्। अथाधिदैवतम्' इत्यादि।** (ऐतरेय ब्राह्मण १०.८)

अर्थ - तो विद्वान छंदोमय, देवतामय, ब्रह्ममय, अमृतमय होऊन देवता होतो, जो हे असे जाणतो तोही तसाच छंद-देवता-ब्रह्म-अमृतमय, देवता होतो हे सुप्रसिद्ध आहे हेच अध्यात्म.

कर्माचा पर्याय म्हणून सांगितलेले कर्म न करताही किंवा कर्माचा अंश असलेल्या ज्ञानात्मक उपासनेच्या रूपाने प्रथम उपनिषदांचे मूळ मानावे असे ज्ञान उत्पन्न होते. अग्निचयन, महदुक्थ, महाव्रत, अश्वमेध इत्यादी यज्ञांचे विधान करणाऱ्या श्रुतींमधूनही उपनिषदोक्त ज्ञानाचे मूळ समजून येते.

कर्माचा अंश असलेली, कर्माचा पर्याय अशी, कर्माच्या अंशाला विषयभूत अशा अनेक विद्यांचा संदर्भ उपनिषदांमध्ये येतो. वैश्वानरविद्येबद्दल छांदोग्यात म्हटलंय- **य एतदेवं विद्वान् अग्निहोत्रं जुह्वोति।** (छांदोग्य उप. ५।२४।२) असे जाणणारा जो विद्वान् अग्निहोत्राचे यजन करतो. येथे प्राणरूपी अग्निहोत्राची विद्या सांगितली आहे. कर्मांची अंशभूत अशीही अनेक ज्ञानवाचक विधाने आढळतात- **ओमित्येतदक्षरमुद्गीथमुपासीत** (छांदोग्य उप.१।१।१) ओम् या अक्षराची (ब्रह्माची) उद्गीथरूपाने उपासना करावी. **'तेनोभौ कुरुते। यश्चैतदेवं वेद यश्च न वेद'**(छांदोग्य उप.१।१।१०) ही वचने नित्यकर्मांपुरती मर्यादित नाहीत. ज्ञानी आणि तसं न जाणणारे दोघांनाही कर्म करण्याचा अधिकार- अनुज्ञा-दिल्याचे दिसते. अशाप्रकारे ज्ञानपूर्वक व ज्ञानाशिवाय केलेल्या कर्माश्रित उपासनेचं फळ वेगळं सांगितलं आहे. ते असं **'नाना तु विद्या चाविद्या च। यदेव विद्यया करोति श्रद्धयोपनिषदा तदेव वीर्यवत्तरं भवति।'** ज्ञान आणि अज्ञान या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. जे कार्य-उपासना- श्रद्धासहित ज्ञानपूर्वक केली जाते त्याचे फळ अधिक तेजस्वी असतं, पुरुषविद्या, दहरविद्या, पञ्चाग्निविद्या, उपकोसलविद्या, अश्वमेधविद्या या स्वरूपात उपनिषदांमध्ये कर्माच्या तुलनेने विद्येचे, ज्ञानाचं महत्त्व अधिक असल्याचे, ते कर्माचं अंग नसल्याचं वर्णन येतं.

दर्श-पूर्णमास, सोमयाग इत्यादि कर्मांनी जो गोष्ट लक्षात येत नाही ती गोष्ट अग्निचयन, महाव्रत इत्यादि कर्मांचा चांगला अभ्यास केल्यावर-विचार केल्यावर

लक्षात येते ती म्हणजे कर्मकाण्ड हे अध्यात्मविद्येचे (प्रवेश)द्वार आहे.

वाजसनेयींचे अग्निरहस्य (शतपथ ब्राह्मण दशमकाण्ड), तैत्तिरीयांचे सावित्र्याग्निचयन (तैत्तिरीयब्राह्मण ३.१०) या दोन्ही गोष्टीचे पर्यवसान उपनिषदार्थातच–ज्ञानातच–होते. अग्निरहस्यात सांगितलेलं अग्निचयनं हे कर्मसंबद्ध नाही हे ब्रह्मसूत्रांनीही सांगितले आहे– ''**विद्यैव तु निर्धारणात्**'' (ब्रह्मसूत्रम्–३।३।४७) विद्येमुळेच निर्धारण होते.

बाह्य साधनसामग्रीशी संबंध नसलेले, क्रियेचा प्रवेशाची शंका बाजूस मागे सारणारे अग्निचयनशास्त्र जागोजागी आढळते. कर्मप्रकरण (संबंध) तोडून टाकून मन, चित् आदींचे स्वातंत्र्य अग्निरहस्याचे प्रतिपादन करते. अग्निचयन क्रियेच्या अंशांना मन–आदींच्या व्यापारांमध्ये– क्रियांमध्ये गुंफते पहा– **ते मनसैवाधीयन्त, मनसाऽचीयन्त मनसैषु ग्रहा अगृह्यन्त मनसाऽस्तुवत मनसाऽशंसन्। यत्किं च यज्ञे कर्म क्रियते यत्किंच यज्ञियं कर्म, मनसैव तेषु तन्मनोमयेषु मनश्चित्सु मनोमयमक्रियत**' (शतपथब्राह्मण १०।५।३।३) मनाने अध्ययन करतात, मनानेच चयन करतात, ग्रह–मनानेच घेतात, मनानेच स्तुती व शंसन केले. जे काही यज्ञकर्म, यज्ञसंबंधी कर्म ते मनोमयामध्ये; मनाच्या जाणिवेमध्ये मनोमयच केले जाते. '**यो हैतमेवमग्निमर्कं पुरुषमुपास्ते अयमहमग्निरर्कोऽस्मीति, विद्यया हैवास्यैष आत्मन्नग्निरर्कश्चितो भवति**' इति। (शतपथ ब्राह्मण १०।५।४।१६)

अर्थ – जो ह्या अग्नीची, सूर्याची त्या पुरुषाची उपासना करतो तेव्हा मीच तो अग्नि मीच तो अर्क मीच अशा ज्ञानाने त्याकडून, आत्मा, अग्नि आणि अर्क यांचेच चयन होते. हे अग्निचयन केवल ज्ञानात्मक, आध्यात्मिक, कर्माशी असंबद्ध असल्याचे वर्णन करून कर्माची निंदा करून, ज्ञानाची स्तुती करून फलाचे प्रतिपादन करून श्रुती उपसंहार करते – '**विद्यया तदारोहन्ति यत्र कामाः परागताः। न तत्र दक्षिणा यन्ति नाविद्वांसस्तपस्विनः, इति। न हैव तं लोकं दक्षिणाभिर्न, तपसाऽनेवंविदश्नुते, एवंविदां हैव स लोकः।**' (शतपथ ब्राह्मण १०।५।४।१६) ज्ञानाने जेथे आरोहण केले असता सर्व इच्छा नष्ट होतात. तेथे दक्षिणा जात नाहीत, जेथे मूढ तपस्वी जात नाहीत. तो लोक दक्षिणांनी, तपाने किंवा तसे न जाणता प्राप्त होत नाही. ज्ञात्यांनाच तो लोक प्राप्त होतो. ही कामशून्य अशी मोक्षसंपत्ती सर्वांच्या अंतर्यामी असलेल्या परमपुरुषाच्या चितीच्या अग्निरूपाने उपासनेचे फळ सांगणारी कर्मकाण्डातील श्रुती कर्मकाण्डसह उपनिषदांचा ऐतिहासिक संबंध पूर्णपणे नाकारते.

शिवाय छन्दोदेवतामय विराट शरीराला अग्निचयनाने आराध्य अशा पुरुषाचे

निरूपण करून उपसंहार करतात– **'सैषा आत्मविद्या'** (शतपथ ब्राह्मण १०।५।४।१६)– हीच ती आत्मविद्या. तेथेच पुढे आहवनीयाच्या शेवटच्या मंत्रांमधील वौषट्–शब्दाचा अंश असलेल्या 'वौग्' या एकाक्षराने सर्व अग्नींचे ऐश्वर्य सांगून **'अग्निरेव महत् एकाक्षरं ब्रह्म'** (शतपथ ब्राह्मण १०।४।१।९) अग्नि हेच एकाक्षरी ब्रह्म आहे, असा निर्वाळा देऊन श्रुती कर्मनिष्ठ यजमानाला ब्रह्मविद्येकडे प्रवृत्त करीत आहे. याच सिद्धान्ताला तैत्तिरीय ब्राह्मणातील सावित्राग्नि–चिति–विद्या बळकटी देते. यज्ञीय सावित्राग्नि तिथे सर्वांचा आत्मा या रूपाने वर्णिला आहे. पहा– **कश्चिद्ध वा अस्माल्लोकात्प्रेत्य आत्मानं वेद अयमहमस्मि इति। कश्चित् स्वं लोकं न प्रतिजानाति। अग्निमुग्धो हैव धूमतान्तः स्वं लोकं न प्रतिजानाति। अथ यो हैवैतमग्निं सावित्रं वेद, स एवास्मालोकात्प्रेत्य आत्मानं वेद, अयमहमस्मीति, स स्वं लोकं प्रतिजानाति'** (नैत्तिर्सय ब्राह्मण ३।१०।११ (१.२))इति।– एखादाच कुणीतरी या जगातून परलोकात गेल्यावर 'मी हा आहे' असे जाणतो. कोणीतरी आपल्या लोकाला जाणत नाही. अग्नीमुळे मोहित झालेला अंतरंगात धूर कोंडलेला तो स्वतःच्या लोकाला जाणत नाही. पण जो अग्नीला सवित्याचे सूर्याचे प्रतिरूप मानतो, तो या लोकातून निघून गेल्यावर आत्म्याला जाणतो–'मी हा आत्मा आहे' असे जाणतो, तो स्वतःच्या लोकाला जाणतो. यातून श्रुती सावित्री अग्निविद्याचे आत्मविद्येत पर्यवसान–परिणाम दाखवते. ती धूमाने निर्दिष्ट होणाऱ्या कर्मठ विद्यारहित, मूढतेला प्राप्त झालेल्या पुरुषाची निन्दा करते. जो पुरुष सावित्र अग्नीलाच 'मी तो आहे' असे जाणतो तोच, स्वतःच्या लोकाला म्हणजे फक्त विवेकी लोकच जो पाहू शकतात, त्या निजस्वरूपाला जाणतो. हेच या श्रुतीचे रहस्य आहे. ही श्रुती कर्ममार्ग आणि ब्रह्मविद्या यांचा सरळ थेट संबंध स्पष्टपणे प्रकट करते.

अग्निचयनाच्या आधाराने उपनिषदातील अध्यात्मविद्याच साक्षात् वा परंपरेने अनेक उपनिषदांमध्ये विस्तार पावली असं तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक, काठक संहिता, मैत्रायणी संहितांच्या चिकित्सक अभ्यासाने आमचं मत झालं आहे. तैत्तिरीय उपनिषदात असं वर्णन येतं– **स वा एष पुरुषोऽन्नरसमयः तस्येदमेव शिरः अयं दक्षिणः पक्षः अयमुत्तरः पक्षः अयमात्मा, इदं पुच्छं प्रतिष्ठा'** इत्येवमादि।– हा पुरुष अन्नरसमय आहे. त्याचे हे शिर, हा उजवा पंख हा डावा पंख हा आत्मा, हे त्याचे शेपूट, तीच त्याची प्रतिष्ठा इ. येथील पंख, शेपूट इत्यादि अंगांची–अवयवांची कल्पना माणसांच्या शरीरांशी यथार्थपणे

स्वीकारता येत नाही. मनुष्य शरीरात ना शेपूट ना पंख, शेपूट-पंखयुक्तता फक्त पक्ष्यांनाच लागू पडते म्हणून अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय आत्म्याचे ठिकाणी दोन पक्ष पुच्छ इत्यादि पक्षाची कल्पना ही अग्निचयनात विधान केलेल्या पक्षिपुरुषापासून स्पष्ट किंवा अस्पष्टरूपात प्रजापतीच्या विश्वमयातूनच स्वीकारली आहे, असे निश्चयपूर्वक म्हणता येईल. विराट्‌रूप अग्निपुरुष पक्षिरूप पुरुष- पुच्छ आणि पंखयुक्त असा- अग्निचयनात प्रसिद्ध आहे. त्याच विश्वव्यापकाच्या उपासनेसाठी त्याचेच रूप (रूपक) इथे घेतले आहे, अशी कल्पना केल्यास ते सुसंगत ठरते अन्यथा नाही. शिवाय तैत्तिरीय आरण्यकात आरुणकेतूच्या अग्निचयन प्रकरणानंतर तैत्तिरीय उपनिषद आले आहे. हे सांनिध्यही चयनात ध्यातव्य-ध्यानयोग्य विश्वात्मक, पक्षिपुरुषाचे परमात्म्याचे स्मरण करून देते. त्याचीच पञ्चविध आत्म्याची उपासना या उपनिषदात प्रतिपादिली आहे.

ऐतरेय आरण्यकाचे दुसरे व तिसरे आरण्यक म्हणजे मही-ऐतरेय उपनिषद होय. **'एष पन्था, एतत् कर्म'** (ऐतरेय आरण्यक २।१।१) अशी त्याची सुरुवात आहे. या उपनिषदात अग्निचयनातील पक्षिपुरुष, त्याला प्राण म्हटलंय, प्रजापती म्हटल्या गेलेल्या हिरण्मय पुरुषाशी संबद्ध आहे. हे उपनिषद प्रत्यक्षपणे चयनसह आचरावयाच्या महाव्रताशी संबद्ध आहे. **'नादीक्षितो महाव्रतं शंसेन्नानग्नौ।** (ऐतरेय आरण्यक ५।३।३) इति तत्रोक्तत्वात्। - दीक्षा न घेतलेल्या, अग्नि न ठेवलेल्याने महाव्रत करू नये' असे तिथेच सांगितले आहे. पक्षीपुरुषरूपाने महाव्रताची कल्पना करावी असे ताण्डय ब्राह्मणावरून निश्चित करता येते. (ताण्ड्यब्राह्मण ५.१,२) या उपनिषदात सांगितलेल्या विशेष उपासना महाव्रतात विहित उक्थाला धरून प्रवृत्त होतात, त्याला आधार करूनच आध्यात्मिक आणि आधिदैविक विषयांचे प्रतिपादन केले आहे. ऐतरेय-आरण्यकाच्या पहिल्या आरण्यकात विराट्‌रूप पक्षिपुरुषस्वरूपाचे-पुच्छ, दोन पक्ष या अंगांनी युक्त असलेल्याचे ध्यान करायला सांगितले आहे.

त्याचे सुपर्णत्व- त्याच्या पंखांचे चांगलेपणही पुढे स्वत: श्रुती सांगते- **'द्विपदयोरयं पुरुषः प्रतिष्ठितस्तस्य यत् सुपर्णरूपं तदस्य कामानामभ्याप्त्या अथ यत् पुरुषरूपं तदस्य श्रियै'** इति। (ऐतरेय आरण्यक१।४।२)- दोन पदांनी हा पुरुष प्रतिष्ठित आहे. जे त्याचे पक्षिरूप आहे ते कामांची पूर्ती करणारे आहे आणि पुरुषरूप ऐश्वर्यासाठी आहे. उक्थामध्ये पुरुषदृष्टि करून हिरण्मय असा गुण सांगितला. **'स इरामयो यद्धीरामयस्तस्माद् हिरण्मयः'** इति। (ऐतरेय आरण्यक

२।१।३) तो (इरा - पाणी, अन्न यांनी युक्त) इरामय म्हणजेच हिरण्मय: तो असा (अध्यात्माशी) कर्मसंबंध श्रीमच्छंकराचार्यही मान्य करतात. या उपनिषदाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे- **'यदि ब्रह्मविद्याप्रतिपत्त्यर्थोऽयमारम्भः किं महाव्रतविषयविज्ञानप्रस्तवनेन।' 'तत्रेदं प्रयोजनं मन्यते श्रुतिः, महाव्रताख्यं कर्म सर्वकर्मसंदोहलक्षणं सर्वात्मनो हिरण्यगर्भस्य प्राप्तिकारणम्। फलं चास्य विज्ञानसंयुक्तस्य देवताप्ययलक्षणम्'** इति (ऐतरेय-आरण्यक २।१।१ शांकरभाष्य) - जर हे उपनिषद् ब्रह्मविद्या प्राप्तीसाठी आरंभिले असेल तर महाव्रतविषयक विज्ञानाची प्रस्तावना कशाला? येथे असे प्रयोजन श्रुतीला मान्य आहे- महाव्रत नावाचे कर्म हे सर्व/अनेक कर्मांच्या समुदायाचे प्रतिनिधी आहे. सर्वांमध्ये असलेल्या हिरण्यगर्भाचे ते प्राप्तिकारण आहे. याचे फळ विज्ञानयुक्त देवताप्राप्तीचे लक्षण हेच आहे. विद्यारण्यही म्हणतात- **'कर्मभिरुत्पन्नायामपि विविदिषायामेकाग्रचित्तस्यैव ब्रह्मदर्शनहेतुत्वात्तदेकाग्र्यसिद्ध्यर्थमस्मिन् काण्डे प्रथममुपासनमभिधीयते। तत्र अङ्गावबद्धमुपासनमुच्यते।** (ऐतरेय आरण्यक, विद्यारण्यभाष्य, २।१।२)- कर्मांमधून उत्पन्न झालेल्या ज्ञानेच्छेलाही चित्ताचे ऐकाग्र्य हेच ब्रह्मज्ञानाचे साधन असल्यामुळे त्या ऐकाग्र्याच्या सिद्धीसाठीच या काण्डात प्रथम उपासना-केवळ त्यासाठी सांगितली आहे. ती अंगाशी-अंशाशी संबंधित उपासना आहे. नंतर आत्मषट्कामध्ये- **'आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत्'** (ऐतरेय आरण्यक-२।४।१।१) - प्रथम फक्त एकटा हा आत्मा तेवढाच होता. अशी सुरुवात करून 'केवलोपनिषद्' रूपाने अभिप्रेत असलेला प्रतिपाद्य पुरुष हा विश्वाचे कारण तोच महाव्रत-यज्ञात उपासना केला गेलेला पुरुषच असल्याने आरण्यकासह ऐतरेयोपनिषदाचा कर्मकांडाबरोबरचा संबंध समुचित ठरतो.

अग्निचयनात उपासल्या जाणाऱ्या सर्वात्मक पुरुषाचे शुद्ध केवळ अशा ब्रह्माच्या साक्षात्काराचे साधनत्व लक्षात घेऊनच कठोपनिषदात चयन (यज्ञ) पाहणाऱ्या नचिकेताच्या गोष्टीवरून आत्मविचार सुरू केला आहे. शिवाय नचिकेताने पाहिलेल्या विशेष यज्ञाचा विधी तैत्तिरीय ब्राह्मणात प्रसिद्ध आहे. तेथे सांगितलेले नचिकेताख्यान उद्धृत करून काठकोपनिषदाचा प्रारंभ केला आहे. तेथे नचिकेताचा आचार्य झालेला मृत्यु-यम हाही चयनाचा विषय झालेला प्रजापति अग्नीच आहे. चित्याग्नीचेच अग्निरहस्यात 'मृत्यू' म्हणून प्रतिपादन केलेले आहे. असे विधान आहे- **'स यदग्निं चिनुते एतमेव तदन्तकं मृत्युं संवत्सरं प्रजापतिमग्निमाप्नोति'** (शतपथ ब्राह्मण १०।४।३।११०)- जो

अग्निचयन करतो तो त्याचा अंत करणाऱ्या मृत्यूला वर्षभर प्रजापती आणि अग्नीला प्राप्त करून घेतो.

मैत्रायणी उपनिषदातही चयनप्रसंगाची सुरुवात करून आत्म्याचे ध्यान उपदिष्ट आहे, ते असे- **ब्रह्मयज्ञो वा एष यत्पूर्वेषां चयनं, तस्माद्यजमानश्चित्वै-तानग्नीनात्मनभिध्यायेत्। स पूर्णः खलु वा अद्धाऽविकलः संपद्यते यज्ञः**' (मैत्रायणी उपनिषद् १।१)- ब्रह्मयज्ञ म्हणजे पूर्वजांचे चयन म्हणून यजमानाने अग्निचयन करून आत्म्याचे ध्यान करावे. तो यज्ञ पूर्ण आणि खरोखर कोणत्याही कमतरतेशिवाय पूर्ण होतो. असं पहिल्या प्रपाठकात आत्मतत्त्वाचं सविस्तर वर्णन करून सहाव्या प्रपाठकात उपसंहार करतात.'**अतोऽनग्निहोत्री अनग्निचिद्-ज्ञानभिध्यायिनां ब्रह्मणः पदव्योमानुस्मरणं विरुद्धम्। तस्मादग्निर्यष्टव्यश्चेतव्यः स्तोतव्योऽभिध्यातव्यः**' इति (मैत्रायणी उपनिषद् ६.३४) जो अग्निहोत्री नाही, जो अग्निचयन करीत नाही, त्या अज्ञानाचे ध्यान (ज्ञानाखेरीजच्या गोष्टीचे ध्यान करतात) त्यांनी ब्रह्माचं स्मरण करणे विरुद्ध/अयोग्य आहे. म्हणून अग्नीचे यजन करावे, अग्नी चेतवावा, त्याची स्तुती करावी, त्याचे ध्यान करावे.

वैश्वानर विद्या (शतपथब्राह्मण १०।६।१), **शाण्डिल्यविद्या** (शतपथ ब्रा.१०।६।३) या आत्मोपासना सांगणाऱ्या आहेत. त्या आत्म्याचे स्वरूपच केवळ प्रतिपादन करणाऱ्या आहेत. प्रथम कर्माचे अंगभूत नसलेल्या अग्निचयन विद्येला धरून प्रवृत्त झालेल्या अग्निरहस्यामध्ये शतपथ ब्राह्मणात वैश्वानरविद्या वर्णिली आहे. त्या दोन्ही विद्या छांदोग्यउपनिषदात पुन्हा सांगितल्या आहेत. (छांदोग्य उपनिषद् ५।११।२४, ३।१४) जी ही वैश्वानरदेवता अग्निचयनप्रकरणात होमाच्या बरोबर येणारी म्हणून वर्णिलेली आहे. (१२)

'अथातो वैश्वानरं जुहोति.... स यः स वैश्वानरः इमे स लोकाः'। (शतपथब्राह्मण ९।३।१।१।३). आता वैश्वनराला आहुती देतो. हा जो वैश्वानर तो म्हणजेच हे लोक. या ठिकाणीही तीच, बाह्य कर्म बाजूला ठेवून, कर्माशी संबद्ध असल्यामुळे, ध्यान करण्यास योग्य अशा विराट स्वरूपाचे रहस्य सांगण्यासाठीच विद्येचा येथे अग्निरहस्यात अनुवाद केला. अग्निचयन या कर्माचा द्रष्टा ऋषि शाण्डिल्य अशी शतपथात प्रसिद्धी आहे. त्याच्याच नावाने आत्मतत्त्व प्रतिपादन करणारी शाण्डिल्यविद्या चयनपुरुषाचे चिंतन करणारीच आहे. जो आत्मा अत्यंत सूक्ष्म, अणु प्रमाणाचा कमीत कमी परिमाणाहून कमी-लहान आणि मोठ्यातल्या मोठ्या परिमाणाहूनही मोठा, अनन्त परिमाणाचा असा छांदोग्यात वर्णन केला आहे. त्याचाच अग्निरहस्यात हिरण्मयपुरुष म्हणून निर्देश

केला आहे. छांदोग्यात आणि अग्निरहस्यातील तात्पर्य समानच आहे.

ईशावास्य उपनिषदातही अग्निरहस्याबरोबर काही अंशानी संगती जुळते. ईशोपनिषदात ज्ञान आणि कर्म याबद्दल पर्याय की समुच्चय याबद्दलची जी चर्चा आहे ती अग्निरहस्यामध्येही आहे. जसे '**अथ व्यावृत्त्य शरीरेणामृतोऽसत्। योऽमृतोऽसद्विद्यया वा कर्मणा वेति। यद्वै तदब्रुवन् विद्यया वा कर्मणा वेति। एषा हैव सा विद्या यदग्निः। एतदु हैव तत्कर्म यदग्निः।**' इति (शतपथ ब्राह्मण १०।४।३।९)- शरीर सोडल्यावर तो अमृत होत नाही तो विद्येने किंवा कर्माने अमृत होतो. ते (ज्ञाते) म्हणाले कर्माने किंवा ज्ञानाने (अमृत होतो.) ज्ञान म्हणजेच अग्नि. हे जे कर्म तोच अग्नि. शिवाय '**यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति। सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते।।**'' (ईश-६) - जो माणूस सर्व प्राणिमात्रांना स्वत:मध्ये पहातो आणि सर्व जीवांमध्ये स्वत:ला पहातो, तेव्हा त्याला कुणाबद्दल घृणा वाटत नाही. प्रजापतीने सर्व भूतांमध्ये स्वत:ला पाहिले आणि ते अग्निरहस्य सांगितले- **स हेक्षांचक्रे। कथं न्वहमिमानि सर्वाणि भूतानि पुनरात्मन्नावपेय, पुनरात्मन्दधीय कथं न्वहमेवैषां सर्वेषां भूतानां पुनरात्मा स्यामिति**' इति (शतपथब्राह्मण १०।४।२।३)- त्याने विचार केला या भूतांमध्ये आता पुन्हा आत्मा कसा ठेवीन, त्याना कसे धारण करीन, त्याचा मी आत्मा कसा होईन? त्याची ही अपेक्षा पूर्ण झाली असे पुढे श्रुती सांगते- '**अथ सर्वाणि भूतानि पर्यैक्षत। स त्रय्यामेव विद्यायां सर्वाणि भूतानि अपश्यत्। अत्र हि सर्वेषां छन्दसामात्मा, सर्वेषां स्तोमानाम्, सर्वेषां प्राणानाम्, सर्वेषां देवानाम्। एतद्वा अस्त्येतद्ध्यमृतम्। यद्ध्यमृतं तद् हि अस्ति।** (शतपथब्राह्मण १०।४।२।२१) त्याने सर्व भूते पाहिली. त्याने वेदत्रयीमध्येच सर्व भूतांना पाहिले. हाच सर्व छंदांचा, स्तोम-स्तोत्रांचा, प्राणांचा, देवांचा आत्मा आहे. हे अमृत आहे. जे आहे ते अमृत (च) आहे. वेदत्रयात्मक सूर्यमंडलात चयन करणाऱ्या यजमानाला सर्वप्राणिमात्रांमधील आत्मभावाची प्राप्ती, ज्ञान आणि कर्म यांच्या समुच्चयाने होते की केवळ उपासनात्मक ज्ञानाने होते याबद्दल उपसंहाररूपाने श्रुती सांगते- '**तस्यैषा प्रतिष्ठा य एष तपति, एतस्माद्वेवाधिचीयते, एतस्मिन्नधिचीयते, आत्मन एवैनं तन्निर्मिमीते, आत्मनः प्रजयनति। स यदैवंविदस्माल्लोकात् प्रैति, अथैतमेवात्मानमभिसंभवति छन्दोमये स्तोममयं प्राणमयं देवतामयम्, स एतन्मय एव भूत्वोद्ध्वं उत्क्रामति य एवं विद्वानेतत्कर्म कुरुते यो वैतदेवं वेद**' इति। (शतपथ ब्राह्मण १०।५।२।६)

अर्थ - त्याची ही प्रतिष्ठा आहे की तो तप करतो. यापासूनच अधिचयन

करतो. याच्यातच अधिचयन करतो. आपल्यापासूनच याला निर्माण करतो. आपल्यापासूनच खरोखर उत्पन्न करतो. जर हे जाणणारा जर या लोकातून गेला तर तो स्वत:ला छंदोमय, स्तोममय, प्राणमय, देवतामय होऊन जन्मतो. तो अशा प्रकारचा होऊन मरण पावल्यावर, असे जाणणारा, हे कर्म करतो, जो हे जाणतो.

सूर्यमण्डलातील पुरुषाबरोबर तादात्म्याचे दर्शन ईशोपनिषदात 'अहं'चा उच्चार करून म्हटलं आहे- **'योऽसावसौ पुरुषः सोऽहमस्मि।'** ईश.१६ (सूर्यमंडलातला) तो पुरुष मीच आहे. वर सांगितल्याप्रमाणे 'जो विद्वान हे जाणून त्याप्रमाणे कर्म करतो' त्यावरून ईशोपनिषदात ज्ञानकर्मसमुच्चयच सांगितला आहे. **विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह। अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययामृतमश्नुते।।** (ईश ११) विद्या आणि अविद्या या दोघांनाही जो जाणतो तो अविद्येने मृत्यूला जिंकून पुढे विद्येने अमृतत्व प्राप्त करून घेतो.

चयन महाव्रत इत्यादींमध्ये उपासिला जाणारा पुरुष विश्वात्मक असतो. सोन्याची पुरुषाकार प्रतिमा करून ती चितीमध्ये ठेवून उपासना करावयाची असते. तैत्तिरीयसंहिता इत्यादींमध्ये चयनविधि सांगणाऱ्या वेदभागात सोन्याची प्रतिमा करून ती ठेवण्याचे विधान केलेले आहे. ते असे आहे - यथा **'हिरण्मयं पुरुषमुपदधाति'** इति। (तैत्तिरीय संहिता ५।२।७।२) **हिरण्मयपुरुषप्रतिमोपधानं च पुष्करपर्णाश्रितरूक्मे कर्तव्यतया कथ्यते। तस्यां प्रतिमायामादित्य-मण्डलस्थश्चिदात्मा एव ध्येयत्वेनार्चनीयत्वेन चोपदिशन्ति चयनामन्नाया:। अत एव मण्डलब्राह्मणे अधियमोपासनाप्रसङ्गे उच्यते।**

'हिरण्मयं पुरुषमुपदधाति' - हिरण्मय पुरुषाला ठेवतो. हिरण्मय प्रतिमेचे उपधान कमलपत्रावर ठेवलेल्या सोन्यावर करावयाचे विधान आढळते. त्या प्रतिमेमध्ये आदित्य मंडलातील चिदात्मा हाच ध्यानयोग्य म्हणून सांगितला आहे. म्हणूनच मण्डल ब्राह्मणात अधियज्ञ-उपासना प्रसंगात असे म्हटले आहे. म्हणूनच मण्डलब्राह्मणात अधियज्ञोपासनेच्या वेळी सांगितले- **'अथाधियज्ञम्। यदेतन्मण्डलं तपत्ययं स रुक्मः, अथ यदेतदर्चिर्दीप्यत इदं तत्पुष्करपर्णम्, अपो ह्येताः, आपः पुष्करपर्णम्, अथ य एष एतस्मिन्मण्डले पुरुषोऽयमेव स योऽयं हिरण्मयः पुरुषः, तदेतदेवैतत्त्रयं संस्कृत्येहोपधत्ते'** (शतपथ- ब्राह्मण १०।५।२।६) इति। आता अधियज्ञ. जे हे तापणारे मंडल आहे ते सोने. त्यात उजळणारी ज्योत ज्याला म्हणजे पुष्करपर्ण, ते जलच आहे. जल म्हणजेच पुष्करपर्ण. पुढे या मण्डलात जो पुरुष आहे तोच हिरण्मय

पुरुष. ह्याच त्या तीन गोष्टींवर संस्कार करून त्या येथे ठेवल्या–मांडल्या आहेत. त्याच मंडलातील पुरुषाचे जीवात्म्याबरोबर ऐक्य सांगून तोच सर्वात्मा असल्याचे सांगितले आहे.

'य एष एतस्मिन् मण्डले पुरुषः, यश्चायं दक्षिणऽक्षन् पुरुषस्तस्य हैतस्य हृदये पादावतिहतौ तौ हैतदाच्छिद्योत्क्रामति, स यदोत्क्रामति अथ हैतत्पुरुषो म्रियते' (शतपथ ब्राह्मण १०।५।२।१३) अर्थ – तो हा जो मंडलातील दक्षिणेकडे पहाणारा पुरुष (तो यम), त्याचे पाय हृदयात ठेवलेले असतात, ते ओढल्यावर तो निघतो. तेव्हा पुरुष मरतो. **'स एष एकः सन् प्रजासु बहुधा व्याविष्ट':** (शतपथ ब्राह्मण १०।५।२।१५) अर्थ – तो हा एकच असून प्रजांमध्ये विविध रूपांनी प्रवेश करतो.

'स एष एवंविद आत्मा भवति.... सोऽमृतो भवति' इति। तथा तत्रैवास्य सर्वरूपत्वेनोपास्यत्वं विदधाति...' (शतपथ ब्राह्मण १०।५।२।२३) अर्थ – तो हे जाणणारा आत्मा होतो. जाणणारा तो अमृत होतो. तेथे त्याचे 'सर्व' रूपत्वाने त्याची उपासना करावी असे सांगितले.

'तं यथायथोपासते तदेव भवति.... तस्मादेतमेवंवित्सर्वैरेवैतैरुपासीत, सर्वे हैतद्भवति' इति। (शतपथ ब्राह्मण १०।५।२।२०)अर्थ – जो जशी त्याची उपासना करतो तसा तो होतो हे जाणून त्याची या सर्वांनीच उपासना करावी म्हणजे तो सर्व होतो. हाच तो हिरण्मय पुरुष परमपुरुष, ब्रह्म, परमात्मा म्हणून आरण्यकात आणि उपनिषदात वर्णिला आहे.

'स य एषोऽन्तर्हृदय आकाश, तस्मिन्नयं पुरुषो मनोमयः, अमृतो हिरण्मयः' (तैत्तिरीय उपनिषद १।६) अर्थ – आत– हृदयात आतील पोकळीत हा मनोमय पुरुष हिरण्मय अमृत असा वसतो.

'अथ य एषोऽन्तरादित्ये हिरण्मयः पुरुषो दृश्यते हिरण्यश्मश्रुर्हिरण्यकेश आप्रणखात्सर्व एव सुवर्णः ... स एष सर्वेभ्यः पाप्मभ्य उदितः' (छांदोग्य उपनिषद १।६।६) अर्थ – हा जो आदित्यामध्ये हिरण्मय पुरुष दिसतो तो त्याची दाढी आणि केस सोन्याचे आहेत– नखापासून सर्व सुवर्णमयच आहे.

'स ईयतेऽमृतो यत्र कामं हिरण्मयः पुरुष एकहंसः' (बृहदारण्यक ४।३।१२) अर्थ – हा हिरण्यमय, अमृत, एकहंस (शुद्धतम) पुरुष तो स्वेच्छेनं कुठेही जातो.

'प्रजापतिर्वावेदमग्र आसीत्। सोऽकामयत बहुः स्यां प्रजायेय भूमानं गच्छेयमिति। ...स हैवं षोडशधात्मानं विकृत्य सार्धं समैत्। ... स एवैष

हिरण्मय; पुरुष उदतिष्ठत् प्रजानां जनिता' इति। (तवलकार ब्राह्मण उपनिषद १।१५।३) अर्थ – आधी फक्त प्रजापतीच होता. त्याने इच्छा केली– मी अनेक व्हावे, प्रजा निर्माण करावी. सोळा प्रकारे स्वत:ला विभागून, स्वत: अर्धा होऊन, तो हिरण्मय पुरुष प्रजांचा पिता निर्माण झाला. तैत्तिरीयब्राह्मण सावित्रचयनात चितीतील अग्नीची उपासना करणाऱ्याला हिरण्मय–हंसरूपता प्राप्तीचे फळ सांगून असा उपसंहार करते.

'हंसो ह वै हिरण्मयो भूत्वा स्वर्गं लोकमेति, आदित्यस्य सायुज्यम्, य एवं वेद' इति। (तैत्तिरीय ब्राह्मण ३।१०।९।११) अर्थ – तो हंस हिरण्मय होऊन स्वर्ग–लोकाला जातो, आदित्याशी सायुज्य पावतो, जे हे जाणतो वैश्वसृज चयनाचा उपसंहारही असाच त्या पुरुषाच्या निर्देशाने आहे.

'विश्वसृज: प्रथमा: सत्रमासत, सहस्रसमं प्रसुतेन यन्त:, ततो ह जज्ञे भुवनस्य गोपा:, हिरण्मय: शकुनिर्ब्रह्म नाम' (तैत्तिरीय ब्राह्मण ३।१२।९।७) अर्थ – विश्वनिर्मिती करणाऱ्या पहिल्यांनी सत्र आरंभले. ते हजारोंच्या संख्येने निर्माण जाले. नंतर भुवनाच्या रक्षकाची निर्मिती झाली– तो हिरण्मय पक्षी ब्रह्म नावाचा होता. हाच मंत्र ताण्ड्यमहाब्राह्मणात (२५.१८.५) याच प्रकरणात अनुवादिला आहे.

❊ शैव आणि भागवतधर्मांचे मूळ 'चयन' प्रक्रियेत आहे.

सर्वच उपनिषदांमध्ये सर्वदेवतामय, विश्वरूप, सर्वसृष्टिकारण, सर्वेश्वर, अशा पुरुषाख्यतत्त्वाचे वर्णन परमात्मा किंवा ब्रह्म या स्वरूपात येतेच. शैव–वैष्णव आदि भारतीय धर्मांचा आधार असा इतिहासपुराणांनी भक्तीचा विषय म्हणून वर्णिलेला शिव, विष्णु आदि रूपांत तो परमपुरुषच आहे. वैदिक यज्ञांमध्ये ऋग्वेदातील सूक्तांनी त्याचीच आराधना होत असे. हे ऐतिहासिक तर्कसंगतीने सांगता येते. वैष्णवांच्या भागवतधर्माचा किंवा शैवांच्या पौराणिक धर्माचा संबंध वैदिकदेवतेशी आणि श्रौत यज्ञाशी जोडणे शक्य आहे. अग्निचयनात पुरुषाराधनेसाठी केलेल्या होमात **'शतरुद्रीयं जुहोति'** (तैत्तिरीय संहिता ५।४।३।१) असे म्हणून रुद्रशिवाची स्तुती केली आहे. जळणाऱ्या अग्नीत हविद्रव्ये टाकून हा यज्ञ केला जात नाही तर चितीचे अंग असलेल्या शेवटच्या इष्टिकेवर द्रव्य ठेवणे या रूपाने केला जातो. पुरुषात्मक प्रजापती हाच चितीमधील अग्नी. त्याचेच या यज्ञात रुद्ररूपाने हा ध्यान करावे असे चयनब्राह्मणातील **'रुद्रो वा एष यदाग्नि:'** (तैत्तिरीय–संहिता ५।४।३।१) रुद्र म्हणजेच अग्नि या वचनावरून लक्षात येते. तेथेच सर्प होमही सांगितला आहे. तेथे वृषभनामक इष्टिका–वीट,

स्थापावी असेही विधान आहे. ही चिह्ने अग्निचयनाचे मूळ, रुद्रशिवाच्या आराधनेमध्ये असल्याचे अनुमान पुष्ट करतात. म्हणूनच मैत्रायणी संहितेमध्ये प्रारंभी आणि शेवटी शैव पुराणात प्रतिपादिलेले, रुद्रपूजा परिभाषेचे मंत्रच म्हटले जातात, त्याने आमच्या मताला बळकटी येते. आवाहन, ध्यान, नमस्कार, दर्शन, आगमन, विसर्जन इत्यादी पूजेमध्ये असलेल्या उपचारांचा उल्लेख मैत्रायणीय संहितेच्या शतरुद्रिय मंत्र समूहाच्या **'नमस्ते रुद्र मन्यवे'** (मैत्रा.२।९।२) हे मन्युरूप रुद्रा तुला नमस्कार- इत्यादि मंत्रांमध्ये येतो.

'देवानां च ऋषीणां चासुराणां च पूर्वजम्। महादेवं सहस्राक्षं शिवमावाहयाम्यहम्।।' (मैत्रा. २।९।१)

अर्थ - देवांच्या, ऋषींच्या आणि असुरांच्या पूर्वजाचे सहस्राक्ष, महादेव शिवाचे आम्ही आवाहन करतो. ही सुरुवात करून नंतर गायत्रीछंदात ११ मंत्र म्हटले आहेत. **'तत्पुरुषाय विद्महे महादेवाय धीमहि। तन्नो रुद्रः प्रचोदयात्।'** त्या महादेव पुरुषाला आम्ही जाणतो, त्याचे ध्यान करतो. तो रुद्र आम्हाला (सत्कर्मासाठी) प्रवृत्त करो. ते रुद्र, गौरी, स्कंद, गणेश, ब्रह्मदेव, विष्णु, भास्कर, चन्द्र, अग्नि, ध्यान आणि वैनतेय या अकरा रुद्रांचे ध्यान करण्यासाठी आहेत. नंतर तैत्तिरीयसंहिता इत्यादींमध्ये आलेल्या शतरुद्रीयासारखे मंत्र म्हणून उपसंहार करतात तो असा- **गच्छ त्वं भगवान् पुनरागमनाय पुनर्दर्शनाय, सहदेव्याय सहवृषाय सहगणाय सहपार्षदाय यथाहुताय नमोनमाय नमःशिवाय नमस्ते अस्तु मा मा हिंसीः।। आवाहितमावाहित, नमस्कृतं नमस्कृत, विसर्जितं विसर्जित, पथं गच्छ पथं गच्छ, दिवं गच्छ दिवं गच्छ, स्वर्गच्छ स्वर्गच्छ, ज्योतिर्गच्छ ज्योतिर्गच्छ, नमस्ते अस्तु, मा मा हिंसीः।।'** (मैत्रा २।९।१०)

अर्थ - (विसर्जन करताना) भगवंता, आपण पुन्हा येण्यासाठी परत जा. पुन्हा दर्शन द्यायला या. देवीसह, वृषासह, गणांसह, पार्षदांसह तुम्ही परत जा. जशी पूजा घडली तशी स्वीकारून पुन्हा पुन्हा नमस्कार. तुला नमस्कार असो- आमची हिंसा करू नको... आम्ही आवाहन केलेल्या, नमस्कार केलेल्या, विसर्जित केलेल्या तू (आल्या मार्गाने) जा-जा. स्वर्गात जा. ज्योतिर्लोकात जा. आमची हिंसा करू नको. या प्रकरणावरून लक्षात येते की शैवधर्माचा पौराणिक स्वरूपात प्रादुर्भाव अथवा प्रक्षेप, तैत्तिरीय संहितेनंतरच्या काळात कृष्णयजुर्वेदाच्या शाखांमध्ये झाला. तो अवैदिक संप्रदायांच्या संसर्गाने अथवा वैदिक संप्रदायात परिवर्तन करणारा होता. श्रौतसूत्रांच्या निर्मितीपूर्वीच तो येऊ लागला होता. तैत्तिरीय आरण्यकाचा अंतिम भाग 'नारायणोपनिषद्' म्हटला

जातो. तो मैत्रायणीसंहितेचे अनुकरण करतो असे मानले जाते, कारण त्यातही **'तत्पुरुषाय विद्महे'** (त्या पुरुषाला आम्ही जाणतो.) या वर निर्दिष्ट केलेल्या ध्यानार्थ अशा गायत्री मंत्रांचा पाठभेदाने तेथेही अनुवाद-अनु-पाठ दिसतो. शिवाव रुद्र-शिवपूजेने पौराणिक प्रमुख अंग लिंगस्थापना या मंत्राने तेही येथे केलेली दिसते-

'एतत्सोमस्य सूर्यस्य सर्वलिङ्गं स्थापयति' (नारायण उपनिषद १६) अर्थ - हे सोमाचे (शिवाचे) सूर्याचे सर्वलिङ्ग तो स्थापन करतो. **ऊर्ध्वलिङ्गहिरण्यलिङ्ग-सुवर्णलिङ्गदिव्यलिङ्गभावलिङ्गशर्वलिङ्गशिवलिङ्गज्वललिङ्गात्मलिङ्ग-परमलिङ्गेत्यभिधानैः शिवस्तत्र नमस्कृतश्च।** ऊर्ध्वलिङ्ग ... परमलिंग इत्यादि नावांनी लिंगांची स्थापना करून शिवाला नमस्कार केला आहे.

'अम्बिकापतये उमापतये पशुपतये नमो नमः' **'पुरुषं कृष्णापिङ्गलं ऊर्ध्वरेतं विरूपाक्षं विश्वरूपाय वै नमो नमः'** (नारायणउपनिषद् २०।२३) अर्थ - अम्बिकेच्या पतीला, उमेच्या पतीला, पशूच्या पतीला पुन:पुन्हा नमस्कार. त्या कृष्णपिंगट, ऊर्ध्वरेत्या, विरूपाक्षाला, विश्वरूपाला नमस्कर असो, अशा प्रकारे स्वरूप वर्णन करून नमस्कार केला आहे.

हे नारायणोपनिषद् बौधायन आणि आपस्तंब गृह्यसूत्रांच्या रचनेपूर्वी तयार झाले असावे असे अनुमान करणे शक्य आहे. कारण या दोन्ही गृह्यसूत्रांत या उपनिषदातील मंत्राप्रमाणे त्याच अनुक्रमाने मंत्र उद्‌धृत केले आहेत.

* वेदर्षि नारायण - पुरुषतत्त्वद्रष्टा हाच भागवदधर्माचा प्रणेता आहे.

आता हेही लक्षात घ्यायला हवे की भागवत-धर्माचा प्रणेता साक्षात नारायण ऋषि आहे. ज्यामुळे भागवत धर्माला नारायण-धर्म असेही म्हणतात. तो नारायण ऋषि पुरुषसूक्त, उत्तरनारायणसूक्त, पुरुषशरीर रचनेचे कारण लक्षात घेऊन पुरुषतत्त्व प्रतिपादन करणाऱ्या अथर्ववेदातील (१०.२) या सूक्ताचा, तसेच पुरुषमेध (शतपथब्राह्मण १३।६।१।१) या भागाचा द्रष्टा आहे, अशी वैदिक क्षेत्रात प्रसिद्ध गोष्ट आहे. सर्वात्मक, विश्वदेवतामय अशा देवाचे नारायणाने 'पुरुष' नावाने संकीर्तन केले. त्यावेळी इतर इन्द्र, वरुण, सविता, विश्वकर्मा, प्रजापती, अग्नि ही पुरुषात्मक ईश्वराचे स्वरूप सांगणारी विशेषनामे त्याने वगळली आणि 'सहस्रशीर्षा पुरुषः - सहस्र-अगणित डोकीवाला पुरुष' अशी सुरवात करून ईश्वराचे स्मरण केले आहे. कर्त्याचे नाव त्या कृतीलाही लावता येत असल्यामुळे पुरुषसूक्ताचे 'नारायणसूक्त' असे नाव शतपथ ब्राह्मणकाळात

रूढ झाले होते हे त्या संदर्भावरूनच कळते. (शतपथ १३।६।२।१२) त्याच नारायणाला सर्वभूतात्म भावाला प्राप्त होण्याच्या इच्छेने 'पुरुषमेध' हा पांचरात्र यज्ञ क्रतू दिसला हे योग्यप्रकारे जुळून येत आहे.

'पुरुषो ह नारायणोऽकामयत, अतितिष्ठेयं सर्वाणि भूतानि, अहमेवेदं सर्वं स्यामिति, स एतं पुरुषमेधं पञ्चरात्रं यज्ञक्रतुमपश्यत्, तमाहरत्, तेनायजत, तेनेष्ट्वाऽत्यतिष्ठत् सर्वाणि भूतानि, इदं सर्वमभवत्, अतितिष्ठति सर्वाणि भूतानि, इदं सर्वं भवति, य एवं विद्वान् पुरुषमेधेन यजते, यो वैतदेवं वेद' (शतपथ ब्राह्मण १३।६।२।१२) इति।

अर्थ - पुरुषरूप नारायणाने इच्छा केली की सर्व भूतांमध्ये वास करावा, मीच हे सर्व व्हावे, त्याने मग हा पंचरात्र पुरुषमेध यज्ञक्रतु पाहिला. (पृथ्वीवर) तो त्याने आणला. त्याप्रकारे यज्ञ केला. त्यामुळे तो सर्व भूतांमध्ये राहिला, हे सर्व तो झाला. सर्वभूतांपेक्षा श्रेष्ठ आहे, तोच सर्व आहे. हे जाणून जो विद्वान पुरुषमेध करतो तो सर्व होतो, सर्वभूतांमध्ये श्रेष्ठ होतो.

येथेच पंचरात्रयज्ञात यज्ञमंडपात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, चांडाल आदि सत्तराहून जास्त लोक नियुक्त केलेले असतात. त्या नियोजित पुरुषांची ब्रह्मा हा ऋत्विक उजव्या बाजूला उभा राहून पुरुषसूक्त-नारायणसूक्त म्हणून स्तुती करतो. त्यांचा बळी देणे, हत्या करणे हे निषिद्ध असल्याने केले जात नाही. फक्त परमेश्वररूपाने स्तुतीच केली जाते. चांडालादींची परमेश्वर रूपाने स्तुति करावी या (विशेष वचनातून) भागवतधर्माचे बीज, पुरुषमेधात आहे हे स्पष्ट होते. शिवाय पंचरात्र हे भागवधर्माचे विशेषण दुसरे नाव- याच प्रकाराने सिद्ध-सार्थ ठरते. आजपर्यंत ऐतिहासिक पद्धतीने अभ्यास करणाऱ्या कुणीही पुरुषमेधाचा आधार देऊन भागवतधर्माच्या पंचरात्र उपपदाची चर्चा केली नव्हती, आता या आधारामुळे ते सुसंगत ठरते. भागवतधर्मात 'सर्वस्व-समर्पणा'ची कल्पना अशाच प्रकारे साधार ठरते. **'अथ यदि ब्राह्मणो यजेत सर्ववेदसं दद्यात्।'** (शतपथ ब्राह्मण १३।६।२।१९) अर्थ - ब्राह्मणाने यज्ञ केला तर सर्व मिळवलेलं दान करावे. सर्ववेदस् म्हणजे सर्व-स्व= स्वत:चे सर्व धन. पुरुषमेधसमाप्तीनंतर लगेच वानप्रस्थाश्रम सांगितला आहे, तो पुरुषमेधाचा अंशच आहे. नंतर घरात वा गावात निवास, अग्नि न ठेवणाऱ्या गृहस्थासाठी, विकल्पाने सांगितला आहे, त्यासाठी उत्तरनारायणसूक्ताने अरणींमध्ये अग्नीसमारोपणा (अग्नीला अरणींमधे पुन्हा सुरक्षित ठेवून) नंतर सांगितले आहे. म्हणूनच कृष्णयजुर्वेदाच्या वैखानसशाखेच्या श्रौतसूत्रांत व गृह्यसूत्रांत 'नारायण' नावाच्या विष्णूची समाराधना,

नारायणबलि किंवा केशव इत्यादि नावांनी संकीर्तन (नामजप) युक्तसंगत वाटतो. म्हणूनच दक्षिणेकडील प्रांतात वैखानसशाखेच्या पूजकांनी वैखानस-आगमानुसार निर्माण केलेल्या मंदिरांमध्ये मूर्तिपूजा-संप्रदायाची उत्पत्ति-स्थापना योग्य ठरते. या क्रमविकासातून विद्वानांनी भागवतधर्माची ऐतिहासिक परंपरा वेदांतच असल्याचे ध्यानात घ्यावे.

*** देवतास्वरूपस्य विचारविकासक्रमः उपनिषदद्विद्यायां परिणतः पञ्चविधश्रेणीभिः। अग्न्यादीनां केषांचित् देवानां परमेश्वरत्वम्।**

* पाच पायऱ्यांमधे देवतास्वरूपाचा विचार त्याचा विकासक्रम उपनिषद् विद्येत परिणत झाला- अग्नी आदि काही देवांचे 'परमेश्वरत्व.'

पहाणे, ज्ञान, संकल्पन, निरोध व कृपा यांची इच्छा, प्रीति, क्रोध, कुशलता, रचनाप्रावीण्य, उन्नयनाची इच्छा, शौर्य इत्यादि मनुष्याच्या अन्तःकरणाचे गुणधर्म आणि शीर, हात, पाय, डोळे, कान इ. मनुष्यशरीराचे अवयव ज्यावेळी स्वतःच्या इष्टदेवतेच्या- सर्वशक्तिमान देवाच्या-ठिकाणी आहेत असे जेव्हा भक्ताला वाटते तेव्हा त्याच्या मनात त्या देवतेचं पुरुषरूप आकार घेतं. देवतेची पुरुषरूपाने संवेदना ऋग्वेदाच्या सूक्तांमध्येच प्रकट झालेली दिसते, ही धर्मविकासातील उच्चतर पायरी असे ऐतिहासिकतत्त्वज्ञ मानतात. ऋग्वेदातील सूक्ते सृष्टीतील निसर्गदेवतांची प्रार्थना करणारी आहेत ती गोष्ट सर्वांनाच मान्य असली तरी या निसर्गदेवतांमध्येच भौतिक शक्तिमत्त्वामध्येच पुरुषाचे- मानवी गुणांचे प्रतिपादन ऋग्वेदाच्या शेकडो ऋचांमध्ये येते हेही खरेच आहे. केवळ निसर्गशक्तींच्या मर्यादांचे उल्लंघन करून दया, शौर्य, सर्वज्ञता इ. गुणांमुळे देवतेला शरण जाणे, त्याची स्तुती करणे या स्वरूपात भक्ती हाच ऋग्वेदाचा प्रतिपाद्य विषय आहे, हे विद्वान वेदाभ्यासकांनी मान्य करायला हवे. हीच भक्ति परमोत्कट झाली तेव्हा देवतांमधील अनेकत्व भक्तांना युक्त वाटले नाही, सहन झाले नाही, त्यांच्यातील अंतरंगातील एकत्व शोधणाऱ्या भक्तीने त्या त्या देवतेचे सर्वेश्वरत्व वर्णन केले. त्या त्या देवतेचे सर्वोत्तम ऐश्वर्य, विश्व निर्मितीचे, धारणादींचे सामर्थ्य वर्णन करणारी सूक्ते वाचून परस्परविरोधाच्या संशयाने गोंधळेल्या पाश्चात्य विद्वानांनी परस्परविरोध दूर करण्याचा अनेक प्रकारे प्रयत्न केला. वेगवेगळ्या देवतांचे सर्वैश्वर्य, सर्वशक्तिमत्त्व, एकाच वेळी कसे असू शकेल याबद्दल त्यांच्या मनात शंका उत्पन्न झाली. ही शंका दूर करण्यासाठी त्यांनी अनेक उपपत्त्या सुचवल्या. विरोधपरिहाराच्या युक्ती सांगणाऱ्या त्यांच्या मनात त्या त्या देवतांच्या सर्वेश्वरात्वाबद्दल त्यांच्यात विवाद नाही. तसेच देवता

कल्पनाच्या विकासक्रमाबद्दल-त्या वास्तवाबद्दल त्यांना शंका नाही. ऋग्वेदापासून उपनिषदांपर्यंतच्या वैदिक वाङ्मयात देवताविचाराच्या उत्क्रांतीच्या या पाच पायऱ्या संभावतात. त्या अशा - १) अनेक देवतांचे अस्तित्व, २) प्रसंगानुसार त्या त्या देवतेचे सर्वेश्वरत्व, ३) विश्वपुरुषरूपाने श्रेष्ठतम देवतारूपाने वर्णन, ४) प्रजापति म्हणजेच सर्व देवता, ५) एकच ते तत्त्व, पुरुष, प्राण, आत्मा, ब्रह्म या नावांनी ओळखले जाणे.

या पाच विभागांचे संक्षेपाने वर्णन करत आहोत. त्या त्या देवतांचा कार्यभिन्नतेनुसार निर्मिति, देवतांचे सापेक्ष अमरत्व, त्यातील अनेक देवतांचे भौतिक, नैसर्गिक शक्तिरूपाने, कार्यरूपाने वर्णन. त्यांची विविध नावे अशी- अग्नि, सोम, सविता, पूषा, मित्र, भग, आदित्य, सूर्य, वायु, पर्जन्य, चन्द्रमा, मरुत्, आप, द्यावापृथिवी, उषा, काही देवता ज्यांचे प्रत्यक्षरूप जाणवत नाही, त्या अशा दोन अश्विन, वरुण, रुद्र, इन्द्र, रुद्र, अर्यमा, बृहस्पति, विष्णु, विश्वकर्मा, हिरण्यगर्भ, प्रजापति इ. या देवता यास्कादींनी पृथिवी, अन्तरिक्ष, द्यौ इत्यादि स्थानांमध्ये विभाग करून दर्शविल्या आहेत. याच तीन स्थानांवरून देवतांचे विभाजन पाश्चात्य पंडितांनी स्वीकारले आहे. त्यानुसार ते देवतांचे वर्णन करतात. वेदाभ्यासक, ब्लूमफिल्ड वेगळ्या तऱ्हेने देवतांचे विभाग दाखवतो - निसर्गशक्ति प्रत्यक्ष दिसणाऱ्या देवता म्हणून अग्नि, आदित्य, सोम, जल, वायु, आकाश, पृथिवी, चन्द्र, उषादि. निसर्गशक्ति अस्पष्टपणे प्रतीत होणाऱ्या, त्या शक्तीचे अनुमान करता येणाऱ्या देवता अशा- इन्द्र, वरुण, विष्णु, रुद्र इत्यादि. अर्यमा, त्वष्टा, विश्वकर्मा, ब्रह्मणस्पति इ. देवतांमध्ये निसर्गशक्ति पूर्णपणे गूढरूपानेच असते, तो तिसरा गट. मॅक्सम्यूलर स्पृश्य-दृश्य किंचित् दृश्य आणि अदृश्य अशा तीन गटात देवतांचे विभाजन करतो. त्या वैदिक देवतांच्या विचारविकासपरंपरेत अनंतशक्ति अशा परमश्रेष्ठ देवतेचे अस्तित्व क्रमशः तरतमतेने दाखवतात असे मानतो. येथे हे लक्षात ठेवण्यासारखे आहे- येथे कोणत्याही प्रकारे केलेल्या देवतेच्या वर्णनात तिचे पुरुषधर्म-युक्तत्व, अत्यन्त कल्याणकारकत्व प्रकट करायला श्रुती कधीही विसरत नाहीत, चूक करीत नाहीत.

अग्नि इत्यादी काही देवतांचे परमेश्वरत्व- ऋग्वेदाच्या काही ऋचा वा सूक्ते त्या त्या देवतांचे स्वरूपविशेषाच्या मर्यादेतील विशेष कार्य सोडून सर्व शक्तिमत्त्व वर्णन करतात. परमेश्वरत्वाने वर्णिल्या गेलेल्या देवतांमध्ये अग्नीचे वर्णन आध्यात्मिक-तत्त्वज्ञानातील सिद्धान्तांचे मूळ वा पूर्वरूप समजता येईल. आत्म्याचे

अमृतत्व, प्रकाशरूपत्व, अनेकरूपता, अनेक जन्म घेणे, अदृश्य, सूक्ष्मरूपाने स्थूलांमध्ये रहाणे इत्यादी धर्म आहेत. ईश्वराचे सर्वशक्तिमत्त्व, तीनही लोकात राहणे, सर्वव्यापकत्व, सृष्टीचे मूलकारण असणे, सर्वज्ञता, सर्व देवांकडून वंदनीयत्व, सर्वदेवतामयत्व, भक्तांवर अनुग्रह करण्याची वृत्ति, पापनाशकता, स्वर्गप्राप्ती इ. गुण ऋग्वेदात वर्णन केलेल्या अग्नीच्या वर्णनात प्रतिबिंबित होतात. जीव आणि ईश्वर यांचे बहुत जन्म घेणे ही गोष्ट आस्तिक दर्शनांना मान्य आहे ते ऋग्वेदाच्या अग्निविषयक बहुतेक मंत्रांमध्ये प्रतिपादित केलेले आहे. एकाच ईश्वराचे विविध रूपांनी, अवतारांनी व्यक्त होणे, ही गोष्ट पुराणे, इतिहास, भगवद्गीता यात प्रतिपादिलेले आहे. त्याचे मूळ ऋग्वेदातील अग्निचरित्रात किंवा इन्द्रवर्णनात सापडू शकेल. याचे अनुमान, तर्कसंगती विद्वानांनी समजून घ्यावी.

ऋग्वेदाच्या काही मंत्रांमध्ये अग्नीला वैश्वानर म्हणून तो सर्व मृतांमध्ये राहणारा अमर, ज्योतिर्मय, असे वर्णन आहे. **‘अयं होता प्रथमः पश्यतेममिदं ज्योतिरमृतं मर्त्येषु’** (ऋग्वेद ६।९।४) इति। हा पहिला होता, याला पहा हाच प्रकाशमय, मर्त्यांमधला अमर असा अग्नि आहे. आत्म्याशी, हृदयस्थानीयाशी त्याची तुलना करून म्हणतात– **‘ध्रुवं ज्योतिर्निहितं दृशये कं मनो जविष्ठं पतयत्स्वन्तः। विश्वे समनसः सकेता एकं क्रतुमभि वि यन्ति साधु।।’** (ऋग्वेद ६।९।५) दर्शनासाठी ही स्थिर ज्योती आहे– तिच्यात मन आनंदाने उडी घेते. सर्व देव एकमताने, स्वेच्छेने या यज्ञात हजर होतात. **‘इदं ज्योतिर्हृदय आहितं यत्’** (ऋग्वेद ६।९।६) अर्थ – ही ज्योती हृदयात ठेवली आहे.

हा प्रकाश हृदयात ठेवला आहे. येथे सर्व देवांकडून हृदयस्थ ज्योतीरूप वैश्वानराची उपासना करायला सांगितली आहे.

‘विश्वे देवा अनमस्यन् भियानास्त्वाम्’ (ऋग्वेद ६।९।७) सर्व देश भिऊन तुला नमस्कार करतात.

‘त्रीणि शता त्री सहस्राण्यग्निं त्रिंशच्च देवा नव चासपर्यन्’ – (ऋग्वेद ३।९।९) तीन सहस्र तीनशे आणि ३९ देवांनी पूजा केली.

‘त्वे अग्ने विश्वे अमृतासो अद्रुह आसा देवा हविरन्त्याहुतम्। त्वया मर्तासः स्वदन्त आसुतिं त्वं गर्भो वीरुधां जज्ञिषे शुचिः।।’ (ऋग्वेद२।१।१४) – हे अग्ने, सर्व अद्रोही देव तुझ्यात हवन केलेला हवि भक्षण करतात. मर्त्य लोक तुझ्यामुळेच अन्नाचा आस्वाद घेतात. शुद्ध असणारा तूच लतादिकांच्या पोटात राहून सर्व उत्पन्न करतोस.

आत्म्याप्रमाणे अग्नि सर्वांच्या अंतरंगात असतो असे पुढील ऋग्वेदातील

मंत्र सांगतो. **'गर्भो यो अपां गर्भा वनानां गर्भश्च स्थातां गर्भश्चरताम्'** (ऋग्वेद १।७०।३) (हे अग्ने) तू जलांचा गर्भ, तू वनांचा गर्भ आहेस, तूच स्थिर आणि चर यांचा ही गर्भ आहेस. (सर्वांच्या पोटात राहतोस.) त्याचे अनेक जन्म धारण करणे ऋग्वेदाच्या पुढील ऋचेत पहावे. **'त्रीणि जाना परि भूषन्त्यस्य समुद्र एकं दिव्येकमप्सु'** (ऋग्वेद १।९५।३) याचे तीन जन्म-एक समुद्रात, एक अंतरिक्षात आणि एक मेघात आहेत. **'त्रिरस्य ता परमा सन्ति सत्या स्पार्हा देवस्य जनिमान्यग्नेः। अनन्ते अन्तः परिवीत आगात् शुचिः शुक्रो अर्यो रोरुचानः।।'** (ऋग्वेद ४।१।७) श्रेष्ठ व नित्य शुद्ध, तेजस्वी आणि अपार अंतरिक्षात भरलेला अत्यंत प्रकाशमान प्रभु अग्नी आमच्याकडे येवो. या अग्निदेवाचे, तीन स्पृहणीय जन्म आहेत.

अथर्ववेद आणि यजुर्वेदातही याचे अनुकरण करून अनेक रूपांनी अग्नीचे सर्व जगतात प्रवेश, सर्व जीवांना धारण करणे, दाता आणि गृहीता, सर्वभक्षकता या गुणांचे वर्णन आहे. तो सर्वदेवांनी पूर्णपणे आहे असे वर्णन आले आहे.

'त्वमग्न इन्द्रो वृषभः सतामसि' – (ऋग्वेद २।१।३) हे अग्नि तूच इन्द्र, तूच सज्जनांचा वृषभ आहेस. या दहा मंत्रामध्ये अग्नीचे सर्वशक्तिमत्त्व सांगत आहेत. अग्नीच्या सर्वज्ञत्वाचे पुन्हापुन्हा वर्णन करून ऋग्वेद सर्व देवांपेक्षा अग्नीचे श्रेष्ठत्व प्रतिपादन करतो आहे.

'आ दैव्यानि व्रता चिकित्वाना मानुषस्य जनस्य जन्म' (ऋग्वेद १।७०।२) दैवी व्रते पहाणारा मानवी जनाचा जन्मच तू! **'देवानां जन्म मताश्च विद्वान्'** (ऋग्वेद १।७०।६) देवांचा जन्मदाता तूच आहेस. **'अग्निष्टा विश्वा भुवनानि वेद महाद्देवानामसुरत्वमेकम्'** (ऋग्वेद ३।५५।१०) अग्नीमध्येच सर्व भुवने सामावलेली आहेत. अग्नीत राहून तो सर्व भुवनांना जाणतो. ते त्याचे एक महान अद्‌भुत कृत्य आहे.

'स राजा विश्वा वेद जनिमा जातवेदाः देवानामुत यो मर्त्यानां यजिष्ठः' (ऋग्वेद ६।१५।१३) तो अग्निराज, सर्व जाणतो. देवांकडून आणि माणसांकडून त्याचे यजन केले जाते. या ऋचा अग्नि देव, मनुष्य आणि सर्व भूतमात्रांचे जन्म जाणतो असे सांगतात. उपासक आणि ईश्वर एकच असे अद्वैत ऋग्वेदात क्वचित प्रकट होते. **'यदग्ने मर्त्यस्त्वं स्यामहं मित्रमहो अमर्त्यः'** (ऋग्वेद ८।१९।२५) मर्त्य असा मी दीप्ती हाच मित्र असलेल्या तुझ्यामुळे अमर होईन. अग्नि अमर आहे मी मात्र मरणधर्मा आहे या भीतीने उपासक दीप्तिमित्र अग्नीशी एकरूपतेची प्रार्थना करतो. अग्नीचे पवित्रतमत्व, पापमोचकत्व आणि परमेश्वरत्व ऋग्वेदात

अनेक ठिकाणी वर्णिले आहेत.

'अग्निः शुचिव्रततमः शुचिर्विप्रः शुचिः कविः' (ऋग्वेद ८।४४।२१)

अर्थ – अग्नि शुद्धतम, शुद्ध व्रत धारण करणारा, विप्र आणि विद्वान आहे.

'त्वं देवाँ अभिशस्तेरमुञ्चो वैश्वानर जातवेदो महित्वा' (ऋग्वेद ७।१३।२)

अर्थ – सर्व जाणणारा तू आपल्या महिम्याने देवांना संकटातून सोडवतोस, त्यांना पापाच्या आरोपातून मुक्त करतोस. अग्नी देवानाही पापातून सोडवतो असा अर्थ. सर्व देवांची माता अदिति. ही सर्व पापांच्या बंधनातून मुक्त करणारी म्हणून ऋग्वेदात प्रसिद्ध आहे. **'अनागास्त्वं नो अदितिः कृणोतु'** (ऋग्वेद १।१६२।२२) अर्थ – तुला अदिति पापमुक्त करो. ऋग्वेदात अग्नीचे अदितिरूपत्व 'अदिति' या विशेषणाने ३।४ ठिकाणी सूचित केले आहे. राक्षसांना– दुष्ट शक्तींना मारणे हा अग्नीचा विशेष धर्म, **'रक्षोहणं वाजिनम्'** (पापनाशक, शक्तिमान्) (ऋग्वेद १०.८७.१) हे सूक्त व्यक्त करते. अग्नी हा द्यावापृथ्वींचा पुत्र आहे असा उल्लेख आहे. तसेच द्यावापृथ्वींचा तो निर्माता असे सांगणाऱ्याही अनेक ऋचा आहेत. त्यातून अग्नीचे परमेश्वरत्व सिद्ध होते.

'व्रता ते अग्ने महतो महानि तव क्रत्वा रोदसी आततन्थ' (ऋग्वेद ३।६।५) **'व्यस्तभ्नाद्रोदसी मित्रो अद्भुतोऽन्तर्वावदकृणोज्ज्योतिषा तमः। वि चर्मणीव धिषणे अवर्तयद्वैश्वानरो विश्वमधत्त वृष्ण्यम्।'** (ऋग्वेद ६।८।३) अर्थ – हे अग्ने तुझी अनेक व्रते आहेत. तुझ्या यज्ञानेच द्यावा पृथ्वी विस्तारल्या. चामडे ताणावे त्याप्रमाणे त्या अग्नीने द्यावा पृथ्वीना लांब ताणून पसरवले. त्याने त्यांची व्यवस्था लावली. आपल्या प्रकाशाने अंधार घालवला. त्यानेच सर्व बलांना आणि वर्षणक्षमतांना धारण केले आहे.

'त्वं भासा रोदसी अतातन्थ' (ऋग्वेद ७।५।४) अर्थ – तू आपल्या तेजाने अंतरिक्ष व पृथ्वीचा विस्तार केलास.

शरीरांमध्ये उष्णता या धर्मामुळे आढळणारा, जीवाचा आत्माच असा शरीरधारणा करणारा, सूर्याच्या रूपाने अंतरिक्षात दिसणारा, स्थिरचर जगाची निर्मिती, धारणा, स्थिती, पोषण इत्यादि क्रियांसाठी उपकारक पृथ्वीवरील वृक्ष दगड इत्यादींमध्ये घर्षणाने प्रकट होणारा, मेघजलामध्ये विद्युतरूपाने चमकणारा, सर्व मानवीय क्रियांचा, अन्न शिजवणे इत्यादिमध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे जीवनाधार असलेला तसेच यज्ञीय अग्नी बनून मानवांच्या ऐहिक आणि पारमार्थिक प्रेयस् आणि श्रेयस् साधून देणाऱ्या, धर्माचा आधार, प्रत्यक्ष दिसणारा अग्नी हाच परमेश्वर अशी कल्पना वैदिक विद्वानांना करता आली. तो प्राणिशरीरातून निघून

गेला असता वा कमी झाला असता मृत्यू त्याला ग्रासतो म्हणून अग्नीला विश्वाचे आयुष्य, जीवन असेही वेदांनी मानले. म्हणूनच काठकसंहितेत (७.१४) **वात: प्राणस्तदयमात्मा–** येथे वात, प्राण, आत्मा या तीन शब्दांनी त्याची स्तुती केली. आपल्या सर्व मनोरथांची पूर्ती होण्यासाठी वैश्वानर–ज्योतिरूपाची प्राप्ती व्हावी अशी प्रार्थना यजुर्वेदीय करतात.

'**वैश्वानरज्योतिभूर्यासम्, विभून् कामान् व्यश्नवै**' (काठकसंहिता ३८।५) अर्थ – आम्ही वैश्वानर ज्योतीप्रमाणे–तेजस्वी व्हावे, मोठे–खूप भोग भोगावेत. अग्नीचे परमात्मत्व ही तेथे व्यक्त होते.

'**विश्वकर्मा विश्वदेवो विश्वजिद् विश्वदर्शन:**' (काठकसंहिता ३६।१५) – विश्वकर्मा, सर्वांचा देव, सर्वांना जिंकणारा, सर्वांना दिसणारा असे त्याचे तसेच अन्य अनेक मंत्रामधील उल्लेख यामुळे अग्नी परमात्मा ठरतो. म्हणूनच यजमानाशी प्रजापतीशी, सर्व प्राणिमात्रांशी तसेच सृष्टीशी संवत्सरात्मक कालासह अग्नीचे तादात्म्य सांगण्यासाठी अग्निचयनात त्याचे विराट पुरुषरूपत्व प्रतिपादिले आहे. अशाप्रकारे अग्निचयन ही क्रिया आध्यात्मिक उपनिषद् तत्त्वज्ञानदर्शनरूप उपासनेन कशी परिणत झाली तर तिच्या मुळाशी जीवात्मा–परमात्मारूप विराट पुरुषाची कल्पना 'अग्नि' उपासना बीजातून निर्माण झाली आहे.

ऋग्वेदात इतर देवांपेक्षा सर्वांत जास्त स्तुती इंद्राची केली आहे. तो उच्चतम परमेश्वरगुणांनी संपन्न आहे. गुणांची परिसीमा त्यात दिसते. पुरुषधर्मांनी परिपूर्ण पुरुषोत्तमाचे प्रतिबिंब असा देव इन्द्रच आहे. सर्व देवांहून तो सामर्थ्यसंपन्न, सर्वांवर अधिराज्य गाजवणारा, वरचढ, अनन्यसाधारण असेच इन्द्राचे वर्णन अनेक सूक्तांमध्ये आले आहे.

'**न यस्य देवा देवता न मर्ता आपश्चन शवसो अन्तमापु:**' (ऋग्वेद १।१००।१५) अर्थ – त्या इंद्राच्या सामर्थ्याचा थांग देवदेवता, माणसे, प्राणी यानाही लागू शकत नाही. येथे शव शब्दाने बळ अपेक्षित आहे. म्हणूनच युद्धात जिंकू इच्छिणाऱ्या भक्तांना युद्धात त्याचे साहाय्य हवे असते. म्हणून ते देवांमधील सर्वश्रेष्ठ म्हणून त्याची स्तुती केली जाते.

'**यस्मान्न ऋते विजयन्ते जनासो यं युद्धयमाना अवसे हवन्ते**' (ऋग्वेद २.१२.९) अर्थ – ज्याच्याशिवाय युद्धात जय मिळत नाही म्हणून रक्षणासाठी युद्ध करणारे भक्त त्यासाठी यज्ञ करतात. त्याच्यापुढे सर्व भीतीने कापतात असे वर्णन अनेक ऋचा करतात.

'त्वद्विश्वानि भुवनानि वज्रिन् द्यावा रेजेते पृथिवी च भीषा' (ऋग्वेद ८।९७।१४) अर्थ – हे इन्द्रा तुझ्या भीतीनेच सर्व भुवने, द्युलोक व पृथ्वी शोभून दिसतात, कापतात. इन्द्राची विश्वाचा आधार, सर्व देवांचा नियंत्रक, नाना शरीरांनी संचार या गोष्टींनी स्तुती केली आहे.

'इन्द्रस्य कर्म सुकृता पुरूणि, व्रतानि देवा न मिनन्ति विश्वे। दाधार यः पृथिवीं द्यामुतेमां जजान सर्वमुषसं सुदंसाः।।' (ऋग्वेद ३.३२.८)

अर्थ – पृथ्वी अन्तरिक्ष आणि द्युलोकाला धारण करणाऱ्या, उषा आणि सूर्यदेव याना निर्माण करणाऱ्या, महापराक्रमी इन्द्रदेवाची कर्मे आणि व्रते यांना सर्व देव एकत्र येऊनही थांबवू/रोखू शकत नाहीत.

'रूपं रूपं मघवा बोभवीति मायाः कृण्वानस्तन्वं परि स्वाम्।।' (ऋग्वेद ३।५३।८)

अर्थ – ज्या रूपात इंद्राचे आवाहन केले जाते त्या रूपात आपल्या मायेने तो प्रकट होतो. देवाकडून आणि भक्तांकडून त्याच्या मैत्रीची प्रार्थना केली जाते. भक्तीचा परमोत्कर्ष दाखवण्यासाठी त्याला पिता, माता, मित्र इत्यादि अनेक विशेषणांनी संबोधतात.

'त्वं हि नः पिता वसो त्वं माता शतक्रतो बभूविथ' (ऋग्वेद ८.९८.११)

अर्थ – हे इंद्रा, तूच आमचा पिता, माता, धन सर्व तूच हो.

ऋग्वेदसंहितेत अनेकवेळा ईश शब्दाचा प्रयोग इन्द्राला उद्देशून केलेला दिसतो. त्यामुळे ईश्वरशब्दाचे मूळ इन्द्रशब्दात मानण्यास काही प्रत्यवाय नाही.

'इन्द्रो दिव इन्द्र ईशे पृथिव्या इन्द्रो अपामिन्द्र इत् पर्वतानाम्। इन्द्रो वृधामिन्द्र इन्मेधिराणामिन्द्रः क्षेमे योगे हव्य इन्द्रः।।' (ऋग्वेद १०.८९.१०)

अर्थ – इन्द्र अंतरिक्ष, पृथ्वी, जल, पर्वत, वृद्ध आणि बुद्धिमान यांचा सत्ताधीश आहे. इन्द्रात योग, क्षेम व हविद्रव्य आहे. **'विश्वस्यैक ईशिषे सास्युक्थ्यः'** (ऋग्वेद २.१३.६) साऱ्या विश्वावर तुझीच सत्ता आहे तू प्रशंसेस पात्र आहेस. ऋग्वेदात ईशान शब्दाचा प्रयोग इन्द्राचं विशेषण म्हणून खूपदा येतो पण सर्व देवतांच्या संदर्भात तो फारसा वापरला जात नाही. ओज शब्द बळ, शक्ति यांचा पर्याय शब्द आहे. सत्ता गाजवणे बलाधीन असते, म्हणून बऱ्याच वेळा इन्द्रासाठी ईशान शब्दाचा प्रयोग करताना 'ओजसा ईशानः' (पराक्रमाने सत्ताधीश, ऐश्वर्यवान) असा ओजस् शब्दाचा ईशानसह प्रयोग आढळतो. जसा

'सूर्य कवे चक्रमीशानमोजसा' (ऋग्वेद १.१७५.४)

अर्थ – हे मेधावी इन्द्रा तू आपल्या बळाने सूर्याला चक्र दिलेस.

'ऋषिर्हि पूर्वजा अस्येक ईशान ओजसा। इन्द्र चोष्कूयसे वसु।।' (ऋग्वेद ८.४६.४१) करून स्तोत्याना दिले. ऋषि याचे पूर्वज होते आपल्या बळाने इन्द्राने धन निर्माण केले. **'इन्द्र प्रेहि पुरस्त्वं विश्वस्येशान ओजसा'** (ऋग्वेद ८।१७।९) अर्थ – बळामुळे सर्व ऐश्वर्य असलेल्या इन्द्रा तू पुढे ये. **'या सप्तबुध्नमर्णवं जिह्मवारमपोर्णुत इन्द्र ईशान ओजसा'** (ऋग्वेद ८.४०.५) अर्थ – सात तळ असलेल्या वाकड्या समुद्राला आपल्या बळाने इन्द्राने वर काढले. **'इन्दुरिन्द्राय पवते इति देवासो अब्रुवन् वाचस्पतिर्मखस्यते विश्वस्येशान ओजसा।।'** (ऋग्वेद ९.१०१.५) अर्थ – सोम इंद्रासाठी वाहतो आहे असे स्तोते म्हणतात तेव्हा सामर्थ्याने सर्वश्रेष्ठ असणारा वाचस्पति सोम स्तुतीची इच्छा करतो.

द्युलोक आणि पृथ्वी यांना धारण करणे त्यांना स्थिर करणे हे कार्य स्तंम्भन किंवा स्कम्भन, देवाचे कर्म म्हणून त्यांच्या स्तुतीसाठी अनेक ठिकाणी निर्दिष्ट असते. आकाशातील सूर्य आणि नक्षत्रे तसेच द्युलोक आणि पृथ्वी यांना धारण करणे हे विश्वकर्म्याचे काम. हा ऋग्वेदाचा एक प्रमुख विषय आहे. कोणतीही देवता या कर्मामुळे मोठेपणाला प्राप्त होते, असा ऋग्वेदाचा संकेत दिसतो. हे इन्द्राचे (च) कर्म आहे असे पुन:पुन्हा सांगितले आहे. ईशान शब्दाचा हाही अर्थ होऊ शकतो हे त्या शब्दाच्या संदर्भाने वेदवेत्त्यांनी ध्यानात घ्यावे. ऋग्वेदात प्राधान्याने इन्द्रासाठीच वापरलेला शब्द यजुर्वेदकाळात आणि ब्राह्मणकाळी इन्द्र सोडून रुद्रासाठी प्रामुख्याने वापरला जाऊ लागला असे वाटते. **तासामीशानो भगव:** (तैत्तिरीय संहिता ४।५।१०।५) – त्यांचा सत्ताधीश भगवान् (रुद्र). शांखायन ब्राह्मणात (६.८) रुद्राच्या आठ नावांमध्ये आणि शतपथ ब्राह्मणात (६।१।३।१७) रुद्राच्या ९ नावांमध्ये ईशान नावाचा समावेश आहे. उपनिषदोक्त अध्यात्मविद्येशी इन्द्राचा साक्षात संबंध विचार विकासाच्या ऐतिहासिक पद्धतीप्रमाणे दाखवता येणे शक्य नसले तरी परमपुरुष कल्पना ही परमेश्वरार्थ विकसित करण्यात इन्द्र कल्पनेने खूप मदत झाली असण्याचा तर्क करता येतो म्हणून इन्द्राचा विचार येथे थोडक्यात केला. वस्तुत: उपनिषदोक्त आत्मविद्येशी इन्द्राच्या ऐतिहासिक दृष्टीने दाखवणे शक्य आहे. तो असा– ईशोपनिषदाच्या पहिल्याच मंत्रात 'ईश्' शब्दाने निर्दिष्ट सर्व जगाचा व्यापक आत्मा तोच आहे. ऋग्वेदात वर्णिल्या जाणाऱ्या इन्द्राचे स्मरण करून देते, हे युक्तच आहे. इन्द्रियांचा अधिष्ठाता जीव जागृतावस्तेत चाक्षुष– द्रष्टा पुरुष– असे म्हटला जातो, कारण जागेपणी डोळे हेच प्रमुख ज्ञानेन्द्रिय असते. तो चाक्षुषपुरुष म्हणजेच इन्द्र असं

मंडलब्राह्मणात म्हटलं आहे.

'स एष एवेन्द्रः योऽयं दक्षिणेऽक्षन् पुरुषः' (शतपथ ब्राह्मण १०।५।९)

'स योऽयं मध्ये प्राणः, एष एवेन्द्रः' (शतब्राह्मण ६।१।१।२) अर्थ - तसेच मध्यमप्राण म्हणजे इन्द्र असाही निर्देश करतात. तसेच त्याला अनुसरून कौषीतकी उपनिषदात प्रतर्दनाला अध्यात्मविद्येतला गुरु इन्द्र म्हणतो- **'मामेव विजानीहि, एतदेवाहं मनुष्याय हिततमं मन्ये'** (कौषीतकी उपनिषद ३।१) अर्थ - मलाच जाणा, हेच मी मनुष्यांसाठी अत्यंत हितकर मानतो' अशी सुरुवात करून तो म्हणाला, **'स होवाच प्राणोऽस्मि प्रज्ञात्मा, तं मामायुर-मृतमित्युपास्स्व, आयुः प्राणः प्राणो वा आयुः'** (कौशितकी उपनिषद ३।२) ''मी प्रज्ञात्मा प्राण आहे, त्या माझी आयुष्य म्हणजे अमृत असे मानून उपासना कर आयुष्य म्हणजे प्राण, प्राण म्हणजे आयुष्य! अशाप्रकारे ज्ञेय अशा गोष्टीचा निर्देश करून आत्मा म्हणजेच इन्द्र, प्राण शब्दाचा पर्याय शब्द असे प्रतिपादन केले. हेच लक्षात घेऊनच शरीरात प्रवेश केलेल्या आत्म्याची विशेष प्रकारे इन्द्रपदाची व्युत्पत्ति सांगून ऐतरेय उपनिषद् निर्देश करते. **'तमिदद्रं सन्तमिन्द्र इत्याचक्षते परोक्षेण'** (ऐतरेयआरण्यक २।४।३।१४) त्या 'इदद्राला' - हे हे देणाऱ्याला- इन्द्र असे अप्रत्यक्षपणे म्हणतात. तसेच बृहदारण्यकात मधुब्राह्मणात सर्वच प्राणिशरीरात झोपणाऱ्या पुरुष परमात्म्याला उद्देशून **'रूपंरूपं प्रतिरूपो बभूव तदस्य रूपं प्रतिचक्षणाय। इन्द्रो मायाभिः पुरुरूप ईयते युक्ता ह्यस्य हरयः शता दशा।'** (ऋग्वेद ६।४७।१८) प्रत्येक रूपात तो वेगवेगळ्या रूपाचा झाला. त्याचं रूप पहाण्यासाठी, इन्द्र मायेने अनेक रूपे धारण केली आहे. याला १००० घोडे जोडलेले आहेत. या ऋग्वेदमंत्राचा अनुवाद करून 'हाच दहा घोडे हजार किंवा अनंत हात, हेच ब्रह्म, सर्वांच्या अनुभवाचा विषय असलेला आत्मा हेच ब्रह्म आहे' अशा प्रकारे इन्द्राचे ब्रह्मत्व सांगून उपसंहार केला आहे.

इन्द्राहूनही श्रेष्ठ वरुण?

ऋग्वेदपूर्वकालात इन्द्राहूनही अधिक महान वरुण होता असे इतिहासज्ञ अनुमान काढतात. आता उपलब्ध असलेल्या ऋग्वेदसंहितेत त्या महान वरुणाचा महिमा सांगणारी काही सूक्तेच आढळतात. ऋग्वेदकाळात युद्ध करू इच्छिणाऱ्या, विजयाची इच्छा असलेल्या आर्यांनी वरुणापेक्षा इष्टकार्य सिद्ध करू शकणारा पराक्रमी इन्द्रच महत्त्वाचा वाटला आणि त्यांनी त्याला स्वीकारले. वरुण हा काही युद्धदेवता नाही. विश्वाची व्यवस्था पाहणारी, न्यायाधीशाप्रमाणे लोकांचे पापपुण्य, साधु आचरण आणि दुर्व्यवहार यांच्यावर नजर ठेवणारी, सर्वांच्या

कर्तव्यकर्मरूप व्रतांचे नियमन करणारी, पाप्यांना शंभर (शेकडो) बंधांनी–पाशंनी–जखडून शिक्षा देणारी, शंभर वैद्यांनी वेढलेली (आवती भवती शेकडो वैद्य असलेली), असत्याचा द्वेष करणारी, त्या त्या देवतेला तिच्या तिच्या (आपापल्या) स्वभावानुसार जगाच्या धारणेसाठी कार्याला प्रवृत्त करणारी, स्वच्छनीतीचे पालन करवणारी, विश्वाच्या साम्राज्यावर नेहमींसाठी अभिषेक केलेली अशी ही वरुणदेवता आहे. सम्राट हे विशेषण फक्त वरुणालाच लावलेलं दिसतं. यथायोग्य ठिकाणी वस्तूची रचना/उपलब्धता करून देणे हे वरुणाचे कार्य आहे असं पुढील श्रुती सांगते– **'वनेषु व्यन्तरिक्षं ततान वाजमर्वत्सु पय उस्रियासु। हृत्सु क्रतुं वरुणो अप्स्वग्निं दिवि सूर्यमदधात् सोममद्रौ।'** (ऋग्वेद ५।८५।२) – वरुणाने अरण्यावर आकाश, घोड्यात सामर्थ्य आणि नद्यात पाणी उत्पन्न केले. अन्त:करणात कर्तव्यबुद्धि, पाण्यात अग्नि आणि द्युलोकात सूर्य आणि पर्वतावर सोम निर्माण केला. अशा प्रकारे योग्य जागी त्या त्या उपयुक्त वस्तू वरुणाने ठेवल्या असा या ऋचेचा अभिप्राय आहे. ऋताचे रक्षण करणारा, पालन करणारा, असत्याचा द्वेष करणारा अशा अर्थाची विशेषणे– ऋतावा, ऋतस्य गोपा, अनृतद्विट् इत्यादि विशेषणे ऋग्वेदात वरुणासाठी वापरलेली दिसतात. सर्वच देव ऋताच्या आधीन, त्याप्रमाणे चालणारे असतात, अशी वचने ऋग्वेदात दिसतात. 'ऋत' नावाचे तत्त्व विश्वाला जीवनभूत– जगवणारे आहे, असे वेदवेत्ते मानतात. ऋत म्हणजे वैश्विक नियम. त्यांच्या पालनाने विश्वाचे पालन होते म्हणून वरुणाला 'ऋतरक्षक' म्हणतात. व्रतशब्दानेही ऋचांमध्ये ऋतच अभिप्रेत आहे. म्हणूनच वरुणाचे 'धृतव्रत' हे नाव अन्वर्थक ठरते. सूर्यचन्द्र, नक्षत्र यांची गती, उदय आणि अस्त आदि घटना म्हणजेच ऋत, तीच वरुणाच्या आज्ञेने घडणारी व्रते असे ऋचांमध्ये सांगितलेले आढळते.

'उरुं हि राजा वरुणश्चकार सूर्याय पन्थामन्वेतवा उ। अपदे पादा प्रतिधातवे–ऽकरुतापवक्ता हृदयाविधश्चित्।। अमी य ऋक्षा निहितास उच्चा नक्तं ददृश्रे कुह चिद्दिवेयु:। अदब्धानि वरुणस्य व्रतानि विचाकशच्चन्द्रमा नक्तमेति।।'' (ऋसं.१.२४.८) – सूर्याला गमन करण्यासाठी राजा वरुणाने रुंद रस्ता तयार करून दिला आणि अंतरिक्षात जाण्याकरता मार्ग दिला. हृदय विदारण करणाऱ्या शत्रूपासून संरक्षण केले. आकाशात उंचावर असलेली नक्षत्रे दिवसा कोठे जातात? तेज:पुंज चंद्र रात्री उगवतो. वरुणाचे व्रते, नियम कोणीही मोडत नाही.

माणसांच्या सत्य–असत्य कर्मांना जाणणारा, उत्कृष्ट आणि निकृष्ट, भूत, वर्तमान आणि भविष्यकालीन, सूक्ष्म आणि स्थूल, व्यक्त आणि अव्यक्त अशा

सर्व वस्तूंचा आणि कर्मांचा साक्षाद् द्रष्टा वरुणच आहे, असे प्रसन्न आणि गंभीर वाणीने ऋग्वेदसूक्तांनी सांगितले आहे. अथर्ववेदातील दोन सूक्तेही या अर्थाची पुष्टी करणारी आहेत. (अथर्ववेद ४.१६, ५.११)

यजुर्वेदाच्या आणि ब्राह्मणग्रंथांच्या काळात वरुणाचे साम्राज्य जणु अस्तंगत झालं, विस्मरणाच्या गर्तेत गेलं. इन्द्रादिदेवता केवळ हविर्भाग स्वीकारणाऱ्या, यज्ञातच आठवल्या जाणाऱ्या झाल्या. इन्द्र, विष्णु, वरुण, मित्र, द्यावापृथिवी, सोम, सविता या ऋग्वेदातील प्रमख, आपापल्या सूक्तांमध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वर म्हणून गणल्या गेलेल्या देवता होत्या. यजुर्वेदात आणि ब्राह्मणग्रंथांमधे 'यज्ञ' या प्रमुख देवतेच्या, संस्थेच्या तुलनेनं या देवतांना गौणत्व आलं. पुरुषसूक्तात वर्णिलेला प्रजापतीच्या पदवीला प्राप्त झालेला परमपुरुष यजुर्वेद आणि ब्राह्मणकाळात पराकाष्ठेच्या महत्त्वाच्या धनी झाला. आता ऋग्वेदाचा विषय पुरा करून लगेच नंतर या विषयाचा विचार करू.

तेजस्वी ग्रह, देवमनुष्य आणि विश्वाला प्रत्यक्ष दिसणारा, सर्वांना प्रकाशित करणारा सूर्य, सविता इ. अनेक नावांनी ऋग्वेदांत दिसतो. परमेश्वराचे 'ज्योतिषां ज्योति:' असे वर्णन आदित्यदेवतेच्या स्वरूपामुळेच मिळाले असावे, या अनुमानात काहीही गैर नाही. शिवाय परमेश्वराची सर्वांना प्रेरणा देण्याची कल्पनाही सविता या देवाच्या स्वरूपामुळे, शक्तीमुळेच सार्थ ठरते, यात काही तर्कदोष नाही. अग्नीप्रमाणेच सूर्य, सविता यांच्या रूपांमुळे आदित्यदेवतेची उपनिषदातील आत्मतत्त्वात परिणाम होण्यामागे साक्षात् उपकारकत्व इतिहास प्रणालीने मान्य केले आहे. सवित्याचे कर्माला प्रवृत्त करणे हे इतर देवतांपेक्षा वेगळेपण असे ऋग्वेदातील ऋचा पटवून देतात. अग्निरहस्यात मण्डलब्राह्मण, तैत्तिरीय ब्राह्मणातील सावित्राग्निचयन, ऐतरेयोपनिषदातील **'योऽहं, सोऽसौ, योऽसौ सोऽहम्**' (ऐतरेय आरण्यक २।२।४) जो मी तो तो आहे, जो तो तो मी आहे' ही देहात आणि सूर्यमंडलात असणाऱ्या देवाची एकात्मतेने–एकीभावाने उपासना, छांदोग्य उपनिषदातील **'असौ वा आदित्यो देवमधु**' (छांदोग्य ३.१.११) हा सूर्य देवांचा मध आहे– देवांना प्रिय आहे, अशा प्रकारे आरंभिलेली आदित्य विषयीची ब्रह्मोपासना इत्यादि संदर्भ आदित्यदेवतेचा उपनिषद्विद्येशी साक्षात् संबंध समजावून देतात.

अग्नि, इन्द्र, वरुण यांच्याप्रमाणेच विष्णु, रुद्र इत्यादींचे ऋग्वेदाने प्रतिपादिलेले परमेश्वरत्व विद्वानांनी अभ्यासाने जाणून घ्यावे, त्यासाठी या भागात उद्धृत केलेल्या आणि न केलेल्या इतर ऋचांचा आधार घ्यावा विस्तारभयास्तव येथे

त्याचा सविस्तर ऊहापोह केला नाही.

अग्नि, इन्द्र, वरुण आदींचा विशेषनामांविना सार्थ विशेषणांसह त्वष्टा, धाता, कर्ता, हिरण्यगर्भ असा उल्लेख एका शुद्ध परमेश्वर तत्त्वाकडे जाण्याचा प्रवास, त्याचा प्रत्यक्ष उदय सूचित करतो. विशेषत: विश्वकर्म्याची २ सूक्ते आणि हिरण्यगर्भाचे एक सूक्त ही एकाच सर्वांना आधार असलेल्या अज पण विश्वात प्रवेश करून विविध आकार जन्म धारण करणाऱ्या देवाची स्तुति करतात आणि प्रश्न विचारून त्याचे एकत्व निश्चित करतात.

'द्यावाभूमी जनयन्देव एक:' 'यो न: पिता जनिता यो विधाता धामानि वेद भुवनानि विश्वा। यो देवानां नामधा एक एव', 'अजस्य नाभावध्येकमर्पितं यस्मिन्विश्वानि भुवनानि तस्थु:' ' न तं विदाथ य इमा जजान' 'य आत्मदा बलदा यस्य विश्व उपासते प्रशिषं यस्य देवा:। यस्य छायाऽमृतं यस्य मृत्यु:, कस्मै देवाय हविषा विधेम।।' 'यो देवेष्वधि देव एक आसीत्' 'ततो देवानां समवर्ततासुरेक:।'

अर्थ : अन्तरिक्ष आणि पृथ्वी या दोघांना एका देवाने निर्माण केला, जो आमचा पिता, निर्माण करणारा, तो सर्व भुवनाना जाणतो. जो देवांच्या नाना नावातूनही एकच आहे. त्या अजाच्या नाभीमध्ये एक तत्त्व ठेवले ज्याच्यामध्ये सगळी भुवने रहातात. ज्याने या प्रजांना निर्माण केले त्याला तुम्ही जाणत नाही. जो आत्मद, बलद आहे, ज्याची सर्व उपासना करतात....., कोणत्या देवाला हवींनी संतुष्ट करू? देवांमध्ये एक श्रेष्ठ आहे. नंतर देवांचा तो एक प्राण झाला. इत्यादींनी ते व्यक्त होते.

विश्वकर्मा, हिरण्यगर्भ, प्रजापती यांचे परमेश्वरत्व दाखवणाऱ्या आणि पुरुषाचे असंख्यात गुण गाणाऱ्या ऋचा पुरुषसूक्तात सिद्धातरूपाने परमपुरुषाचा विचार मांडत आहेत. इन्द्र, वरुण या व इतर विशेषनामांना वगळून विश्वकर्मा, हिरण्यगर्भ इ. विशेषनामासारखी विशेषणेही बाजूला सारून साधारण पुरुष या नावाने पुरुषसूक्तातील ऋचा विश्वतत्त्वांचे वर्णन करतात. येथे सर्व विविध कार्ये एका तत्त्वाकडून होण्याजोगी-त्याचाच अंश असे दर्शवण्यासाठीच सर्व विश्वाची पुरुषात्मकता सांगितली आहे. परमार्थतत्त्वाचे विश्वात्मकत्व असूनही ते त्याहूनही मोठे आहे. हे नीटपणे समजावण्यासाठी **'पादोऽस्य विश्वा भूतानि' 'अत्यतिष्ठद्दशाङ्गुलम्' 'उतामृतत्वस्येशान:'** 'सारे प्राणिमात्र याचे पाय, सर्वांमध्ये राहूनही तो दशांगुळे शिल्लक आहे, अमृतत्वाचा स्वामी' इत्यादि वर्णने येतात. ते एक तत्त्वच कार्य आणि कारण, दोन्ही तोच कार्य आणि तोच कारण हे

सांगण्यासाठी विधान केलं–

'यद् भूतं यच्च भव्यम्' – जे होऊन गेलं ते आणि जे नंतर होणार आहे ते सर्व तो पुरुषच आहे. त्याच पुरुषाचे प्राकट्य आणि अदृश्यभाव हे त्याचे गुण आहेत ते सुचवण्यासाठी यज्ञरूपक आणि जन्म-मरण, यज्ञीय हव्यत्व स्पष्ट केले. एकाच परमेश्वराचे कार्यकारणस्वरूप स्पष्टपणे विशद करून पुरुषसूक्ताने, विश्वात्मक विराट पुरुषाच्या उपनिषदातील अवताराची पार्श्वभूमीच तयार केली.

पुरुषः विश्वस्य परमतत्त्वम्। – पुरुष हेच विश्वाचे परमतत्त्व आहे.

वेदात पुरुषशब्द मनुष्यवाचक आहे, प्रसिद्ध आहे. लोकांच्या व्यवहारात मनुष्यजातीसाठी वापरला जाणारा तोच पुरुष शब्द परमार्थतत्त्वाचा बोधक-वाचक म्हणून नारायणऋषींनी 'पुरुष' हाच शब्द आदराने स्वीकारला. मनुष्य हा ज्याचा वाचक दुसरा शब्द अशा सांसारिक मनुष्याची स्वरूपरचना, उच्चनीच योनीत, अवस्थेत असलेल्या इतर प्राण्यांपेक्षा त्याचे वेगळेपण, त्याच्या विलक्षण अशा चैतन्यगुणांना बारकाईने पाहून, त्यांच्याशी तुलना करून, दोषांना बाजूला सारून त्याच्या लहानशाही उत्तमगुणांना अनंतपट वाढवून श्रेष्ठ पुरुषाची– विश्वात्मक पुरुषाची कल्पना क्रान्तदर्शी वैदिक ऋषींनी केली. अग्निसूर्यवायु आप पृथ्वी आदि देवतांनी युक्त समुदायरूप असूनही प्रत्येक देवता ज्या समूहाचा अवयव होत्या त्या महान विश्वाचे तात्त्विक स्वरूप प्रकट करण्यासाठी पुरुषशब्द कल्पिला. विश्वाच्या आणि मनुष्यप्राण्याच्या तुलनेनं 'आधिदैवतम्' आणि 'अध्यात्मम्' अशा प्रकारे चिंतन सतत करणाऱ्या ऋषींनीच प्रथम वैदिक अध्यात्मदर्शन प्रस्तुत केलं. तशी तुलना करून-केल्यामुळेच पिण्ड आणि ब्रह्माण्ड यातील अत्यंत समानता त्यांना पहाता आली. मनुष्यात विश्वशक्तींचे एकीकरण, त्यांचे प्रत्येकामध्ये कार्यानुसार विभाजन, संकल्पानुसार कार्य पार पाडताना कार्यांची सरमिसळ, परस्परविरोध टाळणे, एकसंध अवयवीसाठी गौणत्व स्वीकारून रहाणे, या सर्वांत तत्त्वतः एकात्मता अनुभवाला येते. हे प्राणिशास्त्राने प्रकट केलेलं पुरुषस्वरूपाचे संघटन किंवा अवयवयुक्तत्व, विश्वतत्त्वदर्शनाला उपकारक ठरते. शिवाय बीजावस्थेत पुरुष हातपाय इत्यादींनी युक्त असलेल्या कर्मेंद्रियांचा डोळे, कान इ. ज्ञानेंद्रियांशी विरोध येऊ न देता कोणत्याही भेदाशिवाय, एकत्वाने रहाते. तोच पुरुष बीजभाव टाकून हातपायादि अवयवांनी आणि कानडोळे इ. ज्ञानेद्रियांनी कार्यरत होऊन अंगभेदांनी स्वस्वरूप दाखवतो. ही कार्यकारणभावाची प्रक्रिया प्राणिविज्ञानाप्रमाणे जगाच्या सृजनप्रक्रियेचे स्वरूप तत्त्वतः समजण्यासाठी उपयोगी पडते.

'सूर्ये चक्षुर्गच्छतु, वातमात्मा, द्यां च गच्छ पृथिवीं च धर्मणा। अपो वा गच्छ यदि तत्र ते हितमोषधीषु प्रति तिष्ठा शरीरैः।।'(ऋग्वेद १०.६०.३) – मृत मनुष्य ब्रह्माण्डात लय पावतो असं सांगणारी श्रुती मनुष्यामध्ये विश्वशक्तीचे एकीकरण आणि कार्यविभाजन सांगते. चक्षू सूर्यात जावो, वायूत आत्मा (?प्राण), अंतरिक्षात, पृथ्वीत किंवा पाण्यात आपल्या स्वधर्माप्रमाणे जा. जर तिथे तुझ्या हित औषधींमध्ये असेल तर तिथे जा– तिथे शरीराने रहा. गतप्राण झालेल्या पुरुषाला उद्देशून असा मंत्र आहे.

'वातात्ते प्राणमविदं सूर्याच्चक्षुरहं तव' इति। (अथर्ववेद ८.२.३)

अर्थ – तुझ्या वातातून प्राण मिळाला, सूर्यापासून दृष्टि (नेत्र) मिळाली, यज्ञात मारल्या जाणाऱ्या पशूला उद्देशून म्हणतात– **'वातं प्राणमन्ववसृजतात्, अन्तरिक्षमसुं, दिशः श्रोत्रं, पृथिवी शरीरमिति। एष्वेवैनं तल्लोकेष्वादधाति'** (ऐतरेय ब्राह्मण ६।६) वाताने प्राण निर्माण होवो, अंतरिक्षाने प्राण, दिशांनी कानांना निर्माण करावं आणि पृथ्वीने शरीराला निर्माण कर. ह्यांच्यामधेच त्या लोकात त्याला ठेवतात (त्याची इन्द्रियादि त्याला मिळतात.)

'यत्रास्य पुरुषस्य मृतस्याग्निं वागप्येति, वातं प्राणः, चक्षुरादित्यं, मनश्चन्द्रं, दिशः श्रोत्रं, पृथिवीं शरीरं, आकाशमात्मा, ओषधीर्लोमानि, वनस्पतीन् केशाः, अप्सु लोहितं च रेतश्च निधीयते क्वायं तदा पुरुषो भवतीति' (बृहदारण्यक ३।२।१३) – मृत पुरुषाचा– त्याच्या सर्व गोष्टींचा कोठे/कसा लय होतो ते सांगतात– 'मृत पुरुषाची वाणी अग्नीत, प्राण वायूत, नेत्र आदित्यात, मन चंद्रात, श्रवणशक्ति दिशांमध्ये, शरीर पृथ्वीमध्ये, आकाशात आत्मा, ओषधींमध्ये लव, वनस्पतींमध्ये केस, पाण्यामध्ये रक्त आणि वीर्य ठेवले जाते, तेव्हा पुरुष कोठे रहातो?' अथर्ववेदाच्या शारीरसूक्तात पुरुषरूपाने विश्व-सर्व-देवतांचे अस्तित्व आणि पुरुषाच्या गुणधर्मांचे सविस्तर परिगणन करून, थोडक्यात त्याबाबत स्वतःचा अभिप्राय सांगितला आहे.

'गृहं कृत्वा मर्त्यं देवाः पुरुषमाविशन्' (अथर्ववेद ११।१०।१८)

अर्थ – 'घर' निर्माण करून देवांनी पुरुषांमध्ये प्रवेश केला.

'या आपो याश्च देवता या विराड् ब्रह्मणा सह। शरीरं ब्रह्म प्राविशत्, शरीरेऽधि प्रजापतिः।। सूर्यश्चक्षुर्वातः प्राणं पुरुषस्य वि भेजिरे। अथास्येतरमात्मानं देवाः प्रायच्छन्नग्नये।। तस्माद्वै विद्वान् पुरुषमिदं ब्रह्मेति मन्यते। सर्वा ह्यस्मिन् देवता गावो गोष्ठ इवासते।।' (अथर्ववेद ३।१०।३०-३२)

अर्थ – आप या देवता, विराट् ब्रह्मा सह शरीरात प्रवेश केला. प्रजापतीनेही

शरीराचा आश्रय घेतला. सूर्याने दृष्टी आणि वायूने प्राणांचे विभाजन केले. नंतर त्याच्या सर्व गोष्टी देवांनी अग्नीला दिल्या. म्हणून विद्वान् या पुरुषाला ब्रह्म असे म्हणतात. गोठ्यात गाई रहाव्यात त्याप्रमाणे सर्व देवता याच्यामध्ये वास करतात.'

'सूर्या मे चक्षुर्वातः प्राणोऽन्तरिक्षमात्मा पृथिवी शरीरम्' (अथर्ववेद ५।९।७) – शिवाय असेही म्हटले आहे– सूर्य माझा डोळा, वायू, प्राण, अन्तरिक्ष आत्मा, पृथ्वी शरीर' याला अनुसरूनच शांखायन आरण्यकात म्हटले आहे– **'प्रजापतिर्वा इमं पुरुषमुदञ्चत। तस्मिन्नेता देवता आवेशयत्। वाच्यग्निं, प्राणे वायुं, अपाने वैद्युतं, उदाने पर्जन्यं, चक्षुष्यादित्यं, मनसि चन्द्रमसं, श्रोत्रे दिशः, शरीरे पृथिवीं, रेतस्यपः, बले इन्द्रं, मन्यावीशानं, मूर्धन्याकाशं, आत्मनि ब्रह्म'** (शांखायन आरण्यक ११।१)

अर्थ – प्रजापतिने या पुरुषाला उचलले. त्यामध्ये देवतांचा प्रवेश करविला. वाणीत अग्नीला, प्राणात वायूला, अपानात वैद्युताला, उदानात पर्जन्याला, डोळ्यांमध्ये सूर्य, मनात चंद्राला, कानात दिशांना, शरीरात पृथ्वीला, वीर्यात पाण्याला, बळात इन्द्राला, मन्यूमध्ये (रागामध्ये?) ईशानाला, मस्तकात आकाशाला, आत्म्यामध्ये ब्रह्माला ठेवले' हेच हृदयात ठेवून ऐतरेयउपनिषदात म्हटले आहे. **'अग्निर्वाग्भूत्वा मुखं प्राविशत्, वायुः प्राणो भूत्वा नासिके प्राविशत्, आदित्यश्चक्षुर्भूत्वाऽक्षिणी प्राविशत्, दिशः श्रोत्रं भूत्वा कर्णौ प्राविशन्, ओषधिवनस्पतयो लोमानि भूत्वा त्वचं प्राविशन्, चन्द्रमा मनो भूत्वा हृदयं प्राविशत्, मृत्युरपानो भूत्वा नाभिं प्राविशत्, आपो रेतो भूत्वा शिश्नं प्राविशन्'** (ऐतरेय आरण्यक २।४।२।४)

अर्थ – 'अग्नीने वाणी होऊन मुखात प्रवेश केला. वायूने प्राण होऊन नाकात प्रवेश केला. आदित्य दृष्टी होऊन डोळ्यात आला. दिशा श्रवणशक्ती होऊन कानात प्रवेशिल्या. औषधी आणि वनस्पती यांनी लोम होऊन त्वचेत प्रवेश केला. चन्द्राने मन होऊन हृदयात प्रवेश केला. मृत्यूने अपानवायू होऊन नाभीत प्रवेश केला. पाण्याने रेत होऊन पुरुषलिंगात प्रवेश केला.

अग्नि, आदित्य, वायू, पाणी आणि अन्न यांनी भरलेल्या या जगात पाच जिवंत प्राण्याचे धर्म आढळतात म्हणून वेदद्रष्ट्या ऋषींनी पुरुषाचे रूप कल्पिले. सतत परिवर्तनशीलता, अप्रकट, भेदरहित बीजापासून विविध लहानमोठ्या आकारांमध्ये परिणत होणे, विनाश व पुन्हा उत्पत्ती यांची साखळी, वेगवेगळी कार्ये करणाऱ्या शक्तींचे विसंवादाशिवाय– सुसंगत सहअस्तित्व, तशा स्थितीत

त्यांच्यातून व्यक्त झाली मूलभूत एकता आणि समान रूपांच्या किंवा विरुद्ध, वेगळ्या रूपांच्या व्यक्तींची जन्मपरंपरा हे ते पाच प्राणिधर्म आहेत. समान-भिन्न नसलेले उपादान कारण असण्याचा सिद्धान्त पुरुषाच्या रूपकानेच सिद्ध होतो. कर्ता हा निमित्त असतो. तो स्वत:हून वेगळे असे उपादानकारण- कच्चा माल- घेऊन रथ इत्यादि कार्ये करतो हे जगात प्रसिद्ध आहे. अशाच प्रकारे जगाची- विश्वाची निर्मिती करणारा परमेश्वर स्वत:पेक्षा वेगळ्या अशा परमाणु इ. उपादानकारण घेऊन जग निर्माण करतो असा तर्क काही तार्किक करतात. ते ईश्वराला जगाचे उपादानकारण मानत नाहीत. वेद मात्र उपादानकारण आणि कर्ता यांचा भेद सहन करीत नाही. पुरुषाचा जनन करणाऱ्याचा दृष्टांत मनात ठेवून प्राण्यांचे जन्मलेला आणि जन्माला घालणारा या नात्याने सादृश्य/ सारखेपणा असलेले विश्व निर्माण करून भेदकल्पना दूर करते.

ही गोष्ट प्रत्यक्ष दिसते की प्राणी स्वत:पासूनच स्वत:च्या अपत्यांना जन्म देतात. तसेच दुसऱ्या कर्त्याची अपेक्षा न ठेवता, उपादानकारणच, कर्तृत्वशक्तीने कार्यरूपाने परिणाम पावते. तत्त्वत: कार्य आणि कारण दोन्ही एकच असतात.

हीच गोष्ट जनकपुरुषाच्या रूपकातून प्रकट होते. म्हणूनच वेद केवळ पुरुषाचे रूपकच सांगत नाही तर गाय, बैल, पक्षी यांचेही रूपक वापरतो. गाईचे रूपक सुचवून म्हणतात- **'तस्या: समुद्रा अधि वि क्षरन्ति तेन जीवन्ति प्रदिशश्चतस्र:। तत: क्षरत्यक्षरं तद्विश्वमुप जीवति।।'** (ऋग्वेद १.१६४.४२)

अर्थ - त्या गाईपासून समुद्र प्रस्रवत असतात, त्याने चारही प्रमुख दिशा जगतात. पुष्ट होतात. त्यापासून अक्षर स्रवते त्यावर विश्व उपजीविका करते.

'यो रोहितो वृषभस्तिग्मशृङ्ग: पर्यग्निं परि सूर्यं बभूव। यो विष्टभ्नाति पृथिवीं दिवं च तस्माद् देवा अधि सृष्टी: सृजन्ते।।' (अथर्व. १३.१.१५)

अर्थ - जो तांबूस तीक्ष्ण शिंगाचा बैल अग्नीच्या सूर्याच्या भोवती राहतो. जो पृथ्वीला अंतरिक्षाला स्थिर बनवितो त्यानंतर पुढे देव सृष्टिनिर्माण करतात.

'दिव्य: स सुपर्णो गरुत्मान्' (ऋग्वेद १.१६४.४६) - तो गरुड दिव्य पक्षी आहे. **'सुपर्णं विप्रा: कवयो वचोभिरेकं सन्तं बहुधा कल्पयन्ति'** (ऋग्वेद १०.११४.५) त्या सुंदर पंखांच्या पक्षाला तो एकच असूनही विद्वान ब्राह्मण त्याची अनेक रूपांमध्ये कल्पना करतात.

प्राणीरूपकांपेक्षा पुरुषरूपक वेदाला अधिक आवडलं. कारण पुरुष इतर प्राण्यांपेक्षा गुणांनी वरचढ असतो.

'तस्य य आत्मानमाविस्तरां वेद, अश्नुते हाविर्भूय:। ओषधिवनस्पतयो

यच्च किंच प्राणभृत्, स आत्मानमाविस्तरां वेद। ओषधिवनस्पतिषु हि रसो दृश्यते, चित्तं प्राणभृत्सु। प्राणभृत्सु त्वेवाविस्तरामात्मा। तेषु हि रसोऽपि दृश्यते। न चित्तमितरेषु। पुरुषे त्वेवाविन्तरमात्मा। स हि प्रज्ञानेन संपन्नतमः' (ऐतरेय आरण्यक २।३।२)

अर्थ – त्याने स्वत:ला प्रकट झालेले पाहिले. प्रकट होऊन त्याने सर्व व्यापले. औषधी वनस्पती जे काही प्राणयुक्त ते त्याने आपल्यापासून प्रकट झाल्याचे पाहिले. औषधी वपस्पतींमध्ये रस असतो. प्राण धारणकरणाऱ्यांमध्ये चित्त असते. प्राणधारण करणाऱ्यांमध्ये आत्मा प्रकट होतो. त्यांच्यामध्ये रसही असतो. इतरांमध्ये चित्त नसते. पुरुषात आत्मा प्रकट होतो. तो ज्ञानाने संपन्न असतो.

'ताभ्यः पुरुषमानयत्। ता अब्रुवन् सुकृतं बतेति। पुरुषो वाव सुकृतम्' (ऐतरेय आरण्यक २।४।२।३) – त्यांच्यापासून पुरुषाला आणले (निर्माण केले) त्या म्हणाल्या 'छान निर्मिती झाली.' पुरुष हीच ती उत्तम निर्मिती.

'अन्नात् पुरुषः' (तैत्तिरीय उपनिषद २।१)

अर्थ – तैत्तिरीय उपनिषदातही आत्म्यापासून सृष्टिक्रम सुरू 'अन्नापासून पुरुष' अशी सृष्टीतील शेवटची निर्मिती पुरुष ही आहे.

पुरुषावरील रूपक ऋग्वेद विश्वतत्त्वाशी जोडून दाखवतो. विश्वाचे स्थूल आणि सूक्ष्म असं कार्यकारणरूप, कोणत्याही अवस्थेत स्थिर रहाणारं रूप हे वस्तुत: तत्त्वसमुदाय वा वस्तुसमुदाय नाही तर एकात्म आहे. जाणावयाचा पदार्थसमुदाय हा कोणत्या तरी एककाचा अवयव असलेल्या, एकसंधाच्या अंगाचा समुदाय आहे असं श्रुती मानते. त्या एकात्मक विश्वपदार्थाचे समर्थन करण्यासाठी पुरुषाचे रूपक स्वीकारले आहे. नारायण ऋषीने पुरुषसूक्तात सूक्ष्म आणि स्थूल, सूक्ष्मतर आणि स्थूलतर अशा पुरुषाला चार प्रकारे रहस्यमयी शैलीत वर्णिले आहे. सर्वांच्या पलिकडचा परमपुरुष– त्याची महती एवढी आहे– पृथ्वीवरील सर्व भूते त्याचा एक पाद आहेत.

याचा तिसरा पाय स्वर्गात अमृत आहे असा दर्शविला आहे. **'तस्माद्विराडजायत विराजो अधि पूरूषः।'** त्यापासून विराट आणि यज्ञपुरुष तयार झाले. या उल्लेखाप्रमाणे परमपुरुषापासून विराट पुरुष आणि यज्ञपुरुष निर्माण झाले असे श्रुति सांगते. त्यांचे स्वरूपाविषयी इथे सरळ अनुक्रमाने न सांगता विरुद्ध क्रमाने सांगितले आहे. प्रथम 'संवत्सर' नामक यज्ञात्मक पुरुषाचे वर्णन येते. नंतर त्यापासून झालेल्या चातुर्वर्ण्ययुक्त पुरुषाचे वर्णन येते. पुढे

'चन्द्रमा मनसो जात:' – चन्द्र मनातून जन्मला अशी सुरुवात करून चन्द्र, सूर्य, इन्द्र, अग्नि, वायु, अन्तरिक्ष, द्युलोक, भूमि, लोक दिशा यांची उत्पत्ति क्रमश: मन, चक्षु, मुख, प्राण, नाभी, मस्तक, पाद, श्रोत्र या विराट पुरुषाच्या अवयवांपासून सांगितली आहे.**'यत्पुरुषेण हविषा'** (पुरुषाने हवीने....) याने सुरवात झालेल्या सात मंत्रांमध्ये यज्ञनामक संवत्सरपुरुषापासून वेदत्रयीच्या छंदांची, घोडा इ. पशूंची आणि चार वर्णातल्या पुरुषांची उत्पत्ति सांगितली आहे. यज्ञपुरुषाचे संवत्सरात्मकत्व **'वसन्तो अस्यासीदाज्यं ग्रीष्म इध्म: शरद्हवि:'**– वसंत तूप, ग्रीष्म समिधा आणि शरद हवी' या वर्णनावरून अनुमित होते. हाच संवत्सरपशु यज्ञपशु आहे **'देवा यद्यज्ञं तन्वाना अबध्नन् पुरुषं पशुम्'** – यज्ञ करणाऱ्या देवांनी पुरुषरूपी पशूला बांधले' असे वर्णन करून सृष्टि–उत्पत्ति–चक्ररूप यज्ञ देवांनी केला असे वर्णन आहे. शिवाय आदिपुरुष, विराटपुरुष, कालात्मा, यज्ञपुरुष आणि चातुर्वर्ण्यपुरुष या चार शब्दांनी सांगितला आहे. रूपकमूल मनुष्य पुरुषाचा पर्याय परोक्ष दाखवतो– **'ततो विष्वङ् व्यक्रामत् साशनानशने अभि'** त्याने खाणाऱ्या व न खाणाऱ्या सर्वांना पूर्णत: व्यापून टाकलं. यातील 'साशन' या शब्दाने त्या श्रेष्ठ पुरुषाने विष्वङ् म्हणजे देव मनुष्य, प्राणी अशा अनेक रूपांनी व्यापून टाकलंय, असे सायणभाष्यावरून कळते.

ऐतरेयउपनिषदामध्ये पुरुषसूक्त लक्षात घेऊनच आदितत्त्वाचा निर्देश 'आत्मा' शब्दाने केला आहे, याआधी त्यासाठी पुरुषशब्द वापरला होता. नंतर लोकाची सृष्टी सांगून नंतर अग्निवायुआदित्य आणि दिशा या लोकपाल म्हटल्या जाणाऱ्यांच्या उत्पत्तीसंबंधी, आत्म्याने केलेली पुरुषाची सृष्टि सांगितली– त्याच्या अवयवांपासूनच अग्निवायू आदींचा जन्म सांगितला. शेवटी अग्निवायू या लोकपालांच्या विषयोपभोगासाठी त्यांचे आयतन–स्थान असा मनुष्य आत्म्याने निर्मिला, असे प्रतिपादन केले. येथे अग्निवायु आदींची ज्या पुरुषापासून उत्पत्ति सांगितली तोच पुरुषसूक्तात **'चन्द्रमा मनसो जात:'** चन्द्र मनापासून जन्मला इत्यादींनी सूचित होतो. यावरून ऐतरेयोपनिषद् आणि पुरुषसूक्त यामधील साम्याची कल्पना करावी. शिवाय पुरुषसूक्तातला परमपुरुषच येथे सृष्टीच्या प्रारंभापूर्वी होताच– **'आत्मा वा इदमेक एवाग्रे आसीत्'** 'आधी फक्त आत्मा तेवढाच होता' यातील आत्मा या शब्दाने ते सूचित होते. पुढे **'सर्वेषां भूतानामन्तरपुरुष: सम आत्मेति विद्यात्'** सर्व पुरुषांच्या आतील पुरुष तो माझा आत्मा' असे सांगितले आहे.

*** परमतत्त्वं पुरुष: प्रजापति: –** परमतत्त्व पुरुष प्रजापति.

व्यक्त आणि अव्यक्त भावांनी सांगितलेला विश्वपुरुष ऋग्वेदानंतरच्या काळातील यजुर्वेदादींमध्ये, मन्त्रब्राह्मणादि ग्रंथांमध्ये प्रजापति म्हटला जातो. सर्व देवाहून श्रेष्ठ वरिष्ठपदी असलेला सर्वांचा आत्मा, सर्वदेवतामय आणि देव-आसुरांचा पिता म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचे बीज ऋग्वेदातच आहे. त्याची पुढची वाढ यजुर्वेदादींमध्ये आढळते. कारण 'देवांचा प्राण' 'देवांचाही देव' अशा शब्दात पुन्हापुन्हा स्तुती केल्या गेलेल्या हिरण्यगर्भाला, हिरण्यगर्भसूक्तात शेवटी 'प्रजापते' असे संबोधून सूक्ताचा उपसंहार केला आहे. तेथे **'कस्मै देवाय हविषा विधेम**'(काठक १२.९, १४.१०) - कोणत्या देवाची हवीने पूजा करू' असे अनेक वेळा विचारून तो विशेष असे नाम नसलेला 'अनिर्देश्य' निर्देश न करता येण्याजोगा आहे असे सुचवले आहे. 'किं' शब्दाने 'त्याला' प्रश्नाचा विषय करून त्याचे उत्तरच दिले नाही. **'अनिरुक्तः प्रजापतिः'** (काठक १२.९) प्रजापतीची व्युत्पत्ति देता येत नाही.' हेच प्रजापतीची अनिरुक्तता दाखवते. हिरण्यगर्भसूक्तातल्या पुन्हा पुन्हा विचारल्या गेलेल्या **'कस्मै देवाय हविषा विधेम'** या चवथ्या चरणाच्या पुनरुक्तीच्या संस्कारामुळे प्रजापतीला 'क' हे नाव मिळाले. नंतर यजुर्वेदकाळात 'क' या संज्ञेने ओळखलाही जाऊ लागला. **'प्रजापतिर्वै कः'** (तैत्तिरीय संहिता १।६।८।५) **'कोऽसि कतमोऽसि कस्मै त्वा काय त्वा, सुश्लोक सुमङ्गल, सत्यराजन्'** (शौनक अथर्ववेद २०।४) इत्यादि मंत्रांनी ते समजावून दिले आहे. 'प्रजापति म्ह. क, कोण आहेस, कितवा आहेस, कुणासाठी आहेस? कीर्तिवंत, अत्यंत शुभकारक सत्यराजा आहेस.'

'स प्रजापतिरब्रवीदथ कोऽहमिति। ... ततो वै को नाम प्रजापतिरभवत्। (ऐतरेय ब्राह्मण १२।१०) प्रजापती म्हणाला, मी कोण आहे... नंतर प्रजापति 'कः' झाला- 'क' म्हणजे प्रजापति. वेदांच्या पुढील विचारांमध्ये अनेक प्रकारे प्रजापतीचे स्वरूप वर्णन केले आहे. त्या सर्वांचे सार म्हणून शतपथब्राह्मण सांगते- **उभयमेतद् प्रजापतिः निरुक्तश्चानिरुक्तश्च, परिमितश्चापरिमितश्च।** (शतपथ ६।५।३।७) सांगितलेले व न निरूपिलेले, परिमित अपि अपरिमित, हे दोन्ही म्हणजे प्रजापतीच.

ऋग्वेदातील सूक्ते इन्द्र, अग्नि, सवित्रादि देवांची पृथक्‌पणे स्तुती करतात तशी प्रजापतीदेवतेची करीत असतात. हिरण्यगर्भ सूक्तातला शेवटचा मंत्र मात्र याला अपवाद आहे. या सूक्तातच प्रजापती शब्द विशेषनाम म्हणून येतो. इतरत्र तो शब्द शब्द 'सवितृ' इत्यादींचे विशेषण असते, असे जाणावे.

यजुर्वेदात, सर्व ब्राह्मणग्रंथांमध्ये प्रजापतीला पराकोटीचे महत्त्व प्राप्त झाले.

हा ऋग्वेदाचा काळ आणि यजुर्वेदाचा काळ यांच्यामधल्या काळात देवतांबद्दलच्या विचारात खूप बदल झाला, असे लक्षात येते. ऐतिहासिकदृष्ट्या अशा परिवर्तनाचा विचार करता त्या परिवर्तनाचे कारण सामाजिक स्थिती हेच आहे. प्रजापति पदाच्या सामाजिक संदर्भाचे प्रतिबिम्ब धार्मिक तत्त्वविचारांमध्येही पडलेले दिसते. जगात हे अनुभवायला मिळतं की विश्वतत्त्वाचा विचार करणारे लोक, सामाजिक अनुभवांच्या, संस्कारांच्या प्रभावांच्या मिश्रणाने सामाजिक तत्त्वांच्या सारखेपणामुळे तसा आरोप करून विश्वतत्त्वाची कल्पना करतात. यजुर्वेदकाळात अशा विचारांच्या संकरामुळे, समाजाच्या आणि विश्वाच्या निसर्गात अगदी वेगळेपणा का असावा याचा विचार करता न आल्यामुळे त्यांनी सामाजिक असा प्रजापति नावाची व्यक्ति सृष्टितत्त्वाच्या उपपत्तीसाठी विश्वनिसर्गात सारखेपणावरून कल्पिली. प्रजापतिशब्दाने अतिप्राचीन सामाजिक व्यवस्था अशा प्रकारे व्यक्त होते. देव आणि असुर या दोहोंमध्ये विरोध नाही-नसावा असे मानणारे वैदिक लोक जेव्हा गणसंस्थेचे अंग असलेल्या प्राथमिक राज्यसंस्थेमध्ये जीवन घालवताना, आरोग्य आणि दीर्घायुष्य याची अपेक्षा ठेवत होते. त्या लोकांच्या कामनांची पूर्ति करणारा, त्या राज्यपद्धतीतील उच्चपद विभूषित करणारा, नियंत्रक नेता, पालक म्हणून प्रजापति ही भूमिका नाव मिळाले.

प्राचीन वैदिकांची सामाजिक संस्था पितृप्रधान होती- स्वाभाविकपणेच पिता मुलाचा पालक आणि नियंत्रक असतोच. हेसुद्धा स्वाभाविकच असते की प्राथमिक जनांपैकी अधिक बलवान आणि वयोवृद्ध असेल त्यालाच मोठा अधिकारी म्हटलं जायचं. (कुटुम्बप्रमुख!) जेव्हा प्राचीनकाळी वैदिक समाजात ही पितृप्रधान पद्धती अस्तित्वात होती- तेव्हा कुटुंब आणि समाज यांना धारण करणारी कर्मे करीत परंपरेने आलेली कर्मे आठवून त्यांचा उपदेश तो करी. पालक म्हणून तो सार्थ असे पिता हे पद भूषवीत असे. त्या प्रजांचा तो पति म्हणजे प्रजापति होता. तो प्रजापति म्हणजे कोणी एक विशिष्ट व्यक्ती नसे तर सामाजिक व्यवस्थेचा भाग असे. लोकसंकेताला अनुसरून प्रजापतिसंज्ञा धारण करणारे, फार काळापासून चालत आलेले ते अधिकारदर्शक एक पद होते. म्हणूनच ब्राह्मणग्रंथ आणि पुराणात अथर्व (गोपथ ब्राह्मण १।१।४), मनु (शतपथ ब्राह्मण ६।६।१।१९), भरत (शतपथ ब्राह्मण ५।८।१।१४), जमदग्नि, कश्यप, वसिष्ठ (शांखायन ब्राह्मण २५।२, २६।१५) इ. ऋषि प्रजापती नावाने वर्णिलेले आहेत. वैदिकजनांची सर्व कर्मे-वैदिक आणि लौकिक- यज्ञाला

नाभिस्थानी म्हणजे मध्यभागी ठेवून प्रजापतीद्वारा केली जात असत. म्हणून यज्ञाचा प्रवर्तक प्रजापति असे पुन्हा पुन्हा ऋग्वेदानंतरच्या वेदांमध्ये सांगितले जाते. यज्ञ हाच सर्व मनुष्यांच्या इच्छापूर्तीचे असाधारण/अमोघ साधन, असं सांगितलं जातं.

'प्रजापतिर्यज्ञानसृजत' (तैत्तिरीय संहिता १।६।९।१) - प्रजापतीने यज्ञांना निर्माण केले. **'तेन प्रजापतिः परमां काष्ठामगच्छत्'** (तैत्तिरीय संहिता १।६।९।२)- त्याने प्रजापति परमसीमेला पोहोचला. **'यो वै प्रजातेन यज्ञेन यजते प्र प्रजया पशुभिर्मिथुनैर्जायते'** (तैत्तिरीय संहिता १।६।९।३) - जो प्रजात अशा यज्ञाने यजन करतो तो प्रजेने, पशूंनी आणि मिथुनांनी युक्त होतो. **'अन्नाद्यमात्मन् धत्ते'** (तैत्तिरीय संहिता १।६।११।६)- अन्नादि आत्माला धारण करतो. **'आयुरेव आत्मन् धत्ते प्रति यज्ञेन तिष्ठति'** (तैत्तिरीय संहिता १।६।११।७)- आत्मा आयुष्यच प्रति यज्ञाने राहतो. प्रजा, अन्न धन आदि देणारी, शत्रूचा नाश करणारी सर्वप्रकारे प्रतिष्ठा प्राप्त करून देणारी, सर्व कृत्ये प्रजापतीने यज्ञाच्या कक्षेत आणली. अशाप्रकारे प्रजापतीच्या कर्मांचे यज्ञफल सांगणारे, त्यांची स्तुती करणारे अर्थवाद खूप आढळतात.

वैदिक जनांनी यज्ञ केवल सामाजिक जीवनातील साधने मिळवण्याचे सामर्थ्य देतात असे मानले नाही. यज्ञ म्हणजे विश्वशक्तीच अशी त्यांची श्रद्धा होती. यज्ञप्रवर्तक प्रजापतीचे सामाजिक सामर्थ्य श्रद्धापूर्वक स्वीकारणाऱ्या वैदिकांनी सृष्टिनिर्मितीच्या प्रक्रियेच्या कल्पनेमध्येही, विश्वकारणशक्तीही प्रजापतीरूपातच कल्पिले. या प्रकारे वेदांनी प्रजापतीला सर्वांचा उत्पत्तिकर्ता व सर्वात्मक मानले. पुरुषसूक्ताचा आधार घेणाऱ्या यजुर्वेदाने आणि ब्राह्मणग्रंथांनी प्रजापति आणि विश्वपुरुष यांचा अभेद मानून सृष्टिप्रक्रिया समजावून सांगितली. समाजाचे आणि सृष्टीचे निर्मिती त्यातील घटना यांच्यातील वेगळेपणाची विवेकाने आकलन करण्याचे बुद्धीचे सामर्थ्य लक्षात आल्यावर गौण अर्थाने प्रजापति शब्दाच्या अर्थाची व्युत्पत्ति-वेदांनी सुरू केली.

'रूपं वै प्रजापतिः', **'नाम वै प्रजापतिः'** (तैत्तिरीय ब्राह्मण २।२।७।१), **'सत्यं हि प्रजापतिः'** (शतपथ ब्राह्मण ४।२।१।२६), **'आत्मा वै प्रजापतिः'** (शतपथ ब्राह्मण ४।५।९।२) **'ब्रह्म वै प्रजापतिः'** (शतपथ ब्राह्मण १३।६।२।८) - रूप म्हणजे प्रजापती, नाम म्हणजे प्रजापती सत्य, आत्मा ब्रह्म म्हणजे प्रजापती! शेवटी उपनिषदांमध्ये प्रजापति पद न वापरता त्याची उपेक्षा करून तत्त्वविचार मांडला अशी विचार विकासाची वाटचाल झालेली दिसते.

(*शतपथब्राह्मणे प्रजापतेर्दृश्यप्रपञ्चकर्तुः आदिसलिलोद्भूतहिरण्मयाण्डात्सृष्टिरुक्ता (११।१।६।२)। तैत्तिरीयसंहितादिषु कथ्यते यत् विश्वजननीष्वप्सु वायुभूतः प्रजापतिः लेलायमानः सृष्ट्यादावासीदिति (तैसं. ५।६।४।२, ७।१।५।१; तैत्तिरीय ब्राह्मण १।१।३।५-७, २।२।९।१-१०)। तैत्तिरीयसंहितायां बहुषु ब्राह्मणेषु च प्रजापतिः विराट्पुरुषत्वेन स्वाङ्गेभ्यो विश्वं जनयतीति पुरुषसूक्तप्रोक्त-सृष्टिप्रक्रियामनुकृत्य वर्ण्यते। स खलु प्रजापतिः ज्येष्ठः अग्न्यादिदेवतानां भूरादिलोकानां गायत्र्यादिच्छन्दसां साम्नामजादिपशूनां ब्राह्मणादिवर्णानां च सृष्टिं स्वाङ्गेभ्यः करोति इत्येवं संक्षेपेण विस्तरेण वा वर्ण्यते (तैत्तिरीय संहिता ७।१।१।३-६; ऐतरेय ब्राह्मण २५।७; ता. ब्रा. ६।१।६-१३, १६।१।१, २०।१४।२; जैब्रा. १।६८,६९, ३५७; तैब्रा. २।२।९।१-१०; ऐआ. २।१।७। ऋग्वेदे यत् सृष्टिकारणं तत्त्वं अद्वैतरूपेण प्रतिपादितं तदेव अद्वैतरूपेण ब्राह्मणग्रन्थेष्वपि प्रजापत्यात्मकं निरूप्यते। 'प्रजापतिर्वा इदमेक एवाग्र आस' (ऐब्रा. १०।१) 'प्रजापतिर्वा इदमेक आसीत्' (ताब्रा. १६।१।१, २०।१४।२) 'प्रजापतिर्वा इदमग्र आसीदेक एव' (शब्रा. ६।१।३।१) इत्यादीनि वाक्यान्यनुसंधेयान्यत्र।)- शतपथब्राह्मणात दृश्य प्रपंच निर्माण करणाऱ्या प्रजापतीने आदिजलातून निर्माण झालेल्या सुवर्णअंडातून सृष्टि निर्माण केली असे म्हणतात. तैत्तिरीय संहितेत म्हटले आहे- विश्व निर्माण करणाऱ्या पाण्यात वायुरूपाने प्रजापती सृष्टिनिर्मितीपूर्वी डुलत होता. तैत्तिरीय संहितेत आणि अनेक ब्राह्मण ग्रंथांमध्ये विराट पुरुष असलेल्या प्रजापतीने आपल्या अवयवांपासून पुरुषसूक्तात सांगितलेल्या सृष्टिप्रक्रियेनुसार सृष्टिनिर्मिती केली, असे वर्णन येते. ज्येष्ठ अशा त्या प्रजापतीनेच अग्नि इत्यादी देवांची, भू आदि लोकांची, गायत्री आदि छांदांची, सामांची, अजादि पशूंची, ब्राह्मणादि वर्णांची निर्मिती स्वतःच्या अवयवांपासून केली असे वर्णन संक्षेपाने किंवा विस्ताराने येते. ऋग्वेदात जे कारण अद्वैतरूपाने सांगितले तेच ब्राह्मण ग्रंथामध्ये प्रजापतिरूपाने येते. आधी फक्त प्रजापतीच होता. प्रजापती एकटाच होता. सृष्टिपूर्वी फक्त प्रजापतीच एकटा होता. इत्यादी विधाने येथे लक्षात घ्यावीत.)

हे येथे लक्षात घेण्यासारखे आहे - जरी पुरुषसूक्तातला पुरुष हाच प्रजापती असे दोघांचे ऐक्य ऋग्वेदानंतरच्या वेदांनी बहुतेक वेळा उल्लेखिलेले असूनही त्याच्या विरुद्धही मत, उद्धरणे आढळतात. शांखायन ब्राह्मणात (६.१) महादेव रुद्र हाच प्रजापतीच्या अपत्यांपैकी एक 'सहस्राक्ष, सहस्रपात्- हजारो डोळे असंख्य पाय' असलेला पुरुष म्हणून प्रसिद्ध झाला असा संदर्भ आहे. तैत्तिरीय

आरण्यकात (१.२३.४) प्रजापतीपूर्वी निर्माण झालेला कूर्म हाच सृष्टिकर्ता सहस्रशीर्ष पुरुष असा निर्देश आहे. रुद्राचे परमपुरुषत्व **'सहस्रशीर्ष: पुरुष:'** **'वेदाहमेतं पुरुषं महान्तम्'** (श्वेताश्वेतर ३.८)- मी या महान पुरुषाला जाणतो **'महान् प्रभुर्वै पुरुष:'** (श्वेता ३.१२)- तो प्रभु महान पुरुष आहे. 'सहस्त्रशीर्षा पुरुष:' या पुरुषसूक्तातील २ मंत्रांद्वारा श्वेताश्वेतरोपनिषदात (३.१४, ३.१५, ३.८) इत्यादि वाक्यांमधून पूर्णत: स्वीकारलेलं आहे. तेच मत उत्तर नारायणमंत्राने आणि वेदोत्तरकालीन पुराणे इत्यादि वाङ्मय, नारायणादि उपनिषदे यात दृढमूल झाले. भगवान वासुदेव विष्णूमध्ये पुरुषोत्तमत्व नारायणद्वारा पक्के ठसले असे म्हणणे शक्य आहे. शतपथब्राह्मणात दोन वाक्ये **'पुरुषो ह नारायण:'** (शतपथ ब्राह्मण १३.६.१.१) पुरुषाने नारायणाची इच्छा केली आणि **'पुरुषं ह नारायणं प्रजापतिरुवाच'** (शतपथ ब्राह्मण१२.३.४.१) - नारायण पुरुषाला प्रजापती म्हणाला. या दोन वाक्यांनी नारायणाचे पुरुषत्व वर्णन करतात. नारायण हाच विष्णू हे समीकरण वेदोत्तरकालीन निगमांमध्ये स्वीकृत आहे. पुरुषोत्तमशब्दाचे वैदिक मूलही उपलब्ध आहे- **'एष संप्रसादोऽस्माच्छरीरात्समुत्थाय परं ज्योतिरुपसंपद्य स्वेन रूपेणाभिनिष्पद्यते स उत्तम: पुरुष:'** (छांदोग्य ८।१२।३)- हा प्रसादरूप आत्मा या शरीरातून बाहेर पडून श्रेष्ठ अशा तेजाला प्राप्त होऊन स्वत:च्या मूळ रूपाशी एकरूप होतो, तोच उत्तम पुरुष.

✲ पुरुषोत्तम हाच सर्वधर्मांनी युक्त असा भक्तिविषय आहे.

परतत्त्वाची पुरुषरूपाने विचारपूर्वक प्रतिष्ठापना केल्यामुळेच प्रपंचाचा दोष घालवणारी, मनाचा रूक्षपणा घालवून मृदुता निर्माण करणारी, रससारवती, संसाराचा संताप शमवणारी अमृतमयी भक्ति मनात पालवते, ते अन्यथा शक्य नाही. भगवंताच्या पुरुषरूपामुळेच त्याचा मानस साक्षात्कार शक्य होतो. चित्तामध्ये सत्त्वाचा आवेग निर्माण होऊन लौकिक आनंदाला क:पदार्थ ठरवणारा, स्वर्गाला मागे टाकणारा, मोक्षाच्या चरमसीमेपर्यंत पोहोचवणारा प्रेमभाव हृदयात जागृत होते, जे अन्यथा (निर्गुणाबद्दल) शक्य नाही. म्हणूनच लोकांनी स्वीकारलेले सर्व धर्म पापांचा निरास करून मुक्ती मिळवण्यासाठी पुरुषोत्तमरूपाने स्थापिलेल्या विभूवरच श्रद्धा ठेवतात. त्या त्या देवताला पुरुषरूपाने स्तवणाऱ्या ऋग्वेदमंत्रांमध्ये आढळणारे हे पुरुषतत्त्व पुरुषसूक्तात विशिष्ट नाव न देता वर्णिले आहे, हे लक्षणीय आहे. या ऋग्वेदाच्या बीजातूनच शैव, वैष्णव आदि भागवतच्या इतर देवांची कल्पना करणारा परमपुरुषाचा विचार निर्माण झाला. पुरुषविचार भक्तीला अनुकूल आहे तरीही तत्त्व समजावून द्यायला पुरेसा समर्थ/उपयुक्त नाही म्हणून

ऋग्वेदातच उपलब्ध असलेले परमदेवतेला उद्देशून असलेले, अनिर्देश्य अशा अन्तिमतत्त्वाचे सूचन करणारे मंत्रच स्वीकारून उपनिषदांनी आध्यात्मिक दर्शनाची उभारणी केली.

ऋग्वेदात बहुदेवतावादापासून एकेश्वरवादापर्यंत प्रवास झाला. देवांची नावं जरी वेगवेगळी असली तरी ती श्रेष्ठ देवतेला उद्देशूनच आहेत असं प्रत्यक्ष सांगितलं आहे.

'इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो दिव्यः स सुपर्णो गरुत्मान्। एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः।।' (ऋग्वेद १.१६४.४६) **'एक एवाग्निर्बहुधा समिद्धः, एकः सूर्यो विश्वमनु प्रभूतः। एकैवोषाः सर्वमिदं वि भाति, एकं वा इदं वि बभूव सर्वम्।।'** (ऋग्वेद ८.५८.२)

अर्थ – 'तो दिव्य चांगल्या पंखाचा गरुड आहे. त्यालाच विप्र– शहाणे लोक, इंद्र, मित्र, वरुण, अग्नि, यम किंवा मातरिश्वा अशा अनेक नावांनी तो एकच असूनही संबोधतात. एकच अग्नी अनेक प्रकारे प्रज्वलित होतो. एकच सूर्य विश्वात अनेक प्रकारे दिसतो. एकच उषा सर्व प्रकारे शोभते. एकच हे सर्व विविध होते.

'आनीदवातं स्वधया तदेकं तस्माद्धान्यन्न परः किंचनास।।' (ऋग्वेद संहिता १०।१२९।२) – ते एकटे स्वधेने– स्वशक्तीने वायूशिवाय श्वासोच्छ्‌वास करीत होते. त्याशिवाय दुसरे काहीच नव्हते. **'अयं देवानामपसामपस्तमो यो जजान रोदसी विश्वशम्भुवा। वि यो ममे रजसी सुक्रतूतया अजरेभिः स्कम्भनेभिः समानृचे।।'** (ऋग्वेद संहिता १।१६०।४) –एका ठिकाणाहून उत्पन्न झालेल्या एका ठिकाणी जोडीने रहाणाऱ्या अशा बहिणी द्यावापृथ्वी ते ज्ञानी आणि कुशल देव वेगवेगळे करतात. ते प्रकाशणारे किरण अंतरिक्षात आणि द्युलोकात नवेनवे तंतु विस्तारतात. **'अहमेव वातइव प्र वाम्यारभमाणा भुवनानि विश्वा। परो दिवा पर एना पृथिव्यैतावती महिना सं बभूव।'** (ऋग्वेद १०।१२५।८) – मीच सर्व जगाचा आरंभ करणारी वाऱ्याप्रमाणे प्रवृत्त होते. स्वर्गापेक्षा आणि पृथ्वीपेक्षाही श्रेष्ठ असणारी मी आपल्या सामर्थ्यानेच एवढी निर्माण झाले.

विशेषनाम नसलेले हे मंत्र एका सर्वात्मक तत्त्वाचा निर्देश करतात. हा अद्वैत परमेश्वराला उद्देशून असलेला निष्कर्ष लक्षात घेऊन ऋग्वेदानंतरच्या अथर्ववेदात ब्रह्मसूक्ते रचिली आहेत.

'तदेवाग्निस्तदादित्यस्तद्वायुस्तदु चन्द्रमाः। तदेव शुक्रं तद्‌ब्रह्म ता आपः स प्रजापतिः।। सर्वे निमेषा जज्ञिरे विद्युतः पुरुषादधि।.... एषो ह देवः ....। स

एव जात: स जनिष्यमाण: प्रत्यङ्जनास्तिष्ठति सर्वतोमुख:।।' (शौनक. अथर्ववेद ३२.१.४)

अर्थ – तोच अग्नि, तोच आदित्य, तोच वायु, तेच चन्द्र, तेच शुक्र, तेच ब्रह्म, तेच आप, तोच प्रजापति, सर्वे देव विद्युत्पासून निर्माण झाले. हा तो देव. तोच झाला. तोच पुढे होणारा. माणसांसमोर सर्वदिशेने मुखे असलेला तो उभा रहातो.

अद्वैताचे प्रकटरूप, एकमेवाद्वितीय पुरुषरूपाने ऋग्वेदात प्रशंसलेले, यजुर्वेदसंहिता आणि ब्राह्मणग्रंथात प्रजापतिरूपाने वर्णिलेले, अथर्ववेद संहितेत अभेद ब्रह्मरूपाने अपेक्षिलेले ते विशिष्ट तत्त्व उपनिषदांमध्ये आत्मा या नावाने ओळखले जाते. पुरुष, ब्रह्म, आत्मा या तीन शब्दांनी सांगितल्या जाणाऱ्या या तत्त्वाचा परिष्कार आणि संस्कार करून तत्त्वाच्या विस्तारासाठी, स्पष्टीकरणासाठी उपनिषदांनी प्रयोग केला. तेथे हा विशेष आहे– पुरुष शब्दाचा अभिधावृत्तीने जो अर्थ कळतो तो टाकून सूक्ष्म अर्थ कळवून देण्यासाठी अर्थवादरूपाने अनेक प्रकारची व्युत्पत्ति अवलंबिली. ह्याची सुरुवात उपनिषदांपूर्वीच्या मंत्रब्राह्मणांमध्ये झाली आणि उपनिषदांमध्ये ती पूर्णत्वाला गेली. पुरुष म्हणताच हातपाय इत्यादि अवयवांनी युक्त, डोळे इ. अन्य इंद्रिययुक्त, बुद्धि इ. धर्म असलेल्याचा बोध होतो. ती पुरुषाची अवयवादियुक्त ही ओळख बाजूला ठेवून सूक्ष्म असा अर्थ सांगण्याची सुरुवात अथर्ववेदात अशी झाली–

'सर्वा दिश: पुरुष आ बभूवाँ ३। पुरं यो ब्रह्मणो वेद यस्या: पुरुष उच्यते।।' (अथर्व १०।२।२८) **'इमे वै लोका: पू:, अयमेव पुरुषो योऽयं (वायु:) पवते, सोऽस्यां पुरि (त्रैलाक्ये) शेते तस्मात्पुरुष:'** (शतब्राह्मण १३–६) **'पुरिशयं सन्तं प्राणं पुरुष इत्याचक्षते'** (गोपथ ब्राह्मण १।१।३९) इति।

अर्थ – सर्व दिशा जो ब्रह्माचे तत्त्व पुर जाणतो तो पुरुष– येथे **'पुरि शेते'** – पुरात झोपतो ही व्युत्पत्ति आदरून 'निरवयव तत्त्व' हा अर्थ घेता येईल. याचाच अनुवाद शतपथ आणि गोपथब्राह्मणात केला आहे.

हे लोक म्हणजे पू:, हाच तो पुरुष (वायु) जो पवित्र करतो. तोच या पुरि– त्रैलोक्यात रहातो म्हणून तो पुरुष. या लोकांमध्ये रहाणाऱ्या प्राणाला पुरुष असे म्हणतात. बृहदारण्यकात तर पुर् या शब्दाने मनुष्य इत्यादि सर्व प्राण्यांची शरीरे विचारात घेऊन त्यांमध्ये निवास करणारा आत्मा हा असा पुरुषशब्दाचा अर्थ घेतला आहे.

'पुरश्चक्रे द्विपद:, पुरश्चक्रे चतुष्पद:, पुर: स पक्षी भूत्वा पुर: पुरुष

आविशदिति। स वा अयं पुरुषः सर्वासु पूर्षु पुरिशयः' (बृहदारण्यक २.५.१८) – '**आत्मैवेदमग्र आसीत् पुरुषविधः। सः ..... अहंनामाऽभवत्। ... स यत् पूर्वोऽस्मात्सर्वस्मात् सर्वान् पाप्मन औषत् तस्मात्पुरुषः**' (बृहदारण्यक १।४।१)

अर्थ – पूर्वी त्याने दोन पायांचे प्राणी निर्माण केले. मग चार पायांचे. मग पक्षी होऊन त्याने त्या सर्वांच्या शरीरात प्रवेश केला. म्हणून तो पुरुष– सर्वांच्या शरीरात विसावणारा. तेथेच या शब्दाची दुसरी व्युत्पत्तीही दिली आहे.

अगदी पूर्वी पुरुषाकार आत्माच होता. अहम् हे त्याचं नाव. त्या इतर सर्वांच्या पूर्वी होता. त्याने सर्व पापे नष्ट केली म्हणून पुरुष. 'उष् दाहे' या धातूपासून हा शब्द व्युत्पन्न झाला आहे. त्यामुळे ज्याने पूर्वीच सर्व पाप जाळून टाकले आहे हा अर्थ निष्पन्न होता. तैत्तिरीयारण्यकात आदिकारणाचा विराजाचा पुरुषशब्दाने निर्देश करण्यासाठी दुसरीच व्युत्पत्ति सांगितली. प्रजापतीला कूर्माचे रूप धारण केलेला जलचर परमात्मा म्हणाला, '**पूर्वमेवाहमिहासमिति। तत् पुरुषस्य पुरुषत्वम्। स सहस्रशीर्षा पुरुषः**' (तैत्तिरीय आरण्यक १।२३।४) – ''मी पूर्वीपासूनच इथे होतो. ते पुरुषाचे पुरुषत्व. तो सहस्र डोक्यांचा पुरुष होता.''

पुरुषशब्दाने व्यवहारात शरीरदोषांनी भरलेला, शोकमोहतृष्णादि दोषांनी ग्रासलेला भोक्ता हा अर्थ सांगितला जातो. तसा हा पुरुष तर नाही या शंकेचा निरास दुसरी व्युत्पत्ति सांगून करतात. त्यातून संगशून्य पुरुषांची कल्पना उपनिषदांमध्ये मांडली. '**असङ्गो ह्ययं पुरुषः**' (बृहदारण्यक ४।३।१५) '**पुरुषान्न परं किंचित् सा काष्ठा सा परा गतिः**' (काठक उप. ३.११) इति। '**दिव्यो ह्यमूर्तः पुरुषः सबाह्याभ्यन्तरो ह्यजः। अप्राणो ह्यमनाः शुभ्रो ह्यक्षरात्परतः परः।।**' (मुण्डकोपनिषद् २।१।२) – हा पुरुष संगरहित आहे. पुरुषाहून श्रेष्ठ काहीही नाही तीच मर्यादा तीच परम गती. त्या पुरुषाचे अवयवशून्यत्वही स्पष्ट शब्दात सांगितले आहे. हा दिव्य पुरुष बाहेरून आणि आतून अमूर्त अज, प्राणरहित, मनरहित, शुभ्र, अक्षरापलिकडचा आहे', अशाप्रकारे पुरुषसूक्तातील विश्व हेच शरीर असलेला पुरुष, यजुर्वेदादींमध्ये प्रजापति नाव मिळालेला, चयन महाव्रतामध्ये विराट् रूपाने पूजिला गेलेला पुरुषच (उपनिषदात) प्राण, आत्मा आणि ब्रह्म या शब्दांनी सांगितला जातो.

प्राण शब्दातील प्र उपसर्गयुक्त अन् धातूचा श्वसनक्रिया हा मुख्य अर्थ आहे. त्यामुळे श्वसनक्रियेद्वारा सर्व जीवांना साधारण अशी जीवनक्रिया सूचित होते. ह्या लक्षणाला आधारून प्राण ही संज्ञा बीज आणि त्याचे कार्य या दोहोंशीही

संबद्ध आहे. कार्य आणि कारण या दोन्ही रूपांनी उपलब्ध असलेल्या 'प्राण' या कल्पनेचा स्वीकार प्रजापति किंवा पुरुष या शब्दांपेक्षा ती अधिक उपयुक्त असल्यामुळे केला. प्रजापति किंवा पुरुष हा शब्द डोळे इत्यादि अवयव असलेल्या वस्तूचा वाचक आहे. चक्षुसरादिरहित अशा बीजावस्थेत वा कारणस्थितीत असलेल्या वस्तूला हे शब्द फारसे लागू पडत नाहीत. म्हणूनच प्राण या शब्दाचे वस्तुतत्त्व दाखवण्यासाठी अधिक उपयुक्तत्व शहाण्यांनी जाणून घ्यावे. प्राणशब्दाची बीज आणि त्याचे कार्य किंवा कारणवाचकता वेदामध्ये प्रसिद्ध आहे.

'प्राणो वै पिता, प्राणो मातरिश्वा, प्राणो रेत:' (ऐतरेय ब्राह्मण १०.६) इति। **'प्रजापतिश्चरति गर्भे अन्तरदृश्यमानो बहुधा वि जायते'** (अथर्ववेद १०।८।१३) **'एषो ह देव: प्रदिशोऽनु सर्वा: पूर्वो ह जात: स उ गर्भे अन्त:'** (शौनक संहिता ३२.४) **'प्रजापति: प्राण:'** (शतपथ ब्राह्मण ७।५।१।२१) - प्राण हाच पिता. प्राण वायु, प्राण म्हणजेच रेत. रेतरूप प्राणाचं प्रजापतित्व प्रजापतिमन्त्रांमध्ये सूचित होतं. जसे- प्रजापति गर्भात फिरतो- आत न दिसणारा अनेक प्रकारे निर्माण होतो. ह्या देवाने सर्वांना सांगावं तो गर्भात सर्वात आधी जन्माला आला. प्रजापति म्हणजे प्राण असे प्राणांचे आणि प्रजापतीचे ऐक्य, एकरूपता शतपथब्राह्मणात सांगितली आहे.

जीवयुक्त सृष्टीहून वेगळ्या अचेतन मानल्या गेलेल्या जगात- वस्तूंच्या जगातही- पृथ्वी आदि लोकांमध्येही कार्यकारण भावाचा पर्याय म्हणता येईल असा उत्पत्ति, स्थिती, नाश हा क्रम असतोच. तो प्राण कुणावरच अवलंबून नाही, तो स्वत:च्या अन्तर्गत शक्तीने सारे साध्य करतो. अशा आशयाची प्राणतत्त्वाला व्यक्त करणारी प्रतिमा अथर्ववेद (११.६) व तैत्तिरीय आरण्यक (३.१४) यात दोन सूक्तांमधून व्यक्त झाली आहे. ती विश्वाची अन्तर्गत शक्ति प्राणशब्दाने सांगितली आहे. तिथे असं म्हटलंय- प्राण हाच एक सर्वेश्वर आहे. पर्जन्य, अन्न, वायु, विराट्, प्रजापति, सूर्य, चन्द्र, आदि देवता म्हणजे तोच आहे. गर्भस्वीकार, धारण, प्रसूति ही कर्मे, ओषधि, पशु, मनुष्य आदींचे जन्म, जीवन, गति, स्थिति, बसणे, श्वास घेणे, आनंदी होणे आदि क्रिया ही त्याचीच कर्मे आहेत. पुन:पुन्हा जन्माला येणारा तो सर्व झोपलेले असतानाही जागा असतो. नेहमीच बदलणे या स्वरूपाचे कालचैतन्यही तोच आहे, हे एका विशेष मंत्रात सांगितले आहे. **'अन्तर्गर्भश्चरति देवतास्वा(?वि)भूतो भूत: स उ जायते पुन:। स भूतो भव्यं भविष्यत्, पिता पुत्रं प्र विवेशा शचीभि:।'**

देवतांमध्ये तो गर्भरूपाने फिरतो आणि आविर्भूत प्रकट होतो म्हणून त्याला 'भूत' झालेला असे म्हणतात. तोच पुन्हा जन्माला येतो तोच भूत, वर्तमान आणि भविष्य आहे. पिता पुत्रामध्ये स्वसामर्थ्याने प्रवेश करतो. तैत्तिरीय आरण्यकात त्याचा विशेषगुण सांगितला आहे– प्राण हाच अमृत आहे आणि मृत्युही तोच. सतत दक्ष असा तो एकमेव देव आहे. भार घेणारा म्हणून भर्ता आणि भरण करण्याजोगा, एकच पण अनेक प्रकारे असणारा आहे. प्रश्नोपनिषदाच्या दुसऱ्या प्रश्नात, अन्य उपनिषदांमध्ये सांगितलेला अर्थ संग्रह करून मांडला आहे.

संहिता, ब्राह्मण आणि उपनिषद् ग्रंथांमध्ये प्राणशब्द अनेक अर्थांनी योजलेला आहे. संदर्भानुसार त्यातील विशेष, वेगळा अर्थ जाणून घ्यावा लागतो. निश्चित अर्थ कळण्यासाठी आणि प्राणतत्त्वाची व्युत्पत्ति समजण्यासाठी आम्ही ते सर्व संदर्भ सात गटात विभागले आहेत. १) वायू आत घेणे आणि बाहेर सोडणे या प्रकारचा श्वसनक्रियारूप प्राण. २) प्राण–अपान इ. पाच प्रकार असलेला प्राण. इथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी– प्राण अपान आदींच्या संख्येबद्दल वैदिकग्रंथामधे मतभिन्नता आहे. कुठे फक्त प्राण–अपान, कुठे प्राण–अपान–समान असा मोजदादीत भेद आढळतो. प्राण–अपानादींचे गणन शरीरातील त्यांचे स्थान आणि कार्य हे लक्षात घेऊन केलेले आहे. ३) प्राण–अपानादींपैकी पहिला प्राण – ४) जीवात्मा– तो मन, वाणी, नाक, नेत्र, श्रोत्र अशी स्वत:ची रूपे प्रकट करतो. **'पञ्चधा विहितो वा अयं शीर्षन् प्राण: मनो वाक् प्राणश्चक्षु: श्रोत्रम्'** इति। (शतपथ ब्राह्मण ९।२।२।५) – हा मुख्य प्राणच पाच प्रकारे विभागलेला आहे – मन, वाक्, प्राण (नाक?) नेत्र आणि कर्ण, मन, वाक्, नेत्र इत्यादींसाठी प्राणशब्द खूप वेळा वापरला जातो, हे विसरू नये. ज्ञानेंद्रिये आणि कर्मेन्द्रिये यांचा पाच प्राणांच्या संदर्भात समावेश करायला हवा. संख्येच्या बाबतीत विशेष लक्ष द्यायला नको. या संदर्भात प्राणशब्दाने घ्राण–घ्राणेन्द्रिय–नाक याचाही निर्देश वाणी इत्यादींचा उल्लेख केला आहे. ५) वायु श्वसनक्रियेचा मुख्य आधार. तोच क्वचित् प्राणशब्दाने अन्यांपासून वेगळा म्हणून प्रशंसिला आहे. तोच शरीरात प्रवेश प्राण अपान आदि प्रकारांनी रहातो असे सांगितले आहे.

(✻ **'अयं वै प्राणो योऽयं पवते। यो वै प्राण: स आयु:। सोऽयमेक इवैव पवते। सोऽयं पुरुषऽन्त: प्रविष्टो दशधा विहित:')** (शतपथ ब्राह्मण ५।२।४।१०)

तो प्राण. जो प्राण तेच आयुष्य. तोच पवित्र करतो. तो एकटाच तोच पुरुषामध्ये प्रवेश करून दहा प्रकारचा होतो.

'सोऽयं (वायु:) पुरुषेऽन्त: प्रविष्टस्त्रेधा विहित: प्राणउदानो व्यान' इति (शतपथ ब्राह्मण ३।१।३।२०) तो वायु पुरुषात प्रवेश करून तीन प्रकारचा होतो. प्राण, उदान, व्यान (शतपथब्राह्मण ३।१।३।२०) ६) बाह्य जीवनाला शक्ति देणारा पदार्थ. उदा. सूर्य, पाणी, अन्न यांचा निर्देश विशेष संदर्भात प्राणशब्दाने होतो. ७) बाह्य आणि आध्यात्मिक या दोन्ही स्थानांच्या उपाधीने युक्त, बीज आणि त्याचे कार्य असा द्विरूप, व्यक्त आणि अव्यक्त या दोहोंमध्येही समानपणे असलेला, क्रियाशक्तीने व्यक्त होणारा परमार्थ पदार्थ म्हणजे प्राण. तोच वर अथर्ववेद, तैत्तिरीयआरण्यक यात मंत्रद्वयाने प्रशंसिला आहे. त्याचाच उपनिषदांमध्ये ब्रह्म आणि आत्मा पदांनी निर्देश असतो म्हणूनच उपनिषदांमधील प्राणपर असलेल्या वाक्यांचा ती परमार्थपर असल्याचा निश्चय करता येतो. म्हणून 'अत एव प्राण:' 'प्राणस्तथानुगमात्' (ब्रह्मसूत्र १।१।२३,२८) म्हणूनच प्राण... तशा अनुमानाने प्राण... इत्यादि ठिकाणी व्यासदर्शनात– प्राणपदार्थातून परमात्म्याचाच उल्लेख करतात.

शतपथब्राह्मणात डोळ्यातील पुरुषाचे मण्डलरूपाने ऐकात्म्य सांगून तोच प्राण असे म्हटले आहे.

'एष उ एव प्राण:। एष हीमा: सर्वा: प्रजा: प्रणयति। तस्यैते प्राणा: स्वा:। स यदा स्वपिति, अथैनमेते प्राणा: स्वा अपियन्ति। तस्मात्स्वाप्यय:। ... स एष एक: सन् प्रजासु बहुधा व्याविष्ट:' (शतपथ ब्राह्मण १०।५।२।१४,१५)

अर्थ – हाच तो प्राण आहे. तो सर्व प्रजेवर प्रेम करतो. प्राण हे त्याचे स्वत:चे आहेत. तो जेव्हा झोपतो तेव्हा हे प्राण दूर जातात. म्हणून स्वप्यय:. तो एक असूनही सर्व प्रजेत प्रवेश करतो. प्राण शब्दाने येथे अमर्त्य आत्म्याचा निर्देश आहे आणि जीवात्मा आणि परमात्मा यांचा अभेद 'एक: सन्' इत्यादि वाक्यांतून साधलेला आहे.

ऐतरेय आरण्यकात प्राणाला सर्वात्मक पुरुष म्हटलं आहे. तोच अन्न आणि अन्नाद आहे असे बाह्य आणि अध्यात्मदृष्ट्या दाखवून दिले आहे. त्याने प्राण नावाच्या ब्रह्माने सर्व पुरुषांमध्ये प्रवेश केला आहे असे सांगून तोच विश्वरूप प्राण शरीर धारण करणारा 'उक्थ' आहे असे मानून तोच उपास्य आहे, असे ठरवले आहे.

'प्राण उक्थमित्येव विद्यात्। तं देवा अब्रुवन्। त्वमुक्थमसि। त्वमिदं सर्वमसि' इत्यादिना। 'एवं सर्वाणि भूतान्या पिपीलिकाभ्य: प्राणेन बृहत्या विष्टब्धानीति' इति। 'स एषोऽसु: स एष प्राण:। स एष भूतिश्चाभूतिश्च।.... .... स एष

मृत्युश्चैवामृतं च। .... अमर्त्यो मर्त्येना सयोनिरिति। एतेन हीदं सर्वे सयोनि। मर्त्यानि हीमानि शरीराणीं३। अमृतैषा देवता'। (ऐतरेय आरण्यक २।१।६, ८)

अर्थ - प्राण 'उक्थ' आहे असे जाणावे. त्याला देव म्हणाले 'तू उक्थ आहेस! तूच हेच सर्व आहेस' इत्यादीनि. तोच सर्व भूतांमध्ये प्रविष्ट झाला आहे असे सांगतात. मुंगीपासून सर्व प्राणिमात्रात प्राणाने प्रवेश केला आहे. तो मर्त्य शरीरातील अमर्त्य आहे. असे सांगतात. तो हा प्राण आहे. तोच समृद्धि आणि असमृद्धि... हा मृत्यु आहे आणि अमृतही. तो अमर्त्य असून मर्त्यापासून निर्माण होतो. यामुळे सर्वांचा जन्म होतो. ही शरीरे मरणशील आहेत. ही देवता अमृत आहे.

कौषीतकी उपनिषदात हे प्राणतत्त्व प्रमुखत्वाने वर्णिले आहे. ऐतरयारण्यकातील आत्मषट्कामधे प्राणशब्दाच्या जागी आत्मा शब्द विचारात घेतला तसं येथे केलेलं नाही. प्रज्ञात्मा या शब्दाने हे उपनिषद् प्राणाचाच निर्देश करते. ऐतरेयारण्यकातला प्राणविषयक उपदेशाचा मागोवा घेत सांगते-

'अथ खलु प्राण एव प्रज्ञात्मेदं शरीरं परिगृह्योत्थापयति तस्मादेतदेवोक्थमुपासीत' (कौषीतकी उप. ३.३) इति। **'तद्यथा रथस्यारेषु नेमिरर्पितः, नाभावरा अर्पिताः, एवमेवैता भूतमात्राः प्रज्ञामात्रास्वर्पिताः, प्रज्ञामात्राः प्राणे अर्पिताः। स एष प्राण एव प्रज्ञात्माऽऽनन्दोऽजरोऽमृतः। न साधुना कर्मणा भूयान्। नो एवासाधुना कनीयान्।... ... एष सर्वेशः। स म आत्मेति विद्यात्'** (कौषीतकी ३.८)

अर्थ - प्राण हाच प्रज्ञात्मा आहे. हाच हे शरीर स्वीकारून वर उचलतो म्हणून उक्थाची उपासना करावी हाच परमार्थ अशा अभिप्रायाने उपसंहार करतात. ज्याप्रमाणे रथाचे आरे धावेमध्ये आणि नाभी (तुंब्यामध्ये) मधे आरे गुंतलेले असतात अशाच प्रकारे सर्व भूते प्रज्ञामात्रांमध्ये समाविष्ट असतात आणि प्रज्ञामात्रा प्राणांमध्ये अर्पित असतात. हा प्राणच प्रज्ञात्मा, आनंद, अजर, अमृत आहे. तो चांगल्या कर्माने मोठा किंवा वाईट कर्मानी हलका होत नाही. हा सर्वेश तो माझा आत्मा आहे, असे जाणावे. येथे प्रज्ञामात्रांचे आणि भूतमात्रांचे ऐक्य प्रज्ञानात्मा, सर्वांच्या नाभिस्थानीय असलेल्या अमृत प्राणांमध्ये विस्ताराने सांगितले आहे. प्रज्ञामात्रा म्हणजे वाणी, घ्राण, चक्षु, कान, जीभ, हातपाय, जननेंद्रिय, शरीर, मन, भूतमात्रे नामगन्धरूपशब्दरस कर्मसुख दुःख आनंद, रति, प्रजनन इ. गोष्टी जाणून घेण्याची इच्छा करणारी असतात, हे येथे निरूपित केले आहे. भूतमात्रांशी प्रज्ञामात्रा कायमच्या बरोबर असतात, प्रज्ञामात्रा

प्रज्ञेशी अशी उपपत्ति मांडून त्या उभयविध मात्रांचे प्राणांमध्ये ऐक्य निश्चित केले आहे.

छांदोग्य उपनिषदात संवर्गविद्येमध्ये रैक्व आणि जानश्रुती यांच्या संवादात, अग्नि, सूर्य आणि जल यांचे वाणी, नेत्र, कर्ण आणि मन यांचे विलयस्थान संवर्ग नावाचे तत्त्व शरीरात प्राणरूपाने आणि बाहेर वायुरूपेण निर्दिष्ट केले आहे. तोच संवर्ग प्राणतत्त्वाच व्यक्त करते. या आणि तलवकार ब्राह्मणोपनिषदात कापेय आणि काक्षसेनी यांच्या कथेमध्ये भिक्षेसाठी आलेल्या ब्रह्मचाऱ्याने विचारले 'भुवनाचा रक्षणकर्ता, अग्नि, आदित्य यांना ग्रासून टाकणारा एक देव कोण?' त्यांनी 'तो प्राण आहे' असे सांगितले.

'आत्मा देवानामुत मर्त्यानां हिरण्यन्तोरपसो न सूनु:। महान्तमस्य महिमानमाहुरनद्यमानो यददन्तमत्ति।। इति। ...... बहुधा ह्येवैष निविष्टो यत्प्राण:' (तैत्तिरीय ब्राह्मण उपनिषद ३।१।२) - तो देवांचाही आत्मा आहे आणि मर्त्यांचाही. त्याचे दात सोन्याचे आहेत. तो पाण्याचा पुत्र आहे. त्याचा मोठाच महिमा सांगितला आहे. तो खाल्ला जात नाही पण दात नसूनही खातो.... अनेक प्रकारे प्रवेश करणारा तो प्राण आहे. हेच वाक्य छांदोग्युपनिषधात पाठभेदाने संवर्गविद्येत आले आहे.

छांदोग्य उपनिषदात (५.१-२) पुन्हा प्राणाबद्दलची ज्येष्ठत्वश्रेष्ठत्व गुणयुक्त विद्या सांगितली तीच शाङ्खायन आरण्यक (९) आणि बृहदारण्यकात (६.१) दिसते. वाणी, चक्षु, कर्ण, मन, रेत यांची शरीरातील स्थिती प्राणांवर अवलंबून असते. तो प्राण शरीरातून जायला निघाल्यावर चक्षुरादींचे शरीरात जीवित रहाणे अशक्य होते. या गोष्टीचे प्रतिपादन केले आहे. डोळे इत्यादी प्राणावर अवलंबून असल्यामुळे त्यांना प्राणही संज्ञा लागू पडते. कुत्रा, पक्षी, कीट, पतंग, कृमिपर्यंत सर्वांमध्ये प्राण रहातो. ते जे अन्न खातात ते सर्व याचेच अन्न, त्या सर्व अन्नांचा हाच भोक्ता असे सांगितले आहे. सर्व प्राण्यांमध्ये समानरूपाने रहाणारा प्राण एकच हे तत्त्व, 'सर्व भूतांमधील मी प्राण आहे' हे उपासनेसाठी सांगितले आहे. जर अशी प्राणविद्या जाणणारा आपत्तीत एखादं निषिद्ध अन्न खाईल तर तो पापाने लिप्त होत नाही. पुढे प्राणविद्येचे फळ अंती सांगितले आहे **'न ह वा एवंविदि किञ्चनानन्नं भवति।'** (छांदोग्य ५।२।१) जो प्राणाला जाणतो त्यासाठी कोणतेच अन्न अयोग्य अन्न होत नाही. **'न ह वास्य अस्यानन्नं जग्धं भवति नानन्नं प्रतिगृहीतम्'** (बृहदारण्यक ६।१।१४) त्याच्याकडून कोणतेही अन्न हे अनन्न- अयोग्य अन्न हे अनन्न खाल्ले जात नाही, त्याने अनन्न स्वीकारले असे

होत नाही.

देवासुरसंग्रामाच्या कथेच्या निमित्ताने प्राण विषयसंगाने पराभूत होत नाही; हा अभिप्राय धर्म आणि अधर्म यांच्याबद्दल विवेकज्ञानासाठी छांदोग्य (१.२), बृहदारण्यक (१.३), आणि तवलकार ब्राह्मणोपनिषदात (१.१८.५) प्रकट केला.

येथे हा एक भेद प्रकट केला आहे. नेत्र इ. इन्द्रियांची चांगलं वाईट, स्वादिष्ट अनास्वाद्य, सुगंधी-दुर्गन्धी, रुचकर आणि बेचव अशी भेदबुद्धि आसक्तीमुळे पापाने पुरुषाला दूषित करते-तो पापी होतो. हा पापाचा संग म्हणजेच मृत्यु. आसक्तिदोषापासून मुक्त असा प्राणच सर्व इन्द्रियांना उपकारक होतो. त्या प्राणाला प्रमुख नियंत्रक म्हणून स्वीकारून इन्द्रियांवर जय मिळवून व्यवहार करणारा पुरुष मृत्यूला ओलांडून जाते. (जन्ममृत्यूच्या चक्रातून बाहेर पडतो.)

तवलकार ब्राह्मणोपनिषदात प्राणच्या स्वरूपाचे विवरण करून भेद समजावून दिला. तो असा-

'तद्ध सात्यकीर्ता आहु:। यां वयं देवतामुपास्महे, एकमेव वयं तस्यै देवतायै रूपं गव्यादिशाम:, एकं वाहने, एकं हस्तिति, एकं पुरुषे, एकं सर्वेषु भूतेषु। तस्या एवेदं देवतायै सर्वे रूपमिति। तदेतदेकमेव रूपं प्राण एव। यावद्ध्येव प्राणेन प्राणिति तावद्रूपं भवति यद्रूपं भवति। तदथ यदा प्राण उत्क्रामति दार्वेवेव भूतोऽनर्थ्य: परिशिष्यते न किंचन रूपम्। तस्यान्तरात्मा तप:। तस्मात्तप्यमानस्योष्णतर: प्राणो भवति। तपसोऽन्तरात्माऽग्नि:। स निरुक्त:। तस्मात्स दहति' (तलवकार ब्राह्मण उपनिषद १।१८।५)

अर्थ - ते सात्यकीर्त सांगतात - ज्या देवतेची आम्ही उपासना करतो. एक तिचे रूप वाणीने सांगतो. एक रूप पाहतात घोड्यात, एक हत्तीमध्ये एक पुरुषामध्ये आणि एक सर्व प्राणिमात्रांमध्ये आहे. हे सर्व रूप त्या देवतेचे आहे. ते हे एकमेव रूप प्राण हेच आहे. जोपर्यंत प्राणाने श्वास घेत असतो, तोपर्यंत तो ज्या रूपाचा असतो त्या रूपात रहातो. त्या रूपातून- व्यक्तीतून प्राण निघून गेल्यावर ती व्यक्ति म्हणजे केवळ लाकूड-निष्प्राण वस्तु उरते. त्याचा अन्तरात्मा तप (तप्त-उष्ण) असतो. म्हणून तप करणाऱ्याचा प्राण अधिक उष्ण असतो. तपाचा अन्तरात्मा अग्नि. त्याची निरुक्ति-व्याख्या अशी- म्हणून तो जळतो. हे वैश्वानरविद्येतील अग्निरहस्यात सांगितलेल्या पुरुषाच्या आत असलेल्या वैश्वानर अग्नीच्या सिद्धान्ताला बळकटी देणारे आहे. तेथे सांगितले आहे.

'स एषोऽग्निर्वैश्वानरो यत्पुरुष:। स यो हैतमेवग्निं वैश्वानरं पुरुषविधं पुरुषेऽन्त:

प्रतिष्ठितं वेद। अप पुनर्मृत्युं जयति' (शतपथ ब्राह्मण १०।६।१।११)

अर्थ - हा वैश्वानर अग्नि म्हणजे तो पुरुष आहे. जो या वैश्वानर अग्नीला पुरुषामध्ये प्रतिष्ठित असल्याचे जाणतो तो अपमृत्यूवर विजय मिळवतो. पुढे तवलकारब्राह्मणोपनिषदात प्राणाचा अत्यंत संबंधी वायु हे अधिदैवत आणि त्याचा अन्तरात्मा विद्युत् असे विधान आहे.

पुरुषामध्ये प्रवेश केलेल्या प्राणाचे जीवात्म्याचा वास- त्याचे स्थान मुख्यत: मस्तक आणि सर्वांगे आहे.

'**प्राणो हि वा अङ्गानां रस:। तस्माद्यस्मात्कस्माच्चाङ्गात् प्राण उत्क्रामति तदेव तच्छुष्यति**' (बृहदारण्यक १।३।१९) '**एतमु एवाङ्गिरसं मन्यन्ते, अङ्गानां यद्रस:**' (छांदोग्य १.२.१०) '**ऊर्ध्वं त्वेवोदसर्पत् तच्छिरोऽश्रयत।.... ता एता: शीर्षन् श्रिय: श्रिता: चक्षु: श्रोत्रं मनो वाक्प्राण:**' (ऐतरेय आरण्यक २।१।४)) '**पञ्चधा विहितो वा अयं शीर्षन् प्राण:, मनो वाक् प्राणश्चक्षु: श्रोत्रम्**' (शतपथ ब्राह्मण ९।२।२।५) '**तदाहु: प्रादेशमात्राद्वा इत एता एकं भवन्ति। अतो ह्ययं प्राण: स्वर्य उपर्युपरिवर्तन इति**' (तवलकार ब्राह्मण ३।६।५) '**यस्त्वेतमेवं प्रादेशमात्रमभिविमानमात्मानं वैश्वानरमुपास्ते स सर्वेषु लोकेषु सर्वेषु भूतेषु सर्वेष्वात्मस्वन्नमत्ति**' (छांदोग्य उपनिषद ५।१८।१) '**तथा तु व एनान् (वैश्वानरावयवान्) वक्ष्यामि यथा प्रादेशमात्रमेवाभिसंपादयिष्यामीति। स होवाच मूर्द्धानमुपदिशन्, एष वा अतिष्ठा वैश्वानर इति। चक्षुषी उपदिशन्नुवाच, एष वै सुतेजा वैश्वानर इति। नासिके उपदिशन्नुवाच, एष वै पृथग्वर्त्मा वैश्वानर इति। मुख्याकाशमुपदिशन्नुवाच, एष वै बहुलो वैश्वानर इति। मुख्या अप उपदिशन्नुवाच, एष वै रयिर्वैश्वानर इति। छुबुकमुपदिशन्नुवाच, एष वै प्रतिष्ठा वैश्वानर इति। स एषोऽग्निर्वैश्वानरो यत्पुरुष:**' (शतपथ ब्राह्मण १०।६।१।१०,११)

अर्थ - प्राण हाच अंगाचा रस म्हणून ज्या कोणत्या अंगातून प्राण निघून जातो ते सुकून जाते. याचाच अनुवाद इतरत्र आला आहे. यालाच अंगाचा रस म्हणून अंगीरस म्हणतात याचे शीर्षण्यस्थानही सांगितले आहे. चेहरा, मुख यावरच नेत्र, कान इ. प्रमुख अवयव निर्मिलेले असल्यामुळे शिराचे स्थान प्रमुख आहे. हे लक्षात घेऊन श्रुती आपली संमती प्रकट करतात. ते वर सरकले. त्याने शिराचा आश्रय केला. नेत्र, कर्ण, मन, वाक् आणि प्राण ही शिराची श्री-वैभव आहे. हे डोके पाच भागात विभागलेले आहे. प्राण, मन, वाक्, चक्षु आणि श्रोत्र. आपापल्या परिणामानुसार एकत्र येऊन त्या एक होतात. म्हणून हा प्राण वरवर जातो, त्याचे वेगवेगळ्या वरच्या शक्तीत रूपांतर होते.

जो परिच्छिन्न, परिमित अशा भावनेने सर्वांमध्ये विद्यमान अशा वैश्वानर आत्म्याची उपासना करतो तो सर्व लोकात, सर्व प्राणिमात्रात सर्व आत्म्यांमध्ये अन्न खातो. येथे प्रादेशमात्र स्थान– परिमाणयुक्त जागा शिर हेच मानावे. मी आता वैश्वानर आत्म्याचे अवयव सांगतो– मी परिमिताचीच प्राप्ती करून घेतो. त्याने डोक्याचा निर्देश केला– हा श्रेष्ठ वैश्वानर आहे. डोळ्याचा निर्देश करून म्हणाला 'हा तेजस्वी वैश्वानर आहे' नाकपुड्या दाखवून म्हणाला 'हा दोन वेगळ्या मार्गांचा वैश्वानर आहे.' मुख्य आधारभूत आकाशाला उद्देशून तो म्हणाला, 'हा खरोखर व्यापक वैश्वानर आहे.' पाण्याला दाखवून म्हणतो, 'हा ऐश्वर्ययुक्त वैश्वानर आहे.' हनुवटीकडे निर्देश करून म्हटले– 'हा प्रतिष्ठारूप वैश्वानर आहे' तो वैश्वानर अग्नि तो म्हणजे पुरुषच आहे. येथे 'प्रादेशमात्र' शब्दाने डोक्यापासून हनुवटीपर्यंतचा मस्तकाच्या भागाचा निर्देश होतो. याचे अधिक स्पष्टीकरण ब्रह्मसूत्राच्या शांकरभाष्यात वैश्वानराधिकरणात (१.२, २४।३२) पहावे.

अथर्वब्रह्माचा हिरण्मयकोश तेजाने आवृत (वेढलेला) स्वर्ग म्हणजे शिर असे अथर्ववेदात ब्रह्मसूक्तात वर्णन आहे तेच प्राणाचे स्थान असे तेथेच म्हटले आहे. **'तद्वा अथर्वण: शिरो देवकोश: समुब्जित:। तत्प्राणो अभि रक्षति शिरो अन्नमथो मन:।।'** (१०.२.२७) इति। यथा – **'स योऽयं मध्ये प्राण: एष एवेन्द्र:'** (शतपथ ६।१।१।२) **'अथेममेव नाप्नोत् योऽयं मध्यम: प्राण:'** (बृहदारण्यक १।५।२१) **'अयं वाव शिशुर्योऽयं मध्यम: प्राण:'** (बृहदारण्यक २।२।१)

अर्थ – ते अथर्वाचे शिर देवकोष निर्माण झाला. तो प्राण, शिर, अन्न आणि मन यांचे रक्षण करतो. प्राण मध्यभागात वा हृदयात रहातो असेही वर्णन येते. जो मध्यम प्राण तोच इन्द्र. मध्यम प्राण (मृत्यूला) प्राप्त करू शकत नाही. मध्यम प्राण म्हणजे एक बालकच. हे मध्यम स्थान मस्तकात आहे उरात की हे निश्चित सांगता येत नाही. मध्यम याचा अर्थ शरीरात राहणारा एवढाच अर्थ होऊ शकतो. क्वचित् प्राणाचं स्थान हृदय हे सांगितले आहे. **'प्राणो हृदये'** (तैत्तिरीय ब्राह्मण ३।१०।८।५) प्राण हृदयात असतो. प्राण म्हणजे जीव नावाचा सर्व प्राण्यांच्या शरीरात राहणारा, सूक्ष्म, शरीराहून वेगळा, इन्द्रियांपलिकडचा, शरीर म्हणजे प्रकट झालेले प्रत्यक्ष दिसणारे, इंद्रियांनी कळणारे असे म्हटले जाते. श्रुति सांगते–

'तिर इव ह्यशरीरम्। अशरीरो हि प्राण:। अथ यदुच्चैस्तच्छरीरम्।

तस्मात्तदाविः। आविर्हि शरीरम्' (ऐतरेय आरण्यक २।३।६)

अर्थ – अशरीर असते हे अदृश्यच असते. प्राण अशरीर असतो. जे उंचावर असते ते शीर म्हणून ते प्रकट असते. शरीर आविर्भूत होते. प्राण शरीरात राहतो ही गोष्ट सामशब्दाच्या आधाराने स्पष्ट केले आहे. हा प्राण साम (सा=वाक् आणि अम=प्राण) आहे. तेच त्याचे सामत्व.

'एष उ एव साम.... यद्धेव समः प्लुषिणा समो मशकेन समो नागेन सम एभिस्त्रिभिर्लोकैः समोऽनेन सर्वेण तस्माद्वेव साम' (बृहदारण्यक उपनिषद १।३।२२) तो प्राण म्हणून माशी, डास, हत्ती आणि हे तिन्ही लोक यांना समानच आहे. या सर्वांबरोबर तो समान असतो म्हणूनच तो साम आहे.

बृहदारण्यक (१.५.२१) आणि तलवकार ब्राह्मणोपनिषदात (२।४।२) दैवतांमध्ये वायू हे अग्नि आदित्य चन्द्र आणि दिशा यांचे उगम आणि लयस्थान आणि शरीराबद्दल– शरीरासंबंधाने, मन डोळा आदि इंद्रियांचे उगम आणि लयस्थान वायू हेच आहे असे म्हणून अध्यात्म आणि अधिदैवत यामध्ये वायुप्राणरूप एकच देवता हा अर्थ सांगितला आहे. बृहदारण्यकात प्राणाचा विशेष सांगितला– नाम, रूप आणि कर्म यांनी मिळून सर्व जग बनले आहे असे प्रतिपादन करून ह्या तीनही एकत्र असलेले कार्यशक्तिरूप आत्मा हे एकच तत्त्व असा उपसंहार केला. आत्मा म्हणजे प्राण असा प्राणशब्दाने त्याचा निर्देश केला. **'आत्मा एकः सन्नेतत्त्रयम्। तदेतदमृतं सत्येन छन्नम्। प्राणो वा अमृतम्। नामरूपे सत्यम्। ताभ्यामयं प्राणश्छन्नः**' (बृहदारण्यक १.६.३) – आत्मा एकच असून या तीन गोष्टी भाग आहेत. ते अमृत सत्याने झाकलेले आहे. प्राण हेच अमृत. नाम आणि रूप हे सत्य. त्या दोघांनी हा प्राण झाकून झाकोळून टाकला आहे. 'आत्मा उ' म्हणजे आत्माच.

छांदोग्य उपनिषदात पुढे पुढे अधिकाधिक सूक्ष्म होत जाणारी तत्त्वे ब्रह्म म्हणून उपासना करण्याजोगी म्हणून सांगितली आणि शेवटी प्राणच सर्वांहून श्रेष्ठ आहे असे विधान केले. नाम, वाक्, मन, संकल्पन, चित्त, ध्यान, विज्ञान, बल, अन्न, पाणी, तेज, आकाश, स्मर, आशा ही ती तत्त्वे. याचा उपसंहार असा केलाय. **'यथा वा अरा नाभौ समर्पिताः, एवमस्मिन् प्राणे सर्वं समर्पितम्। प्राणः प्राणेन याति। प्राणः प्राणं ददाति। प्राणाय ददाति। प्राणो ह पिता प्राणो माता प्राणो भ्राता प्राणः स्वसा प्राण आचार्यः प्राणो ब्राह्मणः**' (छांदोग्य ७।१५।१) – ज्याप्रमाणे चाकाचे आरे तुंब्यात गोवलेले असतात, त्याप्रमाणे प्राणात सर्व अर्पिलेलं असतं. प्राण प्राणाने जातो (प्राणाबरोबर) प्राण प्राणाला

देतो. प्राणाला देतो. प्राण हाच पिता, माता, भाऊ, बहीण, आचार्य आणि ब्राह्मण आहे. मातापित्यांच्या संदर्भाने प्राप्त कर्म-अकर्म विवेकासाठी त्यांचे प्राणत्व कर्तव्य अकर्तव्यांसाठी प्रोत्साहित करणारे तत्त्व असे समर्थन केले आहे. पितृहत्या किंवा मातृहत्या इत्यादी दोषही प्राणत्वधर्मा (चैतन्य)तून प्रोत्साहन मिळवतात. सर्वांचा कर्ता प्राणच आहे.

बृहदारण्यकात ब्रह्मवेत्त्यांच्या सभेत विदग्ध शाकल्याने याज्ञवल्क्याला पुन्हापुन्हा देवांच्या संख्येबद्दल प्रश्न विचारले. तेव्हा अगदी शेवटी निश्चित उत्तर दिले- एकच आहे देव- **'प्राण इति। स ब्रह्म त्यद् इत्याचक्षते।'** (बृहदारण्यक ३।९।९) - तो एक देव प्राणच आहे. तोच ब्रह्म किंवा त्यत् म्हटला जातो. त्याबरोबर सुसंगत असे उषस्ति चाक्रायण म्हणाला, **'सर्वाणि ह वा इमानि भूतानि प्राणमेवाभिसंविशन्ति प्राणमभ्युज्जिहते'** (छांदोग्य १।११।५) सर्व प्राणिमात्रे प्राणापासून जन्माला येतात आणि प्राणातच लय पावतात. अभिसंविशन्ति म्हणजे प्रलय पावतात. उज्जिहते म्हणजे उत्पन्न होतात. सर्व प्राणिमात्रांना समान असणारी प्राण नावाची शक्ती सर्व चराचर सृष्टीच्या उत्पत्ति, स्थिती आणि लय यांचे कारण आहे; असा अभिप्राय आहे.

प्राणविद्यांमध्ये हा सिद्धांत प्राधान्याने प्रस्थापित केला आहे- जो असताना मन नेत्र इत्यादींच्या क्रियांसह सर्व शरीर जीवनक्रिया शक्य होतात आणि जो नसताना त्या क्रिया बंद पडतात, थांबतात तो प्राण. म्हणूनच प्राणसंवादात, वाणी, नेत्र, श्रोत्र, मन आणि रेत प्राणाला म्हणाले, **'मा भगव उत्क्रमीः। न वै शक्ष्यामस्त्वदृते जीवितुमिति'** (बृहदारण्यक उपनिषद ६।१।१३) 'भगवंत तू निघून जाऊ नका. बाहेर पडू नका. तुझ्याशिवाय आम्ही जिवंत राहू शकणार नाही. तसेच अध्यात्म-देहासंबंधी-दोन प्रकारचं कार्य निश्चित केलं आहे- प्रवर्तित करणारे आणि होणारे. मन आदींना प्रवृत्त करावे लागते. प्राण प्रवर्तक असतो, स्वतंत्र असतो. तेच स्वतंत्र तत्त्व अधिदैवताबद्दलही तेथे तेथे समजावले आहे. प्राण हा स्वतंत्र प्रवर्तक त्याच्या ताब्यातच शरीराची स्थिती, तो मरणारा नाही पण शरीर मर्त्य आहे.

※ वैदिक विचारसरणी 'आत्मा' शब्दापर्यंत पोहोचली त्याची कारणे-

स्वतंत्र, संगदोषापासून मुक्त, अंतिम परमार्थसत्य उपनिषदे 'आत्मा' शब्दाने सांगतात. उपनिषदांमध्ये आत्मा शब्दाला पराकाष्ठेचे महत्त्व प्राप्त झाले. उपनिषदांपूर्वीच्या वैदिक ग्रंथांमध्ये 'आत्मा' शब्दाला तसे माहात्म्य दिसत नाही. तेथे पूर्वी 'पुरुष' शब्द 'परमार्थ' विद्येच्या मुळाशी होता ता प्रजापतीचा

पर्याय शब्द होता– महत्त्वाचा होता. ब्रह्म शब्दही ऋग्वेदापासून क्रमश: पारमार्थिक विचाराला पुष्टि देत अथर्ववेदापर्यंत पारमार्थिक प्रौढ अर्थाला प्राप्त झाला. ऋग्वेदात बीजरूपाने असलेला प्राणशब्द अथर्ववेदापासून हळूहळू विकास पावून आरण्यक काळापर्यंत मोठ्याच आध्यात्मिक उंचीला पोहोचला– अर्थश्रीमंत झाला. आत्मा शब्द मात्र उपनिषदांमध्ये पहिल्यांदा येथे उपयोगात आला आणि परमार्थ विचाराचा श्रेष्ठ वाचक ठरला, हा शब्दाचा विशेषच म्हणायचा. अथर्ववेद, तैत्तिरीय ब्राह्मण, शतपथ ब्राह्मण या ग्रंथामध्ये आत्मशब्दाचा पारमार्थिक अर्थ सांगणारी बरीच विधाने आढळतात.

'अकामो धीरो अमृत: स्वयंभू रसेन तृप्तो न कुतश्चनोन:। तमेव विद्वान्न बिभाय मृत्योरात्मानं धीरमजरं युवानम्।।' (अथर्ववेद १०.८.४४) **'येन सूर्यस्तपति तेजसेद्धः। पिता पुत्रेण पितृमान् योनियोनौ। नावेदविन्मनुते तं बृहन्तम्। सर्वानुभूमात्मानं संपराये।। एष नित्यो महिमा ब्राह्मणस्य। न कर्मणा वर्धते नो कनीयान्। तस्यैवात्मा पदवित्तं विदित्वा। न कर्मणा लिप्यते पापकेन।।'** (तैत्तिरीय ब्राह्मण ३।१२।९।७) **'स आत्मानमुपासीत मनोमयं प्राणशरीरं भारूपमा-काशात्मानं कामरूपिणं मनोजवसं सत्यसंकल्पं सत्यधृतिं सर्वगन्धं सर्वरसं सर्वा अनु दिश: प्रभूतं सर्वमिदमभ्याप्तमवाक्कमनादरम्'** (शतपथ ब्राह्मण १०।६।३।२) – अकाम, धीमान्, अमृत, स्वयंजात, रसाने तृप्त, कुठेच कमरतात नसलेला तो, त्याला जाणणारा विद्वान आपल्याला आत्म्याला बुद्धिमान, जरा-शून्य, युवक माणूस, मृत्यूला भीत नाही. ज्यामुळे तेजाने समृद्ध असा सूर्य तापतो. प्रत्येक योनीत पुत्रामुळे पिता पिता ठरतो. वेद न जाणणारा त्याला महान म्हणत नाही. सर्वांना आत्मा सतत कळतो. ब्राह्मणाचा महिमा सदैव आहे. तो कर्माने मोठा होत नाही की लहान होत नाही. आत्म्याला जाणून तो पापकर्मानेही लिप्त होत नाही. मनोमय, प्राणाचं शरीर असलेल्या, प्रकाशरूप, आकाशात्मक, हवे ते रूप घेणारा, मनासारखा वेग असणारा, सत्यसंकल्पयुक्त, सत्यधैर्ययुक्त, सर्व वासांनी युक्त, सर्व रसांनी पूर्ण, सर्व दिशांमध्ये भरलेले, हे सर्व मिळालेले, नि:शब्द, निर्भयपणे अशा आत्म्याची त्याने उपासना करावी. ब्रह्मसूक्ताच्या शेवटी म्हटलेला अथर्ववेदाचा मन्त्र उपनिषद्‌काळाची छाया धारण करीत आहे. तैत्तिरीय ब्राह्मणातलं वचन वैश्वसृजचयनाचे वचन ब्राह्मणकाळाचा समाप्तिक्षण सुचवतात, कारण हे ब्राह्मणांच्या अंतिम भागात येते. म्हणूनच तैत्तिरीय ब्राह्मणातील या प्रकरणाचा अनुवाद करणारे वैश्वसृजसत्र ताण्ड्यब्राह्मणाच्या अखेरच्या भागात म्हटले (आले) आहे. शतपथब्राह्मणातील वचन

अग्निरहस्यातील शाण्डिल्यविद्यारूपाने येते म्हणून त्याच्या उपनिषदकालिकत्वावर शंकेला अवसरच नाही कारण अग्निरहस्याचा उपनिषदपक्षात समावेश करणे शक्य आहे.

प्राणशब्दापेक्षा आत्माशब्दाबद्दल उपनिषदांना जास्त आदर वाटतो. म्हणूनच प्राणशब्द श्वसनक्रियेसाठी उपयुक्त वायुतत्त्वासाठी बहुधा वापरलेला दिसतो. वायु हे नित्य असे मूलतत्त्व नाही. कारण उत्पत्ति आकाशापासून झालेली आहे ही विद्या, हे ज्ञान उपनिषदांना झाले. **'आनीदवातं स्वधया तदेकम्'** (ऋग्वेद-१०।१२९।२)

येथे ऋग्वेदात प्रथमतत्त्वाचे वायूशिवाय अस्तित्व असल्याचे सांगितले आहे. शिवाय शरीराला धारण करणारा जीवनशक्तिरूप प्राण कार्यात्मक आहे, नित्य नव्हे असे छांदोग्यउपनिषदात स्पष्ट केले आहे. **आपोमय: प्राण: न पिबतो विच्छेत्स्यते** (छांदोग्य ६।७।१) प्राण हा जलमय आहे. पाणी न पिणाऱ्याचा प्राण विच्छिन्न होतात. शिवाय आकाशापर्यंतचा भूतविस्तार, औषधि, वनस्पति, प्राण्यांचे प्रकार, दगडरत्ने आदि पदार्थ कारणशक्तीने युक्त असतात. त्यांचा निर्देश प्राण शब्दाने सहजपणे करता येणार नाही. त्यांच्यामध्ये असलेली शक्ती 'प्राण' या शब्दाने निर्देश करण्यासारखी नाही हे वरवर पाहिलं तरी लक्षात येतं. हे सर्व लक्षात घेऊनच 'आत्मा' शब्दाचा स्वीकार केला, असे अनुमान करणे शक्य आहे.

विश्वात्मक पारमार्थिक सत्यासाठी 'आत्मा' शब्दाचा उपयोग विशेषकरून उपनिषदात केल्याचे सांगितले आहे. म्हणूनच उपनिषदांना मूलभूत 'आत्मदर्शन' असे म्हणतात. 'आत्मदर्शन' रूप पर्यवसान वेदांच्या ऐतिहासिक परंपरेचे फळ असे निश्चितपणे म्हणता येईल. विश्वतत्त्व हे पुरुषरूप, प्राणरूप, सत्यस्वरूप असे एकमेव वेदांनी पाहिले. उपनिषदांपूर्वीच्या वाङ्मयात आत्माशब्द पुरुष, प्राण, अस्मद्-मी-आम्ही हा उत्तमपुरुष या अर्थी, स्वरूप या अनेक अर्थांनी वापरलेला होता. अशाप्रकारे चार अर्थ एकत्र घेऊन त्यांच्या एकीकृत अर्थ पारमार्थिक सत्यासाठी 'आत्मन्' पदाची निवड करणारा ठरला असे सूक्ष्मपणे विचार करणाऱ्यांनी लक्षात घ्यावे. येथे त्या क्रमाची दिशा दाखवली जातेय. म्हणूनच **'अथ अध्यात्मम्'** असा प्रारंभ करून उपदिष्ट उपासनेत आधारभूत सर्व पदार्थ पुरुषाचे घटकच निर्देशिले आहेत.

अर्थ - **अथ अध्यात्मम्। प्राणो व्यानोऽपान उदान: समान:। चक्षु: श्रोत्रं मनो वाक् त्वक्। चर्म मासं स्नावास्थि मज्जा।** (तैत्तिरीय उप. १।७) - आता

अध्यात्मरूप- प्राण, व्यान, अपान, उदान समान (हे वायु पाङ्क्त), नेत्र, कर्ण, मन, वाणी, त्वचा (हे इन्द्रियपंचक), चर्म, मांस, स्नायु, अस्थि, मज्जा (हे पाच धातु). येथे आत्मशब्दाने प्राण, मन, नेत्र आदींनी युक्त, त्वचा इ. अवयवांसहित असा पुरुष सांगितला आहे. शतपथब्राह्मणातही चित्याग्निउपासनेच्या अनेक प्रकारांपैकी आत्म्यासंबंधी ती उपासना सांगताना **'आत्मा ह त्वेवैषोऽग्निश्चितः।'** (शतपथ ब्राह्मण १०।५।४।१२) हा चयन केलेला अग्नि आत्माच आहे. अशी सुरुवात करून, पुरुषाचा निर्देश करून, अस्थि, मज्जा, प्राण, मस्तक, लव, त्वचा, मांस या इन्द्रियांचा निर्देश करून खाणे-पिणे इ. क्रियाही उल्लेखिल्या आहेत. केवळ उदाहरण म्हणून ह्याचा उल्लेख केला आहे. याच दिशेने **'त्वङ्मांसं स्नावास्थि मज्जा। एतमेव तत् पञ्चधा विहितम् आत्मानं वरुणपाशान् मुञ्चति'** (तैत्तिरीय ब्राह्मण १।५।९।७) त्वचा, मांस, स्नायु, हाडे, मज्जा या पाचांनी बनलेल्या आत्म्याला (म्हणजे देहाला) वरुणाच्या पाशातून सोडवतो. अशासारखी अनेक उदाहरणे स्वतःच जाणून घ्यायला हवीत- पुरुष हा अवयवयुक्त आहे, अशा अर्थाने रूढ झालेल्या आत्मशब्दाचा व्यक्त-अवयवांनी युक्त- अशासाठीही आत्माशब्दाचा उपयोग होतो म्हणूनच 'मूर्तिमत्' मूर्ती धारण केलेला, व्यक्त झालेला या अर्थाने आत्मन्वी, आत्मन्वत् शब्द वापरले जातात. शिवाय पुरुष वाचक आत्मशब्द आहे तसाच तो अनेक उदाहरणांमध्ये पुरुषाच्या मध्यभागासाठीही वापरला जातो. **'मध्यतो ह्ययमात्मा'** (शतपथब्राह्मण ६।२।२।१३) मध्यात-मध्यापासून हा आत्मा आहे. **'आत्मनो ह्येवाध्यङ्गानि प्रोहन्ति'** (शतपथ ८।७।२।१५) **स वा एष पुरुषो अन्नरसमयः। तस्येदमेव शिरः। अयं दक्षिणः पक्षः। अयमुत्तरः पक्षः। अयमात्मा। इदं पुच्छं प्रतिष्ठा** (तैत्तिरीय उपनिषद् २।१) हा पुरुष अन्नाच्या रसाने परिपूर्ण आहे. हे त्याचे मस्तक. (उजवा हात) ही दक्षिण बाजू (डावा हात) ही उत्तर बाजू. हा देहाचा मध्यभाग आणि (कमरेच्या खालचा भाग) हे शरीराला आधारभूत पुच्छ-शेपूट.' या ठिकाणी मस्तक, हातपाय यांखेरीजचा कंठापासून खाली कटिप्रदेशापर्यंत असलेला ऊर ज्यात मुख्य आहे असा शरीराचा भाग म्हणजे आत्मा आणि शिर, हात वगैरेंना अंग असा शब्द वापरला आहे. क्वचित ऊर किंवा हृदय यांचा निर्देश 'आत्मा' शब्दाने होतो.

'को ददर्श प्रथमं जायमानमस्थन्वन्तं यदनस्था बिभर्ति। भूम्या असुरसृगात्मा क्व स्वित् विद्वांसमुप गात् प्रष्टुमेतत्।' 'अनच्छये तुरगातु जीवमेजद् ध्रुवं मध्य आ पस्त्यानाम्। जीवो मृतस्य चरति स्वाधाभिरमर्त्यो मर्त्येना सयोनिः।' 'अपाङ्

प्राङेति स्वधया गृभीतोऽमर्त्यो मर्त्येना सयोनिः' (ऋग्वेद संहिता १।१६४।४, ३०, ३८) – जो स्वतः अस्थिहीन असून अस्थियुक्तांना जन्म देतो त्याला उत्पन्न होताना कुणी पाहिले! भूमीचा प्राण तिचे रक्त, मन तेव्हा कुठे होती? कोणा विद्वानांना हे विचारावे? चंचल जिवंत उगीच न बसणारी, ती घराच्या मध्यभागी श्वासोच्छ्वास करीत पडून रहाते, जिवंत पदार्थ मृताच्या सामर्थ्याने चालतो, मर्त्य आणि अमर्त्य एकत्र राहतात. मर्त्याबरोबर राहणारा तो अमर्त्य शरीराने ध्यानात येतो. स्वसमार्थ्याने तो उच्च-नीच गतीला जातो.

विश्वसत्य, अंतिम सत्य ऋग्वेदादींमध्ये पुरुषशब्दाने, युजर्वेदादींमध्ये 'प्रजापति' म्हणून प्रतिपादिले. त्याला अनुसरून त्याच्याच 'आत्मन्-आत्मा' शब्दाने निर्देशाला अनुकूलता निर्माण होते. पुरुषाचे तात्पर्यभूत तत्त्व प्राण; त्याबद्दल तत्त्वाच्या अपेक्षेने पुरुषशब्द वापरलेला आढळतो, तसाच आत्मा शब्द वापरला जातो. जेव्हा माणसाचे मर्त्य आणि अमर्त्य स्वरूप विभागून काही निर्देश करायची इच्छा असते किंवा जीवनशक्ती मनात धरून कसला तरी संकेत करावयाचा असतो. तेव्हा 'आत्मा' शब्दाचीच योजना केली जाते.

आत्मशब्दाने वायुरूप प्राणाला उद्देशून म्हटलंय- '**सूर्यं चक्षुर्गच्छतु वातमात्मा**'। (ऋग्वेद १०।१६।३) – सूर्याकडे दृष्टि जावो, वायूकडे प्राण जावो म्हणूनच. '**वातात्ते प्राणमविदं सूर्याच्चक्षुरहं तव**'। (अर्थव ८.२.३) – वायूपासून प्राण मिळाले. सूर्यापासून मला दृष्टी मिळाली, हे तर्कसंगत आहे. म्हणनूच ऋग्वेदात अनेक ठिकाणी वायूचा 'आत्मा' शब्दाने निर्देश आढळतो. '**आत्मेव वातः स्वसराणि गच्छतम्**'। (ऋग्वेद १।३४।७) – प्राणवायू ज्याप्रमाणे स्वतःच्या शरीराकडे जातो- ज्याप्रमाणे प्राण्यांचा- जीवांचा आत्माच असा अवयवांकडे जातो, त्याप्रमाणे हे अश्विनानो तुम्ही जा.

'**आत्मा ते वातो रज आ नवीनोत्**'। (ऋग्वेद ७.८७.२) – (हे वरुण) आत्मा सर्व प्राण्यांचा प्राणरूपाने धारण करणारा वायू पाण्याला सर्व बाजूंनी प्रेरणा देत आहे. वाऱ्याने वृष्टि होते.

'**स रेतोधा वृषभः शश्वतीनां तस्मिन्नात्मा जगतस्तस्थुषश्च**'। (ऋग्वेद ७.१०१.६) – औषधीना पाणी देणाऱ्या बैलासारख्या पर्जन्यात, चराचर सृष्टीत प्राणवायू रहातो- तो पाऊस अनेक औषधींसाठी पाणी धारण करणारा, जणू बैल, त्या पर्जन्यात चर आणि स्थिर जगाचा आत्मा प्राणवायू असतो.

'**आत्मानं वस्यो अभि वातमर्चत**'। (ऋग्वेद १.९२.१३) – आत्मभूत प्राणवायूला उत्तम पूजतो- सर्वांच्या आत्मभूत- वायूला (प्राणाला) श्रेष्ठतर अन्न

मिळवण्यासाठी स्तुतीने पूजा करतो. **'आत्मा देवानां भुवनस्य गर्भो यथावशं चरति देव एषः। घोषा इदस्य शृण्विरे न रूपं तस्मै वाताय हविषा विधेम।।'** (ऋग्वेद १०.१६८.४) – जो देवांचा प्राण, भुवनांचा गर्भ, हा देव स्वेच्छेने हिंडतो. याचा आवाज ऐकू येतो, रूप दिसत नाही. अशा प्राणवायूला हवींनी संतुष्ट करतो. येथे वायूला देवांचा आत्मा म्हणून वर्णिला आहे. काठकसंहितेतही– **'वातः प्राणस्तदयमात्मा'** (काठकसंहिता–७।१४) वायु म्हणजे प्राण तोच हा आत्मा.

मी– आम्ही– अस्मद् या अर्थी आत्मशब्दाचा प्रयोग प्रसिद्ध आहे. उदाहरणे–

'स एवास्माल्लोकात्प्रेत्य आत्मानं वेद, अयमहमस्मीति' (तैत्तिरीय ब्राह्मण ३।१०।११।१) अर्थ – त्यानेच या लोकातून गेल्यावर स्वत:ला जाणले– हा मी असा आहे. **'ब्रह्म वा इदमग्र आसीत्, तदात्मानमेवावेत्, अहं ब्रह्मास्मीति।'** (बृहदारण्यक १।४।१०) – आधी फक्त ब्रह्म होते. त्याने स्वत:ला जाणले– मीच ब्रह्म आहे.

'स्वत:' या अर्थी ही 'आत्मा' शब्द प्रसिद्ध आहे.

'सोममिन्द्रः पिबतु वृत्रहा। बलं दधान आत्मनि, करिष्यन् वीर्यं महत्।।' (ऋग्वेद ९।११३।१) – आपल्यामध्ये बळ धारण करणारा, महान पराक्रम गाजवणारा वृत्राचा वध करणारा इन्द्र सोम पिऊ दे. आत्मनि म्हणजे स्वत:मध्ये.

'स ऐक्षत प्रजापतिः, इमं बा आत्मनः प्रतिमामसृक्षि यत्संवत्सरमिति' (शतपथ ब्राह्मण ११।१।६।१३) – त्या प्रजापतीने इच्छा केली. ही आपलीच प्रतिमा तयार केली– ती म्हणजे संवत्सर. आत्मन: म्हणजे स्वत:ची प्रतिमा हा अर्थ.

'अथाऽऽत्मन्नग्नी समारोह्य, उत्तरनारायणेनाऽऽदित्यमुपस्थाय, अनपेक्षमाणोऽरण्यमभिप्रेयात्' (शतपथ ब्राह्मण १३।६।२।२०) – नंतर स्वत:मध्ये अग्नीला ठेवून, उत्तरनारायणाने आदित्याला वंदना करून, काहीही अपेक्षा न ठेवता अरण्याकडे निघावे. आत्मनि म्हणजे स्वत:मध्ये. आत्मशब्दाचे संक्षिप्त रूप 'त्मन्' हे ऋग्वेदात खूपवेळा वापरलेले दिसते– स्वयम् या अर्थी. **'विश्व त्मना बिभृतः'** (ऋग्वेद १।१८५।१) विश्वाला स्वत: धारण करणाऱ्याचा... द्यावा आणि पृथिवी याना स्वत: धारण करणाऱ्याचा असा.

'त्वं ह्यग्ने दिव्यस्य राजसि, त्वं पार्थिवस्य, पशुपा इव त्मना' (ऋग्वेद १.१४४.६) – हे अग्नि तू गोपालाप्रमाणे दिव्य आणि पार्थिवाचे प्रशासन करतोस– हे अग्ने स्वर्गीय आणि पृथ्वीवरील जगाचे पशुपालकाप्रमाणे स्वत:

प्राशसन करतोस, हा अर्थ.

पुरुषशब्दापासून आत्मापदाकडे वैचारिक संक्रमण अगदी सहज शक्य आहे. यात विद्वानांना जराही शंका येणार नाही. तरीही सहज समजण्यासाठी काही उदाहरणे प्रस्तुत करतो. शतपथब्राह्मणात वैश्वानरविद्येत वैश्वानर पुरुषशब्दानं निर्देशिला आहे.

'स एषोऽग्निर्वैश्वानरो यत्पुरुषः। स वो हैतमेवमग्निं वैश्वानरं पुरुषविधं पुरुषेऽन्तः प्रतिष्ठितं वेद, अप पुनर्मृत्युं जयति' (शतपथ ब्राह्मण १०।६।१।११) – तो हा अग्नि म्हणजे वैश्वानर पुरुष. तो जो ह्या वैश्वानराला पुरुषरूपाने पुरुषामध्ये प्रतिष्ठित असे जाणतो, तो अपमृत्यूला जिंकतो. तोच वैश्वानर छांदोग्यउपनिषदात वैश्वानरविद्येत आत्मशब्दाने निर्दिष्ट आहे. **'आत्मानमैवेमं वैश्वानरं संप्रत्यध्येषि'** (छांदोग्यउपनिषद ५।११।६) – त्या आत्मरूप वैश्वानराचा आता उपदेश करा. **'यस्त्वेतमेवं प्रादेशमात्रमभिविमानमात्मानं वैश्वानरमुपास्ते'** (छांदोग्यउपनिषद ५.१८.१) – जो त्याच प्रादेशमात्र– परिच्छिन्न, अंशात्मक वैश्वानराची उपासना करतो. चिती–चयन केलेल्या अग्नीची छन्दोदेवतारूप विराटपुरुषाची मस्तक, मान, कणा, बाजू, छाती, गुडघे, पाय इत्यादि इन्द्रियांनी युक्ताचे वर्णन करून म्हटले.

'सैषाऽऽत्मविद्यैव। एतन्मयो हैवैतो देवता एतमात्मानमभिसंभवति' (शतपथ ब्राह्मण १०।३।२।१३) – ती आत्मविद्याच आहे. यानीच युक्त ह्या देवता या आत्म्याचाच सम्मान करतात. शतपथ ब्राह्मणात अग्निरहस्यात, शाण्डिल्यविद्येत, चयनात उपास्य असलेल्या हिरण्मय विश्वपुरुषाचा **'एवमयमन्तरात्मन् पुरुषो हिरण्मयः'** – असा हा अन्तरात्मा पुरुष हिरण्मय आहे असा निर्देश केला.

'स प्राणस्यात्मा, एष मे आत्मा, एतमित आत्मनं प्रेत्याभिसंभविष्यामीति' (शतपथ ब्राह्मण १०।६।३।२) – तो प्राणाचा आत्मा, हा माझा आत्मा, यालाच इथून आत्म्याला मृत्यूनंतर मी पुन्हा प्राप्त होईन' यातून पुरुषविचाराचे आत्माशब्दाकडे– कल्पनेकडे संक्रमण स्पष्टपणे दिसून येत आहे. पुरुषशब्द अवयवयुक्त मर्त्य शरीरापासून बाजूला करून, वळवून अमर, अवयवशून्य अशा तत्त्वाकडे उपनिषद्पूर्व वेदभागाने कसा संक्रमित केला ते पूर्वीच पुरुषतत्त्व व्याख्यान करताना आम्ही सांगितले आहे. ते येथेही लक्षात घ्यावे. प्राणशब्द अमर्त्यसत्याचा वाचक, त्याचा पर्याय म्हणून आत्मा शब्द ऋग्वेदात स्वीकारला होता हे आम्ही पूर्वीच सांगितलेलं इथेही ध्यानात घ्यावे.

ऋग्वेदात अमर्त्य मानल्या गेलेल्या प्राणपदाच्या अर्थाने 'मी' या अर्थाच्या

'आत्मा' शब्दाचे संक्रमण योग्य, युक्तिसंगत वाटते. प्रत्येक क्षणी विनाश पावत असलेल्या, देहावयांशी संबद्ध अनुभवास येणाऱ्या शरीराचा अहं शब्दाने व्यवहार होत असतो. जसे– जो मी बालपणात आईवडिलांचा अनुभव घेतला तसा मी आता म्हातारपणात पणतवांचा अनुभव घेत आहे. येथे मी हा शब्द/ही गोष्ट विनाशशील शरीरातून पुढेपुढे जाणाऱ्या वस्तूची अवधारणा करते. आत्मा शब्द अस्मत्–मी/आम्हीचा पर्याय शब्द असल्यामुळे तो प्रत्येक क्षणी क्षय पावणाऱ्या शरीराचे अनुवर्तन करणारा–त्याबरोबर सतत असणारा, स्थिर, साक्षी असा जो त्याचा निर्देश आत्मापदाने करणे योग्य आहे. नष्ट होणाऱ्या कार्यप्रवाहात त्याच्याबरोबर सतत असणारी वस्तु या अर्थाने पर्यवसान होणारा आत्माशब्द प्राणशब्दापेक्षा तत्त्वदर्शनासाठी इष्टतम ठरला. प्राण धारण करणाऱ्यांपेक्षा वेगळ्या सृष्टीचाही अन्तर्भाव करून जेव्हा विश्वाच्या निर्मात्या तत्त्वाचं ज्ञान करून द्यायची इच्छा आहे तेव्हा आत्मा शब्दच योग्य ठरतो. पुरुष शब्द, प्राण पद तिथेही पूर्वी श्रुतीने योजलं होतं. हे त्या त्या ठिकाणी प्रतिपादनात सांगितलेच आहे.

'एकं वा इदं वि बभूव सर्वम्' (ऋग्वेद ८.५८.२) – जे एकच होते ते अनेक झाले. **'आनीदवातं स्वधया तदेकं तस्माद्धन्यन्न पर: किं चनास'** (ऋग्वेद १०.१२९.२) **'प्रजापते न त्वदेतान्यन्यो विश्वा जातानि परि ता बभूव'** (ऋग्वेद १०.१२१.१०) – वाऱ्याशिवाय तो स्वत:च्या शक्तीने उभा रहातो. त्याशिवाय दुसरे काही नव्हते. प्रजापते तुझ्याशिवाय कोणीही उत्पन्न झालेला जगाला व्यापून राहिलेला नाही.

इत्यादी मंत्र ऋग्वेदात आद्यकारणाचे एकत्व आणि अद्वितीयत्व सांगतात अशा प्रकारच्या अद्वय आद्य कारणाच्या सिद्धान्ताच्या प्रभावानुसारच सर्व वेदांमध्ये सृष्ट्युत्पत्ति सांगितली आहे. आद्यकारण पुरुष, प्रजापती, ब्रह्म वा अन्य कोणी देवता किंवा सत् वा असत् यांचा जिथे जिथे निर्देश असतो तिथे तिथे या अद्वय कारणवादाचा प्रभाव असतोच. याच्या विरुद्ध, अपवादात्मक वचनेही थोडी आहेत पण त्यांचा आपल्या प्रस्तुत आत्मा शब्दाच्या प्रयोगाला त्या उपपत्तीला बाध आणणारी नाहीत. तात्पर्यार्थ हा – आत्माशब्दाला अनुकूल भूमिका, सृष्टिकारण सांगणाऱ्या प्रजापत्यादिपर अशा अनेक श्रुतींमधून दृढपणे प्राप्त आहे.

ही भूमिका चार प्रकारची आहे. सृष्ट्युत्पत्तीमध्ये आद्यकारणाचे स्वातंत्र्य 'ईक्षण' पहाण्यातून कर्तृत्व ही पहिली. स्वरूपापासून वा स्वत:च्या अवयवांपासून

जगातील कार्यविशेषांची निर्मिती म्हणजे विश्वाचे विराटपुरुषत्व; ही दुसरी. निर्मिती क्रियेने दृश्यमान होणारे चराचर विश्व आद्य कारणाच्या रूपाचेच आहे, ही तिसरी. चवथी कल्पना म्हणजे आद्यकारण अशा ब्रह्माचा किंवा प्रजापतीचा निर्माण केलेल्या भूतांच्या शरीरांमध्ये प्रवेश. दुसरी भूमिका पूर्वी केलेल्या पुरुषतत्त्वाच्या प्रतिपादनातून जाणावी. पहिली, तिसरी आणि चवथी भूमिका यांचा उपन्यास येथे करू.

'प्रजापते न त्वदेतान्यन्यो विश्वा जातानि परि ता बभूव' (ऋग्वेद १०।१२१।१०) – प्रजापते तुझ्याशिवाय पूर्वी इतर भूते नव्हती. तू एकटाच होतास. **'प्रजापतिर्वा इदमेक एवाग्र आस। सोऽकामयत प्रजायेय भूयान् स्यामिति'** (ऐतरेय ब्राह्मण १०।१) – प्रजापति आधी अगदी एकटा होता. त्याने कामना केली. मी निर्माण व्हावे, खूप अनेक व्हावे. **'प्रजापतिर्वा इदमेक आसीत्। तस्य वागेव स्वमासीत्। वाग्द्वितीया। स ऐक्षत। इमामेव वाचं विसृजै। इयं वा इदं सर्वे विभवन्त्येष्यतीति'** (ताण्डय ब्राह्मण २०।१४।२) – प्रजापति एकटाच होता. वाणी हीच त्याची संपत्ती होती. त्याच्याहून दुसरी वाणी. त्याने विचार केला. हिच्यापासून मी निर्मिती करतो. तीच हे सर्व होईल.' **'प्रजापतिर्वावेदमग्र आसीत्।.... सोऽकामयत बहु स्यां प्रजायेय भूमानं गच्छेयमिति'** (जैमिनीय ब्राह्मण १।६८) – प्रजापति अगदी प्रारंभी एकटा होता... त्याने इच्छा केली. मी निर्माण व्हावे. बहुत-अनेक व्हावे. **'प्रजापतिर्वावेदमग्र आसीत्। सोऽकामयत। अहमेवेदं सर्वं स्यामहमिद-मभिभवेयमिति।.... एष एवेदं सर्वमित्युपासितव्यम्'** (जैमिनीय ब्राह्मण १।३१४) – प्रजापति आधी एकटाच होता. त्याने इच्छा कली, 'मीच हे सर्व व्हावे... हा प्रजापतीच आहे असे मानून त्याची उपासना करावी. **'सोऽयं पुरुषः प्रजापतिरकामयत भूयान् स्याम्, प्रजायेयेति'** (शतपथ ६।१।१।८) – हा तत्पुरुष असलेला प्रजापती. त्याने विचार केला, इच्छा केली. मी खूप/अनेक व्हावे. मी अनेक व्हावे. **'प्रजापतिर्वा इदमग्र आसीदेक एव। सोऽकामयत स्याम्, प्रजायेयेति'** (शतपथ ६।१।३।१) – प्रजापति हा आधी एकटाच होता. त्याने अनेक होण्याची इच्छा केली. इत्यादि वाक्यांमधून चार अर्थ सांगता येईल, येथे सृष्टेचे आद्यकारण जो प्रजापती त्याचा प्रत्यक्ष, अध्याहाराने, कर्ता म्हणून 'अहं' मी या शब्दात निर्देश आहे. मी या शब्दाच्या अर्थामुळे सृष्टिनिर्मितीला तो स्वतः अन्य कुणाच्या आधिपत्याखाली नसलेला कर्ता सूचित होतो. कर्त्याचेच अनेक रूपाने निर्माण/व्यक्त होणे यातून तो कर्ता हेच जगाचे

उपादानकारण असल्याचे ध्वनित होते. इदं या शब्दाचा अर्थ दृश्यसृष्टि, आद्यकारण असा प्रजापति या दोहोंची एकता 'प्रजापतिर्वा इदमेक एव' हे सर्व एकटा प्रजापतीच आहे' इत्यादि विधानांच्या संदर्भांनी तेथे सांगितले आहे. त्यातून कार्य आणि कारण दोन नाहीत एकच आहेत हे सूचित होते. म्हणून 'अहं' असा अनुभव घेणारा चेतन, दुसऱ्यावर अवलंबून नसलेला स्वतंत्र कर्ता, कर्ता हेच उपादानकारण असणे आणि कार्य आणि कारण यांच्यामधील अभेद हे चार अर्थ निष्पन्न होतात.

वागाम्भृणीसूक्तात '**अहं रुद्रेभिर्वसुभिश्चरामि**' मी रुद्रांसह आणि वसूंसह रहाते' या सूक्तात 'अहं' शब्दाने सृष्टीचे प्रवर्तकत्व, श्वासोच्छ्वास, पहाणे आदी जीवाच्या क्रियांचे कर्तृत्व याच पद्धतीने स्पष्ट करायला हवे.

'मया सो अन्नमत्ति यो विपश्यति यः प्राणिति य ईं शृणोत्युक्तम्। अमन्तवो मां त उपक्षियन्ति श्रुधि श्रुत श्रद्धिवं ते वदामि।। अहमेव स्वमिदं वदामि जुष्टं देवेभिरुत मानुषेभिः। यं कामये तं तमुग्रं कृणोमि तं ब्रह्माणं तमृषिं तं सुमेधाम्। अहं रुद्राय धनुरातनोमि ब्रह्मद्विषे शरवे हन्तवाऊ अहं जनाय समदं कृणोम्यहं द्यावापृथिवी आ विवेश।। अहमेव वात इव प्र वाम्यारभमाणा भुवनानि विश्वा। परो दिवा पर एना पृथिव्यैतावती महिना सं बभूव।।' (ऋग्वेद १०.१२५.४–६) – माझ्यामुळे तो अन्न खातो, पहातो, श्वास घेतो आणि ऐकतो. अविचारी लोक मला गमावतात. मी श्रद्धेने हे सांगते! मी स्वतःच देवांशी व माणसांशी बोलतो. ज्याला हवे त्याला मी उग्र किंवा स्तुतियुक्त करतो. मीच द्यावा पृथ्वीत प्रवेश केला.

'अहं मनुरभवं सूर्यश्चाहं कक्षीवाँ ऋषिरस्मि विप्रः।' (ऋग्वेद ४.२६.१) मीच मनू झालो मीच सूर्य, मीच कक्षीवान् नावाचा विप्र ऋषि आहे, असे वामदेवसूक्तात म्हटलंय. **अहं ता विश्वा चकरं नकिर्मा** (ऋग्वेद ४.४२.६) मीच सर्वांना निर्माण केलं. इत्यादि मंत्रांमध्ये ते प्रतिबिंबित होते, असे लक्षात घ्यावे.

सृष्टी जलातून, असत्यातून की ब्रह्मातून निर्माण झाली हे सांगताना हाच अभिप्राय श्रुती दृढ करतात.

'आपो वा इदमग्रे सलिलमासीत्' (तैत्तिरीय संहिता ७।१।५।१)

'आपो ह वा इदमग्रे सलिलमेवास। ता अकामयन्त। कथं नु प्रजायेमहीति' (शतपथ ब्राह्मण ११।१।६।१) – पाणी हे मूळ, असत् हे मूळ. पाण्याने विचार केला मी कसे निर्माण व्हावे. ब्रह्म हेच मूळ असा सिद्धांत मांडणाऱ्या श्रुति हाच

अभिप्राय दृढ करतात.

'**इदं वा अग्रे नैव किंचनाऽऽसीत्। न द्यौरासीत्। न पृथिवी। नान्तरिक्षम्। तदसदेव सन्मनोऽकुरुत स्यामिति। तदतप्यत**' (तैत्तिरीय ब्राह्मण २।२।९।१) - आधी काहीच नव्हते. स्वर्ग, पृथ्वी, अंतरिक्ष काहीच नव्हते. त्या नसलेल्याने विचार केला, मी जन्माला यावे. त्याने तप केले.

'**ब्रह्म वा इदमग्र आसीत्**' (शतपथ ब्राह्मण ११।२।३।१) - पूर्वी ब्रह्मच फक्त होते.

'**अथातोऽहङ्कारादेश एव। अहमेवाधस्तात्, अहमुपरिष्टात्, अहं पश्चात्, अहं पुरस्तात्, अहं दक्षिणतः, अहमुत्तरतः, अहमेवेदं सर्वमिति। अथात आत्मदेश एव। आत्मैवाधस्तात्, आत्मोपरिष्टात्, आत्मा पश्चात्, आत्मा पुरस्तात्, आत्मा दक्षिणतः, आत्मात्तुरतः, आत्मैवेदं सर्वमिति**' (छांदोग्य ७.२५.१)- अहंकारादेश असा-मीच खाली आहे, मीच वर, मीच मागे नि मीच पुढे आहे, डावीकडे मीच, उजवीकडे मीच आहे. मीच हे सर्व आहे. आता पुढे भूमाचा आत्मादेश- आत्माच खाली आहे. तोच वर तोच आत्मा मागे आहे. तोच पुढे तो आत्माच दक्षिणेकडे आहे तोच उत्तरेकडे आहे. आत्मा म्हणजे सर्व काही.

अस्मत् शब्द आणि आत्मा शब्द यांची समानार्थकता निश्चित करण्यासाठी छांदोग्यउपनिषद् पारमार्थिक 'भूमा' या तत्त्वाचा उपदेश करून त्याची सर्वव्यापकता अहंकार आणि आत्मशब्दाच्या उपयोग या दोन्ही प्रकारे सांगितली.

'आत्मा' शब्दाचा 'स्वरूप' हा मुख्य अर्थ. त्याच अर्थाने आद्य कारणाला उद्देशून उपनिषदांतील आत्मा शब्दाचा विचार केला आहे हा ऐतिहासिक प्रणालीचा उपकारच आहे. या प्रकारची उदाहरणे अगदी अल्प मिळत असली तरी 'अणुरपि विशेषोऽध्यवसायकरः' 'अत्यल्प भेद-विशेषही निश्चयाला पुरेसा ठरतो; या न्यायाने आत्मविचारापर्यंत परिणामाच्या प्रक्रियेत त्यांचे विशेष सामर्थ्य स्वीकारायलाच हवे. ती उदाहरणे, अशी आहेत- सृष्टीच्या पूर्वीच्या काळात सत् आणि असत् यापेक्षा वेगळेच काहीतरी होते असे नासदीय सूक्ताच्या आधाराने सांगून पुढे म्हणतात-

तद्ध तन्मन एवास ... नेव हि सन् मनो नेवासत्। तदिदं मनः सृष्टमाविरबुभूषत् निरुक्ततरं मूर्ततरम्। तदात्मानमन्वैच्छत्।' (शतपथब्राह्मण १०।५।३।१-३) - ते मनच होते. मन सत् नव्हते की असत् नव्हते तेव्हा हे सृष्ट-निर्मित झालेले मन प्रकट झाले. अगदी स्पष्ट अधिकच साकार झाले. त्याने आत्म्याची इच्छा केली. या ब्राह्मणात या प्रकरणात '**आत्मानमन्वैच्छत्**' आत्म्याची इच्छा केली

हे वाक्य संदर्भाच्या अपेक्षेने आठ आले आहे. अग्निरहस्यात प्रजापतीने स्वत:चा निर्देश आत्मशब्दाने केला आहे. **'स हेक्षांचक्रे। कथं न्वहमिमानि सर्वाणि भूतानि पुनरात्मन्नावपेय पुनरात्मन् दधीय।'** (शतपथब्राह्मण १०।४।२।३) – त्याने विचार केला मी या सर्व भूतांना पुन्हा माझ्यात कसे परत घेऊ. मी पुन्हा त्यांचा आत्मा कसा होईन?

वाजसनेयी संहितेत आणि तैत्तिरीय आरण्यकात आद्यकारण सर्वात्मकाला उद्देशून म्हटले – **आत्मनाऽऽत्मानमभि सं विवेश** (वाज. संहिता ३२.११, तैत्तिरीय आरण्यक १।२३।९) आत्म्याने आत्म्यात प्रवेश केला. येथे स्वत: निर्माण केलेल्या भूतांमध्ये मूलकारणाचा प्रवेश सांगितला. स्वरूपवाचक आत्मशब्दाने स्वत:च्या कार्यरूप जगात स्वत: प्रवेश केला, हा मंत्राचा अभिप्राय आहे. आत्मशब्दाने येथे मूलकारण आणि कार्यरूप जगत उभयही निर्दिष्ट केले आहे. गोपथब्राह्मणातही अशाच प्रकारचा आत्मशब्द योजून प्रजापतीच्या सृष्टीचे प्रतिपादन केले. **'स आत्मना एव त्रीन् लोकान्। निरमियत पृथिवीमन्तरिक्षं दिवमिति।'** (गोपथब्राह्मण १।१।६). त्याने स्वत:पासून तीनही लोकांना पृथ्वी, अन्तरिक्ष आणि स्वर्गाला निर्मिले.

अज, अमर असे आद्यकारण त्याने स्वत:च्या निर्मितीत प्रवेश केला. हा विचार दोन प्रकारे पारमार्थिक सत्य आणि आत्मशब्दाचे स्थान यांच्या निश्चयाला कारण होईल. शरीररूप कार्यात 'अज आत्मा' स्वत: प्रवेश करतो. ही पहिली गोष्ट अहम्– मी असा निर्देश करण्याजोगा शरीरात रहाणारा हाच सृष्टीचा निर्माता स्वत: आहे ही दुसरी गोष्ट. अशा प्रकारे स्वरूपवाचकताशक्तीने आणि अहंवाचकता शक्तीमुळे इथलं आत्मपद प्रवेशाचा उल्लेख असलेल्या श्रुतीमुळे उपनिषदोक्त, पारमार्थिक सत्यवाचक शक्तीपर्यंत ऐतिहासिक पद्धतीला अनुसरणारे अनुमान योग्यच वाटते. प्रवेश सांगणाऱ्या श्रुति अशा आहेत.

'इनो विश्वस्य भुवनस्य गोपा: स मा धीर: पाकमत्रा विवेश' (ऋग्वेद १।१६४।२१)– सूर्य सर्व जगाचा रक्षणकर्ता तो बुद्धिमान परमेश्वर माझ्या अंत:करणात प्रवेश करून राहिला आहे.

'स आशिषा द्रविणमिच्छमान: प्रथमच्छदवराँ आ विवेश' (ऋग्वेद १०।८१।१) – विश्वकर्म्याने आशीर्वादाने धन प्राप्त करून घेण्यासाठी अग्नीत प्रवेश केला.

'प्रभ्राजमानां हरिणीं यशसा संपरीवृताम्। पुरं हिरण्मयीं ब्रह्माऽऽविवेशापराजिताम्।' (अथर्ववेद १०।२।३३) – अत्यंत दीप्तिमती, यशाने

वेढलेल्या, अपराजित अशा हिरण्मयी, सुवर्णरंगाच्या नगरीत ब्रह्माने प्रवेश केला.

'एको ह देवो मनसि प्रविष्टः प्रथमो जातः स उ गर्भे अन्तः' (अथर्ववेद १०।८।२८) – एकच देव मनात प्रवेश करून प्रथम जन्मला, तोच गर्भाच्या आत आहे. **'प्रजापतिः प्रजा असृजत। ताः सृष्टाः समश्लिष्यन्। ता रूपेणानुप्राविशत्। तस्मादाहुः। रूपं वै प्रजापतिरिति। ता नाम्नाऽनुप्राविशत्। तस्मादाहुः। नाम वै प्रजापतिरिति'** (तैत्तिरीय ब्राह्मण २।२।७।१) – प्रजापतीने प्रजा निर्माण केल्या. निर्मिलेल्या प्रजांनी त्याला आलिंगन दिले. त्यांच्यामध्ये त्याने मागून रूपासह प्रवेश केला, म्हणून म्हणतात– रूप म्हणजेच प्रजापति. त्याच्यात त्याने नामासह प्रवेश केला. म्हणून म्हणतात, नाम म्हणजे प्रजापति.

'आत्मा ममेति ब्रह्माऽऽविवेश' (शांखायन आरण्यक ११।२) – आत्मा माझा आहे म्हणून ब्रह्माने त्यात प्रवेश केला.

'अन्तः प्रविष्टः शास्ता जनानाम्। एकः सन् बहुधा विचारः। .... स मानसीन आत्मा जनानाम्। .... अन्तः प्रविष्टं कर्तारमेतम्। त्वष्टारं रूपाणि विकुर्वन्तं विपश्चिम्। अमृतस्य प्राणं.... कवयो निचिक्युः' (तैत्तिरीय आरण्यक ३।११।१।३) – आंत प्रवेश करून तो लोकांचा शासक बनला. एकच असून अनेक प्रकारे विचरण करतो. तो मानसाला, वेगवेगळी रूपे धारण करणाऱ्या शहाण्याला... अमृताच्या प्राणाला कवी/विद्वान जाणतात.

'त्वमेकोऽसि बहूननुप्रविष्टः' (तैत्तिरीय आरण्यक ३।१४।३)– तू एकटा आहेस, अनेकांमध्ये प्रवेश करतोस. **'स एतमेव सीमानं विदार्य, एतया द्वारा प्रापद्यत'** (ऐतरेय आरण्यक २।४।३।१२) – त्याने या सीमेला भेदून त्या द्वाराने प्रवेश केला.

'प्रजापतिं ब्रह्माऽसृजत। तमपश्यममुखमसृजत। तं..... ब्रह्माऽऽविशत्। पुरुष्यं तत्। प्राणो वै ब्रह्म.... स उदतिष्ठत् प्रजानां जनयिता' (तलवकार ब्राह्मण उपनिषद ३।७।१।१-३) – प्रजापतीला ब्रह्माने निमाण केले. त्याला न पहाणारा, तोंड नसलेला बनवला.. त्यात ब्रह्माने प्रवेश केला. ते समर्थ आहे. प्राण म्हणजेच ब्रह्म... प्रजांचे निर्माते असे ते उठले.

'स तपस्तप्त्वा इदं सर्वमसृजत यदिदं किञ्च। तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत्। तदनुप्रविश्य। सच्च त्यच्चाभवत् निरुक्तं चानिरुक्तं च' (तैत्तिरीय उपनिषद २।६) – जे काही दिसते ते सर्व काही त्याने तप करून निर्माण केलं ते निर्माण करून त्यातच प्रवेश केला. त्यात प्रवेश करून ते सत् आणि त्यत् स्पष्ट आणि

अस्पष्ट दोन्ही झाला.

'सेयं देवतेमास्तिस्रो देवता अनेनैव जीवनेनात्मनाऽनुप्रविश्य नामरूपे व्याकरोत्' (छांदोग्य उपनिषद ६।३।३) – त्या देवतेने जीवात्मरूपाने त्या तीन देवतांमध्ये प्रवेश करून नामे आणि रूपे वेगळी व्यक्त केली (तीन प्रकारची जीव सृष्टी याच तीन देवता.)

'पुरः पुरुष आविशदिति' (बृहदारण्यक उपनिषद २।५।१८) – पुरुष म्हणजे पुरामध्ये शरीरांमध्ये प्रवेश करतो तो. अहं हा अर्थ असलेला स्वरूप सांगणारा आत्मा हा शब्द, 'प्रवेश' सांगणाऱ्या श्रुतींनी अन्वर्थक, स्वत:ला अभिप्रेत असलेले तत्त्व योग्य प्रकारे सांगण्यासाठी युक्ततर म्हणून स्वीकारला. व्यवहार करताना मनुष्य अहं शब्दाने व्यवहाराचा साक्षी असलेल्या (स्वत:चा) निर्देश करू इच्छितो. त्याच 'अहं'ला श्रुती नाम आणि रूपांनी विभक्त करण्यासाठी, शरीरे इत्यादि निर्मित सृष्टीत प्रवेश केलेले आद्य तत्त्व प्रजापति इत्यादि संज्ञांनी उपनिषत्पूर्वकाळात निर्दिष्ट आहे. त्या आद्यतत्त्वात आत्मा हा शब्द अहं या अर्थी आणि स्वरूपाच्या जागी यथार्थ ठरतो, उपयुक्त-योग्य आहे असे विद्वानांनी जाणून घ्यावे.

आत्माशब्दाची यथार्थता आणि परमार्थसत्याचा बोध करून देण्याचे विशेष सामर्थ्य लक्षात घेऊनच ऐतरेयोपनिषदात आत्मषट्कात आत्मा शब्द पहिल्यात पहिल्यांदा उपयोगात आला हे तत्त्वदर्शनाच्या इतिहासक्रमाला अनुसरून निश्चित करता येते. ऐतरोयोपनिषद् हेच सर्व उपनिषदांमधील पहिले उपनिषद् आहे, हे वैदिक वाङ्मयाचे कालदृष्ट्या पूर्वकालीनता आणि उत्तरकालीनता मानणाऱ्या ऐतिहासिकानी मान्यच केले पाहिजे. याच उपनिषदात मंत्र आणि ब्राह्मणांनी युक्त वेदांमध्ये उगम पावलेला तत्त्व-विचाराचा परिणाम-पक्कताक्रम पुरुष आणि प्राण अशा दोन संज्ञा प्रथम स्वीकारून प्रौढ-प्रगल्भ झाला. मग या दोन्ही संज्ञा टाकून देऊन स्वत:चे 'सत्त्व-तत्त्व/सार लक्षात घेऊन आत्माशब्दाचा अङ्गीकार केला. या उपनिषदात प्रथम तत्त्वदर्शनातील प्रगल्भता/प्रौढता प्रगट झाली. हे सर्व उपनिषदांच्यामध्ये उपक्रमस्थानीय मानावे लागेल.

त्या त्या वस्तूचे वाचक, तद् इत्यादि शब्दांप्रमाणे सर्वनामाचे अनुकरण करणारे-सर्वनामासारखे, ज्याच्या त्याच्या बुद्धीत असलेल्या वाचक अर्थाचे, असे 'आत्मा' हे पद, हा शब्द परमार्थ स्वरूपाचा बोध करण्यासाठी उपनिषदांनी अंगीकारला. शिवाय प्रतिक्षणाला विनाश पावणाऱ्या शरीरात सदा अनुगमन करणाऱ्या स्वतंत्र अशा चैतन्याचे, मी या अर्थाचे वाचक आत्मपद आहे.

वाय १८२-२५

क्षणाक्षणाला नष्ट होणाऱ्या कार्यकारण प्रवाही जगात अनुस्यूत असलेल्या चेतनशक्तिरूपाचे पूर्णपणे स्वतंत्र अशा परमार्थवस्तुस्वरूपाच्या, विश्वात सर्वत्र व्यापून राहिलेल्या तत्त्वाच्या निदर्शनासाठीही अतिशय विचारपूर्वक, आत्मशब्दाचा प्रयोग उपनिषदांनी स्वीकारला.

परमार्थवस्तु, भूतमात्रांचा पुरुषापर्यंतचा प्रपञ्च, व्यवहारप्रसिद्ध आत्मा म्हणजे मनुष्यनामक जीव आणि मुक्त ह्या चारगोष्टी आत्म्याविषयीचे सिद्धान्त म्हणून उपनिषदात चर्चिलेल्या असतात. आत्मज्ञान करून देण्यासाठी उपनिषदांचा प्रारम्भ झालाय म्हणून आत्मा या गोष्टीचे प्रथम निरूपण करून नंतर ते कळायला सोपे जावे म्हणून, नाम आणि रूप या भेदांनी युक्त असा प्रपञ्च, अनेक शब्दांनी अनुभवाच्या कक्षेत येणारा व्यवहारात आत्मपदाने प्रसिद्ध पुरुष आणि अखेर मोक्ष या क्रमाने नंतर सर्वांचं निरूपण करू. ऐतरेयोपनिषदात प्राण नावाचा ब्रह्म हा एकच देव, त्या देवाचेच सर्व देव या विभूति, तोच ज्ञान आणि कर्म यांच्या समुच्चयरूप साधनेने प्राप्त करून देवतांचा लय या लक्षणाने युक्त असा मोक्ष पुरुषार्थ प्राप्त करायचा आहे. शुद्ध आत्मज्ञानाच्या विधानासाठी परब्रह्मविषयक निरूपण सुरू केलं.

आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत्। नान्यत्किंचन मिषत्' (ऐतरेयआरण्यक २।४।१।१) - आधी केवळ एकटा आत्माच होता. अन्य काही हालचाल करीत नव्हते. येथे क्रमाने आत्म्यापासून चार लोक, पाणी इ. महाभूतांची विश्वपुरुषाची आणि देवतांची सृष्टी सांगितली आहे. कार्यकारणात्मक आणि व्यक्त आणि अव्यक्त यांचे सत्य रूप परमार्थवस्तूचंच प्रतिपादन करणं अपेक्षित होतं. सृष्टिप्रपंच सांगणे हे नव्हे... सृष्टिप्रपंचाचं वर्णन वस्तुस्वरूपाचा बोध करण्यासाठीचं केले होते. शिवाय जगताच्या निर्मितीच्या पूर्वी आत्मा एकटाच होता आता सृष्टि निर्माण झाल्यावर तो नाही, असे नाही. 'इदं' म्हणजे हे या शब्दाने दिसणारे सृष्टिकार्य सांगून त्याची आत्मरूपता सांगण्याने सृष्टीच्या पूर्वीची कोणताच भेद नसलेली स्थिती निर्दिष्ट केली आणि सृष्टिकालात म्हणजे सृष्टि निर्माण झाली तरी तिच्यात तो एकटाच आहे असे सूचित केले आहे. याच प्रकारे अद्वय अशा आद्यकारणापासून सृष्टीचा उद्भव सांगणारी वाक्ये स्पष्ट करावीत. विश्वाचे कारण म्हणून दर्शविलेला आत्मरूप परम-अर्थ, ते तत्त्व, सृष्टिरूप मनुष्यरूपाचेही आहे. पुरुषाचे बीज आणि स्त्रीचा गर्भ यातही तो अनुभवाला येतो. तसा तो ज्ञानाचा वा उपासनेचा विषय होत नाही, असे सुचवणारी सर्वांच्या ठिकाणी आत्मभाव पहाण्याच्या फळाची प्राप्ती सूचित

करणारी श्रुती खुंटा हालवून बळकट करण्याच्या न्यायाने, प्रश्न विचारून, संसारी जीवांपासून त्याला बाजूला करून उपास्य आत्म्याचे ज्ञापन करते. ती विचारते- **'कोऽयमात्मेति वयमुपास्महे। कतर: स आत्मा।'** (ऐतरेय आरण्यक २।९।१।१) ज्याची आम्ही उपासना करतो तो आत्मा कोण? कसा आहे तो उपास्य आत्मा? पूर्वी आत्मा शब्दाने प्रापंचिक पुरुषाच्या नाना अवस्था दाखवल्या. या प्रश्नाने त्या सर्व बाजूला ठेवल्या जातात. जे सृष्टीचे मूळ परमार्थतत्त्व तेच आध्यात्मिक अर्थाने 'प्रज्ञान' रूपाने सांगून आत्मज्ञानाची समाप्ती केली. दर्शन, ऐकणे, वास घेणे, बोलणे, चव घेणे, मनन आदि क्रिया करणाऱ्या स्वतंत्र 'प्रज्ञान' नामक जीवनसंबंधी तत्त्व पंचमहाभूते इ. स्थिरचरसृष्टीमध्ये तोच प्रज्ञात्मा म्हणून निर्दिष्ट आहे. पण त्याचे प्राणशब्दाने वाचकत्व नाकारलेले नाही. येथे केवळ प्रज्ञान शब्दाच्या प्रयोगाने तसे वगळणे सुचवले आहे, यामुळे उपनिषद् विचाराची चढती कमान लक्षात येते. प्राणाहून भिन्नत्व सूचित केलेले असूनही मनाचे अतीतत्व बुद्धीला उमजत नाही. मनाचे अतीतत्व सांगणारी उपनिषदे ऐतरेयोपनिषदांच्या नंतरची आहेत, हे सूचित होते. शिवाय 'जे हे हृदय तेच मन होय... ही सर्वच प्रज्ञानाचीच नावे आहेत. **'यदेतत् हृदयं मनश्चैतत्... सर्वाण्येवैतानि प्रज्ञानस्य नामधेयानि भवन्ति।'** (ऐतरेय आरण्यक २।६।१।२) हे विधान मनाच्या प्रज्ञानाशी एकत्वाबद्दल संशयही निर्माण करते.

छांदोग्यउपनिषदात मन आणि प्राण याहून भिन्न मन आणि प्राण यांचा अन्तर्यामी आत्मा प्रत्यक्ष शब्दांनी सांगितला आहे. उपनिषदांची सारभूत अशी जी शाण्डिल्य विद्या, तिथे प्रथम आत्मतत्त्व सांगितलं आहे. शतपथब्राह्मणातील आणि छांदोग्य उपनिषदातील शाण्डिल्यविद्या तात्पर्याने एकच आहे. छांदोग्यात **'मनोमय: प्राणशरीर:... एष मे आत्माऽन्तर्हृदये'** (छांदोग्य उप.३।१४।२-४) मनोमय, प्राण हे शरीर असलेला माझा आत्मा हृदयाच्या अन्तर्भागी आहे. याने मन आणि प्राणांपासून आत्म्याचा भेद सांगितला. शतपथ ब्राह्मणात. **'स आत्मानमुपासीत मनोमयं प्राणशरीरं... स प्राणस्यात्मा। एष मे आत्मा'** (शतपथ ब्राह्मण १०।६।३।२) मनोमय, प्राण शरीर असलेल्या आत्म्याची त्याने उपासना केली. तो प्राणाचा आत्मा, हा माझा आत्मा. इथे अत्यंत स्पष्टपणे प्राणापासून भेद सांगितला. त्याचे अणूहून अणुत्व आणि मोठ्याहून मोठेपण विशेषत: निर्दिष्ट करून ती व्यक्त भावानुरूपता सुचवली. शिवाय, सत्यसंकल्प, सर्वकर्मा, सर्वकाम इ. त्याचे वर्णन करून निरंकुश इच्छाशक्तिरूपत्व प्रतिपादित केले आहे.

छांदोग्यात आत्म्याचे स्वरूपलक्षण विस्तारपूर्वक तीन प्रकारे सांगितले आहे. तेजरूप परम ज्योति, एक आणि एकच सत्तत्त्व आणि भूमा. तेथे तेजरूप ज्योति. **'अथ यदत: परो दिवा ज्योतिर्दीप्यते विश्वत: पृष्ठेषु सर्वत: पृष्ठेषु अनुत्तमेषूत्तमेषु लोकेषु, इदं वाव तत् यदिदमस्मिन्नन्त: पुरुषे ज्योति:'** (छांदोग्य ३।१३।७) – जी दिव्य ज्योती सर्व बाजूंनी, सर्व दिशांनी उत्तमोत्तम लोकांमध्ये प्रकाशते. ती या पुरुषाच्या अंत:करणातील ज्योती असते. डोळ्यांनी पहाण्याजोगा उष्णस्पर्शाचा भौतिक प्रकाश बाजूला ठेवण्यासाठी, सहाव्या अध्यायात तेज आदि सृष्टिनिर्मिती ज्यापासून झाली ते सत् म्हटले जाणारे तत्त्व 'आत्मा' आहे. असे विधान आहे. भौतिक तेज म्हणजेच आत्मा असे वरील वाक्यावरून दृढ होते. त्याचा परिहार करण्यासाठी सहावा अध्याय अभ्यासायला हवा. सहाव्या आणि सातव्या अध्यायाचा हा दुसरा विशेष आहे. विचाराचा विषय असलेलं विश्वतत्त्व सत् आणि भूमा या रूपाने निर्देश करून त्यांचे स्पष्टीकरणही केलं. त्यानंतर विधिविशेषण म्हणून आत्मा पदाचा–शब्दाचा प्रयोग केला. आत्मा शब्द नाना अर्थांनी युक्त असल्यामुळे, त्याचा प्रयोग केल्यास त्यामुळे मूळ तत्त्वाच्या स्वरूपाबद्दल संशय निर्माण होतो. त्याचा निरास 'सद्' आदि शब्दांच्या प्राधान्याने परमसत्याच्या ज्ञानाने होतो. **ऐतदात्म्यमिदं सर्वम्। तत्सत्यम् 'स आत्मा' तत्त्वमसि।** (छांदोग्य ६।८।७) हे सर्व जग (सृष्टि) त्या आत्म्याने युक्त आहे, तेच सत्य आहे. तो आत्मा, तो तू आहेस. 'स आत्मा' या मूलतत्त्वाचे पर्यवसान– परिणाम असा 'आत्मा' शब्द स्वीकारला. मन, प्राण, तेज यांच्यामधील अंतरंग तत्त्व आत्मा हे आहे असं स्पष्टपणे प्रतिपादन करतात.

'अस्य सोम्य पुरुषस्य प्रयतो वाङ् मनसि संपद्यते, मन: प्राणे, प्राणस्तेजसि, तेज: परस्यां देवतायाम्' (छांदोग्य ६।८।७) – हे सोम्या, मृत माणसाची वाणी मनात लय पावते, मन प्राणात, प्राण तेजात आणि तेज श्रेष्ठ अशा देवतेमध्ये मिसळून जाते. कार्यसृष्टीचे कारण सद् आत्मा हेच आहे हे लक्षात घेऊन नाम, रूप यांचा भेद स्पष्ट करण्याऱ्या सृष्टी निर्मितीच्या काळीही अद्वयत्व सिद्ध केले आहे. त्यासाठी माती, लोखंड, वडाचे बीज, मिठाचे खडे यांचे दृष्टांत दिले आहेत. लाकूड इ. उपादानकारण रथकारावर, सुतारादींवर अवलंबून असते. त्याप्रमाणे आद्यकारण हेच उपादान कारण असल्यामुळे त्याला दुसऱ्या (निमित्तकारणावर) वर अवलंबित्व प्राप्त झालं तेव्हा, भूमतत्त्वाचे विवरण करताना अन्य वस्तूचा अभाव दाखवून त्याचे स्वत:चे माहात्म्य प्रस्थापित करून– सांगून– त्याचे पूर्ण स्वातंत्र्य कल्पिले आहे.

यो वै भूमा तदमृतम्।' अथ यतल्पं तन्मर्त्यम्। स भगवः कस्मिन् प्रतिष्ठितः इति। स्वे महिम्नि, यदि वा न महिम्नीति।' (छांदोग्य. ७।२४।१) जे भूमा परिपूर्ण आहे तेच अमृत आहे. जे अल्प आहे ते विनाशी आहे. ती परिपूर्णता कशावर टिकून आहे? स्वतःच्या माहात्म्यावर प्रतिष्ठित आहे किंवा नाहीही. भूमा तत्त्वाची आत्मशब्दाने ओळख देणारी उपत्पत्ति हे उपनिषद् स्वतः दाखवते, ही गोष्ट ऐतिहासिक विचारविकासाच्या पद्धतीचा अवलंब करणाऱ्यांवर आनंद देणारी आहे.

'तस्य ह वा एतस्यैवं पश्यत एवं मन्वानस्यैवं विजानतः, आत्मतः प्राण आत्मत आशाऽत्मतः स्मर आत्मत आकाश आत्मतस्तेज आत्मत आप आत्मत आविर्भावतिरोभावावात्मतोऽन्नमात्मतो बलमात्मतो विज्ञानमात्मतो ध्यानमात्म-तश्चित्तमात्मतः संकल्प आत्मतो मन आत्मतो वागात्मतो नामाऽऽत्मतो मन्त्रा आत्मतः कर्माण्यात्मत एवेदं सर्वमिति' (छांदोग्यउपनिषद ७।२६।१)- त्या अशाप्रकारे पहाणाऱ्याला, अशा तऱ्हेने मनन करणाऱ्याला, अशा रीतीने जाणण्यासाठी, त्या विद्वानासाठी आत्म्यापासूनच प्राण, आशा, स्मृति, आकाश, तेज, जल, आत्म्यापासूनच प्रकटीकरण आणि अन्तर्धान, आत्म्यापासूनच अन्न, बल, विज्ञान, ध्यान, चित्त, संकल्प, मन, वाणी, नाम, मंत्र आणि आत्म्यामुळेच कर्म. सर्व काही आत्म्यामुळेच होत असते. परमार्थतत्त्व हे ज्ञात्याहून भिन्न नसते. आत्माशब्द हा ज्ञात्याचा वाचक आहे. म्हणून आत्माशब्दाने परमतत्त्वाचा निर्देश करून त्यापासून विश्वाचा पसारा येथे सांगितला आहे. तसेच परमार्थतत्त्व दृश्यवस्तु विस्ताराचे मूळ रूप आहे, आत्मा हा शब्द वर सांगितल्याप्रमाणे स्वरूपाचा वाचक आहे, म्हणून आत्माशब्दाने सर्ववस्तूंचे स्वरूप असलेला 'भूमा' पदार्थच व्यक्त केला आहे. 'भूमा' पदार्थ सर्वात्मक-सर्वमय आहे हे 'भूमा' पदार्थाच्या लक्षणात निश्चयात्मकपणे सांगितले आहे. **'यत्र नान्यत्पश्यति, नान्यच्छृणोति नान्यद्विजानाति स भूमा।'** (छांदोग्य ७।२४।१) जेथे, जे अन्यत्वाने काही पहात नाही, ऐकत नाही वा जाणत नाही, तो (एकमेव) म्हणजे भूमा.

बृहदारण्यकोपनिषदात आत्मा ही वस्तु, परमतत्त्व म्हणजे अध्यात्मशास्त्रातील प्रगल्भ परिणतीची परमावधि आहे. छांदोग्यात ज्योतिस्वरूप ज्ञात्याहून भिन्न नसलेला, अद्वितीय असा परमअर्थ सांगून तो अन्य कोणाकडून प्रकाशित केला जात नाही, तो स्वयंप्रकाश आहे. परतत्त्वाची स्वयंसिद्धता स्पष्ट शब्दात याच उपनिषदाने सर्वप्रथम उद्घोषित केली. परमार्थतत्त्व-स्वरूप आत्मा प्रज्ञानरूप हे

ऐतरेयात सांगितले, ज्ञात्याहून वेगळं नसलेलं असं छांदोग्यात सांगितलं. येथे त्याहून वेगळेपणा स्वत:सिद्धता स्वभाव स्वयंभूत्व हा आहे. ते असे. **'अस्तमित आदित्ये याज्ञवल्क्य चन्द्रमस्यस्तमिते शान्तेऽग्नौ शान्तायां वाचि किंज्योतिरेवायं पुरुष इति। आत्मैवास्य ज्योतिर्भवतीति'** (छांदोग्य ४।३।६) 'याज्ञवल्क्या, सूर्याचा अस्त झाल्यावर, चंद्र मावळल्यावर, अग्नी शान्त झाल्यावर त्या पुरुषाची 'ज्योति-प्रकाश' कशात असतो? त्यानंतर वाणी ही त्याचे तेज असते. वाणी मौन झाल्यावर आत्मा हीच त्याची ज्योती असते.

'अत्रायं पुरुषः स्वयं ज्योतिर्भवति' (बृहदारण्यकउपनिषद ४।३।९, ४।३।१४) -तेव्हा तो पुरुष आत्मज्योती असतो होतो.

'यद्वै तन्न विजानाति विजानन् वै तन्न विजानाति। न हि विज्ञातुर्विज्ञातेर्विपरिलोपो विद्यतेऽविनाशित्वात्। न तु तद् द्वितीयमस्ति ततोऽन्यद्विभक्तं यद्विजानीयात्' (बृहदारण्यक उपनिषद ४।३।२०) - त्यावेळी तो जे जाणतो ते जाणत असूनही जाणत नाही. ज्ञात्याच्या ज्ञानशक्तीचा लोप, नाश तो अविनाशी असल्यामुळे होत नाही. त्यावेळी त्याच्याहून वेगळं काहीही त्याने जाणावं असं नसतंच, तो एकमेव असतो.

'सलिल एको द्रष्टाऽद्वैतो भवति' (बृहदारण्यक २।३।३२) - पाणी (सृष्टीपूर्वी) एकच द्रष्टे अद्वितीय होते.

'येनेदं सर्वं विजानाति तं केन विजानीयात्.... विज्ञातारमरे केन विजानीयादिति। उक्तानुशासनासि मैत्रेयि। एतावदरे खल्वमृतत्वमिति होक्त्वा याज्ञवल्क्यो विजहार' (बृहदारण्यकउपनिषद ४।५।१५) - ज्याने हे सर्व जाणले जाते, त्याला कशाने जाणावे? विशेष ज्ञानीला कोण जाणणार? हे मैत्रेयी, तुला जे सांगण्यासारखे होते ते सांगितले. हेच ते अमृतत्व, असे म्हणून याज्ञवल्क्य संन्यस्त झाले. अन्यांकडून त्याला प्रकाशित करणे शक्य नाही, हे स्पष्टपणे जसे सांगितले तसेच ते इन्द्रियगोचर-दृष्टीला दिसू शकणारे नाही असेही सांगितले- **'यदेव साक्षादपरोक्षाद्ब्रह्म य आत्मा सर्वान्तरस्तं मे व्याचक्ष्येति। एष त आत्मा सर्वान्तरः। कतमो याज्ञवल्क्य सर्वान्तरः। न दृष्टेर्द्रष्टारं पश्येः। न श्रुतेः श्रोतारं शृणुयाः। न मतेर्मन्तारं मन्वीथाः। न विज्ञातेर्विज्ञातारं विजानीयाः। एष त आत्मा सर्वान्तरः। अतोऽन्यदार्तम्'** (बृहदारण्यक उपनिषद ३।४।२) जो साक्षात् अपरोक्षपणे ब्रह्म आहे जो आत्मा सर्वांच्या अंतरंगात असतो, त्याबद्दल सांग. तो हा सर्वांच्या आत असलेला आत्मा. याज्ञवल्क्य, कोण तो अन्तर्यामी? दृष्टीच्या द्रष्ट्याला तू पाहू शकत नाहीस. शब्दाचे श्रवण करणाऱ्याला ते ऐकू

शकत नाहीस. बुद्धीच्या बोद्ध्याला तू जाणू शकत नाहीस. विज्ञात्याच्या विज्ञात्याला तू जाणू शकत नाहीस. हा तो तुझा आत्मा आत वसतो. त्या पलिकडचे सर्व नाशवंत असते.

आत्म्याचा उपाधि/कारणरहित प्रेमास्पद होण्याविषयीचा अन्य उपनिषदांमध्ये न आलेला सिद्धांत या उपनिषदात आला आहे.

'प्रेय: पुत्रात् प्रेयो वित्तात् प्रेयोऽन्यस्मात् सर्वस्मादन्तरतरं यदयमात्मा' (बृहदारण्यक उपनिषद १।४।८) - आत्मतत्त्व-पुत्राहून अधिक प्रिय धनाहून प्रिय, अन्य सर्वांहूनही अधिक प्रिय आहे. आत्मा सर्व गोष्टींपेक्षा अधिक अंतरतम आहे. हाच विचार मैत्रेयी ब्राह्मणात आला आहे. **'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति'** आत्म्याच्या कार्यासाठी सर्व प्रिय होते (बृहदारण्यक २.४,४.५) येथे अत्यंत विस्तारपूर्वक चर्चिला आहे. आत्म्याचे उपाधिरहित प्रेमविषय होणं त्यांच्या आनन्दस्वरूपामुळे शक्य आहे.

'एषोऽस्य परम आनन्द:। एतस्यैवाऽऽनन्दस्यान्यानि भूतानि मात्रामुपजीवन्ति' (बृहदारण्यक उपनिषद ४।३।३२) - हा त्याचा परमआनंद आहे. या आनंदाच्या मात्रेला आधारूनच अन्य प्राणी जिवंत रहातात.' असा सम्राट जनकाला 'अभय' प्राप्त व्हावे यासाठी उपदेश केला.

आत्मा स्वत:सिद्ध द्रष्टा आहे, तो परमानंदरूप आहे हे सांगून सर्ववेदान्ताचा निष्कर्ष अशा कैवल्य वा मुक्तीचा विचार हे उपनिषद् करते.

'स एष नेति नेत्यात्मा। अगृह्यो न हि गृह्यते। अशीर्यो न हि शीर्यते। असङ्गो न हि सज्यते। असितो न व्यथते। न रिष्यति' (बृहदारण्यउपनिषद ३।९।२६) - तो आत्मा नेति-नेति- असा नाही, असाही नाही असा वर्णिला आहे. तो अगृह्य आहे, त्याचे ग्रहण करता येत नाही. तो अशीर्य आहे. तो नष्ट होत नाही, तो असंग आहे- तो लिप्त होत नाही. तो अबद्ध आहे तो दु:खी होत नाही की क्षीण होत नाही. येथील 'असंगत्व' गुणात भगवद्‌गीतेतील अनासक्ति योगाचे बीज रोवले आहे.

'नेति नेति' असा गूढार्थाने सुचवलेला अर्थ, ब्रह्मवेत्यांच्या सभेत गार्गी-याज्ञवल्क्य यांच्या संवादात स्पष्टपणे कथन केला आहे.

'स होवाच। एतद्वै तदक्षरं गार्गि ब्राह्मणा अभिवदन्ति, अस्थूलमनण्वह्रस्वम-दीर्घमलोहितमस्नेहमच्छायमतमोऽवाय्वनाकाशमसङ्गमरसमगन्धमचक्षुष्कम-श्रोत्रमवागमनोऽतेजस्कमप्राणममुखममात्रमनन्तरमबाह्यम्। न तदश्नाति किंचन। न तदश्नाति कश्चन' (बृहदारण्यक उपनिषद ३।८।८) - याज्ञवल्क्य म्हणाले-

गार्गी या तत्त्वाला ब्रह्मवेत्ते अक्षर म्हणतात. ते मोठं नाही की सूक्ष्म नाही, तो लांब नाही की आखूड नाही. ते लाल नाही, ते द्रव नाही, ते छाया नाही. ते अंधकार नाही, ते वायू नाही की आकाश नाही, ते सक्त नाही, ते रस नाही, गंध नाही, नेत्र नाही की कान नाही, न वाणी आहे की मन नाही, ते मन नाही की प्राण नाही, ते मुख नाही, ते परिमेय नाही, त्यात आत नाही की बाहेर नाही. ते काही खात नाही. त्याला ही कोणी खात नाही.

'**तद्वा एतदक्षरं गार्ग्यदृष्टं द्रष्टृ, अश्रुतं श्रोतृ, अमतं मन्तृ, अविज्ञातं विज्ञातृ। नान्यदतोऽस्ति द्रष्टृ। नान्यदतोऽस्ति श्रोतृ। नान्यदतोऽस्ति मन्तृ। नान्यदतोऽस्ति विज्ञातृ। एतस्मिन्नु खल्वक्षरे गार्ग्याकाश ओतश्च प्रोतश्चेति**' (बृहदारण्यक ३।८।११) – हे गार्गी हे अक्षर दर्शनाचा, श्रवणाचा, मननाचा, विज्ञानाचा विषय नाही, उलट तेच द्रष्टा, श्रोता, मनन करणारा आणि विज्ञाता आहे. त्याशिवाय अन्य कोणी द्रष्टा, श्रोता, मननशील, विज्ञानी नाही. अग गार्गी याअक्षरातच पूर्ण आकाश ओतप्रोत आहे.

केवल आत्म्यालाच उद्देशून असा जो यातला 'अमात्रम्, अनन्तरम्, अबाह्यम्' हा अंश घेऊन चतुर्थआत्मतत्त्वपर माण्डूक्योपनिषद् प्रवृत्त झाले आहे, असा तर्क करणे शक्य आहे. आत्म्याचे स्वयंप्रकाशित्व आणि केवलत्व हे बृहदारण्यकोनिषदात नि:संदिग्धपणे सांगितले आहे हा या उपनिषदाचा इतर उपनिषदांपासून वेगळेपणा आहे.

तैत्तिरीयोपनिषद् परमार्थवस्तूची आनन्दरूपता विज्ञानगुणाहून आतली, अधिक सूक्ष्म म्हणून सांगते, हा भेद लक्षणीय आहे– '**तस्माद्वा एतस्माद्विज्ञानमयात्। अन्यतर: आत्माऽऽनन्दमय:। तेनैष पूर्ण:।**' (तैत्तिरीय २।५) त्या ह्या विज्ञानमयाहून अन्य, अन्तरंग आत्मा आनंदमय आहे. त्याने तो पूर्ण आहे.

शिवाय तेथे आत्म्यापासून क्रमाने आकाशादि पाच पंचमहाभूतांची उत्पत्ति सांगितली. नंतर अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय आत्म्याचं वर्णन केलंय. या क्रमात पुढचे पुढचे रूप अधिक आतलं, सूक्ष्म हेही तेथे निश्चित केले आहे. पाच प्रकारच्या आत्म्याचे स्वरूपवर्णन हा या उपनिषदाचा एक विशेष लक्षात घेण्यासारखा आहे.

शिवाय आत्म्याची असत्‌रूपता, असतापासून सद्रूपाने परिणति सांगितली आहे. '**असद्वा इदमग्र आसीत्। ततो वै सदजायत। तदात्मानं स्वयमकुरुत**' (तैत्तिरीय उपनिषद २।७) – आधी सर्व असत्– काहीच नव्हतं. त्यातून नंतर सत् निर्माण झालं. त्याने स्वत:ला निर्माण केले. याच्या विरोधी वचन छांदोग्यात

आलंय.

‘कथमसत: सज्जायेतेति। सत्त्वेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम्’ (छांदोग्य ६।२।२) – असत्मधून काहीच नसलेल्यातून सत् कसे निर्माण होईल? एक सद् वस्तूच सौम्य, पूर्वी होती– तीच एकच अद्वितीय अशी वस्तु होती.’ या विरोधाचा परिहार बृहदारण्यकातल्या ‘अव्याकृत’ अस्पष्ट, अविभक्त शब्दप्रयोगाने झाला. **‘तद्धेदं तर्ह्यव्याकृतमासीत्। तन्नामरूपाभ्यामेव व्याक्रियत, असौनामाऽयमिदंरूप इति’** (बृहदारण्यक उपनिषद १।४।७) – तर हे सर्व अविभक्त, अस्पष्ट होते. त्याने ते नाम आणि रूप यांच्यामध्ये विभागले. ‘हा या नावाचा या रूपाचा’ असे. जग परस्पर विरुद्धधर्मांनी युक्त जग असल्याचे तैत्तिरीयकामध्ये म्हटले आहे. ते एकच आत्म्याच्या सद् आणि असद् अशा दोन्ही प्रकारच्या असण्यामुळे सुसंगत ठरते. ते असे सांगितले– **‘स तपस्तत्वा, इदं सर्वमसृजत, यदिदं किंच। तत्सृष्ट्वा, तदेवानुप्राविशत्। तदनुप्रविश्य, सच्च त्यच्चाभवत्। निरुक्तं चानिरुक्तं च। निलयनं चानिलयनं च। विज्ञानं चाविज्ञानं च। सत्यं चानृतं च। सत्यमभवत्। यदिदं किंच। तत्सत्यमित्याचक्षते’** (तैत्तिरीय उपनिषद २।६) – त्याने तप करून हे जे काही आहे ते सर्व निर्माण केले आणि त्यातच प्रवेश केला. प्रवेश करून तेच ‘सत्’ आणि ‘त्यत्’ झाले (मूर्त आणि अमूर्त) व्यक्त करता येण्याजोगे आणि शब्दापलिकडचे, आश्रय देणारे, आश्रयाला असमर्थ, चेतनायुक्त आणि अचेतन. सत्य आणि असत्य, हे सर्व सत्यस्वरूप परमात्माच आहे. त्यालाच सत्य असे म्हणतात.

कठोपनिषदात भोक्त्याहून भिन्न सर्वांपलिकडचा गूढ आत्मा वर्णिला आहे. भोक्त्यापेक्षा वेगळा दाखवणे हे येथील वैशिष्ट्य. भोक्ता येथे इन्द्रिय, मन यांनी युक्त असलेला आत्मा येथे सांगितला आहे. तो कर्म आणि ज्ञान यांच्यामुळे त्या त्या योनीत जन्म मिळवतो. त्याचाच अंतरात्मा म्हणजे व्यापक आणि अनिर्देश्य परमात्मा. त्याचे सर्व इन्द्रियांदींपेक्षा श्रेष्ठत्व दोनवेळा, वेगवेगळ्या शब्दात सांगितले आहे. **‘इन्द्रियेभ्य: परा ह्यर्था अर्थेभ्यश्च परं मन:। मनसस्तु परा बुद्धिर्बुद्धेरात्मा महान् पर:।। महत: परमव्यक्तमव्यक्तात्पुरुष: पर:। पुरुषान्न परं किंचित् सा काष्ठा सा परा गति:।।’** (काठक उपनिषद ३।१०,११) – विषय इंद्रियांहून श्रेष्ठ आहेत, त्याहून मन श्रेष्ठ आहे. मनाहून बुद्धि आणि बुद्धीहून आत्मा श्रेष्ठ आहे. महान आत्म्याहून अव्यक्त (माया) तत्त्व श्रेष्ठ त्याहून पुरुष श्रेष्ठ. त्याहून श्रेष्ठ काहीही नाही. तीच परिसीमा आणि श्रेष्ठ गति.

येथे सांगितलेल्या ‘अर्थ’ शब्द सोडून देऊन, बुद्धीचा उल्लेख ‘सत्त्व’पदाने

करून तोच भाव पुन्हा व्यक्त केला.

'इन्द्रियेभ्य: परं मनो मनस: सत्त्वमुत्तमम्। सत्त्वादधि महानात्मा महतोऽव्यक्तमुत्तमम्।। अव्युक्तात्तु पर: पुरुषो व्यापकोऽलिङ्ग एव च। यं ज्ञात्वा मुच्यते जन्तुरमृतत्वं च गच्छति।।' (काठक उपनिषद ६।७, ८)

इन्द्रियांहून मन श्रेष्ठ आहे. मनाहून बुद्धि श्रेष्ठ आहे. बुद्धीहून (जीवात्मा) आत्मा महान. त्याहून अव्यक्त तत्त्व श्रेष्ठ आहे. त्या अव्यक्ताहून व्यापक आणि अनिर्देश्य, परमपुरुष आहे. त्याला जाणून जीव मुक्त होतो आणि अमृतत्व प्राप्त करतो. इतर जे आत्म्याबद्दलचे निरूपण या उपनिषदात आले आहे, ते पूर्वीच्या इतर उपनिषदांप्रमाणेच आहे. सर्वांपेक्षा परमार्थतत्त्व अशा आत्म्याचे श्रेष्ठत्व हा येथील विशेष आहे.

श्वेताश्वतर उपनिषदात, भोक्ता-भोग्य-नियंत्रकाच्या रूपाने तीन प्रकारे अजाचे वर्णन केले आहे. भोक्त्या आत्म्याचे पारतंत्र्य आणि अज्ञान सांगितले. परमात्म्याचा देव शब्दाने विशेष निर्देश आहे. भोग्यार्थांनी युक्त प्रकृति मायारूपाने सांगितली. इतर उपनिषदांप्रमाणेच येथील विरुद्ध/वेगळी गोष्ट म्हणजे तीन अजांची कल्पना. मागील उपनिषदांमधील अद्वितीय ब्रह्माची कल्पना अंशत: तरी उपनिषद सोडत नाही असे **'त्रयं यदा विन्दते ब्रह्ममेतत्'** (श्वेताश्वतर. १।९) ईश्वर जीव आणि प्रकृती या तिघांनाही ब्रह्मरूपाने प्राप्त करून घेतो. या वचनावरून वाटतं.

मैत्रायणी उपनिषदात अद्वैतवादी उपनिषदांचा अनुवाद करून त्रिगुणांचा भोक्ता, चेतन आत्मा वर्णिला आहे. बद्ध जीवात्मा 'भूतात्म' शब्दाने उक्त आहे. येथे हे विचारात घेण्यासारखे आहे. तैत्तिरीय उपनिषदात अन्नमयादि आनंदमयान्त प्रकारचे आत्मरूप सांगितले. त्यांची कार्यरूपता हे उपनिषद् सुचवते. ते अशाप्रकारे-

'अन्नमात्मेत्युपासीत। इत्येवं ह्याह। अन्नाद्भूतानि जायन्ते जातान्यन्नेन वर्धन्ते। अद्यतेऽत्ति च भूतानि तस्मादन्नं तदुच्यते। अथान्यत्राप्युक्तम्। विश्वभृद्वै नामैषा तनूर्भगवतो विष्णोर्यदिदमन्नम्। प्राणो वा अन्नस्य रस:। मन: प्राणस्य। विज्ञानं मनस:। आनन्दं विज्ञानस्येति' (मैत्रायणी उपनिषद ६।१२) - अन्नाची आत्मा म्हणून उपासना करावी, अन्नातून प्राणिमात्र जन्माला येतात. अन्नाने वाढतात. जे खाल्ले जाते आणि जे खाते तेही अन्न. म्हणून त्याला अन्न म्हणतात. असंच इतरत्रही म्हटलं आहे- विश्वाचे भरण करणारी ही भगवंताची - भगवान विष्णूंची मूर्ती म्हणजे अन्न होय. प्राण हा अन्नाचा रस आहे. प्राणाचा रस मन आहे. विज्ञान मनाचा रस आणि आनंद हा विज्ञानाचा रस.

आत्मा शब्दाने सांगितलेल्या परमपदार्थ - परमतत्त्व, त्याचे निरूपण करून, हा सिद्धान्त प्रमाण मानून, ओघानेच पुढील आकाशादि निर्माण झालेल्या वस्तूही आत्माच आहेत. या सिद्धांताची- त्याला बळकटी देणारी उदाहरणे प्रस्तुत करीत आहोत. ऐतरेय उपनिषदात आकाशादि पञ्चमहाभूते, पञ्चप्रकारचा आत्मा यांचे वर्णन करून त्यांचे अन्नत्व आणि अन्नादत्व - अन्न खाणे हा गुण दाखवून, प्राण धारण करणाऱ्या झाडे क्षुद्र वनस्पती आणि माणूस यांची उत्तरोत्तर प्रगत अशी आत्म्याची प्रकटरूपता सिद्ध केली.

'पृथिवी वायुप्रकाश आपो ज्योतींषीत्येष वा आत्मा... तस्मिन् योऽन्नं चान्नादं च वेद, अहास्मिन्नन्नादो जायते। भवत्यस्यान्नम्। आपश्च पृथिवी चान्नम्। एतन्मयानि ह्यन्नानि भवन्ति। ज्योतिश्च वायुश्चान्नादम्। एताभ्यां हीदं सर्वमन्नमत्ति। आवपनमाकाशः। .... ओषधिवनस्पतयोऽन्नम्। प्राणभृतोऽन्नादम्। ... तेषां य उभयतोदन्ताः ... तेऽन्नादाः। अन्नमितरे पशवः। ... पुरुषे त्वेवाविस्तरामात्मा। स हि प्रज्ञानेन संपन्नतमः' (ऐतरेय आरण्यक २।३।१,२) - पृथ्वी, वायु, आकाश, आप आणि तेज हा आत्मा आहे. त्यात जो अन्न आणि अन्नादाला जाणतो, तो हा येथे अन्नाद होतो. त्याला अन्न मिळते. आप आणि पृथ्वी अन्न आहेत. यांनी युक्तच अन्न-अन्नपदार्थ असतात. तेज आणि वायु हे अन्नाद-अन्न खाणारे आहेत. या दोघांनीच सर्वजण अन्न खातात. आकाश उत्पत्तिस्थान, ...तृणधान्ये झाडे हे अन्न आहे. प्राणधारण करणारे अन्न खातात. त्यांच्यापैकी ज्यांना दोन्ही बाजूंनी दात असतात. ते अन्नाद-अन्न खाणारे असतात. इतर पशु इ. अन्न होत...... पुरुषातच आत्मा अधिक स्पष्टरूपाने प्रकट होतो. तो प्रज्ञानाने सर्वाधिक संपन्न आहे. यात विचार असा- भोक्ता आणि भोग्यपदार्थ या दोन्ही प्रकारे असलेला आत्मा मनुष्यापर्यंत क्रमाने बदलत गेला- प्रगत झाला. मनुष्यरूप ही सृष्टिपरिणामाची चरमसीमा उच्चतम, प्रकटीकरण असं येथे अभिप्रेत आहे. लोकपालादि देवताही अग्नी इत्यादी पुरुषरूपाने परिणत होऊनच भोक्ते होतात, त्या खेरीज नाही हे आत्मषट्कात स्पष्ट केलं आहे. 'पुरुष हीच आत्म्याची अत्यंत प्रशंसनीय पूर्ण आविष्कृती' असे प्रतिपादन करणे हेच या उपनिषदाचे इतर उपनिषदांहून वेगळेपण आहे.

बृहदारण्यकात पतिपत्नींचे मिथुनातून निर्माण झालेली सृष्टी आत्माच आहे, असे प्रतिपादन केले आहे.

'आत्मैवेदमग्र आसीत् पुरुषविधः। सोऽनुवीक्ष्य नान्यदात्मनोऽपश्यत' 'सोऽवेत्, अहं वाव सृष्टिरस्मि, अहं हीदं सर्वमसृक्षीति, ततः सृष्टिरमवत्'

इत्युक्तम्। (बृहदारण्यक उपनिषद १।४।१-५) - प्रथम हा पुरुषाकार आत्माच होता. निरीक्षणाने त्याला इथे आपल्याशिवाय कुणी नाही असं दिसून आलं. अशी सुरवात करून पुढे मिथुनयुक्त सृष्टीचे प्रतिपादन करून अखेर सांगितले. (प्रजापतीने) त्याने जाणले 'मीच सृष्टी आहे. मी या सर्वांची रचना केली आहे. म्हणून तो सृष्टी झाला. पुढे मैत्रेयी ब्राह्मणात सांगितले-

'इदं ब्रह्मेदं क्षत्रमिमे लोका इमे देवा इमानि भूतानीदं सर्वं यदयमात्मा' (बृहदारण्य उपनिषद २।४।६) - ब्राह्मण जाति, क्षत्रिय जाति, हे लोक, देवसमूह, सर्व प्राणिमात्र आणि जे काही आहे ते सर्व आत्माच आहे.

जगात आत्माशब्दाचा प्रयोग मुख्यत्वे माणसांसाठी होतो. त्याला अनुसरूनच वेदांमध्ये आणि उपनिषदात आत्मा शब्द मनुष्यांसाठी वापरला आहे. जगात प्रसिद्ध असलेला आत्मचिंतन शब्द, त्याचा अर्थ आत्म्याचा केलेला विचार हाच उपनिषदातील आत्मनिश्चयात आत्मसिद्धान्तात पर्यवसित झाला आहे. बृहदारण्यक सांगते - **'अथो अयं वा आत्मा सर्वेषां भूतानां लोकः। स यज्जुहोति यद्यजते तेन देवानां लोकः। अथ यदनुब्रूते तेन ऋषीणाम्। अथ यत्पितृभ्यो निपृणाति यत्प्रजामिच्छते तेन पितॄणाम्। अथ यन्मनुष्यान् वासयते यदेभ्योऽशनं ददाति तेन मनुष्याणाम्। अथ यत्पशुभ्यस्तृणोदकं विन्दति तेन पशूनाम्। यदस्य गृहेषु श्वापदा वयांस्या पिपीलिकाभ्य उपजीवन्ति तेन तेषां लोकः। यथा ह वै स्वाय लोकायारिष्टिमिच्छेत्, एवं हैवंविदे सर्वाणि भूतान्यरिष्टिमिच्छन्ति। तद्वा एतद्विदितं मीमांसितम्'** (बृहदारण्य उपनिषद १।४।१६) - (शरीरेन्द्रियविशिष्ट) जीव हा सर्व प्राणिमात्राचा भोग्य असतो. त्याच्या हवनाने, यजनाने देवांचा भोग होतो. तो जे स्वाध्याय-अध्ययनादि करतो त्याने ऋषींना भोग मिळतो. तो पितरांना पिंड देतो आणि प्रजा निर्माण करतो त्याने पितरांना भोग मिळतो. मनुष्यांना आसरा व अन्न दिल्यामुळे माणसांचा, मुंगीपासून घरातल्या पशूंना पक्ष्यांना अन्नपाणी दिल्यामुळे त्यांचा भोगविषय होतो. ज्याप्रमाणे स्वतःच्या देहाचा विनाश माणूस इच्छित नाही, त्याप्रमाणे हे जाणणाऱ्या मनुष्याचा नाश होऊ नये अशी इच्छा सर्व भूतमात्रे करतात. या कर्तव्य कर्माची मीमांसा (पञ्चमहायज्ञ प्रकरणाने) केली आहे.

येथे धर्म आणि अधर्म याचा आधार असलेला शरीर-इंद्रियांचा समुदाययुक्त मनुष्याचा 'आत्मा' म्हटला जातो. त्यानंतर पुन्हा तोच कर्माचा अधिकारी-आत्मा शब्दानेच उल्लेखिला आहे. पहा-

'आत्मैवेदमग्र आसीदेक एव। सोऽकामयत, जाया मे स्यात्, अथ प्रजायेय,

अथ वित्तं मे स्यात्, अथ कर्म कुर्वीयेति' (बृहदारण्यक उपनिषद १।४।१७) – प्रारंभी एकटा आत्माच फक्त होता. त्याने इच्छा केली मला पत्नी असावी. मी प्रजा उत्पन्न करावी. मला धन मिळावं, मी कर्म करावे. मन, प्राण, नेत्र, कर्ण, वाणी इत्यादींनी युक्त पूर्ण पुरुषच आत्मा, असा या उपनिषदाचा निश्चय आहे. पहा–

'**अकृत्स्नो हि स प्राणन्नेव प्राणो नाम भवति, वदन् वाक्, पश्यंश्चक्षुः, शृण्वन् श्रोत्रम्, मन्वानो मनः। तान्यस्यैतानि कर्मनामान्येव। स योऽत एकैकमुपास्ते न स वेद। अकृत्स्नो ह्येषोऽत एकैकेन भवति। आत्मेत्येवोपासीत। अत्र ह्येते सर्व एकं भवन्ति**' (बृहदारण्यक उपनिषद १।४।७) – (अखंड आत्मा कळत नाही पण) अंशयुक्त तो श्वासोच्छ्वासामुळे प्राण म्हटला जातो. बोलणाऱ्याला वाणी म्हणतात. पहाणाऱ्याला डोळा, ऐकणाऱ्याला कान, मनन करणारा मन ही त्या आत्म्याची कामावरून पडणारी नावे आहेत. यातील एकमेकांची अंशाची जो उपासना करतो त्याला आत्मा कळत नाही. तो एकमेकांची अंशतः उपासना करणारा अपूर्णच रहातो. म्हणून पूर्ण आत्म्याची उपासना करावी. आत्मामध्येच सर्व एक होते– संपूर्ण कर्माची समृद्धी ज्यामुळे होते तो आत्मा हा अर्थ– निष्कर्ष निघतो.

छांदोग्यात (८.१२.४) नेत्र, नाक, वाणी, श्रोत्र, मनोरूप, आत्मा सांगितला आहे. त्यातील कमीजास्तपणा नष्ट करण्यासाठी हे प्रतिपादन आहे असे मानावे.

ऐतरेयोपनिषदात आत्मा शब्दाने पुरुषशब्दाचा पर्याय असलेल्या 'मनुष्य' शब्द वापरून त्याचाच पुत्र आत्मा म्हणून सांगितला. मरणोत्तर स्वर्गात जीवात्मा जन्म घेतो त्याला पण आत्माच म्हटले आहे. असा हा तीन अर्थांचा आत्मा शब्द एकाच संदर्भात आला आहे. रेताचा निर्देश करून सांगितलंय–

'आत्मन्येवात्मानं बिभर्ति' (ऐतरेयारण्यक २।५।१।१) आत्मनि म्हणजे स्वतःमध्येच स्वतःला रेतरूपानं पुत्राला धारण करतो. मनुष्याचे पुत्ररूपाने मरणानंतरही अस्तित्व रहाते. म्हणून म्हणतात– '**सोऽस्यायमात्मा पुण्येभ्यः कर्मभ्यः प्रतिधीयते।**' (ऐतरेयारण्यक २।५।१।४) तो त्याचा आत्मा पुण्यकर्मामुळे मागे प्रतिनिधीसारखा ठेवला जातो. या जगात पुण्यकर्म करण्यासाठी स्वतःचा आत्मा पुत्ररूपाने प्रतिनिधी म्हणून स्थापला जातो. मरणानंतर पुनर्जन्म धारण करणारी पुरुषाच्या आतील शक्ती–जीवशक्ती आत्मा शब्दाने येथे सांगितली आहे.

'**अथास्यायमितर आत्मा..... प्रैति। स इतः प्रयन्नेव पुनर्जायते**'(ऐतरेय–

आरण्यक २।५।१।४) – तो ह्याचा दुसरा आत्मा जातो... तो इथून गेलेलाच पुन्हा जन्माला येतो.

वामदेवाप्रमाणेच परलोकाला जाणाऱ्या, आत्मोपासनेने अमृतत्व प्राप्त करून घेणाऱ्या त्या आत्म्याचे स्वरूप सांगतात.

'येन वा पश्यति, येन वा शृणोति, येन वा गन्धानाजिघ्रनति, येन वा वाचं व्याकरोति, येन वा स्वादु चास्वादु च विजानाति। यदेतद्धृदयं मनश्चैतत्' (ऐतरेय आरण्यक २।६।१।२) –ज्याने जो पहातो, ज्याने तो ऐकतो, ज्याने ते गंध घेतो, ज्याने भाषण करतो, हा प्रज्ञात्मा, तेथेच सांगितला. छांदोग्यात हाच अशरीरी आत्मा म्हणून वर्णिला आहे.

'मघवन् मर्त्यं वा इदं शरीरमात्तं मृत्युना। तदस्यामृतस्याशरीरस्या–ऽऽत्मनोऽधिष्ठानम्। आत्तो वै सशरीरः प्रियाप्रियाभ्याम्। न वै सशरीरस्य सतः प्रियाप्रिययोरपहतिरस्ति। अशरीरं वाव सन्तं न प्रियाप्रिये स्पृशतः' (छांदोग्य उपनिषद ८।१२।१) – इन्द्रा, हे शरीर मरणाधीन आहे. त्याला मृत्यूने ग्रासले आहे. ते शरीरच अमर्त्य, शरीरहीन आत्म्याचे अधिष्ठान आहे. शरीरयुक्त आत्मा प्रिय आणि अप्रिय यांनी बांधला जातो. शरीरात असताना प्रिय–अप्रिय याचा नाश होत नाही. तो जेव्हा शरीरापासून मुक्त होतो तेव्हा त्याला प्रिय आणि अप्रिय स्पर्श करू शकत नाहीत. (द्वंद्वरहित होतो) पूर्वी सांगितलेला परमार्थसत्य वस्तु आत्मा हे एकच आहेत. परमार्थस्वरूपाने स्वतःला ओळखणे हीच शरीरधारी मनुष्य म्हटल्या जाणाऱ्या आत्म्याचे परम–श्रेष्ठ प्रयोजन– जीवित कर्तव्य आहे. पुण्य लोकांची प्राप्ती हे दुसरे प्रयोजन, त्या त्या आश्रमातील कर्माने पुण्यलोकप्राप्ति आणि ब्रह्मनिष्ठेनं, स्वरूपज्ञानरूपी अमृतत्वप्राप्ती होते. हे कुठे एकीकरणानं तर क्वचित विभागून हे सांगितले आहे. समुच्चयाने असं सांगतात.

'त्रयो धर्मस्कन्धाः। यज्ञोऽध्ययनं दानमिति प्रथमः। तप एव द्वितीयः। ब्रह्मचार्याचार्यकुलवासी तृतीयोऽत्यन्तमात्मानमाचार्यकुलेऽवसादयन्। सर्व एते पुण्यलोका भवन्ति। ब्रह्मसंस्थोऽमृतत्वमेति' (छांदोग्य उपनिषद २।२३।१) – तीन धर्माचे आधारस्तंभ आहेत– यज्ञ, अध्ययन, दान. हा पहिला तप, हा दुसरा. तिसरा धर्मस्कन्ध म्हणजे आचार्यकुलात रहाणारा, आपल्याला श्रमवणारा ब्रह्मचारी. हे सर्व पुण्य लोकांचे भागीदार होतात. ब्रह्मचारी अमृतत्वाला प्राप्त होतो. ब्रह्मनिष्ठत्व हे स्वरूपाची प्राप्ती करून देणारे असते.

'एवमेवैष संप्रसादोऽस्माच्छरीरात्समुत्थाय परं ज्यातिरूपसंपद्य स्वेन

रूपेणाभिनिष्पद्यते। स उत्तमपुरुषः' (छांदोग्य उपनिषद ८।१२।२) – अशाच प्रकारे हा संप्रसाद, या शरीरातून बाहेर पडून ज्योतीरूप होऊन स्वतःच्याच रूपाने पुन्हा उत्पन्न होतो. तो उत्तम पुरुष. गृहस्थाची कर्मे करीतच तो ब्रह्मसम्पन्न ब्रह्म होतो असे छांदोग्यात उपसंहारात सांगितले आहे.

'**आचार्यकुलाद्वेदमधीत्य यथाविधानं गुरोः कर्मातिशेषेण, अभिसमावृत्य, कुटुम्बे शुचौ देशे स्वाध्यायमधीयानो धार्मिकान् विदधदात्मनि सर्वेन्द्रियाणि संप्रतिष्ठाप्य, अहिंसन् सर्वभूतान्यन्यत्र तीर्थेभ्यः। स खल्वेवं वर्तयन् यावदायुषं ब्रह्मलोकमभिसंपद्यते। न च पुनरावर्तते न च पुनरावर्तते**' (छांदोग्य उपनिषद ८।१५।१) – गुरुकुलात राहून गुरूंची सेवा, कामे करून शिल्लक राहिलेल्या काळात विधिपूर्वक वेदाध्ययन– पाठांतर व अर्थाज्ञानासह करून, गुरुकुलातून निवृत्त होऊन (समावर्तन करून) कुटुंबामध्ये पवित्र ठिकाणी राहून स्वाध्याय (अध्ययन, अध्यापन) करीत, संबंधित जनांना धार्मिक बनवीत (स्वतः धार्मिक आचार उत्तम रितीने आचरण करीत व इतरांनाही आचरण करायला लावीत.) सर्व इन्द्रिये (मनासह) आत्मरूपात स्थिर करून, शास्त्रोक्त विधीशिवाय यज्ञादींशिवाय इतरत्र हिंसा न करता, सर्व प्राण्यांना अभय देणारा अशा रीतीने संपूर्ण आयुष्यभर जगल्यास माणूस, ब्रह्मलोकाला प्राप्त होतो. तो पुन्हा परत येत नाही, पुन्हा जन्माला येत नाही.

कर्मनिष्ठांना मिळावा वाटणारा हा सापेक्षनित्य ब्रह्मलोक नव्हे, तर परमार्थवस्तु आत्माच कारण याच अध्यायात तशा ब्रह्माचा उल्लेख आला आहे.

'**अय य आत्मा स सेतुर्विधृतिरेषां लोकानामसंभेदाय। नैतं सेतुमहोरात्रे तरतो न जरा न मृत्युर्न शोको न सुकृतं न दुष्कृतम्। सर्वे पाप्मानोऽतो निवर्तन्ते। अपहतपाप्मा ह्येष ब्रह्मलोकः**' (छांदोग्य उपनिषद ८।४।१) – हा आत्मा आहे. हा लोकांमध्ये त्यांना विशेषप्रकारे धारण करून त्याचात भेद होऊ नये म्हणून निर्माण केलेला सेतु आहे. हा सेतू दिवसरात्र यांना ओलांडत नाही. याला जरामृत्यु, पाप–पुण्य व चांगली वाईट कर्मे यांचा लेप लागत नाही. सर्व पापे यापासून दूर पळतात. कारण हा ब्रह्मलोक पापरहित आहे. जरी याच संदर्भात

'**तद्य एवैतं ब्रह्मलोकं ब्रह्मचर्येणानुविन्दन्ति तेषामेवैष ब्रह्मलोकः**'(छांदोग्य ८।४।३) – जे लोक ब्रह्मचर्याने ब्रह्मलोक मिळवतात त्यांचाच ब्रह्मलोक आहे. या विधानामुळे ब्रह्मचर्य हेच ब्रह्मलोक प्राप्तीचे साधन आहे, असा निश्चय– सिद्धांत सांगितला. त्यामुळे 'गृहस्थाश्रम' त्यातून वगळला जातो– त्याने ब्रह्मलोक नाही असे म्हणावे लागेल. पण तिथेच पुढे यज्ञ, सत्र यांचाही निर्देश ब्रह्मचर्य

शब्दाचा अर्थ म्हणून सांगितल्यामुळे गृहस्थाश्रमाचा निषेध प्राप्त झाला असूनही त्याला बाजूला सारलं– गृहस्थाश्रमीलाही ब्रह्मप्राप्ती सांगितली असं म्हणणं शक्य आहे.

बृहदारण्याकात संन्यास म्हणजे तीन एषणांचा त्याग ब्रह्मात्मप्राप्तीचा उपाय म्हणून सांगितला आहे. तो असा – **'स वा एष महानज आत्मा योऽयं विज्ञानमय: प्राणेषु। य एषोऽन्तर्हृदय आकाशस्तस्मिञ्छेते। ... स न साधुना कर्मणा भूयान्। नो एवासाधुना कनीयान्। एष सर्वेश्वर:। ... तमेतं वेदानु वचनेन ब्राह्मणा विविदिषन्ति यज्ञेन दानेन तपसाऽनाशकेन। एतमेव विदित्वा मुनिर्भवति। एतमेव प्रव्राजिनो लोकमिच्छन्त: प्रव्रजन्ति। एतद्ध स्म वै तत्पूर्वे विद्वांस: प्रजां न कामयन्ते। किं प्रजया करिष्यामो येषां नोऽयमात्माऽयं लोक इति। ते ह स्म पुत्रैषणायाश्च वित्तैषणायाश्च लोकैषणायाश्च व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरन्ति। या ह्येव पुत्रैषणा सा वित्तैषणा सा लोकैषणा। उभे ह्येते एषणे एव भवत:'** (बृहदारण्यक उपनिषद ४।४।२२) – तो हा महान अज आत्मा जो इंद्रियांमध्ये विज्ञानमय असतो. हा अन्तर्हृदयातील आकाशात राहतो. तो जीवाच्या चांगल्या कर्माने श्रेष्ठ वा वाईट कर्माने हलका ठरत नाही. हा सर्वेश्वर आहे. वेदवचनांवरून ब्राह्मण याला यज्ञ, दान, तप, इच्छा, निवृत्ती या मार्गांनी जाणण्याची इच्छा करतात. याला जाणतो तो मुनी होतो. याच संन्यास्यांनी मिळवण्याजोग्या लोकांचा प्राप्तीसाठी लोक संन्यास घेतात. हे सत्य जे पूर्वीच जाणतात ते प्रजा होण्याच्या इच्छा करीत नाहीत. 'आम्हाला प्रजा काय करायची' आमचा लोक हा आत्माच आहे' (असे ठरवून) पुत्रैषणा– मुलंकुटुंब याची अपेक्षा–वित्तैषणा–संसारासाठी धनप्राप्तीची अपेक्षा आणि लोकैषणा– समाजात मान प्रतिष्ठा मिळावी, नाव व्हावं हीसुद्धा इच्छा सोडून– सर्व इच्छांवर लाथ मारून भिक्षा मागून जगतात. जी पुत्रैषणा तीच वित्तैषणा जी वित्तैषणा तीच लोकैषणा. या दोन्ही इच्छाच आहेत. इत्यादि वाक्यांमध्ये पापपुण्य करणे हे साधन असलेले आत्मज्ञान हे संन्यासाने युक्त संन्यासामुळे प्राप्त होते असे सांगितले आहे. जरी यज्ञादिकर्मे येथे उपदेशिली असली तरी एषणानिवृत्ती झालेल्याचाच आत्मपदावर अधिकार सांगणारी श्रुती अशी आहे.

'तस्मादेवंविच्छान्तो दान्त उपरतस्तितिक्षु: समाहितो भूत्वाऽऽत्मन्येवात्मानं पश्यति। सर्वमात्मानं पश्यति। नैनं पाप्मा तरति। सर्वे पाप्मानं तरति। नैनं पाप्मा तपति। सर्वे पाप्मानं तपति। विपापो विरजोऽविचिकित्सो ब्राह्मणो भवति। एष ब्रह्मलोक: सम्राट्' (बृहदारण्यक उपनिषद ४।४।२२) – (ब्रह्म जाणारा

पापपुण्याने लिप्त होत नाही) हे जाणणारा शांत, इंद्रियजयी विरक्त, तितिक्षु, समाधानी, स्वत:मध्येच आत्म्याला पहाणारा होतो. सर्वच, सर्वत्र आत्माला पहातो. याला पाप चिकटत नाही. तो सर्व पापांतून तरून जाऊन अपाप होतो. पापरहित, इच्छारहित, संशयरहित असा हा ब्रह्मज्ञ होतो. हाच समाट्‌जनका तो ब्रह्मलोक प्राचीन उपनिषदांमध्ये परिव्रज्या-संन्यास हे बृहदारण्यकाचेच वैशिष्ट आहे असे ऐतिहासिक तत्त्ववेत्ते म्हणतात. नारायण, जाबाल इ. उपनिषदे जरी संन्यासाचे विधान करीत असली तरी ती आधुनिककाळातील आहेत अशी धारणा आहे.

परमानंदस्वरूप मोक्षलक्ष्मी ही आत्मकामी, कामनारहित, निष्पाप श्रोत्रियाचीच होते असा आश्रमकर्मींचा साक्षात् मोक्षसंबंध आहे. म्हणून म्हटलंय-

'यश्च श्रोत्रियोऽवृजिनोऽकामहत:। अथैष एव परम आनन्द:। एष ब्रह्मलोक: सम्राट्।' (बृहदारण्यक ४।३।३३) - जो श्रोत्रिय पापरहित आणि कामनाशून्य असतो त्याला तो परमानंद (जो मानुष आनंदाच्या मोठा असतो) प्राप्त होतो तोच ब्रह्मलोक सम्राट जनका! असे याज्ञवल्क्य म्हणाला.

पापापासून दूर रहाणे, शांति, समाधान, विज्ञान (अनुभव) सहित आत्मप्राप्तिसाधन बृहदारण्यकाप्रमाणे काठकोपनिषद्‌ही सांगते. तेथे साक्षात्कार या साधनातील न्यूनतेच्या पूर्तीसाठी, परमात्म्याने केलेले वरण-चयन-निवड हे एक अधिक साधन उपदिष्ट आहे.

'नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन। यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनूं स्वाम्।।' (काठक उपनिषद २।२३) - 'हा आत्मा (स्वाध्याय) प्रवचनाने, बुद्धीने वा खूप ऐकलेल्या ज्ञानाने प्राप्त होत नाही. तो परमात्मा ज्याला वरतो, त्यालाच लाभतो. त्याला तो आपले स्वरूप (शरीर) उघडे करून दाखवते. समाधीला साधनभूत योगाचाही विचार तेथे प्रकट केला आहे- **'यदा पञ्चावतिष्ठन्ते ज्ञानानि मनसा सह। बुद्धिश्च न विचेष्टति तामाहु: परमां गतिम्।। तां योगमिति मन्यन्ते स्थिरामिन्द्रियधारणाम्। अप्रमत्तस्तदा भवति योगो हि प्रभवाप्ययौ।।'** (काठक उपनिषद ६।१०) - (आपापल्या विषयांपासून निवृत्त होऊन) जेव्हा पाच इंद्रिये मनाबरोबर रहातात आणि बुद्धी आपल्या कार्यापासून निवृत्त होते. तेव्हा त्या स्थिर इंद्रियांच्या धारणेला परमगति असे म्हणतात. तेव्हा मुमुक्षु प्रमादरहित होतो. त्याचा आत्म्याशी योग होतो पण या योगाला उदय आणि अस्त दोन्ही असल्यामुळे योग्याला निरंतर अभ्यास करावा लागतो.

वाय १८२-२६

श्वेताश्वतर उपनिषद् पूर्वीच्या उपनिषदांनी सांगितलेल्या सर्व साधनांचा अनुवाद करून सांख्ययोग (ज्ञान) भक्ति, देवप्रसाद या सर्वांचे साधनत्व साधते.

'तत्कारणं सांख्योगाधिगम्यं ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः' (श्वेताश्वतर उपनिषद ६।१३) – ज्ञानयोग आणि कर्मयोग या साधनांनी जाणल्या जाणाऱ्या त्या जगत्कारण अशा देवाला जाणून मनुष्य सर्व (भव) पाशांमधून मुक्त होतो. **'तपःप्रभावाद्देवप्रसादाच्च ब्रह्म ह श्वेताश्वतरोऽथ विद्वान्'** (श्वेताश्वतर उपनिषद ६।२१) – श्वेताश्वतर ऋषीने तपःसामर्थ्याने आणि परमेश्वरी प्रसादाने त्या ब्रह्माला जाणले. **'यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ। तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः।'** (श्वेताश्वतर उपनिषद ६।२३) – ज्याची परमेश्वरावर आणि गुरुवर पराकाष्ठेची भक्ती असते, त्याच्या हृदयातच सांगितलेले (रहस्यमय) अर्थ प्रकाशित होतात. छांदोग्यात आश्रमकर्मांनी युक्त, बृहदारण्यकात संन्यासयुक्त, काठकात समाधियोगसहित, श्वेताश्वतरोपनिषदात, देवभक्तियुक्त आत्मदर्शनाने मोक्ष मिळतो, असे प्रतिपादन आढळते.

उपनिषदांचा अभ्यास करणाऱ्या पाश्चात्य विद्वानांचा उपनिषदांवर आक्षेप आहे तो असा– सर्व उपनिषदे परमार्थसत्य आत्मतत्त्वाची चर्चा करतात. आत्म्याच्या शुद्धीचे साधन असलेल्या श्रेष्ठ नीतिरूप धर्माला परमार्थप्राप्तीचे प्रधान साधन म्हणून स्वीकारत नाहीत. सत्याचा साक्षात्काराबद्दलच उपनिषदे बोलू इच्छितात. सत्याचा साक्षात्कार हाच परमपुरुषार्थ मानणारी उपनिषदे बौद्धिक विचाराला प्राधान्य देणारी, बुद्धीची वृद्धी करणारी आहेत. ती निष्पाप सुहृद्भाव सर्व भूतांच्या ठिकाणी ठेवणे या नीतीच्या अंतरंगतत्त्वाचा मुख्य तात्पर्य म्हणून उपदेश करीत नाहीत. हा पाश्चात्यांचा आक्षेप कौषीतकी उपनिषदातील एक वाक्याच्या आधारे आहे.

'स यो मां विजानीयात् नास्य केन च कर्मणा लोको मीयते। न मातृवधेन न पितृवधेन न स्तेयेन न भ्रूणहत्यया। नास्य पापं चन चकृषो मुखान्नीलं वेतीति' (कौषितकी उपनिषद ३।१) – जो मला जाणतो त्याचा कोणत्याही कर्माने ब्रह्मलोक नष्ट होत नाही. आईची हत्या करणारा, पितृघातक, चोर, श्रोत्रियाची हत्या करणारा, असूनही त्याचं मुख लज्जेने, पापाने काळे होत नाही. येथे आत्मज्ञानाने पापाचरण केले जरी तो दोषी नाही असे सांगितले. इतरत्र आत्मज्ञ पुण्य आणि पाप या दोहोच्याही पलिकडे जातो असे वर्णन आहे. हा आक्षेप उपनिषदांनी सांगितलेल्या बंध आणि मोक्ष यांची व्यवस्था करणाऱ्या विचारांचा विरोध करीत असल्यामुळे खोडता येतो. हा आक्षेप अपवादस्वरूप अशा

एकमेव उदाहरणावर आधारलेला असल्यामुळे फारसा लक्षात घेण्यालायक, उचित नाही.

मुख्य विचारप्रवाहाला अनुसरून काढलेला सामान्य निष्कर्षच 'सिद्धान्त' या संज्ञेला योग्य ठरतो. शिवाय वर उद्धृत केलेले कौषितकि उपनिषदातले वचन आत्मसाक्षात्काराच्या साधनांच्या चर्चेच्या ओघात आलेले नाही, तर ज्ञान-विधीविधानाच्या संदर्भाने प्रशंसार्थक अर्थवादरूप आहे. शिवाय कामवासनेनं पछाडलेलाच पापाला प्रवृत्त होतो. कशाची तरी आशा करणारा, कामाच्या आहारी गेलेला विशुद्ध आत्मसाक्षात्काराची आशाच करीत नाही. हा उपनिषदांचा निष्कर्ष नजरेआड करण्यासारखा नाही. तो अगदी प्रकट- प्रसिद्धच आहे. म्हणून पाश्चात्यांचा आक्षेप दुरूनच सोडून द्यायला हवा.

जे परमार्थ सत्य आत्मा शब्दाने व्यक्त करायचे आहे. तेच उपनिषदांमध्ये विश्वचैतन्यशक्तियुक्त ब्रह्मशब्दानेही सांगितले जाते.

'प्रज्ञानं ब्रह्म' (ऐतरेय आरण्यक २।६।१।३) - उत्तम ज्ञान म्हणजे ब्रह्म.

'स एतमेव पुरुषं ब्रह्म ततमपश्यत्' (ऐतरेय आरण्यक २।४।२।१३) - त्याने ह्याच पुरुषाला विस्तारित ब्रह्म म्हणून पाहिले.

'एष आत्मेति होवाच। एतदमृतमभयमेतद्ब्रह्मेति। तस्य ह वा एतस्य ब्रह्मणो नाम सत्यमिति' (छांदोग्य उपनिषद ८।३।४) - हा आत्मा असे तो म्हणाला. हे अमृत, अभय असे ब्रह्म आहे. त्या ह्या ब्रह्माचे नाव 'सत्य' असेही आहे.

'तदब्रह्मापूर्वमनपरमनन्तरमबाह्यम्। अयमात्मा ब्रह्म सर्वानुभूः। इत्यनुशासनम्' (बृहदारण्य उपनिषद २।५।१९) - ते हे ब्रह्म अपूर्व, नपर (अद्वितीय) अनन्तर अबाह्य आहे. हाच आत्मा सर्वांचा अनुभव घेणारा आहे, हाच वेदान्त वाक्याचा सिद्धांत आहे. इत्यादि वाक्ये ब्रह्माचे आत्मत्व, ब्रह्म=आत्मा असे सांगतात.

ब्रह्मन् या नपुंसकलिंगी शब्दाची विश्व आणि चैतन्य यांची अद्वैतबोधक शक्ति उपनिषद् पूर्वकालीच अर्थवेदाच्या सूक्तात आणि तैत्तिरीयादि ब्राह्मण-ग्रंथांमध्ये विकास पावली हा निर्देश आढळतो. अद्वितीय विश्वशक्तीला उद्देशून असलेली चार ब्रह्मपर सूक्ते अथर्ववेदाच्या शौनकीय शाखेत पठित आहेत. ब्रह्मपुराच्या शरीर रचना हा विषय असलेले सूक्त (१०.२) विश्वशरीररूप स्कम्भवर्णनसूक्त (१०।७), ज्येष्ठब्रह्मसूक्त (१०।८), पुरुषब्रह्मसूक्त (अथर्व ११।१०) तेथे प्रश्न उपस्थित करून ब्रह्मसिद्धांत स्थापिला आहे. **'केनेयं भूमिर्विहिता केन द्यौरुत्तरा हिता। केनेदमूर्ध्वं तिर्यक्चान्तररिक्षं व्यचो हितम्।।'**

(अथर्ववेद संहिता १०।२।२४) – कोणी ही भूमी स्थिर केली कोणी त्यावर स्वर्ग स्थापला? तिरके आकाश आणि अन्य विस्तार कुणी निर्माण केला? ब्रह्मानेच ही भूमि निर्माण केली. त्यानेच उत्तरेकडील द्यौ स्थापिली.

सर्वांचा आधार अशा स्तंभाचे वर्णन करून विश्वरूप अशा ब्रह्माला नमस्कार करतो. **'यस्य भूमिः प्रमाऽन्तारिक्षमुतोदरम्। दिवं यश्चक्रे मूर्धानं तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः।।'** (अथर्ववेद १०।७।३२) – पृथ्वीस्वरूपी पदक्षेप, अन्तरिक्षरूपी उदर आणि द्युलोकस्वरूप मस्तक असलेल्या स्कंभब्रह्माला नमस्कार असो. ब्रह्माची आत्म्यामध्ये स्थिती सांगतात. **'पुण्डरीकं नवद्वारं त्रिभिर्गुणेभिरावृतम्। तस्मिन् यद्यक्षमात्मन्वत्तद्वै ब्रह्मविदो विदुः।।'** (अथर्ववेद १०।८।४३) – सत्त्व, रज, तम या त्रिगुणांनी व्यापलेल्या मानवी शरीररूपी नवद्वारयुक्त कमळामध्ये निवास करणारे स्कंभरूपी आत्मतत्त्वाचे ज्ञान केवळ ब्रह्मवेत्त्यानाच होते. पैप्पलादसंहितेतील ब्रह्मसूत्र आहे. **'ब्रह्म दासा ब्रह्म दाशा ब्रह्मेमे कितवा उत। स्त्रीपुंसौ ब्रह्मणो जातौ स्त्रियो ब्रह्मोत वा पुमान्।।'** (पैपलाद संहिता ८।९) – ब्रह्मच दास, दाश, फसवे (चोर) स्त्री पुरुष ब्रह्मापासून निर्माण झाले. म्हणून स्त्री ब्रह्म पुरुषही ब्रह्मच. या सूत्राचा आधार घेऊनच बादरायणऋषींनी 'अंशो नानाव्यपदेशादन्यथा चापि दाशकितवादित्वमधीयत एके' हे ब्रह्मसूत्र (२।३।४३) रचले असे शंकराचार्य, रामानुज यांच्या भाष्यावरून लक्षात येते.

ब्रह्मसूत्रातील या सूत्राला अनुसरूनच तैत्तिरीयब्राह्मण ब्रह्मपदार्थाचे वर्णन करते. (तैत्तिरीय ब्राह्मण २।८।८।९) – **'ब्रह्म विश्वमिदं जगत्'** हे जग म्हणजे सर्व विश्वच आहे. **'ब्रह्मैव भूतानां ज्येष्ठम्'** ब्रह्मच प्राणिमात्रामध्ये श्रेष्ठ आहे. इ. तैत्तिरीय ब्राह्मणातच असाही संदर्भ आहे. **'किंस्विद्वनं क उ स वृक्ष आसीत्, यतो द्यावापृथिवी निष्टतक्षुः। मनीषिणो मनसा पृच्छतेदु तत्, यदध्यतिष्ठद्भुवनानि धारयन्।।'** (ऋग्वेद १०।८१।४) – तो कोणता वृक्ष आहे ज्यातून द्यावा पृथिवी निर्माण झाले? विद्वान लोक मनात विचार करतात की कोण हा या भुवनांना धारण करून स्थिर आहे? ऋग्वेदाच्या अस्यवामीय सूक्ताच्या प्रश्नाचा अनुवाद पाठभेदाने तैत्तिरीय ब्राह्मणात केला आहे. त्या प्रश्नाचे ब्रह्मवादपर उत्तर येथे सांगितले आहे. **'ब्रह्म वनं ब्रह्म स वृक्ष आस यतो द्यावापृथिवी निष्टतक्षुः। मनीषिणो मनसा विब्रवीमि वः ब्रह्माध्यतिष्ठद्भुवनानि धारयन्।।'** – हे विद्वानांनो, मी मनापासून तुम्हाला सांगतो. ब्रह्म हे वन तोच वृक्ष, त्यापासूनच द्यावापृथिवी निर्माण झाले. ब्रह्म भुवनांना धारण करतो. शतपथ ब्राह्मणातही **'सत्यं ब्रह्मेत्युपासीत्'** अशी सुरुवात करून शांडिल्यविद्या सांगितली आहे. याच

ब्राह्मणात सृष्टीची उत्पत्ति याच नपुंसकलिंगी ब्रह्मपासूनच झाल्याचे सांगितले आहे. **'ब्रह्म वा इदमग्र आसीत्' तद्देवानसृजत** (शतपथब्राह्मण ११।२।३।१)

ब्रह्म आधी (एकटंच) होतं. त्याने देवांना निर्माण केलं. तेथेच ब्रह्माचे नाम आणि रूप यांनी युक्त असणे सांगून पुढे देवांना अमृतत्वप्राप्ती ब्रह्मामुळे होत असे विधान केले आहे. गोपथब्राह्मणातही सृष्टीच्या आधीपासून अस्तित्वात असलेल्या ब्रह्माचे वर्णन केले आहे.

'ओं ब्रह्म ह वा इदमग्र आसीत् स्वयं लोकमेव।' (गोपथब्राह्मण १।१।१) ॐ आधी केवळ ब्रह्मच होते, ते स्वत: एकटे होते.

नपुंसकलिंगी ब्रह्मशब्द ऋग्वेदापासून सुरू करून शतपथ ब्राह्मणापर्यंत विश्वचैतन्यशक्तिरूप ब्रह्मशब्दाच्या अडथळ्याशिवाय ऐतिहासिक परंपरेने निश्चित करू शकतो. तसेच पवित्र समर्थ स्तोत्र या अर्थाने 'ब्रह्म' शब्दाचा अनेकवेळा उपयोग आढळतो. गायल्या जाणाऱ्या स्तोत्राने स्वर्गातले देव मर्त्यलोकात रहाणाऱ्या यजमानाकडे स्तोत्रबळाच्या प्रभावाने यज्ञात हजर होतात. देवांना उत्साह देऊन भक्तांवर कृपा करण्यासाठी स्तोत्र त्यांना प्रवृत्त करते. युद्धात विजयी होऊ इच्छिणाऱ्या यजमानाला शौर्यासाठी उत्तेजना देऊन मदत करणाऱ्या देवांना स्तोत्रच प्रवृत्त करते. शत्रू, रोग आणि पाप यांना पराभूत करून स्तोत्र भक्ताचे रक्षण करते. अशा प्रकारच्या ब्रह्मनावाच्या स्तोत्राचे सामर्थ्य ऋग्वेदात अनेक ठिकाणी वर्णिलेले आहे.

'ब्रह्म' शब्द 'बृह् धातूपासून' निर्माण झाले आहे ते वृद्धि कर. शक्ति देणे या अर्थाचे आहे. या अर्थातूनच 'महिमा' हा त्याचा अर्थ अखेरीस झाला. देवाचा महिमा सांगणारी स्तोत्रे परंपरेने 'ब्रह्म' शब्दाने ऋग्वेदकाळात उल्लेखिली जाऊ लागली. प्रतिपाद्यवर्ण्य विषयाला लावला जाणारा शब्द वर्णनाला-प्रतिपादनालाही लावला जातो हे जगात दिसते. 'बृंह' धातूपासून निर्माण झालेला अर्थ लक्षात घेऊनच ऋग्वेदात स्तोत्र-ब्रह्म शब्दाने सांगितलेलं देवांना वृद्धि करणारं पोषण देणारं, देवांना सामर्थ्य देणारं इ. वर्णन केलेलं योग्य प्रकारे सांगणे शक्य आहे. ऋषि गौतम इन्द्राला संबोधित करून म्हणतात- **'ब्रह्मा चकार वर्धनम्'** (ऋग्वेद १।८०।१) ब्रह्माने स्तोत्र केलं. ब्रह्मा या स्तोत्रानं 'वर्धन' म्हणजे तुझे वृद्धिकर स्तोत्र केले- या सूक्ताने केले हा अर्थ. इन्द्र, अग्नि, सोम, उषा, वरुण मित्र, रुद्र, अश्विनौ, ब्रह्मणस्पति इत्यादींचेसाठी ब्रह्माख्य स्तोत्र पुष्टिकर होते, असे वर्णन करण्याऱ्या ऋचा स्वत: जिज्ञासूंनी पहाव्यात. इन्द्राचे अश्व रथ ओढण्याच्या कामात स्तोत्रांनी प्रचोदना केल्यामुळे प्रवृत्त

होतात. हे 'ब्रह्मयुज:' (१.८२.६।१.८४.३।३,३५.४।८।१।२४) 'ब्रह्माने जोडलेले' या विशेषणाने विशेषित केले आहेत. इन्द्र हा **'ब्रह्मजूतस्तन्वा वावृधान:'** (ऋग्वेद ३.३४.१) ब्रह्माने प्रेरणा दिलेला, वाढणारा. द्यावापृथ्वींना व्यापून टाकतो. मन्त्रसामर्थ्यानेच इन्द्राचे कार्य होते.

'रूपंरूपं मधवा बोभवीति माया: कृण्वानस्तन्वं परि स्वाम्' (ऋग्वेद ३।५३।८) **'तद्देवानां देवतमाय कर्त्वमश्रघ्नन् दृळ्हाव्रदन्त वीळिता। उद्गा आजदभिनद् ब्रह्मणा वलमगूहत्तमो व्यचक्षयत् स्व:।।'** (ऋग्वेद २।२४।३)

ज्याने नमावयास योग्य त्याना तेजाने नमविले. क्रोधाने मेघांना विदीर्ण केले. त्या ब्रह्मणस्पतीने पाऊस पाडला आणि संपन्न पर्वतांमध्ये प्रवेश केला. इन्द्रादि देवांमध्ये देवतमाय- अत्यंत दानादिगुणांनी युक्त, (षष्ठीच्या जागी चतुर्थी), अशा ब्रह्मणस्पतीचे, ते कर्त्व म्हणजे कर्म, ते काय तर दृढ पर्वतादि... विभक्त वेगवेगळे झाले. तसेच विळितानि म्हणजे दृढीकृत वृक्ष आदि मऊ-मृदु झाले. गाई देवांकडे गेल्या. ब्रह्माने स्वत:च्या मंत्राने बल असुराला मंत्रसामर्थ्याने मारले. अंधाराला नष्ट केले आणि आदित्याला प्रकट केले- दाखवले.

या प्रमाणांनी ब्रह्मशब्दांनी सांगितलेलं स्तोत्र देवतांनाही सामर्थ्य आणि पोषण देण्यामुळे महिमा निर्माण करणारे ठरते, हा अभिप्राय ऋग्वेदात ब्रह्मपदा-संदर्भात खूप वेळा मिळतो. नंतर ऋग्वेदात देवाहूनही अधिक गौरव स्तोत्राला प्राप्त झाला. ही ब्रह्मशब्दाने व्यक्त झालेली स्तोत्रशक्ती उपनिषदातील ब्रह्म पदाच्या मुळाशी बीजरूपाने आहे असे निश्चितपणे म्हणता येईल.

पवित्र शक्तीने युक्त असा स्तोत्रासाठी असलेला ब्रह्म शब्द ऋग्वेदकाळातच वेदवाचक झाला होता. वेदाच्या व्रताचे आचरण करणारे प्रथमाश्रमातील ब्रह्मचारी शब्दाने निर्देश करतात. **'ब्रह्मचारी चरति'** (ऋग्वेद १०।१०९।५) ब्रह्मचारी व्रताचरण करतो. स्तोत्रवाचक ब्रह्मशब्दाचे वेदपरत्व पर्यवसान स्तोत्रांच्या वेदपरत्वामुळे योग्य वाटते- मिळतेजुळते आहे. ऋग्वेदातील देवाचा महिमा सांगणारा स्तोत्रपर ब्रह्मशब्द मनात ठेवूनच अर्थववेदात 'ब्रह्मचारिसूक्तम्' रचले. त्यात ब्रह्मचाऱ्याचे विश्वाला धारण करण्याचे सामर्थ्य विस्ताराने गाईले आहे ते म्हटलंय.

'पृथक् सर्वे प्राजापत्या: प्राणानात्मसु बिभ्रति। तान् सर्वान् ब्रह्म रक्षति ब्रह्मचारिण्याभृतम्।' (अथर्ववेद उच्छिष्ट ब्रह्म सूक्त ११।७।२२) प्रजापतीचे सर्व पुत्र वेगवेगळ्या देहांत प्राणाला धारण करतात. ब्रह्मचाऱ्याने धारण केलेले ब्रह्म

(म्हणजे ज्ञान) त्या सर्वांचे रक्षण करते. तेथेच पुढे ब्रह्मचारी सर्व देवांचा आश्रय वर्णिला गेला आहे. **'ब्रह्मचारी ब्रह्म भ्राजद्बिभर्ति तस्मिन् देवा अधिविश्वे समोता:'** (अथर्ववेद ११।७।२४)

ब्रह्मणस्पतीच्या पराक्रमाचे कारण जे शौर्य ते त्याला ब्रह्मामुळे मिळाले असे सांगते.

'ऋचो अक्षरे परमे व्योमन् यस्मिन् देवा अधि विश्वे निषेदु:' (ऋग्वेद १.१६४.३९) वेदात्मक शब्दब्रह्माचे सर्व देवांमध्ये रहाणे ऋग्वेदात वर्णन केलेले दिसते. वेदांचे अक्षर म्हणजे सर्व देव जेथे रहातात असा उत्तम स्वर्ग होय. ज्याने ते अक्षर जाणले नाही. तो विद्या घेऊन काय करणार? ज्याने जाणले तो सुखी. येथे ऋचांची अक्षरे म्हणजेच परम व्योम- सर्व देवांचे आश्रयस्थान असे सांगितले आहे.

ब्रह्म शब्द वेदार्थवाचक आहे. हे ब्राह्मणग्रंथांमध्ये प्रत्यक्ष दिसते.

'ऋग्भ्यो जातां सर्वशो मूर्तिमाहु:। सर्वा गतिर्याजुषी हैव शश्वत्। सर्वं तेज: सामरूप्यं ह शश्वत्। सर्वं हेदं ब्रह्मणा हैव सृष्टम्। (तैत्तिरीय ब्राह्मण ३।१२।९।१)

अर्थ - ऋचांपासून सर्व प्रकारच्या मूर्ती, आकार निर्माण झाले. यजुर्वेद मंत्रांमध्ये सर्व गति सामावलेली आहे. सर्व तेज सामरूपाने वसत आहे. हे सर्व ब्रह्मानेच निर्माण केले आहे.

'ततो ब्रह्मैव प्रथममसृज्यत त्रय्येव विद्या' (शतपथ ब्राह्मण ६।१।१।१०) - ब्रह्मानेच प्रथम त्रयी विद्या निर्माण केली.

'सप्ताक्षरं वै ब्रह्म, ऋगित्येकमक्षरम्, यजुरिति द्वे, सामेति द्वे, अथ यदतोऽन्यद् ब्रह्मैव तत्' (शतपथ ब्राह्मण १०।२।४।६) - ब्रह्म हे सात अक्षरांचे आहे. ऋग् हे एक अक्षर यजुस् ही दोन अक्षरे. साम ही २ अक्षरे याहून जे बाकी ते ब्रह्मच आहे.

म्हणूनच 'ब्रह्मयज्ञ' शब्दाने 'वेदपठन' हा अर्थ शतपथ ब्राह्मणात सांगितला आहे. (शतपथ ब्राह्मण ११।५।७) वेदाचे विश्वशक्तिरूपत्व वर सांगितलेल्या तैत्तिरीय ब्राह्मणातही वर्णिले आहे ते पहावे.

देवधारकशक्तियुक्त, वेदशब्दात्मक ब्रह्म सूक्ष्म कल्पनेने विश्वचैतन्यशक्तीच्या रूपाने उपनिषत्पूर्व वेदांमध्ये वर्णिले यात एक विचारपरिणतिक्रम दिसतो. म्हणून अथर्ववेदातील ब्रह्मपर सूक्ते उपनिषदातील ब्रह्मविचाराच्या प्रस्तावनेतसारखी

वाटतात, असा संबंध निश्चयाने लक्षात येतो. परमार्थवस्तूचा बोध करणाऱ्या आत्मा शब्दाशी ब्रह्मशब्दाची समानार्थता उपनिषदांनी स्पष्टपणे स्वीकारली आहेच. आत्माशब्दाने परमार्थवस्तूचा बोध उपनिषदानींच प्रथम करून दिला.

विश्वचैतन्यशक्ति ब्रह्म, परमार्थवस्तुरूप आत्मा या दोन्ही वस्तूंचे एकार्थाने संगमनाचे कार्य उपनिषदांमध्येच संभवते, त्यापूर्वी क्वचितच कधी आत्मशब्दाचा परमार्थपर अर्थ झाला होता.

ब्रह्म आणि आत्मा यांच्या एकत्र 'ब्रह्मात्मनिश्चयामुळे वेदान्तांनी देवाच्या दास्यात अडकून पडलेल्या पुरुषाला स्वातंत्र्याच्या पराकोटीला पोहोचवला.

'ब्रह्म वा इदमग्र आसीत्, तदात्मानमेवावेत्। अहं ब्रह्मास्मीति। ... तदिदमप्येतर्हि य एवं वेद, अहं ब्रह्मास्मीति, स इदं सर्वे भवति। तस्य ह न देवाश्चन अभूत्या ईशते' (बृहदारण्यक उपनिषद १।४।१०) – प्रथम फक्त ब्रह्मच होते. त्याने जाणले की मी ब्रह्म आहे. म्हणून तो सर्व झाला.. त्या ब्रह्माला जो या प्रकारे जाणतो तो सर्व होऊन जातो... त्याचा पराभव देवही करू शकत नाहीत.

याप्रकारे पुरुष, प्राण, आत्मा, ब्रह्म या शब्दाचा ऐतिहासिक पद्धतीनं प्रतिपाद्य अर्थाचा विकासक्रम, दार्शनिक तत्त्वेतिहासाचा एक भाग म्हणून स्पष्ट केला, तो विचाराला चालना देणारा ठरावा अशी अपेक्षा करून लेखणीला विराम देतो.

***

भाषांतर - प्रा. डॉ. सौ. आशाताई गुर्जर

Publisher - **Prajnapathashala Mandala,**
Wai, Dist Satara (M.S.), India.
(1950)

ooo

(१३०)

लोकमान्यटिळकचरितम्

(चरितम्)

कृ. वा. चितळे

पुरस्कारः

भारतराष्ट्रगुरोः पुण्यश्लोकस्य लोकमान्येत्यसाधारणपदवीभाजो लोकोत्तरचरितप्रभावस्य सकलभारतीयकुलतिलकस्य परमपावनीयेयं कथा गीर्वाणवाण्यां सुश्लिष्टाश्लिष्टपदवाक्यविन्यासैः रचिता सहृदयानां चेतःसु चकास्ति। एषा सुभगा तिलककथाऽष्टादशसु पर्वसु निबद्धा वैयासिक्या महाभारतकथाया औपम्यं चारुतया सूचयन्ती द्योतयति यदयं चरितरचयिता महान्तं पुण्यौघं संपादयन् दुरितपटलं निर्दहंश्च वाचकानामपि दुरिततिमिरं तिरोदध्यात् सुकृतानि च तेभ्यो वितरेदिति। ये किल भारतवर्षेऽन्यत्र च संस्कृतभाषायां प्रविष्टबुद्धयो विदग्धमतयो वा वर्तन्ते ते सर्वेऽप्यस्य तिलकचरितस्य पठनेन स्वात्मानं धन्यं मनिष्यन्ते इत्यत्र मनागपि पदं संदेहो न कुरुते। अस्य चरितस्य पठनेन परं संतोषमधिगच्छन्तो वयमिमं कथारचयितारं सानन्दमभिनन्दयामः। युवानः प्रौढाश्च संस्कृतप्रविष्टमतयो नूनमिमां कथां परिशीलयन्तो तिलकगुरोर्जीवितस्य सकलमनतिविस्तरं च चरितपरामर्शं चित्रपटमिव हृदि चिरं धारयितुं प्रभवेरन्निति।

यस्य स्मरणमात्रेणागण्यपुण्यराशेर्वशीकरणं भवति सोऽयं बालाख्यः प्रज्ञाप्रभुस्तिलकगुरुर्भारतं बलद्वयात्मकेऽधिष्ठाने बिभर्ति। एतद्बलद्वयं निष्ठाद्वयरूपमस्ति। प्रथमा निष्ठा, एकमिदं भारतराष्ट्रं, तस्य स्वराज्यमेकात्मकमेव सर्वैर्भारतीयैः शरणीकरणीयमित्याकारा एकात्मकभारतस्वराज्यनिष्ठा। द्वितीया निष्ठा चिरंतनधार्मिकतत्त्वदर्शनाश्रितः कर्मयोगः।

प्रथमेयं निष्ठा प्रत्यवायबहुलाऽस्ति। बहुलप्रत्यवायपरिहारार्थं बहुभ्यः संवत्सरशतेभ्यः संचितानां भारतीयसामाजिकजीवनधारणायां व्यापत्कराणां पातकानां क्षयार्थं तिलकगुरुणा महद्दीर्घं सुदुष्करं च तप आचरितम्। तेन तिलकतपसा दग्धकिल्बिषे भारतेऽस्मिन् राष्ट्रैक्योद्बोधनकरं स्वात्मबोधोत्थं परं ज्योतिराविर्भूतम्। तदेव प्रथमनिष्ठात्मकम्। तच्च ज्योतिर्भारतीयानां हृदयमन्दिराणि प्रकाशयच्चिरमास्ते। अधिष्ठानभूताया भारतैकत्वभावनाभाविताया ज्योतिःस्वरूपाया अस्या निष्ठाया दूषका अन्तराय-

भूताः प्रत्यवायाः पुनःपुनरुद्भवन्तो भीपयन्ते भारतीयानां चित्तेपु संमोहं जनयित्वा भ्रमं चोद्भाव्येति सर्वैर्विवेकिभिस्तिलकादर्शचिन्तनेन चित्तमालिन्यापनोदनं कृत्वा सावधानमतिभिर्भवितव्यम् । ते च प्रत्यवाया जातिभेद-प्रान्तभेद-भाषाभेद-धर्मभेदेत्याद्युपाधिरूपा विवेकपरिभवाय यतन्ते कानिचिन्निमित्तानि पुरस्कृत्य । बहून्यपरिमेयानि चेमानि निमित्तानि संमोहजननाय प्रभवन्ति काले काले, मानुषस्वभावस्याविवेकजन्यकालुष्यगोचरत्वात् । कदाचित् जातिविशेषपक्षपाताः, कदाचित् प्रादेशिकराज्योपाधिका विसंवादाः, कदाचित् राष्ट्रियभाषाविशेषपोषणार्थोद्यमाः विधानपरिषद्भिः शासनतन्त्रैर्निर्वाचितमन्त्रिमण्डलैर्नेतृश्रेष्ठवर्गेण वा विनियुक्तार्थाधिक्यवशाद्वा विधिविशेषप्रवर्तनाद्वा संस्थाप्रचाराद्वा प्रवर्तिताः, नागरिकगणेषु वैमत्यमुत्पाद्य विद्वेषं विग्रहं च जनयन्ति । आर्थिकनियोजनविशेषेषु विशेषेण एकदाऽन्यं प्रदेशं प्राधान्येन पुरस्कर्तुं युक्तं दृश्येत एकदाऽन्यं च प्रदेशम् । एतदपि पक्षपातदोपशङ्कामुपजनयत् राष्ट्रैक्यभावनां बाधेत । अर्थानां मध्यशासनकृता विषमा विनियोगा अपि अन्ततो राष्ट्रपोषणोदर्का भवन्ति, ते अपि अदीर्घदर्शिभिरनुदारहृदयैः पक्षपातशङ्कामुत्पाद्य दूष्यन्ते । एतानि सर्वाणि संमोहस्थानानि अन्तःकोपकराणि राष्ट्रविदारणानि सर्वथा तिलकप्रदत्तां स्वराज्यैकात्मकसंवित्तिं ज्योतिःस्वरूपामधिष्ठाय निवार्याणि ।

श्रीतिलकसद्गुरुणा निर्मिता द्वितीया निष्ठा कर्मयोगात्मिका भारतभूमिं नितान्तमुपकरोति । पुराणपुरुषोत्तमादारभ्य प्रसृतस्य मध्ये मध्ये भस्मपिहितवह्नेरिव लुप्तप्रायस्य सनातनस्य दिव्यस्य कर्मयोगतत्त्वदर्शनस्योद्धरणेन सर्वेभ्यो जगतीगतेभ्यो धार्मिकतत्त्वदर्शनेभ्यो नितरामतिशेतेऽयं गीतारहस्यपरिष्कृतः कर्मयोगमार्गः । भारतीया यावत्पर्यन्तमिमं श्रीतिलकसद्गुरुणोपदिष्टं स्वयमाचरितं च मार्गं न परित्यक्ष्यन्ति तावत्पर्यन्तं भारतीयान् जेतुं दिवि वा पाताले वा भूतले वा निवसन् सर्वातिशायिनीमपि महाशक्तिं बिभ्रदरिर्न प्रभवेत् । श्रीतिलकगुरुमुखद्वारा साक्षाद्भगवतैवायं पुनर्गीतारहस्यरूपेण श्रावितः सार्वभौमो गीताधर्मो भारतीयेभ्य उपदिष्ट इति श्रद्दध्महे ।

प्राज्ञपाठशाला, वाई
२९-५-५६

लक्ष्मणशास्त्री जोशी तर्कतीर्थः

(Ref.- Written & published by K. W. Chitale
at 1, Dongre Baug, Bhavani Shankar Road, Dadar-Bombay 2

''तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी स्वसाहित्य, संपादित केलेले ग्रंथ नि कोश तसेच अन्य अनेकांच्या ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या आहेत. या प्रस्तावनांची संख्या सुमारे ३०० आहे. पैकी निवडक १२० प्रस्तावना या संग्रहात अंतर्भूत आहेत. त्यांचा काळ १९२८ ते १९९४ असा सुमारे सात दशकांचा आहे. या प्रस्तावनांचा कालपट नि विषयपट लक्षात घेता त्या तर्कतीर्थांच्या ज्ञान वैविध्याचे क्षितिज प्रतिबिंबित करतात. त्यांच्या प्रस्तावना लेखनाची स्वतःची धाटणी आहे. त्या 'इन्सायक्लोपीडिक राइटिंग' च्या शैलीत लिहिल्या गेलेल्या आहेत. विषय स्वरूपांचा विचार केला तर त्या सर्वविषयसंग्राहक आहेत. पार्श्वभूमीत इतिहास, मध्यात वर्तमान, तर उपसंहारात भविष्यवेध अशा नवदिशासूचक प्रस्तावनांची तर्कतीर्थांची शैली त्यांच्या प्रस्तावनांना व्यवच्छेदक बनवते. तर्कतीर्थांच्यातील प्रस्तावनाकार हा चिंतक, विश्लेषक नि तत्त्वज्ञ म्हणून पुढे येतो. त्याला सहसा सुबोध लिहिणे जमत नाही. प्रतिभेचे आश्चर्यकारक विभ्रम घेऊन येणाऱ्या या प्रस्तावना वाचणे म्हणजे तो ग्रंथ समजणे असते.''

– डॉ. सुनीलकुमार लवटे
संपादक



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई